भारत सरकार

**विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३

(१९७४ चा अधिनियम क्रमांक २)

[ ३१ जानेवारी १९९७ रोजी यथाविद्यमान ]

# The Code of Criminal Procedure, 1973

(Act No. 2 of 1974)

[ As in force on 31st January 1997 ]

(महाराष्ट्र विशोधनांसहित)

संचालक, शासन मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रीत व प्रकाशित केले.
(१९९७)

[ किंमत : रु. ४१-०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३० जानेवारी १९९७ रोजी यथाविद्यमान असलेला दि कोड ऑफ क्रिमिनल प्रोसीजर, १९७३ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण भाग बारा, अनुभाग १, खंड ७, अंक १, दिनांक ९ ऑगस्ट १९९६ यात पृष्ठ ३ ते २२२ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक : ९ ऑगस्ट, १९९६.

के. एल. मोहनपुरिया,
सचिव,
भारत सरकार.

## PREFACE

This edition of The Code of Criminal Procedure, 1973, as on the 30th January 1997 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 1, Vol. 7, dated 9th August 1996 on pages 3 to 222.

This autho ritative text was published under the authority of the President undee section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated : 9th August 1996.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the
Government of India.

## केंद्रीय विशोधन अधिनियमांची सूची

१. फौजदारी प्रक्रिया संहिता (विशोधन) अधिनियम, १९७८ (१९७८ चा ४५).

२. फौजदारी प्रक्रिया संहिता (विशोधन) अधिनियम, १९८० (१९८० चा ६३).

३. फौजदारी विधि (विशोधन) अधिनियम, १९८३ (१९८३ चा ४३).

४. फौजदारी विधि (दुसरे विशोधन) अधिनियम, १९८३ (१९८३ चा ४६).

५. फौजदारी प्रक्रीया संहिता (विशोधन) अधिनियम, १९८८ (१९८८ चा ३२).

६. फौजदारी प्रक्रिया संहिता (विशोधन) अधिनियम, १९९० (१९९० चा १०).

७. फौजदारी प्रक्रिया संहिता (विशोधन) अधिनियम, १९९१ (१९९१ चा ४३).

८. फौजदारी प्रक्रीया संहिता (विशोधन) अधिनियम, १९९३ (१९९३ चा ४०).

९. फौजदारी विधि (विशोधन) अधिनियम, १९९३ (१९९३ चा ४२).

---

## महाराष्ट्र विशोधन अधिनियमांची सूची

१. फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७६ (१९७६ चा २३).

२. फौजदारी प्रक्रीया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७६ (१९७६ चा २४).

३. फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७७ (१९७८ चा १).

४. फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८१ (१९८१ चा ७).

५. फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८१ (१९८१ चा ३४).

६. फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८१ (१९८१ चा ६०).

# फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३

## कलमांचा क्रम

### प्रकरण एक

### प्रारंभिक

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. निर्देशांचा अर्थ लावणे.

४. 'भारतीय दंड संहिते' खालील व अन्य कायद्यांखालील अपराधांची संपरीक्षा.

५. व्यावृत्ति.

### प्रकरण दोन

### फौजदारी न्यायालये व अधिकारपदे घटित करणे

६. फौजदारी न्यायालयांचे वर्ग.

७. प्रादेशिक विभाग.

८. महानगर क्षेत्र.

९. सत्र न्यायालय.

१०. सहाय्यक सत्र न्यायाधीश दुय्यम असणे.

११. न्याय दंडाधिकाऱ्यांची न्यायालये.

१२. मुख्य न्याय दंडाधिकारी आणि अपर मुख्य न्याय दंडाधिकारी.

१३. विशेष न्याय दंडाधिकारी.

१४. न्याय दंडाधिकाऱ्यांची स्थानिक अधिकारिता.

१४-क. विनिर्दिष्ट प्रकरणांत किंवा स्थानिक क्षेत्रात न्याय दंडाधिकाऱ्याकडे अधिकारिता विनिहित करणे.

१५. न्याय दंडाधिकाऱ्यांची दुय्यमता.

१६. महानगर दंडाधिकाऱ्यांची न्यायालये.

१७. मुख्य महानगर दंडाधिकारी आणि अपर मुख्य महानगर दंडाधिकारी.

१८. विशेष महानगर दंडाधिकारी.

१९. महानगर दंडाधिकाऱ्यांची दुय्यमता.

२०. कार्यकारी दंडाधिकारी.

२१. विशेष कार्यकारी दंडाधिकारी.

२२. कार्यकारी दंडाधिकाऱ्यांची स्थानिक अधिकारिता.

२३. कार्यकारी दंडाधिकाऱ्यांची दुय्यमता.

२४. सरकारी अभियोक्ते.

२५. सहाय्यक सरकारी अभियोक्ते.

### प्रकरण तीन

### न्यायालयांचा अधिकार

२६. कोणत्या न्यायालयांना अपराधांची संपरीक्षा करावयाची.

२७. बाल गुन्हेगारांच्या बाबतीत अधिकारिता.

कलमे

२८. उच्च न्यायालये व सत्र न्यायाधीश कोणत्या शिक्षा देऊ शकतील.

२९. दंडाधिकारी कोणत्या शिक्षा देऊ शकतील.

३०. द्रव्यदंड भरण्यात कसूर झाल्यास कारावासाची शिक्षा.

३१. एका संपरीक्षेत अनेक अपराधांबद्दल दोषसिद्धी झाल्यास त्याप्रकरणी द्यावयाची शिक्षा.

३२. शक्ती प्रदान करण्याची पद्धत.

३३. नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांची शक्ती.

३४. शक्ती काढून घेणे.

३५. न्यायाधीशांच्या व दंडाधिकाऱ्यांच्या शक्ती त्यांच्या पदीय उत्तराधिकाऱ्यांना वापरता येणे.

प्रकरण चार

क-वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या शक्ती

३६. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या शक्ती.

ख-दंडाधिकाऱ्यांना व पोलिसांना सहाय्य

३७. दंडाधिकाऱ्यांना व पोलिसांना जनतेने केव्हा सहाय्य करावयाचे.

३८. पोलीस अधिकाऱ्यांखेरीज अन्य अशा, वॉरंट बजावणाऱ्या व्यक्तीला मदत.

३९. विवक्षित अपराधांची जनतेने वर्दी देणे.

४०. गावाच्या कारभारासंबंधात नेमलेल्या अधिकाऱ्यांनी विवक्षित अहवाल देणे हे त्यांचे कर्तव्य.

प्रकरण पाच

व्यक्तींना अटक करणे

४१. पोलीस वॉरंटाशिवाय केव्हा अटक करू शकतील.

४२. नाव व राहण्याचे ठिकाण सांगण्यास नकार दिल्यावरुन अटक.

४३. खाजगी व्यक्तीकडून अटक आणि अशी अटक झाल्यावरची कार्यपद्धती.

४४. दंडाधिकाऱ्यांकडून अटक.

४५. सशस्त्र सेनादलांच्या सदस्यांना अटकेपासून संरक्षण.

४६. अटक कशी करावयाची.

४७. अटक करावयाच्या व्यक्तीने प्रवेश केलेल्या स्थळांची झडती.

४८. अपराध्यांचा अन्य अधिकारिता क्षेत्रामध्ये पाठलाग.

४९. कोणताही अनावश्यक निर्बंध नसणे.

५०. अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला अटकेच्या कारणांची व जामिनाच्या हक्काची माहिती देणे.

५१. अटक झालेल्या व्यक्तीची झडती.

५२. मारक हत्यारे अभिग्रहण करण्याची शक्ती.

५३. पोलीस अधिकाऱ्यांच्या विनंतीवरुन वैद्यक व्यवसायीने आरोपीची तपासणी करणे.

५४. अटक केलेल्या व्यक्तीची तिच्या विनंतीवरून वैद्यक व्यवसायीने तपासणी करणे.

५५. पोलीस अधिकारी वॉरंटाशिवाय अटक करण्यासाठी दुय्यम अधिकाऱ्याला प्रतिनियुक्त करतो त्या बाबतीतील कार्यपद्धती.

५६. अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला दंडाधिकाऱ्यापुढे किंवा पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्यापुढे नेणे.

५७. अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला चोवीस तासांहून अधिक काळ स्थानबद्ध करुन ठेवावयाचे नाही.

५८. पकडीचे वृत्त पोलीस अधिकाऱ्यांनी कळवणे.

कलमे

५९. पकड केलेल्या व्यक्तीची विमुक्ती.

६०. निसटल्यावर पाठलाग करण्याची व पुन्हा पकडण्याची शक्ती.

प्रकरण सहा

उपस्थित राहण्यास भाग पाडण्यासाठी आदेशिका

क-समन्स

६१. समन्सचे प्रारूप.

६२. समन्स कसे बजावले जाते.

६३. निगम-निकाय व सोसायटया यांच्यावर समन्स बजावणे.

६४. ज्यांना समन्स पाठवलेले असेल त्या व्यक्ती सापडू शकत नसतील त्याबाबतीतील बजावणी.

६५. यापूर्वी उपबंधित केल्याप्रमाणे बजावणी केली जाऊ शकत नसेल त्याबाबतीतील कार्यपद्धती.

६६. शासकीय कर्मचाऱ्यांवर बजावणी.

६७. स्थानिक मर्यादांच्या बाहेर समन्सची बजावणी.

६८. अशा प्रकरणांमध्ये व बजावणी करणारा अधिकारी उपस्थित नसेल त्या बाबतीत बजावणीचा पुरावा.

६९. साक्षीदारांवर डाकेने समन्सची बजावणी.

ख-अटकेचे वॉरंट

७०. अटकेच्या वॉरंटाचे प्रारूप व त्याची मुदत.

७१. जामीन घ्यावयाचा निदेश देण्याची शक्ती.

७२. वॉरंटे, कोणाला निदेशून लिहिता येतील.

७३. वॉरंट कोणत्याही व्यक्तीला निदेशून लिहिता येणे.

७४. पोलीस अधिकाऱ्याला निदेशून लिहिलेले वॉरंट.

७५. वॉरंटाचा आशय विदित करणे.

७६. अटक केलेल्या व्यक्तीला विनाविलंब न्यायालयापुढे आणणे.

७७. वॉरंटाची अंमलबजावणी कोठे करता येईल.

७८. अधिकारिता क्षेत्राबाहेर अंमलबजावणी करण्यासाठी पाठवलेले वॉरंट.

७९. अधिकारिता क्षेत्राबाहेर अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस अधिकाऱ्याला निदेशून लिहिलेले वॉरंट.

८०. ज्या व्यक्तीविरुद्ध वॉरंट काढलेले असेल तिला अटक केल्यानंतरची प्रक्रिया.

८१. अटक केलेल्या व्यक्तीला ज्या दंडाधिकाऱ्यासमोर आणले असेल त्याने अनुसरावयाची प्रक्रिया.

ग-उद्घोषणा व जप्ती

८२. फरारी व्यक्तीबद्दल उद्घोषणा.

८३. फरारी व्यक्तीच्या संपत्तीवर जप्ती आणणे.

८४. हक्क मागण्या जप्तीला हरकती.

८५. जप्त केलेली संपत्ती मुक्त करणे, विकणे व परत करणे.

८६. जप्त केलेली संपत्ती परत करण्याविषयीचा अर्ज फेटाळणाऱ्या आदेशावर अपील.

घ-आदेशिकाविषयी अन्य नियम

८७. समन्स ऐवजी किंवा त्याच्या बरोबरच वॉरंट काढणे.

८८. उपस्थितीसाठी बंधपत्र घेण्याची शक्ती.

८९. उपस्थिती-बंधपत्राचा भंग केल्यास अटक.

९०. या प्रकरणाचे उपबंध सर्वसाधारणपणे समन्सांना व अटकेच्या वॉरंटांना लागू असणे.

## प्रकरण सात

### वस्तू हजर करण्याची सक्ती करणारी आदेशिका

कलमे

**क-हजर करण्यासाठी समन्स**

९१. दस्तऐवज किंवा अन्य वस्तू हजर करण्यासाठी समन्स.

९२. पत्रे व तारा याबाबतची कार्यपद्धती.

**ख-झडती वॉरंटे**

९३. झडती-वॉरंट केव्हा काढता येईल.

९४. जेथे चोरीची संपत्ती, बनावट दस्तऐवज इ.-असल्याचा संशय असेल त्या जागेची झडती.

९५. विवक्षित प्रकाशने समपहृत करण्यात आल्याचे घोषित करण्याची व त्यासाठी झडती वॉरंटे काढण्याची शक्ती.

९६. समपहरणाची घोषणा रद्द ठरवण्यासाठी उच्च न्यायालयाकडे अर्ज.

९७. गैरपणे परिरूद्ध केलेल्या व्यक्तींना शोधून काढण्यासाठी झडती.

९८. अपहरण केलेल्या स्त्रियांना पूर्ववत मोकळे करण्यास भाग पाडण्याची शक्ती.

**ग-झडत्यासंबंधीचे सर्वसाधारण उपबंध**

९९. झडती वॉरंट अंमलबजावणीसाठी निदेशित करणे, इत्यादी.

१००. बंदिस्त जागेचा ताबा ज्यांच्याकडे असेल त्या व्यक्तींनी झडतीस मुभा देणे.

१०१. अधिकार क्षेत्रापलिकडे झडती घेताना सापडलेल्या वस्तूंची विल्हेवाट.

**घ-संकीर्ण**

१०२. विवक्षित संपत्ती अभिग्रहण करण्याची पोलीस अधिकाऱ्याची शक्ती.

१०३. दंडाधिकारी आपल्या समक्ष झडती घेण्याचा निदेश देऊ शकेल.

१०४. हजर केलेला दस्तऐवज, इत्यादी अवरूद्ध करण्याची शक्ती.

१०५. आदेशिकांविषयी प्रतियोगी व्यवस्था.

## प्रकरण सात-क

### विवक्षित प्रकरणांमधील सहाय्यासाठी अन्योन्य व्यवस्था आणि संपत्तीच्या जप्तीसाठी आणि समपहरणासाठी कार्यपद्धती

१०५क. व्याख्या.

१०५ख. व्यक्तींचे स्थलांतर करण्यासाठी सहाय्य.

१०५ग. संपत्तीची जप्ती किंवा समपहरण यासंबंधातील आदेशांबाबत सहाय्य.

१०५घ. बेकायदेशीररित्या संपादित केलेली संपत्ती ओळखणे.

१०५ङ. संपत्तीचे अभिग्रहण किंवा जप्ती.

१०५च. या प्रकरणा अन्वये अभिग्रहण केलेल्या किंवा जप्त केलेल्या संपत्तीचे व्यवस्थापन.

१०५छ. संपत्तीच्या समपहरणाची नोटीस.

१०५ज. विवक्षित प्रकरणात संपत्तीचे समपहरण.

१०५झ. समपहरणाऐवजी दंड.

१०५ञ. विवक्षित हस्तांतरणे रद्दबातल ठरणे.

१०५ट. विनंतीपत्राच्या बाबतीतील कार्यपद्धती.

१०५ठ. या प्रकरणाची प्रयुक्ती.

## प्रकरण आठ

कलमे **शांतता राखण्यासाठी व चांगल्या वागणुकीसाठी जामीन**

१०६. दोषसिद्धी झाल्यावर शांतता राखण्यासाठी जामीन.

१०७. अन्य प्रकरणी शांतता राखण्यासाठी जामीन.

१०८. प्रजाक्षोभक साहित्य प्रसृत करणाऱ्या व्यक्तींकडून चांगल्या वागणुकीसाठी जामीन.

१०९. संशयित व्यक्तींकडून चांगल्या वागणुकीसाठी जामीन.

११०. सराईत अपराध्यांकडून चांगल्या वागणुकीसाठी जामीन.

१११. आदेश काढणे.

११२. न्यायालयात हजर असलेल्या व्यक्तीबाबतची कार्यपद्धती.

११३. अशा हजर नसलेल्या व्यक्तीच्या बाबतीत समन्स किंवा वॉरंट.

११४. आदेशाची प्रत समन्सच्या किंवा वॉरंटाच्या सोबत असणे.

११५. जातीनिशी हजेरी अनावश्यक करण्याची शक्ती.

११६. खबरीच्या सत्यतेबाबत चौकशी.

११७. जामीन देण्याचा आदेश.

११८. जिच्याविरुद्ध खबर मिळाली असेल त्या व्यक्तीला विनादोषारोप सोडणे.

११९. ज्या कालावधीकरता जामीन आवश्यक असेल त्याची सुरुवात.

१२०. बंधपत्राचा मजकूर.

१२१. जामीनदार नाकारण्याची शक्ती.

१२२. जामीन देण्यात कसूर झाल्यास कारावास.

१२३. जामीन देण्यास चूक झाल्याबद्दल तुरुंगात पाठवलेल्या व्यक्तींना बंधमुक्त करण्याची शक्ती.

१२४. बंधपत्राच्या न सरलेल्या कालावधीकरिता जामीन.

## प्रकरण नऊ

### पत्नी, अपत्ये आणि आईबाप यांच्या निर्वाहाकरिता आदेश

१२५. पत्नी, अपत्ये आणि आईबाप यांच्या निर्वाहाकरिता आदेश.

१२६. कार्यपद्धती.

१२७. भत्ता कमीअधिक करणे.

१२८. निर्वाह-खर्चाच्या आदेशाची अंमलबजावणी.

## प्रकरण दहा

### सार्वजनिक सुव्यवस्था व प्रशांतता राखणे

१२९. मुलकी बळाचा वापर करून जमाव पांगवणे.

१३०. जमाव पांगवण्यासाठी सशस्त्र सेनादलाचा वापर.

१३१. जमाव पांगवण्याची सशस्त्र सेनादलाच्या विवक्षित अधिकाऱ्यांची शक्ती.

१३२. मागील कलमांखाली केलेल्या कृतींबद्दल खटला भरला जाण्यापासून संरक्षण.

### ख-सार्वजनिक उपद्रव

१३३. सार्वजनिक उपद्रव दूर करण्यासाठी सशर्त आदेश.

१३४. आदेशाची बजावणी किंवा अधिसूचना.

१३५. आदेश ज्या व्यक्तीला उद्देशून असेल तिने त्याचे पालन करणे किंवा कारण दाखवणे.

१३६. तसे करण्यास ती चुकल्याचे परिणाम.

कलमे

१३७. सार्वजनिक हक्काचे अस्तित्व नाकबूल केले गेल्यास त्या बाबतीतील कार्यपद्धती.

१३८. ती व्यक्ती कारण दाखवण्यासाठी उपस्थित होईल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.

१३९. स्थानिक अन्वेषणासाठी व तज्ञांची साक्ष तपासणी करण्यासाठी निदेश देण्याची दंडाधिकाऱ्याची शक्ती.

१४०. लेखी अनुदेश देणे, इत्यादींची दंडाधिकाऱ्याची शक्ती.

१४१. आदेश कायम करण्यात आल्यावरची कार्यपद्धती आणि अवज्ञेचे परिणाम.

१४२. चौकशी होईतोवर मनाई हुकूम.

१४३. सार्वजनिक उपद्रव पुन्हा करण्यास किंवा तो चालू ठेवण्यास दंडाधिकारी मनाई करू शकेल.

ग-उपद्रवाची किंवा आशंकित संकटाची तातडीची प्रकरणे

१४४. उपद्रवाच्या किंवा आशंकित संकटाच्या अशा तातडीच्या प्रकरणात आदेश काढण्याची शक्ती.

घ-स्थावर संपत्तीबाबत तंटे

१४५. जमीन किंवा पाणी यासंबंधीच्या तंट्यामुळे शांतताभंग घडून येण्याचा संभव असतो त्याबाबतीतील कार्यपद्धती.

१४६. तंट्याची विषय वस्तू जप्त करण्याची आणि प्रापक नियुक्त करण्याची शक्ती.

१४७. जमिनीचा किंवा पाण्याचा वापर करण्याच्या हक्कासंबंधीचा तंटा.

१४८. स्थानिक चौकशी.

प्रकरण अकरा

पोलिसांची प्रतिबंधक कारवाई

१४९. पोलिसांनी दखलपात्र अपराधांना प्रतिबंध करणे.

१५०. दखलपात्र अपराध करण्याचा बेत रचण्यात आल्याची खबर.

१५१. दखलपात्र अपराध करण्यास प्रतिबंध करण्यासाठी अटक.

१५१-क. पोट-कलम (१) खाली अटक करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला, तिच्या अटकेच्या वेळेपासून चोवीस तासापेक्षा अधिक काळपर्यंत हवालातीत स्थानबद्ध केले जाणार नाही.

१५२. सार्वजनिक संपत्तीला क्षती पोहचविण्यास प्रतिबंध.

१५३. वजने व मापे यांची तपासणी.

प्रकरण बारा

पोलिसांना वर्दी देणे आणि अन्वेषण करण्याच्या त्यांच्या शक्ती

१५४. दखलपात्र प्रकरणांतील वर्दी.

१५५. बिन दखली प्रकरणांबाबत वर्दी आणि अशा प्रकरणांचे अन्वेषण.

१५६. दखलपात्र प्रकरणांचे अन्वेषण करण्याची पोलीस अधिकाऱ्याची शक्ती.

१५७. अन्वेषणाची कार्यपद्धती.

१५८. अहवाल कसा सादर करावयाचा.

१५९. अन्वेषण किंवा प्रारंभिक चौकशी करण्याची शक्ती.

१६०. साक्षीदारांना समक्ष हजर राहण्यास फर्मावण्याची शक्ती.

१६१. पोलिसांनी घ्यावयाची साक्षीदारांची तपासणी.

१६२. पोलिसांनी दिलेले जबाब स्वाक्षरित करावयाचे नाहीत : त्या जबाबाचा पुराव्यात उपयोग.

१६३. कोणतेही प्रलोभन दाखवावयाचे नाही.

१६४. कबुली जबाब आणि जबाब नोंदून घेणे.

कलमे

१६५. पोलिस अधिकाऱ्याने घ्यावयाची झडती.

१६६. एका पोलीस ठाणे अंमलदार अधिकाऱ्याला अशा दुसऱ्या अधिकाऱ्याकडे झडती-वॉरंट काढण्याची मागणी केव्हा करता येईल.

१६७. जेव्हा अन्वेषण चोवीस तासात संपवणे शक्य नसेल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.

१६८. दुय्यम पोलीस अधिकाऱ्याकडून अन्वेषणाचा अहवाल.

१६९. जेव्हा पुरावा अपुरा असेल तेव्हा आरोपीची बंधमुक्तता.

१७०. जेव्हा पुरावा पुरेसा असेल तेव्हा दंडाधिकाऱ्याकडे पाठवावयाची प्रकरणे.

१७१. फिर्यादिदार किंवा साक्षीदार यांना पोलीस अधिकाऱ्याबरोबर जाण्यास भाग पाडता कामा नये व त्यांच्यावर निर्बंध लादता कामा नयेत.

१७२. अन्वेषणातील कार्यवाहीचा रोजनामा.

१७३. अन्वेषण पुरे झाल्यावर पोलीस अधिकाऱ्याचा अहवाल.

१७४. आत्महत्या, इत्यादींबाबत पोलिसांनी चौकशी करणे व अहवाल देणे.

१७५. व्यक्तींना समन्स पाठवण्याची शक्ती.

१७६. मृत्यूच्या कारणाची दंडाधिकाऱ्याने चौकशी करणे.

## प्रकरण तेरा

### चौकशी व संपरीक्षा याबाबत फौजदारी न्यायालयांची अधिकारिता

१७७. चौकशीचे व संपरीक्षेचे सर्वसामान्य स्थळ.

१७८. चौकशीचे किंवा संपरीक्षेचे स्थळ.

१७९. जेथे कृत्य करण्यात आले असेल किंवा परिणाम घडून आला असेल त्या ठिकाणी अपराध संपरीक्षा योग्य.

१८०. एखादी कृती अन्य अपराधाशी तिचा संबंध असल्यामुळे अपराध ठरत असेल त्या बाबतीतील संपरीक्षेचे स्थळ.

१८१. विवक्षित अपराधांच्या बाबतीत संपरीक्षेचे स्थळ.

१८२. पत्रे, इत्यादींद्वारे केलेले अपराध.

१८३. प्रवासात किंवा जलप्रवासात केलेला अपराध.

१८४. एकत्रितपणे संपरीक्षायोग्य असलेल्या अपराधांच्या संपरीक्षेचे स्थळ.

१८५. निरनिराळ्या सत्र-विभागांत खटल्यांची संपरीक्षा करण्याचा आदेश देण्याची शक्ती.

१८६. शंका असल्यास, कोणत्या जिल्ह्यात चौकशी किंवा संपरीक्षा व्हावी ते उच्च न्यायालयाने ठरविणे.

१८७. स्थानिक अधिकारितेच्या पलिकडे केलेल्या अपराधाबद्दल समन्स किंवा वॉरंट काढण्याची शक्ती.

१८८. भारताबाहेर करण्यात आलेला अपराध.

१८९. भारताबाहेर केलेल्या अपराधांसंबंधीचा पुरावा दाखल करून घेणे.

## प्रकरण चौदा

### कार्यवाही सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या शर्ती

१९०. दंडाधिकाऱ्यांनी अपराधांची दखल घेणे.

१९१. आरोपींच्या अर्जावरुन वर्ग करणे.

१९२. दंडाधिकाऱ्याकडे प्रकरण सोपवणे.

१९३. सत्र-न्यायालयांनी अपराधांची दखल घेणे.

१९४. अपर व सहायक सत्र-न्यायाधिशांनी त्यांच्याकडे सोपवण्यात आलेल्या प्रकरणांची संपरीक्षा करणे.

कलमे

१९५. लोकसेवकांच्या वैध प्राधिकाराच्या अवमानाबद्दल सार्वजनिक न्यायाविरुद्ध केलेल्या अपराधांबद्दल आणि पुराव्यात दिलेल्या दस्तऐवजासंबंधीच्या अपराधांबद्दल खटला.

१९६. देशविरोधी अपराधांबद्दल व असा अपराध करण्याविषयीच्या फौजदारीपात्र कटाबद्दल खटला.

१९७. न्यायाधीश किंवा लोकसेवक यांच्याविरुद्ध खटला.

१९७-क. दिवाणी न्यायालयाने नेमलेल्या आयोगावरील किंवा प्रापकावरील खटला.

१९८. विवाहविरोधी अपराधाबद्दल खटला.

१९८-क. 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ४९८-क खालील अपराधांबद्दल शिक्षा.

१९९. अब्रुनुकसानीबद्दल खटला.

## प्रकरण पंधरा

### दंडाधिकाऱ्याकडे फिर्यादी

२००. फिर्यादादारांची साक्ष तपासणी.

२०१. प्रकरणांची दखल घेण्यास सक्षम नसलेल्या दंडाधिकाऱ्याने अनुसरावयाची कार्यपद्धती.

२०२. आदेशिका काढण्याचे लांबणीवर टाकणे.

२०३. फिर्याद काढून टाकणे.

## प्रकरण सोळा

### दंडाधिकाऱ्यापुढे कार्यवाही सुरू करणे

२०४. आदेशिका काढणे.

२०५. दंडाधिकारी आरोपीची जातिनिशी उपस्थिती माफ करू शकेल.

२०६. क्षुल्लक अपराधाच्या प्रकरणी विशेष समन्स.

२०७. पोलीस अहवालाची प्रत व अन्य दस्तऐवज आरोपीला पुरवणे.

२०८. सत्र न्यायालयाने संपरीक्षा करण्याजोग्या खटल्यांमध्ये आरोपीला जबाबांच्या व दस्तऐवजांच्या प्रती पुरवणे.

२०९. जेव्हा अपराध केवळ सत्र न्यायालयानेच संपरीक्षा करण्याजोगा असेल तेव्हा त्याच्याकडे तो खटला सुपूर्द करणे.

२१०. फिर्यादजन्य खटला असून त्याच अपराधाबाबत पोलिसांकडून अन्वेषण चालू असेल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.

## प्रकरण सतरा

### दोषारोप

#### क-दोषारोपांचे प्ररूप

२११. दोषारोपांचा मजकूर.

२१२. वेळ, स्थळ आणि व्यक्ती यासंबंधीचा तपशील.

२१३. अपराध करण्याची रीत नमूद करणे केव्हा आवश्यक.

२१४. ज्या कायद्याखाली अपराध दंडनीय आहे त्याच्या अर्थाने दोषारोपातील शब्द समजून घेणे.

२१५. चुकांचा परिणाम.

२१६. न्यायालयाला दोषारोपात फेरबदल करता येणे.

२१७. दोषारोपात फेरबदल केला असेल तेव्हा साक्षीदारांना पुन्हा बोलावणे.

#### ख-दोषारोपांचे संयोजन

२१८. वेगवेगळ्या अपराधांकरिता अलगअलग दोषारोप.

२१९. एका वर्षातील एकाच प्रकारच्या तीन अपराधांबद्दल एकत्रितपणे दोषारोप ठेवता येणे.

कलमे

२२०. एकाहून अधिक अपराधांची संपरीक्षा.

२२१. कोणता अपराध करण्यात आलेला आहे याबद्दल शंका असेल तेथे.

२२२. शाबीत केलेल्या अपराधात जेव्हा दोषारोप केलेला अपराध समाविष्ट असेल तेव्हा.

२२३. कोणत्या व्यक्तीवर संयुक्तपणे दोषारोप ठेवता येईल.

२२४. अनेक दोषारोपांपैकी एकाबाबत दोषसिद्धी झाल्यावर उरलेले दोषारोप मागे घेणे.

प्रकरण अठरा

**सत्र न्यायालयापुढील संपरीक्षा**

२२५. सरकारी अभियोक्त्याने संपरीक्षा चालवणे.

२२६. फिर्यादी पक्षातर्फे प्रारंभिक कथन करणे.

२२७. विनादोषारोप सुटका.

२२८. दोषारोपाची मांडणी करणे.

२२९. अपराधीपणाच्या कबुलीवरून दोषसिद्धी.

२३०. फिर्यादी पक्षाच्या साक्षीपुराव्यासाठी तारीख.

२३१. फिर्यादी पक्षातर्फे साक्षीपुरावा.

२३२. दोषमुक्ती.

२३३. बचावाला सुरुवात करणे.

२३४. युक्तिवाद.

२३५. दोषमुक्ती किंवा दोषसिद्धी यांचा न्यायनिर्णय.

२३६. पूर्वीची दोषसिद्धी.

२३७. कलम १९९ (२) खालील गुदरलेल्या खटल्यांतील कार्यपद्धती.

प्रकरण ऐकोणीस

**दंडाधिकाऱ्याने करावयाची वॉरंट खटल्याची संपरीक्षा**

**क-पोलीस अहवालावरून गुदरलेले खटले**

२३८. कलम २०७ चे अनुपालन.

२३९. आरोपीला केव्हा विनादोषारोप सोडले जाईल.

२४०. दोषारोपांची मांडणी करणे.

२४१. अपराधीपणाच्या कबुलीवरून दोषसिद्धी.

२४२. फिर्यादी पक्षातर्फे साक्षीपुरावा.

२४३. बचाव पक्षातर्फे साक्षीपुरावा.

**ख-पोलीस अहवालाव्यतिरिक्त अन्यथा दाखल केलेले खटले**

२४४. फिर्यादी पक्षातर्फे साक्षीपुरावा.

२४५. आरोपीला केव्हा विनादोषारोप सोडले जाईल.

२४६. आरोपीला विनादोषारोप सोडले जात नाही तेव्हाची कार्यपद्धती.

२४७. बचाव पक्षातर्फे साक्षीपुरावा.

**ग-संपरीक्षेची समाप्ती.**

२४८. दोषमुक्ति किंवा दोषसिद्धी.

२४९. फिर्याददाराची अनुपस्थिती.

२५०. वाजवी कारणाशिवाय आरोप केल्याबद्दल भरपाई.

## प्रकरण वीस

### दंडाधिकाऱ्यांनी करावयाची समन्स खटल्याची संपरीक्षा

**कलमे**

२५१. आरोपाचा आशय सांगणे.

२५२. अपराधीपणाच्या कबुलीवरून दोषसिद्धी.

२५३. आरोपीच्या अनुपस्थितीत क्षुल्लक प्रकरणात अपराधीपणाच्या कबुलीवरून दोषसिद्धी.

२५४. सिद्धदोष ठरवण्यात आले नसेल तेव्हाची कार्यपद्धती.

२५५. दोषमुक्ती किंवा दोषसिद्धी.

२५६. फिर्यादिदाराची अनुपस्थिती किंवा मृत्यू.

२५७. फिर्याद काढून घेणे.

२५८. विवक्षित प्रकरणी कार्यवाही थांबवण्याची शक्ती.

२५९. समन्स खटल्याचे वॉरंट खटल्यात रूपांतर करणे.

## प्रकरण ऐकवीस

### संक्षिप्त संपरीक्षा

२६०. संक्षिप्त संपरीक्षा करण्याची शक्ती.

२६१. द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्यांनी करावयाची संक्षिप्त संपरीक्षा.

२६२. संक्षिप्त संपरीक्षांची कार्यपद्धती.

२६३. संक्षिप्त संपरीक्षांमधील अभिलेख.

२६४. संक्षिप्त संपरीक्षा केलेल्या खटल्यांतील न्याय निर्णय.

२६५. अभिलेखाची व न्यायनिर्णयाची भाषा.

## प्रकरण बावीस

### कारागृहात बंदिवान किंवा स्थानबद्ध केलेल्या व्यक्तींची समक्ष हजेरी

२६६. व्याख्या.

२६७. कैद्यांना समक्ष हजर करण्यास फर्मावण्याची शक्ती.

२६८. राज्य शासनाच्या विवक्षित व्यक्तींना कलम २६७ च्या प्रवर्तनातून वगळण्याची शक्ती.

२६९. कारागृहाच्या अंमलदार अधिकाऱ्याने विवक्षित संभाव्य प्रसंगी आदेशाचे पालन करण्यापासून परावृत्त राहणे.

२७०. कैद्याला न्यायालयापुढे बंदोबस्तात आणणे.

२७१. कारागृहातील साक्षीदाराच्या तपासणीसाठी आयोगपत्र काढण्याची शक्ती.

## प्रकरण तेवीस

### चौकशी व संपरीक्षा यातील साक्षीपुरावा

### क-साक्षीपुरावा घेण्याची व नोंदवण्याची पद्धत

२७२. न्यायालयांची भाषा.

२७३. साक्षीपुरावा आरोपीच्या समक्ष घेणे.

२७४. समन्स, खटल्यातील चौकशी मधील अभिलेख.

२७५. वॉरंट खटल्यातील अभिलेख.

२७६. सत्र न्यायालयापुढील संपरीक्षेतील अभिलेख.

२७७. साक्षीच्या अभिलेखाची भाषा.

कलमे

२७८. अशी साक्ष पुरी होईल तेव्हा त्याबाबत करावयाची कार्यपद्धती.
२७९. आरोपीला किंवा त्याच्या वकिलाला साक्षीचे भाषांतर करून सांगणे.
२८०. साक्षीदाराच्या चालचर्येबाबत शेरे.
२८१. आरोपीच्या साक्ष तपासणीचा अभिलेख.
२८२. दुभाषी खरेखुरे भाषांतर करण्यास बांधलेला असणे.
२८३. उच्च न्यायालयातील अभिलेख.

ख-साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्र

२८४. केव्हा साक्षीदाराची समक्ष हजेरी माफ करून आयोगपत्र काढता येईल.
२८५. आयोगपत्र कोणाला निदेशून काढावयाचे.
२८६. आयोगपत्रांची अंमलबजावणी.
२८७. पक्षकारांना साक्षीदाराची तपासणी घेता येईल.
२८८. आयोगपत्र प्रतिवेदनासह परत पाठवणे.
२८९. कार्यवाहीची तहकुबी.
२९०. विदेशी आयोग पत्रांची अंमलबजावणी.
२९१. वैद्यकीय साक्षीदाराची जबानी.
२९२. टाकसाळीच्या अधिकाऱ्यांचा साक्षीपुरावा.
२९३. विवक्षित शासकीय वैज्ञानिक तज्ञांचे अहवाल.
२९४. विवक्षित दस्तऐवजांच्या औपचारिक शाबितीची जरुरी नसणे.
२९५. लोकसेवकांच्या वर्तनाच्या शाबितीसाठी प्रतिज्ञालेख.
२९६. प्रतिज्ञालेखाद्वारे औपचारिक स्वरूपाचा साक्षीपुरावा.
२९७. कोणत्या प्राधिकाऱ्यासमोर प्रतिज्ञालेख शपथपूर्वक करता येतील.
२९८. पूर्वीची दोषसिद्धी किंवा दोषमुक्ती कशी शाबित करावयाची.
२९९. आरोपीच्या अनुपस्थितीत पुराव्याचा अभिलेख.

प्रकरण चोवीस

चौकशी व संपरीक्षा यासंबंधीचे सर्वसाधारण उपबंध

३००. एकदा सिद्धदोष किंवा दोषमुक्त ठरवण्यात आलेल्या व्यक्तीची त्याच अपराधाबद्दल संपरीक्षा करावयाची नाही.
३०१. सरकारी अभियोक्त्यांनी उपस्थित राहणे.
३०२. खटला चालवण्यास परवानगी.
३०३. जिच्या विरुद्ध कार्यवाही सुरू करण्यात आली त्या व्यक्तीला स्वतःचा बचाव करून घेण्याचा हक्क.
३०४. विवक्षित बाबतीत राज्याच्या खर्चाने आरोपीला कायदेविषयक सहाय्य.
३०५. निगम किंवा नोंदीव सोसायटी ही आरोपी असेल त्याबाबतीतील कार्यपद्धती.
३०६. सह अपराधीला माफी देऊ करणे.
३०७. माफी देऊ करण्याचा निदेश देण्याची शक्ती.
३०८. माफीच्या शर्तीचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्तीची संपरीक्षा.
३०९. कार्यवाही पुढे ढकलण्याची किंवा तहकूब करण्याची शक्ती.
३१०. स्थळाची पाहणी.
३११. महत्त्वाच्या साक्षीदारास समन्स काढण्याचा किंवा हजर असलेल्या व्यक्तीची साक्ष तपासणी करण्याची शक्ती.

कलमे

३१२. फिर्यादिदारांचा व साक्षीदारांचा खर्च.

३१३. आरोपीची तपासणी करण्याचा अधिकार.

३१४. तोंडी युक्तिवाद व युक्तिवादाचे टिप्पण.

३१५. आरोपी व्यक्ती साक्षीदार होण्यास सक्षम असणे.

३१६. प्रकटन करण्यास प्रवृत्त करण्यासाठी दडपण आणावयाचे नाही.

३१७. विवक्षित प्रकरणी आरोपीच्या अनुपस्थितीत चौकशी व संपरीक्षा करण्यासाठी उपबंध.

३१८. आरोपीला कार्यवाही समजत नसेल त्या बाबतीतील कार्यपद्धती.

३१९. अपराधाबाबत दोषी असल्याचे दिसणाऱ्या अन्य व्यक्तीविरुद्ध कार्यवाही करण्याची शक्ती.

३२०. अपराध आपसात मिटवणे.

३२१. खटल्यातून अंग काढून घेणे.

३२२. दंडाधिकारी निकालात काढू शकणार नाही अशा खटल्यांमधील कार्यपद्धती.

३२३. चौकशी किंवा संपरीक्षा सुरु झाल्यानंतर, खटला सुपूर्द करण्यायोग्य असल्याचे दंडाधिकाऱ्याला आढळून येईल तेव्हाची कार्यपद्धती.

३२४. नाणी पाडणे, मुद्रांक कायदा किंवा संपत्ती यांच्याविरोधी अपराधाबद्दल पूर्वी दोषसिद्धी झालेल्या व्यक्तींची संपरीक्षा.

३२५. पुरेशी कडक शिक्षा देणे दंडाधिकाऱ्याला शक्य नसेल तेव्हाची कार्यपद्धती.

३२६. अंशत: एका दंडाधिकाऱ्याने व अंशत: दुसऱ्याने नोंदवलेल्या पुराव्यावरुन दोषसिद्धी किंवा सुपूर्दगी.

३२७. न्यायालय खुले असणे.

## प्रकरण पंचवीस

### मनोविकल आरोपी व्यक्तींबाबतचे उपबंध

३२८. वेडा असलेल्या आरोपीच्या बाबतीतील कार्यपद्धती.

३२९. न्यायालयासमोर संपरीक्षा केल्या जाणाऱ्या मनोविकल व्यक्तीच्या बाबतीतील कार्यपद्धती.

३३०. अन्वेषण किंवा संपरीक्षा होईपावेतो वेड्याची सुटका.

३३१. चौकशी किंवा संपरीक्षा पुन्हा सुरु करणे.

३३२. आरोपी दंडाधिकाऱ्यासमोर किंवा न्यायालयासमोर उपस्थित झाल्यावरची कार्यपद्धती.

३३३. आरोपी निकोप मनाचा असल्याचे दिसून येईल तेव्हा.

३३४. मनोविकलतेच्या कारणावरुन दोषमुक्तीचा न्यायनिर्णय.

३३५. अशा कारणावरुन दोषमुक्त केलेल्या व्यक्तीला सुरक्षित हवालातीत स्थानबद्ध करणे.

३३६. अंमलदार अधिकाऱ्याला कार्ये पार पाडण्याची शक्ती प्रदान करण्याची राज्य शासनाची शक्ती.

३३७. वेडा कैदी आपला बचाव करण्यास क्षम असल्याचे घोषित करण्यात आले असेल त्या बाबतीतील कार्यपद्धती.

३३८. अडकवून ठेवलेली वेडी व्यक्ती सोडून देण्यायोग्य असल्याचे ठरवण्यात आले असेल त्या बाबतीतील कार्यपद्धती.

३३९. वेड्या व्यक्तीला नातलगाच्या किंवा मित्राच्या हवाली करणे.

## प्रकरण सव्वीस

### न्यायदानाच्या कामावर परिणाम करणाऱ्या अपराधांबाबतचे उपबंध

३४०. कलम १९५ मध्ये उल्लेखिलेल्या प्रकरणांतील कार्यपद्धती.

३४१. अपील.

३४२. वाद खर्चाचा आदेश देण्याची शक्ती.

कलमे

३४३. दखल घेणाऱ्या दंडाधिकाऱ्याची कार्यपद्धती.

३४४. खोटा साक्षीपुरावा देण्याच्या अपराधाबद्दलच्या संपरीक्षेसाठी संक्षिप्त कार्यपद्धती.

३४५. अवमानाच्या विवक्षित प्रकरणांतील कार्यपद्धती.

३४६. एखाद्या प्रकरणाचा कलम ३४५ खाली परामर्श घेऊ नये असे न्यायालयाला वाटेल त्या बाबतीतील कार्यपद्धती.

३४७. निबंधक किंवा दुय्यम निबंधक यांना केव्हा दिवाणी न्यायालय मानावयाचे.

३४८. माफीपत्र सादर केल्यावर अपराध्याची विनादोषारोप सुटका.

३४९. उत्तर देण्यास किंवा दस्तऐवज हजर करण्यास नकार देणाऱ्या व्यक्तीला कारावासात ठेवणे किंवा हवालातीत पाठवणे.

३५०. समन्सचे पालन म्हणून हजर न राहिल्याबद्दल शिक्षा देण्याची संक्षिप्त कार्यपद्धती.

३५१. ३४४, ३४५, ३४९, ३५० या कलमांखाली दोषसिद्धीविरुद्ध अपिले.

३५२. विवक्षित न्यायाधीश आणि दंडाधिकारी यांच्यासमोर विवक्षित अपराध केलेले असता त्यांनी त्यांची संपरीक्षा करावयाची नाही.

## प्रकरण सत्तावीस

### न्यायनिर्णय

३५३. न्यायनिर्णय.

३५४. न्यायनिर्णयाची भाषा व मजकूर.

३५५. महानगर दंडाधिकाऱ्याचा न्यायनिर्णय.

३५६. पूर्वी सिद्धदोष ठरवलेल्या अपराध्याचा पत्ता कळविण्याचा आदेश.

३५७. भरपाई देण्याचा आदेश.

३५८. निष्कारण अटक केलेल्या व्यक्तींना भरपाई.

३५९. बिनदखली प्रकरणांत खर्च देण्याचा आदेश.

३६०. चांगले वर्तन ठेवण्यासाठी परिवीक्षेच्या शर्तीवर किंवा समज दिल्यावर सोडून देणे.

३६१. विवक्षित प्रकरणात विशेष कारणांची नोंद करणे.

३६२. न्यायालयाने न्यायनिर्णयात फेरबदल करावयाचा नाही.

३६३. न्यायनिर्णयाची प्रत आरोपीला व अन्य व्यक्तींना देणे.

३६४. न्यायनिर्णयाचा केव्हा अनुवाद करावयाचा.

३६५. सत्र न्यायालयाने निष्कर्षाची व शिक्षादेशाची प्रत जिल्हादंडाधिकाऱ्याला पाठवणे.

## प्रकरण अट्ठावीस

### मृत्युचे शिक्षादेश कायम करण्यासाठी सादर करणे

३६६. सत्र न्यायालयाने मृत्युचा शिक्षादेश कायम करण्यासाठी सादर करणे.

३६७. आणखी चौकशी करण्याची किंवा अधिक साक्षीपुरावा घेण्याचा निदेश देण्याची शक्ती.

३६८. शिक्षादेश कायम करण्याची किंवा दोषसिद्धी रद्दबातल करण्याची शक्ती.

३६९. कायमीकरणाच्या आदेशावर किंवा नवीन शिक्षादेशावर दोन न्यायाधीशांनी स्वाक्षरी करणे.

३७०. मतभेदाच्या बाबतीतील प्रक्रिया.

३७१. उच्च न्यायालयाकडे कायमी करणासाठी सादर केलेल्या खटल्यांतील प्रक्रिया.

## प्रकरण एकोणतीस

### अपीले

कलमे

३७२. अन्यथा उपबंध केला असल्याशिवाय अपील होऊ शकणार नाही.

३७३. शांतता राखण्यासाठी किंवा चांगले वर्तन ठेवण्यासाठी जामीन आवश्यक करणाऱ्या किंवा त्याबद्दल जामीनदार स्वीकारण्यास नकार देणाऱ्या किंवा तो नाकारणाऱ्या आदेशांवर अपील.

३७४. दोषसिद्धीवरील अपील.

३७५. आरोपी आपण दोषी असल्याची कबुली देईल अशा विवक्षित प्रकरणी अपील नाही.

३७६. क्षुल्लक खटल्यात अपील नाही.

३७७. राज्य शासनाकडून शिक्षेविरुद्ध अपील.

३७८. दोषमुक्तीच्या बाबतीत अपील.

३७९. उच्च न्यायालयाने केलेल्या दोषसिद्धीविरुद्ध विवक्षित बाबतीत अपील.

३८०. विवक्षित बाबतीत अपिलाचा विशेष हक्क.

३८१. सत्र न्यायालयाकडे केलेल्या अपिलाची सुनावणी कशी केली जाते.

३८२. अपील विनंती अर्ज.

३८३. अपीलकर्ता तुरुंगात असेल तेव्हाची कार्यपद्धती.

३८४. अपील विनासोपस्कार खारीज करणे.

३८५. विनासोपस्कार खारीज न केलेल्या अपिलांच्या सुनावणीची कार्यपद्धती.

३८६. अपील न्यायालयाच्या शक्ती.

३८७. दुय्यम अपील न्यायालयाच्या शक्ती.

३८८. उच्च न्यायालयाने अपीलान्ती दिलेला आदेश कनिष्ठ न्यायालयाकडे प्रमाणित करून पाठविणे.

३८९. अपील प्रलंबित असताना शिक्षादेशाचे निलंबन; अपिलकर्त्याची जामिनावर सुटका.

३९०. दोषमुक्तीवरील अपिलाचे कामी आरोपीला अटक.

३९१. अपील न्यायालय अधिक पुरावा घेऊ शकेल किंवा तो घेण्याचा निदेश देऊ शकेल.

३९२. अपील न्यायालयातील न्यायाधीश मताच्या बाबतीत समसमान विभागले जातील त्यावेळी कार्यपद्धती.

३९३. अपीलान्ती दिलेल्या न्यायनिर्णयांची व आदेशांची अंतिमता.

३९४. अपिले अवसान पावणे.

## प्रकरण तीस

### निर्देशन व पुनरीक्षण

३९५. उच्च न्यायालयाकडे निर्देशन.

३९६. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार खटल्याचा निकाल करणे.

३९७. पुनरीक्षणाच्या शक्ती वापरण्यासाठी अभिलेख मागवणे.

३९८. चौकशीचा आदेश देण्याची शक्ती.

३९९. सत्र न्यायाधीशाच्या पुनरीक्षणाच्या शक्ती.

४००. अपर सत्र न्यायाधीशाची शक्ती.

४०१. उच्च न्यायालयाच्या पुनरीक्षण शक्ती.

४०२. पुनरीक्षणाचे खटले काढून घेण्याची किंवा वर्ग करण्याची उच्च न्यायालयाची शक्ती.

४०३. पक्षकारांचे म्हणणे ऐकण्याचा न्यायालयाचा विकल्पाधिकार.

४०४. महानगर दंडाधिकाऱ्याने दिलेले आपल्या निर्णयाच्या कारणांचे कथन उच्च न्यायालयाने विचारात घेणे.

४०५. उच्च न्यायालयाचा आदेश कनिष्ठ न्यायालयाकडे प्रमाणित करून पाठवणे.

## प्रकरण एकतीस

### फौजदारी खटले वर्ग करणे

कलमे

४०६. खटले व अपिले वर्ग करण्याची सर्वोच्च न्यायालयाची शक्ती.

४०७. खटले व अपिले वर्ग करण्याची उच्च न्यायालयाची शक्ती.

४०८. खटले व अपिले वर्ग करण्याची सत्र न्यायाधीशांची शक्ती.

४०९. सत्र न्यायाधीशांनी खटले व अपिले काढून घेणे.

४१०. न्याय दंडाधिकाऱ्यांनी खटले काढून घेणे.

४११. कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी खटले सोपवणे किंवा काढून घेणे.

४१२. कारणे नमूद करणे.

## प्रकरण बत्तीस

### शिक्षांची अंमलबजावणी, निलंबन/माफी व सौम्यीकरण

#### क-मृत्युदंड

४१३. कलम ३६८ खाली दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी.

४१४. उच्च न्यायालयाने दिलेल्या मृत्युदंडाची अंमलबजावणी.

४१५. सर्वोच्च न्यायालयाकडे अपील होऊ शकत असल्यास, मृत्युदंडाची अंमलबजावणी पुढे ढकलणे.

४१६. गर्भवती स्त्रीची देहांताची शिक्षा पुढे ढकलणे.

#### ख-कारावास

४१७. कारावासाचे स्थळ नियत करण्याची शक्ती.

४१८. कारावासाच्या शिक्षेची अंमलबजावणी.

४१९. वॉरंट अंमलबजावणीसाठी निदेशून काढणे.

४२०. वॉरंट कोणाकडे दाखल करावयाचे.

#### ग-द्रव्यदंड वसूल करणे

४२१. द्रव्यदंडाच्या वसुलीसाठी वॉरंट.

४२२. अशा वॉरंटाचा परिणाम.

४२३. जेथे या संहितेचा विस्तार नाही अशा कोणत्याही राज्य क्षेत्रातील न्यायालयाने द्रव्यदंडाच्या वसुलीसाठी काढलेले वॉरंट.

४२४. कारावासाच्या शिक्षादेशाच्या अंमलबजावणीचे निलंबन.

#### घ-अंमलबजावणीविषयी सर्वसाधारण उपबंध

४२५. वॉरंट कोण काढू शकेल.

४२६. पळून गेलेल्या सिद्धदोष अपराध्याला दिलेली शिक्षा केव्हा अंमलात यावयाची.

४२७. आधीच दुसऱ्या एखाद्या अपराधाबद्दल शिक्षा झालेल्या अपराध्याला शिक्षा.

४२८. आरोपीने भोगलेल्या स्थानबद्धतेच्या कालावधीची कारावासाच्या शिक्षेतून वजावट करणे.

४२९. व्यावृत्ति.

४३०. शिक्षेची अंमलबजावणी झाल्यावर वॉरंट प्रतिवेदनासह परत करणे.

४३१. जे पैसे देण्याबाबत आदेश झाला असेल ते द्रव्यदंड म्हणून वसूल करणे.

#### ङ-शिक्षा निलंबित करणे, त्या माफ करणे व सौम्य करणे

४३२. शिक्षा निलंबित किंवा माफ करण्याची शक्ती.

४३३. शिक्षा सौम्य करण्याची शक्ती.

४३३क. विवक्षित प्रकरणी शिक्षा माफ करण्याच्या किंवा सौम्य करण्याच्या शक्तींवरील निर्बंध.

४३४. मृत्युदंडाच्या बाबतीत केंद्र शासनाची समवर्ती शक्ती.

४३५. विवक्षित प्रकरणी राज्य शासनाने केंद्र सरकारचा विचार घेतल्यानंतर कार्यवाही करणे.

## प्रकरण तेहेतीस

### जामीन व बंधपत्रे याबाबतचे उपबंध

कलमे

४३६. कोणत्या प्रकरणात जामीन घ्यावयाचा.

४३७. बिन-जामिनी अपराधाच्या बाबतीत जामीन केव्हा घेता येईल.

४३८. अटकेची आशंका वाटणाऱ्या व्यक्तीला जामीन मंजूर करण्यासाठी निदेश.

४३९. जामिनाविषयी उच्च न्यायालयाच्या किंवा सत्र न्यायालयाच्या शक्ती.

४४०. बंधपत्राची रक्कम व ती कमी करणे.

४४१. आरोपीचे व जामीनदारांचे बंधपत्र.

४४२. हवालातीतून मुक्तता.

४४३. पहिल्यांदा घेतलेला जामीन पुरेसा नसेल तेव्हा पुरेशा जामिनाचा आदेश देण्याची शक्ती.

४४४. जामीनदारांची दायित्वमुक्तता.

४४५. मुचलक्याऐवजी अनामत.

४४६. जेव्हा बंधपत्र दंडपात्र होईल तेव्हाची कार्यपद्धती.

४४६क. बंधपत्र किंवा जामीन बंधपत्र रद्द होणे.

४४७. जामीनदार दिवाळखोर झाल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास त्याबाबतीतील किंवा बंधपत्र दंडपात्र होईल तेव्हाची कार्यपद्धती.

४४८. अज्ञान व्यक्तीकडून बंधपत्र आवश्यक केले असेल तेव्हा.

४४९. कलम ४४६ खालील आदेशांवर अपील.

४५०. विवक्षित मुचलक्यांवरून येणे असलेली रक्कम वसूल करण्याचा निदेश देण्याची शक्ती.

## प्रकरण चौतीस

### संपत्तीची विल्हेवाट

४५१. विवक्षित खटल्यामध्ये संपरीक्षा प्रलंबित असेपर्यंत संपत्तीच्या अभिरक्षेचा व विल्हेवाटीचा आदेश.

४५२. संपरीक्षेच्या अखेरीस संपत्तीच्या विल्हेवाटीचा आदेश.

४५३. आरोपीकडे सापडलेला पैसा निर्दोष खरेदीदाराला देणे.

४५४. कलम ४५२ किंवा कलम ४५३ खालील आदेशांविरूद्ध अपील.

४५५. बदनामीकारक व अन्य प्रकारचे साहित्य नष्ट करणे.

४५६. स्थावर संपत्तीचा कब्जा परत देववण्याची शक्ती.

४५७. संपत्तीचे अभिग्रहण केल्यावर पोलिसांनी अवलंबिण्याची कार्यपद्धती.

४५८. जेव्हा सहा महिन्यांत कोणीही मागणीदार उपस्थित होत नाही त्याबाबतीतील कार्यपद्धती.

४५९. नाशवंत संपत्तीची विक्री करण्याची शक्ती.

## प्रकरण पस्तीस

### गैरनियम कार्यवाही

४६०. ज्यांमुळे कार्यवाही रद्दबातल होत नाही अशा गैरनियम बाबी.

४६१. ज्यांमुळे कार्यवाही रद्दबातल होते अशा गैरनियम बाबी.

४६२. चुकीच्या ठिकाणची कार्यवाही.

४६३. कलम १६४ च्या किंवा कलम २८१ च्या उपबंधांचे पालन न होणे.

४६४. दोषारोपांची मांडणी न करणे किंवा त्याचा अभाव किंवा त्यातील चूक यांचा परिणाम.

कलमे

४६५. चूक, गाळणूक किंवा गैरनियम गोष्ट असल्याच्या कारणाने निष्कर्ष किंवा शिक्षादेश केव्हा उलट फिरवता येईल.

४६६. दोष किंवा चूक असल्यामुळे जप्ती बेकायदेशीर व्हावयाची नाही.

प्रकरण छत्तीस

**विवक्षित अपराधांची दखल घेण्याची मुदत**

४६७. व्याख्या.

४६८. मुदतमर्यादा उलटून गेल्यानंतर दखल घेण्यास आडकाठी.

४६९. मुदतमर्यादेची सुरुवात.

४७०. विवक्षित प्रकरणी अवधी वगळणे.

४७१. न्यायालय बंद होईल तो दिनांक वगळणे.

४७२. सतत चालू राहणारा अपराध.

४७३. विवक्षित प्रकरणी मुदत मर्यादा वाढवणे.

प्रकरण सदतीस

**संकीर्ण**

४७४. उच्च न्यायालयासमोरील संपरीक्षा.

४७५. लष्करी न्यायालयाकडून संपरीक्षा होण्यास पात्र अशा व्यक्तींना समादेशक अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करणे.

४७६. नमुने.

४७७. उच्च न्यायालयाची नियम करण्याची शक्ती.

४७८. काही विवक्षित प्रकरणांत कार्यकारी दंडाधिकाऱ्यांना नेमून दिलेल्या कार्यामध्ये फेरबदल करण्याची शक्ती.

४७९. न्यायाधीश किंवा दंडाधिकारी ज्यात व्यक्तीशः हितसंबंधित असेल तो खटला.

४८०. व्यवसाय करणाऱ्या वकिलाने विवक्षित न्यायालयांत दंडाधिकारी म्हणून बसावयाचे नाही.

४८१. विक्रीशी संबंधित असलेल्या लोकसेवकाने संपत्ती खरेदी करावयाची नाही किंवा त्या संपत्ती-करता बोली बोलायची नाही.

४८२. उच्च न्यायालयाच्या अंगभूत शक्तींची व्यावृत्ति.

४८३. न्याय दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयांवर सतत अधीक्षण करणे हे उच्च न्यायालयाचे कर्तव्य.

४८४. निरसन व व्यावृत्ति.

शब्दसूची—मराठी–इंग्रजी

इंग्रजी–मराठी

# फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३

## (१९७४ चा अधिनियम क्र. २)

(३० जानेवारी, १९९७ रोजी यथाविद्यमान)

[२५ जानेवारी, १९७४]

**फौजदारी प्रक्रियेसंबंधीचा कायदा संकलित व विशोधित करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या चोविसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे :

परंतु, या संहितेतील प्रकरणे ८, १० व १२ यांच्याशी संबंधित असलेल्यांखेरीज असे तिचे अन्य उपबंध,—

(क) नागालँड राज्याला,

(ख) जनजाति-क्षेत्रांना,

लागू असणार नाहीत, पण संबंधित राज्य शासन अधिसूचनेद्वारे संपूर्ण नागालँड राज्याला किंवा त्याच्या एखाद्या भागाला अथवा, प्रकरणपरत्वे, अशा जनजाति-क्षेत्रांना असे किंवा त्यांपैकी कोणतेही उपबंध, त्या अधिसूचनेत जी विनिर्दिष्ट केली जातील त्या पूरक, आनुषंगिक किंवा परिणामी आपरिवर्तनांसह लागू करू शकेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमात "जनजाति-क्षेत्रे" याचा अर्थ, संविधानाच्या सहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २० मध्ये निर्देशिलेली, शिलाँग नगरपालिकेच्या स्थानिक सीमांमधील जनजाति-क्षेत्रांखेरीज अन्य अशी जी राज्यक्षेत्रे २१ जानेवारी, १९७२ या दिवसाच्या निकटपूर्वी, आसामच्या जनजाति-क्षेत्रात समाविष्ट होती ती राज्यक्षेत्रे, असा आहे.

(३) हा अधिनियम १ एप्रिल १९७४ रोजी अंमलात येईल.

२. या संहितेत संदर्भानुळे, अन्यथा आवश्यक नसेल तर,— **व्याख्या.**

(क) "जामीनपात्र अपराध" याचा अर्थ, जो पहिल्या अनुसूचीत जामीनपात्र म्हणून दाखवलेला आहे, किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याद्वारे जामीनपात्र करण्यात आला आहे तो अपराध, असा आहे; आणि "बिनजामिनी अपराध" याचा अर्थ, अन्य कोणताही अपराध, असा आहे;

(ख) "दोषारोप" यामध्ये, जेव्हा दोषारोपात एकाहून जास्त शीर्षे अंतर्भूत असतात तेव्हा दोषारोपाच्या कोणत्याही शीर्षाचा समावेश होतो;

(ग) "दखलपात्र अपराध" याचा अर्थ आणि *"दखलपात्र प्रकरण" याचा अर्थ, ज्या अपराधाबद्दल व ज्या प्रकरणात पोलीस अधिकारी पहिल्या अनुसूचीनुसार किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली वॉरंटाशिवाय अटक करू शकेल तो अपराध व ते प्रकरण, असा आहे;

(घ) "फिर्याद" याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीने—मग ती ज्ञात असो वा अज्ञात असो,—अपराध केला आहे अशा आशयाचे दंडाधिकाऱ्याकडे, त्याने या संहितेखाली कारवाई करावी या हेतूने करण्यात आलेले कोणतेही तोंडी किंवा लेखी अभिकथन असा आहे, पण यात पोलीस अहवालाचा समावेश नाही;

**स्पष्टीकरण.**—ज्या प्रकरणात बिनदखली अपराध करण्यात आल्याचे अन्वेषणांती उघडकीला येते त्या प्रकरणी पोलीस अधिकाऱ्याने दिलेला अहवाल हा फिर्याद असल्याचे मानले जाईल; आणि ज्या पोलीस अधिकाऱ्याने असा अहवाल दिला असेल तो फिर्यादीदार असल्याचे मानले जाईल;

(ङ) "उच्च न्यायालय" याचा अर्थ,—

(एक) कोणत्याही राज्याच्या संबंधात, त्या राज्याकरता असलेले उच्च न्यायालय,

(दोन) ज्या संघ राज्यक्षेत्रावर एखाद्या राज्याच्या उच्च न्यायालयाची अधिकारिता कायद्याद्वारे विस्तारित केली असेल त्याच्या संबंधात, ते उच्च न्यायालय,

(तीन) अन्य कोणत्याही संघराज्य क्षेत्राच्या संबंधात, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाहून अन्य असे त्या राज्यक्षेत्रासाठी असलेले फौजदारी अपिलाचे उच्चतम न्यायालय,

असा आहे;

(च) "भारत" याचा अर्थ, ज्यांच्यावर या संहितेचा विस्तार आहे ती राज्यक्षेत्रे, असा आहे;

---

*१९८४ चा अधिनियम ६१, कलम १५(१) अनुसार, त्या अधिनियमाच्या अनुसूचीत दिलेला प्रत्येक अपराध हा उपरोक्त कलम २ खंड (ग) ला अभिप्रेत असल्याप्रमाणे "दखलपात्र प्रकरण" आहे.

(छ) "चौकशी" याचा अर्थ, दंडाधिकाऱ्याने किंवा न्यायालयाने या संहितेखाली केलेली संपरीक्षेखेरीज अन्य अशी प्रत्येक चौकशी, असा आहे;

(ज) "अन्वेषण" यात, पुरावा गोळा करण्यासाठी एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने केलेल्या अथवा दंडाधिकाऱ्याने जिला या संबंधात प्राधिकृत केले आहे अशा (दंडाधिकाऱ्याखेरीज अन्य) कोणत्याही व्यक्तीने केलेल्या या संहितेखालील सर्व कार्यवाहींचा समावेश आहे;

(झ) "न्यायिक कार्यवाही" या शब्दप्रयोगामध्ये, जिच्या ओघात विधित: शपथेवर पुरावा घेतला जातो किंवा घेता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीचा समावेश आहे;

(ञ) "स्थानिक अधिकारिता" याचा न्यायालय किंवा दंडाधिकारी यांच्यासंबंधातील अर्थ, न्यायालयाला किंवा दंडाधिकाऱ्याला या संहितेखालील त्याच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती, ज्या क्षेत्राच्या आत वापरता येतील ते स्थानिक क्षेत्र, असा आहे, [1][आणि असे स्थानिक क्षेत्र राज्य शासन अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे संपूर्ण राज्य किंवा राज्याचा कोणताही भाग मिळून बनलेले असू शकेल];

(ट) "महानगर क्षेत्र" याचा अर्थ, कलम ८ खाली महानगर क्षेत्र म्हणून घोषित केलेले किंवा घोषित केल्याचे मानले गेलेले क्षेत्र, असा आहे;

(ठ) "बिनदखली अपराध" याचा अर्थ, ज्या अपराधाबद्दल व "बिनदखली प्रकरण" याचा अर्थ ज्या प्रकरणात वॉरंटाशिवाय अटक करण्याचा पोलीस अधिकाऱ्याला प्राधिकार नाही तो अपराध व ते प्रकरण, असा आहे;

(ड) "अधिसूचना" याचा अर्थ, शासकीय राजपत्रात प्रकाशित केलेली अधिसूचना, असा आहे;

(ढ) "अपराध" याचा अर्थ, त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे शिक्षापात्र केलेली कोणतीही कृती किंवा अकृती, असा आहे आणि जिच्याबाबत 'गुरे अतिक्रमण अधिनियम, १८७१' (१८७१ चा १) याच्या कलम २० खाली फिर्याद देता येईल अशा कोणत्याही कृतीचा त्यात समावेश आहे;

(ण) "पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकारी" या शब्दप्रयोगात, पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकारी त्या ठाणेघरात अनुपस्थित असताना अथवा आजारपणामुळे किंवा अन्य कारणामुळे तो आपली कामे करण्यास असमर्थ असताना ठाणेघरात उपस्थित असलेला जो पोलीस अधिकारी अशा अधिकाऱ्याच्या लगतखालच्या दर्जाचा असून पोलीस शिपायाहून वरच्या दर्जाचा असेल त्याचा किंवा राज्य शासन तसे निदेशित करील तेव्हा याप्रमाणे उपस्थित असलेल्या अन्य कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याचा समावेश आहे ;

(त) "स्थळ" या संज्ञेत घर, इमारत, तंबू, वाहन आणि जलयान यांचा समावेश आहे;

(थ) "वकील" हा शब्द जेव्हा कोणत्याही न्यायालयातील कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात वापरला जातो तेव्हा त्याचा अर्थ, त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याखाली अशा न्यायालयात व्यवसाय करण्यास प्राधिकृत असलेली व्यक्ती असा आहे, आणि त्यात, अशा कार्यवाहीचे काम चालविण्यासाठी न्यायालयाच्या परवानगीने नियुक्त केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीचा समावेश आहे;

(द) "पोलीस अहवाल" याचा अर्थ, पोलीस अधिकाऱ्याने कलम १७३ पोटकलम (२) खाली दंडाधिकाऱ्याकडे पाठवलेला अहवाल, असा आहे;

(ध) "पोलीस ठाणे" याचा अर्थ, राज्य शासनाने पोलीस ठाणे म्हणून सर्वसाधारणत: किंवा विशेषत: घोषित केलेली कोणतीही चौकी किंवा स्थळ, असा आहे, आणि त्यात राज्य शासनाने यासंबंधात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही स्थानिक क्षेत्राचा समावेश आहे;

(न) "विहित" याचा अर्थ, या संहितेखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेला असा आहे;

(प) "सरकारी अभियोक्ता" याचा अर्थ, कलम २४ खाली नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे, आणि त्यात सरकारी अभियोक्त्याच्या निदेशांनुसार कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश आहे;

(फ) "उप-विभाग" याचा अर्थ, जिल्ह्याचा उप-विभाग, असा आहे;

(ब) "समन्स-खटला" याचा अर्थ, वॉरंट-खटला नसलेला असा अपराधासंबंधीचा खटला, असा आहे;

(भ) "वॉरंट-खटला" याचा अर्थ, मृत्यूच्या किंवा आजीव कारावासाच्या किंवा दोन वर्षांहून अधिक मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधासंबंधीचा खटला, असा आहे;

(म) यात वापरलेल्या आणि व्याख्या न केलेल्या, पण 'भारतीय दंड संहिता, १८६०' (१८६० चा ४५) यात व्याख्या केलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना त्या संहितेत त्यांना नेमून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ आहेत.

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम २ द्वारे घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

३. (१) या संहितेत,—— **निर्देशांचा अर्थ लावणे.**

(क) कोणतेही विशेषक शब्द नसताना, " दंडाधिकारी " म्हणून केलेल्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,——

(एक) महानगर क्षेत्राबाहेरील एखाद्या क्षेत्राच्या संबंधात, न्याय दंडाधिकाऱ्याचा निर्देश म्हणून;

(दोन) महानगर क्षेत्राच्या संबंधात, महानगर दंडाधिकाऱ्याचा निर्देश म्हणून, लावला जाईल ;

(ख) द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याच्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ, महानगर क्षेत्राबाहेरील क्षेत्राच्या संबंधात द्वितीय वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याचा निर्देश म्हणून आणि महानगर क्षेत्राच्या संबंधात, महानगर दंडाधिकाऱ्याचा निर्देश म्हणून लावला जाईल;

(ग) प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याच्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ,——

(एक) महानगर क्षेत्राच्या संबंधात, त्या क्षेत्रात अधिकारिता वापरणाऱ्या महानगर दंडाधिकाऱ्याचा निर्देश म्हणून लावला जाईल,

(दोन) अन्य कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात, त्या क्षेत्रात अधिकारिता वापरणाऱ्या प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याचा निर्देश म्हणून लावला जाईल;

(घ) महानगर क्षेत्राच्या संबंधात, मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याच्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ, त्या क्षेत्रात अधिकारिता वापरणाऱ्या मुख्य महानगर दंडाधिकाऱ्याचा निर्देश म्हणून लावला जाईल.

(२) या संहितेत, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर, महानगर क्षेत्राच्या संबंधात न्याय दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाच्या निर्देशाचा अर्थ, त्या क्षेत्राच्या महानगर दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाचा निर्देश म्हणून लावला जाईल.

(३) संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर, या संहितेच्या प्रारंभापूर्वी संमत झालेल्या कोणत्याही अधिनियमातील,——

(क) प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याच्या निर्देशाचा अर्थ, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याचा निर्देश म्हणून लावला जाईल;

(ख) द्वितीय वर्ग किंवा तृतीय वर्ग दंडाधिकाऱ्याच्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ, द्वितीय वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याचा निर्देश म्हणून लावला जाईल;

(ग) इलाखा शहर दंडाधिकाऱ्याच्या किंवा मुख्य इलाखा शहर दंडाधिकाऱ्याच्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ, अनुक्रमे, महानगर दंडाधिकारी किंवा मुख्य महानगर दंडाधिकारी यांचा निर्देश म्हणून लावला जाईल;

(घ) महानगर क्षेत्रात जे समाविष्ट असेल अशा कोणत्याही क्षेत्राच्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ, अशा महानगर क्षेत्राचा निर्देश म्हणून आणि अशा क्षेत्राच्या संबंधात प्रथम वर्ग आणि द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याच्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ, अशा क्षेत्रात अधिकारिता वापरणाऱ्या महानगर दंडाधिकाऱ्याचा निर्देश म्हणून लावला जाईल.

(४) जेथे या संहितेखेरीज अन्य कोणत्याही कायद्याखाली दंडाधिकाऱ्याने वापरावयाचे कार्याधिकार,——

(क) पुराव्याचे गुणपरीक्षण किंवा त्यांची छाननी करणे अथवा जो निर्णय कोणत्याही व्यक्तीला अन्वेषण, चौकशी किंवा संपरीक्षा होईपर्यंत कोणत्याही शिक्षेस, दंडास किंवा हवालातीतील स्थानबद्धतेस पात्र करील किंवा तिला कोणत्याही न्यायालयापुढे संपरीक्षेस पाठवणे हा ज्याचा परिणाम असू शकेल असा कोणताही निर्णय बनवणे हे ज्या बाबी अनुस्यूत आहे त्यांच्याशी, संबंधित असतील तेथे, ते कार्याधिकार, या संहितेतील उपबंधांच्या अधीनतेने, न्याय दंडाधिकाऱ्याने वापरण्याजोगे असतील ; अथवा

(ख) लायसन देणे, लायसन निलंबित किंवा रद्द करणे, खटल्यास मंजुरी देणे किंवा त्यातून अंग काढून घेणे अशांसारख्या ज्या बाबी प्रशासनिक किंवा कार्यकारी स्वरूपाच्या आहेत त्यांच्याशी संबंधित असतील तेथे, ते कार्याधिकार पूर्वोक्तवत् त्या उपबंधाच्या अधीनतेने, कार्यकारी दंडाधिकाऱ्याने वापरण्याजोगे असतील.

४. (१) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याखालील सर्व अपराधांचे अन्वेषण, चौकशी, संपरीक्षा व अन्य कार्यवाही, यात यापुढे अंतर्भूत असलेल्या उपबंधानुसार केली जाईल. **'भारतीय दंड संहिते' खालील व अन्य कायद्यांखालील अपराधांची संपरीक्षा.**

(२) अन्य कोणत्याही कायद्याखालील सर्व अपराधांचे अन्वेषण, चौकशी, संपरीक्षा व अन्य कार्यवाही त्याच उपबंधानुसार, पण अशा अपराधांचे अन्वेषण, चौकशी, संपरीक्षा व अन्य कार्यवाही करण्याची रीत किंवा स्थळ याबाबत विनियमन करणाऱ्या त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीच्या अधीनतेने, केली जाईल.

व्यावृत्ति. ५. या संहितेत अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, विरुद्ध विनिर्दिष्ट उपबंधाच्या अभावी, त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही विशेष किंवा स्थानिक कायद्यावर, अथवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याने प्रदान केलेल्या कोणत्याही विशेष अधिकारितेवर किंवा शक्तीवर किंवा त्या कायद्याने विहित केलेल्या कोणत्याही विशेष कार्यपद्धतीवर परिणाम करणार नाही.

## प्रकरण दोन

## फौजदारी न्यायालये व अधिकारपदे घटित करणे

फौजदारी न्यायालयांचे वर्ग. ६. उच्च न्यायालये व या संहितेहून अन्य कोणत्याही कायद्याद्वारे घटित झालेली न्यायालये याशिवाय, प्रत्येक राज्यात पुढील प्रकारची फौजदारी न्यायालये असतील, ती अशी :—

(एक) सत्र न्यायालये;

(दोन) प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, आणि कोणत्याही महानगर क्षेत्रात, महानगर दंडाधिकारी;

(तीन) द्वितीय वर्ग न्याय दंडाधिकारी; आणि

(चार) कार्यकारी दंडाधिकारी.

प्रादेशिक विभाग. ७. (१) प्रत्येक राज्य हा सत्र-विभाग असेल किंवा ते सत्र-विभागांचे बनलेले असेल; आणि प्रत्येक सत्र-विभाग हा या संहितेच्या प्रयोजनार्थ जिल्हा असेल किंवा जिल्ह्यांचा बनलेला असेल:

परंतु, प्रत्येक महानगर क्षेत्र, उक्त प्रयोजनार्थ वेगळा सत्र-विभाग आणि जिल्हा असेल.

(२) राज्य शासनाला, उच्च न्यायालयाचा विचार घेतल्यानंतर अशा विभागांच्या व जिल्ह्यांच्या सीमांमध्ये किंवा त्यांच्या संख्येत फेरबदल करता येईल.

(३) राज्य शासनाला उच्च न्यायालयाचा विचार घेतल्यानंतर, कोणत्याही जिल्ह्याची उप-विभागांमध्ये विभागणी करता येईल, आणि अशा उप-विभागांच्या सीमांमध्ये किंवा संख्येत फेरबदल करता येईल.

(४) या संहितेच्या प्रारंभी एखाद्या राज्यात अस्तित्वात असलेले सत्र-विभाग, जिल्हे व उप-विभाग हे या कलमाखाली बनवले असल्याचे मानले जाईल.

महानगर क्षेत्रे. ८. (१) राज्य शासनाला अधिसूचनेद्वारे असे घोषित करता येईल की, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकास व तेव्हापासून, ज्याची लोकसंख्या दहा लाखांहून अधिक आहे असे शहर किंवा नगर समाविष्ट असलेले राज्यातील कोणतेही क्षेत्र या संहितेच्या प्रयोजनार्थ महानगर क्षेत्र असेल.

(२) या संहितेच्या प्रारंभी व तेव्हापासून मुंबई, कलकत्ता व मद्रास यांपैकी प्रत्येक इलाखा शहर आणि अहमदाबाद शहर ही महानगर क्षेत्रे असल्याचे पोटकलम (१) खाली घोषित करण्यात आले असल्याचे मानले जाईल.

(३) राज्य शासन अधिसूचनेद्वारे महानगर क्षेत्राच्या सीमा विस्तारित करू शकेल किंवा आकुंचित करू शकेल किंवा त्यात फेरबदल करू शकेल, पण ज्यामुळे अशा क्षेत्राची लोकसंख्या दहा लाखांहून कमी होईल अशा प्रकारे आकुंचन किंवा फेरबदल केला जाणार नाही.

(४) जेव्हा एखादे क्षेत्र महानगर क्षेत्र म्हणून घोषित केले गेल्यानंतर किंवा घोषित करण्यात आले असल्याचे मानण्यात आल्यानंतर, अशा क्षेत्राची लोकसंख्या दहा लाखांहून कमी होईल तेव्हा, असे क्षेत्र हे राज्य शासन यासंबंधात अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा दिनांकास व तेव्हापासून महानगर क्षेत्र असण्याचे बंद होईल; पण ते तसे असण्याचे बंद झाले तरीही, ते बंद होण्याच्या निकटपूर्वी अशा क्षेत्रातील कोणत्याही न्यायालयासमोर किंवा दंडाधिकाऱ्यासमोर प्रलंबित असलेली कोणतीही चौकशी, संपरीक्षा किंवा अपील यांची कार्यवाही जणू काही ते तसे बंद झालेले नसावे त्याप्रमाणे या संहितेखाली चालू राहील.

(५) जेव्हा राज्य शासन पोटकलम (३) खाली कोणत्याही महानगर क्षेत्राच्या सीमा आकुंचित करील किंवा त्यांत फेरबदल करील तेव्हा, असे आकुंचन किंवा फेरबदल करण्याच्या निकटपूर्वी कोणत्याही न्यायालयासमोर किंवा दंडाधिकाऱ्यासमोर प्रलंबित असलेल्या कोणत्याही चौकशीवर, संपरीक्षेवर किंवा अपिलावर अशा आकुंचनाचा किंवा फेरबदलाचा परिणाम होणार नाही, आणि अशी प्रत्येक चौकशी, संपरीक्षा किंवा अपील यांची कार्यवाही जणू काही असे आकुंचन किंवा फेरबदल करण्यात आलेला नसावा त्याप्रमाणे या संहितेखाली चालू राहील.

**स्पष्टीकरण.**—या कलमात "लोकसंख्या" या शब्दप्रयोगाचा अर्थ, जिची संबद्ध आकडेवारी प्रकाशित करण्यात आली आहे अशा निकटपूर्व जनगणनेमध्ये विनिश्चित केल्याप्रमाणे असेल ती लोकसंख्या, असा आहे.

९. (१) राज्य शासन प्रत्येक सत्र-विभागाकरिता एकेक सत्र न्यायालय स्थापन करील. सत्र न्यायालय.

(२) प्रत्येक सत्र न्यायालय उच्च न्यायालयाने नियुक्त करावयाच्या अशा न्यायाधीशाच्या अध्यक्षतेखाली असेल.

(३) सत्र न्यायालयात अधिकारिता वापरण्यासाठी उच्च न्यायालयाला अपर सत्र न्यायाधीश आणि सहायक सत्र न्यायाधीशही नियुक्त करता येतील.

(४) उच्च न्यायालय एका सत्र-विभागाच्या सत्र न्यायाधीशास अन्य विभागाचा अपर सत्र न्यायाधीश म्हणून नियुक्तीही करू शकेल आणि अशा बाबतीत त्या न्यायाधीशाला खटल्यांचा निकाल करण्यासाठी त्या अन्य विभागात उच्च न्यायालय निदेशित करील अशा एका स्थळी किंवा अनेक स्थळी बैठक घेता येईल.

(५) जेथे सत्र न्यायाधीशाचे पद रिक्त असेल तेथे, जो कोणताही तातडीचा अर्ज अशा सत्र न्यायालयाकडे करण्यात आलेला असेल किंवा केला जाईल किंवा प्रलंबित असेल अशा कोणत्याही अर्जाचा सत्र-विभागात अपर किंवा सहायक सत्र न्यायाधीशाकरवी अथवा अपर किंवा सहायक सत्र न्यायाधीश नसेल तर, मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याकरवी निकाल करण्याबाबत उच्च न्यायालय व्यवस्था करू शकेल, आणि अशा प्रत्येक न्यायाधीशाला किंवा दंडाधिकाऱ्याला अशा कोणत्याही अर्जाचे काम पाहण्याची अधिकारिता असेल.

(६) उच्च न्यायालय अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा एका किंवा अनेक स्थळीं सत्र न्यायालय सर्वसामान्यत: आपली बैठक भरवील; पण जर एखाद्या विशिष्ट प्रकरणी, सत्र-विभागातील अन्य कोणत्याही स्थळी आपल्या बैठकी भरवणे पक्षकारांस व साक्षीदारांस सर्वसाधारणपणे सोयीस्कर होण्यासारखे आहे असे सत्र न्यायालयाचे मत असेल तर, त्याला खटल्याचा निकाल करण्यासाठी किंवा त्यातील कोणत्याही साक्षीदाराच्या अगर साक्षीदारांच्या तपासणीसाठी फिर्यादीपक्षाच्या व आरोपीच्या संमतीने त्या स्थळी आपली बैठक घेता येईल.

**स्पष्टीकरण.**---या संहितेच्या प्रयोजनार्थ, "नियुक्ती" या संज्ञेत, जेथे संघराज्याच्या किंवा राज्याच्या कारभारासंबंधातील कोणत्याही सेवेत अथवा पदावर कोणत्याही व्यक्तीची प्रथम नियुक्ती पदस्थापन किंवा पदोन्नती कोणत्याही कायद्याखाली शासनाने करणे आवश्यक असेल तेथे, अशा नियुक्तीचा, पदस्थापनाचा किंवा पदोन्नतीचा समावेश होत नाही.

१०. (१) सर्व सहायक सत्र न्यायाधीश, ज्याच्या न्यायालयात ते अधिकारिता वापरतात त्या सत्र न्यायाधीशाला दुय्यम असतील. सहायक सत्र न्यायाधीश दुय्यम असणे.

(२) सत्र न्यायाधीशाला वेळोवेळी, अशा सहायक सत्र न्यायाधीशांमध्ये कामकाज वाटून देण्याबाबत या संहितेशी सुसंगत असे नियम करता येतील.

(३) सत्र न्यायाधीशाला जेव्हा तो अनुपस्थित असेल किंवा कार्य करण्यास असमर्थ असेल त्या प्रसंगी, अपर किंवा सहायक सत्र न्यायाधीशाकरवी, अथवा अपर किंवा सहायक सत्र न्यायाधीश नसेल तर, मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याकरवी कोणत्याही तातडीच्या अर्जाचा निकाल करण्याची तजवीज करता येईल, आणि अशा प्रत्येक न्यायाधीशाला किंवा दंडाधिकाऱ्याला अशा कोणत्याही अर्जाबाबत कार्यवाही करण्याची अधिकारिता असल्याचे मानले जाईल.

११. (१) (महानगर क्षेत्र नसलेल्या) प्रत्येक जिल्ह्यात, राज्य शासन उच्च न्यायालयाचा विचार घेतल्यानंतर अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील इतकी आणि अशा ठिकाणी, प्रथम वर्ग आणि द्वितीय वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यांची न्यायालये स्थापन केली जातील : न्याय दंडाधिकाऱ्यांची न्यायालये.

[१][परंतु, उच्च न्यायालयाचा विचार घेतल्यानंतर राज्य शासनाला कोणत्याही विशिष्ट प्रकरणाची किंवा विशिष्ट वर्गातील प्रकरणांची संपरीक्षा करण्यासाठी कोणत्याही स्थानिक क्षेत्राकरता प्रथम वर्ग किंवा द्वितीय वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यांची एक किंवा अधिक विशेष न्यायालये स्थापन करता येतील, आणि असे कोणतेही विशेष न्यायालय स्थापन केले असेल त्या बाबतीत, न्याय दंडाधिकाऱ्याचे असे विशेष न्यायालय ज्याच्या संपरीक्षेसाठी स्थापन करण्यात आलेले असेल असा कोणताही खटला किंवा अशा वर्गातील खटले यांची संपरीक्षा करण्यास त्या स्थानिक क्षेत्रातील इतर कोणत्याही दंडाधिकारी न्यायालयास अधिकारिता असणार नाही.]

(२) अशा न्यायालयांचे पीठासीन अधिकारी उच्च न्यायालयाकडून नियुक्त केले जातील.

(३) उच्च न्यायालयाला जेव्हा तसे करणे समयोचित किंवा जरूरीचे वाटेल तेव्हा, ते दिवाणी न्यायालयात न्यायाधीश म्हणून कार्य करणाऱ्या राज्याच्या, न्याय सेवेतील कोणत्याही सदस्याला प्रथम वर्ग किंवा द्वितीय वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याच्या शक्ती प्रदान करू शकेल.

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम ३ द्वारे घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

**मुख्य न्याय दंडाधिकारी आणि अपर मुख्य न्याय दंडाधिकारी.**

१२. (१) (महानगर क्षेत्र नसलेल्या) प्रत्येक जिल्ह्यात उच्च न्यायालय एका प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यास मुख्य न्याय दंडाधिकारी म्हणून नियुक्त करील.

(२) उच्च न्यायालयाला कोणत्याही प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याची अपर मुख्य न्याय दंडाधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल, आणि अशा दंडाधिकाऱ्याला , उच्च न्यायालय निदेशित करील त्याप्रमाणे या संहितेखाली किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखाली मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याला असणाऱ्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती असतील.

(३) (क) उच्च न्यायालय, कोणत्याही उप-विभागातील कोणत्याही प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याला उप-विभागीय न्याय दंडाधिकारी म्हणून पदनिर्देशित करू शकेल आणि प्रसंगानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे त्याला या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या जबाबदाऱ्यांतून मुक्त करू शकेल.

(ख) मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याच्या सर्वसाधारण नियंत्रणाच्या अधीनतेने, प्रत्येक उप-विभागीय न्याय दंडाधिकाऱ्याला त्या उप-विभागातील (अपर मुख्य न्याय दंडाधिकाऱ्यांहून अन्य अशा), न्याय दंडाधिकाऱ्यांच्या कामाचे पर्यवेक्षण व नियंत्रण करण्यासाठी, या संबंधात उच्च न्यायालय सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशाही शक्ती असतील व तो त्यांचा वापर करील.

**विशेष न्याय दंडाधिकारी.**

१३. (१) उच्च न्यायालय, केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने त्यास तसे करण्याची विनंती केली तर, शासनाच्या अखत्यारातील कोणतेही पद जी व्यक्ती धारण करत आहे किंवा जिने धारण केलेले होते अशा कोणत्याही व्यक्तीला, [१][महानगर क्षेत्र नसलेल्या कोणत्याही स्थानिक क्षेत्रात, प्रथम वर्ग किंवा द्वितीय वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याला] या संहितेद्वारे किंवा तिच्याखाली प्रदान केलेल्या किंवा प्रदान करण्याजोग्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती [१][विशिष्ट खटले किंवा विशिष्ट वर्गातील खटले] यांबाबत प्रदान करू शकेल :

परंतु, एखाद्या व्यक्तीला तिच्याकडे कायदेविषयक कारभारासंबंधी उच्च न्यायालय नियमांद्वारे विनिर्दिष्ट करील अशी अर्हता किंवा अनुभव असल्याशिवाय अशी कोणतीही शक्ती प्रदान केली जाणार नाही.

(२) अशा दंडाधिकाऱ्यांना "विशेष न्याय दंडाधिकारी" म्हणून संबोधले जाईल आणि उच्च न्यायालय सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निर्देशित करील त्याप्रमाणे एका वेळी जास्तीत जास्त एक वर्ष इतक्या मुदतीकरिता त्यांची नियुक्ती केली जाईल.

[२][ (३) उच्च न्यायालय एखाद्या विशेष न्याय दंडाधिकाऱ्याला त्याच्या स्थानिक अधिकारितेबाहेरील कोणत्याही महानगर क्षेत्राच्या संबंधात महानगर दंडाधिकाऱ्याच्या वापरण्याच्या शक्ती प्रदान करू शकेल.]

**न्याय दंडाधिकाऱ्यांची स्थानिक अधिकारिता.**

१४. (१) उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाच्या अधीनतेने, मुख्य न्याय दंडाधिकारी, कलम ११ खाली किंवा कलम १३ खाली नियुक्त केलेल्या दंडाधिकाऱ्यांना या संहितेखाली त्यांच्या ठायी विनिहित केले जातील ते सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती ज्या क्षेत्रात वापरता येतील त्यांच्या स्थानिक सीमा वेळोवेळी निश्चित करू शकेल :

[३][परंतु, विशेष न्याय दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाला, ज्यासाठी ते स्थापन करण्यात आले असेल त्या स्थानिक क्षेत्राच्या आतील कोणत्याही ठिकाणी आपली बैठक भरवता येईल.]

(२) अशा निश्चितीद्वारे अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीजकरून एरव्ही, अशा प्रत्येक दंडाधिकाऱ्याच्या अधिकारितेचा आणि शक्तींचा विस्तार जिल्ह्यात सर्वत्र असेल.

[३][ (३) कलम ११ किंवा कलम १३ किंवा कलम १८ खाली नियुक्त केलेल्या दंडाधिकाऱ्याची स्थानिक अधिकारिता, तो सर्वसामान्यपणे ज्या जिल्ह्यामध्ये किंवा, प्रकरणपरत्वे, महानगर क्षेत्रामध्ये न्यायालय भरवतो त्याच्या पलिकडील क्षेत्रात विस्तारित असेल त्या बाबतीत, या संहितेमधील सव न्यायालय, मुख्य न्याय दंडाधिकारी किंवा मुख्य महानगर दंडाधिकारी यांच्या संबंधीच्या कोणत्याही निदेशाचा अशा दंडाधिकाऱ्याच्या संबंधातील अर्थ, त्याच्या स्थानिक अधिकारितेमधील क्षेत्रात सर्वत्र संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, उक्त जिल्ह्याच्या किंवा महानगर क्षेत्राच्या संबंधात अधिकारिता वापरणाऱ्या सत्र न्यायालयाचा, मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याचा किंवा, प्रकरणपरत्वे, मुख्य महानगर दंडाधिकाऱ्याचा निर्देश म्हणून लावण्यात येईल.]

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे समाविष्ट केले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे समाविष्ट केले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

विनिर्दिष्ट प्रकरणांत किंवा स्थानिक क्षेत्रांत न्याय दंडाधिकाऱ्यांकडे अधिकारिता विनिहित करणे.

[2][१४क. उच्च न्यायालयास, विशिष्ट प्रकरणाच्या अगर विशिष्ट प्रकरणवर्गाच्या किंवा वर्गांच्या बाबतीत अथवा त्या बाबतीत त्याने विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही जिल्ह्यांचे मिळून बनलेल्या स्थानिक क्षेत्रातील सरसकट सर्व प्रकरणांच्या बाबतीत, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली न्याय दंडाधिकाऱ्यास प्रदान केलेल्या किंवा प्रदान करण्याजोग्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती कोणत्याही न्याय दंडाधिकाऱ्याकडे विनिहित करता येतील.]

न्याय दंडाधिकाऱ्यांची दुय्यमता.

१५. (१) प्रत्येक मुख्य न्याय दंडाधिकारी सत्र न्यायाधीशाला दुय्यम असेल ; आणि प्रत्येक अन्य न्याय दंडाधिकारी, सत्र न्यायाधीशाच्या सर्वसाधारण नियंत्रणाच्या अधीनतेने, मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याला दुय्यम असेल.

(२) मुख्य न्याय दंडाधिकारी, त्याला दुय्यम असणाऱ्या न्याय दंडाधिकाऱ्यांमध्ये कामकाज वाटून देण्याबाबत वेळोवेळी या संहितेशी सुसंगत असे नियम करू शकेल किंवा विशेष आदेश देऊ शकेल.

महानगर दंडाधिकाऱ्यांची न्यायालय.

१६. (१) प्रत्येक महानगर क्षेत्रात, उच्च न्यायालयाचा विचार घेतल्यानंतर राज्य शासन अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील तितकी आणि तशा ठिकाणी महानगर दंडाधिकाऱ्यांची न्यायालये स्थापन केली जातील.

(२) अशा न्यायालयांचे पीठासीन अधिकारी उच्च न्यायालयाकडून नियुक्त केले जातील.

(३) प्रत्येक महानगर दंडाधिकाऱ्याच्या अधिकारितेचा व शक्तींचा विस्तार महानगर क्षेत्रात सर्वत्र असेल.

मुख्य महानगर दंडाधिकारी आणि अपर मुख्य महानगर दंडाधिकारी.

१७. (१) उच्च न्यायालय, त्याच्या स्थानिक अधिकारितेतील प्रत्येक महानगर क्षेत्राच्या संबंधात एकेका महानगर दंडाधिकाऱ्याला अशा महानगर क्षेत्राचा " मुख्य महानगर दंडाधिकारी " म्हणून नियुक्त करील.

(२) उच्च न्यायालयाला, कोणत्याही महानगर दंडाधिकाऱ्याची " अपर मुख्य महानगर दंडाधिकारी " म्हणून नियुक्ती करता येईल, आणि अशा दंडाधिकाऱ्याला उच्च न्यायालय निदेशित करील त्याप्रमाणे त्या संहितेखाली किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखाली मुख्य महानगर दंडाधिकाऱ्याला असणाऱ्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती असतील.

विशेष महानगर दंडाधिकारी.

१८. (१) उच्च न्यायालय, राज्य शासनाने किंवा केंद्र शासनाने त्यास तसे करण्याची विनंती केली तर, शासनाच्या अखत्याराखालील कोणतेही पद जी व्यक्ती धारण करत आहे किंवा जिने धारण केलेले होते अशा कोणत्याही व्यक्तीला आपल्या स्थानिक अधिकारितेतील कोणत्याही महानगर क्षेत्रात, महानगर दंडाधिकाऱ्याला या संहितेद्वारे किंवा तिच्याखाली प्रदान केलेल्या किंवा प्रदान करण्याजोग्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती विशिष्ट खटले किंवा विशिष्ट वर्गातील खटले [1]* * * याबाबत प्रदान करू शकेल :

परंतु, एखाद्या व्यक्तीला, तिच्याकडे कायदेविषयक कारभारासंबंधी उच्च न्यायालय नियमांद्वारे, विनिर्दिष्ट करील अशी अर्हता किंवा अनुभव असल्याशिवाय अशी कोणतीही शक्ती प्रदान केली जाणार नाही.

विशेष महानगर दंडाधिकारी.

**१८. (१) उच्च न्यायालय, राज्य शासनाने किंवा केंद्र शासनाने त्यास तसे करण्याची विनंती केली तर, शासनाच्या अखत्याराखालील कोणतेही पद जी व्यक्ती धारण करत आहे किंवा जिने धारण केलेले होते अशा कोणत्याही व्यक्तीला आपल्या स्थानिक अधिकारितेतील [1][एका किंवा अधिक महानगर क्षेत्रांत], महानगर दंडाधिकाऱ्याला या संहितेद्वारे किंवा तिच्याखाली प्रदान केलेल्या किंवा प्रदान करण्याजोग्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती विशिष्ट खटले किंवा विशिष्ट वर्गातील खटले यांबाबत प्रदान करू शकेल :**

**परंतु, एखाद्या व्यक्तीला, तिच्याकडे कायदेविषयक कारभारासंबंधी उच्च न्यायालय नियमाद्वारे विनिर्दिष्ट करील अशी अर्हता किंवा अनुभव असल्याशिवाय अशी कोणतीही शक्ती प्रदान केली जाणार नाही.**

(२) अशा दंडाधिकाऱ्यांना " विशेष महानगर दंडाधिकारी " म्हणून संबोधले जाईल, आणि उच्च न्यायालय सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेशित करील त्याप्रमाणे एका वेळी जास्तीत जास्त एक वर्ष इतक्या मुदतीकरिता त्यांची नियुक्ती केली जाईल.

[2][(३) उच्च न्यायालय किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य शासन कोणत्याही विशेष न्याय दंडाधिकाऱ्याला महानगर क्षेत्राबाहेरील कोणत्याही स्थानिक क्षेत्रामध्ये प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याच्या शक्ती वापरण्याची शक्ती प्रदान करू शकेल.]

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम ६ (एक) द्वारे " किंवा सरसकट सर्व खटले " हा मजकूर गाळला (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ६ (दोन) द्वारे मूळ पोटकलम ३ ऐवजी घातले.

**१. फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७६ (१९७६ चा महा. २३) कलम-२ द्वारे समाविष्ट केले (९ जून, १९७६ रोजी व तेव्हापासून).**

**२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (९ जून, १९७६ रोजी व तेव्हापासून).**

महानगर दंडाधिकाऱ्यांची दुय्यमता.

१९. (१) मुख्य महानगर दंडाधिकारी आणि प्रत्येक अपर मुख्य महानगर दंडाधिकारी सत्र न्यायाधीशाला दुय्यम असेल ; आणि अन्य प्रत्येक महानगर दंडाधिकारी सत्र न्यायाधीशाच्या सर्वसाधारण नियंत्रणाच्या अधीनतेने, मुख्य महानगर दंडाधिकाऱ्याला दुय्यम असेल.

(२) अपर मुख्य महानगर दंडाधिकारी हा मुख्य महानगर दंडाधिकाऱ्याला दुय्यम असल्यास, उच्च न्यायालय, या संहितेच्या प्रयोजनाकरिता त्या दुय्यमतेची व्याप्ती निश्चित करू शकेल.

(३) मुख्य महानगर दंडाधिकारी, महानगर दंडाधिकाऱ्यांमध्ये कामकाज वाटून देणे आणि अपर मुख्य महानगर दंडाधिकाऱ्याला कामकाज नेमून देणे याबाबत वेळोवेळी या संहितेशी सुसंगत असे नियम करू शकेल किंवा असे विशेष आदेश देऊ शकेल.

कार्यकारी दंडाधिकारी.

२०. (१) प्रत्येक जिल्ह्यात आणि प्रत्येक महानगर क्षेत्रात राज्य शासन, त्याला योग्य वाटतील तितक्या व्यक्ती "कार्यकारी दंडाधिकारी" म्हणून नियुक्त करू शकेल आणि त्यांपैकी एका व्यक्तीला "जिल्हा दंडाधिकारी" म्हणून नियुक्त करील.

(२) राज्य शासन कोणत्याही कार्यकारी दंडाधिकाऱ्याची अपर जिल्हा दंडाधिकारी म्हणून नियुक्ती करू शकेल आणि अशा दंडाधिकाऱ्याला, या संहितेखाली किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखाली जिल्हा दंडाधिकाऱ्याला असलेल्या [1][शक्तींपैकी राज्य शासन निदेशित करील अशा] शक्ती असतील.

(३) जेव्हाकेव्हा जिल्हा दंडाधिकाऱ्याचे पद रिक्त झाल्याचा परिणाम म्हणून कोणताही अधिकारी जिल्ह्याच्या कार्यकारी प्रशासनाचा तात्पुरता उत्तराधिकारी होईल तेव्हा, असा अधिकारी, राज्य शासनाचे आदेश होईतोवर, या संहितेद्वारे जिल्हा दंडाधिकाऱ्याला प्रदान केलेल्या सर्व शक्ती वापरील व तीद्वारे त्याच्याकडे सोपविलेली सर्व कामे पार पाडील.

(४) राज्य शासन, कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडे उप-विभागाचा प्रभार सोपवू शकेल आणि प्रसंगानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे त्याला त्या प्रभारातून मुक्त करू शकेल ; आणि याप्रमाणे उपविभागाचा प्रभार ज्याच्याकडे सोपवलेला आहे अशा दंडाधिकाऱ्याला "उप-विभागीय दंडाधिकारी" म्हणून संबोधले जाईल.

(५) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, महानगर क्षेत्रासंबंधात कार्यकारी दंडाधिकाऱ्याला असणाऱ्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती त्या-त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली पोलीस आयुक्ताला प्रदान करण्यास राज्य शासनाला प्रतिबंध होणार नाही.

विशेष कार्यकारी दंडाधिकारी.

२१. राज्य शासन, त्याला योग्य वाटेल अशा मुदतीकरता, "विशेष कार्यकारी दंडाधिकारी" म्हणून ओळखण्यात यावयाचे असे कार्यकारी दंडाधिकारी विशिष्ट क्षेत्रांकरता किंवा विशिष्ट कार्ये करण्याकरता, नियुक्त करू शकेल आणि ते या संहितेखाली कार्यकारी दंडाधिकाऱ्याला ज्या शक्ती प्रदान करण्याजोग्या आहेत, त्यांपैकी त्याला योग्य वाटतील अशा विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांना प्रदान करू शकेल.

कार्यकारी दंडाधिकाऱ्यांची स्थानिक अधिकारिता.

२२. (१) राज्य शासनाच्या नियंत्रणाच्या अधीनतेने, कार्यकारी दंडाधिकाऱ्यांना या संहितेखाली त्यांच्या ठायी विनिहित केल्या जातील त्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती ज्या क्षेत्रांत वापरता येतील त्यांच्या स्थानिक सीमा वेळोवेळी जिल्हा दंडाधिकाऱ्याला निश्चित करता येतील.

(२) अशा निश्चितीद्वारे अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीजकरून एरव्ही, अशा प्रत्येक दंडाधिकाऱ्याच्या अधिकारितेचा आणि शक्तीचा जिल्ह्यात सर्वत्र विस्तार असेल.

कार्यकारी दंडाधिकाऱ्यांची दुय्यमता.

२३. (१) अपर जिल्हा दंडाधिकाऱ्याहून अन्य सर्व कार्यकारी दंडाधिकारी हे जिल्हा दंडाधिकाऱ्याला दुय्यम असतील आणि उप-विभागात शक्ती वापरणारा (उप-विभागीय दंडाधिकारी वगळून) प्रत्येक कार्यकारी दंडाधिकारी उप-विभागीय दंडाधिकाऱ्यालाही, जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या सर्वसाधारण नियंत्रणाच्या अधीनतेने, दुय्यम असेल.

(२) जिल्हा दंडाधिकारी, त्याला दुय्यम असणाऱ्या कार्यकारी दंडाधिकाऱ्यांमध्ये कामकाज वाटून देणे आणि अपर जिल्हा दंडाधिकाऱ्याला कामकाज नेमून देणे याबाबत वेळोवेळी या संहितेशी सुसंगत असे नियम करू शकेल किंवा विशेष आदेश देऊ शकेल.

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम ७ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

सरकारी अभियोक्ते.

[1][२४. (१) प्रत्येक उच्च न्यायालयासाठी केंद्र शासन किंवा राज्य शासन, त्या उच्च न्यायालयाचा विचार घेतल्यानंतर अशा न्यायालयात, प्रकरणपरत्वे, केंद्र किंवा राज्य शासनाच्या वतीने कोणताही खटला, अपील किंवा अन्य कार्यवाही चालवण्यासाठी सरकारी अभियोक्त्याची नियुक्ती करील आणि एक किंवा अधिक अपर सरकारी अभियोक्तेही नियुक्त करू शकेल.

**२४. (१) प्रत्येक उच्च न्यायालयासाठी केंद्र सरकारी शासन किंवा राज्य, [1] * * * अशा न्यायालयात, प्रकरणपरत्वे, केंद्र किंवा राज्य शासनाच्या वतीने कोणताही खटला, अपील किंवा अन्य कार्यवाही चालवण्यासाठी सरकारी अभियोक्त्याची नियुक्ती करील आणि एक किंवा अधिक अपर सरकारी अभियोक्तेही नियुक्त करू शकेल.**

(२) केंद्र शासनाला, कोणत्याही जिल्ह्यामध्ये किंवा स्थानिक क्षेत्रामध्ये कोणताही खटला किंवा कोणत्याही वर्गातील खटले चालवण्याच्या प्रयोजनासाठी एका किंवा अधिक सरकारी अभियोक्त्यांची नियुक्ती करता येईल.

(३) प्रत्येक जिल्ह्यासाठी राज्य शासन सरकारी अभियोक्त्यांची नियुक्ती करील आणि त्या जिल्ह्यासाठी एक किंवा अधिक अपर सरकारी अभियोक्तेही नियुक्त करू शकेल :

परंतु, एका जिल्ह्यासाठी नियुक्त केलेल्या सरकारी अभियोक्त्यांची किंवा अपर सरकारी अभियोक्त्याची दुसऱ्या जिल्ह्यासाठी सरकारी अभियोक्ता किंवा अपर सरकारी अभियोक्ता म्हणूनही नियुक्ती होऊ शकेल.

(४) जिल्हा दंडाधिकारी, सत्र न्यायाधीशाचा विचार घेऊन, ज्या व्यक्ती तिच्या मते त्या जिल्ह्याचा सरकारी अभियोक्ता किंवा अपर सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त होण्यास योग्य असतील त्यांच्या नावांची यादी तयार करील.

**(४) जिल्हा दंडाधिकारी, [2][राज्य शासनाची मान्यता घेऊन], ज्या व्यक्ती तिच्या मते त्या जिल्ह्याचा सरकारी अभियोक्ता किंवा अपर सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त होण्यास योग्य असतील त्यांच्या नावांची यादी तयार करील.**

(५) कोणतीही व्यक्ती, जिल्हा दंडाधिकाऱ्याने पोट-कलम (४) खाली तयार केलेल्या नावांच्या यादीत तिचे नाव आल्याशिवाय, राज्य शासनाकडून सरकारी अभियोक्ता किंवा अपर सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त केली जाणार नाही.

(६) पोटकलम (५) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या राज्यामध्ये खटला चालणाऱ्या अधिकाऱ्यांचा रीतसर संवर्ग विद्यमान असेल त्या बाबतीत, राज्य शासन सरकारी अभियोक्त्याची किंवा अपर सरकारी अभियोक्त्याची नियुक्ती अशा संवर्गातील घटकव्यक्तींमधूनच करील :

परंतु, अशा नियुक्तीसाठी अशा संवर्गामध्ये राज्य शासनाच्या मते कोणतीही योग्य व्यक्ती उपलब्ध नसेल त्या बाबतीत, ते शासन, जिल्हा दंडाधिकाऱ्याने, पोटकलम (४) खाली तयार केलेल्या नावांच्या यादीमधील एखाद्या व्यक्तीस सरकारी अभियोक्ता किंवा, प्रकरणपरत्वे, अपर सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करू शकेल.

(७) एखादी व्यक्ती कमीत कमी सात वर्षे इतका काळ अधिवक्ता म्हणून व्यवसायात असेल तरच केवळ ती पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली अथवा पोटकलम (३) किंवा पोटकलम (६) खाली सरकारी अभियोक्ता किंवा अपर सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त केली जाण्यास पात्र असेल.

(८) केंद्र शासन किंवा राज्य शासन कोणत्याही खटल्याच्या किंवा कोणत्याही वर्गातील खटल्यांच्या प्रयोजनांकरता, जी व्यक्ती कमीत कमी दहा वर्षे इतका काळ अधिवक्ता म्हणून व्यवसायात असेल अशा व्यक्तीला विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करू शकेल.

(९) पोटकलम (७) व पोटकलम (८) यांच्या प्रयोजनार्थ, ज्या कालावधीमध्ये एखादी व्यक्ती अधिवक्ता म्हणून व्यवसायात असेल अथवा तिने सरकारी अभियोक्ता किंवा सहायक सरकारी अभियोक्ता किंवा खटला चालवणारा अन्य अधिकारी म्हणून-मग त्यास कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो-सेवा बजावलेली असेल (मग ती सेवा या संहितेच्या प्रारंभापूर्वीची असो वा नंतरची असो) तो कालावधी म्हणजे, अशी व्यक्ती अधिवक्ता म्हणून व्यवसायात राहिलेली असेल असा कालावधी असल्याचे मानण्यात येईल.]

**२५.** (१) राज्य शासन, दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात खटला चालवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एका किंवा अधिक सहायक सरकारी अभियोक्त्यांची नियुक्ती करील. सहायक सरकारी अभियोक्ते.

[2][(१क) दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयांमध्ये कोणतेही खटले किंवा कोणत्याही वर्गातील खटले चालवण्याच्या प्रयोजनासाठी केंद्र शासनाला एका किंवा अधिक सहायक सरकारी अभियोक्त्यांची नियुक्ती करता येईल.]

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम ८ द्वारे मूळ कलमाऐवजी घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे समाविष्ट केले.

**१. फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८१ (१९८१ च्या महा ३४). -कलम २ द्वारे गाळले.**

**२. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.**

(२) पोटकलम (३) मध्ये अन्यथा उपबंधित केले असेल तेवढे वगळता एरव्ही, कोणताही पोलीस अधिकारी एखादा सहायक सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त केला जाण्यास पात्र असणार नाही.

(३) जेथे कोणत्याही विशिष्ट खटल्याच्या प्रयोजनासाठी कोणताही सहायक सरकारी अभियोक्ता उपलब्ध नसेल तेथ, जिल्हा दंडाधिकाऱ्याला अन्य कोणत्याही व्यक्तीची, त्या खटल्याची जबाबदारी ज्याच्याकडे सोपवली आहे असा सहायक सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करता येईल :

परंतु, कोणताही पोलीस अधिकारी—

(क) ज्या अपराधाबद्दल आरोपीवर खटला भरण्यात आला असेल त्याच्या अन्वेषणात त्याने कोणत्याही प्रकारे भाग घेतला असेल तर ; किंवा

(ख) निरीक्षकाहून खालच्या दर्जाचा असेल तर;

याप्रमाणे नियुक्त केला जाणार नाही.

## प्रकरण तीन

## न्यायालयांची शक्ती

कोणत्या न्यायालयांनी अपराधांची संपरीक्षा करावयाची.

२६. या संहितेतील अन्य उपबंधांच्या अधीनतेने,—

(क) 'भारतीय दंड संहिता' (१९६० चा ४५) या खालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा—

(एक) उच्च न्यायालय, किंवा

(दोन) सत्र न्यायालय, किंवा

(तीन) ज्याने अशा अपराधाची संपरीक्षा करावयाची असे पहिल्या अनुसूचीत दाखविण्यात आले असेल असे अन्य कोणतेही न्यायालय

करू शकेल.

(ख) अन्य कोणत्याही कायद्याखालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा, जेव्हा यासंबंधात अशा कायद्यात कोणतेही न्यायालय उल्लेखिलेले असेल तेव्हा, असे न्यायालय करील आणि जेव्हा कोणतेही न्यायालय उल्लेखिलेले नसेल तेव्हा, त्याची संपरीक्षा—

(एक) उच्च न्यायालय, किंवा

(दोन) ज्याने अशा अपराधाची संपरीक्षा करावयाची असे पहिल्या अनुसूचीत दाखविण्यात आले असेल असे अन्य कोणतेही न्यायालय

करू शकेल.

बाल गुन्हेगारांच्या बाबतीत अधिकारिता.

२७. कोणतीही व्यक्ती, जेव्हा ती न्यायालयापुढे उपस्थित होते किंवा आणली जाते त्या दिनांकास सोळा वर्ष वयाखालील असेल तर, अशा व्यक्तीने मृत्यूच्या किंवा आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र नसलेला अपराध केला असल्यास त्या अपराधाची संपरीक्षा मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाला अथवा 'बालक अधिनियम, १९६०' (१९६० चा ६०) याखाली अगर अल्पवयीन अपराध्यांवरील उपचार, त्यांचे प्रशिक्षण व पुनर्वसन याबाबत उपबंध करणाऱ्या त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखाली विशेष शक्ती प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही न्यायालयाला करता येईल.

उच्च न्यायालये व सत्र न्यायाधीश कोणत्या शिक्षा देऊ शकतील.

२८. (१) उच्च न्यायालय कायद्याद्वारे प्राधिकृत केलेली कोणतीही शिक्षा देऊ शकेल.

(२) सत्र न्यायाधीश किंवा अपर सत्र न्यायाधीश कायद्याद्वारे प्राधिकृत केलेली कोणतीही शिक्षा देऊ शकेल; पण अशा कोणत्याही न्यायाधीशाने दिलेला कोणताही मृत्यूचा शिक्षादेश हा उच्च न्यायालयाने तो कायम करण्याच्या शर्तीस अधीन असेल.

(३) सहायक सत्र न्यायाधीश मृत्यूची किंवा आजीव कारावासाची किंवा दहा वर्षांहून अधिक मुदतीच्या कारावासाची शिक्षा खेरीजकरून, कायद्याद्वारे प्राधिकृत केलेली कोणतीही शिक्षा देऊ शकेल.

दंडाधिकारी कोणत्या शिक्षा देऊ शकतील.

२९. (१) मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याचे न्यायालय मृत्यूची किंवा आजीव कारावासाची किंवा सात वर्षांहून अधिक मुदतीच्या कारावासाची शिक्षा खेरीजकरून, कायद्याद्वारे प्राधिकृत केलेली कोणतीही शिक्षा देऊ शकेल.

(२) प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याचे न्यायालय जास्तीत जास्त तीन वर्षे इतक्या मुदतीच्या कारावासाची, किंवा जास्तीत जास्त पाच हजार रुपये इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा देऊ शकेल.

(३) द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याचे न्यायालय जास्तीत जास्त एक वर्ष इतक्या मुदतीच्या कारावासाची, किंवा जास्तीत जास्त एक हजार रुपये इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा देऊ शकेल.

(४) मुख्य महानगर दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाला मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालयाच्या शक्ती असतील आणि महानगर दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाला प्रथम वर्ग दंडाधिकारी न्यायालयाच्या शक्ती असतील.

**द्रव्यदंड भरण्यात कसूर झाल्यास कारावासाची शिक्षा.**

३०. (१) दंडाधिकाऱ्याचे न्यायालय द्रव्यदंड भरण्यात कसूर झाल्यास भोगावयाचा कारावास म्हणून कायद्याद्वारे प्राधिकृत असेल तेवढ्या मुदतीची शिक्षा देऊ शकेल :

परंतु, ती मुदत—

(क) कलम २९ खालील दंडाधिकाऱ्याच्या शक्तींच्या कक्षेबाहेर नसावी;

(ख) जेथे मूळ शिक्षेचा भाग म्हणून कारावासाची शिक्षा देण्यात आली असेल तेथे, अपराधाबद्दल द्रव्यदंड भरण्यात कसूर झाल्यास भोगावयाचा कारावास म्हणून नव्हे तर अन्यथा जितक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा देण्यास दंडाधिकारी सक्षम असेल तिच्या एक-चतुर्थांशापेक्षा अधिक नसावी.

(२) या कलमाखाली देण्यात आलेला कारावास दंडाधिकाऱ्याने कलम २९ खाली देण्याजोग्या कमाल मुदतीच्या कारावासाच्या मूळ शिक्षेव्यतिरिक्त असू शकेल.

**एका संपरीक्षेत अनेक अपराधांबद्दल दोषसिद्धी झाल्यास त्या प्रकरणी द्यावयाची शिक्षा.**

३१. (१) जेव्हा एखादी व्यक्ती एका संपरीक्षेत दोन किंवा अधिक अपराधांबद्दल सिद्धदोष झालेली असेल तेव्हा अशा अपराधांकरिता विहित केलेल्या ज्या शिक्षा देण्यास न्यायालय सक्षम असेल अशा अनेक शिक्षा असे न्यायालय, 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)—कलम ७१ च्या उपबंधांच्या अधीनतेने, त्या व्यक्तीला त्याबद्दल देऊ शकेल; अशा शिक्षा कारावासाच्या असतील तेव्हा, न्यायालयाने अशा शिक्षा समवर्तीपणे चालू राहतील असे निदेशित केले नसल्यास, न्यायालय निदेशित करील अशा क्रमाने एक संपल्यानंतर दुसरी याप्रमाणे त्या सुरू होणाऱ्या असतील.

(२) क्रमवर्ती शिक्षांच्या बाबतीत, न्यायालयाने अनेक अपराधांबद्दल दिलेली एकूण शिक्षा ही एका अपराधाबद्दल दोषसिद्धी झाल्यावर ते न्यायालय जितकी शिक्षा देण्यास सक्षम असेल तिच्यापेक्षा अधिक आहे एवढ्याच केवळ कारणाने अपराध्याला संपरीक्षेसाठी वरिष्ठ न्यायालयाकडे पाठवण्याची जरुरी असणार नाही :

परंतु,—

(क) काही झाले तरी, अशा व्यक्तीला चौदा वर्षांहून दीर्घतर मुदतीच्या कारावासाची शिक्षा दिली जाणार नाही;

(ख) एकूण शिक्षा ही, ते न्यायालय एका अपराधाबद्दल जितकी शिक्षा देण्यास सक्षम असेल तिच्या दुपटीहून अधिक असणार नाही.

(३) सिद्धदोष व्यक्तीने करावयाच्या अपिलाच्या प्रयोजनार्थ, या कलमाखाली तिला देण्यात आलेल्या एकूण क्रमवर्ती शिक्षा म्हणजे एकच शिक्षा असल्याचे मानले जाईल.

**शक्ती प्रदान करण्याची पद्धत.**

३२. (१) या संहितेखाली शक्ती प्रदान करताना, उच्च न्यायालय किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य शासन व्यक्तींना विशेषकरून त्यांच्या नावांचा किंवा पदाधिकारांचा निर्देश करून अथवा सरसकट अधिकारीवर्गांना त्यांच्या पदाभिधानाचा निर्देश करून आदेशाद्वारे शक्ती प्रदान करू शकेल.

(२) असा प्रत्येक आदेश, याप्रमाणे शक्ती प्रदान करण्यात आलेल्या व्यक्तीला ज्या दिनांकास तो कळवण्यात आला असेल त्या दिनांकापासून परिणामक होईल.

**अधिकाऱ्यांची शक्ती.**

३३. शासनाच्या सेवेतील एखादे पद धारण करणाऱ्या ज्या व्यक्तीच्या ठायी उच्च न्यायालयाने किंवा राज्य शासनाने या संहितेखाली कोणत्याही संपूर्ण स्थानिक क्षेत्रापुरत्या कोणत्याही शक्ती विनिहित केल्या असतील ती व्यक्ती त्याच राज्य शासनाच्या अखत्याराखालील सदृश स्थानिकक्षेत्रात, त्याच स्वरूपाच्या समतुल्य किंवा त्याहून वरिष्ठ पदावर नियुक्त केली जाईल तेव्हा तेव्हा ती व्यक्ती, उच्च न्यायालयाने किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य शासनाने अन्यथा निदेशित केले नाही तर किंवा केलेले नसेल तर, जेथे ती याप्रमाणे नियुक्त केली गेली असेल त्या स्थानिक क्षेत्रात त्याच शक्ती वापरील.

**शक्ती काढून घेणे.**

३४. (१) उच्च न्यायालय किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य शासन या संहितेखाली त्याने किंवा त्याला दुय्यम असणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याने कोणत्याही व्यक्तीला प्रदान केलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती काढून घेऊ शकेल.

(२) मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याने किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याने प्रदान केलेल्या कोणत्याही शक्ती ज्याने अशा शक्ती प्रदान केल्या त्या दंडाधिकाऱ्याला काढून घेता येतील.

**न्यायाधीशांच्या व दंडाधिकाऱ्यांच्या शक्ती त्यांच्या पदीय उत्तराधिकाऱ्यांना वापरता येणे.**

३५. (१) या संहितेतील अन्य उपबंधांच्या अधीनतेने, न्यायाधीशांच्या किंवा दंडाधिकाऱ्यांच्या शक्ती व कामे त्यांच्या पदीय उत्तराधिकाऱ्याला वापरता वा करता येतील.

(२) कोणत्याही अपर किंवा सहायक सत्र न्यायाधीशाचा पदीय उत्तराधिकारी कोण आहे याबाबत जेव्हा कोणतीही शंका असेल तेव्हा, कोणताही न्यायाधीश या संहितेच्या अथवा ती खालील कोणत्याही कार्यवाहीच्या किंवा आदेशाच्या प्रयोजनार्थ अशा अपर किंवा सहायक न्यायाधीशाचा पदीय उत्तराधिकारी म्हणून मानला जाईल ते सत्र न्यायाधीश लेखी आदेशाद्वारे निर्धारित करील.

(३) कोणत्याही दंडाधिकाऱ्याचा पदीय उत्तराधिकारी कोण आहे याबाबत जेव्हा कोणतीही शंका असेल तेव्हा, कोणता दंडाधिकारी या संहितेच्या अथवा तीखालील कोणत्याही कार्यवाहीच्या किंवा आदेशाच्या प्रयोजनार्थ अशा दंडाधिकाऱ्याचा पदीय उत्तराधिकारी म्हणून मानला जाईल ते, मुख्य न्याय दंडाधिकारी किंवा, प्रकरणपरत्वे, जिल्हा दंडाधिकारी लेखी आदेशाद्वारे निर्धारित करील.

## प्रकरण चार

### क—वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या शक्ती

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या शक्ती.

३६. पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याहून दर्जाने वरिष्ठ असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना जेथे त्यांची नियुक्ती झाली असेल त्या स्थानिक क्षेत्रात सर्वत्र असा अधिकारी आपल्या ठाण्याच्या सीमांच्या आत वापरू शकेल अशा शक्ती वापरता येतील.

### ख-दंडाधिकाऱ्यांना व पोलिसांना सहाय्य

दंडाधिकाऱ्यांना व पोलिसांना जनतेने केव्हा सहाय्य करावयाचे.

३७. प्रत्येक व्यक्ती ज्या दंडाधिकाऱ्याने किंवा पोलीस अधिकाऱ्याने,—

(क) जिला अटक करण्यास असा दंडाधिकारी किंवा पोलीस अधिकारी प्राधिकृत असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीला ताब्यात घेण्याच्या कामी किंवा ती निसटून जाण्यास प्रतिबंध करण्याच्या कामी ; अथवा

(ख) शांतताभंगास प्रतिबंध किंवा त्याचे दमन करण्याच्या कामी; अथवा

(ग) कोणत्याही रेल्वेस, कालव्यास, तारायंत्रास किंवा सार्वजनिक संपत्तीस कोणतीही क्षती पोचवण्याच्या प्रयत्नास प्रतिबंध करण्याच्या कामी,

वाजवी रीत्या तिची मदत मागितली असेल तर त्याला मदत करण्यास बांधलेली असते.

पोलीस अधिकाऱ्यांखेरीज अन्य अशा, वॉरंट बजावणाऱ्या व्यक्तीला मदत.

३८. जेव्हा एखादे वॉरंट पोलीस अधिकाऱ्याखेरीज अन्य व्यक्तीने बजावावे म्हणून तिला निदेशून लिहिलेले असेल तेव्हा, अन्य कोणतीही व्यक्ती, वॉरंट जिला निदेशून लिहिलेले आहे ती व्यक्ती जवळपास असून वॉरंटाच्या अंमलबजावणीचे काम करीत असेल तर, तिला अशा वॉरंटाच्या अंमलबजावणीच्या कामी मदत करू शकेल.

विवक्षित अपराधांची जनतेने वर्दी देणे.

३९. (१) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या पुढीलपैकी कोणत्याही कलमाखाली शिक्षापात्र असलेला अपराध करण्यात आल्याचे किंवा असा अपराध करण्याचा अन्य कोणत्याही व्यक्तीचा उद्देश असल्याचे माहीत असलेल्या प्रत्येक व्यक्तीने कोणत्याही वाजवी सबबीच्या अभावी—ती सबब सिद्ध करण्याची जबाबदारी याप्रमाणे माहिती असलेल्या व्यक्तीवर राहील—तात्काळ सर्वात जवळच्या दंडाधिकाऱ्याला किंवा पोलीस अधिकाऱ्याला अशा कृतीची किंवा उद्देशाची वर्दी दिली पाहिजे—ती कलमे अशी :—

(एक) कलमे १२१ ते १२६ (दोन्ही धरून) आणि कलम १३० (म्हणजे, उक्त संहितेच्या ६व्या प्रकरणामध्ये विनिर्दिष्ट केलेले देशविरोधी अपराध);

(दोन) कलमे १४३, १४४, १४५, १४७ व १४८ (म्हणजे, उक्त संहितेच्या ८व्या प्रकरणामध्ये विनिर्दिष्ट केलेले सार्वजनिक प्रशांततेच्या विरोधी अपराध);

(तीन) कलमे १६१ ते १६५क (दोन्ही धरून) (म्हणजे, अवैध परितोषणासंबंधीचे अपराध);

(चार) कलमे २७२ ते २७८ (दोन्ही धरून) (म्हणजे, अन्न व औषधिद्रव्ये इ. च्या भेसळीसंबंधीचे अपराध);

(पाच) कलमे ३०२, ३०३, ३०४ (म्हणजे, जीवितास, बाधक होणारे अपराध);

[1][ (पाच-क) कलम ३६४ क (म्हणजे, खंडणी इत्यादी साठी केलेल्या अपनयनाशी संबंधित अपराध).];

(सहा) कलम ३८२ (म्हणजे, चोरी करण्यासाठी मृत्यू, दुखापत किंवा निरोध घडवून आणण्याची तयारी करून चोरी करण्याचा अपराध);

(सात) कलमे ३९२ ते ३९९ (दोन्ही धरून) आणि कलम ४०२ (म्हणजे, जबरी चोरी व दरवडा हे अपराध);

(आठ) कलम ४०९ (म्हणजे, लोकसेवक इ. नी फौजदारीपात्र विश्वासघात करण्यासंबंधीचा अपराध);

(नऊ) कलमे ४३१ ते ४३९ (दोन्ही धरून) (म्हणजे, संपत्तीच्या विरोधी आगळीक करण्याचे अपराध);

(दहा) कलमे ४४९ आणि ४५० (म्हणजे, गृह-अतिक्रमणाचा अपराध);

(अकरा) कलमे ४५६ ते ४६० (दोन्ही धरून) (म्हणजे, चोरट्या गृह-अतिक्रमणाचे अपराध); आणि

(बारा) कलमे ४८९क आणि ४८९ङ (दोन्ही धरून) (म्हणजे, चलनी नोटा व बँक नोटा यासंबंधीचे अपराध).

---

१. १९९३ चा अधिनियम ४२, कलम ३ द्वारे समाविष्ट केले.

(२) या कलमाच्या प्रयोजनासाठी, "अपराध" या शब्दात भारताबाहेर कोणत्याही स्थळी केलेली जी कृती भारतात केली तर अपराध ठरेल अशा कोणत्याही कृतीचा समावेश आहे.

४०. (१) एखाद्या गावाच्या कारभारासंबंधात नियुक्त केलेल्या प्रत्येक अधिकाऱ्याने आणि गावात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने पुढील बाबींसंबंधात त्याच्याकडे जी कोणतीही माहिती असेल ती सर्वात जवळचा दंडाधिकारी किंवा सर्वात जवळच्या पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकारी, यांपैकी जो अधिक जवळ असेल त्याला तात्काळ कळवली पाहिजे, त्या बाबी अशा :— गावाच्या कारभारासंबंधात नेमलेल्या अधिकाऱ्यांनी विवक्षित अहवाल देणे हे त्यांचे कर्तव्य.

(क) चोरीची संपत्ती स्वीकारणारा किंवा विकणारा म्हणून कुप्रसिद्ध असलेल्या कोणत्याही व्यक्तीचा अशा गावात किंवा त्याच्या जवळपास कायमचा किंवा तात्पुरता रहिवास ;

(ख) जी व्यक्ती ठग, जबरी चोर, पळून गेलेला सिद्धदोषी किंवा उद्घोषित अपराधी असल्याचे आपणांस माहीत आहे किंवा तसा आपणांस वाजवी संशय आहे अशा कोणत्याही व्यक्तीचा अशा गावातील कोणत्याही स्थळी असणारा राबता किंवा त्या गावातून होणारे तिचे मार्गक्रमण ;

(ग) अशा गावात किंवा त्याच्या जवळपास कोणताही बिनजामिनी अपराध किंवा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) कलम १४३, कलम १४४, कलम १४५, कलम १४७ किंवा कलम १४८ खाली शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध घडणे किंवा करण्याचा उद्देश असणे ;

(घ) अशा गावात किंवा त्याच्या जवळपास कोणताही आकस्मिक किंवा अनैसर्गिक मृत्यु घडून येणे किंवा संशयास्पद परिस्थितीत कोणताही मृत्यु घडून येणे अथवा असा मृत्यु घडून आलेला आहे असा वाजवी संशय जीमुळे उत्पन्न होतो अशा परिस्थितीत कोणताही मृतदेह किंवा त्याचा भाग सापडणे अथवा कोणतीही व्यक्ती अशा व्यक्तीच्याबाबत बिनजामिनी अपराध करण्यात आलेला आहे असा जीमुळे संशय उत्पन्न होतो अशा परिस्थितीत अशा गावातून नाहीशी होणे ;

(ङ) जी कृती भारतात केली तर 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या पुढीलपैकी म्हणजेच, २३१ ते २३८ (दोन्ही धरून) ३०२, ३०४, ३८२, ३९२ ते ३९९ (दोन्ही धरून), ४०२, ४३५, ४३६, ४४९, ४५०, ४५७ ते ४६० (दोन्ही धरून), ४८९क, ४८९ख, ४८९ग आणि ४८९घ यांपैकी कोणत्याही कलमाखाली शिक्षापात्र होईल अशी कोणतीही कृती भारताबाहेर अशा गावाच्या जवळपास घडणे किंवा करण्याचा उद्देश असणे ;

(च) सुव्यवस्था राखणे किंवा गुन्हेगारीस प्रतिबंध करणे अथवा व्यक्ती किंवा संपत्ती सुरक्षित राहणे यांना बाधक होण्याचा संभव असलेल्या ज्या बाबीसंबंधी जिल्हा दंडाधिकाऱ्याने राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने दिलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे वर्दी कळविण्याचे निदेशित केले असेल अशी कोणतीही बाब.

(२) या कलमात,

(एक) "गाव" या संज्ञेत गाव-जमिनीचा समावेश आहे ;

(दोन) "उद्घोषित अपराधी" या शब्दप्रयोगात ज्यांवर या संहितेचा विस्तार आहे या राज्यक्षेत्रांमध्ये जी कृती केल्यास, 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या पुढीलपैकी म्हणजेच, ३०२, ३०४, ३८२, ३९२ ते ३९९ (दोन्ही धरून), ४०२, ४३५, ४३६, ४९९, ४५० व ४५७ ते ४६० (दोन्ही धरून) यांपैकी कोणत्याही कलमाखाली शिक्षापात्र अपराध होईल अशा कोणत्याही कृतीबाबत, भारतातील ज्या कोणत्याही राज्यक्षेत्रावर या संहितेचा विस्तार नाही त्यातील कोणत्याही न्यायालयाने किंवा प्राधिकरणाने अपराधी म्हणून उद्घोषित केलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश आहे ;

(तीन) "गावाच्या कारभारासंबंधात नेमलेला अधिकारी" या शब्दांचा अर्थ, ग्रामपंचायतीचा सदस्य, असा आहे आणि त्यात ग्राम-प्रमुख व गावच्या प्रशासनाशी संबंधित असे कोणतेही कार्य करण्यासाठी नियुक्त केलेला प्रत्येक अधिकारी किंवा अन्य व्यक्ती यांचा समावेश आहे.

## प्रकरण पाच

## व्यक्तींना अटक करणे

४१. (१) कोणताही पोलीस अधिकारी,—

(क) जी व्यक्ती कोणत्याही दखलपात्र अपराधाशी संबंधित आहे, अथवा याप्रमाणे ती संबंधित असल्याबद्दल जिच्याविरुद्ध वाजवी फिर्याद करण्यात आलेली आहे, किंवा तशी विश्वसनीय माहिती मिळालेली आहे किंवा तसा वाजवी संशय आहे ; किंवा पोलीस वॉरंटाशिवाय केव्हा अटक करू शकतील.

(ख) ज्या व्यक्तीकडे कायदेशीर सबबीशिवाय–असल्यास ती सबब सिद्ध करण्याची जबाबदारी अशा व्यक्तीवर राहील–तिच्या कब्जात कोणतेही घरफोडीचे हत्यार आहे ; किंवा

(ग) ज्या व्यक्तीला या संहितेखाली किंवा राज्य शासनाच्या आदेशाद्वारे अपराधी म्हणून उद्घोषित करण्यात आले आहे ; किंवा

(घ) चोरीची संपत्ती म्हणून वाजवी संशय घेता येईल अशी कोणतीही वस्तू जिच्या कब्जात असून अशा वस्तुसंबंधात ज्या व्यक्तीने अपराध केला असल्याचा वाजवी संशय घेता येईल ; किंवा

(ङ) पोलीस अधिकारी आपले कर्तव्य बजावीत असताना जी व्यक्ती त्याला अडथळा आणते, अथवा जी व्यक्ती कायदेशीर हवालातीतून निसटली आहे किंवा निसटण्याचा प्रयत्न करते; किंवा

(च) जी व्यक्ती संघराज्याच्या सशस्त्र सेनादलांपैकी कोणत्याही सेनादलातून पळून आली असल्याचा वाजवी संशय आहे ; किंवा

(छ) भारताबाहेर कोणत्याही स्थळी केलेली जी कोणतीही कृती भारतात केली असती तर अपराध म्हणून शिक्षापात्र झाली असता तिच्याशी जी व्यक्ती संबंधित असून अथवा त्या कृतीशी संबंधित असल्याबद्दल जिच्याविरुद्ध वाजवी फिर्याद देण्यात आली असून किंवा तशी विश्वसनीय माहिती मिळालेली असून किंवा तसा वाजवी संशय असून त्याबद्दल प्रत्यर्पणाशी संबंधित अशा कोणत्याही कायद्याखाली किंवा अन्यथा भारतात पकड केली जाण्यास किंवा हवालातीत स्थानबद्ध केली जाण्यास पात्र आहे ; किंवा

(ज) जी व्यक्ती बंधमुक्त सिद्धदोषी असून, कलम ३५६ च्या पोटकलम (५) खाली केलेल्या कोणत्याही नियमाचा भंग करते ; किंवा

(झ) ज्या व्यक्तीच्या अटकेसाठी, अन्य पोलीस अधिकाऱ्याकडून कोणतीही रीतसर मागणी—मग ती लेखी किंवा तोंडी असो—आलेली असून अटक करावयाची व्यक्ती आणि ज्याबद्दल अटक करावयाची तो अपराध किंवा अन्य कारण रीतसर मागणीपत्रात विनिर्दिष्ट केलेले असेल आणि ज्याने ती रीतसर मागणी केली तो अधिकारी कायद्याने वॉरंटाशिवाय त्या व्यक्तीला अटक करू शकला असता असे त्यावरून दिसून आले तर,

अशा कोणत्याही व्यक्तीस, दंडाधिकाऱ्याकडून आदेश मिळाल्याशिवाय व वॉरंटाशिवाय अटक करू शकेल.

(२) पोलीस ठाण्याचा कोणताही अंमलदार अधिकारी, कलम १०९ किंवा कलम ११० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी एका किंवा त्याहून अधिक प्रवर्गातील कोणत्याही व्यक्तीला अटक तशाच रीतीने करू शकेल किंवा अटक करवू शकेल.

**नाव व राहण्याचे ठिकाण सांगण्यास नकार दिल्यावरून अटक.**

४२. (१) जिने पोलीस अधिकाऱ्यासमक्ष बिनदखली अपराध केलेला असेल किंवा तसे केल्याचा जिच्यावर आरोप असेल अशी कोणतीही व्यक्ती, अशा अधिकाऱ्याने मागणी केल्यावर, आपले नाव व राहण्याचे ठिकाण सांगण्यास नकार देईल किंवा जे खोटे आहे असे समजण्यात अशा अधिकाऱ्याला कारण आहे असे नाव व राहण्याचे ठिकाण सांगेल तेव्हा, तिचे नाव किंवा राहण्याचे ठिकाण याची खात्री करता यावी म्हणून असा अधिकारी तिला अटक करू शकेल.

(२) जेव्हा अशा व्यक्तीचे खरे नाव आणि राहण्याचे ठिकाण याबाबत खात्री होईल तेव्हा, तसे फर्माविण्यात आल्यास दंडाधिकाऱ्यासमोर उपस्थित होण्यासाठी तिने जामिनदारांसहित किंवा त्यांच्याविना असे बंधपत्र निष्पादित करून दिल्यावर तिला सोडून दिले जाईल :

परंतु, जर अशी व्यक्ती भारतातील रहिवासी नसेल तर, त्या बंधपत्राला भारतात रहिवासी असलेला किंवा असलेले जामीनदार यांचा जामीन घेतला जाईल.

(३) अशा व्यक्तीचे खरे नाव व राहण्याचे ठिकाण याबाबत अटकेच्या वेळेपासून चोवीस तासांच्या आत खात्री झाली नाही अथवा बंधपत्र निष्पादित करण्यास किंवा तसे फर्माविण्यात आल्यास पुरेसे जामीनदार देण्यास ती व्यक्ती चुकली तर, अधिकारिता असलेल्या सर्वात जवळच्या दंडाधिकाऱ्यापुढे तिला तात्काळ पाठवण्यात येईल.

**खाजगी व्यक्तीकडून अटक आणि अशी अटक झाल्यावरची कार्यपद्धती.**

४३. (१) कोणतीही खाजगी व्यक्ती, तिच्या समक्ष ज्याने बिनजामिनी आणि दखलपात्र अपराध केला असेल अशा कोणत्याही व्यक्तीस किंवा कोणत्याही उद्घोषित अपराध्यास अटक करू शकेल किंवा अटक करवू शकेल आणि, अनावश्यक विलंब न लावता, याप्रमाणे अटक केलेल्या व्यक्तीला पोलीस अधिकाऱ्याच्या स्वाधीन करील किंवा स्वाधीन करवील अथवा, पोलीस अधिकारी अनुपस्थित असल्यास अशा व्यक्तीला बंदोबस्तात सर्वात जवळच्या पोलीस ठाण्यावर नेईल किंवा नेण्याची व्यवस्था करील.

(२) जर अशी व्यक्ती कलम ४१ च्या उपबंधाखाली येते असे समजण्यास कारण असेल तर, पोलीस अधिकारी तिला पुन्हा अटक करील.

(३) जर तिने बिनदखली अपराध केलेला आहे असे समजण्यास कारण असेल आणि पोलीस अधिकाऱ्याने मागणी केली असता तिने आपले नाव व राहण्याचे ठिकाण सांगण्यास नकार दिला अथवा जे खोटे आहे असे समजण्यास अशा अधिकाऱ्याला कारण आहे असे नाव, किंवा राहण्याचे ठिकाण सांगितले तर, त्याच्याबाबत कलम ४२ च्या उपबंधांखाली कार्यवाही केली जाईल ; पण त्याने कोणताही अपराध केला आहे असे समजण्यास कोणतेही पुरेसे कारण नसेल तर, तिला लगेच सोडून देण्यात येईल.

**दंडाधिकाऱ्याकडून अटक.**

४४. (१) जेव्हा दंडाधिकाऱ्याच्या समक्ष—मग तो कार्यकारी असो वा न्यायिक असो—त्याच्या स्थानिक अधिकारितेत अपराध करण्यात येईल तेव्हा, अपराध्याला तो स्वतः अटक करू शकेल किंवा त्याला अटक करण्यास कोणत्याही व्यक्तीला आदेश देऊ शकेल आणि तद्नंतर, जामिनाबाबत यात अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या अधीनतेने, अपराध्याला हवालातीत पाठवू शकेल.

(२) कोणताही दंडाधिकारी—मग तो कार्यकारी असो वा न्यायिक असो—जिच्या अटकेसाठी वॉरंट काढण्यास तो त्या वेळी व त्या परिस्थितीत सक्षम असेल अशा कोणत्याही व्यक्तीला आपल्या स्थानिक अधिकारितेत आपल्या समक्ष कोणत्याही वेळी अटक करू शकेल किंवा अटक करण्याचा निदेश देऊ शकेल.

**सशस्त्र सेनादलांच्या सदस्यांना अटकेपासून संरक्षण.**

४५. (१) कलमे ४१ ते ४४ (दोन्ही धरून) यांत काहीही अंतर्भूत असले तरी केंद्र शासनाची संमती मिळविल्याखेरीज संघराज्याच्या सशस्त्र सेनादलांमधील कोणत्याही सदस्याला त्याने आपल्या पदाची कामे पार पाडण्याच्या कामी केलेल्या किंवा त्यासाठी म्हणून केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल अटक केली जाणार नाही.

(२) राज्य शासन, अधिसूचनेद्वारे पोटकलम (१) चे उपबंध, सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी ज्याच्याकडे सोपविण्यात आली आहे अशा दलापैकी त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वर्गाच्या किंवा प्रवर्गाच्या सदस्यांना—मग ते कुठेही सेवा करीत असोत—लागू होतील असा निदेश देऊ शकेल, आणि त्यामुळे त्या पोटकलमाचे उपबंध, त्यात आलेल्या "केंद्र शासन" या शब्दप्रयोगा-ऐवजी जणू काही "राज्य शासन" हा शब्दप्रयोग घालण्यात आलेला असावा त्याप्रमाणे लागू होतील.

**अटक कशी करावयाची.**

४६. (१) अटक करताना, तसे करणारा पोलीस अधिकारी किंवा अन्य व्यक्ती, अटक करावयाच्या व्यक्तीने उक्तीद्वारे किंवा कृतीद्वारे स्वाधीन होण्याची तयारी दर्शविली नाही तर, तिच्या शरीरास प्रत्यक्षपणे स्पर्श करील किंवा वेढा घालील.

(२) जर अशा व्यक्तीने तिला अटक करावयाच्या प्रयत्नाचा बळाने प्रतिकार केला किंवा अटक चुकवण्याचा प्रयत्न केला तर, असा पोलिस अधिकारी किंवा अन्य व्यक्ती, अटक करण्यासाठी जरूर त्या सर्व मार्गांचा अवलंब करू शकेल.

(३) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, मृत्यूच्या किंवा आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाचा जिच्यावर आरोप नाही अशा व्यक्तीचा मृत्यू घडवून आणण्याचा हक्क मिळत नाही.

**अटक करावयाच्या व्यक्तीने प्रवेश केलेल्या स्थळाची झडती.**

४७. (१) जर अटकेच्या वॉरंटान्वये कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा अटक करावयाचा प्राधिकार असलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला, अटक करण्यात यावयाच्या व्यक्तीने एखाद्या स्थळी प्रवेश केलेला आहे किंवा ती तेथे आहे असे समजण्यास कारण असेल तर, अशा स्थळी राहणाऱ्या किंवा तेथील ताबा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, पूर्वोक्ताप्रमाणे कार्य करणाऱ्या अशा व्यक्तीकडून किंवा अशा पोलीस अधिकाऱ्याकडून मागणी झाल्यास त्यांना तेथे मुक्त प्रवेश दिला पाहिजे व तेथे झडती घेण्यासाठी सर्व वाजवी सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

(२) जर पोटकलम (१) खाली अशा स्थळी प्रवेश मिळू शकला नाही तर वॉरंटान्वये कार्य करणाऱ्या व्यक्तीने व ज्या प्रकरणी वॉरंट निघू शकेल, पण ते मिळवावयाचे झाल्यास अटक करावयाच्या व्यक्तीला निसटण्याची संधी नक्कीच मिळाल्याशिवाय राहणार नाही अशा कोणत्याही प्रकरणी, पोलीस अधिकाऱ्याने अशा स्थळी प्रवेश करणे व तेथे झडती घेणे आणि आपल्या प्राधिकाराची व प्रयोजनाची सूचना देऊन, प्रवेश देण्याची रीतसर मागणी केल्यानंतर त्याला अन्यथा प्रवेश मिळू शकत नसेल तर, अशा स्थळी प्रवेश मिळविण्यासाठी कोणत्याही घराचे किंवा जागेचे—मग ते अटक करावयाच्या व्यक्तीचे असो वा अन्य कोणत्याही व्यक्तीचे असो—बाहेरील किंवा आतील दार किंवा खिडकी फोडून उघडणे कायदेशीर असेल :

परंतु, रूढीनुसार जी परक्यांसमोर वावरत नाही अशा स्त्रीच्या (ती अटक करावयाची व्यक्ती नसताना) प्रत्यक्ष ताब्यात असलेले असे दालन म्हणजे असे स्थळ असेल तर, अशी व्यक्ती किंवा पोलीस अधिकारी अशा दालनात प्रवेश करण्यापूर्वी अशा स्त्रीला निघून जाण्याची तिला मोकळीक आहे अशी सूचना देऊन, निघून जाण्यासाठी सर्व प्रकारची वाजवी सोय तिला उपलब्ध करून देईल, व नंतर तो दालन फोडून उघडू शकेल व त्यात प्रवेश करू शकेल.

(३) अटक करण्यास प्राधिकृत असा कोणताही पोलीस अधिकारी किंवा अशी अन्य व्यक्ती, अटक करण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही घरात किंवा जागेत कायदेशीरपणे प्रवेश करून तेथे अडकून पडल्यास स्वतःची किंवा अशा अन्य कोणत्याही व्यक्तीची सुटका करण्यासाठी, त्याचे बाहेरील किंवा आतील दार किंवा खिडकी फोडून उघडू शकेल.

**अपराध्यांचा अन्य अधिकारिताक्षेत्रां-मध्ये पाठलाग.**

४८. पोलीस अधिकारी जिला अटक करण्यास प्राधिकृत असेल त्या व्यक्तीला वॉरंटाशिवाय अटक करण्याच्या प्रयोजनार्थ, तो अशा व्यक्तीचा भारतातील कोणत्याही स्थळी पाठलाग करू शकेल.

कोणताही अनावश्यक निर्बंध नसणे. ४९. अटक करण्यात आलेल्या व्यक्तीवर, ती निसटून जाण्यास प्रतिबंध करण्यासाठी जरूर असेल त्याहून अधिक निर्बंध लादला जाता कामा नये.

अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला अटकेच्या कारणांची व जामिनाच्या हक्काची माहिती देणे. ५०. (१) वॉरंटाशिवाय कोणत्याही व्यक्तीला अटक करणारा प्रत्येक पोलीस अधिकारी किंवा अन्य व्यक्ती, ज्याबद्दल तिला अटक केलेली असेल, त्या अपराधाचा संपूर्ण तपशील किंवा अशा अटकेची अन्य कारणे तिला तात्काळ कळवील.

(२) जेव्हा पोलीस अधिकारी बिनजामिनी अपराधाचा आरोप असलेल्या व्यक्तीहून अन्य व्यक्तीला वॉरंटाशिवाय अटक करील तेव्हा, तो अटक केलेल्या व्यक्तीला, जामिनावर सुटका होण्यास ती हक्कदार आहे व तिला स्वतःच्या वतीने जामिनदारांची व्यवस्था करता येईल असे कळवील.

अटक झालेल्या व्यक्तीची झडती. ५१. (१) ज्या वॉरंटात जामीन घेण्याबाबत तरतूद केलेली नाही त्याखाली जेव्हाकेव्हा पोलीस अधिकाऱ्याने एखाद्या व्यक्तीला अटक केलेली असेल अथवा ज्या वॉरंटात जामीन घेण्याबाबत तरतूद केलेली आहे त्याखाली तिला अटक केली असेल, पण अटक झालेली व्यक्ती जामीन देऊ शकत नसेल तेव्हा, आणि

जेव्हाकेव्हा एखाद्या व्यक्तीला वॉरंटाशिवाय किंवा खाजगी व्यक्तीने वॉरंटाखाली अटक केलेली असेल व त्या अटक झालेल्या व्यक्तीला जामिनादेश देणे कायद्याने शक्य नसेल किंवा ती जामीन देण्यास असमर्थ असेल तेव्हा,

अटक करणारा अधिकारी, किंवा जेव्हा खाजगी व्यक्तीने अटक केली असेल तेव्हा ती खाजगी व्यक्ती अटक केलेल्या व्यक्तीला ज्या पोलीस अधिकाऱ्याच्या स्वाधीन करील तो अधिकारी अशा अटक केलेल्या व्यक्तीची झडती घेऊ शकेल व तिच्या अंगावर जरूर त्या पेहेरलेल्या कपड्यांहून अन्य अशा ज्या वस्तू सापडतील त्या सर्व वस्तू सुरक्षितपणे ताब्यात ठेवता येतील व अटक केलेल्या व्यक्तीकडून कोणतीही वस्तू अभिग्रहण करण्यात आली असेल तेव्हा, पोलीस अधिकाऱ्याने कोणत्या वस्तू कब्जात घेतल्या ते दर्शवणारी पावती अशा व्यक्तीला देण्यात येईल.

(२) जेव्हाकेव्हा एखाद्या स्त्रीची झडती घेणे जरुरीचे असेल तेव्हा, सभ्यता काटेकोरपणे सांभाळून झडती घेतली जाईल.

मारक हत्यारे अभिग्रहण करण्याची शक्ती. ५२. या संहितेखाली कोणताही अटक करणारा अधिकारी किंवा अन्य व्यक्ती, अटक झालेल्या व्यक्तीच्या अंगावर जी कोणतीही मारक हत्यारे असतील ती तिच्याकडून अभिग्रहण करू शकेल आणि याप्रमाणे अभिग्रहण केलेली सर्व हत्यारे अटक करणाऱ्या अधिकाऱ्याने किंवा व्यक्तीने अटक केलेल्या व्यक्तीला ज्या न्यायालयासमोर किंवा अधिकाऱ्यासमोर हजर करणे या संहितेखाली आवश्यक असेल त्याच्याकडे सुपूर्द करील.

पोलीस अधिकाऱ्याच्या विनंतीवरून वैद्यक व्यवसायीने आरोपीची तपासणी करणे. ५३. (१) एखाद्या व्यक्तीच्या शारीरिक तपासणीवरून अपराध करण्यात आल्याचा पुरावा उपलब्ध होऊ शकेल असे समजण्यास वाजवी कारणे आहेत अशा स्वरूपाचा व अशा परिस्थितीत जो अपराध केलेला असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल तो अपराध केल्याच्या दोषारोपावरून तिला अटक करण्यात आली असेल तेव्हा, फौजदाराहून खालच्या दर्जाचा नसलेल्या पोलीस अधिकाऱ्याच्या विनंतीवरून कार्य करणाऱ्या नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीने आणि त्याला मदत म्हणून व त्याच्या निदेशाखाली सद्भावपूर्वक कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, ज्या तथ्यांवरून असा पुरावा उपलब्ध होऊ शकेल त्यांची खात्री करून घेण्यासाठी वाजवी मर्यादेपर्यंत आवश्यक असेल अशी त्या अटक झालेल्या व्यक्तीची तपासणी करणे व त्या प्रयोजनासाठी वाजवी मर्यादेपर्यंत जरूर असेल इतक्या बळाचा वापर करणे कायदेशीर असेल.

(२) जेव्हाकेव्हा या कलमाखाली एखाद्या स्त्रीची शारीरिक तपासणी करावयाची असेल तेव्हा, ती तपासणी केवळ नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी स्त्रीकरवी किंवा तिच्या देखरेखीखालीच केली जाईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमात व कलम ५४ मध्ये "नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी" याचा अर्थ, ज्याच्याकडे 'भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६' (१९५६ चा १०२)—कलम २-खंड (ज्) मध्ये व्याख्या केली आहे तशी कोणतीही मान्यताप्राप्त वैद्यकीय अर्हता असून, ज्याच्या नावाची 'राज्य वैद्यक नोंदपुस्तका' त नोंद करण्यात आली असेल तो वैद्यक व्यवसायी, असा आहे.

अटक केलेल्या व्यक्तीची तिच्या विनंतीवरून वैद्यक व्यवसायीने तपासणी करणे. ५४. जिला अटक करण्यात आली—मग ती दोषारोपावरून असो वा अन्य कारणास्तव असो,—ती व्यक्ती दंडाधिकाऱ्यापुढे हजर केली जाईल त्यावेळी किंवा ती हवालातीत स्थानबद्ध असल्याच्या कालावधीत कोणत्याही वेळी, ज्या पुराव्यांमुळे तिने कोणताही अपराध केल्याचे नाशावीत होईल, किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने तिच्या शरीरासंबंधी कोणताही अपराध केल्याचे शाबीत होईल असा पुरावा आपल्या शारीरिक तपासणीतून उपलब्ध होईल असे अभिकथन करील तेव्हा, अटक झालेल्या व्यक्तीने तसे करण्याची विनंती केली असता, ती विनंती ताप देण्याच्या किंवा विलंब लावण्याच्या किंवा न्यायाची उद्दिष्टे विफल करण्याच्या हेतूने करण्यात आली आहे असे दंडाधिकाऱ्यास वाटले नाही तर एरव्ही, तो दंडाधिकारी अशा व्यक्तीची नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीकरवी शारीरिक तपासणी करण्याचा निदेश देईल.

५५. (१) जेव्हा पोलीस ठाण्याचा कोणताही अंमलदार अधिकारी किंवा बाराव्या प्रकरणाखाली अन्वेषण करणारा कोणताही पोलीस अधिकारी, जिला वॉरंटाशिवाय वैधपणे अटक करता येईल अशा कोणत्याही व्यक्तीला वॉरंटाशिवाय (आपल्या समक्ष नव्हे) अटक करण्यास, आपणास दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास फर्मावील तेव्हा, तो अंमलदार अधिकारी अटक करण्यास फर्माविण्यात आलेल्या अधिकाऱ्याकडे अटक करावयाची व्यक्ती व ज्याबद्दल अटक करावयाची आहे तो अपराध किंवा अन्य कारण विनिर्दिष्ट करणारा लेखी आदेश सुपूर्द करील आणि ज्यास याप्रमाणे फर्मावण्यात आले असेल तो अधिकारी अटक करण्यापूर्वी, जिला अटक करावयाची त्या व्यक्तीला आदेशाचा आशय विदित करील व अशा व्यक्तीने तशी मागणी केल्यास तिला तो आदेश दाखवील. पोलीस अधिकारी वॉरंटाशिवाय अटक करण्यासाठी दुय्यम अधिकाऱ्याला प्रतिनियुक्त करतो त्याबाबतीतील कार्यपद्धती.

(२) पोटकलम (१) मधील कोणतीही गोष्ट कलम ४१ खाली एखाद्या व्यक्तीस अटक करण्यासंबंधी पोलीस अधिकाऱ्याला असलेल्या शक्तीवर परिणाम करणार नाही.

५६. वॉरंटाशिवाय अटक करणारा पोलीस अधिकारी अनावश्यक विलंब न लावता व जामिनाबाबत यामध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या अधीनतेने, अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला त्या प्रकरणी अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे किंवा पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याकडे घेऊन जाईल किंवा पाठवील. अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला दंडाधिकाऱ्यापुढे किंवा पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्यापुढे नेणे.

५७. कोणताही पोलीस अधिकारी, वॉरंटाशिवाय अटक केलेल्या व्यक्तीला, प्रकरणाच्या समग्र परिस्थितीनुसार वाजवी असेल त्याहून अधिक काळ हवालातीत स्थानबद्ध करणार नाही, व दंडाधिकाऱ्याने कलम १६७ खाली आदेश दिला नसताना असा कालावधी, अटकेच्या स्थळापासून दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापर्यंतच्या प्रवासासाठी आवश्यक असलेला अवधी वगळता, चोवीस तासांहून अधिक असणार नाही. अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला चोवीस तासांहून अधिक काळ स्थानबद्ध करून ठेवावयाचे नाही.

५८. पोलीस ठाण्याचे अंमलदार अधिकारी आपापल्या ठाण्यांच्या हद्दींमध्ये वॉरंटाशिवाय अटक केलेल्या सर्व व्यक्तींची प्रकरणे—मग अशा व्यक्तींना जामिनादेश दिलेला असो वा नसो—जिल्हा दंडाधिकाऱ्याला किंवा जर त्याने तसा निदेश दिला तर उप-विभागीय दंडाधिकाऱ्याला कळवतील. पकडीचे वृत्त पोलीस अधिकाऱ्यांनी कळवणे.

५९. जिल्हा पोलीस अधिकाऱ्याने अटक केलेली असेल अशा कोणत्याही व्यक्तीला, तिने जात-मुचलका किंवा जामीन दिल्याखेरीज अथवा दंडाधिकाऱ्याच्या विशेष आदेशाखेरीज विमुक्त केले जाणार नाही. पकड केलेल्या व्यक्तीची विमुक्ती.

६०. (१) जर कायदेशीर हवालातीत असलेली व्यक्ती निसटली किंवा तिला अवैधपणे सोडवले गेले तर, ज्या व्यक्तीच्या हवालातीतून ती निसटली असेल किंवा तिला अवैधपणे सोडवले गेले असेल ती व्यक्ती तात्काळ तिचा पाठलाग करू शकेल व तिला भारतातील कोणत्याही स्थळी अटक करू शकेल. निसटल्यावर पाठलाग करण्याची व पुन्हा पकडण्याची शक्ती.

(२) पोटकलम (१) खालील अटकांना, जरी अशी कोणतीही अटक करणारी व्यक्ती वॉरंटान्वये कार्य करत नसली व ती अटक करण्याचा प्राधिकार असलेला पोलीस अधिकारी नसली तरी, कलम ४७ चे उपबंध लागू असतील.

## प्रकरण सहा

## उपस्थित राहण्यास भाग पाडण्यासाठी आदेशिका

### क—समन्स

६१. या संहितेखाली न्यायालयाने काढलेले प्रत्येक समन्स हे लेखी व दोन प्रतींमध्ये असेल व अशा न्यायालयाच्या पीठासीन अधिकाऱ्याने किंवा उच्च न्यायालय नियमाद्वारे वेळोवेळी निदेशित करील अशा अन्य अधिकाऱ्याने स्वाक्षरित केलेले असेल, आणि त्यावर न्यायालयाची मोहोर लावलेली असेल. समन्सचे प्रारूप.

६२. (१) प्रत्येक समन्स पोलीस अधिकाऱ्याकडून, किंवा राज्य शासन यासंबंधात करील अशा नियमांच्या अधीनतेने, ते काढणाऱ्या न्यायालयाच्या अधिकाऱ्याकडून किंवा अन्य लोकसेवकाकडून बजावले जाईल. समन्स कसे बजावले जाते.

(२) ज्या व्यक्तीवर समन्स काढले आहे त्या व्यक्तीला, शक्य असेल तर, समन्सच्या दोन प्रतींपैकी एक प्रत सुपूर्द करून किंवा देऊ करून खुद्द त्या व्यक्तीवर समन्स बजावण्यात येईल.

(३) जिच्यावर याप्रमाणे समन्स बजावण्यात आले असेल अशा प्रत्येक व्यक्तीला, बजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याने तशी मागणी केल्यास, अन्य प्रतीच्या मागील बाजूस त्याबद्दलची पोच म्हणून स्वाक्षरी करावी लागेल.

निगम-निकाय व सोसायटचा यांच्यावर समन्स बजावणे.

६३. निगमावर करावयाची समन्सची बजावणी ते निगमाचा कार्यवाह, स्थानिक व्यवस्थापक, किंवा अन्य प्रधान अधिकारी यांच्यावर बजावून अथवा निगमाचा भारतातील जो मुख्य अधिकारी असेल त्याला उद्देशून लिहिलेल्या व नोंदणीकृत डाकेने पाठवलेल्या पत्राद्वारे करता येईल व त्या बाबतीत डाकेच्या सामान्य क्रमानुसार पत्र ज्यावेळी येऊ शकेल त्यावेळी बजावणी घडून आल्याचे मानले जाईल.

स्पष्टीकरण.—या कलमात " निगम " याचा अर्थ, निगमित कंपनी किंवा अन्य निगम-निकाय, असा आहे, व त्यात 'सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०' (१८६० चा २१) याखाली नोंदणी केलेल्या सोसायटीचा समावेश आहे.

ज्यांना समन्स पाठवलेले असेल त्या व्यक्ती सापडू शकत नसतील त्या-बाबतीतील बजावणी.

६४. जिला समन्स पाठवलेले असेल ती व्यक्ती यथायोग्य तत्परता दाखवल्यावरही सापडू शकत नसेल तर, तिच्या कुटुंबाचा घटक असलेला जो एखादा प्रौढ पुरुष तिच्याबरोबर राहत असेल त्याच्याकडे दोन प्रतींपैकी एक त्या व्यक्तीकडे ठेवून समन्स बजावता येईल, व ज्या व्यक्तीकडे समन्स याप्रमाणे ठेवून देण्यात येईल त्या व्यक्तीला बजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याने तशी मागणी केल्यास दुसऱ्या प्रतीच्या मागील बाजूस त्याबद्दलची पोच म्हणून स्वाक्षरी करावी लागेल.

स्पष्टीकरण.—नोकर हा या कलमाच्या अर्थांतर्गत कुटुंबातील घटकव्यक्ती होत नाही.

यापूर्वी उपबंधित केल्याप्रमाणे बजावणी केली जाऊ शकत नसेल त्याबाबतीतील कार्यपद्धती.

६५. जर यथायोग्य तत्परता दाखवूनही कलम ६२, कलम ६३ किंवा कलम ६४ मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे बजावणी करता येत नसेल तर, बजावणी करणारा अधिकारी हा समन्स काढलेली व्यक्ती ज्या घरात किंवा ज्या घरवाडीत सर्वसामान्यपणे राहत असेल तेथील एखाद्या ठळक भागी समन्सच्या दोन प्रतींपैकी एक लावील ; आणि तदनंतर न्यायालय त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर समन्स रीतसर बजावण्यात आले आहे असे घोषित करू शकेल किंवा त्याला उचित वाटेल अशा रीतीने नव्याने बजावणी करण्याचा आदेश देऊ शकेल.

शासकीय कर्मचाऱ्यांवर बजावणी.

६६. (१) समन्स पाठवलेली व्यक्ती ही शासनाच्या सक्रिय सेवेत असेल तेव्हा, समन्स काढणारे न्यायालय सर्वसामान्यपणे त्या समन्सच्या प्रती अशी व्यक्ती ज्या कार्यालयात नोकरीला असेल त्याच्या प्रमुखाकडे पाठवील, आणि असा प्रमुख तदनंतर कलम ६२ द्वारे उपबंधित केलेल्या रीतीने समन्स बजावण्याची तजवीज करील, आणि त्या कलमाद्वारे आवश्यक असलेल्या पृष्ठांकनासह ते आपल्या स्वाक्षरीनिशी न्यायालयाकडे परत पाठवील.

(२) अशी स्वाक्षरी हा रीतसर बजावणीचा पुरावा असेल.

स्थानिक मर्यादांच्या बाहेर समन्सची बजावणी.

६७. जेव्हा आपण काढलेले समन्स आपल्या स्थानिक अधिकारितेच्या बाहेर कोणत्याही स्थळी बजावण्यात यावे अशी न्यायालयाची इच्छा असेल तेव्हा, तेथे ते बजावले जाण्यासाठी सर्वसामान्यपणे न्यायालय, समन्स पाठवण्यात आलेली व्यक्ती ज्याच्या स्थानिक अधिकारितेत असेल किंवा राहत असेल त्या दंडाधिकाऱ्याकडे ते समन्स प्रतीसहित पाठवील.

अशा प्रकरणांमध्ये व बजावणी करणारा अधिकारी उपस्थित नसेल त्या-बाबतीत बजावणीचा पुरावा.

६८. (१) जेव्हा न्यायालयाने काढलेले समन्स त्याच्या स्थानिक मर्यादांच्या बाहेर बजावण्यात आले असेल, आणि ज्याने समन्स बजावले असेल तो अधिकारी खटल्याच्या सुनावणीच्या वेळी उपस्थित नसेल अशा कोणत्याही बाबतीत, असे समन्स बजावण्यात आले आहे अशा आशयाचा व जो प्रतिज्ञालेख दंडाधिकाऱ्यापुढे केला असल्याचे दिसते तो प्रतिज्ञालेख आणि समन्सची प्रत जिला सुपूर्द केली होती किंवा जिला देऊ केली होती किंवा जिच्याकडे ठेवली होती त्या व्यक्तीने (कलम ६२ किंवा कलम ६४ मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने) पृष्ठांकित केल्याचे दिसून येणारी ती प्रत पुराव्यात ग्राह्य असेल, आणि विरुद्ध काही शाबीत झाले नाही तर व तोपर्यंत तीत केलेली निवेदने बरोबर असल्याचे मानले जाईल.

(२) या कलमात उल्लेखिलेला प्रतिज्ञालेख समन्सच्या प्रतीला जोडून न्यायालयाकडे परत पाठवता येईल.

साक्षीदारावर डाकेने समन्सची बजावणी.

६९. (१) या प्रकरणाच्या पूर्वगामी कलमांत काहीही अंतर्भूत असले तरी, साक्षीदाराला समन्स काढणारे न्यायालय असे समन्स काढून त्याबरोबर त्याच वेळी समन्सची एक प्रत साक्षीदाराला उद्देशून, तो जेथे सर्वसामान्यपणे राहत असेल किंवा धंदा चालवत असेल किंवा कमाईसाठी जातीने काम करत असेल त्या स्थळी नोंदणीकृत डाकेने बजावण्याचा निदेश देऊ शकेल.

(२) जेव्हा साक्षीदाराने स्वाक्षरित केल्याचे दिसणारी पोच किंवा साक्षीदाराने समन्सची सुपूर्दगी घेण्याचे नाकारले अशा आशयाचे डाक कर्मचाऱ्याने स्वाक्षरित केल्याचे दिसणारे पृष्ठांकन मिळेल तेव्हा, समन्स काढणाऱ्या न्यायालयाला समन्स रीतसर बजावण्यात आले आहे असे घोषित करता येईल.

## ख-अटकेचे वॉरंट

अटकेच्या वॉरंटांचे प्रारुप व त्याची मुदत.

७०. (१) या संहितेखाली न्यायालयाने काढलेले अटकेचे प्रत्येक वॉरंट लेखी व अशा न्यायालयाच्या पीठासीन अधिकाऱ्याने स्वाक्षरित केलेले असेल व त्यावर न्यायालयाची मोहोर लावलेली असेल.

(२) असे प्रत्येक वॉरंट, ज्याने काढले ते न्यायालय ते रद्द करीपर्यंत किंवा त्याची अंमलबजावणी होईपर्यंत, अंमलात राहील.

**जामीन घ्यावयाचा निदेश देण्याची शक्ती.**

७१. (१) कोणत्याही व्यक्तीच्या अटकेचे वॉरंट काढणारे कोणतेही न्यायालय स्वविवेकानुसार त्या वॉरंटावर पृष्ठांकन करून असा निदेश देऊ शकेल की, जर विनिर्दिष्ट वेळी व त्यानंतर न्यायालय निदेश देईपर्यंत अन्यथा निदेश देईपर्यंत न्यायालयापुढे उपस्थित होण्याबाबत पुरेशा जामीनदारांसह अशा व्यक्तीने बंधपत्र निष्पादित केले तर वॉरंट ज्याला निदेशून लिहिलेले असेल त्या अधिकाऱ्याने असा जामीन घ्यावा व अशा व्यक्तीची हवालातीतून सुटका करावी.

(२) पृष्ठांकनात—

(क) जामीनदारांची संख्या;

(ख) जितक्या रकमेकरता ते जामीनदार व जिच्या अटकेचे वॉरंट काढलेले असेल ती व्यक्ती यांच्यापैकी प्रत्येकजण बांधलेला असेल ती रक्कम;

(ग) ज्यावेळी त्या व्यक्तीने न्यायालयापुढे उपस्थित व्हावयाचे असेल ती वेळ,

हे नमूद केले जाईल.

(३) जेव्हा केव्हा या कलमाखाली जामीन घेतला जाईल तेव्हा, वॉरंट ज्याला निर्देशून लिहिलेले असेल तो अधिकारी ते बंधपत्र न्यायालयाकडे पाठवील.

**वॉरंटे कोणाला निदेशून लिहिता येतील.**

७२. (१) अटकेचे वॉरंट सर्वसामान्यपणे एका किंवा अधिक पोलीस अधिकाऱ्यांना निदेशून लिहिले जाईल; पण अशा वॉरंटाची तात्काळ अंमलबजावणी होणे जरुरीचे असेल व कोणताही पोलीस अधिकारी तात्काळ उपलब्ध नसेल तर, ते अन्य कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना निदेशून लिहिता येईल, आणि अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्ती त्याची अंमलबजावणी करतील.

(२) जेव्हा वॉरंट एकाहून अधिक अधिकाऱ्यांना किंवा व्यक्तींना निदेशून लिहिलेले असेल तेव्हा, ते सर्व किंवा त्यांच्यापैकी कोणीही एक किंवा अधिक जण त्याची अंमलबजावणी करू शकतील.

**वॉरंट कोणत्याही व्यक्तीला निदेशून लिहिता येणे.**

७३. (१) मुख्य न्याय दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी कोणत्याही पळून गेलेल्या सिद्ध-दोषीच्या, उद्घोषित अपराध्याच्या किंवा बिनजामिनी अपराधाचा आरोप असून जी व्यक्ती अटक चुकवीत असेल त्या व्यक्तीच्या अटकेसाठी स्थानिक अधिकारितेतील कोणत्याही व्यक्तीला उद्देशून वॉरंट लिहू शकेल.

(२) अशा व्यक्तीला वॉरंटाची लेखी पोच द्यावी लागेल व जिच्या अटकेसाठी ते वॉरंट काढलेले होते ती व्यक्ती आपल्या अखत्याराखालील कोणत्याही जमिनीत किंवा अन्य संपत्तीच्या ठिकाणी असेल किंवा तेथे तिने प्रवेश केला असेल तर, वॉरंटाची तिला अंमलबजावणी करावी लागेल.

(३) जिच्याविरुद्ध वॉरंट काढले असेल त्या व्यक्तीला अटक केली जाईल तेव्हा, ती वॉरंटासह निकटतम पोलीस अधिकाऱ्याच्या स्वाधीन केली जाईल व कलम ७१ खाली जामीन घेण्यात आला नाही तर तो अधिकारी त्या प्रकरणात अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्यापुढे तिला नेण्याची व्यवस्था करील.

**पोलीस अधिकाऱ्याला निदेशून लिहिलेले वॉरंट.**

७४. कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला निदेशून लिहिलेले वॉरंट ज्याला निदेशून लिहिलेले किंवा ज्याला पृष्ठांकित केलेले आहे तो अधिकारी वॉरंटावर ज्याचे नांव पृष्ठांकित करील अशा अन्य पोलीस अधिकाऱ्यालाही त्याची अंमलबजावणी करता येईल.

**वॉरंटाचा आशय अधिसूचित करणे.**

७५. अटकेच्या वॉरंटाची अंमलबजावणी करणारा पोलीस अधिकारी किंवा अन्य व्यक्ती अटक करावयाच्या व्यक्तीला त्याचा आशय अधिसूचित करील व तशी मागणी झाल्यास तिला ते वॉरंट दाखवील.

**अटक केलेल्या व्यक्तीला विनाविलंब न्यायालयापुढे आणणे.**

७६. अटकेच्या वॉरंटाची अंमलबजावणी करणारा पोलीस अधिकारी किंवा अन्य व्यक्ती (जामिनाबाबत कलम ७१ मध्ये असलेल्या उपबंधाच्या अधीनतेने) अटक केलेल्या व्यक्तीला ज्या न्यायालयापुढे त्याने हजर करणे कायद्यानुसार आवश्यक असेल त्याच्यापुढे अशा व्यक्तीला अनावश्यक विलंब न लावता आणील :

परंतु, कोणत्याही परिस्थितीत असा विलंब, अटकेच्या स्थळापासून दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापर्यंतच्या प्रवासासाठी जरुर असलेला अवधी वगळता, चोवीस तासांपेक्षा अधिक असणार नाही.

**वॉरंटाची अंमलबजावणी कोठे करता येईल.**

७७. अटकेच्या वॉरंटाची अंमलबजावणी भारतातील कोणत्याही स्थळी करता येईल.

**अधिकारिताक्षेत्राबाहेर अंमलबजावणी करण्यासाठी पाठवलेले वॉरंट.**

७८. (१) जेव्हा एखाद्या वॉरंटाची अंमलबजावणी, ते काढणाऱ्या न्यायालयाच्या अधिकारताक्षेत्राबाहेर करावयाचे असेल तेव्हा, असे न्यायालय ते वॉरंट आपल्या अधिकारितेतील पोलीस अधिकाऱ्याला निदेशून लिहिण्याऐवजी ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांच्या आत त्याची अंमलबजावणी करावयाची असेल अशा कोणत्याही कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडे किंवा जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे किंवा पोलीस आयुक्ताकडे डाकेने किंवा अन्य प्रकारे ते पाठवील; व तो कार्यकारी दंडाधिकारी किंवा जिल्हा अधीक्षक किंवा आयुक्त त्यावर आपले नांव पृष्ठांकित करील व व्यवहार्य असल्यास, यात यापूर्वी उपबंधित केलेल्या रीतीने त्याची अंमलबजावणी करवील.

(२) पोटकलम (१) खाली वॉरंट काढणारे न्यायालय अटक करावयाच्या व्यक्तीला जामीन मंजूर करावा की करू नये याचा निर्णय करणे कलम ८१ खाली कार्य करणाऱ्या न्यायालयाला शक्य होण्यासाठी पुरेसा होईल इतका त्या व्यक्तीच्या विरुद्ध असलेल्या माहितीचा सारांश व त्यासोबत त्यासाठी पुरेसे होतील असे कोणतेही दस्तऐवज असल्यास ते वॉरंटाबरोबर पाठवील.

अधिकारिताक्षेत्राबाहेर अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस अधिकाऱ्याला निदेशून लिहिलेले वॉरंट.

७९. (१) जेव्हा पोलीस अधिकाऱ्याला निदेशून लिहिलेल्या वॉरंटाची अंमलबजावणी, ते काढणाऱ्या न्यायालयाच्या स्थानिक अधिकारितेबाहेर करावयाची असेल तेव्हा, सर्वसामान्यपणे तो पोलीस अधिकारी ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांच्या आत वॉरंटाची अंमलबजावणी करावयाची असेल त्या कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडे किंवा त्या हद्दीमधील पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याहून खालचा दर्जा नसलेल्या पोलीस अधिकाऱ्याकडे ते वॉरंट पृष्ठांकनासाठी नेईल.

(२) असा दंडाधिकारी किंवा पोलीस अधिकारी त्यावर आपले नांव पृष्ठांकित करील व असे पृष्ठांकन म्हणजे वॉरंटाची अंमलबजावणी करण्यासाठी ते ज्याला निदेशून लिहिलेले आहे त्या पोलीस अधिकाऱ्याला मिळालेला पुरेसा प्राधिकार असेल व स्थानिक पोलीस अशा वॉरंटाची अंमलबजावणी करण्याच्या कामी तशी मागणी करण्यात आल्यास अशा अधिकाऱ्याला सहाय्य करतील.

(३) ज्याच्या स्थानिक अधिकारितेत वॉरंटाची अंमलबजावणी करावयाची असेल त्या दंडाधिकाऱ्याचे किंवा पोलीस अधिकाऱ्याचे पृष्ठांकन मिळवत बसल्यास होणाऱ्या विलंबामुळे अशा अंमलबजावणीस आडकाठी होईल असे समजण्यास कारण असेल तेव्हा, ते ज्याला निदेशून लिहिलेले असेल तो पोलीस अधिकारी ज्याने ते वॉरंट काढले त्या न्यायालयाच्या स्थानिक अधिकारितेपलिकडील कोणत्याही स्थळी अशा पृष्ठांकनाशिवाय त्याची अंमलबजावणी करू शकेल.

ज्या व्यक्तीविरुद्ध वॉरंट काढलेले असेल तिला अटक केल्यानंतरची कार्यपद्धती.

८०. अटकेचे वॉरंट ज्या जिल्ह्यात काढलेले असेल त्याच्याबाहेर त्याची अंमलबजावणी केली जाईल तेव्हा, ज्याने ते वॉरंट काढले ते न्यायालय अटकेच्या स्थळापासून तीस किलोमीटरच्या आत नसेल अथवा ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांच्या आत अटक करण्यात आली होती त्या कार्यकारी दंडाधिकाऱ्याहून किंवा त्या जिल्हा पोलीस अधिक्षकाहून किंवा त्या पोलीस आयुक्ताहून अधिक जवळ नसेल अथवा कलम ७१ खाली जामीन घेतलेला नसेल तर, अटक झालेल्या व्यक्तीला अशा दंडाधिकाऱ्यासमोर किंवा जिल्हा अधीक्षकांसमोर किंवा आयुक्तासमोर नेले जाईल.

अटक केलेल्या व्यक्तीला ज्या दंडाधिकाऱ्यासमोर आणले असेल त्याने अनुसरावयाची कार्यपद्धती.

८१. (१) जर अटक केलेली व्यक्ती ही ज्या न्यायालयाने वॉरंट काढले त्याला अभिप्रेत असलेली व्यक्ती असल्याचे दिसून आले तर, कार्यकारी दंडाधिकारी किंवा जिल्हा पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्त त्या व्यक्तीला बंदोबस्तात अशा न्यायालयाकडे न्यावे असा निदेश देईल :

परंतु, जर अपराध जामीनपात्र असेल व अशी व्यक्ती अशा दंडाधिकाऱ्याच्या, जिल्हा अधीक्षकाच्या, किंवा आयुक्ताच्या समाधानासाठी पुरेसा जामीन देण्यास तयार व राजी असेल तर, अथवा कलम ७१ खाली वॉरंटावर एखादा निदेश पृष्ठांकित करण्यात आला असेल व अशा निदेशाद्वारे आवश्यक केलेले जामीनपत्र देण्यास अशी व्यक्ती तयार व राजी असेल तर, दंडाधिकारी, जिल्हा अधीक्षक किंवा आयुक्त, असा जामीन किंवा, प्रकरणपरत्वे, जामीनपत्र घेईल व ज्या न्यायालयाने ते वॉरंट काढले त्याच्याकडे ते बंधपत्र पाठवील :

परंतु, आणखी असे की, जर अपराध बिनजामिनी असेल तर, अटक जेथे करण्यात आली असेल त्या जिल्ह्याच्या मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याने (कलम ४३७ च्या उपबंधाच्या अधीनतेने) किंवा सत्र न्यायाधीशाने कलम ७८ च्या पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेली माहिती व दस्तऐवज विचारात घेतल्यावर अशा व्यक्तीला जामिनावर बंधमुक्त करणे हे कायदेशीर असेल.

(२) या कलमातील कोणतीही गोष्ट कलम ७१ खाली जामीनपत्र घेण्यास पोलीस अधिकाऱ्याला प्रतिबंध करीत असल्याचे मानले जाणार नाही.

### ग-उद्घोषणा व जप्ती

फरारी व्यक्तीबद्दल उद्घोषणा.

*८२. (१) जर कोणत्याही न्यायालयाने ज्या व्यक्तीविरुद्ध वॉरंट काढलेले असेल ती व्यक्ती अशा वॉरंटाची अमलबजावणी करणे शक्य होऊ नये म्हणून फरारी झालेली आहे किंवा गुप्त राहिली आहे असे त्या न्यायालयाला सकारण वाटत असेल (मग ते पुरावा घेतल्यानंतर असो वा नसो) तर, असे न्यायालय एक लेखी उद्घोषणा प्रकाशित करून, विनिर्दिष्ट स्थळी व अशी उद्घोषणा प्रकाशित केल्याच्या दिनांकापासून कमीत कमी तीस दिवसांच्या मुदतीनंतरच्या विनिर्दिष्ट वेळी त्या व्यक्तीला उपस्थित राहण्यास फर्मावू शकेल.

(२) उद्घोषणा पुढीलप्रमाणे प्रकाशित केली जाईल :—

(एक) (क) अशी व्यक्ती सर्वसामान्यपणे जेथे राहत असेल त्या नगरातील किंवा गावातील एखाद्या ठळक जागी ती जाहीरपणे वाचून दाखवली जाईल ;

(ख) अशी व्यक्ती सर्वसामान्यपणे जेथे राहत असेल त्या घराच्या किंवा घरवाडीच्या अथवा अशा नगरातील किंवा गावातील एखाद्या ठळक जागी ती लावली जाईल;

*१९८१ चा महाराष्ट्र अधिनियम ७, कलम ७ पहा.

(ग) तिची एक प्रत न्यायगृहाच्या एखाद्या ठळक भागी लावली जाईल ;

(दोन) अशी व्यक्ती सर्वसामान्यपणे जेथे राहत असेल त्या स्थळी प्रसृत होणाऱ्या एखाद्या दैनिक वृत्तपत्रात उद्घोषणेची एक प्रत प्रकाशित करणे न्यायालयाला योग्य वाटले तर ते तसाही निदेश देऊ शकेल.

(३) पोटकलम (२) च्या खंड (एक) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने विनिर्दिष्ट दिवशी उद्घोषणा रीतसर प्रकाशित केली होती अशा आशयाचे, उद्घोषणा काढणाऱ्या न्यायालयाने केलेले लेखी निवेदन म्हणज या कलमाद्वारे आवश्यक केलेल्या गोष्टींचे अनुपालन झालेले आहे व अशा दिवशी उद्घोषणा प्रकाशित केली होती याचा निर्णायक पुरावा असेल.

८३. (१) कलम ८२ खाली उद्घोषणा काढणारे न्यायालय, उद्घोषणा काढल्यानंतर कोणत्याही वेळी कारणे लेखी नमूद करून, उद्घोषित व्यक्तींच्या जंगम किंवा स्थावर किंवा दोन्ही प्रकारच्या संपत्तीवर जप्ती आणण्याचा आदेश देऊ शकेल : फरारी व्यक्तीच्या संपत्तीवर जप्ती आणणे.

परंतु, ज्या व्यक्तीच्या संबंधात उद्घोषणा काढावयाची असेल ती व्यक्ती,—

(क) आपली संपूर्ण संपत्ती किंवा तिचा कोणताही भाग यांची वासलात लावण्याच्या बेतात आहे, किंवा

(ख) न्यायालयाच्या स्थानिक अधिकारितेतून आपली संपूर्ण संपत्ती किंवा तिचा कोणताही भाग हलवण्याच्या बेतात आहे,

अशी प्रतिज्ञालेखावरून किंवा अन्य प्रकारे न्यायालयाची उद्घोषणा काढण्याचे वेळी खात्री झाली तर, ते उद्घोषणा काढतानाच जप्तीचा आदेश देऊ शकेल.

(२) असा आदेश ज्या जिल्हृयात दिला असेल तेथे अशा व्यक्तीची जी कोणतीही संपत्ती असेल तिच्यावर जप्ती आणणे त्या आदेशाद्वारे प्राधिकृत होईल; व अशा व्यक्तीची अशा जिल्हृयाबाहेर जी कोणतीही संपत्ती असेल तिच्यावर, ज्याच्या जिल्हृयात अशी संपत्ती असेल त्या जिल्हा दंडाधिकाऱ्याने त्या आदेशावर पृष्ठांकन केल्यानंतर जप्ती आणणे प्राधिकृत होईल.

(३) जी संपत्ती जप्त करण्याचा आदेश देण्यात आला ती म्हणजे एखादे ऋण किंवा अन्य जंगम संपत्ती असेल तर, या कलमाखालील जप्ती,—

(क) अभिग्रहणाद्वारे; किंवा

(ख) प्रापकाच्या नियुक्तीद्वारे; किंवा

(ग). उद्घोषित व्यक्तीकडे किंवा तिच्या वतीने कोणाकडेही अशी संपत्ती सुपूर्द करण्यास मनाई करणाऱ्या लेखी आदेशाद्वारे; किंवा

(घ) न्यायालयास योग्य वाटेल त्याप्रमाणे अशा सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही दोन पद्धतींनी, केली जाईल.

(४) ज्या संपत्तीवर जप्ती आणण्याचा आदेश देण्यात आला ती स्थावर असेल तर, राज्य शासनाला महसूल देणाऱ्या जमिनीच्या बाबतीत, या कलमाखालील जप्ती ज्या जिल्ह्यात ती जमीन असेल त्या जिल्हाधिकाऱ्यामार्फत व अन्य सर्व बाबतींत,—

(क) कब्जा घेऊन; किंवा

(ख) प्रापकाच्या नियुक्तीद्वारे; किंवा

(ग) उदघोषित व्यक्तीकडे किंवा तिच्या वतीने कोणाकडेही भाडे भरण्यास किंवा संपत्ती सुपूर्द करण्यास मनाई करणाऱ्या लेखी आदेशाद्वारे; किंवा

(घ) न्यायालयाला योग्य वाटेल त्याप्रमाणे अशा सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही दोन पद्धतींनी केली जाईल.

(५) जी संपत्ती जप्त करण्याचा आदेश देण्यात आला ती जर पशुधनाच्या रूपातील किंवा जलद नाश पावणारी असेल तर न्यायालय, त्याला तसे करणे समयोचित वाटले तर तिची तात्काळ विक्री करण्याचा आदेश देऊ शकेल व अशा बाबतीत, विक्रीचे उत्पन्न न्यायालयाच्या आदेशावर अवलंबून राहील.

(६) या कलमाखाली नियुक्त केलेल्या प्रापकांच्या शक्ती, कामे व दायित्वे 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याखाली नियुक्त झालेल्या प्रापकाच्याप्रमाणेच असतील.

८४. (१) जर कलम ८३ खाली जप्त केलेल्या कोणत्याही संपत्तीबाबत उद्घोषित व्यक्तीहून अन्य कोणत्याही व्यक्तीने अशा जप्तीपासून सहा महिन्यांच्या आत अशा कारणावरून हक्कमागणी मांडली किंवा तिच्या जप्तीला हरकत घेतली की, मागणीदाराचा किंवा हरकतदाराचा अशा संपत्तीत हितसंबंध आहे व असा हितसंबंध कलम ८३ खाली जप्तीस पात्र नाही, तर हक्कमागणीबाबत किंवा हरकतीबाबत चौकशी केली जाईल व ती संपूर्णत: किंवा अंशत: मान्य किंवा अमान्य केली जाईल : हक्कमागण्या व जप्तीला हरकती.

परंतु, या पोटकलमाने दिलेल्या कालावधीत मांडलेली कोणतीही हक्कमागणी किंवा घेतलेली हरकत मागणीदाराचा किंवा हरकतदाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या वध प्रतिनिधीस चालू ठेवता येईल.

(२) ज्याने जप्तीचा आदेश काढला त्या न्यायालयात अथवा हक्कमागणी किंवा हरकत कलम ८३ च्या पोटकलम (२) खाली पृष्ठांकित केलेल्या आदेशाखाली जप्त केलेल्या संपत्तीबाबत असेल तर, ज्या जिल्ह्यात जप्ती केली असेल त्याच्या मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयात पोटकलम (१) खालील हक्कमागण्या मांडता येतील किंवा हरकती घेता येतील.

(३) अशा प्रत्येक हक्कमागणीबाबत किंवा हरकतीबाबत, ज्या न्यायालयात ती हक्कमागणी मांडली असेल किंवा हरकत घेतली असेल ते न्यायालय चौकशी करील :

परंतु, जर ती हक्कमागणी किंवा हरकत मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयात मांडलेली किंवा घेतलेली असेल तर, त्याला ती त्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही दंडाधिकाऱ्याकडे तिचा निकाल करण्यासाठी सोपवता येईल.

(४) ज्या व्यक्तीची हक्कमागणी किंवा हरकत पोटकलम (१) खालील आदेशाद्वारे संपूर्णत: किंवा अंशत: अमान्य करण्यात आली असेल अशा कोणत्याही व्यक्तीला अशा आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत विवादग्रस्त संपत्तीबाबत तो जो हक्क सांगत असेल तो प्रस्थापित करण्यासाठी दावा लावता येईल, पण असा कोणताही दावा लावला गेल्यास त्याचा जो काही निकाल होईल त्याच्या अधीनतेने, तो आदेश निर्णायक असेल.

**जप्त केलेली संपत्ती मुक्त करणे, विकणे व परत करणे.**

८५. (१) जर उद्घोषित व्यक्ती उद्घोषणेत विनिर्दिष्ट केलेल्या अवधीच्या आत उपस्थित झाली तर, न्यायालय संपत्तीची जप्तीतून मुक्तता करणारा आदेश काढील.

(२) जर उद्घोषित व्यक्ती उद्घोषणेत विनिर्दिष्ट केलेल्या अवधीच्या आत उपस्थित झाली नाही तर, जप्तीतील संपत्ती राज्य शासनाच्या ताब्यात राहील; पण जप्तीच्या दिनांकापासून सहा महिने संपून जाईपर्यंत आणि कलम ८४ खाली मांडलेल्या कोणत्याही हक्कमागणीचा किंवा घेतलेल्या हरकतीचा त्या कलमाखाली निकाल केला जाईपर्यंत ती विकली जाणार नाही—मात्र ती संपत्ती जलद व स्वभावत: नाश पावणारी असेल तर किंवा तिची विक्री मालकाला लाभदायक ठरेल असे न्यायालयाला वाटले तर, त्या दोन्ही बाबतीत न्यायालयाला जेव्हा केव्हा योग्य वाटेल तेव्हा ते तिची विक्री करु शकेल.

(३) ज्या व्यक्तीची संपत्ती पोटकलम (२) खाली राज्य शासनाच्या ताब्यात आहे किंवा होती अशी कोणतीही व्यक्ती जप्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत स्वेच्छेने उपस्थित झाली किंवा ती पकडली जाऊन ज्या न्यायालयाच्या आदेशाने त्या संपत्तीवर जप्ती आणली होती त्याच्या किंवा असे न्यायालय ज्या न्यायालयाला दुय्यम असेल त्याच्यापुढे आणली गेली आणि न्यायालयाचे समाधान होईल अशाप्रकारे तिने, वॉरंटाची अंमलबजावणी चुकवण्याच्या हेतूने आपण फरारी झालो नव्हतो किंवा गुप्त झालो नव्हतो व जेणेकरुन उद्घोषणेत विनिर्दिष्ट केलेल्या अवधीच्या आत उपस्थित होणे आपणास शक्य झाले असते अशी उद्घोषणेची सूचना आपणास मिळाली नव्हती असे शाबीत केले तर, अशी संपत्ती किंवा ती विकलेली असेल तर, विक्रीचे निव्वळ उत्पन्न किंवा, तिचा एखादाच भाग विकलेला असेल तर विक्रीचे निव्वळ उत्पन्न व उर्वरित संपत्ती हे, जप्तीनिमित्त आलेला सर्व खर्च त्यातून भागवल्यानंतर तिच्याकडे सुपूर्द केले जाईल.

**जप्त केलेली संपत्ती परत करण्याविषयीचा अर्ज फेटाळणाऱ्या आदेशावर अपील.**

८६. कलम ८५ च्या पोटकलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेली जी व्यक्ती संपत्ती किंवा विक्रीचे उत्पन्न सुपूर्द केले जाण्यास नकार मिळाल्यामुळे नाराज झाली असेल अशा कोणत्याही व्यक्तीला प्रथम उल्लेखिलेल्या न्यायालयाच्या शिक्षादेशांवर सर्वसामान्यपणे ज्या न्यायालयाकडे अपिले होऊ शकतात त्याच्याकडे अपील करता येईल.

### घ-आदेशिकांविषयी अन्य नियम

**समन्स एवजी किंवा त्याच्या-बरोबरच वॉरंट काढणे.**

८७. कोणत्याही व्यक्तीच्या उपस्थितीसाठी समन्स काढण्याकरिता या संहितेद्वारे न्यायालयाला शक्ती प्रदान केली असेल अशा कोणत्याही प्रकरणी,—

(क) जर एकतर असे समन्स काढण्यापूर्वी, किंवा ते काढल्यानंतर पण त्या व्यक्तीच्या उपस्थितीसाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी, ती व्यक्ती फरारी झाली आहे किंवा ती समन्सचे पालन करणार नाही असे न्यायालयाला सकारण वाटले तर; किंवा

(ख) जर अशा वेळी ती उपस्थित राहण्यास चुकली व समन्सानुसार उपस्थित होणे तिला शक्य होईल अशाप्रकारे समन्स वेळेवर रीतसर बजावले होते असे शाबीत झाले व अशा चुकण्याबद्दल कोणतीही वाजवी सबब पुढे केलेली नसेल तर;

त्या व्यक्तीच्या अटकेसाठी न्यायालय आपली कारणे लेखी नमूद करुन, वॉरंट काढू शकेल.

**उपस्थितीसाठी बंधपत्र घेण्याची शक्ती.**

८८. जिच्या उपस्थितीसाठी किंवा अटकेसाठी समन्स किंवा वॉरंट काढण्याची कोणत्याही न्यायालयाच्या पीठासीन अधिकाऱ्याला शक्ती प्रदान झाली असेल अशी कोणतीही व्यक्ती अशा न्यायालयात उपस्थित असेल तर, असा अधिकारी अशा व्यक्तीला अशा न्यायालयात किंवा ज्याच्याकडे ते प्रकरण संपरीक्षेसाठी वर्ग करता येईल अशा अन्य कोणत्याही न्यायालयात तिने उपस्थित राहण्यासाठी जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना बंधपत्र निष्पादित करण्यास फर्मावू शकेल.

**उपस्थिति-बंधपत्राचा भंग केल्यास अटक.**

८९. न्यायालयापुढे उपस्थित राहण्यासाठी, या संहितेखाली लिहून घेतलेल्या कोणत्याही बंधपत्राने जी बांधलेली असेल अशी कोणतीही व्यक्ती उपस्थित राहिली नाही तर, न्यायालयातील पीठासीन अधिकारी, अशा व्यक्तीला अटक करण्यात यावी व तिला आपल्यापुढे हजर केले जावे असे निदेशित करणारे वॉरंट काढू शकेल.

**या प्रकरणाचे उपबंध सर्वसाधारणपणे समन्सांना व अटकेच्या वॉरंटांना लागू असणे.**

९०. समन्स व वॉरंट आणि ते काढणे, बजावणे व त्याची अंमलबजावणी करणे या संबंधीचे या प्रकरणात अंतर्भूत असलेले उपबंध या संहितेखाली काढलेल्या प्रत्येक समन्सला व अटकेच्या वॉरंटाला शक्य होईल तेथवर लागू असतील.

## प्रकरण सात

## वस्तू हजर करण्याची सक्ती करण्याची आदेशिका

### क-हजर करण्यासाठी समन्स

**दस्तऐवज किंवा अन्य वस्तू हजर करण्यासाठी समन्स.**

९१. (१) जेव्हाकेव्हा कोणत्याही न्यायालयाला किंवा पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला, या संहितेखाली अशा न्यायालयाने किंवा अधिकाऱ्याने किंवा त्या न्यायालयाच्या अगर अधिकाऱ्याच्या समोर करावयाचे कोणतेही अन्वेषण, चौकशी, संपरीक्षा किंवा अन्य कार्यवाही यांच्या प्रयोजनार्थ कोणताही दस्तऐवज किंवा अन्य वस्तू हजर केली जाणे जरूरीचे किंवा इष्ट वाटेल तेव्हा, ज्या व्यक्तीच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असा दस्तऐवज किंवा वस्तू आहे असा तिचा समज असेल तिला असे न्यायालय समन्स काढून किंवा असा अधिकारी आदेश काढून तिला समन्समध्ये किंवा आदेशात नमूद केलेल्या वेळी व स्थळी ते हजर करण्यास किंवा उपस्थित राहून ते हजर करण्यास फर्मावू शकेल.

(२) या कलमाखाली ज्या व्यक्तीला दस्तऐवज किंवा अन्य वस्तू केवळ हजर करण्यास फर्मावण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीने ते हजर करण्यासाठी जातीने उपस्थित राहण्याऐवजी असा दस्तऐवज किंवा वस्तू हजर करण्याची व्यवस्था केली तर, तिने या फर्मानाचे अनुपालन केले असल्याचे मानले जाईल.

(३) या कलमातील कोणतीही गोष्ट—

(क) 'भारतीय पुरावा अधिनियम, १८७२' (१८७२ चा १) याची कलमे १२३ व १२४ किंवा 'बँकव्यवसायाची पुस्तके पुरावा अधिनियम, १८९१' (१८९१ चा १३) यांवर परिणाम करते; किंवा

(ख) डाक किंवा तार प्राधिकरणाच्या ताब्यातील पत्र, पोस्ट-कार्ड, तार किंवा अन्य दस्तऐवज किंवा कोणतेही पार्सल किंवा वस्तू यांना लागू आहे;

असे मानले जाणार नाही.

**पत्रे व तारा यांबाबतची कार्यपद्धती.**

९२. (१) जर डाक किंवा तार प्राधिकरणाच्या ताब्यातील कोणताही दस्तऐवज, पार्सल किंवा वस्तू जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या, मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याच्या, सत्र न्यायालयाच्या किंवा उच्च न्यायालयाच्या मते या संहितेखालील कोणतेही अन्वेषण, चौकशी, संपरीक्षा किंवा अन्य कार्यवाही यांच्या प्रयोजनासाठी आवश्यक असेल तर, असा दंडाधिकारी किंवा न्यायालय, हे डाक किंवा, प्रकरणपरत्वे, तार प्राधिकरणाला दंडाधिकारी किंवा न्यायालय निदेशित करील अशा व्यक्तीकडे दस्तऐवज, पार्सल किंवा वस्तू सुपूर्द करण्यास फर्मावू शकेल.

(२) जर असा कोणताही दस्तऐवज, पार्सल किंवा वस्तू अन्य कोणत्याही दंडाधिकाऱ्याच्या मते—मग तो कार्यकारी असो वा न्यायिक असो—किंवा कोणत्याही पोलीस आयुक्ताच्या किंवा जिल्हा पोलीस अधीक्षकाच्या मते अशा कोणत्याही प्रयोजनासाठी आवश्यक असेल तर, तो अशा दस्तऐवजाचा, पार्सलाचा किंवा वस्तूचा शोध करण्यास किंवा पोटकलम (१) खाली जिल्हा दंडाधिकाऱ्याचा, मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याचा किंवा न्यायालयाचा आदेश होईल तोवर तपास करवून ती अडकवून ठेवण्यास डाक किंवा प्रकरणपरत्वे, तार प्राधिकरणाला फर्मावू शकेल.

### ख—झडती-वॉरंटे

**झडती-वॉरंट केव्हा काढता येईल.**

९३. (१) (क) ज्या व्यक्तीला उद्देशून कलम ९१ खाली समन्स किंवा आदेश अथवा कलम ९२ च्या पोटकलम (१) खाली फर्मान काढलेले असेल किंवा काढले असते तरी ती व्यक्ती समन्सद्वारे किंवा फर्मानाद्वारे आवश्यक केल्याप्रमाणे तो दस्तऐवज किंवा वस्तू हजर करणार नाही किंवा तिने ते हजर केले नसते असे कोणत्याही न्यायालयाला सकारण वाटत असेल तेव्हा, किंवा

(ख) असा दस्तऐवज किंवा वस्तू अमुक एखाद्या व्यक्तीच्या कब्जात असल्याचे न्यायालयाला ज्ञात नसेल तेव्हा, किंवा

(ग) या संहितेखालील कोणतीही चौकशी, संपरीक्षा किंवा अन्य कार्यवाही यांची प्रयोजने सर्व-साधारण झडतीने किंवा तपासणीने साध्य होतील असे न्यायालयाला वाटेल तेव्हा,

त्याला झडती-वॉरंट काढता येईल; व असे झडती-वॉरंट जिला निदेशून काढलेले असेल त्या व्यक्तीला त्यानुसार व यात यापुढे अंतर्भूत असलेल्या उपबंधांनुसार झडती घेता येईल किंवा तपासणी करता येईल.

(२) न्यायालयाला योग्य वाटले तर, त्याला झडती किंवा तपासणी ज्याच्यापुरती मर्यादित असावी ते विशिष्ट स्थळ किंवा त्याचा भाग वॉरंटात विनिर्दिष्ट करता येईल; व अशा वॉरंटाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असलेली व्यक्ती नंतर याप्रमाणे विनिर्दिष्ट केलेल्याच स्थळाची किंवा भागाची झडती घेईल किंवा तपासणी करील.

(३) डाक किंवा तार प्राधिकाऱ्याच्या ताब्यातील दस्तऐवज, पार्सल किंवा अन्य वस्तू यांसाठी झडती घेण्याबाबतचे वॉरंट देण्यास जिल्हा दंडाधिकारी किंवा मुख्य न्याय दंडाधिकारी याहून अन्य कोणत्याही दंडाधिकाऱ्याला या कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट प्राधिकृत करणार नाही.

जेथे चोरीची संपत्ती, बनावट दस्त-ऐवज इ. असल्याचा संशय असेल त्या जागेची झडती.

९४. (१) जर खबर मिळाल्यावरून व त्याला आवश्यक वाटेल अशा चौकशीनंतर, जिल्हा दंडाधिकाऱ्याला, उप-विभागीय दंडाधिकाऱ्याला किंवा प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याला एखादी जागा चोरीची संपत्ती ठेवण्यासाठी किंवा ती विकण्यासाठी अथवा हे कलम जिला लागू आहे अशी कोणतीही आक्षेपार्ह वस्तू ठेवण्यासाठी, विकण्यासाठी किंवा तिचे उत्पादन करण्यासाठी वापरली जात आहे किंवा अशी कोणतीही आक्षेपार्ह वस्तू एखाद्या जागी ठेवण्यात आली आहे असे सकारण वाटत असेल तर, तो वॉरंटाद्वारे पोलीस शिपायाहून वरच्या दर्जाच्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला,—

(क) आवश्यक त्या सहाय्यानिशी अशा जागी प्रवेश करण्यास,

(ख) वॉरंटात विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने त्या जागेची झडती घेण्यास,

(ग) त्या ठिकाणी सापडलेली जी कोणतीही संपत्ती किंवा वस्तू ही चोरीची संपत्ती असल्याचा किंवा जिला हे कलम लागू होते अशी आक्षेपार्ह वस्तू असल्याचा त्याला वाजवी संशय येईल ती कब्जात घेण्यास,

(घ) अशी संपत्ती किंवा वस्तू दंडाधिकाऱ्यासमोर नेण्यास किंवा अपराध्याला दंडाधिकाऱ्यासमोर नेले जाईपर्यंत त्याच जागी तिची राखण करण्यास किंवा कोणत्याही सुरक्षित स्थळी तिची अन्यप्रकारे विल्हेवाट करण्यास,

(ङ) अशा जागी सापडलेली जी व्यक्ती अशी कोणतीही संपत्ती किंवा वस्तू ही चोरीची संपत्ती असल्याचे किंवा, प्रकरणपरत्वे, जिला हे कलम लागू आहे अशी आक्षेपार्ह वस्तू असल्याचे माहीत असताना किंवा तसे असल्याचा संशय घेण्यास तिला वाजवी कारण असताना, ती ठेवण्याच्या, विकण्याच्या किंवा तिचे उत्पादन करण्याच्या कामी सामील असल्याचे दिसत असेल अशा प्रत्येक व्यक्तीला ताब्यात घेऊन दंडाधिकाऱ्यापुढे नेण्यास,

प्राधिकृत करू शकेल.

(२) ज्यांना हे कलम लागू होते त्या आक्षेपार्ह वस्तू पुढीलप्रमाणे आहेत :—

(क) नकली नाणी;

(ख) 'धातु चिन्हे अधिनियम, १८८९' (१८८९ चा १) याचे उल्लंघन करून बनवलेले किंवा 'सीमाशुल्क अधिनियम, १९६२' (१९६२ चा ५२) याच्या कलम ११ खालील त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिसूचनांचे उल्लंघन करून भारतात आणलेले धातूचे मग;

(ग) नकली चलनी नोटा; नकली मुद्रांक;

(घ) बनावट दस्तऐवज;

(ङ) खोटया मोहरा;

(च) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यातील कलम २९२ मध्ये निर्दिष्ट केलेल्या अश्लील वस्तू;

(छ) खंड (क) ते (च) मध्ये उल्लेखिलेल्यापैकी कोणत्याही वस्तूचे उत्पादन करण्यासाठी वापरली जाणारी उपकरणे किंवा सामग्री.

९५. (१) ज्या मजकुराचे प्रकाशन करणे हे 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यातील कलम १२४क किंवा कलम १५३क किंवा कलम १५३ख किंवा कलम २९२ किंवा कलम २९३ किंवा कलम २९५क खाली शिक्षापात्र आहे असा कोणता मजकूर,— **विवक्षित प्रकाशने समपहृत करण्यात आल्याचे घोषित करण्याची व त्यासाठी झडती-वॉरंटे काढण्याची शक्ती.**

(क) कोणत्याही वृत्तपत्रात किंवा पुस्तकात, किंवा

(ख) कोणत्याही दस्तऐवजात—मग त्याचे मुद्रण कोठेही झालेले असो,—

अंतर्भूत आहे असे राज्य शासनाला दिसून येईल तेथे, राज्य शासनाला अधिसूचनेद्वारे, आपल्या मतामागील कारणे नमूद करून, अशा मजकूर अंतर्भूत असलेली, वृत्तपत्राच्या अंकाची प्रत्येक प्रत व अशा पुस्तकाची किंवा अन्य दस्तऐवजाची प्रत्येक प्रत समहृपत होऊन सरकारजमा झाली असल्याचे घोषित करता येईल व तद्नंतर कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला भारतात जेथे कोठे ती सापडेल तेथे तेथे तिचे अभिग्रहण करता येईल आणि जेथे अशा अंकाची कोणतीही प्रत किंवा असे कोणतेही पुस्तक किंवा अन्य दस्तऐवज असेल किंवा असल्याचा वाजवी संशय येईल अशा कोणत्याही जागेत प्रवेश करून त्यासाठी झडती घेण्यास कोणताही दंडाधिकारी वॉरंटाद्वारे फौजदाराहून खालचा दर्जा नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला प्राधिकृत करू शकेल.

(२) या कलमात व कलम ९६ मध्ये,—

(क) "वृत्तपत्र" व "पुस्तक" यांना 'मुद्रण व पुस्तक-नोंदणी अधिनियम, १८६७' (१८६७ चा २५) यामध्ये दिल्याप्रमाणे तोच अर्थ आहे;

(ख) "दस्तऐवज" यात कोणतेही रंगचित्र, रेखाचित्र किंवा छायाचित्र किंवा अन्य दृश्य प्रतिरूपण यांचा समावेश आहे.

(३) या कलमाखाली काढलेला कोणताही आदेश किंवा केलेली कोणतीही कारवाई कलम ९६ च्या उपबंधांचे अनुसरण केल्याशिवाय अन्यथा कोणत्याही न्यायालयात प्रश्नास्पद केली जाणार नाही.

९६. (१) कलम ९५ खाली ज्याच्या बाबतीत समपहरणाची घोषणा करण्यात आलेली असेल अशा कोणत्याही वृत्तपत्रात, पुस्तकात किंवा अन्य दस्तऐवजात कोणताही हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, शासकीय राजपत्रात अशी घोषणा प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत उच्च न्यायालयाकडे, ज्याच्याबाबत, घोषणा केली गेली त्या वृत्तपत्राच्या अंकात किंवा पुस्तकात किंवा अन्य दस्तऐवजात कलम ९५ च्या पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला असा कोणताही मजकूर अंतर्भूत नाही या कारणावरून अशी घोषणा रद्द ठरवली जावी यासाठी अर्ज करता येईल. **समपहरणाची घोषणा रद्द ठरवण्यासाठी उच्च न्यायालयाकडे अर्ज.**

(२) उच्च न्यायालय तीन किंवा अधिक न्यायाधीशांचे मिळून बनलेले असेल त्या बाबतीत, अशा प्रत्येक अर्जाची सुनावणी व निर्णय तीन न्यायाधीशांचे मिळून बनलेले उच्च न्यायालयाचे विशेष न्यायपीठ करील आणि उच्च न्यायालय तीनाहून कमी न्यायाधीशांचे मिळून बनलेले असेल त्या बाबतीत असे विशेष न्यायपीठ त्या उच्च न्यायालयाच्या सर्व न्यायाधीशांचे मिळून बनलेले असेल.

(३) कोणत्याही वृत्तपत्राच्या संदर्भात अशा कोणत्याही अर्जाच्या सुनावणीच्या वेळी ज्याच्याबाबत समपहरणाची घोषणा करण्यात आली असेल अशा त्या वृत्तपत्रात अंतर्भूत असलेले शब्द, चिन्हे किंवा दृश्य प्रतिरूपणे यांचे स्वरूप किंवा रोख काय आहे ते शाबीत करण्याच्या कामी मदत म्हणून अशा वृत्तपत्राची कोणतीही प्रत पुराव्यात देता येईल.

(४) ज्याच्याबाबत अर्ज करण्यात आलेला असेल त्या वृत्तपत्राच्या अंकात किंवा पुस्तकात किंवा अन्य दस्तऐवजात कलम ९५ च्या पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला असा कोणताही मजकूर अंतर्भूत होता अशी उच्च न्यायालयाची खात्री झाली नाही तर, ते समपहरणाची घोषणा रद्द ठरवील.

(५) विशेष न्यायपीठ ज्या न्यायाधीशांचे मिळून बनलेले असेल त्यांच्यामध्ये मतभेद असेल तेव्हा, त्या न्यायाधीशांच्या बहुमतानुसार निर्णय दिला जाईल.

९७. ज्या परिस्थितीत परिरोध करणे हे 'अपराध' यासदरात मोडेल अशा परिस्थितीत एखाद्या व्यक्तीला परिरुद्ध करण्यात आले आहे असे कोणत्याही जिल्हा दंडाधिकाऱ्याला, उप-विभागीय दंडाधिकाऱ्याला किंवा प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याला सकारण वाटत असेल तर, तो झडती-वॉरंट काढू शकेल आणि असे वॉरंट ज्या व्यक्तीला निदेशून काढलेले असेल ती व्यक्ती याप्रमाणे परिरुद्ध करण्यात आलेल्या व्यक्तीला शोधून काढण्यासाठी झडती घेऊ शकेल; आणि अशी झडती त्या वॉरंटानुसार घेतली जाईल व जर ती व्यक्ती सापडली तर तिला तात्काळ दंडाधिकाऱ्यासमोर नेले जाईल व तो त्या प्रकरणाच्या परिस्थितीत योग्य दिसेल असा आदेश संमत करील. **गैरपणे परिरुद्ध केलेल्या व्यक्तींना शोधून काढण्यासाठी झडती.**

९८. कोणत्याही बेकायदेशीर प्रयोजनासाठी एखाद्या स्त्रीचे किंवा अठरा वर्षे वयाखालील बालिकेचे अपहरण केल्याबद्दल किंवा तिला अवधपणे अडकवून ठेवल्याबद्दल शपथेवर फिर्याद देण्यात आल्यावरून जिल्हा दंडाधिकारी, उप-विभागीय दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी अशा स्त्रीला तात्काळ पूर्ववत् मोकळे करण्याचा किंवा अशा बालिकेला तिच्या पतीच्या, आई-वा-बापाच्या, पालकाच्या किंवा ज्या व्यक्तीवर अशा बालिकेचा कायदेशीर रक्षणभार असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या स्वाधीन करण्याचा आदेश काढू शकेल व जरूर असेल तेवढ्या बळाचा वापर करून अशा आदेशाचे अनुपालन करवून घेऊ शकेल. **अपहरण केलेल्या स्त्रियांना पूर्ववत् मोकळे करण्यास भाग पाडण्याची शक्ती.**

## घ-झडत्यांसंबंधीचे सर्वसाधारण उपबंध

**झडती-वॉरंटे अंमलबजावणीसाठी निदेशित करणे, इत्यादी.**

९९. कलमे ३८, ७०, ७२, ७४, ७७, ७८ व ७९ यांचे उपबंध हे कलम ९३ कलम ९४ कलम ९५ किंवा कलम ९७ खाली काढलेल्या सर्व झडती-वॉरंटांना, शक्य होईल तेथवर, लागू असतील.

**बंदिस्त जागेचा ताबा ज्यांच्याकडे असेल त्या व्यक्तींनी झडतीस मुभा देणे.**

१००. (१) जेव्हाजेव्हा या प्रकरणाखाली झडतीस किंवा तपासणीस पात्र असलेली कोणतीही जागा बंदिस्त असेल तेव्हा, अशा जागी राहणाऱ्या किंवा त्या जागेचा ताबा जिच्याकडे असेल अशा कोणत्याही व्यक्तीने वॉरंटाची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या मागणीवरून व वॉरंट दाखवण्यात आल्यावर, त्यांना तेथे मुक्त प्रवेश दिला पाहिजे व तेथे झडती घेण्यासाठी सर्व वाजवी सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

(२) जर अशा जागी याप्रमाणे प्रवेश मिळू शकत नसेल तर, वॉरंटाची अंमलबजावणी करणारा अधिकारी किंवा व्यक्ती कलम ४७ च्या पोटकलम (२) द्वारे उपबंधित केलेल्या रीतीने पुढील कार्यवाही करील.

(३) ज्यासाठी झडती घ्यावयाची अशी कोणतीही वस्तू अशा जागी किंवा तिच्या जवळपास असलेल्या कोणत्याही व्यक्तीने आपल्या अंगावर लपवून ठेवली असल्याचा वाजवी संशय असेल तेव्हा, अशा व्यक्तीची झडती घेता येईल व जर अशी व्यक्ती ही स्त्री असेल तर सभ्यता काटकोरपणे सांभाळून अन्य स्त्रीकरवी झडती घतली जाईल.

(४) या प्रकरणाखाली झडती घेण्यापूर्वी, ती झडती घेण्याच्या बेतात असलेला अधिकारी किंवा अन्य व्यक्ती झडती घ्यावयाची जागा ज्या स्थानिक भागात असेल तेथील दोन किंवा अधिक निःपक्ष व प्रतिष्ठित रहिवाशांना अथवा सदर भागातील असा कोणताही रहिवासी उपलब्ध नसेल किंवा झडतीचा साक्षीदार होण्यास राजी नसेल तर, अन्य कोणत्याही भागातील अशा रहिवाशांना उपस्थित राहण्याची व झडतीस साक्षी राहण्याची विनंती करील व त्यांना किंवा त्यांच्यापकी कोणालाही तसे करण्याचा लेखी आदेश काढू शकेल.

(५) झडती त्यांच्यासमक्ष घेतली जाईल व असा अधिकारी किंवा अन्य व्यक्ती अशा झडतीच्या ओघात ताब्यात घेतलेल्या सर्व वस्तूंची व त्या जेथे जेथे सापडल्या त्या त्या सर्व जागांची यादी तयार करील व असे साक्षीदार ती यादी स्वाक्षरित करतील; पण या कलमाखाली झडतीस साक्षी राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला न्यायालयाने खास समन्स पाठवल्याशिवाय न्यायालयात झडतीचा साक्षीदार म्हणून उपस्थित राहणे आवश्यक करता येणार नाही.

(६) झडती घेतलेल्या जागेच्या ताबाधारकाला किंवा त्याच्या वतीने एखाद्या व्यक्तीला प्रत्येक वेळी झडती चालू असताना उपस्थित राहण्यास परवानगी दिली जाईल व या कलमाखाली तयार केलेल्या यादीची सदर साक्षीदारांनी स्वाक्षरित केलेली प्रत अशा ताबाधारकाकडे किंवा व्यक्तीकडे सुपूर्द केली जाईल.

(७) जव्हा पोटकलम (३) खाली कोणत्याही व्यक्तीची झडती घेतली जाईल तेव्हा, कब्जात घेतलेल्या सर्व वस्तूंची यादी तयार करण्यात येईल व तिची एक प्रत अशा व्यक्तीकडे सुपूर्द केली जाईल.

(८) जर एखाद्या व्यक्तीला या कलमाखाली झडतीस उपस्थित राहून साक्षी राहण्यासाठी तिच्याकडे सुपूर्द केलेल्या किंवा देऊ केलेल्या लेखी आदेशाद्वारे फर्माविण्यात आले असता तिने तसे करण्यास वाजवी कारणाशिवाय नकार दिला किंवा त्याबाबत उपेक्षा केली तर, अशा कोणत्याही व्यक्तीने 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या कलम १८७ खाली अपराध केला असल्याचे मानले जाईल.

**अधिकारक्षेत्रापलिकडे झडती घेताना सापडलेल्या वस्तूंची विल्हेवाट.**

१०१. ज्या न्यायालयाने झडती वॉरंट काढले त्याच्या स्थानिक अधिकारितेच्या पलीकडील कोणत्याही स्थळी त्याची अंमलबजावणी करताना, ज्यांच्यासाठी झडती घतली त्यापैकी कोणत्याही वस्तू सापडल्या असतील तेव्हा, अशा वस्तू यात यापुढे अंतर्भूत असलेल्या उपबंधांखाली त्यांची यादी तयार करून तीसह, वॉरंट काढणाऱ्या न्यायालयासमोर तात्काळ नेल्या जातील—मात्र, अशा स्थळापासून तेथे अधिकारिता असलेला दंडाधिकारी उपरोक्त न्यायालयाहून अधिक जवळ असेल तर, त्या बाबतीत ती यादी व त्या वस्तू तात्काळ अशा दंडाधिकाऱ्यासमोर नेण्यात येतील; आणि सबळ विरोधी कारण नसेल तर असा दंडाधिकारी अशा न्यायालयासमोर त्या नेण्यास प्राधिकृत करणारा आदेश काढील.

## ङ-संकीर्ण

**विवक्षित संपत्ती अभिग्रहण करण्याची पोलीस अधिकाऱ्यांची शक्ती.**

१०२. (१) जी संपत्ती चोरीची असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल किंवा तसा संशय असेल अथवा ज्या परिस्थितीमुळे कोणताही अपराध करण्यात आल्याचा संशय निर्माण होतो अशा परिस्थितीत जी संपत्ती सापडल अशी कोणतीही संपत्ती कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला अभिग्रहण करता येईल.

(२) असा पोलीस अधिकारी, जर तो पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्यास दुय्यम असेल तर, तात्काळ त्या अधिकाऱ्याला अभिग्रहणाचे वृत्त कळवील.

[१][(३) पोटकलम (१) खाली कार्य करणारा प्रत्येक पोलीस अधिकारी अधिकारिता असणाऱ्या दंडाधिकाऱ्याला ताबडतोब अभिग्रहणाचे वृत्त कळवील व अभिग्रहण केलेली संपत्ती, ती न्यायालयाकडे सोईस्करपणे घेऊन जाणे शक्य होणार नाही अशा स्वरूपाची असेल त्या बाबतीत, आवश्यक करण्यात येईल त्याप्रमाणे व तेव्हा न्यायालयासमोर संपत्ती हजर करण्याचे तिच्या विल्हेवाटीबाबतचे न्यायालयाचे पुढील आदेश अंमलात आणण्याचे वचन देणारे बंधपत्र कोणत्याही व्यक्तीने करून दिल्यावर तो संपत्तीचा ताबा तिला देऊ शकेल.]

**१०३.** कोणताही दंडाधिकारी, ज्या जागेच्या झडतीसाठी झडती-वॉरंट काढण्यास तो सक्षम असेल अशा कोणत्याही जागेची आपल्या समक्ष झडती घेण्याचा निदेश देऊ शकेल. दंडाधिकारी आपल्या समक्ष झडती घेण्याचा निदेश देऊ शकेल.

**१०४.** कोणत्याही न्यायालयाला तसे योग्य वाटल्यास या संहितेखाली न्यायालयासमोर हजर केलेला कोणताही दस्तऐवज किंवा वस्तू त्याला अवरुद्ध करता येईल. हजर केलेला दस्तऐवज इत्यादी अवरुद्ध करण्याची शक्ती.

**१०५.** (१) ज्या राज्यक्षेत्रांवर या संहितेचा विस्तार आहे (या कलमात यापुढे "उक्त राज्यक्षेत्रे" म्हणून निर्दिष्ट) त्यांतील न्यायालयाने— आदेशिकांविषयी प्रतियोगी व्यवस्था.

(क) आरोपी व्यक्तीवर काढलेले समन्स, किंवा

(ख) आरोपी व्यक्तीच्या अटकेसाठी काढलेले वॉरंट, किंवा

(ग) कोणत्याही व्यक्तीवर काढलेले, तिला जातीने हजर राहून एखादा दस्तऐवज किंवा अन्य वस्तू हजर करण्यास किंवा ते नुसते हजर करण्यास फर्माविणारे समन्स, किंवा

(घ) काढलेले झडती-वॉरंट,

यांची

[२][(एक) भारतात उच्च राज्यक्षेत्राबाहेर कोणत्याही राज्यातील किंवा क्षेत्रातील न्यायालयाच्या स्थानिक अधिकारितेतील कोणत्याही स्थळी बजावणी किंवा अंमलबजावणी करण्यात यावी, अशी जर प्रथमोक्त न्यायालयाची इच्छा असेल तर त्या न्यायालयाला असे समन्स किंवा वॉरंट त्याची बजावणी किंवा अंमलबजावणी करण्यासाठी त्या दुसऱ्या न्यायालयाच्या पीठासीन अधिकाऱ्याकडे डाकेने किंवा अन्य प्रकारे दोन प्रतीत पाठवता येईल; व जेथे खंड (क) किंवा खंड (ग) मध्ये निर्दिष्ट केलेले कोणतेही समन्स याप्रमाणे बजावण्यात आले असेल त्या बाबतीत, ज्या न्यायालयाच्या पीठासीन अधिकाऱ्याकडे असे समन्स पाठवले असेल तो जणू काही उक्त राज्यक्षेत्रातील दंडाधिकारी असावा त्याप्रमाणे कलम ६८ चे उपबंध अशा समन्सच्या संबंधात लागू होतील.

(दोन) भारताबाहेरील ज्या कोणत्याही देशाच्या किंवा स्थळाच्याबाबतीत, केंद्र शासनाने अशा देशाच्या किंवा स्थळाच्या शासनाशी, फौजदारी बाबीसंबंधातील समन्स किंवा वॉरंट याची बजावणी किंवा अंमलबजावणी करण्याची व्यवस्था केलेली असेल, अशा कोणत्याही देशात किंवा स्थळी (या कलमात यापुढे ज्याचा करारबद्ध राज्य म्हणून उल्लेख केला आहे) बजावणी किंवा अंमलबजावणी करण्यात यावी, अशी जर प्रथमोक्त न्यायालयाची इच्छा असेल तर, त्या न्यायालयाला असे समन्स किंवा वॉरंट, केंद्र शासन अधिसूचनेद्वारे, या संदर्भात विनिर्दिष्ट करील, अशा नमुन्यात, अशा न्यायालयाला, न्यायाधीशाला किंवा दंडाधिकाऱ्याला उद्देशून आणि प्रेषणासाठी अशा प्राधिकरणाकडे दोन प्रतीत पाठवता येईल.]

(२) जेव्हा उक्त राज्यक्षेत्रांतील न्यायालयाकडे,

[२][(एक) उक्त राज्य क्षेत्राबाहेरील भारताच्या कोणत्याही राज्यातील किंवा क्षेत्रातील न्यायालयाने;

(दोन) करारबद्ध राज्यातील न्यायालय, न्यायाधीश किंवा दंडाधिकारी यांनी,]

(क) आरोपी व्यक्तीवर काढलेले समन्स,

(ख) आरोपी व्यक्तीच्या अटकेसाठी काढलेले वॉरंट, किंवा

(ग) कोणत्याही व्यक्तीवर काढलेले, तिला जातीने हजर राहून एखादा दस्तऐवज किंवा अन्य वस्तू हजर करण्यास किंवा ते नुसते हजर करण्यास फर्माविणारे समन्स, किंवा

(घ) काढलेले झडती-वॉरंट,

[२][बजावणीसाठी किंवा अंमलबजावणीसाठी आले असेल तेव्हा,] ते जणू काही उक्त राज्यक्षेत्रांतील अन्य न्यायालयाकडून आपल्या स्थानिक अधिकारितेत बजावणी किंवा अंमलबजावणी करण्यासाठी आपल्याकडे आलेले समन्स किंवा वॉरंट असावे त्याप्रमाणे त्याची बजावणी किंवा अंमलबजावणी ते करवील; व जेव्हा—

(एक) अटकेच्या वॉरंटाची अंमलबजावणी करण्यात आली असेल तेव्हा, अटक केलेल्या व्यक्ती-बाबत, शक्य असेल तेथवर, कलमे ८० व ८१ यांद्वारे विहित केलेल्या प्रक्रियेनुसार कार्यवाही केली जाईल,

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम १० द्वारे घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).
२. १९८८ चा अधिनियम ३२, कलम २ द्वारे घातले (२५ मे, १९८८ रोजी व तेव्हापासून).

(दोन) झडती-वॉरंटाची अंमलबजावणी करण्यात आली असेल तेव्हा, झडतीत सापडलेल्या वस्तूंबाबत, शक्य असेल तेथवर, कलम १०१ द्वारे विहित केलेल्या कार्यपद्धती नुसार कार्यवाही केली जाईल :

[1][परंतु, करारबद्ध राज्याकडून आलेल्या समन्सची किंवा झडती वॉरंटची अंमलबजावणी करण्यात आली असेल त्याबाबतीत सादर करण्यात आलेले दस्तऐवज किंवा वस्तू अथवा झडतीत सापडलेल्या वस्तू, ते समन्स किंवा झडती-वॉरंट काढणाऱ्या न्यायालयाकडे, केंद्र शासन अधिसूचनेद्वारे त्या संदर्भात विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकरणामार्फत पाठवण्यात येतील.]

## [2][प्रकरण सात-क

### विवक्षित प्रकरणांमधील सहाय्यासाठी अन्योन्य व्यवस्था आणि संपत्तीच्या जप्तीसाठी आणि समपहरणासाठी कार्यपद्धती

व्याख्या. १०५क. या प्रकरणामध्ये, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "कंत्राटी राज्य" याचा अर्थ, भारताबाहेरील ज्या कोणत्याही देशाच्या किंवा स्थळाच्या बाबतीत केंद्र शासनाने त्या देशाच्या शासनाबरोबर तह करून किंवा अन्यथा व्यवस्था केलेली असेल, असा कोणताही देश किंवा स्थळ, असा आहे ;

(ख) "ओळखणे" यात, अपराध केल्यामुळे संपत्ती प्राप्त झाली आहे किंवा अपराध करण्यासाठी ती उपयोगात आणली आहे, हे सिद्ध करण्याचाही अंतर्भाव होतो ;

(ग) "गुन्ह्यापासूनचे उत्पन्न" याचा अर्थ, कोणत्याही व्यक्तीने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे गुन्हेगारी कृत्याच्या परिणामी (चलन हस्तांतरणाचा अंतर्भाव असलेल्या गुन्ह्यांसह) मिळवलेली किंवा तिला मिळालेली कोणतीही संपत्ती किंवा अशा कोणत्याही संपत्तीचे मूल्य, असा आहे ;

(घ) "संपत्ती" याचा अर्थ, प्रत्येक प्रकारची संपत्ती आणि मत्ता, मग ती मूर्त किंवा अमूर्त असो, जंगम किंवा स्थावर असो, स्पष्ट किंवा संदिग्ध असो आणि अपराध करताना प्राप्त झालेल्या किंवा वापरलेल्या अशा संपत्तीवरील किंवा मत्तेवरील हक्काचा किंवा त्यातील हित-संबंधाचा पुरावा असणारे विलेख आणि संलेख, असा आहे आणि त्यात गुन्ह्यापासूनच्या उत्पन्नाच्या द्वारे मिळालेल्या संपत्तीचा अंतर्भाव आहे ;

(ङ) "मागोवा काढणे" याचा अर्थ, संपत्तीचे स्वरूप, मूळ साधन, संपत्ती व्यवस्था, स्थानांतरण, हक्क किंवा मालकी ठरवणे, असा आहे.

व्यक्तींचे स्थलांतर करण्यासाठी सहाय्य. १०५ख. (१) जेथे, भारतामधील एखाद्या न्यायालयाची एखाद्या गुन्हेगारी प्रकरणाच्या संबंधात, अशी इच्छा असेल की, कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यासाठी किंवा त्या न्यायालयाने दिलेली कागदपत्रे किंवा अन्य गोष्टी सादर करण्यासाठी त्या व्यक्तीस अटक करण्याकरिता काढण्यात आलेले वॉरंट, कंत्राटी राज्यामधील कोणत्याही स्थळी निष्पादित करण्यात यावे, तेथे ते न्यायालय असे वॉरंट केंद्र शासन, अधिसूचनेद्वारे त्याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यामध्ये, अशा न्यायालयाकडे, न्यायाधीशाकडे किंवा दंडाधिकाऱ्याकडे दोन प्रतींमध्ये पाठवील आणि ते न्यायालय, न्यायाधीश किंवा यथास्थिती दंडाधिकारी, ते वॉरंट निष्पादित करण्याची व्यवस्था करील.

(२) या संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर एखाद्या अपराधाच्या अन्वेषणाच्या किंवा चौकशीच्या ओघात अन्वेषण अधिकाऱ्याने किंवा अन्वेषण अधिकाऱ्याच्या वरच्या दर्जाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने जर असा अर्ज केला की, कंत्राटी राज्यामधील कोणत्याही ठिकाणी असणाऱ्या व्यक्तीची उपस्थिती तशा अन्वेषणासंबंधात किंवा चौकशी संबंधात आवश्यक आहे, आणि तशी उपस्थिती आवश्यक असल्याबद्दल न्यायालयाची खात्री पटली असेल तर, ते न्यायालय उक्त व्यक्तीविरुद्धचे समन्स किंवा वॉरंट, केंद्र शासन, अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा न्यायालयाकडे न्यायाधीशाकडे किंवा दंडाधिकाऱ्याकडे अशा नमुन्यात बजावणीसाठी किंवा कार्यान्वित करण्यासाठी पाठवील.

(३) जेव्हा भारतामधील न्यायालयात गुन्हेगारी प्रकरणाच्या संबंधात, कोणत्याही व्यक्तीस अटक करण्याचे वॉरंट प्राप्त झाले असेल आणि त्याद्वारे त्या व्यक्तीस हजर राहण्यास किंवा हजर राहून त्या न्यायालयात किंवा अन्य कोणत्याही अन्वेषण अभिकरणासमोर, कंत्राटी राज्यामधील न्यायालयाने, न्यायाधीशाने, किंवा दंडाधिकाऱ्याने दिलेला दस्तऐवज किंवा अन्य गोष्ट सादर करण्यास भाग पाडण्यात आले असेल, तर ते वॉरंट त्या न्यायालयाला भारतातील अन्य एखाद्या न्यायालयाकडून स्थानिक हद्दीमध्ये कार्यान्वित करण्यासाठी ते प्राप्त झालेले असल्याप्रमाणे, त्या न्यायालयाकडून निष्पादित करण्यात येईल.

(४) जेव्हा पोटकलम ३ अनुसार कंत्राटी राज्याकडे स्थानांतरीत केलेली व्यक्ती ही भारतामधील कैदी असेल तेव्हा भारतातील न्यायालय किंवा केंद्र शासन, त्या न्यायालयाला किंवा केंद्र शासनाला योग्य वाटतील अशा अटी घालू शकेल.

---

१. १९८८ चा अधिनियम ३२, कलम २ द्वारे घातले (२५ मे, १९८८ रोजी व तेव्हापासून).

२. १९९३ चा अधिनियम ४०, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले. (२० जुलै, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(५) जेव्हा पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) ला अनुसरून भारतात स्थानांतरीत झालेली व्यक्ती, कंत्राटी राज्यातील कैदी असेल तेव्हा, भारतातील न्यायालय, ज्या शर्तींच्या अधीनतेने त्या कैद्याला भारतात स्थानांतरीत केले आहे त्या शर्तीचे अनुपालन केले आहे याची खातरजमा करून घेईल आणि अशा कैद्याला, केंद्र शासन लेखी निदेश देईल अशा अभिरक्षेत व अशा शर्तींच्या अधीन ठेवले जाईल.

**संपत्तीची जप्ती किंवा समपहरण यासंबंधातील आदेशांबाबत सहाय्य.**

**१०५ ग.** (१) जेव्हा भारतातील न्यायालयाला वाजवी कारणांवरून असे वाटत असेल की, एखाद्या व्यक्तीने मिळवलेली संपत्ती त्या व्यक्तीने प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे अपराध करून प्राप्त केली किंवा मिळवली आहे, तेव्हा ते, कलम १०५ घ ते १०५ ज (दोन्ही धरून) या कलमांच्या उपबंधान्वये त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे अशा संपत्तीच्या जप्तीचा किंवा समपहरणाचा आदेश देऊ शकेल.

(२) पोटकलम (१) अन्वये कोणत्याही संपत्तीची जप्ती किंवा समपहरण यांसाठी न्यायालय आदेश देईल आणि अशी संपत्ती कंत्राटी राज्यातील असल्याचा संशय असेल तेव्हा, न्यायालय, अशा आदेशाच्या अंमलबजावणीसाठी कंत्राटी राज्यातील न्यायालयाला किंवा प्राधिकरणाला विनंतीपत्र पाठवू शकेल.

(३) कंत्राटी राज्यातील न्यायालयाकडून किंवा प्राधिकरणाकडून केंद्र शासनाला, एखाद्या व्यक्तीने त्या कंत्राटी राज्यात केलेल्या अपराधापासून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मिळवलेली किंवा तिला प्राप्त झालेली भारतातील संपत्ती जप्त करण्याची किंवा तिचे समपहरण करण्याची विनंती करणारे विनंतीपत्र मिळाले असेल तेव्हा, केंद्र शासन असे पत्र १०५ ध ते १०५ ज (दोन्ही धरून) च्या उपबंधांना किंवा प्रकरणपरत्वे, त्याकाळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याच्या उपबंधांना अनुसरून, केंद्र शासनास, योग्य वाटेल त्याप्रमाणे न्यायालयाकडे अग्रेषित करू शकेल.

**बेकायदेशीररीत्या संपादित केलेली संपत्ती ओळखणे.**

**१०५ घ.** (१) न्यायालय, पोटकलम (१) अन्वये किंवा कलम १०५ ग च्या पोटकलम (३) अन्वये विनंतीपत्र मिळाल्यावर अशा संपत्तीचा शोध घेण्यासाठी किंवा ओळख पटविण्यासाठी सर्व आवश्यक उपाय योजण्याकरिता पोलीस उप निरीक्षकाच्या खालच्या श्रेणीच्या नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला निदेश देईल.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या उपायांमध्ये, कोणतीही व्यक्ती, जागा, संपत्ती, मत्ता, दस्तऐवज, कोणत्याही बँकेतील किंवा सार्वजनिक वित्त संस्थेतील लेखापुस्तके किंवा कोणत्याही इतर संबंधित बाबी यांच्या बाबतीतील कोणतीही चौकशी, अन्वेषण, सर्वेक्षण यांचा अंतर्भाव असू शकेल.

(३) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेला अधिकारी, उक्त न्यायालयाने दिलेल्या आदेशांना अनुसरून पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेली कोणतीही चौकशी, अन्वेषण किंवा सर्वेक्षण पार पाडील.

**संपत्तीचे अभिग्रहण किंवा जप्ती.**

**१०५ङ.** (१) कलम १०५घ अन्वये चौकशी किंवा अन्वेषण करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यास जर असे समजण्यास आधार असेल की, जिच्या संबंधात अशी चौकशी किंवा अन्वेषण चालू आहे अशी कोणतीही संपत्ती, लपविली जाण्याचा, हस्तांतरित केली जाण्याचा किंवा ज्यामुळे अशा संपत्तीची विल्हेवाट लावली जाईल अशा पद्धतीने ती हाताळली जाण्याचा संभव आहे तर, तो अशा संपत्तीच्या अभिग्रहणासाठी आदेश देऊ शकेल आणि जेव्हा अशा संपत्तीचे अभिग्रहण करणे व्यवहार्य नसेल तेव्हा तो, अशी संपत्ती, आदेश देणाऱ्या अधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय हस्तांतरित करण्यात येऊ नये किंवा अन्यथा हाताळण्यात येऊ नये असा निदेश देणारा आदेश काढू शकेल आणि अशा आदेशाची एक प्रत संबंधित व्यक्तीवर बजावण्यात येईल.

(२) पोटकलम (१) खाली दिलेला कोणताही आदेश, तो दिल्यानंतर तीस दिवसांच्या कालावधीत उक्त न्यायालयाच्या आदेशाद्वारे उक्त आदेशास पुष्टी मिळाल्याशिवाय, परिणामक होणार नाही.

**या प्रकरणाअन्वये अभिग्रहण केलेल्या किंवा जप्त केलेल्या संपत्तीचे व्यवस्थापन.**

**१०५च.** (१) न्यायालय, अशा संपत्तीच्या प्रशासकाचे कार्य करण्यासाठी जिथे संपत्ती स्थित आहे त्या क्षेत्राच्या जिल्हा दंडाधिकाऱ्याची किंवा जिल्हा दंडाधिकारी नामनिर्देशित करील अशा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याची नियुक्ती करू शकेल.

(२) पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेला प्रशासक, कलम १०५ङ. च्या पोटकलम (१) अन्वये किंवा कलम १०५ झ अन्वये जिच्या संबंधात आदेश दिला असेल अशी संपत्ती, केंद्र शासन विनिर्दिष्ट करील अशा रीतीने आणि अशा शर्तींच्या अधीन राहून स्वीकारील आणि तिची व्यवस्था पाहील.

(३) प्रशासक, केंद्र शासनाने जिचे समपहरण केले आहे अशा संपत्तीची विल्हेवाट लावण्यासाठी, केंद्रशासन निर्देशित करील अशा उपाययोजनासुद्धा करील.

**संपत्तीच्या समपहरणाची नोटीस.** १०५छ. (१) कलम १०५घ खाली केलेल्या चौकशीच्या, अन्वेषणाच्या किंवा सर्वेक्षणाच्या परिणामी जर न्यायालयाला असे समजण्यास आधार असेल की, अशी सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही संपत्ती गुन्ह्यापासून प्राप्त झाली आहे तर, न्यायालय अशा व्यक्तीवर (यात यापुढे बाधित व्यक्ती म्हणून उल्लेखिलेली) नोटीस बजावील व त्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या तीस दिवसांच्या कालावधीच्या आत, तिने ज्यामधून किंवा ज्याद्वारे अशी संपत्ती संपादित केली असेल ती प्राप्तीची साधने, मिळकत किंवा मत्ता, ज्या पुराव्यावर तो अवलंबून आहे तो पुरावा आणि इतर संबंधित माहिती व तपशील नमूद करण्यास आणि अशी सर्व, किंवा प्रकरणपरत्वे, कोणतीही संपत्ती गुन्ह्यापासून प्राप्त झाल्याचे का घोषित केले जाऊ नये व केंद्र शासनाकडे ती समपहृत का करण्यात येऊ नये, याचे कारण दाखवण्यास फर्मावण्यात येईल.

(२) जेव्हा पोटकलम (१) अन्वये, कोणत्याही व्यक्तीला दिलेल्या नोटिशीत, कोणतीही संपत्ती अशा व्यक्तीच्या वतीने कोणतीही अन्य व्यक्ती धारण करीत आहे असे विनिर्दिष्ट केलेले असेल तेव्हा, त्या नोटिशीची एक प्रत अशा दुसऱ्या व्यक्तीवरही बजावण्यात येईल.

**विवक्षित प्रकरणात संपत्तीचे समपहरण.** १०५ज. (१) न्यायालय, कलम १०५छ अन्वये काढलेल्या कारणे दाखवा नोटिशीबाबत काही स्पष्टीकरण असल्यास ते, आणि त्याच्यासमोर उपलब्ध असलेली अन्य माहिती विचारात घेतल्यानंतर, आणि बाधित व्यक्तीला (आणि जेव्हा बाधित व्यक्ती नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली संपत्ती कोणत्याही इतर व्यक्तीमार्फत धारण करीत असेल तेव्हा अशा इतर व्यक्तीलाही) तिचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आदेशाद्वारे, प्रश्नास्पद संपत्ती पूर्णपणे किंवा तिचा कोणताही भाग हा गुन्ह्यांपासून प्राप्त झालेला आहे किंवा कसे, याबाबतचा आपला निष्कर्ष नमूद करील :

परंतु, जर बाधित व्यक्ती (आणि ज्या प्रकरणात ती व्यक्ती नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली संपत्ती कोणत्याही इतर व्यक्तीमार्फत धारण करीत असेल त्या प्रकरणात ती दुसरी व्यक्तीही) कारणे दाखवा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या तीस दिवसांच्या कालावधीत न्यायालयासमोर उपस्थित राहिली नाही किंवा तिने आपली बाजू मांडली नाही तर, न्यायालय, त्याच्या समोर उपलब्ध असलेल्या पुराव्याच्या आधारे या पोटकलमाखाली एकतर्फी निष्कर्ष नमूद करील.

(२) कारणे दाखवा नोटिशीत उल्लेखिलेल्या संपत्तीपैकी काही संपत्ती ही गुन्ह्यांपासून प्राप्त झाली असल्याविषयी जेव्हा न्यायालयाची खात्री झाली असेल, परंतु अशी संपत्ती नेमकी ओळखणे शक्य नसेल तेव्हा, न्यायालयाने त्याच्या सर्वोत्तम न्यायानुसार, गुन्ह्यांपासून प्राप्त झालेली संपत्ती विनिर्दिष्ट करणे व पोटकलम (१) अन्वये निष्कर्ष नमूद करणे, हे कायदेशीर असेल.

(३) या कलमाअन्वये न्यायालय जेव्हा असा निष्कर्ष नमूद करील की, एखादी संपत्ती ही गुन्ह्यापासून प्राप्त झालेली आहे तेव्हा, अशी संपत्ती सर्व भारमुक्त स्वरूपात केंद्र शासनाकडे समपहृत होईल.

(४) जेव्हा या कलमाअन्वये, एखाद्या कंपनीचा कोणताही शेअर केंद्र शासनाकडे समपहृत होईल तेव्हा, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) किंवा कंपनीच्या संस्थापन नियमावलीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कंपनी तात्काळ अशा शेअरची हस्तांतरिती म्हणून केंद्र शासनाची नोंदणी करील.

**समपहरणाऐवजी दंड.** १०५झ. (१) जेव्हा न्यायालय, कलम १०५ज अन्वये केंद्र शासनाकडे कोणतीही संपत्ती समपहृत झाल्याचे घोषित करील आणि अशा संपत्तीच्या केवळ काही भागाचे मूळ साधन, न्यायालयाचे समाधान होईल अशा रीतीने सिद्ध करण्यात आलेले नसेल तेव्हा, बाधित व्यक्तीला समपहरणाऐवजी, अशा भागाच्या बाजारमूल्याइतका दंड भरण्याचा पर्याय देणारा आदेश न्यायालय देईल.

(२) पोटकलम (१) अन्वये दंड लादणारा आदेश देण्यापूर्वी, बाधित व्यक्तीला तिचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(३) पोटकलम (१) अन्वये देय असलेला दंड बाधित व्यक्तीने त्यासाठी अनुज्ञेय असलेल्या कालावधीत भरला तर न्यायालय, कलम १०५ज अन्वये केलेली समपहरणाची घोषणा आदेशाद्वारे रद्द करील आणि नंतर अशी संपत्ती बंधमुक्त होईल.

**विवक्षित हस्तांतरणे रद्दबातल ठरणे.** १०५ञ. जेव्हा कलम १०५ङ च्या पोटकलम (१) अन्वये आदेश देण्यात आल्यावर किंवा कलम १०५छ अन्वये नोटीस दिल्यावर, उक्त आदेशात, किंवा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली कोणतीही संपत्ती, कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यात आली असेल तेव्हा, या प्रकरणाखालील कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ, असे हस्तांतरण नजरेआड करण्यात येईल आणि कलम १०५ज अन्वये, जर अशी संपत्ती त्यानंतर केंद्र शासनाकडे समपहृत झाली तर, अशा संपत्तीचे हस्तांतरण रद्दबातल ठरल्याचे मानण्यात येईल.

**विनंतीपत्राच्या बाबतीतील कार्यपद्धती.** १०५ट. केंद्र शासनाला, करारी राज्याकडून मिळालेले प्रत्येक विनंतीपत्र, समन्स किंवा वॉरंट आणि या प्रकरणाअन्वये करारी राज्याला पाठविलेले प्रत्येक विनंतीपत्र, समन्स किंवा वॉरंट, केंद्र शासन, यासंबंधात अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात व अशा रीतीने करारी राज्याकडे किंवा यथास्थिति, भारतातील संबंधित न्यायालयाकडे पाठवण्यात येईल.

**या प्रकरणाची प्रयुक्ती.** १०५ठ. केंद्र शासनाला, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, ज्याच्याबरोबर अन्योन्य व्यवस्था करण्यात आली आहे अशा करारी राज्याच्या संबंधातील या प्रकरणाची प्रयुक्ती, उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या अटी, अपवाद किंवा अर्हता यांच्या अधीन असेल.]

प्रकरण आठ

शांतता राखण्यासाठी व चांगल्या वागणुकीसाठी जामीन

१०६. (१) जेव्हा सत्र न्यायालय किंवा प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्यांचे न्यायालय एखाद्या व्यक्तीला पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपकी कोणत्याही अपराधाबद्दल किंवा अशा कोणत्याही अपराधास अपप्रेरणा दल्याबद्दल सिद्धदोष ठरवील आणि शांतता राखण्यासाठी अशा व्यक्तीकडून जामीन घेणे जरुरीचे आहे असे त्याचे मत होईल तेव्हा, न्यायालय अशा व्यक्तीला शिक्षादेश देण्याच्या वेळी त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे जास्तीत जास्त तीन वर्षांच्या कालावधीपुरते शांतता राखण्यासाठी, जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना, बंधपत्र निष्पादित करण्याचा तिला आदेश देऊ शकेल. दोषसिद्धी झाल्यावर शांतता राखण्यासाठी जामीन.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेले अपराध पुढीलप्रमाणे आहेत :—

(क) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या आठव्या प्रकरणाखाली शिक्षापात्र असलेला, पण कलम १५३क किंवा १५३ख किंवा १५४ याखाली शिक्षापात्र असणाऱ्या अपराधाहून अन्य असा कोणताही अपराध ;

(ख) हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग किंवा आगळीक करणे यामुळे जो अपराध घडतो किंवा हे ज्यात समाविष्ट आहे असा कोणताही अपराध;

(ग) फौजदारीपात्र धाकदपटशाचा कोणताही अपराध;

(घ) ज्यामुळे शांतताभंग घडला किंवा घडावा असे उद्देशित होते किंवा तो घडण्याचा संभव असल्याचे माहीत होते असा अन्य कोणताही अपराध.

(३) जर अपीलान्ती किंवा अन्यप्रकारे दोषसिद्धी रद्द ठरवण्यात आली तर, याप्रमाणे निष्पादित केलेले बंधपत्र शून्य होईल.

(४) या कलमाखालील आदेश अपील न्यायालयालाही किंवा एखादे न्यायालय आपल्या पुनरीक्षणाच्या शक्ती वापरत असताना त्यालाही काढता येईल.

१०७. (१) कोणतीही व्यक्ती शांतताभंग करण्याचा किंवा सार्वजनिक प्रशांतता बिघडवण्याचा अथवा ज्यामुळे संभवतः शांतताभंग घडून येईल किंवा सार्वजनिक प्रशांतता बिघडेल असे कोणतेही गैर कृत्य करण्याचा संभव आहे अशी जेव्हा कार्यकारी दंडाधिकाऱ्याला खबर मिळाली असेल आणि पुढील कार्यवाही करण्यास पुरेसे कारण आहे असे त्याचे मत असेल तेव्हा, यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने तो दंडाधिकारी, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे जास्तीत जास्त एक वर्षाच्या कालावधीपुरते शांतता राखण्यासाठी, [1][जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना] बंधपत्र निष्पादित करण्याचा आदेश अशा व्यक्तीला का देऊ नये याचे कारण दाखवण्यास त्या व्यक्तीला फर्मावू शकेल. अन्य प्रकरणी शांतता राखण्यासाठी जामीन.

(२) जेथे शांतताभंगाची किंवा विक्षोभाची आशंका आहे असे कोणतेही स्थळ कोणत्याही कार्यकारी दंडाधिकाऱ्याच्या स्थानिक अधिकारितेत असेल अथवा जी व्यक्ती अशा अधिकारितेपलिकडे शांतताभंग करण्याचा किंवा सार्वजनिक प्रशांतता बिघडवण्याचा किंवा पूर्वोक्त असे कोणतेही गैर कृत्य करण्याचा संभव आहे ती व्यक्ती अशा स्थानिक अधिकारितेत असेल तेव्हा, या कलमाखालील कार्यवाही त्या कार्यकारी दंडाधिकाऱ्यासमोर करता येईल.

*१०८. (१) जेव्हा एखाद्या [2][कार्यकारी दंडाधिकाऱ्याला], त्याच्या स्थानिक अधिकारितेत किंवा त्याबाहेर असताना जी व्यक्ती,— प्रजाक्षोभक साहित्य प्रसृत करणाऱ्या व्यक्तींकडून चांगल्या वागणुकीसाठी जामीन.

(एक) (क) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यातील कलम १२४क किंवा कलम १५३क किंवा कलम १५३ख किंवा कलम २९५क याखाली ज्याचे प्रकाशन शिक्षापात्र आहे असे कोणतेही साहित्य, किंवा

(ख) जे साहित्य प्रसृत करणे हे 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याखाली 'फौजदारीपात्र धाकदपटशा' किंवा 'बदनामी' या सदरात जमा होते असे, आपली पदीय कर्तव्ये पार पाडण्याचे कार्य करणाऱ्या किंवा तसे म्हणून कार्य करणाऱ्या न्यायाधीशासंबंधीचे कोणतेही साहित्य,

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम ११ द्वारे घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

२. १९८० चा अधिनियम ६३, कलम २ द्वारे 'प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी' याऐवजी 'कार्यकारी दंडाधिकारी' असा शब्दोल्लेख घातला (२३ सप्टेंबर, १९८० रोजी व तेव्हापासून).

* १९८० चा अधिनियम क्र. ६३-क. १०-"या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी कोणत्याही प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याकडे प्रलंबित असलेली मुख्य अधिनियमाच्या कलम १०८, १०९ आणि ११० खालील सर्व प्रकरणे, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जणू काही हा अधिनियम संमत केलेला नाही असे समजून त्याप्रमाणे हाताळण्यात येतील."

तोंडी किंवा लेखी किंवा अन्य कोणत्याही रीतीने प्रसृत करते किंवा प्रसृत करण्याचा प्रयत्न करते किंवा तो प्रसृत करण्यास अपप्रेरणा देते,

(दोन) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या कलम २९२ मध्ये निर्दिष्ट केलेले असे कोणतेही अश्लील साहित्य बनवते, निर्माण करते, प्रकाशित करते किंवा विक्रीस ठवते, आयात करते, निर्यात करते, अभिहस्तांतरित करते, विकते, भाड्याने देते, वितरित करते, जाहीर-रीत्या प्रदर्शित करते किंवा अन्य कोणत्याही रीतीने त्याचा प्रसार करते,

अशी एखादी व्यक्ती आपल्या स्थानिक अधिकारितेत आहे अशी खबर मिळालेली असेल आणि पुढील कायवाही करण्यास पुरेसे कारण आहे असे त्या दंडाधिकाऱ्याचे मत असेल तेव्हा, यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने तो दंडाधिकारी, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे जास्तीत जास्त एक वर्षाच्या कालावधीपुरते अशा व्यक्तीने चांगली वागणूक ठेवण्यासाठी, जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना, बंधपत्र निष्पादित करण्याचा आदेश तिला का देऊ नये याचे कारण दाखवण्यास त्या व्यक्तीला फर्मावू शकेल.

(२) 'मुद्रण व पुस्तक-नोंदणी अधिनियम, १८६७' (१८६७ चा २५) यामध्ये घालून दिलेल्या नियमांखाली नोंदणी केलेल्या आणि त्यानुरूप संपादित, मुद्रित व प्रसिद्ध केलेल्या कोणत्याही प्रकाशनाचा संपादक, मालक, मुद्रक किंवा प्रकाशक याच्याविरुद्ध, अशा प्रकाशनात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही साहित्याच्या संदर्भात या कलमाखाली कोणतीही कार्यवाही राज्य शासन किंवा राज्य शासनाने या संबंधात शक्ती प्रदान केलेला एखादा अधिकारी यांच्या आदेशाखेरीज किंवा प्राधिकाराखेरीज केली जाणार नाही.

संशयित व्यक्तींकडून चांगल्या वागणुकीसाठी जामीन.

*१०९. जी व्यक्ती गुप्तपणे वावरण्याची खबरदारी घेते अशी एखादी व्यक्ती आपल्या स्थानिक अधिकारितेत आहे आणि दखलपात्र अपराध करण्याच्या हेतून ती तसे करीत आहे असे समजण्यास कारण आहे अशी जेव्हा एखाद्या [1][कार्यकारी दंडाधिकाऱ्याला] खबर मिळेल तेव्हा, यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने तो दंडाधिकारी, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे जास्तीत जास्त एक वर्षाच्या कालावधीपुरते अशा व्यक्तीने चांगली वागणूक ठेवण्यासाठी, जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना, बंधपत्र निष्पादित करण्याचा आदेश तिला का देऊ नये, याचे कारण दाखविण्यास त्या व्यक्तीला फर्मावू शकेल.

सराईत अपराध्यांकडून चांगल्या वागणुकीसाठी जामीन.

*११०. जी व्यक्ती—

(क) सरावलेला असा जबरी चोर, घरफोड्या, चोर किंवा बनावटकार आहे, किंवा

(ख) संपत्ती चोरीची आहे हे माहित असताना चोरीची संपत्ती घेण्यास सरावलेली आहे, किंवा

(ग) चोरांना संरक्षण किंवा आसरा देण्यास, अथवा चोरीची संपत्ती लपविण्याच्या किंवा तिची विल्हेवाट करण्याच्या कामी मदत करण्यास सरावलेली आहे, किंवा

(घ) अपनयन, अपहरण, बलाद्ग्रहण, ठकवणूक किंवा आगळीक अथवा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या बाराव्या प्रकरणाखाली, किंवा त्या संहितेच्या कलम ४८९क, कलम ४८९ख, कलम ४८९ग किंवा कलम ४८९घ खाली शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध करण्यास सरावलेली आहे, किंवा करण्याचा प्रयत्न करते, किंवा करण्यास अपप्रेरणा देते, किंवा

(ङ) शांतताभंग ज्यात अनुस्यूत आहे असे अपराध करण्यास सरावलेली आहे, किंवा करण्याचा प्रयत्न करते, किंवा करण्यास अपप्रेरणा देते, किंवा

(च) (एक) पुढील अधिनियमांपैकी म्हणजे,—

(क) 'औषधिद्रव्य व प्रसाधन अधिनियम, १९४०' (१९४० चा २३) ;

(ख) [2]['विदेशी विनिमयचलन विनियमन अधिनियम, १९७३' (१९७३ चा ४६)] ;

(ग) 'कर्मचारी भविष्य निधि अधिनियम, १९५२' (१९५२ चा १९) ;

(घ) 'अन्नभेसळ प्रतिबंधक अधिनियम, १९५४' (१९५४ चा ३७) ;

(ङ) 'अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५' (१९५५ चा १०) ;

**(च) 'अस्पृश्यता (अपराध) अधिनियम, १९५५' (१९५५ चा २२) ;

(छ) 'सीमाशुल्क अधिनियम, १९६२' (१९६२ चा ५२) ;

यांपैकी एका किंवा अधिक अधिनियमांखालील कोणताही अपराध; किंवा

(दोन) साठेबाजीस अथवा नफेबाजीस अथवा अन्नातील किंवा औषधिद्रव्यांतील भेसळीस अथवा भ्रष्टाचारास प्रतिबंध करण्याचा उपबंध करणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्याखाली शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध;

करण्यास सरावलेली आहे, किंवा करण्याचा प्रयत्न करते, किंवा करण्यास अपप्रेरणा देते, किंवा

---

१. १९८० चा अधिनियम ६३, कलम २ द्वारे 'प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी' याऐवजी 'कार्यकारी दंडाधिकारी' असा शब्दोल्लेख घातला (२३ सप्टेंबर, १९८० रोजी व तेव्हापासून).

*१९८० चा अधिनियम ६३-कलम. १०—"या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी कोणत्याही प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याकडे प्रलंबित असलेली मुख्य अधिनियमाच्या कलम १०८, १०९ आणि ११० खालील सर्व प्रकरणे, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जणू काही हा अधिनियम संमत केलेला नाही असे समजून त्याप्रमाणे हाताळण्यात येतील."

**आता 'नागरी हक्क संरक्षण अधिनियम, १९५५' पहावा.

२. १९७४ चा अधिनियम ५६, कलम ३ आणि दुसरी अनुसूची याद्वारे याऐवजी घातले.

(छ) इतकी दु:साहसी आणि धोकादायक आहे की, ती जामिनाशिवाय मोकळी राहणे हे समाजास धोक्याचे आहे ;

अशी एखादी व्यक्ती आपल्या स्थानिक अधिकारितेत आहे अशी जेव्हा [1][कार्यकारी दंडाधिकाऱ्यास] खबर मिळेल तेव्हा, यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने असा दंडाधिकारी, त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे जास्तीत जास्त तीन वर्षांच्या कालावधीपुरते अशा व्यक्तीला चांगली वागणूक ठेवण्यासाठी जामीनदारांसह बंधपत्र निष्पादित करण्याचा आदेश तिला का देऊ नये याचे कारण दाखविण्यास त्या व्यक्तीला फर्मावू शकेल.

**आदेश काढणे.**

१११. जेव्हा कलम १०७, कलम १०८, कलम १०९ किंवा कलम ११० खाली कार्य करणाऱ्या दंडाधिकाऱ्याला अशा कलमाखाली कोणत्याही व्यक्तीला कारण दाखवावयास लावणे जरुरीचे वाटेल तेव्हा, तो मिळालेल्या खबरीचा सारांश, निष्पादित करावयाच्या बंधपत्राची रक्कम, किती काळ ते अंमलात राहावयाचे ती मुदत, आणि कोणतेही जामीनदार आवश्यक असल्यास त्यांची संख्या व कोणत्या स्वरूपाचे आणि प्रकारचे जामीनदार आवश्यक आहेत ते नमूद करणारा लेखी आदेश काढील.

**न्यायालयात हजर असलेल्या व्यक्तीबाबतची कार्यपद्धती.**

११२. जिच्याबाबत असा आदेश केलेला असेल ती व्यक्ती न्यायालयात हजर असल्यास, तो आदेश तिला वाचून दाखविण्यात येईल, किंवा तिची तशी इच्छा असेल तर, त्याचा आशय तिला समजावून देण्यात येईल.

**अशा हजर नसलेल्या व्यक्तींच्या बाबतीत समन्स किंवा वॉरंट.**

११३. अशी व्यक्ती न्यायालयात हजर नसल्यास, दंडाधिकारी तिला उपस्थित राहण्यास फर्मावणारे समन्स अथवा अशी व्यक्ती हवालातीत असेल तेव्हा, ज्याच्या हवालातीत ती असेल त्या अधिकाऱ्याला उद्देशून तिला न्यायालयासमोर आणण्याचा निदेश देणारे वॉरंट काढील :

परंतु, पोलीस अधिकाऱ्याच्या अहवालावरून किंवा अन्य खबरीवरून (त्या अहवालाचा किंवा खबरीचा सारांश दंडाधिकाऱ्याने नमूद करावा) शांतताभंग केला जाईल असे भय वाटण्यास कारण असून, अशा व्यक्तीस तात्काळ अटक करण्याव्यतिरिक्त अन्य मार्गाने अशा शांतताभंगास प्रतिबंध करणे शक्य नाही असे जेव्हा केव्हा अशा दंडाधिकाऱ्याला दिसून येईल तेव्हा, तो दंडाधिकारी कोणत्याही वेळी तिच्या अटकेसाठी वॉरंट काढू शकेल.

**आदेशाची प्रत समन्सच्या किंवा वॉरंटाच्या सोबत असणे.**

११४. कलम ११३ खाली काढलेल्या प्रत्येक समन्सचा किंवा वॉरंटाच्या सोबत कलम १११ खाली केलेल्या आदेशाची प्रत असेल आणि अशा समन्सची किंवा वॉरंटाची बजावणी किंवा अंमलबजावणी करणारा अधिकारी जिच्यावर ते बजावले जाईल किंवा त्याखाली जिला अटक केली जाईल त्या व्यक्ती-कडे अशी प्रत सुपूर्द करील.

**जातीनिशी हजेरी अनावश्यक करण्याची शक्ती.**

११५. ज्या व्यक्तीला, शांतता राखण्यासाठी किंवा चांगली वागणूक ठेवण्यासाठी बंधपत्र निष्पादित करण्याचा आदेश तिला का देऊ नये याचे कारण दाखविण्यास फर्माविण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीची जातीनिशी हजेरी आवश्यक करण्यास दंडाधिकाऱ्याला पुरेसे कारण दिसल्यास तो तसे करू शकेल आणि तिला वकिलामार्फत उपस्थित राहण्याची परवानगी देऊ शकेल.

**खबरीच्या सत्यतेबाबत चौकशी.**

११६. (१) जेव्हा न्यायालयात हजर असलेल्या व्यक्तीला कलम १११ खालील आदेश कलम ११२ अन्वये वाचून दाखवण्यात येईल किंवा समजावून देण्यात यईल, अथवा कलम ११३ खाली काढलेल्या समन्सला किंवा वॉरंटाला अनुसरून किंवा त्याची अंमलबजावणी म्हणून कोणतीही व्यक्ती दंडाधिकाऱ्या-समोर उपस्थित होईल किंवा आणली जाईल तेव्हा, दंडाधिकारी ज्यावरून कारवाई करण्यात आली त्या खबरीच्या सत्यतेसंबंधी चौकशी करण्याच्या आणि जरूर वाटेल असा आणखी पुरावा घेण्याच्या कामास लागेल.

(२) अशी चौकशी, व्यवहार्य असेल तेथवर, समन्स-खटल्यांतील संपरीक्षा चालवण्यासाठी आणि पुरावा नोंदवण्यासाठी यात यापुढे विहित केलेल्या रीतीने करण्यात येईल.

(३) पोटकलम (१) खालील चौकशीस प्रारंभ झाल्यानंतर व ती पूर्ण होण्यापूर्वी, शांतताभंगास किंवा सार्वजनिक प्रशांतता बिघडवली जाण्यास किंवा कोणताही अपराध घडून येण्यास प्रतिबंध करण्या-साठी अथवा सार्वजनिक सुरक्षिततेसाठी तात्काळ उपाययोजना जरुरीची आहे असे दंडाधिकाऱ्यास वाटले तर, तो कलम १११ खाली ज्या व्यक्तीबाबत आदेश काढण्यात आला असेल तिला चौकशी संपेपर्यंत शांतता राखण्यासाठी किंवा चांगली वागणूक ठेवण्यासाठी, जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना, बंधपत्र निष्पादित करण्याचा निदेश देऊ शकेल, आणि अशा बंधपत्राचे निष्पादन होईपर्यंत, किंवा निष्पादन करण्यात कसूर झाल्यास चौकशी संपेपर्यंत तिला हवालातीत स्थानबद्ध करू शकेल :

---

१. १९८० चा अधिनियम ६३, कलम २ द्वारे 'प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी' याऐवजी 'कार्यकारी दंडाधिकारी' असा शब्दोल्लेख घातला (२३ सप्टेंबर, १९८० रोजी व तेव्हापासून).

परतु,—

(क्) कलम १०८, कलम १०९ किंवा कलम ११० खाली जिच्याविरुद्ध कार्यवाही करण्यात आलेली नाही अशा कोणत्याही व्यक्तीला चांगली वागणूक ठेवण्यासाठी बंधपत्र निष्पादित करण्याचा निदेश दिला जाणार नाही;

(ख्) अशा बंधपत्राच्या शर्ती—मग त्या त्याच्या रकमेबाबत असोत वा जामीनदार देण्याबाबत किंवा त्यांच्या संख्येबाबत असोत वा त्यांच्या दायित्वाच्या द्रव्यविषयक व्याप्तीबाबत असोत—कलम १११ खालील आदेशात विनिर्दिष्ट केलेल्यांहून अधिक भारप्रद असणार नाहीत.

(४) या कलमाच्या प्रयोजनांकरता, एखादी व्यक्ती सराईत अपराधी आहे किंवा इतकी दु:साहसी आणि धोकादायक आहे की, ती जामिनाशिवाय मोकळी राहणे हे समाजास धोक्याचे होईल हे तथ्य सर्वसाधारण लौकिकासंबंधीच्या पुराव्याने किंवा अन्यथा शाबीत करता येईल.

(५) जेथे चौकशीतील बाबीमध्ये दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्रितपणे संबंधित असतील तेथे दंडाधिकाऱ्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे त्यांच्याबाबत एकाच किंवा वेगवेगळ्या चौकशीद्वारे कार्यवाही करता यईल.

(६) या कलमाखालील चौकशी तिच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्यात यईल, आणि अशी चौकशी याप्रमाणे पूर्ण झाली नाही तर, या प्रकरणाखालील कार्यवाही सदर कालावधी संपताच, अशा दंडाधिकाऱ्याने विशेष कारणे असल्यास ती नमूद करून त्याकरता अन्यथा निदेशित केले नाही तर, समापित होईल :

परंतु, जेव्हा अशी चौकशी प्रलंबित असेपर्यंत कोणत्याही व्यक्तीला स्थानबद्धतेत ठेवण्यात आले असेल तेव्हा, त्या व्यक्तीविरुद्ध होणारी कार्यवाही तत्पूर्वी समाप्त झाली नसेल तर अशा स्थानबद्धतेचा सहा महिन्यांचा कालावधी संपताच ती समापित होईल.

(७) कार्यवाही चालू ठेवण्याकरता पोटकलम (६) खाली कोणताही निदेश देण्यात आला असेल तेथे, नाराज पक्षकाराने सत्र न्यायाधीशाकडे केलेल्या अर्जावरून, तो निदेश कोणत्याही विशेष कारणावर आधारलेला नाही किंवा तो विकृत आहे अशी त्याची खात्री झाली तर, त्याला तो विलोपित करता येईल.

**जामीन देण्याचा आदेश.** ११७. ज्या व्यक्तीबाबत चौकशी करण्यात आली असेल तिने बंधपत्र, जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना, निष्पादित करणे हे, प्रकरणपरत्वे, शांतता राखण्यासाठी किंवा चांगली वागणूक ठेवण्यासाठी जरुरीचे आहे असे अशा चौकशीअन्ती शाबीत झाले तर, दंडाधिकारी तद्नुसार आदेश देईल :

परंतु,—

(क्) कोणत्याही व्यक्तीला, कलम १११ खाली केलेल्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्याहून निराळ्या स्वरूपाचा किंवा त्याहून मोठ्या रकमेचा किंवा त्याहून दीर्घतर कालावधीकरता जामीन देण्याचा आदेश दिला जाणार नाही;

(ख्) प्रत्येक बंधपत्राची रक्कम, प्रकरणाची परिस्थिती यथायोग्यपणे लक्षात घेऊन निश्चित करण्यात येईल आणि ती अत्याधिक असणार नाही;

(ग्) जिच्याबाबत चौकशी करण्यात आली ती व्यक्ती अज्ञान असेल तर, ते बंधपत्र तिच्या जामीनदारांकडूनच निष्पादित करण्यात येईल.

**जिच्याविरुद्ध खबर मिळाली असेल त्या व्यक्तीला विनादोषारोप सोडणे.** ११८. ज्या व्यक्तीबाबत चौकशी करण्यात आली तिने बंधपत्र निष्पादित करणे हे, प्रकरणपरत्वे, शांतता राखण्यासाठी किंवा चांगली वागणूक ठेवण्यासाठी जरुरीचे आहे, असे कलम ११६ खालील चौकशीअन्ती शाबीत झाले नाही तर, दंडाधिकारी अभिलेखावर तशा आशयाची नोंद करील, आणि अशा व्यक्तीला केवळ चौकशीच्या प्रयोजनांसाठीच हवालातीत ठेवण्यात आले असेल तर तिला बंधमुक्त करील किंवा, अशी व्यक्ती हवालातीत नसेल तर, तिला विनादोषारोप सोडून देईल.

**ज्या कालावधीकरता जामीन आवश्यक असेल त्याची सुरुवात.** ११९. (१) कलम १०६ किंवा कलम ११७ खाली जिच्याबाबत जामीन आवश्यक करणारा आदेश काढण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीला, असा आदेश काढण्यात आला त्यावेळी कारावासाची शिक्षा देण्यात आली असेल, किंवा त्यावेळी ती कारावासाची शिक्षा भोगत असेल तर, ज्या कालावधीकरिता असा जामीन आवश्यक करण्यात आला असेल तो कालावधी अशी शिक्षा संपताच सुरू होईल.

(२) अन्य प्रकरणी असा कालावधी, अशा आदेशाच्या दिनांकास सुरू होईल—मात्र दंडाधिकाऱ्याने पुरेशा कारणास्तव नंतरचा दिनांक निश्चित केला असेल तर तो अपवाद समजावा.

**बंधपत्राचा मजकूर.** १२०. अशा कोणत्याही व्यक्तीने निष्पादित करावयाच्या बंधपत्राने ती, प्रकरणपरत्वे, शांतता राखण्यास किंवा चांगली वागणूक ठेवण्यास बांधली जाईल, आणि यापैकी दुसऱ्या बाबतीत कारावासाच्या शिक्षेस पात्र असा कोणताही अपराध करणे किंवा करण्याचा प्रयत्न करणे किंवा करण्यास अपप्रेरणा देणे हे कोठेही करण्यात आले तरी तो म्हणजे बंधपत्राचा भंग ठरेल.

१२१. (१) या प्रकरणाखाली एखादा जामीनदार देऊ करण्यात आलेला असता, बंधपत्राच्या प्रयोजनांसाठी असा जामीनदार ही अयोग्य व्यक्ती आहे या कारणावरून तो स्वीकारण्यास दंडाधिकारी नकार देऊ शकेल अथवा त्याने किंवा त्याच्या पूर्वाधिकाऱ्याने पूर्वी स्वीकारलेल्या कोणत्याही जामीन-दाराला त्या कारणावरून नाकारू शकेल : जामीनदार नाकारण्याची शक्ती.

परंतु, असा कोणताही जामीनदार स्वीकारण्यास याप्रमाणे नकार देण्यापूर्वी किंवा तो नाकारण्या-पूर्वी तो दंडाधिकारी स्वतः जामीनदाराच्या योग्यतेबाबत शपथेवर रीतसर चौकशी करील किंवा आपणांस दुय्यम असणाऱ्या दंडाधिकाऱ्याकरवी अशी चौकशी करून त्याला त्यावर अहवाल द्यावयास लावील.

(२) असा दंडाधिकारी जामीनदाराला आणि ज्या व्यक्तीने जामीनदार देऊ केला तिला, चौकशी करण्यापूर्वी वाजवी नोटीस देईल आणि चौकशी करताना, त्याच्यापुढे दाखल करण्यात आलेल्या पुराव्यांचा सारांश नमूद करील.

(३) आपल्यापुढे किंवा पोटकलम (१) खाली प्रतिनियुक्त केलेल्या दंडाधिकाऱ्यापुढे याप्रमाणे दाखल करण्यात आलेला पुरावा व तसेच अशा दंडाधिकाऱ्याचा कोणताही अहवाल असल्यास तो विचारात घेतल्यानंतर, बंधपत्राच्या प्रयोजनांकरिता तो जामीनदार ही अयोग्य व्यक्ती आहे अशी दंडाधिकाऱ्याची खात्री झाली तर, तो, असा जामीनदार स्वीकारण्यास नकार देणारा किंवा प्रकरणपरत्वे, त्याला नाकारणारा आदेश काढील आणि तसे करण्याच्या आपल्या कारणांची त्यात नोंद करील:

परंतु, जो जामीनदार पूर्वी स्वीकारलेला होता त्याला नाकारणारा आदेश काढण्यापूर्वी, आपणांस योग्य वाटेल त्याप्रमाणे दंडाधिकारी आपले समन्स किंवा वॉरंट काढील, आणि ज्या व्यक्तीकरता जामीन-दार बांधलेला असेल तिला आपल्यापुढे उपस्थित व्हावयास लावील किंवा उपस्थित करण्याची व्यवस्था करील.

१२२. (१) (क) कलम १०६ किंवा कलम ११७ खाली जामीन देण्याचा आदेश देण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने जर, असा जामीन जितक्या कालावधीकरिता द्यावयाचा तो कालावधी ज्या दिनांकास सुरू होणार त्या दिनांकास किंवा त्यापूर्वी जामीन दिला नाही तर, तिला, यात लगतनंतर उल्लेखिलेली बाब खरीजकरून इतर बाबतीत असा कालावधी संपेपर्यंत अथवा ज्या न्यायालयाने किंवा दंडाधिकाऱ्याने जामीन आवश्यक करणारा आदेश काढला त्याला ती व्यक्ती अशा कालावधीत जामीन देईपर्यंत तुरुंगात पाठवले जाईल किंवा ती आधीच तुरुंगात असल्यास तिला तुरुंगातच स्थानबद्ध केले जाईल. जामीन देण्यात कसूर झाल्यास कारावास.

(ख) कलम ११७ खाली दंडाधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाला अनुसरून एखाद्या व्यक्तीने शांतता राखण्याबाबत जामीनदारांच्याविना बंधपत्र निष्पादित केल्यानंतर जर, तिने बंधपत्राचा भंग केला आहे याबद्दल त्या दंडाधिकाऱ्याची किंवा त्याच्या पदीय उत्तराधिकाऱ्याची खात्री होईल अशाप्रकारे शाबीत करण्यात आले तर, अशा शाबितीची आधारभूत कारणे नमूद करून असा दंडाधिकारी किंवा त्याचा पदीय उत्तराधिकारी, अशा व्यक्तीला अटक करून बंधपत्राचा कालावधी संपेपर्यंत तुरुंगात स्थानबद्ध करावे असा आदेश देऊ शकेल आणि सदर व्यक्ती कायद्यानुसार ज्या अन्य कोणत्याही शिक्षेला किंवा समप-हरणाला पात्र असेल त्याला अशा आदेशामुळे बाध येणार नाही.

(२) जेव्हा अशा व्यक्तीला दंडाधिकाऱ्याने एक वर्षाहून अधिक कालावधीकरता बंधपत्र देण्याचा आदेश दिलेला असेल तेव्हा, अशा व्यक्तीने पूर्वोक्त असा जामीन दिला नाही तर, असा दंडाधिकारी सत्र न्यायाधीशाचे आदेश होईतोवर तिला तुरुंगात स्थानबद्ध करण्याचे निदेशित करणारे वॉरंट काढील आणि सोईस्कर होईल तितक्या लवकर ती कार्यवाही अशा न्यायालयापुढे ठेवण्यात येईल.

(३) अशा न्यायालयाला, अशा कार्यवाहीचे परीक्षण करून आपणांस जरुरीची वाटेल अशी आणखी कोणतीही माहिती किंवा पुरावा दंडाधिकाऱ्याकडून मागवल्यानंतर, आणि संबंधित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्याप्रकरणी त्याला योग्य वाटेल असा आदेश काढता येईल:

परंतु, जामीन देण्यास चुकल्याबद्दल कोणत्याही व्यक्तीला काही कालावधीकरिता तुरुंगात पाठवण्यात आल्यास तो कालावधी तीन वर्षांहून अधिक असणार नाही.

(४) जर दोन किंवा अधिक व्यक्तींकडून एकाच कार्यवाहीच्या ओघात जामीन मागवण्यात आला असून, त्यांच्यापैकी कोणाही एका व्यक्तीबाबत ती कार्यवाही पोटकलम (२) खाली सत्र न्यायाधीशाकडे निर्देशित केलेली असेल तर, अशा व्यक्तींपैकी ज्या व्यक्तीला जामीन देण्याचा आदेश दिलेला असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या प्रकरणाचाही अशा निर्देशनात समावेश असेल आणि तसे घडल्यास पोट-कलम (२) आणि (३) चे उपबंध अशा अन्य व्यक्तीच्याही प्रकरणास लागू असतील, मात्र तिला काही कालावधीकरिता कारागृहात ठेवण्यात आल्यास तो कालावधी जितक्या कालावधीकरिता तिला जामीन देण्याचा आदेश देण्यात आला होता त्याहून अधिक असणार नाही.

(५) सत्र न्यायाधीशाला पोटकलम (२) किंवा पोटकलम (४) खाली त्याच्यापुढे मांडण्यात आलेली कोणतीही कार्यवाही स्वविवेकानुसार अपर सत्र न्यायाधीशाकडे किंवा सहायक सत्र न्यायाधीशाकडे वर्ग करता येईल आणि याप्रमाणे ती वर्ग झाल्यावर, अशा अपर सत्र न्यायाधीशाला किंवा सहायक सत्र न्यायाधीशाला अशा कार्यवाहीबाबत सत्र न्यायाधीशाचे या कलमाखालील अधिकार वापरता येतील.

(६) जर तुरुंगाच्या अंमलदार अधिकाऱ्याकडे जामीन सादर केला तर, ज्याने आदेश दिला त्या न्यायालयाकडे किंवा दंडाधिकाऱ्याकडे तो ती बाब तात्काळ निर्देशित करील आणि अशा न्यायालयाच्या किंवा दंडाधिकाऱ्याच्या आदेशाची प्रतीक्षा करील.

(७) शांतता राखण्यासाठी जामीन देण्यास चुकल्याबद्दलचा कारावास साधा असेल.

(८) चांगली वागणूक ठेवण्यासाठी जामीन देण्यास चुकल्याबद्दलचा कारावास, कार्यवाही कलम १०८ खाली करण्यात आली असेल तर साधा असेल आणि कार्यवाही कलम १०९ किंवा कलम ११० खाली करण्यात आली असेल तर प्रत्येक प्रकरणात न्यायालय किंवा दंडाधिकारी निदेशित करील त्यानुसार तो सश्रम किंवा साधा असेल.

जामीन देण्यास चुकल्याबद्दल तुरुंगात पाठवलेल्या व्यक्तींना बंधमुक्त करण्याची शक्ती.

१२३. (१) या प्रकरणाखाली जामीन देण्यास चुकल्याबद्दल तुरुंगात पाठवलेल्या कोणत्याही व्यक्तीला बंधमुक्त करण्याने समाजाला किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला धोका पोचणार नाही असे जेव्हा केव्हा [1][कलम ११७ खाली कार्यकारी दंडाधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाच्या बाबतीत जिल्हा दंडाधिकाऱ्याचे इतर कोणत्याही बाबतीत मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याचे] मत होईल तेव्हा, तो अशा व्यक्तीस विमुक्त करण्याचा आदेश देऊ शकेल.

(२) या प्रकरणाखाली जामीन देण्यास चुकल्याबद्दल जेव्हा केव्हा कोणत्याही व्यक्तीला तुरुंगात पाठवण्यात आले असेल तेव्हा, उच्च न्यायालयाला किंवा सत्र न्यायालयाला, किंवा जर अन्य कोणत्याही न्यायालयाने आदेश दिला असेल तर [1][कलम ११७ खाली कार्यकारी दंडाधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाच्या बाबतीत जिल्हा दंडाधिकाऱ्याला व इतर कोणत्याही बाबतीत मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याला] जामिनाची रक्कम किंवा जामीनदारांची संख्या किंवा जितक्या अवधीकरिता जामीन आवश्यक केलेला असेल तो अवधी, कमी करण्याचा आदेश काढता येईल.

(३) पोटकलम (१) खालील आदेशाद्वारे अशा व्यक्तींची बिनशर्त किंवा अशी व्यक्ती स्वीकारील अशा कोणत्याही शर्तींवर विमुक्ती करण्याचे निदेशित करता येईल :

परंतु, लादलेली कोणतीही शर्त ज्या कालावधीकरिता जामीन देण्याचा आदेश अशा व्यक्तीला देण्यात आला असेल तो संपताच अंमलात असण्याचे बंद होईल.

(४) कोणत्या शर्तींवर सशर्त विमुक्ती करता येईल ते राज्य शासनाला विहित करता येईल.

(५) ज्या शर्तीवर कोणत्याही व्यक्तीची विमुक्ती झालेली असेल अशी कोणतीही शर्त, [1][कलम ११७ खाली कार्यकारी दंडाधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाच्या बाबतीत जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या किंवा इतर कोणत्याही बाबतीत ज्याने विमुक्तीचा आदेश दिला त्या मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याच्या] किंवा त्याच्या उत्तराधिकाऱ्याच्या मते पूर्ण करण्यात आली नसेल तर, तो आदेश त्याला रद्द करता येईल.

(६) जेव्हा विमुक्तीचा सशर्त आदेश पोटकलम (५) खाली रद्द करण्यात येईल तेव्हा, अशा व्यक्तीला कोणताही पोलीस अधिकारी वॉरंटाशिवाय अटक करू शकेल आणि तदनंतर तिला [1][कार्यकारी दंडाधिकाऱ्याने कलम ११७ खाली दिलेल्या आदेशाच्या बाबतीत जिल्हा दंडाधिकाऱ्यापुढे किंवा इतर कोणत्याही बाबतीत मुख्य न्याय दंडाधिकाऱ्यापुढे] हजर केले जाईल.

(७) अशा व्यक्तीला प्रथमतः ज्या मुदतीकरिता तुरुंगात पाठवण्यात आले होते किंवा स्थानबद्ध करण्याचा आदेश देण्यात आला होता त्यापैकी न सरलेल्या भागाकरिता (असा कालभाग हा विमुक्तीच्या शर्तीच्या भंगाचा दिनांक व अशी सशर्त विमुक्ती झाली नसती तर ज्या दिनांकास बंधमुक्त होण्यास ती हक्कदार झाली असती त्यांच्यामधील कालावधीइतका मानण्यात येईल) तिने मूळ आदेशाच्या तरतुदींनुसार जामीन दिला नाही तर, [1][कार्यकारी दंडाधिकाऱ्याने कलम ११७ खाली दिलेल्या आदेशाच्या बाबतीत जिल्हा दंडाधिकारी व इतर कोणत्याही बाबतीत मुख्य न्याय दंडाधिकारी] तशा व्यक्तीला त्या मुदतीपैकी अशा न सरलेल्या भागाची शिक्षा भोगण्यासाठी तुरुंगात परत पाठवू शकेल.

(८) पोटकलम (७) खाली तुरुंगात परत पाठवलेल्या व्यक्तीने, असा आदेश काढणाऱ्या न्यायालयाला किंवा दंडाधिकाऱ्याला अथवा त्याच्या उत्तराधिकाऱ्याला पूर्वोक्त अशा न सरलेल्या भागाकरिता मूळ आदेशाच्या तरतुदींनुसार जामीन दिल्यावर केव्हाही कलम १२२ च्या उपबंधाच्या अधीनतेने तिला बंधमुक्त केले जाईल.

(९) या प्रकरणाखाली निष्पादित केलेले शांतता राखण्याबाबतचे किंवा चांगली वागणूक ठेवण्याबाबतचे कोणतेही बंधपत्र उच्च न्यायालयाला किंवा सत्र न्यायालयाला कोणत्याही वेळी, पुरेशी कारणे नमूद करून काढलेल्या आदेशाद्वारे रद्द करता येईल, आणि [1][कार्यकारी दंडाधिकाऱ्याने कलम ११७ खाली दिलेल्या आदेशाच्या बाबतीत जिल्हा दंडाधिकाऱ्यास व इतर कोणत्याही बाबतीत मुख्य न्याय दंडाधिकाऱ्यास] असे बंधपत्र जेव्हा त्याच्या आदेशान्वये किंवा त्याच्या जिल्ह्यातील अन्य कोणत्याही न्यायालयाच्या आदेशान्वये निष्पादित करण्यात आलेले असेल तेव्हा ते याप्रमाणे रद्द करता येईल.

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम १२ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

(१०) जो कोणी या प्रकरणाखाली बंधपत्र निष्पादित करण्याचा आदेश देण्यात आलेल्या अन्य व्यक्तीने शांततापूर्ण वर्तन ठेवण्यासाठी किंवा तिने चांगली वागणूक ठेवण्यासाठी जामीनदार असेल त्याला कोणत्याही वेळी, असा आदेश काढणाऱ्या न्यायालयाकडे बंधपत्र रद्द करण्यासाठी अर्ज करता येईल, आणि असा अर्ज करण्यात आल्यावर, ते न्यायालय ज्या व्यक्तीकरिता असा जामीनदार बांधलेला असेल त्या व्यक्तीला आपल्यासमोर उपस्थित होणे किंवा आणले जाणे आवश्यक करण्यासाठी त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे समन्स किंवा वॉरंट काढील.

१२४. (१) कलम १२१ च्या पोटकलम (३) च्या परंतुकाखाली किंवा कलम १२३ च्या पोटकलम (१०) खाली जिच्या उपस्थितीकरिता समन्स किंवा वॉरंट काढण्यात आले असेल ती व्यक्ती जेव्हा दंडाधिकाऱ्यासमोर किंवा न्यायालयासमोर उपस्थित होईल किंवा आणली जाईल तेव्हा, दंडाधिकारी किंवा न्यायालय अशा व्यक्तीने निष्पादित केलेले बंधपत्र रद्द करील आणि अशा बंधपत्राच्या मुदतीच्या न सरलेल्या भागाकरिता मूळ जामीनाच्या वर्णनाचाच नवीन जामीन देण्याचा अशा व्यक्तीला आदेश देईल. बंधपत्राच्या न सरलेल्या कालावधी-करिता जामीन.

(२) असा प्रत्येक आदेश कलमे १२० ते १२३ (दोन्ही धरून) यांच्या प्रयोजनार्थ कलम १०६ किंवा, प्रकरणपरत्वे, कलम ११७ खाली काढलेला आदेश असल्याचे मानले जाईल.

## प्रकरण नऊ

## पत्नी, अपत्ये आणि आईबाप यांच्या निर्वाहाकरता आदेश

१२५. (१) पुरेशी ऐपत असताना जर कोणत्याही व्यक्तीने— पत्नी, अपत्ये आणि आईबाप यांच्या निर्वाहाकरिता आदेश.

(क) स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ असलेल्या आपल्या पत्नीचा, अथवा

(ख) स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ असलेल्या आपल्या औरस किंवा अनौरस अज्ञान अपत्याचा—मग ते विवाहित असो वा अविवाहित असो, अथवा

(ग) तिचे सज्ञान झालेले औरस किंवा अनौरस अपत्य (विवाहित मुलगी नव्हे) कोणत्याही शारीरिक किंवा मानसिक अपसामान्यतेमुळे किंवा क्षतीमुळे स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ असेल तर, अशा अपत्याचा, अथवा

(घ) स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ असलेल्या आपल्या बापाचा किंवा आईचा निर्वाह करण्याबाबत उपेक्षा केली किंवा तो करण्यास नकार दिला तर, अशी उपेक्षा किंवा नकार शाबीत झाल्यावर प्रथम वर्ग दंडाधिकारी, अशा व्यक्तीने आपल्या पत्नीच्या अथवा अशा अपत्याच्या अथवा बापाच्या किंवा आईच्या निर्वाहाकरिता अशा दंडाधिकाऱ्याला योग्य वाटेल त्या, पण सर्व मिळून जास्तीत जास्त पाचशे रुपये एवढ्या मासिक दराने मासिक भत्ता द्यावा आणि दंडाधिकारी वेळोवेळी निदेशित करील त्याप्रमाणे तिने तो प्रदान करावा, असा त्याला आदेश देऊ शकेल :

परंतु, खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेली अज्ञान मुलगी विवाहित असल्यास, तिच्या पतीकडे पुरेशी ऐपत नाही अशी जर दंडाधिकाऱ्याची खात्री झाली तर, अशी अज्ञान मुलगी सज्ञान होईपर्यंत तिच्या बापाने तिला असा भत्ता द्यावा असा आदेश दंडाधिकारी देऊ शकेल.

स्पष्टीकरण.—या प्रकरणाच्या प्रयोजनांसाठी,—

(क) "अज्ञान" याचा अर्थ, जी व्यक्ती 'भारतीय सज्ञानता अधिनियम १८७५' (१८७५ चा ९) याच्या उपबंधाखाली सज्ञान झालेली नसल्याचे मानले जाते ती व्यक्ती, असा आहे ;

(ख) "पत्नी" या संज्ञेत, जिला आपल्या पतीने घटस्फोट दिलेला असून किंवा जिने त्याच्यापासून घटस्फोट मिळविलेला असून पुनर्विवाह केलेला नाही अशा स्त्रीचा समावेश आहे.

(२) असा भत्ता आदेशाच्या दिनांकापासून किंवा तसा आदेश दिला गेल्यास, निर्वाहाकरिता केलेल्या अर्जाच्या दिनांकापासून प्रदेय असेल.

(३) जर याप्रमाणे आदेश देण्यात आलेली कोणतीही व्यक्ती पुरेसे कारण नसताना आदेशाचे अनुपालन करण्यास चुकली तर, असा कोणताही दंडाधिकारी, आदेशाच्या प्रत्येक भंगाबद्दल देय असलेली रक्कम वसूल करण्यासाठी, द्रव्यदंड वसूल करण्याच्या बाबतीत उपबंधित केलेल्या रीतीने वॉरंट काढू शकेल, आणि वॉरंटाच्या अंमलबजावणीनंतर प्रत्येक महिन्याचा संपूर्ण भत्ता किंवा तिचा कोणताही भाग द्यावयाचा राहिल्यास त्याबद्दल एक महिन्यापर्यंत किंवा तत्पूर्वी भरणा झाल्यास, तो होईपर्यंत अशा व्यक्तीला कारावासाची शिक्षा देऊ शकेल :

परंतु, या कलमाखाली देय असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी, ती ज्या दिनांकास देय झाली त्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत अशी रक्कम वसूल करण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करण्यात आल्या-शिवाय कोणतेही वॉरंट काढण्यात येणार नाही :

परंतु, आणखी असे की, आपल्या पत्नीने आपल्याबरोबर राहावे या शर्तीवर तिचा निर्वाह करण्याची तयारी अशा व्यक्तीने दाखवली आणि तिने त्या व्यक्तीबरोबर राहण्यास नकार दिला तर, अशा दंडाधिकाऱ्याला, तिने दिलेली नकाराची कोणतीही कारणे विचारात घेता येतील, आणि अशी तयारी असली तरीही या कलमाखाली आदेश काढण्यास न्याय्य कारण आहे अशी त्याची खात्री झाली तर, त्याला तसे करता येईल.

स्पष्टीकरण.—जर पतीने अन्य स्त्रीशी विवाह केला असेल किंवा रखेली ठेवली असेल तर, त्याच्या पत्नीने त्याच्याबरोबर राहण्यास नकार देण्यास ते न्याय्य कारण आहे असे मानले जाईल.

(४) कोणतीही विवाहित स्त्री परगमनी जीवन जगत असेल किंवा कोणतेही पुरेसे कारण नसताना ती आपल्या पतीबरोबर राहण्यास नकार देत असेल किंवा ते परस्परसंमतीने विभक्त राहत असतील तर, या कलमाखाली आपल्या पतीकडून भत्ता मिळण्यास ती हक्कदार असणार नाही.

(५) जिच्या बाजूने या कलमाखाली आदेश देण्यात आला असेल अशी कोणतीही विवाहित स्त्री परगमनी जीवन जगत आहे किंवा आपल्या पतीबरोबर राहण्यास ती पुरेसे कारण नसताना नकार देत आहे, किंवा ते परस्पर संमतीने विभक्त राहत आहेत हे शाबीत झाल्यावर दंडाधिकारी आदेश रद्द करील.

कार्यपद्धती. १२६. (१) कलम १२५ खालील कार्यवाही कोणत्याही व्यक्तीविरुद्ध,—

(क) ती व्यक्ती जेथे असेल, किंवा

(ख) जेथे ती व्यक्ती किंवा त्या व्यक्तीची पत्नी राहत असेल, किंवा

(ग) जेथे ती व्यक्ती आपल्या पत्नीबरोबर, किंवा प्रकरणपरत्वे, अनौरस अपत्याच्या आईबरोबर निकटपूर्वी राहिली असेल,

अशा कोणत्याही जिल्ह्यात करता येईल.

(२) अशा कार्यवाहीतील सर्व पुरावा, निर्वाह-खर्च देण्याचा आदेश ज्या व्यक्तीविरुद्ध देण्याची सूचना असेल तिच्या समक्ष अथवा तिची जातीनिशी हजेरी अनावश्यक करण्यात आली असेल तर तिच्या वकिलाच्या समक्ष घेतला जाईल, आणि तो समन्स-खटल्यासाठी विहित केलेल्या रीतीने नोंदला जाईल:

परंतु, निर्वाह-खर्च देण्याचा आदेश ज्या व्यक्तीविरुद्ध देण्याची सूचना असेल ती व्यक्ती बजावणी बुद्धिपुरस्सर टाळत आहे, किंवा न्यायालयात हजर राहण्याबाबत बुद्धिपुरस्सर दुर्लक्ष करीत आहे अशी दंडाधिकाऱ्याची खात्री झाली तर, दंडाधिकाऱ्याला एकतर्फी सुनावणी व निर्णय करण्याची कार्यवाही करता येईल आणि याप्रमाणे देण्यात आलेला कोणताही आदेश, त्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत करण्यात आलेल्या अर्जावरून दंडाधिकाऱ्याला सबळ कारण दाखविण्यात आल्यावर विरुद्ध पक्षकाराला वादखर्च देण्याबाबतच्या अटी धरून, न्याय्य व उचित वाटतील अशा अटींच्या अधीनतेने रद्द ठरविता येईल.

(३) कलम १२५ खालील अर्जाचे काम पाहताना, न्यायालयाला खर्चाबाबत न्याय्य असेल असा आदेश देण्याची शक्ती असेल.

भत्ता कमीअधिक करणे. १२७. (१) कलम १२५ खाली मासिक भत्ता मिळणाऱ्या किंवा त्याच कलमाखाली प्रकरणपरत्वे आपल्या पत्नीला, अपत्याला, बापाला किंवा आईला मासिक भत्ता देण्याचे आदेश मिळालेल्या कोणत्याही व्यक्तीच्या परिस्थितीत बदल झाल्याचे शाबीत झाल्यावर दंडाधिकाऱ्याला स्वत:ला योग्य वाटेल त्याप्रमाणे भत्ता कमीअधिक करता येईल :

परंतु, जर त्याने भत्ता वाढविला तर, त्याचा मासिक दर सगळा मिळून पाचशे रुपयांहून अधिक असणार नाही.

(२) जेथे सक्षम दिवाणी न्यायालयाच्या कोणत्याही निर्णयाचा परिणाम म्हणून, कलम १२५ खाली केलेला कोणताही आदेश रद्द करावा किंवा त्यात बदल करावा असे दंडाधिकाऱ्याला वाटेल तेथे, तद्नुसार त्याला आदेश रद्द करता येईल किंवा, प्रकरणपरत्वे, त्यात बदल करता येईल.

(३) ज्या स्त्रीला आपल्या पतीने घटस्फोट दिला आहे किंवा जिने त्याच्यापासून घटस्फोट मिळविला आहे तिच्या बाजूने कलम १२५ खाली कोणताही आदेश काढण्यात आला असेल तेव्हा, जर दंडाधिकाऱ्याची अशी खात्री झाली की,—

(क) अशा घटस्फोटाच्या दिनांकानंतर त्या स्त्रीने पुन्हा विवाह केला आहे, तर तो तिच्या पुनर्विवाहाच्या दिनांकी व तेव्हापासून असा आदेश रद्द करील;

(ख) त्या स्त्रीला तिच्या पतीने घटस्फोट दिला असून, त्या पक्षकारांना लागू असलेल्या रुढीप्राप्त किंवा व्यक्तिविषयक कायद्याअन्वये अशा घटस्फोटानंतर प्रदेय होणारी संपूर्ण रक्कम तिला मिळालेली आहे—मग ती सदर आदेशापूर्वी असो वा नंतर असो—तर तो—

(एक) असा आदेश काढण्यापूर्वी अशी रक्कम दिलेली असल्यास त्या बाबतीत, असा आदेश काढल्याच्या दिनांकापासून,

(दोन) अन्य कोणत्याही बाबतीत, पतीने त्या स्त्रीला प्रत्यक्षात काही काळापुरता निर्वाहखर्च दिला असल्यास तो कालावधी संपल्याच्या दिनांकापासून,

असा आदेश रद्द करील;

(ग) त्या स्त्रीने पतीपासून घटस्फोट मिळवला असून, आपल्या घटस्फोटानंतरच्या निर्वाहासंबंधीचे आपले हक्क तिने स्वेच्छेने सोडून दिले आहेत, तर आदेशाच्या दिनांकापासून तो रद्द करील.

(४) कलम १२५ खाली ज्या व्यक्तीला मासिक भत्ता दिला जाण्याचा आदेश काढण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीने कोणताही निर्वाह-खर्च किंवा हुंडा वसूल करावा यासाठी कोणताही हुकूमनामा करताना, दिवाणी न्यायालय, जी रक्कम उक्त आदेशाला अनुसरून अशा व्यक्तीला देण्यात आलेली असेल तिने वसूल केलेली असेल ती हिशेबात घेईल.

**निर्वाह-खर्चाच्या आदेशाची अंमलबजावणी.**

**१२८.** निर्वाह-खर्चाच्या आदेशाची एक प्रत जिच्या बाजूने तो आदेश काढण्यात आला त्या व्यक्तीला किंवा तिचा कोणी पालक असल्यास त्याला किंवा ज्या व्यक्तीला भत्ता द्यावयाचा तिला विनाशुल्क दिली जाईल; कोणताही दंडाधिकारी ज्या व्यक्तीविरुद्ध तो आदेश देण्यात आला ती जेथे असेल अशा कोणत्याही स्थळी, अशा दंडाधिकाऱ्याला पक्षांची ओळख पटल्यावर व देय भत्ता दिलेला नसल्याची खात्री झाल्यावर अशा आदेशाची अंमलबजावणी करू शकेल.

## प्रकरण दहा

## सार्वजनिक सुव्यवस्था व प्रशांतता राखणे

### क-बेकायदेशीर जमाव

**मुलकी बळाचा वापर करून जमाव पांगवणे.**

**१२९.** (१) कोणताही कार्यकारी दंडाधिकारी किंवा पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकारी, किंवा अशा अंमलदार अधिकाऱ्याच्या अनुपस्थितीत उप निरीक्षकाहून खालच्या दर्जाचा नसलेला कोणताही पोलीस अधिकारी कोणत्याही बेकायदेशीर जमावाला किंवा जिच्यामुळे सार्वजनिक शांततेचा भंग घडून येण्याचा संभव आहे अशा पाच किंवा अधिक व्यक्तींच्या जमावाला पांगण्याचा हुकूम देऊ शकेल; आणि तद्नुसार पांगणे हे अशा जमावातील व्यक्तींचे तद्नंतरचे कर्तव्य असेल.

(२) जर याप्रमाणे हुकूम झाला असताना असा कोणताही जमाव पांगला नाही किंवा याप्रमाणे हुकूम झाला नसताना, जेणेकरून न पांगण्याचा निर्धार दिसून येतो असे त्याचे वर्तन असेल तर, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कार्यकारी दंडाधिकाऱ्याला किंवा पोलीस अधिकाऱ्याला बळाने असा जमाव पांगविण्याचे काम सुरू करता येईल, आणि असा जमाव पांगवण्यासाठी व जरुर तर, त्यातील घटक-व्यक्तींना, अशा जमावाची पांगापांग व्हावी किंवा त्यांना कायद्यानुसार शिक्षा व्हावी यासाठी अटक करुन बंदिवासात ठेवण्यासाठी सशस्त्र सेनादलाचा अधिकारी किंवा सदस्य नसलेल्या व त्या नात्याने कार्य करत नसलेल्या कोणत्याही पुरुषाचे सहाय्य अधिकारपूर्वक मागता येईल.

**जमाव पांगवण्यासाठी सशस्त्र सेनादलाचा वापर.**

**१३०.** (१) जर असा कोणताही जमाव अन्यथा पांगवणे शक्य नसेल आणि तो पांगला जावा हे सार्वजनिक सुरक्षेसाठी जरुरीचे असेल तर, सर्वात वरिष्ठ दर्जाचा जो कार्यकारी दंडाधिकारी उपस्थित असेल तो सशस्त्र सेनादलांकरवी त्या जमावास पांगवू शकेल.

(२) असा दंडाधिकारी सशस्त्र सेनादलांतील व्यक्तींच्या कोणत्याही गटावर हुकूमत असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला आपल्या हुकूमतीखालील सशस्त्र सेनादलाच्या मदतीने तो जमाव पांगवण्यास, आणि त्यातील ज्या घटक-व्यक्ती दंडाधिकारी निदेशित करील अथवा जमावाची पांगापांग व्हावी किंवा त्यांना कायद्यानुसार शिक्षा व्हावी यासाठी ज्यांना, अटक करून बंदिवासात ठेवणे जरुरीचे असेल अशा व्यक्तींना अटक करून बंदिवासात ठेवण्यास फर्मावू शकेल.

(३) सशस्त्र सेनादलाचा असा प्रत्येक अधिकारी त्याला योग्य वाटेल अशारीतीने अशा फर्मानाचे पालन करील, पण तसे करताना तो जमाव पांगवण्यासाठी आणि अशा व्यक्तींना अटक करून स्थानबद्ध करण्यासाठी योग्य तितकेच किमान बळ वापरील व कोणाच्याही शरीराला किंवा संपत्तीला योग्य तितकीच किमान क्षती पोचवील.

**जमाव पांगवण्याची सशस्त्र सेनादलाच्या विवक्षित अधिकाऱ्यांची शक्ती.**

**१३१.** जेव्हा अशा कोणत्याही जमावामुळे सार्वजनिक सुरक्षा उघड उघड धोक्यात आली असेल आणि कोणत्याही कार्यकारी दंडाधिकाऱ्याशी संपर्क साधणे शक्य नसेल तेव्हा, सशस्त्र सेनादलाचा कोणताही राजादिष्ट किंवा राजपत्रित अधिकारी अशा जमावास आपल्या हुकूमतीखालील सशस्त्र सेनादलाच्या मदतीने पांगवू शकेल आणि त्यातील घटक-व्यक्तींना, अशा जमावाची पांगापांग व्हावी यासाठी किंवा त्यांना कायद्यानुसार शिक्षा व्हावी यासाठी अटक करून बंदिवासात ठेवू शकेल; पण जर या कलमाखाली तो कार्य करत असताना कार्यकारी दंडाधिकाऱ्याशी संपर्क साधणे त्याला शक्य असेल तर, तो तसे करील आणि त्यानंतर पुढे आपण अशी कारवाई चालू ठेवावी किंवा नाही याबाबत दंडाधिकाऱ्याने दिलेल्या अनुदेशांचे पालन करील.

**मागील कलमांखाली केलेल्या कृतींबद्दल खटला भरला जाण्यापासून संरक्षण.**

**१३२.** (१) कलम १२९, कलम १३०, किंवा कलम १३१ खाली केलेल्या कोणत्याही कृतीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध,—

(क) जेथे अशी व्यक्ती ही सशस्त्र सेनादलातील अधिकारी किंवा सदस्य असेल तेथे, केंद्र शासनाच्या मंजुरीखेरीज;

(ख) अन्य कोणत्याही प्रकरणी राज्य शासनाच्या मंजुरीखेरीज;

कोणत्याही फौजदारी न्यायालयात कोणताही खटला भरला जाणार नाही.

(२) (क) कोणताही कार्यकारी दंडाधिकारी किंवा पोलीस अधिकारी, उक्त कलमांपैकी कोणत्याही कलमाखाली सद्भावपूर्वक कार्य करत असताना त्याने;

(ख) कोणतीही व्यक्ती कलम १२९ किंवा कलम १३० खालील फर्मानाच्या अनुपालनार्थ सद्भावपूर्वक कोणतीही कृती करत असताना त्या व्यक्तीने;

(ग) सशस्त्र सेनादलाचा कोणताही अधिकारी कलम १३१ खाली सद्भावपूर्वक कार्य करत असताना त्याने ;

(घ) सशस्त्र सेनादलाचा कोणताही सदस्य, तो ज्या आदेशाचे पालन करण्यास बांधलेला असेल त्याच्या पालनार्थ कोणतीही कृती करत असताना त्याने;

त्यामुळे अपराध केला असल्याचे मानले जाणार नाही.

(३) या कलमात आणि या प्रकरणातील पूर्ववर्ती कलमांमध्ये,—

(क) "सशस्त्र सेनादले" या शब्दप्रयोगाचा अर्थ, स्थलसेना म्हणून कार्य करणारी भूसैनिकी नौसैनिकी, वायुसैनिकी दले, असा आहे आणि याप्रमाणे कार्य करणारी संघराज्याची अन्य कोणतीही दले त्या संज्ञेत समाविष्ट आहेत;

(ख) "अधिकारी" याचा सशस्त्र सेनादलाच्या संबंधातील अर्थ, सशस्त्र सेनादलाचा अधिकारी म्हणून राजादिष्ट किंवा राजपत्रित झालेली किंवा त्या नात्याने नोकरीत असलेली व्यक्ती, असा आहे आणि कनिष्ठ राजादिष्ट अधिकारी, अधिपत्र अधिकारी, पेटी ऑफिसर, अराजादिष्ट अधिकारी व अराजपत्रित अधिकारी यांचा त्या संज्ञेत समावेश आहे;

(ग) "सदस्य" याचा सशस्त्र सेनादलांच्या संबंधातील अर्थ, सशस्त्र सेनादलांत असलेली अधिकाऱ्यांहून अन्य व्यक्ती, असा आहे.

## ख—सार्वजनिक उपद्रव

सार्वजनिक उपद्रव दूर करण्यासाठी सशर्त आदेश.

१३३. (१) जेव्हाकेव्हा जिल्हा दंडाधिकाऱ्याला किंवा उप विभागीय दंडाधिकाऱ्याला किंवा राज्य शासनाने यासंबंधात खास शक्ती प्रदान केलेल्या अन्य कोणत्याही कार्यकारी दंडाधिकाऱ्याला, पोलीस अधिकाऱ्याचा अहवाल किंवा अन्य खबर मिळाल्यावर आणि त्याला योग्य वाटेल असा कोणताही पुरावा (असल्यास) घेतल्यावर असे वाटेल की,—

(क) कोणत्याही सार्वजनिक स्थळातून अथवा लोक ज्याचा कायदेशीरपणे वापर करतात किंवा करू शकतील अशा कोणत्याही रस्त्यातून, नदीतून किंवा जलमार्गातून कोणताही बेकायदेशीर अडथळा किंवा उपद्रव दूर करावयास हवा; किंवा

(ख) एखादा उदीम किंवा व्यवसाय चालवणे अथवा एखादा माल किंवा व्यापारी माल ठेवणे हे समाजाच्या आरोग्याला किंवा शरीरस्वास्थ्याला अपायकारक आहे आणि परिणामी, असा उदीम किंवा व्यवसाय याला मनाई करावयास हवी अथवा असा माल किंवा व्यापारी माल हलवावयास हवा अथवा तो ठेवण्याबाबत नियंत्रण घालावयास हवे; किंवा

(ग) ज्यामुळे आगडोंब उसळण्याचा किंवा स्फोट होण्याचा संभव आहे असे कोणत्याही इमारतीचे बांधकाम करण्यास किंवा तशाप्रकारे कोणत्याही पदार्थाची विल्हेवाट करण्यास प्रतिबंध करावयास हवा किंवा ते थांबवावयास हवे; किंवा

(घ) कोणतीही इमारत, तंबू किंवा बांधकाम अथवा कोणतेही झाड, ते पडण्याचा आणि आसपास राहणाऱ्या किंवा धंदा करणाऱ्या अगर तेथून ये-जा करणाऱ्या व्यक्तींना त्यामुळे इजा पोचण्याचा संभव आहे इतक्या अवस्थेत असून, परिणामी, अशी इमारत, तंबू किंवा बांधकाम हलवणे, दुरुस्त करणे किंवा त्याला आधार देणे अथवा असे झाड हलवणे किंवा त्याला आधार देणे जरुरीचे आहे; किंवा

(ङ) अशा कोणत्याही रस्त्यालगत किंवा सार्वजनिक स्थळालगत असलेला कोणताही तलाव, विहीर किंवा खोदकाम यामुळे लोकांस उद्भवणारा धोका टळेल अशा रीतीने त्याला कुंपण घालावयास हवे; किंवा

(च) कोणतेही धोकादायक जनावर नष्ट करावयास हवे, कोंडून ठेवावयास हवे किंवा त्याची अन्यप्रकारे विल्हेवाट लावावयास हवी;

तेव्हा असा दंडाधिकारी असा अडथळा किंवा उपद्रव करणाऱ्या, अथवा असा उदीम किंवा व्यवसाय करणाऱ्या, अथवा असा कोणताही माल किंवा व्यापारी माल ठेवणाऱ्या अथवा अशी इमारत, तंबू, बांधकाम, पदार्थ, तलाव, विहीर किंवा खोदकाम यांवर मालकी असणाऱ्या, मालकी-कब्जा असणाऱ्या किंवा त्यांचे नियंत्रण करणाऱ्या अथवा असे जनावर किंवा झाड यांवर मालकी किंवा मालकी-कब्जा असणाऱ्या व्यक्तीला सशर्त आदेश देऊन, आदेशात निश्चित केलेल्या मुदतीत,—

(एक) असा अडथळा किंवा उपद्रव दूर करण्यास; किंवा

(दोन) असा उदीम किंवा व्यवसाय करण्याचे थांबवण्यास किंवा निदेशित करण्यात येईल अशा रीतीने तो दूर हलवण्यास किंवा विनियमित करण्यास, अथवा असा माल किंवा व्यापारी माल हलवण्यास, अथवा तो ठेवण्याबाबत निदेशित करण्यात येईल त्या रीतीने विनियमन करण्यास; किंवा

(तीन) अशा इमारतीच्या बांधकामास प्रतिबंध करण्यास किंवा ते थांबवण्यास, अथवा अशा पदार्थाच्या विल्हेवाटीच्या प्रकारात फेरबदल करण्यास; किंवा

(चार) अशी इमारत, तंबू किंवा बांधकाम हलवण्यास, दुरुस्त करण्यास किंवा त्याला आधार देण्यास अथवा अशी झाडे हलवण्यास किंवा त्यांना आधार देण्यास; किंवा

(पाच) अशा तलावाला, विहिरीला किंवा खोदकामाला कुंपण घालण्यास; किंवा

(सहा) उक्त आदेशात उपबंधित केलेल्या रीतीने असे धोकादायक जनावर नष्ट करण्यास, त्याला कोंडून ठेवण्यास किंवा त्याची विल्हेवाट लावण्यास,

अथवा तिने तसे करण्यास हरकत घेतली तर आदेशाद्वारे निश्चित केलेल्या वेळी व स्थळी आपल्यासमोर किंवा आपल्याला दुय्यम असलेल्या अन्य एखाद्या कार्यकारी दंडाधिकाऱ्यासमोर उपस्थित होण्यास आणि तो आदेश कायम का करू याचे यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने कारण दाखवण्यास, फर्मावू शकेल.

(२) या कलमाखाली दंडाधिकाऱ्याने रीतसर दिलेला कोणताही आदेश कोणत्याही दिवाणी न्यायालयात प्रश्नास्पद करता येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—"सार्वजनिक स्थळ" या संज्ञेत राज्याच्या मालकीची संपत्ती, शिबिराच्या जागा आणि आरोग्यविषयक किंवा विहारविषयक प्रयोजनांकरता मोकळ्या ठेवलेल्या जागा यांचाही समावेश आहे.

**आदेशाची बजावणी किंवा अधिसूचना.**

**१३४.** (१) तो आदेश, तसे करणे शक्य असल्यास, ज्या व्यक्तीविरुद्ध तो देण्यात आला तिच्यावर, समन्सच्या बजावणीकरता यात उपबंधित केलेल्या रीतीने बजावला जाईल.

(२) असा आदेश याप्रमाणे बजावणे शक्य नसल्यास तो, राज्य शासन नियमांद्वारे निदेशित करील अशा रीतीने प्रकाशित केलेल्या उद्घोषणेद्वारे अधिसूचित केला जाईल, आणि अशा व्यक्तीला माहिती कळवण्यासाठी सर्वात योग्य असेल अशा एखाद्या स्थळी किंवा अनेक स्थळी त्याची एकेक प्रत चिकटवली जाईल.

**आदेश ज्या व्यक्तीला उद्देशून असेल तिने त्याचे पालन करणे किंवा कारण दाखवणे.**

**१३५.** ज्या व्यक्तीविरुद्ध असा आदेश काढण्यात आला असेल त्या व्यक्तीला—

(क) आदेशाद्वारे निर्देशित केलेली कृती त्यात विनिर्दिष्ट केलेल्या अवधीत व त्या रीतीने करावी लागेल; किंवा

(ख) अशा आदेशाला अनुसरून उपस्थित व्हावे लागेल व त्या आदेशाविरुद्ध कारण दाखवावे लागेल.

**तसे करण्यास ती चुकल्याचे परिणाम.**

**१३६.** जर अशा व्यक्तीने अशी कृती केली नाही किंवा उपस्थित होऊन कारण दाखवले नाही तर, ती 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यातील कलम १८८ खाली त्यासंबंधात विहित केलेल्या शिक्षेला पात्र होईल आणि आदेश कायम केला जाईल.

**सार्वजनिक हक्काचे, अस्तित्व नाकबूल केले गेल्यास त्या बाबतीतील कार्यपद्धती.**

**१३७.** (१) कोणत्याही रस्त्याचा, नदीचा, जलमार्गाचा किंवा स्थळाचा वापर करताना लोकांना होणारा अडथळा, उपद्रव किंवा धोका टाळण्याच्या प्रयोजनार्थ कलम १३३ खाली आदेश काढण्यात आला असेल तेव्हा, दंडाधिकारी, ज्या व्यक्तीविरुद्ध आदेश देण्यात आला ती त्याच्यासमोर उपस्थित झाल्यावर, तो रस्ता, नदी, जलमार्ग किंवा ते स्थळ यांच्याबाबत कोणत्याही सार्वजनिक हक्काचे अस्तित्व तिला नाकबूल आहे काय असा तिला प्रश्न करील, आणि तिने तसे नाकबूल केले तर, दंडाधिकारी, कलम १३८ खाली कार्यवाही करण्याआधी त्या बाबीसंबंधी चौकशी करील.

(२) अशा नाकबुलीच्या पुष्टयर्थ कोणताही विश्वसनीय पुरावा आहे, असे जर अशा चौकशीअन्ती दंडाधिकाऱ्याला आढळून आले तर, तो, सक्षम न्यायालयाकडून अशा हक्काच्या अस्तित्वाची बाब निर्णीत होईपर्यंत कार्यवाही स्थगित करील; आणि असा कोणताही पुरावा नाही असे त्याला आढळून आले तर, कलम १३८ मध्ये नेमून दिल्यानुसार ती कार्यवाही करील.

(३) पोटकलम (१) खाली दंडाधिकाऱ्याने प्रश्न विचारल्यावर ज्या व्यक्तीने त्यात निर्दिष्ट केलेल्या स्वरूपाच्या सार्वजनिक हक्काचे अस्तित्व नाकबूल करण्यात कसूर केली असेल किंवा याप्रमाणे नाकबुली दिली असता ज्या व्यक्तीने तिच्या पुष्टयर्थ विश्वसनीय पुरावा दाखल केला नसेल तिला, नंतरच्या कार्यवाहीत अशी कोणतीही नाकबुली देण्यास परवानगी दिली जाणार नाही.

**ती व्यक्ती कारण दाखवण्यासाठी उपस्थित होईल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.**

**१३८.** (१) कलम १३३ खाली ज्या व्यक्तीविरुद्ध आदेश देण्यात आला असेल तिने उपस्थित होऊन आदेशाविरुद्ध कारण दाखवले तर, दंडाधिकारी समन्स-खटल्यात घेतला जातो त्याप्रमाणे या बाबतीत साक्षीपुरावा घेईल.

(२) तो आदेश मुळात जसा केला होता तसा किंवा आपणास जरूर वाटेल असा त्यात बदल केल्यास तो वाजवी व योग्य होईल, याबाबत जर दंडाधिकाऱ्याचे समाधान झाले तर, तो आदेश बदलाशिवाय किंवा, प्रकरणपरत्वे, अशा बदलासह कायम केला जाईल.

(३) जर दंडाधिकाऱ्याचे याप्रमाणे समाधान झाले नाही तर, त्या प्रकरणात पुढील कार्यवाही केली जाणार नाही.

**स्थानिक अन्वेषणासाठी व तज्ज्ञाची साक्षतपासणी करण्यासाठी निदेश देण्याची दंडाधिकाऱ्याची शक्ती.**

**१३९.** कलम १३७ किंवा कलम १३८ खालील चौकशीच्या प्रयोजनांसाठी, दंडाधिकारी—

(क) स्थानिक अन्वेषण, त्याला योग्य वाटेल अशा व्यक्तीने करावे असा निदेश देऊ शकेल; किंवा

(ख) तज्ज्ञाला समन्स पाठवून त्याची साक्षतपासणी करू शकेल.

**लेखी अनुदेश देणे, इत्यादींची दंडाधिकाऱ्याची शक्ती.** १४०. (१) जेव्हा कलम १३९ खाली एखाद्या व्यक्तीने स्थानिक अन्वेषण करावे असे दंडाधिकारी निदेशित करील तेव्हा, दंडाधिकारी,—

(क) अशा व्यक्तीला तिच्या मार्गदर्शनासाठी जरुरीचे वाटतील असे लेखी अनुदेश देऊ शकेल;

(ख) स्थानिक अन्वेषणाचा जरूर तो संपूर्ण खर्च किंवा त्याचा कोणताही भाग कोणी द्यावा ते घोषित करू शकेल.

(२) अशा व्यक्तीचा अहवाल हा या प्रकरणात पुरावा म्हणून वाचता येईल.

(३) दंडाधिकारी कलम १३९ खाली समन्स पाठवून तज्ञाची साक्षतपासणी करील त्या बाबतीत, दंडाधिकारी, असा समन्स पाठवण्याचा आणि साक्षतपासणीचा खर्च कोणी द्यावा ते निदेशित करू शकेल.

**आदेश कायम करण्यात आल्यावरची कार्यपद्धती आणि अवज्ञेचे परिणाम.** १४१. (१) जेव्हा कलम १३६ किंवा कलम १३८ खाली आदेश कायम करण्यात आलेला असेल तेव्हा, दंडाधिकारी ज्या व्यक्तीविरुद्ध आदेश काढण्यात आला तिला त्याची नोटीस देईल, आणि तसेच आदेशाद्वारे निदेशित केलेली कृती नोटिशीत निश्चित केलेल्या अवधीत करण्यास तिला फर्मावील, आणि अवज्ञा झाल्यास 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यातील कलम १८८ द्वारे उपबंधित केलेल्या शिक्षेस ती पात्र होईल असे तिला कळवील.

(२) जर अशी कृती निश्चित केलेल्या अवधीत करण्यात आली नाही तर, दंडाधिकाऱ्याला ती करवून घेता येईल आणि ती करण्याचा खर्च, त्याच्या आदेशानुसार हलवण्यात आलेल्या कोणत्या इमारतीच्या, मालाच्या किंवा अन्य संपत्तीच्या विक्रीद्वारे, अथवा अशा दंडाधिकाऱ्याच्या स्थानिक अधिकारितेच्या आत किंवा बाहेर अशा व्यक्तीची अन्य कोणतीही जंगम संपत्ती असल्यास तिला अटकावणी लावून व ती विकून वसूल करता येईल, आणि जर अशी अन्य संपत्ती अशा अधिकारितेबाहेर असेल तर, जप्त करावयाची संपत्ती ज्याच्या स्थानिक अधिकारितेत असल्याचे आढळून येईल, त्या दंडाधिकाऱ्याने तो आदेश पृष्ठांकित केल्यावर, ती संपत्ती जप्त करून विकणे हे त्याद्वारे प्राधिकृत होईल.

(३) या कलमाखाली सद्भावपूर्वक करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीबाबत कोणताही दावा लावता येणार नाही.

**चौकशी होईतोवर मनाई हुकूम.** १४२. (१) कलम १३३ खाली आदेश काढणाऱ्या दंडाधिकाऱ्याला जर, लोकांना पोचू शकणारे निकटवर्ती संकट किंवा गंभीर स्वरूपाची क्षती टाळण्यासाठी तात्काळ उपाययोजना केली पाहिजे असे वाटले तर, ज्या व्यक्तीविरुद्ध आदेश काढण्यात आला तिला, त्या बाबीचा निर्णय होईतोवर, असे संकट किंवा क्षती निवारण्यासाठी किंवा टाळण्यासाठी आवश्यक असेल असा मनाई हुकूम दंडाधिकारी काढू शकेल.

(२) अशा व्यक्तीने अशा मनाई हुकूमाचे तात्काळ पालन करण्यात कसूर केल्यास, दंडाधिकाऱ्याला असे संकट निवारण्यासाठी किंवा अशी क्षती टाळण्यासाठी स्वतःला योग्य वाटेल अशा मार्गाचा अवलंब करता येईल किंवा करवता येईल.

(३) या कलमाखाली सद्भावपूर्वक करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीबाबत दावा लावता येणार नाही.

**सार्वजनिक उपद्रव पुन्हा करण्यास किंवा तो चालू ठेवण्यास दंडाधिकारी मनाई आदेश करू शकेल.** १४३. जिल्हा दंडाधिकारी किंवा उप-विभागीय दंडाधिकारी अथवा राज्य शासनाने किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याने या संबंधात शक्ती प्रदान केलेला अन्य कोणताही कार्यकारी दंडाधिकारी कोणत्याही व्यक्तीला 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यात अगर अन्य कोणत्याही विशेष किंवा स्थानिक कायद्यात जशी व्याख्या केली आहे तसा सार्वजनिक उपद्रव पुन्हा न करण्याचा किंवा तो चालू न ठेवण्याचा मनाई आदेश देऊ शकेल.

### ग—उपद्रवाची किंवा आशंकित संकटाची तातडीची प्रकरणे

**उपद्रवाच्या किंवा आशंकित संकटाच्या अशा तातडीच्या प्रकरणांत आदेश काढण्याची शक्ती.** १४४. (१) जेथे जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या, उप-विभागीय दंडाधिकाऱ्याच्या किंवा राज्य शासनाने या संबंधात खास अधिकार प्रदान केलेल्या अन्य कोणत्याही कार्यकारी दंडाधिकाऱ्याच्या मते, या कलमाखाली कार्यवाही करण्यास पुरेसे कारण असेल आणि तात्काळ प्रतिबंध करणे किंवा सत्वर उपाययोजना इष्ट असेल त्या प्रकरणी, एखाद्या व्यक्तीला विवक्षित कृती करण्यापासून परावृत्त राहण्याचा अथवा तिच्या कब्जातील किंवा तिच्या व्यवस्थापनाखालील विवक्षित संपत्तीबाबत विवक्षित बंदोबस्त करण्याचा निदेश दिल्यास कायदेशीरपणे नेमलेल्या व्यक्तीस अडथळा, त्रास किंवा क्षती पोचण्यास अथवा मानवी जीविताला, आरोग्याला किंवा सुरक्षिततेला संकट उत्पन्न होण्यास अथवा सार्वजनिक प्रशांतता बिघडण्यास अथवा दंग्यास किंवा दंगलीस त्यामुळे प्रतिबंध होण्याचा संभव आहे किंवा प्रतिबंध होण्याला ते उपकारक आहे, असे अशा दंडाधिकाऱ्याला वाटले तर, असा दंडाधिकारी त्या प्रकरणाच्या महत्त्वाच्या तथ्यांचे निवेदन अंतर्भूत असलेला एक लेखी आदेश काढून व कलम १३४ मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने तो बजावून त्याद्वारे तसा निदेश देऊ शकेल.

(२) आणीबाणीच्या प्रसंगी किंवा जिच्याविरुद्ध आदेश काढलेला असेल त्या व्यक्तीवर योग्य अवधीत नोटीस बजावणे परिस्थितीमुळे शक्य नसेल अशा प्रकरणांत, या कलमाखालील आदेश एकतर्फी देता येईल.

(३) या कलमाखालील आदेश विशिष्ट व्यक्तीला, अथवा विशिष्ट स्थळी किंवा क्षेत्रात राहणाऱ्या व्यक्तींना, अथवा एखाद्या विशिष्ट स्थळी किंवा क्षेत्रात राबता असणाऱ्या किंवा तेथे प्रसंगवशात् येणाऱ्या सर्वसाधारण जनतेला उद्देशून काढता येईल.

(४) या कलमाखालील कोणताही आदेश तो काढण्यात आल्यापासून दोन महिन्यांहून अधिक काळ अंमलात राहणार नाही :

परंतु, मानवी जीविताला, आरोग्याला किंवा सुरक्षिततेला संकट उत्पन्न होण्यास प्रतिबंध करण्यासाठी, अथवा दंग्याला किंवा कोणत्याही दंगलीला प्रतिबंध करण्यासाठी तसे करणे राज्य शासनाला जरुरीचे वाटले तर, ते अधिसूचनेद्वारे असे निदेशित करू शकेल की, या कलमाखाली दंडाधिकाऱ्याने काढलेला आदेश, अशा निदेशाच्या अभावी एरव्ही तो ज्या दिनांकास संपला असता त्या दिनांकापासून उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट केले जाईल त्याप्रमाणे पण जास्तीत जास्त सहा महिने इतक्या आणखी कालावधीपर्यंत अंमलात राहील.

(५) कोणत्याही दंडाधिकाऱ्याला त्याने स्वतः किंवा त्याला दुय्यम असणाऱ्या कोणत्याही दंडाधिकाऱ्याने किंवा त्याच्या पदीय पूर्वाधिकाऱ्याने या कलमाखाली काढलेला कोणताही आदेश स्वतः होऊन किंवा कोणत्याही नाराज झालेल्या व्यक्तीच्या अर्जावरून विखंडित करता येईल किंवा त्यात फेरबदल करता येईल.

(६) राज्य शासनाला पोटकलम (४) च्या परंतुकाखाली त्याने काढलेला कोणताही आदेश स्वतः होऊन किंवा कोणत्याही नाराज झालेल्या व्यक्तीच्या अर्जावरून विखंडित करता येईल किंवा त्यात फेरबदल करता येईल.

(७) जेव्हा पोटकलम (५) किंवा पोटकलम (६) खालील अर्ज येईल तेव्हा, दंडाधिकारी किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य शासन अर्जदाराला जातीने किंवा वकिलामार्फत आपल्यासमोर उपस्थित होण्याची आणि आदेशाविरुद्ध कारण दाखविण्याची सत्वर संधी देईल; आणि, प्रकरणपरत्वे, दंडाधिकाऱ्याने किंवा राज्य शासनाने अर्ज संपूर्णतः किंवा अंशतः फेटाळला तर तो किंवा ते तसे करण्यामागील कारणांची लेखी नोंद करील.

## घ—स्थावर संपत्तीबाबत तंटे

जमीन किंवा पाणी यासंबंधीच्या तंटयामुळे शांतताभंग घडून येण्याचा संभव असतो त्याबाबतीतील कार्यपद्धती.

१४५. (१) ज्यामुळे शांतताभंग होण्याचा संभव आहे असा आपल्या स्थानिक अधिकारितेतील कोणत्याही जमिनीसंबंधी किंवा पाण्यासंबंधी किंवा त्यांच्या हद्दीसंबंधी एखादा तंटा अस्तित्वात आहे अशी जेव्हाकेव्हा पोलीस अधिकाऱ्याच्या अहवालावरून किंवा मिळालेल्या अन्य खबरीवरून कार्यकारी दंडाधिकाऱ्याची खात्री होईल तेव्हा, तो आपली याप्रमाणे खात्री झाल्याची कारणे निवेदन करून एक लेखी आदेश काढील, आणि त्याद्वारे, अशा तंटयाशी संबंधित असणाऱ्या पक्षांना आपल्या न्यायालयात विनिर्दिष्ट दिनांकी व वेळी, जातीने किंवा वकिलामार्फत हजर राहण्यास आणि तंटयाच्या विषयवस्तूच्या प्रत्यक्ष कब्जाच्या वस्तुस्थितीबाबतच्या, आपापल्या दाव्यांची लेखी निवेदने मांडण्यास फर्मावील.

जमीन किंवा पाणी यासंबंधीच्या तंटयामुळे शांतताभंग घडून येण्याचा संभव असतो त्याबाबतीतील कार्यपद्धती.

*१४५. (१) ज्यामुळे शांतताभंग होण्याचा संभव आहे असा आपल्या स्थानिक अधिकारितेतील कोणत्याही जमिनीसंबंधी किंवा पाण्यासंबंधी किंवा त्यांच्या हद्दीसंबंधी एखादा तंटा अस्तित्वात आहे अशी जेव्हाकेव्हा पोलीस अधिकाऱ्याच्या अहवालावरून किंवा मिळालेल्या अन्य खबरीवरून [१][बृहन्मुंबईत, महानगर दंडाधिकाऱ्याची आणि राज्यात इतरत्र कार्यकारी दंडाधिकाऱ्याची] खात्री होईल तेव्हा, तो आपली याप्रमाणे खात्री झाल्याची कारणे निवेदन करून, एक लेखी आदेश काढील आणि त्याद्वारे, अशा तंटयाशी संबंधित असणाऱ्या पक्षांना आपल्या न्यायालयात, विनिर्दिष्ट दिनांकी व वेळी, जातीने किंवा वकिलामार्फत उपस्थित राहण्यास आणि तंटयाच्या विषयवस्तूच्या प्रत्यक्ष कब्जाच्या वस्तुस्थितीबाबत आपापल्या दाव्यांचे लेखी निवेदन मांडण्यास फर्मावील.

(२) या कलमाच्या प्रयोजनांसाठी, "जमीन किंवा पाणी" या शब्दप्रयोगात इमारती, बाजार, मत्स्यक्षेत्रे, पिके किंवा जमिनीतील अन्य उत्पादन आणि अशा कोणत्याही संपत्तीचे भाडे-उत्पन्न किंवा फायदा यांचा समावेश आहे.

---

*फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७७ (१९७८ चा महा. १), कलम ५ "जर या अधिनियमाच्या प्रारंभीच्या तारखेच्या लगतपूर्वी दिवशी, उक्त संहितेचे कलम १४५, १४६ किंवा १४७ याखालील कोणतेही कामकाज बृहन्मुंबईतील कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडे प्रलंबित असेल तर जणू काही हा अधिनियम अंमलात आला नाही असे समजून त्या दंडाधिकाऱ्याकडून ते चालू ठेवण्यात येईल, त्याची सुनावणी करण्यात येईल व ते निकालात काढण्यात येईल."

१. फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७७ (१९७८ चा महा. १), कलम २ (अ) या अन्वये मूळ मजकुराऐवजी घातले.

(३) दंडाधिकारी निदेशित करील अशा व्यक्तींवर आदेशाची एक प्रत समन्स बजावण्यासाठी या संहितेत उपबंधित केलेल्या रीतीने बजावली जाईल, आणि निदान एक प्रत तंटयाच्या विषयवस्तूच्या ठिकाणी किंवा त्याच्या जवळपास एखाद्या ठळक जागी लावून प्रकाशित केली जाईल.

(४) त्यानंतर, विषयवस्तूच्या कब्जाच्या हक्काबाबत पक्षांपैकी कोणीही सांगितलेल्या दाव्यांचे गुणावगुण लक्षात न घेता, दंडाधिकारी याप्रमाणे मांडलेल्या निवेदनांचे अवलोकन करील, पक्षांचे म्हणणे ऐकून घेईल, ते हजर करतील असा सर्व पुरावा स्वीकारील, त्याला जरूर वाटल्यास तसा आणखी पुरावा घेईल आणि, शक्य असल्यास, त्याने पोटकलम (१) खाली जेव्हा आदेश दिला त्या दिनांकास कोणत्याही पक्षाकडे तंटयाच्या विषयवस्तूचा कब्जा होता काय व तो पक्ष कोणता हे निर्णीत करील :

परंतु, दंडाधिकाऱ्याला ज्या दिनांकास पोलीस अधिकाऱ्याचा अहवाल किंवा अन्य खबर मिळाली त्याच्या लगतपूर्वीच्या दोन महिन्यात किंवा त्या दिनांकानंतर पोटकलम (१) खालील त्याच्या आदेशाच्या दिनांकाआधी कोणत्याही पक्षाकडून बळाने आणि गैरपणे कब्जा काढून घेण्यात आला आहे असे दंडाधिकाऱ्याला दिसून आले तर, त्याला याप्रमाणे ज्याच्याकडून कब्जा काढून घेतला त्या पक्षाकडे जणू काही पोटकलम (१) खालील आपल्या आदेशाच्या दिनांकापूर्वी कब्जा होता असे समजून चालता येईल.

(५) अशा प्रकारे हजर राहण्यास फर्मावण्यात आलेल्या कोणत्याही पक्षाला किंवा अन्य कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीला, पूर्वोक्त असा तंटा अस्तित्वात नाही किंवा अस्तित्वात नव्हता असे दाखवण्यापासून या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रत्यवाय होणार नाही; आणि अशा बाबतीत दंडाधिकारी आपला उक्त आदेश रद्द करील, आणि त्यावरील पुढील सर्व कार्यवाही स्थगित करण्यात येईल, पण दंडाधिकाऱ्याचा पोटकलम (१) खालील आदेश, याप्रमाणे तो रद्द झाला नाही तर, अंतिम असेल.

(६) (क) पक्षांपैकी एकाकडे उक्त विषयवस्तूचा कब्जा होता किंवा पोटकलम (४) च्या परंतुकाखाली तसे असल्याचे समजून चालावे असा जर दंडाधिकाऱ्याने निर्णय केला तर, अशा पक्षाला जोवर रीतसर विधिक्रमानुसार त्यातून निष्कासित केले जात नाही तोपर्यंत तो विषयवस्तूच्या कब्जाला हक्कदार असल्याचे घोषित करणारा आणि निष्कासन होईपर्यंत अशा कब्जाला कसलाही अडथळा करण्यास मनाई करणारा आदेश तो दंडाधिकारी काढील ; आणि जेव्हा पोटकलम (४) च्या परंतुकाखाली तो कार्यवाही करील तेव्हा, ज्या पक्षाकडून कब्जा बळाने व गैरपणे काढून घेण्यात आला असेल त्याला तो कब्जा परत देऊ शकेल.

(ख) या पोटकलमाखाली काढण्यात आलेला आदेश पोटकलम ३ मध्ये घालून दिलेल्या रीतीने बजावला व प्रकाशित केला जाईल.

(७) जर अशा कोणत्याही कार्यवाहीतील कोणताही पक्ष मृत्यू पावला तर, दंडाधिकारी मृत पक्षाच्या वैध प्रतिनिधीला कार्यवाहीतील पक्ष करून घेईल आणि तद्नंतर चौकशी चालू ठेवील, आणि अशा कार्यवाहीच्या प्रयोजनांसाठी वैध प्रतिनिधी कोण आहे असा प्रश्न उद्भवला तर, मृत पक्षाचे प्रतिनिधी म्हणून दावा सांगणाऱ्या सर्व व्यक्तींना त्यातील पक्ष बनवण्यात येईल.

(८) आपल्यासमोर प्रलंबित असलेल्या या कलमाखालील कार्यवाहीतील तंटयाची विषयवस्तू असलेल्या संपत्तीतील पीक किंवा अन्य उत्पादन हे जलद व निसर्गतः नाश पावणारे आहे असे त्याचे मत असेल तर, तो अशा संपत्तीच्या योग्य अभिरक्षेच्या किंवा विक्रीचा आदेश देऊ शकेल आणि चौकशी पूर्ण झाल्यावर, त्याला योग्य वाटेल असा अशा संपत्तीच्या किंवा तिच्या विक्री-उत्पन्नाच्या विल्हेवाटी-संबंधी आदेश देईल.

(९) दंडाधिकाऱ्याला योग्य वाटल्यास या कलमाखालील कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्याला कोणत्याही पक्षाच्या अर्जावरून कोणत्याही साक्षीदाराला उपस्थित राहण्याचे अथवा कोणताही दस्तऐवज किंवा वस्तू हजर करण्याचा निदेश देणारे समन्स काढू शकेल.

(१०) या कलमातील कोणतीही गोष्ट कलम १०७ खाली कार्यवाही करण्याच्या दंडाधिकाऱ्याच्या शक्तीस न्यूनकारी असल्याचे मानले जाणार नाही.

[1][ (१०) या कलमाखाली कार्यवाही करणाऱ्या कार्यकारी दंडाधिकाऱ्याच्या बाबतीत, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे कलम १०७ खाली कार्यवाही करण्याच्या त्याच्या अधिकाराचे न्यूनीकरण झाल्याचे समजण्यात येणार नाही. या कलमाखाली कार्यवाही करणाऱ्या महानगर दंडाधिकाऱ्याच्या बाबतीत, कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यात जर त्याचे असे मत झाले की, त्या वादात कलम १०७ खाली कार्यवाही करणे आवश्यक आहे, तर तो त्याची कारणे नमूद करून, त्याबाबतीत अधिकारिता असलेल्या कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडे, त्याला त्या कलमाखाली कार्यवाही करणे शक्य व्हावे म्हणून आवश्यक ती माहिती पाठवील. ]

---

१. फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७७ (१९७८ चा महा. १), कलम २ (ब) याअन्वये मूळ मजकुरा-ऐवजी दाखल केले.

*१४६. (१) जर कलम १४५च्या पोटकलम (१) खाली आदेश दिल्यानंतर कोणत्याही वेळी दंडाधिकाऱ्याला ते प्रकरण आणीबाणीचे वाटले किंवा कलम १४५ मध्ये निर्दिष्ट केला आहे तसा कब्जा त्यावेळी कोणत्याही पक्षाकडे नव्हता असा त्याने निर्णय केला किंवा त्यांच्यापैकी कोणाकडे तंटयाच्या विषयवस्तूचा कब्जा होता याबाबत स्वतःची खात्री होऊ शकत नसेल तर, तंटयाच्या विषयवस्तुच्या कब्जाला कोणती व्यक्ती हक्कदार आहे याविषयी त्या पक्षांचे हक्क सक्षम न्यायालय निर्गीत करीपर्यंत त्या दंडाधिकाऱ्याला ती जप्त करता येईल :

**तंटयाची विषयवस्तू जप्त करण्याची आणि प्रापक नियुक्त करण्याची शक्ती.**

परंतु, तंटयाच्या विषयवस्तूच्या संबंधात शांततेचा भंग होण्याचा यापुढे कसलाही संभव नाही याबाबत अशा दंडाधिकाऱ्याची खात्री झाल्यास त्याला कोणत्याही वेळी जप्ती मागे घेता येईल.

(२) जेव्हा दंडाधिकारी तंटयाची विषयवस्तू जप्त करील तेव्हा, अशा तंटयाच्या विषयवस्तूच्या संबंधात कोणत्याही दिवाणी न्यायालयाने प्रापक नियुक्त केला नसेल तर, संपत्तीची देखभाल करण्यासाठी आपल्याला योग्य वाटेल अशी व्यवस्था त्या दंडाधिकाऱ्याला करता येईल किंवा त्याला योग्य वाटल्यास तिच्याबाबत प्रापक नियुक्त करता येईल, व त्या प्रापकाला, दंडाधिकाऱ्याच्या नियंत्रणाच्या अधीनतेने, 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याखाली नियुक्त केल्या जाणाऱ्या प्रापकाचे सर्व अधिकार असतील :

परंतु, तंटयाच्या विषयवस्तूच्या संबंधात मागाहून दिवाणी न्यायालयाने प्रापकाची नियुक्ती केल्यास दंडाधिकारी,—

(क) त्याने स्वतः नियुक्त केलेल्या प्रापकाने, दिवाणी न्यायालयाकडून नियुक्त झालेल्या प्रापकाकडे तंटयाच्या विषयवस्तूचा कब्जा द्यावा असा आदेश देईल, आणि स्वतः नियुक्त केलेल्या प्रापकाला त्यानंतर कार्यमुक्त करील ;

(ख) न्याय्य असतील असे अन्य आनुषंगिक किंवा परिणामरूप आदेश काढू शकेल.

**जमिनीचा किंवा पाण्याचा वापर करण्याच्या हक्कासंबंधीचा तंटा.**

१४७. (१) आपल्या स्थानिक अधिकारितेतील कोणत्याही जमिनीचा किंवा पाण्याचा वापर करण्याच्या अभिकथित हक्काविषयी—मग असा हक्क 'सुविधाधिकार' म्हणून सांगितलेला असो वा अन्य प्रकारे असो—ज्यामुळे शांतताभंग होण्याचा संभव आहे असा एखादा तंटा अस्तित्वात आहे अशी जेव्हा केव्हा पोलीस अधिकाऱ्याच्या अहवालावरून किंवा मिळालेल्या अन्य खबरीवरून कार्यकारी दंडाधिकाऱ्याची खात्री होईल तेव्हा, तो याप्रमाणे आपली खात्री झाल्याची कारणे निवेदन करून एक लेखी आदेश काढील आणि त्याद्वारे, अशा तंटयाशी संबंधित असणाऱ्या पक्षांना आपल्या कार्यालयात विनिर्दिष्ट दिनांकी व वेळी, जातीने किंवा वकिलामार्फत हजर राहण्यास आणि आपापल्या दाव्यांची लेखी निवेदने मांडण्यास फर्मावील.

स्पष्टीकरण.—"जमीन किंवा पाणी" या शब्द प्रयोगाला, कलम १४५ च्या पोटकलम (२) मध्ये त्याला दिलेला अर्थ आहे.

**जमिनीचा किंवा पाण्याचा वापर करण्याच्या हक्कासंबंधीचा तंटा.**

*१४७. (१) आपल्या स्थानिक अधिकारितेतील कोणत्याही जमिनीच्या किंवा पाण्याचा वापर करण्याच्या अभिकथित हक्काविषयी—मग असा हक्क 'सुविधाधिकार' म्हणून सांगितलेला असो वा अन्य प्रकारे असो—ज्यामुळे शांतताभंग होण्याचा संभव आहे असा एखादा तंटा अस्तित्वात आहे अशी जेव्हा केव्हा पोलीस अधिकाऱ्याच्या अहवालावरून किंवा मिळालेल्या अन्य खबरीवरून '[बृहन्मुंबईत महानगर दंडाधिकाऱ्याची आणि राज्यात इतरत्र कार्यकारी दंडाधिकाऱ्याची] खात्री होईल तेव्हा, तो याप्रमाणे आपली खात्री झाल्याची कारणे निवेदन करून एक लेखी आदेश काढील आणि त्याद्वारे, अशा तंटयाशी संबंधित असणाऱ्या पक्षांना आपल्या न्यायालयात विनिर्दिष्ट दिनांकी व वेळी, जातीने किंवा वकिलामार्फत हजर राहण्यास आणि आपापल्या दाव्यांची लेखी निवेदने मांडण्यास फर्मावील.

स्पष्टीकरण.—"जमीन किंवा पाणी" या शब्द प्रयोगाला कलम १४५ च्या पोटकलम (२) मध्ये त्याला दिलेला अर्थ आहे.

---

*फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७७ (१९७८ चा महा. १), कलम ५—

"जर या अधिनियमाच्या प्रारंभीच्या तारखेच्या लगतपूर्व दिवशी उक्त संहितेचे कलम १४५, १४६ किंवा १४७ याखालील कोणतेही कामकाज, बृहन्मुंबईतील कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडे प्रलंबित असेल तर, जणू काही हा अधिनियम अंमलात आला नाही असे समजून त्या दंडाधिकाऱ्याकडून ते चालू ठेवण्यात येईल, त्याची सुनावणी करण्यात येईल व ते निकालात काढण्यात येईल."

१. फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७७ (१९७८ चा महा. १), कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केला.

(२) त्यानंतर दंडाधिकारी याप्रमाणे मांडलेल्या निवेदनांचे अवलोकन करील, पक्षांचे म्हणणे ऐकून घेईल, त्यांच्यापैकी प्रत्येकजण हजर करील असा सर्व पुरावा स्वीकारील, अशा पुराव्याचा परिणाम विचारात घेईल, त्याला जरूर वाटल्यास तसा आणखी पुरावा घेईल आणि, शक्य असल्यास, असा हक्क विद्यमान आहे किंवा काय हे निर्णीत करील; आणि कलम १४५ चे उपबंध, शक्य तेथवर, अशा चौकशीच्या बाबतीत लागू होतील.

(३) असा हक्क विद्यमान आहे असे जर अशा दंडाधिकाऱ्याला दिसून आले तर, अशा हक्काच्या वापरास कसलीही आडकाठी करण्यास मनाई करणारा आदेश व योग्य बाबतीत अशा कोणत्याही हक्काच्या वापरास असलेला अडथळा दूर करण्यासाठी द्यावयाचा आदेशसुद्धा तो देऊ शकेल :

परंतु, जर तो हक्क बारमहा वापरता येण्यासारखा असेल तर, ज्यामुळे चौकशी सुरू करावी लागली असा पोटकलम (१) खालील पोलीस अधिकाऱ्याचा अहवाल किंवा अशी अन्य खबर मिळण्याच्या लगतपूर्वीच्या तीन महिन्यांमध्ये असा हक्क वापरलेला असल्याशिवाय अथवा जर तो हक्क केवळ विशिष्ट हंगामात किंवा विशिष्ट प्रसंगीच वापरता येण्यासारखा असेल तर असा अहवाल किंवा खबर मिळण्या-पूर्वीच्या अशा हंगामांपैकी अखेरच्या हंगामाला किंवा अशा प्रसंगांपैकी अखेरच्या प्रसंगी असा हक्क वापरला असल्याशिवाय असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(४) कलम १४५ च्या पोटकलम (१) खाली सुरू केलेल्या कोणत्याही कार्यवाहीत जेव्हा, जमिनीचा किंवा पाण्याचा वापर करण्याच्या अभिकथित हक्काविषयी तंटा आहे असे दंडाधिकाऱ्याला आढळून येईल तेव्हा, ती कार्यवाही जणू काही पोटकलम (१) खाली सुरू केलेली असावी त्याप्रमाणे ती त्याला आपल्या कारणांची नोंद करून पुढे चालू ठेवता येईल;

आणि पोटकलम (१) खाली सुरू केलेल्या कोणत्याही कार्यवाहीत जेव्हा, कलम १४५ खाली त्या तंट्याचा परामर्श घेतला पाहिजे असे दंडाधिकाऱ्याला आढळून येईल तेव्हा, ती कार्यवाही जणू काही कलम १४५ च्या पोटकलम (१) खाली सुरू केली असावी त्याप्रमाणे तो त्याला आपल्या कारणांची नोंद करून पुढे चालू ठेवता येईल.

स्थानिक चौकशी.

१४८. (१) जेव्हा केव्हा कलम १४५, कलम १४६ किंवा कलम १४७ यांच्या प्रयोजनांसाठी स्थानिक चौकशी जरुरीची असेल तेव्हा, जिल्हा दंडाधिकारी किंवा उप-विभागीय दंडाधिकारी चौकशी करण्याकरता त्यास दुय्यम असलेल्या कोणत्याही दंडाधिकाऱ्यास प्रतिनियुक्त करू शकेल व त्याच्या मार्ग-दर्शनासाठी जरुरीचे वाटतील असे लेखी अनुदेश त्याला देऊ शकेल आणि चौकशीचा जरूर तो संपूर्ण खर्च किंवा त्याचा कोणताही भाग कोणी द्यावा ते घोषित करू शकेल.

(२) याप्रमाणे प्रतिनियुक्त केलेल्या व्यक्तीचा अहवाल हा त्या प्रकरणातील पुरावा म्हणून समजण्यात येईल.

(३) जेव्हा कलम १४५, कलम १४६ किंवा कलम १४७ खालील कार्यवाहीतील कोणत्याही पक्षाला काही खर्च आलेला असेल तेव्हा, निर्णय देणारा दंडाधिकारी असा खर्च कोणी द्यावयाचा—अशा पक्षाने की कार्यवाहीतील अन्य कोणत्याही पक्षाने, आणि तो संपूर्णपणे की अंशतः की यथाप्रमाणे द्यावयाचा याबाबत निदेश देऊ शकेल आणि अशा खर्चात साक्षीदारांबाबत व वकिलांच्या फीबाबत आलेला, न्यायालयाला वाजवी वाटेल इतक्या मर्यादेपर्यंत कोणताही खर्च समाविष्ट असू शकेल.

## प्रकरण अकरा

## पोलिसांची प्रतिबंधक कारवाई

**पोलिसांनी दखलपात्र अपराधांना प्रतिबंध करणे.**

१४९. प्रत्येक पोलीस अधिकारी कोणताही दखलपात्र अपराध केला जाण्यास प्रतिबंध करण्याच्या प्रयोजनासाठी हस्तक्षेप करू शकेल आणि तो आपल्या सामर्थ्याच्या पराकाष्ठेपर्यंत त्याला प्रतिबंध करील.

**दखलपात्र अपराध करण्याचा बेत रचण्यात आल्याची खबर.**

१५०. कोणताही दखलपात्र अपराध करण्यासाठी रचलेल्या बेताची खबर ज्याला मिळेल असा प्रत्येक पोलीस अधिकारी, ज्या पोलीस अधिकाऱ्याला तो दुय्यम असेल त्याला आणि असा कोणताही अपराध केला जाण्यास प्रतिबंध करणे किंवा त्याची दखल घेणे हे ज्याचे कर्तव्य आहे अशा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याला अशी खबर कळवील.

**दखलपात्र अपराध करण्यास प्रतिबंध करण्यासाठी अटक.**

१५१. (१) कोणताही दखलपात्र अपराध करण्याचा बेत माहीत असलेल्या पोलीस अधिकाऱ्याला जर अपराध केला जाण्यास अन्यथा प्रतिबंध करता येणे शक्य नाही असे दिसून आले तर असा अधिकारी याप्रमाणे बेत रचणाऱ्या व्यक्तीला दंडाधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय आणि वॉरंटाशिवाय अटक करू शकेल.

(२) पोटकलम (१) खाली अटक करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला, तिच्या अटकेच्या वेळेपासून चोवीस तासांपेक्षा अधिक काळपर्यंत हवालातीत स्थानबद्ध केले जाणार नाही.---मात्र या संहितेच्या अन्य कोणत्याही उपबंधाखाली किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखाली त्या व्यक्तीला आणखी काही काळ स्थानबद्ध करून ठेवणे आवश्यक असेल किंवा प्राधिकृत असेल तर तो अपवाद समजावा.

(२) पोटकलम (१) खाली अटक करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला, तिच्या अटकेच्या वेळेपासून चोवीस तासांपेक्षा अधिक काळपर्यंत हवालातीत स्थानबद्ध केले जाणार नाही---मात्र, [1][पोटकलम (३) खाली किंवा]या संहितेच्या अन्य कोणत्याही उप-बंधांखाली किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखाली त्या व्यक्तीला आणखी काही काळ स्थानबद्ध करून ठेवणे आवश्यक असेल किंवा प्राधिकृत असेल तर तो अपवाद समजावा.

[2][(३) (क) या कलमाखाली एखाद्या व्यक्तीला अटक केलेली असेल, आणि---

(एक) त्या व्यक्तीची सुटका केल्यानंतर ती व्यक्ती, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला दखलपात्र अपराध करण्याचा बेत रचण्याचे चालू ठेवण्याचा संभव आहे किंवा ती तो अपराध करण्याचा संभव आहे; आणि

(दोन) ती व्यक्ती मोकळी राहणे हे सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने बाधक ठरू शकेल अशी त्या प्रकरणाची परिस्थिती आहे.

या कारणास्तव, अटक केलेल्या व्यक्तीला अटकेच्या वेळेपासून चोवीस तासांपेक्षा अधिक काळपर्यंत (अटक केलेल्या व्यक्तीला अटकेच्या ठिकाणापासून न्याय दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयात नेण्यासाठी आवश्यक असलेला कालावधी वगळून) स्थानबद्धतेत ठेवणे आवश्यक आहे असे मानण्यास, अटक करणाऱ्या अधिकाऱ्याला किंवा अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला ज्याच्यासमोर हजर करण्यात आले असेल अशा पोलीस ठाणे अंमलदार अधिकाऱ्याला वाजवी आधारकारणे असतील तर अटक करणारा अधिकारी किंवा तो पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकारी, अशा अटक केलेल्या व्यक्तीला, चोवीस तासांपेक्षा अधिक काळपर्यंत, अशा व्यक्तींची स्थानबद्धता चालू ठेवण्यासंबंधीची कारणे नमूद करणाऱ्या लेखी अहवालासह, सर्वात जवळच्या न्याय दंडाधिकाऱ्यासमोर हजर करील.

(ख) या संहितेमध्ये किंवा त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला ज्याच्यासमोर हजर करण्यात आले असेल अशा दंडाधिकाऱ्याचे अशा व्यक्तीला चोवीस तासांपेक्षा अधिक काळपर्यंत हवालातीत तात्पुरते स्थानबद्ध करण्यास वाजवी आधारकारण आहे याबाबत समाधान झाले असेल अशा बाबतीत, तो अशा व्यक्तीला वेळोवेळी आदेशाद्वारे त्याला योग्य वाटेल अशा हवालातीत परत पाठवू शकेल :

परंतु, कोणत्याही व्यक्तीला, या कलमाखाली एकावेळी पंधरा दिवसांपेक्षा अधिक काळपर्यंत आणि अशा व्यक्तीच्या अटकेच्या तारखेपासून एकूण तीस

---

१. महाराष्ट्र जातीय, समाजविरोधी व इतर विघातक कृत्यांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९८० (१९८१ चा महा. ७), कलम १८ द्वारे समाविष्ट केले (२७ ऑगस्ट, १९८० रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे पोटकलम (३) जादा दाखल केले (२७ ऑगस्ट, १९८० रोजी व तेव्हापासून).

दिवसांपेक्षा अधिक होईल इतका काळ स्थानबद्ध करण्यात येणार नाही.

(ग) एखाद्या व्यक्तीला खंड (ख) खाली हवालातीत परत पाठवण्यात आले असेल अशा बाबतीत दंडाधिकारी शक्य तितक्या लवकर, ज्यांच्या आधारे तो आदेश काढण्यात आला आहे ती कारणे त्याला कळवील आणि अशा व्यक्तीला त्या आदेशाविरुद्ध, सत्र न्यायालयाकडे अभिवेदन करता येईल. असे अभिवेदन मिळाल्यावर सत्र न्यायाधीशाला, त्यास योग्य वाटेल अशी रीतसर चौकशी केल्यानंतर, एकतर ते अभिवेदन नाकारता येईल अथवा अटक केलेल्या व्यक्तीला आणखी स्थानबद्धतेत ठेवणे आवश्यक नाही किंवा तो आदेश विलोपित करणे अन्यथा योग्य व न्याय्य आहे असे स्वतःला वाटले तर त्यास तो आदेश विलोपित करता येईल आणि अटक केलेल्या व्यक्तीला तात्काळ मुक्त करण्यात येईल.]

सार्वजनिक संपत्तीला क्षती पोचविण्यास प्रतिबंध. १५२. आपल्या मते कोणत्याही जंगम किंवा स्थावर सार्वजनिक संपत्तीला जी कोणतीही क्षती पोचविण्याचा प्रयत्न होत असेल तिला अथवा कोणतेही सार्वजनिक भूचिन्ह किंवा नौकानयनासाठी वापरला जाणारा बोया किंवा अन्य चिन्ह हलवण्यास किंवा त्याला क्षती पोचविण्यास प्रतिबंध करण्यासाठी कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला स्वतःच्या अखत्यारात हस्तक्षेप करता येईल.

वजने व मापे यांची तपासणी. १५३. (१) जेव्हा केव्हा पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला अशा ठाण्याच्या हद्दीच्या आत कोणत्याही स्थळी खोटी असलेली अशी कोणतीही वजने, मापे किंवा वजन करण्याची साधने आहेत असे सकारण वाटत असेल तेव्हा, त्यास अशा स्थळी वापरात असलेली किंवा ठेवलेली वजने किंवा मापे किंवा वजन करण्याची साधने यांची तपासणी करण्यासाठी किंवा त्यांची झडती घेण्यासाठी वॉरंटाशिवाय तेथे प्रवेश करता येईल.

(२) जर त्याला अशा स्थळी खोटी असलेली वजने, मापे किंवा वजन करण्याची साधने आढळून आली तर, त्यास ती अभिग्रहण करता येतील, आणि अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे तात्काळ अभिग्रहणाचे वृत्त कळवावे लागेल.

प्रकरण बारा

## पोलिसांना वर्दी देणे आणि अन्वेषण करण्याच्या त्यांच्या शक्ती

दखलपात्र प्रकरणांतील वर्दी. १५४. (१) दखलपात्र अपराध घडल्याची प्रत्येक वर्दी पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्यास तोंडी देण्यात आली असेल तर, तो ती लेखनिविष्ट करील किंवा आपल्या सांगण्यावरून करवून घेईल, आणि वर्दीदाराला ती वाचून दाखवण्यात येईल; आणि अशा प्रत्येक वर्दीखाली–मग ती लेखी दिलेली असो वा पूर्वोक्तानुसार लेखनिविष्ट करण्यात आलेली असो– ती देणाऱ्या व्यक्तीला स्वाक्षरी करावी लागेल, आणि तिच्या गोषवाऱ्याची नोंद राज्य शासन यासंबंधात विहित करील अशा नमुन्यानुसार अशा अधिकाऱ्याने ठेवावयाच्या पुस्तकात केली जाईल.

(२) पोटकलम (१) खाली जशी नोंदण्यात आली असेल तशा वर्दीची एक प्रत वर्दीदाराला तात्काळ विनाशुल्क देण्यात येईल.

(३) पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली वर्दी नोंदून घेण्यास पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याने नकार दिल्यामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीस लेखी स्वरूपात आणि डाकेने अशा वर्दीचा गोषवारा संबंधित पोलीस अधीक्षकाकडे पाठवता येईल, आणि दखलपात्र अपराध घडला असल्याचे अशा वर्दीवरून उघडकीस आले आहे अशी जर त्याची खात्री झाली तर, या संहितेद्वारे उपबंधित केलेल्या रीतीने त्या प्रकरणी एकतर तो स्वतः अन्वेषण करील किंवा त्यास दुय्यम असलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकरवी अन्वेषण करवण्याचा निदेश देईल, आणि अशा अधिकाऱ्याला त्या अपराधाच्या संबंधात पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याच्या सर्व शक्ती असतील.

बिनदखली प्रकरणांबाबत वर्दी आणि अशा प्रकरणांचे अन्वेषण. १५५. (१) जेव्हा पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्यास अशा ठाण्याच्या हद्दीमध्ये बिनदखली अपराध करण्यात आल्याची वर्दी देण्यात आली असेल तेव्हा, असा अधिकारी यासंबंधात राज्य शासन विहित करील अशा नमुन्यानुसार त्याने ठेवावयाच्या पुस्तकात त्या वर्दीच्या गोषवाऱ्याची नोंद करील किंवा करवील, आणि वर्दीदाराला दंडाधिकाऱ्याकडे पाठवील.

(२) बिनदखली प्रकरणांचे अन्वेषण कोणताही पोलीस अधिकारी अशा प्रकरणांची संपरीक्षा करण्याचा किंवा ते प्रकरण संपरीक्षेसाठी सुपूर्द करण्याचा अधिकार असलेल्या दंडाधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय करणार नाही.

(३) असा आदेश मिळालेल्या प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याला अन्वेषणाबाबत, पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकारी दखलपात्र प्रकरणी ज्या शक्ती (वॉरंटाशिवाय अटक करण्याचा अधिकार खेरीजकरून) वापरू शकेल त्या शक्ती वापरता येतील.

(४) ज्यांपैकी निदान एक अपराध दखलपात्र आहे अशा दोन किंवा अधिक अपराधांशी प्रकरण संबंधित असेल तेव्हा, अन्य अपराध बिनदखली असले तरीही, ते प्रकरण दखलपात्र प्रकरण असल्याचे मानले जाईल.

**दखलपात्र प्रकरणांचे अन्वेषण करण्याची पोलीस अधिकाऱ्याची शक्ती.**

१५६. (१) कोणत्याही पोलीस ठाणे अंमलदार अधिकाऱ्यास, अशा ठाण्याच्या हद्दींमधील स्थानिक क्षेत्रावर अधिकारिता असलेल्या एखाद्या न्यायालयाला १३ व्या प्रकरणाच्या उपबंधाखाली ज्या प्रकरणाची चौकशी किंवा संपरीक्षा करण्याची शक्ती असेल अशा कोणत्याही बिनदखली प्रकरणाचे दंडाधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय अन्वेषण करता येईल.

(२) पोलीस अधिकाऱ्याची अशा कोणत्याही प्रकरणातील कोणतीही कार्यवाही कोणत्याही टप्प्यावर असताना, या कलमाखाली अशा अधिकाऱ्याला ज्याचे अन्वेषण करण्याची शक्ती प्रदान झालेली नाही असे ते प्रकरण आहे या कारणावरून ती कार्यवाही प्रश्नास्पद करता येणार नाही.

(३) कलम १९० खाली शक्ती प्रदान झालेला कोणताही दंडाधिकारी वर उल्लेखिल्याप्रमाणे असे अन्वेषण करण्याचा आदेश देऊ शकेल.

**अन्वेषणाची कार्यपद्धती.**

१५७. (१) कलम १५६ खाली ज्याचे अन्वेषण करण्याची शक्ती आपणांस प्रदान झालेली आहे तो अपराध करण्यात आल्याचा संशय घेण्यास पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला, मिळालेल्या खबरीवरून किंवा अन्यथा कारण दिसत असेल तर, तो पोलीस अहवालावरून अशा अपराधाची दखल घेण्याची शक्ती प्रदान झालेल्या दंडाधिकाऱ्याकडे तात्काळ त्याबद्दलचा अहवाल पाठवील आणि घटनास्थळी जातीनिशी जाऊन अथवा यासंबंधात राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विहित करील त्याहून खालचा दर्जा नसलेल्या अशा आपल्या दुय्यम अधिकाऱ्यांपैकी एकाला प्रतिनियुक्त करून, प्रकरणाच्या तथ्यांचे व परिस्थितीचे अन्वेषण करण्याच्या आणि जरूर तर, अपराध्याला शोधून काढण्यासाठी व अटक करण्यासाठी उपाययोजना करण्याच्या कामाला लागेल :

परंतु,—

(क) कोणत्याही व्यक्तीविरुद्ध जेव्हा असा कोणताही अपराध करण्यात आल्याबाबत तिच्या नावानिशी वर्दी देण्यात आलेली असेल आणि ते प्रकरण गंभीर स्वरूपाचे नसेल तेव्हा, पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याने घटनास्थळी जाऊन अन्वेषण करण्याची किंवा ते करण्यासाठी दुय्यम अधिकाऱ्याला प्रतिनियुक्त करण्याची गरज नाही ;

(ख) अन्वेषण सुरू करण्यासाठी पुरेसे कारण नाही असे पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्यास दिसून आल्यास, तो त्या प्रकरणाचे अन्वेषण करणार नाही.

(२) पोटकलम (१) च्या परंतुकाच्या खंड (क) आणि (ख) मध्ये उल्लेखिलेल्यांपैकी प्रत्येक प्रकरणात, पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकारी, त्या पोटकलमाने आवश्यक केलेल्या गोष्टींचे पूर्णपणे अनुपालन न केल्याबद्दलची आपली कारणे आपल्या अहवालात नमूद करील, आणि उक्त परंतुकाच्या खंड (ख) मध्ये उल्लेखिलेल्या प्रकरणी, कोणी वर्दीदार असल्यास त्याला तो अधिकारी, आपण त्या प्रकरणाचे अन्वेषण करणार नाही ही गोष्ट राज्य शासन विहित करील अशा रीतीने विदित करील.

**अहवाल कसा सादर करावयाचा.**

१५८. (१) कलम १५७ खाली दंडाधिकाऱ्याकडे पाठविलेला प्रत्येक अहवाल, राज्य शासनाने तसा निदेश दिल्यास, त्यासंबंधात राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे नियुक्त करील अशा वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यामार्फत सादर करण्यात येईल.

(२) असा वरिष्ठ अधिकारी त्यास योग्य वाटतील असे अनुदेश पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्यास देऊ शकेल, आणि अशा अहवालावर असे अनुदेश नमूद केल्यानंतर तो अहवाल दंडाधिकाऱ्याकडे विनाविलंब पाठवील.

**अन्वेषण किंवा प्रारंभिक चौकशी करण्याची शक्ती.**

१५९. असा दंडाधिकारी असा अहवाल मिळाल्यावर या संहितेत उपबंधित केलेल्या रीतीने त्या प्रकरणाचे अन्वेषण करण्याचा निदेश देऊ शकेल, अथवा त्यास योग्य वाटले तर, लगेच त्याची प्रारंभिक चौकशी करण्याची किंवा अन्यथा ते निकालात काढण्याची कार्यवाही करू शकेल किंवा ती कार्यवाही करण्यासाठी आपल्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही दंडाधिकाऱ्याला प्रतिनियुक्त करू शकेल.

**साक्षीदारांना समक्ष हजर राहण्यास फर्माविण्याची शक्ती.**

१६०. (१) या प्रकरणाखाली अन्वेषण करणारा कोणताही पोलीस अधिकारी, त्याच्या स्वतःच्या ठाण्याच्या किंवा लगतच्या ठाण्याच्या हद्दींमध्ये असलेली जी कोणतीही व्यक्ती ही, प्रकरणांच्या तथ्यांशी व परिस्थितीशी परिचित आहे असे देण्यात आलेल्या वर्दीवरून किंवा अन्यथा दिसत असेल अशा कोणत्याही व्यक्तीला समक्ष हजर राहण्यास फर्मावू शकेल; आणि याप्रमाणे फर्मावण्यात आल्यानुसार अशा व्यक्तीला हजर राहावे लागेल :

परंतु, कोणत्याही पंधरा वर्ष वयाखालील पुरुष व्यक्तीला किंवा कोणत्याही स्त्रीला, असा पुरुष किंवा स्त्री ज्या स्थळी राहत असेल त्याहून अन्य कोणत्याही स्थळी हजर राहण्यास सांगितले जाणार नाही.

(२) पोटकलम (१) अन्वये स्वतःच्या निवासस्थानाव्यतिरिक्त अन्य स्थळी हजर राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला पोलीस अधिकाऱ्याने तिचा वाजवी खर्च द्यावा यासाठी राज्य शासनाला यासंबंधात नियम करून त्याद्वारे उपबंध करता येईल.

**पोलिसांनी घ्यावयाची साक्षीदारांची तपासणी.** १६१. (१) या प्रकरणाखाली अन्वेषण करणाऱ्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला अथवा राज्य शासन यासंबंधात सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विहित करील अशा दर्जाहून खालचा दर्जा नसलेला जो कोणताही पोलीस अधिकारी अशा अधिकाऱ्याच्या फर्मानानुसार कार्य करीत असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याला प्रकरणाच्या तथ्यांशी व परिस्थितीशी परिचित असल्याचे समजल्या गेलेल्या कोणत्याही व्यक्तीची तोंडी साक्ष तपासणी घेता येईल.

(२) अशा अधिकाऱ्याने अशा प्रकरणासंबंधी त्या व्यक्तीला विचारलेल्या प्रश्नांपैकी ज्यांच्या उत्तरांमुळे ती फौजदारीपात्र आरोपास, द्रव्य दंडास किंवा समपहरणास पात्र होण्याची शक्यता आहे त्याहून अन्य सर्व प्रश्नांची खरीखुरी उत्तरे देण्यास ती बांधलेली असेल.

(३) पोलीस अधिकारी या कलमाखालील साक्ष तपासणीच्या ओघात त्याला दिलेला जबाब लेखनिविष्ट करू शकेल; आणि जर त्याने तसे केले तर, ज्या ज्या व्यक्तीचा जबाब तो नमूद करीत असेल अशा प्रत्येक व्यक्तीच्या जबाबाचा वेगवेगळा व यथातथ्य अभिलेख तो तयार करील.

**पोलिसांनी दिलेले जबाब स्वाक्षरित करावयाचे नाहीत त्या जबाबांचा पुराव्यात उपयोग.** १६२. (१) या प्रकरणाखालील अन्वेषणाच्या ओघात कोणत्याही व्यक्तीने पोलीस अधिकाऱ्याकडे दिलेला कोणताही जबाब लेखनिविष्ट करण्यात आला तर, तो जबाब देणाऱ्या व्यक्तीकडून तो स्वाक्षरित केला जाणार नाही, तसेच असा कोणताही जबाब किंवा त्याची कोणतीही नोंद--मग ती पोलीस रोजनाम्या मधील असो किंवा अन्य ठिकाणची असो--अथवा अशा जबाबाचा किंवा नोंदीचा कोणताही भाग यांचा उपयोग जेव्हा असा जबाब दिला गेला त्यावेळी ज्याचे अन्वेषण चालू होते अशा कोणत्याही अपराधाबाबत कोणतीही चौकशी किंवा संपरीक्षा करतेवेळी, यात यापुढे उपबंधित केले असेल ते वगळून अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी करता येणार नाही :

परंतु, वर सांगितल्याप्रमाणे ज्याचा जबाब लेखनिविष्ट करण्यात आला आहे अशा कोणत्याही साक्षीदाराला अशा चौकशीच्या किंवा संपरीक्षेच्या वेळी जेव्हा फिर्यादीपक्षाच्या बाजूने बोलावण्यात येईल तेव्हा, अशा साक्षीदाराच्या जबाबाचा कोणताही भाग, तो रीतसर शाबीत करण्यात आल्यास, आरोपीला आणि न्यायालयाच्या परवानगीने फिर्यादीपक्षाला 'भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२' (१८७२ चा १) याच्या कलम १४५ द्वारे उपबंधित केल्याप्रमाणे त्या साक्षीदाराच्या कथनांमधील विरोध दाखवून देण्यासाठी वापरता येईल ; आणि जेव्हा अशा जबाबाचा कोणताही भाग याप्रमाणे वापरण्यात येईल तेव्हा, त्याचा कोणताही भाग अशा साक्षीदाराची फेरतपासणी करताना देखील, पण केवळ त्याच्या उलटतपासणीत निर्दिष्ट केलेली कोणतीही बाब स्पष्ट करण्याच्या प्रयोजनासाठीच वापरता येईल.

(२) या कलमातील कोणतीही गोष्ट, 'भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२' (१८७२ चा १) याचे कलम ३२-खंड (१) च्या उपबंधांच्या अंतर्गत येणाऱ्या कोणत्याही जबाबाला लागू असल्याचे किंवा त्या अधिनियमाच्या कलम २७ च्या उपबंधांवर परिणाम करत असल्याचे मानले जाणार नाही.

स्पष्टीकरण.--पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जबाबात एखाद्या तथ्याचा किंवा परिस्थितीचा उल्लेख गाळला गेला असता, ज्या संदर्भात याप्रमाणे तो उल्लेख गाळला गेला असेल तो लक्षात घेता जर ते तथ्य किंवा परिस्थिती महत्त्वाची व अन्यथा संबद्ध असल्याचे दिसत असेल तर, असा अनुल्लेख 'कथन-विरोध' या सदरात मोडू शकेल, आणि कोणताही अनुल्लेख हा विशिष्ट संदर्भात 'कथनविरोध' या सदरात मोडतो की काय हा तथ्यविषयक प्रश्न असेल.

**कोणतेही प्रलोभन दाखवावयाचे नाही.** १६३. (१) कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने किंवा अन्य प्राधिकारी व्यक्तीने स्वतः किंवा दुसऱ्याकरवी, 'भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा १) याच्या कलम २४ मध्ये उल्लेखिलेले असे कोणतेही प्रलोभन दाखवता कामा नये अथवा तशी धमकी किंवा तसे वचन देता कामा नये.

(२) या प्रकरणाखालील अन्वेषणाच्या ओघात कोणत्याही व्यक्तीला जो कोणताही जबाब स्वेच्छेने द्यावासा वाटेल तो देण्यास तिला कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने किंवा अन्य व्यक्तीने कोणताही इशारा देऊन किंवा अन्य प्रकारे प्रतिबंध करता कामा नये :

परंतु, या पोटकलमातील कोणतीही गोष्ट कलम १६४ च्या पोटकलम (४) च्या उपबंधांवर परिणाम करणार नाही.

**कबुलीजबाब आणि जबाब नोंदून घेणे.** १६४. (१) कोणत्याही महानगर दंडाधिकाऱ्याला किंवा न्याय दंडाधिकाऱ्याला--मग त्याला त्या प्रकरणात अधिकारिता असो वा नसो--या प्रकरणाखालील किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखालील अन्वेषणाच्या ओघात किंवा त्यानंतर चौकशी किंवा संपरीक्षा सुरू होण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यास दिलेला कोणताही कबुलीजबाब किंवा जबाब नोंदून घेता येईल :

परंतु, ज्याला त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली दंडाधिकाऱ्याची कोणतीही शक्ती प्रदान करण्यात आलेली असेल अशा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला कोणताही जबाब नोंदून घेता येणार नाही.

(२) असा कोणताही कबुलीजबाब नोंदून घेण्यापूर्वी दंडाधिकारी तो कबुलीजबाब देणाऱ्या व्यक्तीस असे स्पष्ट करील की, ती कबुलीजबाब देण्यास बांधलेली नाही आणि तिने तसा तो दिल्यास तो तिच्याविरुद्ध पुरावा म्हणून वापरता येईल; आणि तो कबुलीजबाब देणाऱ्या व्यक्तीला प्रश्न विचारून नंतर दंडाधिकाऱ्याला, तिने तो स्वेच्छेने दिला आहे असे सकारण वाटल्याशिवाय तो दंडाधिकारी असा कोणताही कबुलीजबाब नोंदून घेणार नाही.

(३) कबुलीजबाब नोंदण्यापूर्वी कोणत्याही वेळी जर दंडाधिकाऱ्यासमोर उपस्थित होणाऱ्या व्यक्तीने, कबुलीजबाब देण्याची आपली इच्छा नाही असे सांगितले तर, दंडाधिकारी अशा व्यक्तीस पोलिसांच्या हवालातीत स्थानबद्ध करण्यास प्राधिकृती देणार नाही.

(४) असा कोणताही कबुलीजबाब आरोपी व्यक्तीच्या तपासणीची नोंद करण्यासाठी कलम २८१ मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने नोंदण्यात येईल आणि कबुलीजबाब देणाऱ्या व्यक्तीला तो स्वाक्षरित करावा लागेल; आणि तो दंडाधिकारी अशा नोंदीच्या तळाशी पुढील आशयाचे टिपण करील :—

"(नाव)····ला मी असे स्पष्ट केले आहे की, तो कबुलीजबाब देण्यास बांधलेला नाही आणि त्याने तो दिला तर, तो देईल असा कोणताही कबुलीजबाब त्याच्याविरुद्ध पुरावा म्हणून वापरता येईल, आणि हा कबुलीजबाब स्वेच्छेने दिलेला होता असे मी समजतो. तो माझ्या समक्ष व मला ऐकू येईल अशा रीतीने घेण्यात आला व तो देणाऱ्या व्यक्तीस वाचून दाखवण्यात आला आणि तो बरोबर असल्याचे तिने मान्य केले, आणि त्यात तिने दिलेल्या जबाबाचा संपूर्ण व खरा वृत्तांत अंतर्भूत आहे.

(स्वाक्षरी) क. ख. दंडाधिकारी."

(५) पोटकलम (१) खाली दिलेला (कबुलीजबाबाहून अन्य) कोणताही जबाब साक्षीपुराव्याची नोंद करण्यासाठी यात यापुढे उपबंधित केलेली जी रीत दंडाधिकाऱ्याच्या मते त्या प्रकरणाच्या परिस्थितीत सर्वथैव योग्य असेल अशा रीतीने नोंदण्यात येईल; आणि याप्रमाणे ज्या व्यक्तीचा जबाब नोंदण्यात आला असेल तिला शपथ देवविण्याची दंडाधिकाऱ्यास शक्ती असेल.

(६) या कलमाखाली कबुलीजबाब किंवा जबाब नोंदणारा दंडाधिकारी, ज्याने त्या प्रकरणाची चौकशी किंवा संपरीक्षा करावयाची असेल त्या दंडाधिकाऱ्याकडे तो पाठवील.

**पोलीस अधिकाऱ्याने घ्यावयाची झडती.**

**१६५.** (१) जेव्हाकेव्हा पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला किंवा अन्वेषण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला, ज्या कोणत्याही अपराधाचे अन्वेषण करण्यास तो प्राधिकृत झाला असेल त्याचे अन्वेषण करण्याच्या प्रयोजनार्थ आवश्यक असलेली कोणतीही वस्तू तो ज्याचा अंमलदार आहे किंवा ज्याच्याशी संलग्न आहे त्या पोलीस ठाण्याच्या हद्दींच्या आतील कोणत्याही जागी सापडू शकेल व अशी वस्तू आपल्या मते गैरवाजवी विलंबाशिवाय अन्यथा मिळविणे शक्य नाही असे समजण्यास वाजवी आधारकारणे असतील तेव्हा, असा अधिकारी तसा आपला समज होण्याची आधारकारणे लेखी नोंदवून शक्य असेल तेथवर अशा लेखात, ज्या वस्तूसाठी झडती घ्यावयाची ती विनिर्दिष्ट करून नंतर, अशा वस्तूसाठी अशा ठाण्याच्या हद्दींच्या आतील कोणत्याही जागेची स्वत: किंवा दुसऱ्याकरवी झडती घेईल.

(२) पोटकलम (१) खाली कार्यवाही करणारा पोलीस अधिकारी, व्यवहार्य असेल तर, जातीने झडतीचे काम चालवील.

(३) जर तो जातीने झडती घेण्यास असमर्थ असून झडती घेण्यास सक्षम अशी अन्य कोणीही व्यक्ती त्यावेळी उपस्थित नसेल तर, तो तसे करण्याची आपली कारणे लेखी नोंदवून, आपणास दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला झडती घेण्यास फर्मावू शकेल, आणि अशा दुय्यम अधिकाऱ्याकडे तो झडती घ्यावयाची जागा आणि शक्य असेल तेथवर, ज्या वस्तूसाठी झडती घ्यावयाची आहे तो विनिर्दिष्ट करून लेखी आदेश देईल; आणि अशा दुय्यम अधिकाऱ्यास तदनंतर अशा वस्तूसाठी अशा जागी झडती घेता येईल.

(४) झडती-वॉरंटाबाबतचे या संहितेतील उपबंध आणि झडतीबाबत कलम १०० मध्ये अंतर्भूत असलेले सर्वसाधारण उपबंध हे, शक्य तेथवर, या कलमाखाली घेतल्या जाणाऱ्या झडतीस लागू असतील.

(५) पोटकलम (१) किंवा पोटकलम (३) खाली केलेल्या कोणत्याही नोंदीच्या प्रती, त्या अपराधाची दखल घेण्याची शक्ती प्रदान झालेल्या सर्वात जवळच्या दंडाधिकाऱ्याकडे तात्काळ पाठवण्यात येतील, आणि झडती घेतलेल्या जागेच्या मालकाला किंवा ताबाधारकाला त्याच्या अर्जावरून त्या नोंदीची एक प्रत विनामूल्य पुरवली जाईल.

**एका पोलीस ठाणे अंमलदार अधिकाऱ्याला अशा दुसऱ्या अधिकाऱ्याकडे झडती-वॉरंट काढण्याची मागणी केव्हा करता येईल.**

**१६६.** (१) अन्वेषण करणाऱ्या पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला किंवा फौजदाराहून खालचा दर्जा नसलेल्या पोलीस अधिकाऱ्याला, ज्या प्रकरणी तो अधिकारी झडती करवू शकला असता त्या प्रकरणी अन्य पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याकडे—मग तो त्याच जिल्ह्यातील असो वा वेगळ्या जिल्ह्यातील असो-त्याच्या ठाण्याच्या हद्दींच्या आत कोणत्याही जागी अशी झडती करवण्याची मागणी करता येईल.

(२) याप्रमाणे मागणी करण्यात आल्यावर असा अधिकारी कलम १६५, च्या उपबंधानुसार कार्यवाही करील व जर कोणतीही वस्तू सापडली तर ज्याच्या विनंतीवरून झडती घेण्यात आली त्या अधिकाऱ्याकडे तो ती वस्तू पाठवील.

(३) जेव्हाकेव्हा पोटकलम (१) खाली झडती घेण्यासाठी अन्य पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याकडे मागणी करण्यामुळे होणाऱ्या विलंबाच्या परिणामी, अपराध करण्यात आल्याचा पुरावा लपविला किंवा नष्ट केला जाईल असे सकारण वाटत असेल तेव्हा, या प्रकरणाखाली अन्वेषण करणाऱ्या पोलीस ठाणे अंमलदार अधिकाऱ्याने किंवा पोलीस अधिकाऱ्याने अन्य पोलीस ठाण्याच्या हद्दींच्या आतील कोणत्याही जागी, जणू काही अशी जागा आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दींच्या आत आहे असे समजून कलम १६५ च्या उपबंधांनुसार झडती घेणे किंवा घेववणे कायदेशीर असेल.

(४) पोटकलम (३) खाली झडतीचे काम चालवणारा कोणताही अधिकारी ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दींच्या आत अशी जागा स्थित असेल त्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला तात्काळ झडतीची नोटीस पाठवील आणि कलम १०० खाली जर कोणतीही यादी तयार केलेली असेल तर अशा नोटिशीसोबत तिची एक प्रतही पाठवील व तसेच अपराधाची दखल घेण्याची शक्ती प्रदान झालेल्या सर्वांत जवळच्या दंडाधिकाऱ्याकडेही कलम १६५ ची पोटकलमे (१) व (३) यांमध्ये निर्दिष्ट केलेल्या नोंदींच्या प्रती पाठवील.

(५) झडती घेतलेल्या जागेच्या मालकाने किंवा ताबाधारकाने अर्ज केल्यावर त्याला पोटकलम (४) खाली दंडाधिकाऱ्याकडे पाठवलेल्या कोणत्याही नोंदीची प्रत विनामूल्य पुरविली जाईल.

भारताबाहेरील एखाद्या देशामध्ये किंवा ठिकाणी अन्वेषण करण्याकरता सक्षम प्राधिकरणास विनंतीपत्र.

[1]१६६क. (१) या संहितेत काहीही अंतर्भूत असले तरी, अन्वेषण अधिकाऱ्याने किंवा अन्वेषण अधिकाऱ्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने एखाद्या अपराधाच्या अन्वेषणाच्या ओघात, भारताबाहेरील एखाद्या देशामध्ये किंवा ठिकाणी पुरावा उपलब्ध होऊ शकेल असा अर्ज केल्यास, कोणतेही फौजदारी न्यायालय, त्या प्रकरणातील तथ्ये व परिस्थिती माहीत असल्याचे समजण्यात येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची मौखिक तपासणी करण्याची व अशा तपासणीच्या ओघात तिने केलेली विधाने अभिलिखित करण्याची व अशा व्यक्तीस किंवा इतर कोणत्याही व्यक्तीस तिच्या कब्जात असेल असा, त्या प्रकरणाशी संबंधित कोणताही दस्तऐवज किंवा वस्तू हजर करण्यास फर्मावण्याची आणि असे घेतलेले किंवा गोळा केलेले सर्व पुरावे किंवा त्यांच्या अधिप्रमाणित प्रती किंवा अशा गोळा केलेल्या वस्तू असे पत्र निर्गमित करणाऱ्या न्यायालयाकडे पाठविण्याची विनंती करणारे पत्र, अशा विनंतीबाबत कार्यवाही करण्यास सक्षम असलेल्या त्या देशांतील किंवा त्या ठिकाणच्या एखाद्या न्यायालयाला किंवा प्राधिकरणाला निर्गमित करू शकेल.

(२) केंद्र शासन याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा रीतीने ते विनंतीपत्र पुढे पाठवण्यात येईल.

(३) पोटकलम (१) अन्वये अभिलिखित केलेले प्रत्येक विधान किंवा मिळवलेला दस्तऐवज किंवा वस्तू, या प्रकरणाखालील अन्वेषणाच्या ओघात गोळा केलेला पुरावा असल्याचे मानले जाईल.

भारताबाहेरील एखाद्या देशाकडून किंवा ठिकाणाकडून भारतातील एखाद्या न्यायालयाला किंवा, प्राधिकरणाला अन्वेषणासाठी विनंतीपत्र.

१६६ख. (१) भारताबाहेरील एखाद्या देशातील किंवा ठिकाणच्या असे पत्र निर्गमित करण्यास सक्षम असलेल्या एखाद्या न्यायालयाकडून किंवा प्राधिकरणाकडून, त्या देशात किंवा त्या ठिकाणी अन्वेषणाधीन असलेल्या एखाद्या अपराधाच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीची तपासणी करण्याकरता किंवा कोणताही दस्तऐवज किंवा वस्तू हजर करण्याकरता विनंती करणारे पत्र मिळाल्यावर, केंद्र शासन, त्याला योग्य वाटल्यास,—

(एक) ते पत्र मुख्य महानगर दंडाधिकाऱ्याकडे किंवा मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याकडे किंवा याबाबतीत तो नियुक्त करील अशा महानगर दंडाधिकाऱ्याकडे किंवा न्याय दंडाधिकाऱ्याकडे अग्रेषित करू शकेल. तो दंडाधिकारी त्यानंतर अशा व्यक्तीला आपल्या समोर समन्सद्वारे बोलावील व त्याचे निवेदन अभिलिखित करील किंवा तिला दस्तऐवज किंवा वस्तू सादर करावयास लावील;

किंवा

(दोन) ते पत्र अन्वेषणाकरता कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडे पाठवू शकेल. त्यानंतर तो अधिकारी अपराध जणू काही भारतातच घडला असावा अशा रीतीने त्या अपराधाचे अन्वेषण करील.

(२) पोटकलम (१) अन्वये घेतलेले किंवा गोळा केलेले सर्व पुरावे, किंवा त्यांच्या अधिप्रमाणित प्रती किंवा अशी गोळा केलेली वस्तू, दंडाधिकाऱ्याकडून किंवा प्रकरणपरत्वे, पोलीस अधिकाऱ्याकडून केंद्र शासनाकडे, केंद्र शासनाला योग्य वाटेल अशा रीतीने ती विनंती करणारे पत्र पाठवणाऱ्या न्यायालयाकडे किंवा प्राधिकरणाकडे, पुढे पाठवण्यासाठी पाठवण्यात येईल.]

जेव्हा अन्वेषण चोवीस तासांत संपवणे शक्य नसेल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.

*१६७. (१) जेव्हाकेव्हा कोणत्याही व्यक्तीला अटक करण्यात येऊन तिला हवालातीत स्थानबद्ध केलेले असेल व कलम ५७ द्वारे निश्चित केल्यानुसार चोवीस तासांच्या कालावधीत अन्वेषण पूर्ण होऊ शकत नसेल आणि आरोपाला किंवा खबरीला भक्कम आधार आहे असे समजण्यास कारणे असतील तेव्हा, पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकारी किंवा अन्वेषण करणारा पोलीस अधिकारी, जर तो फौजदाराहून खालच्या दर्जाचा नसेल तर, त्या प्रकरणासंबंधीच्या यात यापुढे विहित केलेल्या रोजनाम्यातील नोंदींची प्रत तात्काळ सर्वांत जवळच्या न्याय दंडाधिकाऱ्याकडे रवाना करील व त्याचवेळी आरोपीला अशा दंडाधिकाऱ्याकडे पाठवील.

---

१. १९९० चा अधिनियम १०, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

*१९७८ चा अधिनियम ४५-क. १४ :—

"या अधिनियमाद्वारे विशोधित केलेल्या अशा कलम १६७ चे उपबंध हे, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी प्रलंबित असलेल्या प्रत्येक अन्वेषणाला लागू होतील—मात्र आरोपी व्यक्तीच्या पोलीस हवालातीव्यतिरिक्त अन्य स्थानबद्धतेचा कालावधी अशा प्रारंभाच्या वेळी साठ दिवसांपेक्षा अधिक झालेला असू नये."

(२) या कलमाखाली आरोपीला ज्या दंडाधिकाऱ्याकडे पाठवलेले असेल त्याला त्या प्रकरणाची संपरीक्षा करण्याची अधिकारिता असो वा नसो—अशा दंडाधिकाऱ्यास स्वत:ला योग्य वाटेल अशा हवालातीत एकूण जास्तीत जास्त पंधरा दिवसांएवढ्या मुदतीपर्यंत आरोपीला स्थानबद्ध करणे हे प्राधिकृत करता येईल ; आणि जर त्याला प्रकरणाची संपरीक्षा करण्याची किंवा ते संपरीक्षेसाठी सुपूर्द करण्याची अधिकारिता नसेल व आणखी स्थानबद्धता त्यास अनावश्यक वाटत असेल तर, तो आरोपीला अशी अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे पाठवण्याचा आदेश देऊ शकेल :

परंतु,—

[१][(क) जर आरोपी व्यक्तीला पोलीस हवालातीव्यतिरिक्त अन्यथा पंधरा दिवसांच्या मुदतीपेक्षा अधिक काळ स्थानबद्ध करून ठेवण्यास पुरेशी आधारकारणे अस्तित्वात आहेत अशी दंडाधिकाऱ्याची खात्री झाली तर, त्याला तसे करता येईल, पण कोणताही दंडाधिकारी,—

(एक) मृत्यु, आजीव कारावास किंवा किमान दहा वर्षे मुदतीचा कारावास या शिक्षेस पात्र असणाऱ्या अपराधाशी अन्वेषण संबंधित असेल त्या बाबतीत, एकूण नव्वद दिवसांच्या;

(दोन) अन्वेषण इतर कोणत्याही अपराधाशी संबंधित असेल त्या बाबतीत, एकूण साठ दिवसांच्या ;

कालावधीपेक्षा अधिक काळ, आरोपी व्यक्तीला या परिच्छेदाअन्वये हवालातीत स्थानबद्ध करण्यास प्राधिकृती देणार नाही आणि, नव्वद दिवसांचा किंवा, प्रकरणपरत्वे, साठ दिवसांचा उक्त कालावधी समाप्त झाल्यानंतर आरोपी व्यक्ती जामीन देण्यास तयार असेल व जामीन देईल तर तिला जामिनावर बंधमुक्त करण्यात येईल आणि या पोटकलमाखाली जामिनावर बंधमुक्त करण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती ३३ व्या प्रकरणाच्या प्रयोजनार्थ त्या प्रकरणाच्या उपबंधाखाली अशाप्रकारे बंधमुक्त करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल ; ]

(ख) कोणताही दंडाधिकारी त्याच्यासमोर आरोपी आणला गेल्याशिवाय त्या कलमाखाली त्याला कोणत्याही हवालातीत स्थानबद्ध करण्यास प्राधिकृती देणार नाही;

(ग) ज्याला उच्च न्यायालयाने यासंबंधात खास शक्ती प्रदान केलेली नाही असा कोणताही द्वितीय वर्ग दंडाधिकारी पोलीस हवालातीतील स्थानबद्धतेस प्राधिकृती देणार नाही.

[२][**स्पष्टीकरण १.**—शंका उद्भवू नयेत म्हणून याद्वारे असे घोषित करण्यात येते की, परिच्छेद (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाला तरीही, आरोपी जोपर्यंत जामीन पुरवत नाही तोपर्यंत त्याला हवालातीत ठेवण्यात येईल.]

[२][**स्पष्टीकरण २.**]—परिच्छेद (ख) खाली आवश्यक केल्याप्रमाणे आरोपी व्यक्तीला दंडाधिकाऱ्यासमोर हजर केले होते किंवा कसे याबाबत कोणताही प्रश्न उद्भवला तर, आरोपी व्यक्तीला हजर केले होते ही गोष्ट स्थानबद्धतेस प्राधिकृती देणाऱ्या आदेशावरील तिच्या स्वाक्षरीवरुन सिद्ध करता येईल.

[३][(२क) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला किंवा अन्वेषण करणारा पोलीस अधिकारी हा फौजदाराहून खालच्या दर्जाचा नसेल तर, त्या पोलीस अधिकाऱ्याला न्याय दंडाधिकारी उपलब्ध नसेल तेव्हा त्या प्रकरणासंबंधी, यात यापुढे विहित केलेल्या रोजनाम्यात केलेल्या नोंदीची प्रत ज्याला दंडाधिकाऱ्याचे किंवा महानगर दंडाधिकाऱ्याच्या शक्ती ज्याला प्रदान करण्यात आल्या असतील अशा, सर्वात जवळच्या कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडे रवाना करता येईल आणि तो त्याचवेळी आरोपीला अशा कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडे पाठवील, आणि त्यानंतर असा कार्यकारी दंडाधिकारी कारणे लेखी नमूद करुन, त्याला योग्य वाटेल अशा हवालातीमध्ये एकूण जास्तीत जास्त सात दिवस इतक्या मुदतीपर्यंत आरोपी व्यक्तीला स्थानबद्ध करण्यास प्राधिकृती देऊ शकेल; आणि अशा प्रकारे प्राधिकृत केलेल्या स्थानबद्धतेचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, आरोपी व्यक्तीला जामिनावर सोडण्यात येईल,—मात्र आरोपी व्यक्तीला आणखी काही काळ स्थानबद्ध करण्याचा आदेश देण्यास सक्षम असलेल्या दंडाधिकाऱ्याने असा आदेश दिलेला असेल तर गोष्ट अलाहिदा; आणि अशा आणखी स्थानबद्धतेचा आदेश काढण्यात आलेला असेल त्याबाबतीत, या पोटकलमाखाली कार्यकारी दंडाधिकाऱ्याने काढलेल्या आदेशांखाली आरोपी व्यक्तीला ज्या कालावधीत हवालातीत स्थानबद्ध करण्यात आले होते तो कालावधी पोटकलम (२) च्या परंतुकाचा परिच्छेद (क) यामध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी मोजताना हिशेबात घेण्यात येईल :

परंतु, पूर्वोक्त कालावधी समाप्त होण्यापूर्वी कार्यकारी दंडाधिकारी, त्याच्याकडे पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याने किंवा, प्रकरणपरत्वे, अन्वेषण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने त्या प्रकरणासंबंधीच्या रोजनाम्यामधील नोंदीची जी प्रत पाठवली होती त्या प्रतीसह प्रकरणाचे कागदपत्र सर्वात जवळच्या न्याय दंडाधिकाऱ्याकडे रवाना करील.]

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम १३ (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १३ (ख) द्वारे हे स्पष्टीकरण समाविष्ट केले व मूळ स्पष्टीकरणाला 'स्पष्टीकरण २' असा नवीन क्रमांक दिला (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १३ (ग) द्वारे घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

(३) या कलमाखाली पोलीस हवालातीतील स्थानबद्धता प्राधिकृत करणारा दंडाधिकारी तसे करण्याची आपली कारणे नमूद करील.

(४) असा आदेश देणारा कोणताही, मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याहून अन्य दंडाधिकारी आपल्या आदेशाची एक प्रत तो आदेश देण्यामागील आपल्या कारणांसह मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याकडे पाठवील.

(५) दंडाधिकाऱ्याला समन्स—खटला म्हणून संपरीक्षा करता येण्याजोग्या अशा कोणत्याही प्रकरणी, जर आरोपीला अटक केल्याच्या दिवसापासून सहा महिन्यांच्या कालावधीत अन्वेषण संपले नाही, तर दंडाधिकारी अपराधाचे त्यापुढील अन्वेषण थांबवण्याचा आदेश देईल—मात्र, विशेष कारणास्तव व न्याय-हितार्थ सहा महिन्यांच्या कालावधीच्या पलीकडे अन्वेषण चालू ठेवणे जरुरीचे आहे अशी अन्वेषण करणाऱ्या अधिकाऱ्याने दंडाधिकाऱ्याची खात्री पटवली तर गोष्ट अलाहिदा.

(६) पोटकलम (५) खाली अपराधाचे पुढील अन्वेषण थांबवण्याचा आदेश देण्यात आला असेल त्या बाबतीत, अपराधाचे पुढील अन्वेषण करावयास हवे अशी आपणांकडे आलेल्या अर्जावरुन किंवा अन्यप्रकारे सत्र न्यायाधीशाची खात्री झाली तर, तो पोटकलम (५) खाली दिलेला आदेश विलोपित करू शकेल आणि जामीन व अन्य बाबी यांविषयी तो विनिर्दिष्ट करील अशा निदेशांच्या अधीनतेने, अपराधाचे पुढील अन्वेषण करण्याचे निदेशित करू शकेल.

**दुय्यम पोलीस अधिकाऱ्याकडून अन्वेषणाचा अहवाल.**

१६८. जेव्हा कोणत्याही दुय्यम पोलीस अधिकाऱ्याने या प्रकरणाखाली कोणतेही अन्वेषण केले असेल तेव्हा, तो पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला अशा अन्वेषणातून काय निष्पन्न झाले त्याचा अहवाल देईल.

**जेव्हा पुरावा अपुरा असेल तेव्हा आरोपीची बंध-मुक्तता.**

१६९. जर आरोपीला दंडाधिकाऱ्याकडे पाठवणे समर्थनीय होण्याइतपत पुरेसा पुरावा किंवा संशयास वाजवी आधार नाही असे या प्रकरणाखालील अन्वेषणान्ती पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला दिसून आले तर, अशी व्यक्ती हवालातीत असल्यास पोलीस अहवालावरुन अपराधाची दखल घेण्याचा व आरोपीची संपरीक्षा करण्याचा किंवा त्याला संपरीक्षेसाठी सुपूर्द करण्याची शक्ती प्रदान झालेल्या दंडाधिकाऱ्यासमोर त्या व्यक्तीने, तिला तसे फर्मावण्यात आल्यास व येईल तेव्हा उपस्थित होण्याबाबत जामीनदारांसहित किंवा त्यांच्याविना असे बंधपत्र निष्पादित केल्यावर असा अधिकारी तिला बंधमुक्त करील.

**जेव्हा पुरावा पुरेसा असेल तेव्हा दंडाधिकाऱ्याकडे पाठवावयाची प्रकरणे.**

१७०. (१) जर पूर्वोक्त असा पुरेसा पुरावा किंवा वाजवी आधार आहे असे या प्रकरणाखालील अन्वेषणान्ती पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला दिसून आले तर असा अधिकारी बंदोबस्तानिशी आरोपीला पोलीस अहवालावरुन अपराधाची दखल घेण्याची व आरोपीची संपरीक्षा करण्याची किंवा त्याला संपरीक्षेसाठी पाठवण्याची शक्ती प्रदान झालेल्या दंडाधिकाऱ्याकडे पाठवील अथवा जर अपराध जामीनपात्र असेल व आरोपी जामीन देण्यास समर्थ असेल तर, दंडाधिकारी त्याच्याकडून, निश्चित केलेल्या दिवशी अशा दंडाधिकाऱ्यापुढे त्याने उपस्थित होण्यासाठी व अन्य निदेश दिला जाईपर्यंत अशा दंडाधिकाऱ्यापुढे त्याने रोजच्या रोज समक्ष हजर राहण्यासाठी जामीन घेईल.

(२) जेव्हा पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकारी या कलमाखाली आरोपीला दंडाधिकाऱ्याकडे पाठवील किंवा अशा दंडाधिकाऱ्यासमोर तो उपस्थित व्हावा यासाठी जामीन घेईल तेव्हा, तो अशा दंडाधिकाऱ्यासमोर जे कोणतेही हत्यार किंवा अन्य वस्तू हजर करणे जरुरीचे असेल ते त्याच्याकडे पाठवील आणि फिर्यादादाराने (कोणी असल्यास) त्या प्रकरणाची तथ्ये व परिस्थिती यांची ज्यांना माहिती आहे असे अशा अधिकाऱ्याला वाटत असेल अशांपैकी त्याला आवश्यक वाटतील तेवढ्या व्यक्तींनी निदेशित करण्यात आल्यानुसार दंडाधिकाऱ्यासमोर उपस्थित होण्यासाठी आणि आरोपीविरुद्ध असलेल्या दोषारोपाबाबत फिर्याद चालवण्यासाठी किंवा (प्रकरणपरत्वे) साक्षीपुरावा देण्यासाठी बंधपत्र निष्पादित करावे असे फर्मावील.

(३) जर बंधपत्रात मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाचा उल्लेख केलेला असेल तर अशा न्यायालयाच्या उल्लेखात असा दंडाधिकारी ज्याच्याकडे ते प्रकरण चौकशीसाठी किंवा संपरीक्षेसाठी निर्देशित करील अशा कोणत्याही न्यायालयाचा समावेश असल्याचे मानले जाईल—मात्र अशा फिर्यादादाराला किंवा व्यक्तींना निर्देशनाची वाजवी नोटीस देण्यात आली असली पाहिजे.

(४) ज्याच्या समक्ष बंधपत्र निष्पादित केलेले असेल तो अधिकारी त्याची एक प्रत ज्या व्यक्तींनी ते निष्पादित केले त्यांच्यापैकी एका व्यक्तीकडे सुपूर्द करील आणि नंतर मूळ लेख आपल्या अहवालासह दंडाधिकाऱ्याकडे पाठवील.

**फिर्यादादार किंवा साक्षीदार यांना पोलीस अधिकाऱ्या-बरोबर जाण्यास भाग पाडता कामा नये व त्यांच्यावर निर्बंध लादता कामा नयेत.**

१७१. कोणताही फिर्यादादार किंवा साक्षीदार कोणत्याही न्यायालयाकडे जाण्याच्या मार्गावर असताना त्याला पोलीस अधिकाऱ्याबरोबर जाण्यास भाग पाडता कामा नये अथवा अनावश्यक निर्बंध किंवा गैरसोय सोसावयास लावता कामा नये अथवा त्याच्या उपस्थितीसाठी त्याच्या जातमुचलक्या-व्यतिरिक्त अन्य कोणताही जामीन देण्यास त्याला भाग पाडता कामा नये:

परंतु, जर कोणत्याही फिर्यादादाराने किंवा साक्षीदाराने समक्ष हजर राहण्यास किंवा कलम १७० खाली निर्देशित केल्याप्रमाणे बंधपत्र निष्पादित करण्यास नकार दिला तर, पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकारी त्याला बंदोबस्तानिशी दंडाधिकाऱ्याकडे पाठवू शकेल व तो असे बंधपत्र निष्पादित करीपर्यंत किंवा प्रकरणाची सुनावणी पुरी होईपर्यंत दंडाधिकारी त्याला हवालातीत स्थानबद्ध करू शकेल.

१७२. (१) या प्रकरणाखाली अन्वेषण करणारा प्रत्येक पोलीस अधिकारी रोजनाम्यात कोणत्या वेळी त्याला खबर मिळाली, कोणत्या वेळी त्याने आपल्या अन्वेषणास सुरुवात केली व ते केव्हा संपवले, कोणत्या स्थळाला किंवा स्थळांना त्याने भेट दिली हे नमूद करून अन्वेषणातील आपल्या कार्यवाहीची व आपल्या अन्वेषणातून ज्या परिस्थितीची खातरजमा झाली तिच्याबाबत निवेदनाची रोजच्या रोज नोंद करील. अन्वेषणातील कार्यवाहीचा रोजनामा.

(२) कोणत्याही फौजदारी न्यायालयाला अशा न्यायालयात चौकशी किंवा संपरीक्षा चालू असलेल्या प्रकरणाविषयीचे पोलीस रोजनामे मागवता येतील व असे रोजनामे प्रकरणातील पुरावा म्हणून नव्हे तर अशा चौकशीच्या किंवा संपरीक्षेच्या कामी आपल्याला मदत म्हणून वापरता येतील.

(३) आरोपी किंवा त्याचे प्रतिनिधीही असे रोजनामे मागवण्यास हक्कदार असणार नाहीत, तसेच केवळ न्यायालयाने त्यांचा निर्देश केला आहे एवढ्यावरून ते बघण्यास तो किंवा ते हक्कदार होणार नाहीत; पण ज्या पोलीस अधिकाऱ्याने ते लिहिले त्याने जर आपल्या स्मृतीला उजाळा देण्यासाठी ते वापरले किंवा न्यायालयाने अशा पोलीस अधिकाऱ्याच्या कथनातील विरोध दाखवून देण्यासाठी ते वापरले तर, 'भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२' (१८७२ चा १) याच्या कलम १६१ किंवा, प्रकरणपरत्वे, कलम १४५ चे उपबंध लागू होतील.

१७३. (१) या प्रकरणाखालील प्रत्येक अन्वेषण अनावश्यक विलंब न लावता पुरे करावे लागेल. अन्वेषण पुरे झाल्यावर पोलीस अधिकाऱ्याचा अहवाल.

(२) (एक) ते पुरे होताच पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकारी पोलीस अहवालावरून अपराधाची दखल घेण्याची शक्ती प्रदान झालेल्या दंडाधिकाऱ्याकडे राज्य शासनाने विहित केलेल्या नमुन्यानुसार एक अहवाल पाठवील व त्यात पुढील गोष्टी निवेदन करण्यात येतील :—

(क) पक्षांची नावे ;

(ख) खबरीचे स्वरूप ;

(ग) ज्या व्यक्ती त्या प्रकरणाच्या परिस्थितीशी परिचित असल्याचे दिसते त्यांची नावे ;

(घ) एखादा अपराध घडला असल्याचे दिसते किंवा कसे व तसे असल्यास तो कोणी केला;

(ङ) आरोपीला अटक करण्यात आली आहे किंवा कसे;

(च) त्याला त्याच्या बंधपत्रावरून बंधमुक्त केले आहे किंवा कसे व तसे असल्यास जामीनदारासह की त्यांच्याविना;

(छ) कलम १७० खाली त्याला हवालातीत पाठवण्यात आले आहे की काय.

(दोन) अपराध घडल्याच्या संबंधातील वर्दी जिने प्रथम दिली अशी कोणी व्यक्ती असल्यास तिलाही तो अधिकारी आपण केलेली कार्यवाही राज्य शासन विहित करील अशा रीतीने कळवील.

(३) कलम १५८ खाली पोलिसातील वरिष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली असेल तेव्हा, राज्य शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे तसे निर्देशित केले असेल अशा कोणत्याही प्रकरणी अहवाल त्या अधिकाऱ्यामार्फत सादर करण्यात येईल व दंडाधिकाऱ्याचे आदेश होईतोवर तो पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकाऱ्याला पुढील अन्वेषण करण्याचा निदेश देऊ शकेल.

(४) आरोपीला त्याच्या बंधपत्रावरून बंधमुक्त करण्यात आले आहे असे जेव्हा केव्हा या कलमाखाली पाठवण्यात आलेल्या अहवालावरून दिसून येईल तेव्हा, दंडाधिकारी आपणास योग्य वाटेल त्याप्रमाणे असे बंधपत्र विसर्जित करण्याचा किंवा अन्य प्रकारचा आदेश देईल.

(५) जेव्हा असा अहवाल कलम १७० ज्याला लागू आहे त्या प्रकरणाबाबत असेल तेव्हा, पोलीस अधिकारी दंडाधिकाऱ्याकडे अहवालासोबत पुढील कागदपत्र पाठवील, ते असे :—

(क) फिर्यादीपक्षाने ज्यांचा आधार घेण्याचे ठरवले असेल असे, अन्वेषण चालू असताना दंडाधिकाऱ्याकडे आधीच पाठवण्यात आले असतील ते सोडून अन्य सर्व दस्तऐवज किंवा त्यांतील संबद्ध उतारे ;

(ख) फिर्यादीपक्षाने आपले साक्षीदार म्हणून ज्यांना तपासण्याचे ठरवले असेल त्या सर्व व्यक्तींचे कलम १६१ खाली नोंदून घेतलेले जबाब.

(६) जर अशा कोणत्याही जबाबाचा कोणताही भाग कार्यवाहीच्या विषयवस्तूशी संबद्ध नाही किंवा आरोपीला तो उघड करणे हे न्यायहितार्थ अत्यावश्यक नाही व लोकहिताच्या दृष्टीने असमयोचित आहे असे त्या पोलीस अधिकाऱ्याचे मत असेल तर, तो जबाबाचा तेवढा भाग निर्दिष्ट करून, आरोपीला द्यावयाच्या प्रतींमधून तो भाग वगळण्याची दंडाधिकाऱ्याला विनंती करणारी व अशी विनंती करण्यामागची आपली कारणे निवेदन करणारी टिप्पणी जोडील.

(७) जेव्हा प्रकरणाचे अन्वेषण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला सोयीचे वाटेल तेव्हा, तो आरोपीला पोटकलम (५) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही दस्तऐवजांच्या प्रती पुरवू शकेल.

(८) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे पोटकलम (२) खाली दंडाधिकाऱ्याकडे अहवाल पाठवण्यात आल्यानंतर अपराधाबाबत पुढील अन्वेषण करण्यास प्रत्यवाय होतो असे मानले जाणार नाही व जेथे अशा अन्वेषणानंतर पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला आणखी तोंडी किंवा कागदोपत्री पुरावा मिळेल तेव्हा, तो विहित नमुन्यानुसार अशा पुराव्याविषयीचा अहवाल किंवा त्याविषयीचे अहवाल दंडाधिकाऱ्याकडे पाठवील, व पोटकलमे (२) ते (६) यांचे उपबंध जसे पोटकलम (२) खाली पाठवलेल्या अहवालाच्या संबंधात लागू होतात तसे ते अशा अहवालाच्या किंवा अहवालांच्या संबंधात शक्य तेथवर लागू असतील.

**आत्महत्त्या, इत्यादी-बाबत पोलिसांनी चौकशी करणे व अहवाल देणे.** १७४. (१) एखाद्या व्यक्तीने आत्महत्या केलेली आहे अथवा दुसऱ्याकडून किंवा एखाद्या जनावराकडून किंवा यंत्राद्वारे किंवा अपघाताने तिची हत्या घडून आलेली आहे अथवा अशा परिस्थितीत ती मृत्यू पावली आहे की, अन्य एखाद्या व्यक्तीने अपराध केलेला असावा असा वाजवी संशय निर्माण होतो अशी जेव्हा पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला किंवा राज्य शासनाने त्यासंबंधात खास शक्ती प्रदान केलेल्या अन्य एखाद्या पोलीस अधिकाऱ्याला खबर मिळेल तेव्हा, मरणान्वेषण करण्याची शक्ती प्रदान झालेल्या सर्वात जवळच्या कार्यकारी दंडाधिकाऱ्याला तो तात्काळ त्याची सूचना देईल आणि राज्य शासनाने विहित केलेल्या कोणत्याही नियमाद्वारे अथवा जिल्हा किंवा उप-विभागीय दंडाधिकाऱ्याच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अन्यथा निदेशित करण्यात आले नसेल तर, जेथे अशा मृत व्यक्तीचा देह असेल त्या जागी तो जाईल व तेथे जवळपासच्या दोन किंवा अधिक प्रतिष्ठित रहिवाश्यांच्या समक्ष अन्वेषण करील व त्या मृतदेहावर जेथे कोठे जखमा झाल्याचे, हाड मोडल्याचे, अंग खरचटल्याचे आणि दुखापतीच्या इतर खुणा असल्याचे आढळून येईल त्यांचे वर्णन व कशा प्रकारे किंवा कोणत्या हत्यारामुळे किंवा साधनामुळे (वापरले असल्यास) अशा खुणा झाल्या असल्याचे दिसते ते नमूद करून मृत्यूच्या दर्शनी कारणांचा अहवाल तयार करील.

(२) पोलीस अधिकारी व अन्य व्यक्ती यांना किंवा त्यांच्यापैकी जितक्या व्यक्ती त्या अहवालाशी सहमत असतील तितक्या व्यक्तींना त्यावर स्वाक्षरी करावी लागेल व तो तात्काळ जिल्हा दंडाधिकाऱ्याकडे किंवा उप-विभागीय दंडाधिकाऱ्याकडे पाठवला जाईल.

(३) [१][जेव्हा—

(एक) ते प्रकरण एखाद्या स्त्रीने तिचा विवाह झाल्यापासून सात वर्षांच्या आत आत्महत्या केल्यासंबंधीचे असेल तेव्हा; किंवा

(दोन) ते प्रकरण एखाद्या स्त्रीचा विवाह झाल्यापासून सात वर्षांच्या आत अशा कोणत्याही परिस्थितीत तिचा मृत्यू घडण्यासंबंधीचे असेल की, ज्या परिस्थितीत अशा स्त्रीच्या संबंधात दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने अपराध केलेला असावा असा वाजवी संशय निर्माण होऊ शकतो तेव्हा; किंवा

(तीन) ते प्रकरण एखाद्या स्त्रीचा विवाह झाल्यापासून सात वर्षांच्या आत तिचा मृत्यू घडण्यासंबंधीचे असेल आणि त्या स्त्रीच्या कोणत्याही नातलगाने विनंती केली असेल तेव्हा; किंवा

(चार) मृत्यूच्या कारणांविषयी कोणताही संशय असेल तेव्हा; किंवा

(पाच) इतर कोणत्याही कारणासाठी पोलीस अधिकाऱ्याला तसे करणे समयोचित वाटेल तेव्हा]

राज्य शासन यासंबंधात विहित करील अशा नियमांच्या अधीनतेने, तो पोलीस अधिकारी त्या मृतदेहाची तपासणी केली जावी या हेतूने सर्वात जवळच्या जिल्हा शल्यचिकित्सकाकडे किंवा राज्य शासनाने यासंबंधात नियुक्त केलेल्या अन्य अर्हताप्राप्त वैद्यकीय तज्ञाकडे तो मृतदेह पाठवील—मात्र जेणेकरून अशी तपासणी निरुपयोगी होईल इतपत तो मृतदेह वाटेत कुजेल असा धोका न पत्करता तो याप्रमाणे पाठवणे शक्य व्हावे अशा प्रकारे हवामानाची स्थिती व अंतर अनुकूल असावे.

(४) मरणान्वेषण करण्यास पुढील दंडाधिकाऱ्यांना शक्ती प्रदान करण्यात आली आहे, ते असे:—

कोणताही जिल्हा दंडाधिकारी किंवा उप-विभागीय दंडाधिकारी व राज्य शासनाने किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याने यासंबंधात खास शक्ती प्रदान केलेला अन्य कोणताही कार्यकारी दंडाधिकारी.

**व्यक्तींना समन्स पाठवण्याची शक्ती.** १७५. (१) कलम १७४ खाली कार्यवाही करणारा पोलीस अधिकारी लेखी आदेशाद्वारे अशा पूर्वोक्त दोन किंवा अधिक व्यक्तींना उक्त अन्वेषणाच्या प्रयोजनार्थ व जी प्रकरणाच्या तथ्यांशी परिचित असल्याचे दिसत असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीला समन्स पाठवू शकेल व याप्रमाणे समन्स पाठवण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती समक्ष हजर होण्यास व ज्यांच्या उत्तरामुळे तिला फौजदारीपात्र आरोपाला किंवा शिक्षेला किंवा समपहरणाला पात्र व्हावे लागण्याची शक्यता आहे अशा प्रश्नांहून अन्य सर्व प्रश्नांची खरेपणाने उत्तरे देण्यास बांधलेली असेल.

---

१. १९८३ चा अधिनियम ४६, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

(२) ज्याला कलम १७० लागू आहे असा दखलपात्र अपराध तथ्यांवरून उघडकीस आला नाही तर, पोलीस अधिकाऱ्याकडून अशा व्यक्तींना दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयात समक्ष हजर होण्यास फर्मावण्यात येणार नाही.

१७६. (१) [1][ जेव्हा एखादी व्यक्ती पोलिसांच्या हवालातीत असताना मृत्यू पावली असेल किंवा ते प्रकरण कलम १७४-पोटकलम (३) चा खंड (एक) किंवा खंड (दोन) यांमध्ये निर्देशिलेल्या स्वरूपाचे असेल ] तेव्हा, मरणान्वेषण करण्याची शक्ती प्रदान झालेल्या सर्वांत जवळच्या दंडाधिकाऱ्याला कलम १७४ च्या पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या अन्य कोणत्याही प्रकरणी, याप्रमाणे शक्ती प्रदान झालेल्या कोणत्याही दंडाधिकाऱ्याला पोलीस अधिकाऱ्याने करावयाच्या अन्वेषणाच्या ऐवजी किंवा त्याशिवाय आणखी, मृत्यूच्या कारणाबाबत चौकशी करता येईल; व जर त्याने तसे केले तर, त्याला एखाद्या अपराधाची रीतसर चौकशी करताना ज्या शक्ती राहिल्या त्या सर्व शक्ती ती चौकशी चालवताना राहतील. मृत्यूच्या कारणाची दंडाधिकाऱ्याने चौकशी करणे.

(२) अशी चौकशी चालवणारा दंडाधिकारी त्यासंबंधात त्याने घेतलेला साक्षीपुरावा प्रकरणाच्या परिस्थितीप्रमाणे यात यापुढे विहित केलेल्या कोणत्याही रीतीने नोंदून घेईल.

(३) जिला आधीच पुरण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूचे कारण शोधून काढण्यासाठी तिच्या मृतदेहाची तपासणी करणे हे जेव्हा केव्हा अशा दंडाधिकाऱ्याला समयोचित वाटेल तेव्हा, दंडाधिकारी तो मृतदेह उकरावयास लावील व त्याची तपासणी करवील.

(४) जेव्हा या कलमाखाली चौकशी करावयाची असेल तेव्हा, दंडाधिकारी, व्यवहार्य असेल तेव्हा, मृताच्या ज्या नातलगांची नावे व पत्ते माहीत असतील त्यांना तसे कळवील व त्यांना चौकशीच्या वेळी उपस्थित राहण्याची मुभा देईल.

स्पष्टीकरण.—या कलमात, "नातलग" या शब्दप्रयोगाचा अर्थ, आईबाप, अपत्ये, भाऊ, बहिणी व पति वा पत्नी, असा आहे.

## प्रकरण तेरा

## चौकशी व संपरिक्षा याबाबत फौजदारी न्यायालयांची अधिकारिता

१७७. प्रत्येक अपराधाची चौकशी व संपरीक्षा सर्वसामान्यपणे ज्याच्या स्थानिक अधिकारितेत तो अपराध घडला होता त्या न्यायालयाकडून केली जाईल. चौकशीचे व संपरीक्षेचे सर्वसामान्य स्थळ.

१७८. (क) जेव्हा अनेक स्थानिक क्षेत्रांपैकी कोणत्या क्षेत्रात अपराध घडला हे अनिश्चित असेल तेव्हा, किंवा चौकशीचे किंवा संपरीक्षेचे स्थळ.

(ख) जेव्हा अपराध अंशत: एका स्थानिक क्षेत्रात व अंशत: अन्य स्थानिक क्षेत्रात घडला असेल तेव्हा, किंवा

(ग) जेव्हा अपराध सतत चालू राहणारा असा असेल व एकाहून अधिक स्थानिक क्षेत्रांत तो घडत राहिला असेल तेव्हा, किंवा

(घ) जेव्हा तो निरनिराळ्या स्थानिक क्षेत्रांत केलेल्या अनेक कृती मिळून झाला असेल तेव्हा अशांपैकी कोणत्याही स्थानिक क्षेत्रावर अधिकारिता असलेल्या न्यायालयाला त्याची चौकशी किंवा संपरीक्षा करता येईल.

१७९. विवक्षित कृत्य करण्यात आले व त्यामुळे विवक्षित परिणाम घडून आला या कारणास्तव ते कृत्य अपराध ठरत असेल तेव्हा, त्याची चौकशी किंवा संपरीक्षा ज्याच्या स्थानिक अधिकारितेत असे कृत्य करण्यात आले असेल किंवा असा परिणाम घडून आला असेल त्या न्यायालयाला करता येईल. जेथे कृत्य करण्यात आले असेल किंवा परिणाम घडून आला असेल त्या ठिकाणी अपराध संपरीक्षा-योग्य.

१८०. जेव्हा एखादी कृती अशा अन्य एखाद्या कृतीशी तिचा संबंध असल्याने अपराध ठरत असेल की जी कृती स्वयमेव अपराध आहे किंवा तिचा कर्ता अपराध करण्यास क्षम असता तर अपराध ठरू शकली असती असे असेल तेव्हा, प्रथम उल्लेखिलेल्या अपराधाची चौकशी किंवा संपरीक्षा ज्याच्या स्थानिक अधिकारितेत त्यांपैकी कोणतीही कृती करण्यात आली त्या न्यायालयाला करता येईल. एखादी कृती अन्य अपराधाशी तिचा संबंध असल्यामुळे त्याबाबतीतील संपरीक्षेचे स्थळ.

१८१. (१) ठग असणे, ठगाकडून खून होणे, दरवडा घालणे, खुनासह दरवडा घालणे, दरोडेखोरांच्या टोळीपैकी असणे किंवा हवालातीतून निसटणे अशा कोणत्याही अपराधाची चौकशी किंवा संपरीक्षा ज्यांच्या स्थानिक अधिकारितेत अपराध करण्यात आला असेल किंवा आरोपी सापडला असेल त्या न्यायालयाला करता येईल. विवक्षित अपराधांच्या बाबतीत संपरीक्षेचे स्थळ.

१. १९८३ चा अधिनियम ४६, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

(२) व्यक्तीचे अपनयन किंवा अपहरण करण्याच्या कोणत्याही अपराधाची चौकशी किंवा संपरीक्षा ज्याच्या स्थानिक अधिकारितेत व्यक्तीचे अपनयन किंवा अपहरण घडले किंवा तिला वाहनातून नेण्यात आले किंवा लपविण्यात आले किंवा स्थानबद्ध करण्यात आले त्या न्यायालयाला करता येईल.

(३) चोरी, बलाद्ग्रहण किंवा लूटमारी अशा कोणत्याही अपराधाची चौकशी किंवा संपरीक्षा ज्या न्यायालयाच्या स्थानिक अधिकारितेत तो अपराध घडला किंवा अपराधविषय असलेली चोरीची संपत्ती तो अपराध करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात अथवा जी चोरीची संपत्ती असल्याचे माहीत असताना किंवा तसे समजण्यास कारण असताना ज्या कोणत्याही व्यक्तीने अशी संपत्ती स्वीकारली किंवा ठेवून घेतली तिच्या कब्जात असेल त्या न्यायालयाला करता येईल.

(४) फौजदारीपात्र अपहाराच्या किंवा फौजदारीपात्र न्यासभंगाच्या कोणत्याही अपराधाची चौकशी किंवा संपरीक्षा ज्याच्या स्थानिक अधिकारितेत अपराध घडला अथवा अपराधविषय असलेल्या संपत्तीचा कोणताही भाग आरोपी व्यक्तीने स्वीकारला किंवा ठेवून घेतला अथवा तो परत केला जाण्याची किंवा त्याचा हिशेब दिला जाण्याची तिने मागणी केली त्या न्यायालयाला करता येईल.

(५) चोरीची संपत्ती कब्जात ठेवणे हे ज्यात समाविष्ट असेल अशा कोणत्याही अपराधाची चौकशी किंवा संपरीक्षा, ज्याच्या स्थानिक अधिकारितेत अपराध घडला किंवा ती चोरीची संपत्ती असल्याचे माहीत असताना किंवा तसे समजण्यास कारण असताना ज्या कोणत्याही व्यक्तीने ती स्वीकारली किंवा ठेवून घेतली त्या न्यायालयाला करता येईल.

पत्रे इत्यादींद्वारे केलेले अपराध.

१८२. (१) ज्यात ठकवणुकीचा समावेश आहे अशा कोणत्याही अपराधाची चौकशी किंवा संपरीक्षा, जर पत्रांद्वारे किंवा दूरसंचारण संदेशांद्वारे फसवणूक केली गेली असेल तर, ज्याच्या स्थानिक अधिकारितेत अशी पत्रे किंवा संदेश पाठवण्यात आले किंवा मिळाले त्या न्यायालयाला करता येईल; व ठकवणुकीच्या किंवा संपत्ती सुपूर्द करण्यास अप्रामाणिकपणे प्रवृत्त करण्याच्या कोणत्याही अपराधाची चौकशी किंवा संपरीक्षा, ज्याच्या स्थानिक अधिकारितेत फसवणूक झालेल्या व्यक्तीने संपत्ती देऊन टाकली किंवा आरोपी व्यक्तीने स्वीकारली त्या न्यायालयाला करता येईल.

(२) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या कलम ४९४ किंवा कलम ४९५ खाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची चौकशी किंवा संपरीक्षा ज्याच्या स्थानिक अधिकारितेत अपराध घडला किंवा अपराधी व्यक्ती पहिल्या विवाहातील आपल्या विवाहसाथीसह निकटपूर्वी राहत होती [1][किंवा पहिल्या विवाहातील पत्नीने अपराध घडल्यानंतर कायमचे वास्तव्य करण्यास प्रारंभ केला असेल] त्या न्यायालयाला करता येईल.

प्रवासात किंवा जलप्रवासात केलेला अपराध.

१८३. ज्या व्यक्तीने किंवा ज्या व्यक्तीविरुद्ध किंवा ज्या वस्तूबाबत अपराध केला त्या व्यक्तीचा किंवा वस्तूचा प्रवास किंवा जलप्रवास चालू असताना अपराध घडला असेल तेव्हा, त्या अपराधाची चौकशी किंवा संपरीक्षा, तो प्रवास किंवा जलप्रवास चालू असताना ज्याच्या स्थानिक अधिकारितेतून किंवा अधिकारितेत त्या व्यक्तीचे किंवा वस्तूचे मार्गक्रमण झाले त्या न्यायालयाला करता येईल.

एकत्रितपणे संपरीक्षायोग्य असलेल्या अपराधांच्या संपरीक्षेचे स्थळ.

१८४. जेव्हा—

(क) कोणत्याही व्यक्तीने केलेले अपराध असे असतील की, अशा प्रत्येक अपराधाबद्दल तिच्यावर कलम २१९, कलम २२० किंवा कलम २२१ च्या उपबंधांच्या आधारे दोषारोप ठेवता येईल व एका संपरीक्षेत तिची संपरीक्षा करता येईल; किंवा

(ख) अनेक व्यक्तींनी केलेला किंवा केलेले अपराध असे असतील की, कलम २२३ च्या उपबंधांच्या आधारे त्यांच्यावर एकत्रितपणे दोषारोप ठेवता यईल व संपरीक्षा करता येईल;

तेव्हा, त्या अपराधांची चौकशी किंवा संपरीक्षा त्यांपैकी कोणत्याही अपराधाची चौकशी किंवा संपरीक्षा करण्यास सक्षम असलेल्या कोणत्याही न्यायालयाला करता येईल.

निरनिराळ्या सत्र-विभागांत खटल्यांची संपरीक्षा करण्याचा आदेश देण्याची शक्ती.

१८५. या प्रकरणाच्या पूर्वगामी उपबंधांत काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही जिल्ह्यात संपरीक्षार्थ पाठविलेल्या अशा खटल्यांची किंवा अशा कोणत्याही प्रकारच्या खटल्यांची संपरीक्षा एखाद्या सत्र-विभागात करावी असे राज्य शासन निदेशित करू शकेल :

परंतु, असा निदेश संविधानाखाली किंवा या संहितेखाली किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखाली उच्च न्यायालयाने किंवा सर्वोच्च न्यायालयाने पूर्वी काढलेल्या कोणत्याही निदेशाला प्रतिकूल असू नये.

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम १५ द्वारे घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

१८६. जेव्हा दोन किंवा अधिक न्यायालयांनी त्याच अपराधाची दखल घेतलेली असेल आणि त्यांच्यापैकी कोणी त्या अपराधाची चौकशी किंवा संपरीक्षा करावयास हवी असा प्रश्न उद्भवला असेल तेव्हा,— शंका असल्यास, कोणत्या जिल्ह्यात चौकशी किंवा संपरीक्षा व्हावी ते उच्च न्यायालयाने ठरविणे.

(क) जर ती न्यायालये एकाच उच्च न्यायालयाला दुय्यम असतील तर, ते उच्च न्यायालय;

(ख) जर ती न्यायालये एकाच उच्च न्यायालयाला दुय्यम नसतील तर, त्याच्या अपीलीय फौजदारी अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांच्या आत प्रथम ती कार्यवाही सुरू झाली ते उच्च न्यायालय,

त्या प्रश्नाचा निर्णय करील व तद्नंतर त्या अपराधाबाबतची अन्य सर्व कार्यवाही थांबवण्यात येईल.

१८७. (१) जेव्हा प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्यास, आपल्या स्थानिक अधिकारितेतील कोणत्याही व्यक्तीने अशा अधिकारितेबाहेर (मग ते भारतात असो वा भारताबाहेर असो) कलमे १७७ ते १८५ (दोन्ही धरून) यांच्या उपबंधाखाली किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखाली अशा अधिकारितेत ज्याची चौकशी किंवा संपरीक्षा करणे शक्य नाही, पण त्या त्या काळी अंमलात असलेल्या एखाद्या कायद्याखाली भारतात संपरीक्षा करता येण्यासारखी आहे असा अपराध केला आहे असे सकारण वाटत असेल तेव्हा, जणू काही तो अपराध अशा अधिकारितेत केलेला असावा त्याप्रमाणे असा दंडाधिकारी त्याची चौकशी करू शकेल व यात यापूर्वी उपबंधित केलेल्या रीतीने अशा व्यक्तीला आपणांसमोर उपस्थित होण्याची सक्ती करू शकेल, आणि अशा अपराधाची चौकशी किंवा संपरीक्षा करण्याची अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे अशा व्यक्तीला पाठवू शकेल, किंवा जर, असा अपराध मृत्यूच्या किंवा आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र नसेल व या कलमाखाली कार्य करणाऱ्या दंडाधिकाऱ्याचे समाधान होईल असा जामीन देण्यास अशी व्यक्ती तयार व राजी असेल तर, अशी अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्यांपुढे तिने उपस्थित होण्यासाठी तिच्याकडून जामीनदारांसहित किंवा त्यांच्याविना बंधपत्र घेऊ शकेल. स्थानिक अधिकारितेच्या पलिकडे केलेल्या अपराधाबद्दल समन्स किंवा वॉरंट काढण्याची शक्ती.

(२) जेव्हा अशी अधिकारिता असलेले दंडाधिकारी एकाहून अधिक असतील व अशा व्यक्तीला कोणत्या दंडाधिकाऱ्याकडे पाठवावे किंवा कोणत्या दंडाधिकाऱ्यासमोर उपस्थित होण्यासाठी तिला बांधून घ्यावे याबाबत, या कलमाखाली दंडाधिकाऱ्याची स्वतःची खात्री होऊ शकत नसेल तेव्हा, उच्च न्यायालयाच्या आदेशांसाठी ते प्रकरण सादर केले जाईल.

१८८. जेव्हा— भारताबाहेर करण्यात आलेला अपराध.

(क) भारताच्या नागरिकाने मुक्त सागरात किंवा अन्यत्र, किंवा

(ख) असा नागरिक नसलेल्या इसमाने भारतात नोंदणी झालेल्या कोणत्याही जहाजावर किंवा विमानावर,

भारताबाहेर अपराध केलेला असेल तेव्हा, भारतात ज्या कोणत्याही स्थळी तो सापडेल तेथेच जणू काही असा अपराध करण्यात आलेला असावा त्याप्रमाणे त्याबाबत त्याच्याविरुद्ध कार्यवाही करता येईल :

परंतु, या प्रकरणातील कोणत्याही पूर्ववर्ती कलमात काहीही असले तरी, भारतात अशा कोणत्याही अपराधाची चौकशी किंवा संपरीक्षा केंद्र शासनाच्या पूर्वमंजुरीशिवाय केली जाणार नाही.

१८९. जो कोणताही अपराध भारताबाहेरील एखाद्या क्षेत्रात केला असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल त्याची कलम १३८च्या उपबंधाखाली चौकशी किंवा संपरीक्षा चालू असेल तेव्हा, केंद्र शासनाला योग्य वाटल्यास ते असे निदेशित करू शकेल की, त्या क्षेत्रातील किंवा त्या क्षेत्राकरता नेमलेल्या न्यायिक अधिकाऱ्यासमोर अथवा त्या क्षेत्रातील किंवा त्या क्षेत्राकरता नेमलेल्या भारताच्या राजदौतिक किंवा वाणिज्यदौतिक प्रतिनिधीसमोर दिलेल्या जबान्यांच्या प्रती किंवा हजर केलेल्या निशाण्या, अशी चौकशी किंवा संपरीक्षा करणाऱ्या न्यायालयाने अशा जबान्या किंवा निशाण्या ज्यांच्याशी संबंधित असतील त्या बाबींसंबंधीचा पुरावा घेण्यासाठी असे न्यायालय आयोगपत्र काढू शकले असते अशा कोणत्याही बाबतीत, अशा न्यायालयाने पुराव्यात दाखल करून घ्याव्यात. भारताबाहेर केलेल्या अपराधांसंबंधीचा पुरावा दाखल करून घेणे.

## प्रकरण चौदा

## कार्यवाही सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या शर्ती

१९०. (१) या प्रकरणाच्या उपबंधांच्या अधीनतेने, कोणत्याही प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याला आणि पोटकलम (२) खाली यासंबंधात खास शक्ती प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याला एखाद्या अपराधाबाबत,— दंडाधिकाऱ्यांनी अपराधांची दखल घेणे.

(क) अशा अपराध्याला जी घटकभूत असतील अशा तथ्यांसंबंधी फिर्याद आल्यावरून;

(ख) अशा तथ्यांबद्दलच्या पोलीस अहवालावरून;

(ग) असा अपराध घडला आहे अशी पोलीस अधिकाऱ्याहून अन्य कोणत्याही व्यक्तीकडून वर्दी मिळाल्यावरून किंवा स्वतःच्या माहितीवरून;

दखल घेता येईल.

(२) मुख्य न्याय दंडाधिकारी, ज्यांची चौकशी किंवा संपरीक्षा करणे हे त्याच्या अधिकारकक्षेत येते अशा अपराधांची पोटकलम (१) खाली दाखल घेण्यास कोणत्याही द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याला शक्ती प्रदान करू शकेल.

आरोपीच्या अर्जा-वरून वर्ग करणे. १९१. कलम १९०-पोटकलम (१) च्या खंड (ग) खाली दंडाधिकारी अपराधाची दखल घेईल तेव्हा, कोणताही साक्षीपुरावा घेण्याआधी आरोपीला असे कळवले जाईल की, त्या प्रकरणाची चौकशी किंवा संपरीक्षा अन्य दंडाधिकाऱ्याकडून करून घेण्यास तो हक्कदार आहे, आणि आरोपीने किंवा, एकाहून अधिक आरोपी असल्यास त्यांपैकी कोणीही दखल घेणाऱ्या दंडाधिकाऱ्यासमोर पुढील कार्यवाही केली जाण्यास हरकत घेतली तर, ते प्रकरण मुख्य न्याय दंडाधिकारी यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशा अन्य दंडाधिकाऱ्याकडे वर्ग केले जाईल.

दंडाधिकाऱ्याकडे प्रकरणे सोपवणे. १९२. (१) अपराधाची दखल घेतल्यानंतर कोणत्याही मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याला ते प्रकरण आपणांस दुय्यम असणाऱ्या कोणत्याही सक्षम दंडाधिकाऱ्याकडे चौकशीसाठी किंवा संपरीक्षेसाठी सोपवता येईल.

(२) मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याने या संबंधात शक्ती प्रदान केलेल्या कोणत्याही प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याला, अपराधाची दखल घेतल्यानंतर ते प्रकरण मुख्य न्याय दंडाधिकारी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य सक्षम दंडाधिकाऱ्याकडे चौकशीसाठी किंवा संपरीक्षेसाठी सोपवता येईल आणि तद्नंतर अशा दंडाधिकाऱ्याला चौकशी किंवा संपरीक्षा करता येईल.

सत्र न्यायालयांनी अपराधांची दखल घेणे. १९३. या संहितेने किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याद्वारे स्पष्टपणे अन्यथा उपबंधित केलेले असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, कोणत्याही अपराधांची दखल कोणतेही सत्र न्यायालय एखाद्या दंडाधिकाऱ्याने ते प्रकरण त्याच्याकडे सुपूर्द केल्याशिवाय, मूळ अधिकारितेचे न्यायालय म्हणून घेणार नाही.

अपर व सहायक सत्र न्यायाधीशांनी त्यांच्याकडे सोपवण्यात आलेल्या प्रकरणांची संपरीक्षा करणे. १९४. अपर सत्र न्यायाधीश किंवा सहायक सत्र न्यायाधीश, जी प्रकरणे त्याच्याकडे त्या विभागाचा सत्र न्यायाधीश सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे संपरीक्षेसाठी सोपवील किंवा ज्यांची संपरीक्षा करण्यास उच्च न्यायालय विशेष आदेशाद्वारे त्याला निदेशित करील अशा प्रकरणांची संपरीक्षा करील.

लोक सेवकांच्या वैध प्राधिकाराच्या अवमानाबद्दल सार्वजनिक न्याया-विरुद्ध केलेल्या अपराधांबद्दल आणि पुराव्यात दिलेल्या दस्तऐवजांसंबंधीच्या अपराधांबद्दल खटला. १९५. (१) कोणतेही न्यायालय—

(क) (एक) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या १७२ ते १८८ (दोन्ही धरून) या कलमांखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबाबत किंवा,

(दोन) अशा अपराधास कोणतीही अपप्रेरणा देण्यात आल्याबाबत किंवा तो करण्याच्या प्रयत्नाबाबत, किंवा

(तीन) अशा अपराध करण्यासाठी केलेल्या कोणत्याही फौजदारीपात्र कटाबाबत, संबंधित लोक सेवकाकडून किंवा ज्याला तो प्रशासकीय दृष्ट्या दुय्यम असेल अशा अन्य एखाद्या लोक सेवकाकडून लेखी फिर्याद आल्याशिवाय ;

(ख) (एक) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या पुढीलपैकी म्हणजे कलमे १९३ ते १९६ (दोन्ही धरून) १९९, २००, २०५ ते २११ (दोन्ही धरून) आणि २२८ यांपैकी कोणत्याही कलमाखाली शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध कोणत्याही न्यायालयातील कोणत्याही कार्यवाहीत किंवा तिच्या संबंधात केला असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल तेव्हा, अशा अपराधाबाबत, किंवा

(दोन) उक्त संहितेच्या कलम ४६३ मध्ये वर्णिलेला किंवा, कलम ४७१, कलम ४७५ किंवा कलम ४७६ खाली शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध कोणत्याही न्यायालयातील कार्यवाहीत हजर केलेल्या किंवा पुराव्यात दिलेल्या दस्तऐवजाबाबत केला असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल तेव्हा, अशा अपराधाबाबत, किंवा

(तीन) उपखंड (एक) किंवा उपखंड (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही अपराध करण्याच्या कोणत्याही फौजदारीपात्र कटाबाबत किंवा तो करण्याच्या प्रयत्नाबाबत किंवा त्यास अपप्रेरणा देण्यात आल्याबाबत,

त्या न्यायालयाकडून किंवा ज्याला ते न्यायालय दुय्यम असेल अशा अन्य एखाद्या न्यायालयाकडून लेखी फिर्याद आल्याशिवाय,

त्याची दखल घेणार नाही.

(२) जेव्हा पोटकलम (१) च्या खंड (क) खाली एखाद्या लोक सेवकाने फिर्याद दिली असेल तेव्हा, प्रशासकीय दृष्ट्या तो ज्यास दुय्यम असेल असे कोणतेही प्राधिकरण फिर्याद काढून घेण्याचा आदेश देऊन अशा आदेशाची प्रत न्यायालयाकडे पाठवू शकेल; आणि न्यायालयाला ती मिळाल्यावर, त्या फिर्यादीवरून पुढील कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही :

परंतु, प्रारंभिक न्यायालयातील संपरीक्षा समाप्त झाली असेल तर, फिर्याद काढून घेण्याचा असा कोणताही आदेश दिला जाणार नाही.

(३) पोटकलम (१) च्या खंड (ख) मध्ये "न्यायालय" या संज्ञेचा अर्थ, दिवाणी, महसूल किंवा फौजदारी न्यायालय, असा आहे, आणि त्या संज्ञेत, एखाद्या केंद्रीय प्रांतीय किंवा राज्य अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली घटित झालेले एखादे अधिकरण या कलमाच्या प्रयोजनार्थ न्यायालय असल्याचे त्या अधिनियमाद्वारे घोषित करण्यात आले असेल तर, त्या अधिकरणाचा समावेश होतो.

(४) पोटकलम (१) खंड (ख) च्या प्रयोजनार्थ, एखाद्या न्यायालयाच्या अपीलयोग्य हुकूमनाम्यांवर किंवा न्यायनिर्णयांवर सर्वसामान्यपणे ज्या न्यायालयाकडे अपिले होऊ शकतात त्या न्यायालयाला असे पूर्वोक्त न्यायालय दुय्यम असल्याचे किंवा ज्या दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्यांवर सर्वसामान्यपणे अपील होऊ शकत नाही त्याच्या बाबतीत, ते साधारण मूळ दिवाणी अधिकारिता असलेल्या ज्या मुख्य न्यायालयाच्या स्थानिक अधिकारितेत असेल त्यास असे दिवाणी न्यायालय दुय्यम असल्याचे मानले जाईल :

परंतु,—

(क) एकाहून अधिक न्यायालयांकडे अपिले होऊ शकतात त्या बाबतीत, कनिष्ठ अधिकारितेच्या अपील न्यायालयास ते न्यायालय दुय्यम असल्याचे मानले जाईल;

(ख) एखाद्या दिवाणी आणि महसूल न्यायालयांकडेही अपिले होऊ शकतात त्याबाबतीत, ज्याच्या संबंधात अपराध केल्याचे अभिकथन करण्यात आले असेल त्या प्रकरणाच्या किंवा कार्यवाहीच्या स्वरुपानुसार, दिवाणी किंवा महसूल न्यायालयाला असे न्यायालय दुय्यम असल्याचे मानले जाईल.

देशविरोधी अपराधांबद्दल व असा अपराध करण्याविषयीच्या फौजदारीपात्र कटाबद्दल खटला.

**१९६.** (१) कोणतेही न्यायालय,—

(क) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यातील सहाव्या प्रकरणाखाली किंवा कलम १५३क, [१][कलम २९५क किंवा कलम ५०५ चे पोटकलम (१)] याखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची, किंवा

(ख) असा अपराध करण्यासाठी केलेल्या फौजदारीपात्र कटाची, किंवा

(ग) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या कलम १०८क मध्ये वर्णिल्याप्रमाणे अशा कोणत्याही अपप्रेरणाची,

केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीशिवाय दखल घेणार नाही.

[२][(१क) कोणतेही न्यायालय,—

(क) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यातील कलम १५३ख अथवा कलम ५०५ चे पोटकलम (२) किंवा पोटकलम (३) याखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची, किंवा

(ख) असा अपराध करण्यासाठी केलेल्या फौजदारीपात्र कटाची,

केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय दखल घेणार नाही.]

(२) मृत्यूच्या किंवा आजीव कारावासाच्या किंवा दोन वर्षे अगर त्याहून अधिक मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला [३][अपराध] करण्यासाठी केलेल्या फौजदारीपात्र कटाहून अन्य अशा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या कलम १२०ख खाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही फौजदारीपात्र कटाच्या अपराधाची राज्य शासनाने किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याने कार्यवाही सुरू करावयास लेखी संमती दिल्याशिवाय, कोणतेही न्यायालय दखल घेणार नाही :

परंतु, ज्यास कलम १९५ चे उपबंध लागू होतात असा तो फौजदारीपात्र कट असेल तेव्हा, अशा कोणत्याही संमतीची जरुरी असणार नाही.

(३) [४][केंद्र शासन किंवा राज्य शासन पोटकलम (१) किंवा पोटकलम (१क) खाली मंजुरी देण्यापूर्वी आणि जिल्हा दंडाधिकारी पोटकलम (१क) खाली मंजुरी देण्यापूर्वी] आणि राज्य शासन किंवा जिल्हा दंडाधिकारी पोटकलम (२) खाली संमती देण्यापूर्वी, निरीक्षकाहून कमी दर्जा नसलेल्या पोलीस अधिकाऱ्याकरवी प्रारंभिक अन्वेषण करण्याचा आदेश देऊ शकेल, व त्याबाबतीत अशा पोलीस अधिकाऱ्याला कलम १५५ च्या पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेले अधिकार असतील.

न्यायाधीश किंवा लोकसेवक यांच्याविरुद्ध खटला.

**१९७.** (१) जी व्यक्ती एखादा न्यायाधीश किंवा दंडाधिकारी आहे किंवा होती अथवा शासनाशिवाय अगर त्याच्या मंजुरीशिवाय अन्य कोणाहीकडून पदावरून दूर करता न येण्यासारखा असा एखादा लोकसेवक आहे किंवा होती तिच्यावर, आपली पदीय कामे पार पाडताना किंवा तसे म्हणून कार्य करताना तिने जो अपराध केल्याचे अभिकथन करण्यात आले आहे अशा कोणत्याही अपराधाचा आरोप ठेवण्यात आला असेल तेव्हा,—

(क) जी व्यक्ती संघराज्याच्या कारभारासंबंधात नोकरीला आहे किंवा, प्रकरणपरत्वे अभिकथित अपराध करण्याच्या वेळी त्या नोकरीत होती तिच्या बाबतीत, केंद्र शासनाच्या ;

---

१. १९८० चा अधिनियम ६३, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२३ सप्टेंबर, १९८० रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे समाविष्ट केले (२३ सप्टेंबर, १९८० रोजी व तेव्हापासून).

३. १९७८ चा अधिनियम ४५, कलम १६ द्वारे 'दखलपात्र अपराध' याऐवजी 'अपराध' असा शब्दोल्लेख घातला.

४. १९८० चा अधिनियम ६३, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२३ सप्टेंबर, १९८० रोजी व तेव्हापासून).

(ख) जी व्यक्ती राज्याच्या कारभारासंबंधात नोकरीला आहे किंवा, प्रकरणपरत्वे, अभिकथित अपराध करण्याच्या वेळी त्या नोकरीत होती तिच्या बाबतीत, राज्य शासनाच्या,

पूर्व मंजुरीखेरीज कोणतेही न्यायालय अशा अपराधाची दखल घेणार नाही :

¹[परंतु, अभिकथित अपराध, खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीने, संविधानाच्या कलम ३५६ च्या खंड (१) अन्वये केलेली उद्घोषणा एखाद्या राज्यात अंमलात असताना त्या कालावधीमध्ये केला असल्यास, खंड (ख) हा, जणू काही त्यामध्ये असलेल्या "राज्य शासन" या शब्दप्रयोगाऐवजी "केंद्र शासन" हा शब्दप्रयोग बदलीदाखल केला आहे. त्याप्रमाणे लागू होईल.]

(२) संघराज्याच्या सशस्त्र सेनादलांच्या कोणत्याही सदस्याने आपली पदीय कामे पार पाडताना किंवा तसे म्हणून कार्य करताना जो कोणताही अपराध केल्याचे अभिकथन करण्यात आले असेल त्याची केंद्र शासनाच्या पूर्वमंजुरीखेरीज कोणतेही न्यायालय दखल घेणार नाही.

(३) राज्य शासन अधिसूचनेद्वारे असे निदेशित करू शकेल की, सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या दलांपैकी त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वर्गाच्या किंवा प्रवर्गाच्या सदस्यांना---मग ते कोठेही सेवा करीत असोत---पोटकलम (२) चे उपबंध लागू असतील, आणि तदनंतर, त्या पोटकलमाचे उपबंध त्यात येणाऱ्या 'केंद्र शासन' या शब्दप्रयोगाऐवजी जणू काही तेथे 'राज्य शासन' हा शब्दप्रयोग घातलेला असावा त्याप्रमाणे लागू होतील.

¹[(३क) पोटकलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्यातील सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याचा भार ज्याच्यावर सोपवलेला आहे अशा बलाच्या कोणत्याही सदस्याकडून, संविधानाच्या कलम ३५६ च्या खंड (१) अन्वये केलेली उद्घोषणा अंमलात असताना त्या कालावधीत, त्याची अधिकृत कर्तव्ये पार पाडताना किंवा पार पाडण्याचे अभिप्रेत असताना, घडलेल्या अभिकथित अपराधाची दखल कोणतेही न्यायालय केंद्र शासनाच्या पूर्वमंजुरीखेरीज घेणार नाही.

(३ख) या संहितेत किंवा इतर कोणत्याही विधीत एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, संविधानाच्या कलम ३५६ च्या खंड (१) अन्वये करण्यात आलेली उद्घोषणा राज्यात अंमलात असताना त्या कालावधीत करण्यात आलेल्या अभिकथित अपराधाच्या संबंधात, २० ऑगस्ट, १९९१ रोजी प्रारंभ होणाऱ्या व फौजदारी प्रक्रिया संहिता (विशोधन) अधिनियम, १९९१ याला राष्ट्रपतीची अनुमती मिळेल त्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांकास समाप्त होणाऱ्या कालावधीत, राज्य शासनाने दिलेली कोणतीही मंजुरी किंवा अशा मंजुरीनंतर एखाद्या न्यायालयाने घेतलेली कोणतीही दखल ही, विधिअग्राह्य ठरेल आणि अशा बाबतीत मंजुरी देण्यास केंद्र शासन व त्याची दखल घेण्यास न्यायालय सक्षम असेल.]

(४) केंद्र शासनाला किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य शासनाला, कोणत्या व्यक्तीने, कोणत्या रीतीने व कोणत्या अपराधाबद्दल किंवा अपराधांबद्दल अशा न्यायाधीशावर, दंडाधिकाऱ्यावर किंवा लोकसेवकावर खटला चालवावयाचा ते निर्धारित करता येईल आणि कोणत्या न्यायालयापुढे संपरीक्षा करावयाची ते विनिर्दिष्ट करता येईल.

**दिवाणी न्यायालयाने नेमलेल्या आयोगावरील किंवा प्रापकावरील खटला.**

**¹[१९७क. 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याच्या उपबंधांनुसार न्यायालयाने आयोगी किंवा प्रापक म्हणून नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीवर जेव्हा आयोगी किंवा प्रापक या नात्याने असणारी आपली कामे पार पाडताना किंवा तसे म्हणून कार्य करताना तिने जो अपराध केल्याचे अभिकथन करण्यात आले आहे अशा कोणत्याही अपराधाचा आरोप ठेवण्यात आला असेल तेव्हा, अशा व्यक्तीला आयोगी किंवा, प्रकरणपरत्वे, प्रापक म्हणून नेमणाऱ्या न्यायालयाच्या पूर्वमंजुरीखेरीज कोणतेही न्यायालय अशा अपराधाची दखल घेणार नाही.]**

**विवाहविरोधी अपराधांबद्दल खटला.** १९८. (१) कोणतेही न्यायालय 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यातील विसाव्या प्रकरणाखाली शिक्षापात्र अशा कोणत्याही अपराधाची, अशा अपराधामुळे उपसर्ग पोचलेल्या एखाद्या पक्षाकडून फिर्याद आल्याखेरीज, दखल घेणार नाही :

परंतु,---

(क) अशी व्यक्ती अठरा वर्षे वयाखालील असेल, अथवा निर्बुद्ध किंवा वेडी असेल, अथवा आजारपणामुळे किंवा विकलतेमुळे फिर्याद देण्यास असमर्थ असेल, किंवा स्थानिक रुढीरिवाजांनुसार जिच्यावर लोकांसमोर येण्याची सक्ती करणे युक्त नव्हे अशी ती स्त्री असेल त्याबाबतीत, न्यायालयाच्या परवानगीने अन्य एखाद्या व्यक्तीला त्याच्या किंवा तिच्या वतीने फिर्याद देता येईल ;

---

१. १९९१ चा अधिनियम ४३, कलम २ द्वारे घातले (१९ सप्टेंबर, १९९१ रोजी व तेव्हापासून).

**१. फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) अधिनियम, १९८१ (१९८१ चा महा. ६० कलम २ द्वारे दाखल केले.**

(ख) अशी व्यक्ती ही पती असेल आणि तो संघराज्याच्या कोणत्याही सशस्त्र सेनादलात नोकरी करत असून, जातीनिशी फिर्याद देणे शक्य होण्यासाठी त्याला अनुपस्थिति-रजा मिळण्यास ज्या परिस्थितीत प्रत्यवाय असल्याचे त्याच्या समादेशक अधिकाऱ्याने प्रमाणित केले आहे अशी परिस्थिती असेल त्याबाबतीत, पतीने पोटकलम (४) च्या उपबंधानुसार प्राधिकृत केलेल्या अन्य एखाद्या व्यक्तीला यासंबंधात फिर्याद देता येईल ;

(ग) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यातील [1][कलम ४९४ किंवा कलम ४९५] खाली शिक्षापात्र अशा अपराधामुळे उपसर्ग पोचलेली व्यक्ती ही पत्नी असेल त्याबाबतीत, तिच्या वतीने तिच्या बापाला, आईला, भावाला, बहिणीला, मुलाला किंवा मुलीला अथवा तिच्या बापाच्या किंवा आईच्या भावाला किंवा बहिणीला [2][किंवा न्यायालयाच्या परवानगीने, तिच्याशी रक्ताच्या, सोयरिकीच्या किंवा दत्तकाच्या नात्याने संबंधित असलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीला] फिर्याद देता येईल.

(२) पोटकलम (१) च्या प्रयोजनांसाठी, उक्त संहितेच्या कलम ४९७ किंवा कलम ४९८ खाली शिक्षापात्र अशा कोणत्याही अपराधामुळे स्त्रीच्या पतीहून अन्य कोणत्याही व्यक्तीला उपसर्ग पोचला असल्याचे मानले जाणार नाही :

परंतु, असा अपराध करण्यात आला त्यावेळी पतीच्या वतीने त्या स्त्रीची देखभाल ज्या व्यक्तीकडे होती तिला न्यायालयाच्या परवानगीने त्याच्या अनुपस्थितीत त्याच्या वतीने फिर्याद देता येईल.

(३) पोटकलम (१) च्या परंतुकाच्या खंड (क) खाली येणाऱ्या कोणत्याही प्रकरणात जेव्हा अठरा वर्षे वयाखालील व्यक्तीच्या किंवा वेडया व्यक्तीच्या वतीने, अज्ञान किंवा वेडया व्यक्तीच्या देहाचा पालक म्हणून जिला सक्षम प्राधिकरणाने नियुक्त किंवा घोषित केलेले नाही अशी व्यक्ती फिर्याद देऊ पाहत असेल आणि याप्रमाणे नियुक्त किंवा घोषित झालेला असा एखादा पालक आहे अशी न्यायालयाची खात्री होईल तेव्हा, न्यायालय परवानगीचा अर्ज मंजूर करण्यापूर्वी अशा पालकाला नोटीस देववील आणि त्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल.

(४) पोटकलम (१) च्या परंतुकाच्या खंड (ख) मध्ये निर्देशिलेले प्राधिकृतिपत्र लेखी असेल, पतीला ते स्वाक्षरित किंवा अन्यथा साक्षांकित करावे लागेल, ज्या अभिकथनांच्या आधारे फिर्याद द्यावयाची आहे ती आपणांस कळवण्यात आलेली आहे अशा आशयाचे निवेदन त्यात अंतर्भूत असेल, त्याचा समादेशक अधिकारी ते प्रतिस्वाक्षरित करील आणि जातीनिशी फिर्याद देण्याच्या प्रयोजनाकरिता पतीला अनुपस्थिति-रजा सध्या देता येत नाही अशा आशयाचे त्या अधिकाऱ्याने स्वाक्षरित केलेले प्रमाणपत्र त्यासोबत जोडावे लागेल.

(५) जो दस्तऐवज म्हणजे असे प्राधिकृतिपत्र असल्याचे दिसते व पोटकलम (४) च्या उपबंधानुसार आहे असा कोणताही दस्तऐवज, आणि जो दस्तऐवज म्हणजे त्या पोटकलमान्वये आवश्यक असलेले प्रमाणपत्र असल्याचे दिसते असा कोणताही दस्तऐवज हे, विरुद्ध शाबीत झाले नाही तर, अस्सल असल्याचे गृहीत धरण्यात येईल आणि ते पुराव्यात स्वीकारले जातील.

(६) एखाद्या पुरुषाने आपली पत्नी पंधरा वर्षे वयाखालील असताना तिच्याशी लैंगिक संभोग केल्याने 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या कलम ३७६ खालील अपराध घडला असेल त्या बाबतीत, अपराध घडल्यानंतर एक वर्ष लोटून गेले असेल तर, कोणतेही न्यायालय अशा अपराधाची दखल घेणार नाही.

(७) या कलमाचे उपबंध जसे अपराधास लागू होतात तसेच ते अपराधाच्या अपप्रेरणास किंवा अपराध करण्याच्या प्रयत्नास लागू होतात.

'भारतीय दंड संहिते' च्या कलम ४९८ क खालील अपराधाबद्दल शिक्षा.

[3][१९८क. 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) कलम ४९८क खालील अपराधास घटकभूत असलेल्या तथ्यांबाबत पोलीस अहवाल मिळाल्याशिवाय अथवा त्या अपराधामुळे उपसर्ग पोचलेल्या व्यक्तीने अगर तिचा बाप, आई, भाऊ, बहीण यांनी अगर तिच्या बापाचा किंवा आईचा भाऊ किंवा बहीण यांनी अगर न्यायालयाची परवानगी घेऊन, तिच्याशी रक्ताच्या, सोयरिकीच्या किंवा दत्तकाच्या नात्याने संबंधित असलेल्या व्यक्तीने फिर्याद दिलेली असल्याशिवाय, कोणतेही न्यायालय अशा अपराधाची दखल घेणार नाही.]

अब्रुनुकसानीबद्दल खटला.

१९९. (१) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या २१ व्या प्रकरणाखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधामुळे उपसर्ग पोचलेल्या एखाद्या व्यक्तीने फिर्याद दिल्याखेरीज कोणतेही न्यायालय त्या अपराधाची दखल घेणार नाही :

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम १७ द्वारे "कलम ४९४" या मजकुराऐवजी घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

३. १९८३ चा अधिनियम ४६, कलम ४ द्वारे समाविष्ट केले.

परंतु, जेथे अशी व्यक्ती अठरा वर्षे वयाखालील असेल, अथवा निर्बुद्ध किंवा वेडी असेल, अथवा आजारपणामुळे किंवा विकलतेमुळे फिर्याद देण्यास असमर्थ असेल किंवा स्थानिक रूढिरिवाजांनुसार जिच्यावर लोकांसमोर येण्याची सक्ती करणे युक्त नव्हे अशी ती स्त्री असेल त्याबाबतीत, न्यायालयाच्या परवानगीने अन्य एखाद्या व्यक्तीला त्याच्या किंवा तिच्या वतीने फिर्याद देता येईल.

(२) या संहितेत काहीही अंतर्भूत असले तरीही, जेव्हा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या २१ व्या प्रकरणाखाली येणारा कोणताही अपराध घडण्याच्या वेळी जी व्यक्ती भारताचा राष्ट्रपती, उप राष्ट्रपती, एखाद्या राज्याचा राज्यपाल, संघ राज्यक्षेत्राचा प्रशासक अथवा संघराज्याचा किंवा राज्याचा किंवा संघ राज्यक्षेत्राचा मंत्री, अथवा संघराज्याच्या किंवा राज्याच्या कारभारासंबंधात नोकरीला असलेला अन्य कोणताही लोकसेवक होती ती आपली सरकारी कामे पार पाडत असताना तिने केलेल्या वर्तनाच्या संबंधात तिच्याविरुद्ध असा अपराध करण्यात आल्याचे अभिकथन करण्यात आले असेल तेव्हा, सत्र न्यायालयाला ते प्रकरण त्याच्याकडे सुपूर्द करण्यात आलेले नसतानाही, सरकारी अभियोक्त्याने दिलेल्या लेखी फिर्यादीवरून अशा अपराधाची दखल घेता येईल.

(३) पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेल्या प्रत्येक फिर्यादीत अभिकथित अपराधाची घटकतथ्ये, अशा अपराधाचे स्वरूप आणि आरोपीने जो अपराध केल्याचे अभिकथन करण्यात आले आहे त्याची त्याला जाणीव देण्यास वाजवीपणे पुरेसा असलेला असा अन्य तपशील दिला जाईल.

(४) (क) जी व्यक्ती राज्याचा राज्यपाल अथवा त्या शासनाचा मंत्री आहे किंवा होती तिच्या बाबतीत, त्या राज्य शासनाच्या,

(ख) राज्याच्या कारभारासंबंधात नोकरीला असलेल्या अन्य कोणत्याही लोकसेवकाच्या बाबतीत राज्य शासनाच्या,

(ग) अन्य कोणत्याही बाबतीत, केंद्र शासनाच्या

पूर्व मंजुरीखेरीज सरकारी अभियोक्त्याला पोटकलम (२) खालील कोणतीही फिर्याद देता येणार नाही.

(५) पोटकलम (२) खालील अपराध ज्या दिनांकास केल्याचे अभिकथन करण्यात आले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत फिर्याद देण्यात आली नाही तर, कोणत्याही सत्र न्यायालयाला त्या अपराधाची दखल घेता येणार नाही.

(६) ज्या व्यक्तीविरूद्ध अपराध केला गेल्याचे अभिकथन करण्यात आले असेल तिला, अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे त्या अपराधाबाबत फिर्याद देण्याचा जो हक्क आहे त्यावर किंवा अशा दंडाधिकाऱ्याला अशा फिर्यादीवरून त्या अपराधाची दखल घेण्याचा जी शक्ती आहे तीवर या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही.

## प्रकरण पंधरावे

## दंडाधिकाऱ्यांकडे फिर्यादी

फिर्याददाराची तपासणी.

२००. फिर्यादीवरून अपराधाची दखल घेणारा दंडाधिकारी फिर्याददाराची आणि कोणी साक्षीदार उपस्थित असल्यास त्यांची शपथेवर तपासणी करील आणि अशा तपासणीचा सारांश लेखनिविष्ट करण्यात येईल आणि फिर्याददार व साक्षीदार आणि दंडाधिकारीही तो स्वाक्षरित करतील :

परंतु, फिर्याद लेखी देण्यात आली असेल तेव्हा,—

(क) जर आपली पदीय कामे पार पाडणाऱ्या किंवा तसे म्हणून कार्य करणाऱ्या लोकसेवकाने किंवा न्यायालयाने फिर्याद दिली असेल तर; किंवा

(ख) जर दंडाधिकाऱ्याने ते प्रकरण चौकशीसाठी किंवा संपरीक्षेसाठी कलम १९२ खाली अन्य दंडाधिकाऱ्याकडे सोपवले तर ;

दंडाधिकाऱ्याने फिर्याददाराची व साक्षीदारांची तपासणी करण्याची गरज नाही :

परंतु आणखी असे की, जर दंडाधिकाऱ्याने फिर्याददाराची व साक्षीदारांची तपासणी केल्यानंतर कलम १९२ खाली अन्य दंडाधिकाऱ्याकडे ते प्रकरण सोपवले तर, त्या दुसऱ्या दंडाधिकाऱ्याने त्यांची फेरतपासणी घेण्याची गरज नाही.

प्रकरणांची दखल घेण्यास सक्षम नसलेल्या दंडाधिकाऱ्याने अनुसरावयाची कार्यपद्धती.

२०१. अपराधाची दखल घेण्यास सक्षम नसलेल्या दंडाधिकाऱ्याकडे फिर्याद देण्यात आल्यास, तो—

(क) फिर्याद लेखी असेल तर, ती योग्य न्यायालयाला सादर केली जाण्यासाठी तशा आशयाच्या पृष्ठांकनासह परत करील ;

(ख) फिर्याद लेखी नसेल तर, फिर्याददाराला योग्य न्यायालयाकडे निदेशित करील.

२०२. (१) कोणत्याही दंडाधिकाऱ्याला, ज्या अपराधाची दखल घेण्यास तो प्राधिकृत आहे किंवा कलम १९२ खाली ज्या अपराधाचे प्रकरण त्याच्याकडे सोपवण्यात आले आहे त्याबाबतची फिर्याद मिळाल्यावर, त्याला योग्य वाटल्यास, आरोपीविरुद्ध आदेशिका काढण्याचे लांबणीवर टाकता येईल आणि पुढील कार्यवाही करण्यास पुरेसे कारण आहे की नाही हे ठरवण्यासाठी एकतर तो स्वतः त्या प्रकरणाची चौकशी करू शकेल अथवा एखाद्या पोलीस अधिकाऱ्याकरवी किंवा त्याला योग्य वाटेल अशा अन्य व्यक्तीकरवी अन्वेषण करण्याचा निदेश देऊ शकेल : आदेशिका काढण्याचे लांबणीवर टाकणे.

परंतु,—

(क) ज्याबद्दल फिर्याद देण्यात आली आहे तो अपराध केवळ सत्र न्यायालयानेच संपरीक्षा करण्याजोगा आहे असे दंडाधिकाऱ्याला दिसून येईल त्या बाबतीत; किंवा

(ख) न्यायालयाने फिर्याद दिलेली नसेल त्या बाबतीत, फिर्याददार व (असल्यास) उपस्थित साक्षीदार यांची कलम २०० खाली शपथेवर तपासणी केल्याशिवाय,

असा कोणताही अन्वेषणाचा निदेश दिला जाणार नाही.

(२) पोटकलम (१) खालील चौकशीत स्वतःला योग्य वाटल्यास, दंडाधिकारी साक्षीदारांची शपथेवर तपासणी करू शकेल :

परंतु, ज्याबद्दल फिर्याद देण्यात आली असेल तो अपराध केवळ सत्र न्यायालयानेच संपरीक्षा करण्याजोगा आहे असे दंडाधिकाऱ्याला दिसून आल्यास, तो फिर्याददाराला आपल्या सर्व साक्षीदारांना हजर करण्यास फर्मावील आणि त्यांची शपथेवर तपासणी करील.

(३) जर पोटकलम (१) खालील अन्वेषण पोलीस अधिकारी नसलेल्या व्यक्तीने केले तर, तिला त्या अन्वेषणाच्या प्रयोजनार्थ वॉरंटाशिवाय अटक करण्याची शक्ती खेरीजकरून, या संहितेने पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला प्रदान केलेल्या सर्व शक्ती असतील.

२०३. जर फिर्याददार व साक्षीदार यांनी शपथेवर दिलेल्या जबान्या (असल्यास) आणि कलम २०२ खालील चौकशीतून किंवा तपासणीतून ज काही निष्पन्न झाले (असल्यास) ते विचारात घेतल्यानंतर जर पुढील कार्यवाही करण्यास पुरेसे कारण नाही असे दंडाधिकाऱ्याचे मत झाले तर, तो फिर्याद काढून टाकील, आणि अशा प्रत्येक बाबतीत, तो तसे करण्याबाबतची आपली कारणे थोडक्यात नमूद करील. फिर्याद काढून टाकणे.

## प्रकरण सोळा

## दंडाधिकाऱ्यांपुढे कार्यवाही सुरू करणे

२०४. (१) जर अपराधाची दखल घेणाऱ्या दंडाधिकाऱ्याच्या मते पुढील कार्यवाही करण्यास पुरेसे कारण असेल आणि तो खटला— आदेशिका काढणे.

(क) समन्स-खटला असल्याचे दिसत असेल तर, तो आरोपीच्या समक्ष हजेरीसाठी आपले समन्स काढील; किंवा

(ख) वॉरंट-खटला असल्याचे दिसत असेल तर, अशा दंडाधिकाऱ्यापुढे किंवा (त्याला स्वतःला अधिकारिता नसल्यास) अधिकारिता असलेल्या अन्य एखाद्या दंडाधिकाऱ्यापुढे विवक्षित वेळी आरोपीला आणवण्यासाठी तो एक वॉरंट किंवा आपणास योग्य वाटल्यास, त्याला तेथे उपस्थित व्हावयास लावण्यासाठी एक समन्स काढू शकेल.

(२) फिर्यादीपक्षाच्या साक्षीदारांची यादी दाखल केली जाईपर्यंत आरोपीविरुद्ध पोटकलम (१) खाली कोणतेही समन्स किंवा वॉरंट काढले जाणार नाही.

(३) लेखी फिर्यादीवरून सुरू केलेल्या कार्यवाहीत, पोटकलम (१) खाली काढलेल्या प्रत्येक समन्सबरोबर किंवा वॉरंटाबरोबर अशा फिर्यादीची प्रत असेल.

(४) जेव्हा त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार कोणतीही आदेशिका-फी किंवा अन्य फी प्रदेय असेल तेव्हा, फी भरण्यात येईपर्यंत कोणतीही आदेशिका काढली जाणार नाही, आणि अशी फी वाजवी अवधीत भरली गेली नाही तर, दंडाधिकाऱ्याला फिर्याद काढून टाकता येईल.

(५) या कलमातील कोणतीही गोष्ट कलम ८७ च्या उपबंधावर परिणाम करत असल्याचे मानले जाणार नाही.

२०५. (१) जेव्हा केव्हा दंडाधिकारी समन्स काढील तेव्हा, त्याला तसे करण्यास कारण दिसले तर, तो आरोपीची जातिनिशी उपस्थिती माफ करून त्याला आपल्या वकिलामार्फत उपस्थित राहण्याची परवानगी देऊ शकेल. दंडाधिकाऱ्याने आरोपीची जातीनिशी उपस्थिती माफ करणे.

(२) पण खटल्याची चौकशी किंवा संपरीक्षा करणारा दंडाधिकारी स्वविवेकानुसार, कार्यवाही कोणत्याही टप्प्यात असताना, आरोपीला जातीनिशी उपस्थित राहण्याबाबत निदेश देऊ शकेल आणि जरूर तर, त्याला याप्रमाणे उपस्थित राहण्यास यात यापूर्वी उपबंधित केलेल्या रीतीने भाग पाडू शकेल.

क्षुल्लक अपराधाच्या प्रकरणी विशेष समन्स.

२०६. (१) क्षुल्लक अपराधाची दखल घेणाऱ्या दंडाधिकाऱ्याच्या मते जर, कलम २६० खाली तो खटला संक्षेपतः निकालात काढता येत असेल तर, आरोपीला विनिर्दिष्ट दिनांकास दंडाधिकाऱ्यासमोर जातीनीशी किंवा वकिलामार्फत उपस्थित राहण्यास अथवा दंडाधिकाऱ्यासमोर उपस्थित न होता दोषारोपाबाबत अपराधीपणाचे प्रतिकथन देण्याची त्याची इच्छा असल्यास, विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी डाकेने किंवा निरोप्याकरवी दंडाधिकाऱ्याकडे लेखी स्वरूपात उक्त प्रतिकथन आणि समन्समध्ये, विनिर्दिष्ट केलेली द्रव्यदंडाची रक्कम पाठवण्यास अथवा वकिलामार्फत उपस्थित राहून अशा वकिलामार्फत अशा दोषारोपाबाबत अपराधीपणाचे प्रतिकथन देण्याची त्याची इच्छा असेल तर, आपल्या वतीने वकिलाला लेखी प्राधिकृत करण्यास आणि अशा वकिलामार्फत द्रव्यदंड भरण्यास फर्मावणारे असे समन्स आरोपीवर काढता येईल— मात्र, त्याचे मत तसे करण्याविरुद्ध असल्यास त्याची कारणे त्याला लेखी नमूद करावी लागतील :

परंतु, अशा समन्समध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम शंभर रुपयांहून अधिक असणार नाही.

(२) या कलमांच्या प्रयोजनार्थ "क्षुल्लक अपराध" याचा अर्थ, जो एक हजार रुपयांहून अधिक नाही इतक्या द्रव्यदंडाच्याच शिक्षेस पात्र आहे असा कोणताही अपराध, असा आहे, पण त्यात 'मोटार वाहन अधिनियम, १९३९' (१९३९ चा ४) याखाली किंवा आरोपी व्यक्तीला तिच्या अनुपस्थितीत अपराधीपणाच्या प्रतिकथनावरून सिद्धदोष ठरविण्यासाठी उपबंध करणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्याखाली याप्रमाणे शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाचा समावेश नाही.

[१][(३) राज्य शासन अधिसूचनेद्वारे कोणत्याही दंडाधिकाऱ्याला, कलम ३२० खाली मिटविण्याजोग्या अपराधाच्या अथवा जास्तीत जास्त तीन महिने मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असलेल्या अपराधांच्या संबंधात, खटल्याची तथ्ये व परिस्थिती विचारात घेता केवळ द्रव्यदंडाची शिक्षा देऊनच न्यायाची उद्दिष्टे साध्य होतील असे दंडाधिकाऱ्याचे मत असेल त्या बाबतीत पोटकलम (१) खाली प्रदान केलेल्या शक्ती वापरण्यासाठी खास शक्ती प्रदान करू शकेल.]

पोलीस अहवालाची प्रत व अन्य दस्तऐवज आरोपीला पुरवणे.

२०७. पोलीस अहवालावरून कार्यवाही सुरू करण्यांत आली असेल अशा कोणत्याही प्रकरणी, दंडाधिकारी आरोपीला विनाविलंब पुढीलपैकी प्रत्येकाची एकेक प्रत विनामूल्य पुरवील :—

(एक) पोलीस अहवाल ;

(दोन) कलम १५४ खाली नोंदलेला खबरी रिपोर्ट ;

(तीन) फिर्यादीपक्षाने आपले साक्षीदार म्हणून ज्यांची तपासणी करण्याचे ठरवले असेल त्या सर्व व्यक्तींचे कलम १६१ च्या पोटकलम (३) खाली नोंदवलेले जबाब-कलम १७३ च्या पोटकलम (६) पोलीस अधिकाऱ्याने जो कोणताही भाग वगळण्याबाबत विनंती केली असेल तो त्यातून वगळून ;

(चार) कलम १६४ खाली कोणतेही कबुलीजबाब व जबाब नोंदलेले असल्यास, ते ;

(पाच) कलम १७३ च्या पोटकलम (५) खाली पोलीस अहवालासोबत पाठवलेला अन्य कोणताही दस्तऐवज किंवा त्यातील संबद्ध उतारा :

परंतु, खंड (तीन) मध्ये निर्देशिलेला अशा जबाबाचा कोणताही भाग अवलोकन केल्यानंतर आणि पोलीस अधिकाऱ्याने विनंती करण्याबाबतची दिलेली कारणे विचारात घेतल्यानंतर, जबाबाच्या त्या भागाची किंवा दंडाधिकाऱ्याला योग्य वाटेल अशा त्यातील भागाची प्रत आरोपीला पुरविण्यात यावी असे दंडाधिकारी निदेशित करू शकेल :

परंतु आणखी असे की, खंड (पाच) मध्ये निर्देशिलेला कोणताही दस्तऐवज अतिविस्तृत आहे अशी दंडाधिकाऱ्याची खात्री झाली तर, आरोपीला त्याची प्रत पुरविण्याऐवजी, तो आरोपीला जातीने किंवा न्यायालयात वकिलामार्फत त्याचे फक्त निरीक्षण करण्याची परवानगी देण्यात यावी असे निदेशित करील.

सत्र न्यायालयाने संपरीक्षा करण्याजोग्या खटल्यांमध्ये आरोपीला जबाबांच्या व दस्तऐवजांच्या प्रती पुरवणे.

२०८. पोलीस अहवालाव्यतिरिक्त अन्य प्रकारे गुदरलेल्या खटल्यात तो अपराध केवळ सत्र न्यायालयानेच संपरीक्षा करण्याजोगा आहे, असे कलम २०४ खाली आदेशिका काढणाऱ्या दंडाधिकाऱ्याला दिसून येईल त्या बाबतीत, तो दंडाधिकारी आरोपीला विनाविलंब पुढीलपैकी प्रत्येकाची एकेक प्रत विनामूल्य पुरवील :—

(एक) दंडाधिकाऱ्याने तपासणी केलेल्या सर्व व्यक्तींचे कलम २०० किंवा २०२ खाली नोंदवलेले जबाब ;

(दोन) कलम १६१ किंवा कलम १६४ खाली कोणतेही कबुलीजबाब व जबाब नोंदवलेले असल्यास, ते ;

(तीन) दंडाधिकाऱ्यापुढे हजर केलेल्या ज्या कोणत्याही दस्तऐवजांचा आधार घेण्याचे फिर्यादी पक्षाने ठरवले असेल ते दस्तऐवज :

परंतु, असा कोणताही दस्तऐवज अतिविस्तृत आहे अशी दंडाधिकाऱ्याची खात्री झाली तर, आरोपीला त्याची प्रत पुरविण्याऐवजी, तो आरोपीला जातीने किंवा न्यायालयात वकिलामार्फत त्याचे निरीक्षण करण्याची परवानगी देण्यात यावी असे निदेशित करील.

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम १८ द्वारे समाविष्ट केले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हा पासून.)

२०९. पोलीस अहवालावरून किंवा अन्यप्रकारे गुदरलेल्या खटल्यात जेव्हा आरोपी दंडाधिकाऱ्या-समोर उपस्थित होईल किंवा आणला जाईल आणि तो अपराध केवळ सत्र न्यायालयानेच संपरीक्षा करण्याजोगा आहे असे दंडाधिकाऱ्याला दिसून येईल तेव्हा, तो— जेव्हा अपराध केवळ सत्र न्यायालयानेच संपरीक्षा करण्या-जोगा असेल तेव्हा त्याच्याकडे तो खटला सुपूर्द करणे.

[1][(क) कलम २०७ च्या किंवा, प्रकरणपरत्वे, २०८ च्या उपबंधाचे अनुपालन केल्यानंतर सत्र न्यायालयाकडे तो खटला सुपूर्द करील व या संहितेमधील, जामिनासंबंधीच्या उपबंधाच्या अधीनतेने, अशी सुपूर्दगी करण्यात येईपर्यंत आरोपीला हवालातीत परत पाठवील;]

(ख) या संहितेतील जामिनासंबंधीच्या उपबंधाच्या अधीनतेने, संपरीक्षा चालू असताना आणि ती संपेपर्यंत आरोपीला हवालातीत परत पाठवील;

(ग) त्या खटल्याचा अभिलेख आणि पुराव्यात हजर करावयाचे असे कोणतेही दस्तऐवज व वस्तू असल्यास ते त्या न्यायालयाकडे पाठवील;

(घ) सत्र न्यायालयाकडे तो खटला सुपूर्द करण्यात आल्याचे सरकारी अभियोक्त्याला कळवील.

२१०. (१) पोलीस अहवालाव्यतिरिक्त अन्य प्रकारे गुदरलेल्या खटल्यात (यात यापुढे 'फिर्यादिजन्य खटला' म्हणून निर्दिष्ट), आपण चालविलेल्या चौकशीच्या किंवा संपरीक्षेच्या ओघात जर दंडाधिकाऱ्याच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले की, त्याने चालवलेल्या चौकशीचा किंवा संपरीक्षेचा विषय असलेल्या अपराधाच्या संबंधात पोलीस अधिकाऱ्याकडून अन्वेषण चालू आहे, तर तो दंडाधिकारी अशा चौकशीचे किंवा संपरीक्षेचे कामकाज स्थगित करील आणि अन्वेषण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याकडून त्या बाबी-वरील अहवाल मागवील. फिर्यादिजन्य खटला असून त्याच अपराधा-बाबत पोलिसांकडून अन्वेषण चालू असेल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.

(२) जर कलम १७३ खाली अन्वेषण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने अहवाल दिला आणि फिर्यादिजन्य खटल्यात आरोपी असलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध दंडाधिकाऱ्याने अशा अहवालावरून कोणत्याही अपराधाची दखल घेतली तर, फिर्यादिजन्य खटला व पोलीस अहवालातून उद्‌भवणारा खटला हे दोन्ही खटले जणू काही पोलीस अहवालावरून गुदरलेले आहेत असे समजून दंडाधिकारी दोन्हींची एकत्रितपणे चौकशी किंवा संपरीक्षा करील.

(३) जर पोलीस अहवाल हा फिर्यादिजन्य खटल्यातील कोणत्याही आरोपीशी संबंधित नसेल किंवा पोलीस अहवालावरून दंडाधिकाऱ्याने कोणत्याही अपराधाची दखल घेतली नसेल तर, तो आपण स्थगित केलेली चौकशी किंवा संपरीक्षा या संहितेच्या उपबंधानुसार पुढे चालवील.

## प्रकरण सतरा

## दोषारोप

### क-दोषारोपांचे प्रारूप

२११. (१) या संहितेखालील प्रत्येक दोषारोपात, आरोपीवर ज्या अपराधाचा दोषारोप ठेवण्यात आला असेल तो नमूद केला जाईल. दोषारोपाचा मजकूर.

(२) ज्या कायद्याद्वारे तो अपराध ठरवण्यात आला असेल त्यात या अपराधाला एखादे निश्चित नाव दिलेले असेल तर, दोषारोपात त्या अपराधाचे त्याच नावाने वर्णन केले जाईल.

(३) ज्या कायद्याद्वारे तो अपराध ठरवण्यात आला असेल त्यात त्या अपराधाला कोणतेही निश्चित नाव दिलेले नसेल तर, आरोपीवर ज्या गोष्टीचा दोषारोप ठेवण्यात येईल त्याची आरोपीला जाणीव देण्यास पुरेसा इतका त्या अपराधाच्या व्याख्येचा भाग नमूद केला जाईल.

(४) ज्याविरुद्ध अपराध घडला असल्याचे म्हटलेले असेल त्या कायद्याचा आणि कायद्यातील त्या कलमाचा उल्लेख दोषारोपात केला जाईल.

(५) दोषारोप ठेवण्यात आला आहे ही वस्तुस्थिती म्हणजे ज्याचा दोषारोप ठेवण्यात आला तो अपराध घडण्यासाठी कायद्याने अपेक्षित असलेल्या प्रत्येक वैध आवश्यक घटकाची त्या विशिष्ट प्रकरणात पूर्तता झालेली आहे असे म्हणण्यासारखेच आहे.

(६) दोषारोप न्यायालयाच्या भाषेत लिहिण्यात येईल.

(७) जर पूर्वी कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धदोष झालेला आरोपी, अशा पूर्वीच्या दोषसिद्धीमुळे नंतरच्या अपराधाबद्दल वाढीव शिक्षेस किंवा निराळ्या प्रकारच्या शिक्षेस पात्र असेल आणि नंतरच्या अपराधाबद्दल जी शिक्षा देणे न्यायालयाला योग्य वाटेल तिच्यावर परिणाम करण्याच्या हेतूने अशी पूर्वीची दोषसिद्धी शाबीत करणे उद्देशित असेल तर, पूर्वीची दोषसिद्धी झाली होती हे तथ्य, त्याचा दिनांक व स्थळ दोषारोपात नमूद केले जाईल; आणि असे कोणतेही विधान वगळण्यात आले असेल तर, शिक्षादेश देण्यापूर्वी कोणत्याही वेळी न्यायालयाला ते त्यात घालता येईल.

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम १९ द्वारे मूळ खंड (क) ऐवजी घातला (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

**उदाहरणे**

(क) 'क' वर 'ख' च्या खुनाचा दोषारोप ठेवलेला आहे. हा दोषारोप करणे म्हणजे 'क' ची कृती 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या २९९ आणि ३०० या कलमांमध्ये दिलेल्या खुनाच्या व्याख्येत मोडत असून, ती उक्त संहितेतील कोणत्याही सर्वसाधारण अपवादात बसत नाही, आणि ती कृती कलम ३०० च्या पाच अपवादांपैकी कोणत्याही अपवादात येत नाही किंवा जर ती कृती पहिल्या अपवादाच्या अंतर्गत येत असलीच तर त्या अपवादाच्या तीन परंतुकांपैकी एक किंवा अन्य परंतुके तिला लागू होती असे विधान करण्यासारखे आहे.

(ख) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ८५) कलम ३२६ खाली गोळीबार करण्याच्या साधनाने 'ख' ला बुद्धिपुरस्सर जबर दुखापत केल्याचा दोषारोप 'क' वर ठेवण्यात आला आहे. हा दोषारोप म्हणजे उक्त संहितेच्या कलम ३३५ द्वारे या प्रकरणाबाबत उपबंध केलेला नव्हता आणि सर्वसाधारण अपवाद त्याला लागू होत नव्हते असे म्हणण्यासारखे आहे.

(ग) 'क' वर खुनाचा, ठकवणुकीचा, चोरीचा, बलाद्ग्रहणाचा, परगमनाचा किंवा फौजदारीपात्र धाकदपटशाचा किंवा खोटे स्वामित्व-चिन्ह वापरल्याचा आरोप आहे. 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यात अंतर्भूत असलेल्या त्या त्या अपराधाच्या व्याख्येचा निर्देश न करता दोषारोपात, 'क' ने खून किंवा ठकवणूक किंवा चोरी किंवा बलाद्ग्रहण किंवा परगमन किंवा फौजदारीपात्र धाकदपटशा हा अपराध केला किंवा त्याने खोटे स्वामित्व-चिन्ह वापरले असे नमूद करता येईल; पण ज्या कलमांखाली अपराध शिक्षापात्र आहे ती कलमे दोषारोपात प्रत्येक बाबतीत निर्देशिली पाहिजेत.

(घ) 'क' वर, लोकसेवकाच्या वैध प्राधिकारान्वये विक्रीला काढलेल्या संपत्तीच्या विक्रीला उद्देशपूर्वक अडथळा आणण्याचा दोषारोप 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या कलम १८४ खाली ठेवण्यात आला आहे. दोषारोप त्या शब्दांत असावा.

**वेळ, स्थळ आणि व्यक्ती यासंबंधीचा तपशील.**

२१२. (१) अभिकथित अपराधाची वेळ, स्थळ आणि ज्या व्यक्तीविरुद्ध (असल्यास) किंवा ज्या वस्तुबाबत (असल्यास) तो अपराध करण्यात आला ती व्यक्ती किंवा वस्तू यासंबंधी दोषारोपात, आरोपीवर ज्या गोष्टीचा दोषारोप ठेवण्यात आला आहे तिची त्याला जाणीव देण्यास वाजवीपणे पुरेसा होईल असा तपशील अंतर्भूत असेल.

(२) जेव्हा आरोपीवर फौजदारीपात्र न्यासभंग अथवा पैशाचा किंवा अन्य जंगम संपत्तीचा अप्रामाणिकपणे केलेला अपहार यांचा दोषारोप ठेवण्यात येईल तेव्हा, ज्या रकमेबाबत किंवा अन्य जंगम संपत्तीबाबत अपराध केल्याचे अधिकथन करण्यात आले असेल तिच्यातील विशिष्ट बाबी विनिर्दिष्ट न करता, ती ठोक रक्कम विनिर्दिष्ट केल्यास किंवा त्या जंगम संपत्तीचे वर्णन दिल्यास आणि नेमके दिनांक विनिर्दिष्ट न करता, ज्या दिनांकांच्या दरम्यान अपराध घडला असे अभिकथन करण्यात आले असेल ते नमूद केल्यास तेवढे पुरेसे होईल आणि याप्रमाणे मांडणी करण्यात आलेला दोषारोप हा कलम २१९ च्या अर्थानुसार एका अपराधाचा दोषारोप असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, अशा दिनांकांपैकी पहिल्या आणि शेवटच्या दिनांकांमध्ये समाविष्ट असलेला अवधी एक वर्षाहून अधिक असणार नाही.

**अपराध करण्याची रीत नमूद करणे केव्हा आवश्यक.**

२१३. २११ व २१२ या कलमांत उल्लेखिलेला तपशील आरोपीवर ज्या गोष्टीचा दोषारोप ठेवण्यात आला तिची पुरेशी जाणीव देत नाही असे त्या प्रकरणाचे स्वरूप असेल तेव्हा, दोषारोपात अभिकथित अपराध ज्या रीतीने करण्यात आला तीसंबंधी त्या प्रयोजनार्थ पुरेसा होईल असा तपशील अंतर्भूत असेल.

**उदाहरणे**

(क) 'क' वर विवक्षित वेळी व स्थळी विवक्षित वस्तूची चोरी केल्याचा आरोप आहे. कोणत्या रीतीने चोरी करण्यात आली ते दोषारोपात मांडण्याची जरूरी नाही.

(ख) 'क' वर विवक्षित वेळी व स्थळी 'ख' ला ठकवल्याचा आरोप आहे. कोणत्या रीतीने 'क' ने 'ख' ला ठकवले ते दोषारोपात मांडले पाहिजे.

(ग) 'क' वर विवक्षित वेळी व स्थळी खोटी साक्ष दिल्याचा आरोप आहे. 'क' ने दिलेल्या साक्षीचा जो भाग खोटा असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल तो भाग दोषारोपात मांडला पाहिजे.

(घ) 'ख' हा लोकसेवक विवक्षित वेळी व स्थळी आपली सरकारी कामे पार पाडत असताना त्याला अडथळा केल्याचा 'क' वर आरोप आहे. 'ख' आपली सरकारी कामे पार पाडत असताना 'क' ने त्याला कोणत्या रीतीने अडथळा केला ते दोषारोपात मांडले पाहिजे.

(ङ) 'क' वर विवक्षित वेळी व स्थळी 'ख' चा खून केल्याचा आरोप आहे. कोणत्या रीतीने 'क' ने 'ख' चा खून केला ते दोषारोपात मांडण्याची जरूरी नाही.

(च) 'क' वर 'ख' ला वाचवण्याच्या उद्देशाने कायद्याच्या निदेशाची अवज्ञा केल्याचा आरोप आहे. कोणत्या प्रकारच्या अवज्ञेचा दोषारोप ठेवण्यात आला व कोणत्या कायद्याचे उल्लंघन झाले ते दोषारोपात मांडले पाहिजे.

२१४. प्रत्येक दोषारोपात अपराधाचे वर्णन करताना वापरलेले शब्द ज्या कायद्याखाली असा अपराध शिक्षापात्र असेल त्याद्वारे त्या प्रत्येकाशी संलग्न करण्यात आलेल्या अर्थाने वापरले असल्याचे मानण्यात येईल.' ज्या कायद्याखाली अपराध दंडनीय आहे त्याच्या अर्थाने दोषारोपातील शब्द समजून घेणे.

२१५. अपराध किंवा दोषारोपात जो तपशील नमूद करणे आवश्यक आहे तो तपशील नमूद करताना झालेल्या कोणत्याही चुकीमुळे आणि अपराधाच्या किंवा त्या तपशिलाच्या अनुल्लेखामुळे आरोपीची खरोखरी दिशाभूल झाली असून त्यामुळे न्याय होऊ शकला नाही असे घडले नसेल तर, खटल्याच्या कोणत्याही टप्प्याला अशी कोणतीही चूक किंवा असा कोणताही अनुल्लेख महत्वाचा समजला जाणार नाही. चुकांचा परिणाम.

### उदाहरणे

(क) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) कलम २४२ खाली 'क' वर एखादे "नकली नाणे कब्जात आले त्यावेळी ते नकली असल्याचे ज्ञात असताना ते कब्जात बाळगल्याचा" दोषारोप ठेवण्यात आला असून, दोषारोपात 'कपटपूर्वक' हा शब्द गाळला गेला आहे. या अनुल्लेखामुळे 'क' ची खरोखरी दिशाभूल झाली असे दिसून आल्याशिवाय ती चूक महत्वाची समजली जाणार नाही.

(ख) 'क' वर 'ख' ला ठकवल्याचा दोषारोप आहे, आणि कोणत्या रीतीने त्याने 'ख' ला ठकवले ते दोषारोपात मांडलेले नाही किंवा चुकीच्या स्वरूपात मांडले आहे. 'क' स्वत:चा बचाव देतो साक्षीदार बोलावतो आणि त्या संव्यवहाराविषयी स्वत:चा खुलासा देतो. यावरून न्यायालयाला असे अनुमान काढता येईल की, कोणत्या रीतीने ठकवले त्याचा अनुल्लेख महत्वाचा नाही.

(ग) 'क' वर 'ख' ला ठकवल्याचा दोषारोप आहे आणि कोणत्या रीतीने त्याने 'ख' ला ठकवले ते दोषारोपात मांडलेले नाही. 'क' आणि 'ख' यांच्यामध्ये अनेक संव्यवहार झाले होते आणि दोषारोप त्यांपैकी कोणत्या संव्यवहारास अनुलक्षून होता ते कळण्यास 'क'ला काहीच मार्ग नव्हता. व त्याने बचाव दिला नाही. अशा तथ्यांवरून न्यायालयाला असे अनुमान काढता येईल की, कोणत्या रीतीने ठकवले त्याचा अनुल्लेख ही या प्रकरणात महत्वाची चूक होती.

(घ) 'क' वर २१ जानेवारी १८८२ रोजी खुदाबक्ष याचा खून केल्याचा दोषारोप आहे. वस्तुत: खून झालेल्या व्यक्तीचे नाव 'हैदरबक्ष' असे होते, आणि २० जानेवारी, १८८२ ही खुनाची तारीख होती. हा एक खून वगळता, 'क' वर कधीही कोणत्या खुनाचा दोषारोप नव्हता आणि दंडाधिकाऱ्यासमोर ज्या चौकशीची सुनावणी झाली ती फक्त हैदरबक्षच्याच खुनाला अनुलक्षून होती. या तथ्यावरून न्यायालयाला असे अनुमान काढता येईल की, 'क' ची दिशाभूल झालेली नव्हती, आणि दोषारोपातील चूक गौण होती.

(ङ) 'क' वर हैदरबक्षचा २० जानेवारी, १८८२ रोजी आणि (ज्याने त्या खुनाबद्दल त्याला अटक करण्याचा प्रयत्न केला त्या) खुदाबक्षचा २१ जानेवारी १८८२ रोजी खून केल्याचा दोषारोप होता. हैदरबक्षच्या खुनाचा दोषारोप त्याच्यावर करण्यात आला तेव्हा, खुदाबक्षच्या खुनाबद्दल त्याची संपरीक्षा करण्यात आली. त्याच्या बचावासाठी हजर असलेले साक्षीदार हे हैदरबक्षच्या खटल्यातील साक्षीदार होते. न्यायालयाला यावरून असे अनुमान काढता येईल की, 'क' ची दिशाभूल झाली, आणि ती चूक महत्त्वाची होती.

२१६. (१) न्यायनिर्णय अधिघोषित करण्यापूर्वी कोणत्याही न्यायालयाला दोषारोपात कोणताही फेरबदल करता येईल किंवा त्यात अधिक भर घालता येईल. न्यायालयाला दोषारोपात फेरबदल करता येणे.

(२) याप्रमाणे फेरबदल केलेला किंवा अधिक घातलेला प्रत्येक मजकूर आरोपीला वाचून दाखवण्यात येईल व समजावून देण्यात येईल.

(३) संपरीक्षा पुढे चालवणे हे न्यायालयाच्या मते, आरोपीला आपला बचाव करण्यात किंवा फिर्यादीला खटला चालवण्यात बाधक होण्याचा संभव नाही असे दोषारोपातील फेरबदलाचे किंवा अधिक घातलेल्या मजकुराचे स्वरुप असेल तर, असा फेर बदल करण्यात आल्यानंतर किंवा अधिक मजकूर घालण्यात आल्यानंतर स्वविवेकानुसार न्यायालयाला फेरबदल केलेला किंवा अधिक मजकूर घातलेला दोषारोप जणू काही मूळचा दोषारोप असावा त्याप्रमाणे संपरीक्षा पुढे चालवता येईल.

(४) संपरीक्षा तात्काळ पुढे चालवणे हे न्यायालयाच्या मते, आरोपीला किंवा फिर्यादीला पूर्वोक्ताप्रमाणे बाधक होण्याचा संभव आहे असे त्या फेरबदलाचे किंवा अधिक घातलेल्या मजकुराचे स्वरूप असेल तर, न्यायालय नव्याने संपरीक्षा करण्याचा निदेश देऊ शकेल किंवा जरूर असेल तितक्या काळापुरती संपरीक्षा तहकूब करू शकेल.

(५) फेरबदल केलेल्या किंवा अधिक भर घातलेल्या दोषारोपात नमूद केलेला अपराध हा ज्याबद्दलच्या खटल्यासाठी पूर्वमंजुरीची जरूरी असते असा अपराध असेल तर, फेरबदल केलेला किंवा अधिक भर घातलेला दोषारोप ज्यांवर आधारलेला आहे त्याच तथ्यांवरून खटल्यासाठी आधीच मंजुरी मिळवलेली नसल्यास, अशी मंजुरी मिळेपर्यंत त्या प्रकरणात पुढे कार्यवाही केली जाणार नाही.

दोषारोपात फेरबदल केला असेल तेव्हा किंवा साक्षीदारांना पुन्हा बोलावणे.

२१७. संपरीक्षा सुरू झाल्यानंतर जेव्हाकेव्हा न्यायालयाने दोषारोपात फेरबदल केला असेल अधिक भर घातली असेल तेव्हा, फिर्यादीला किंवा आरोपीला,—

(क) ज्याची साक्षतपासणी केलेली असेल अशा कोणत्याही साक्षीदारास पुन्हा बोलवण्याची किंवा पुन्हा समन्स पाठवण्याची मुभा दिली जाईल—माल त्रास देण्याच्या किंवा विलंब लावण्याच्या किंवा न्यायाची उद्दिष्टे विफल करण्याच्या हेतूने, फिर्यादी किंवा, प्रकरणपरत्वे, आरोपी हा अशा साक्षीदाराला पुन्हा बोलावू इच्छित आहे किंवा त्याची पुन्हा तपासणी करू इच्छित आहे या कारणास्तव मुभा नाकारावी असे न्यायालयाला वाटले तर, ती कारणे त्याला लेखी नमूद करावी लागतील;

(ख) त्याचप्रमाणे, न्यायालयाला महत्वाचा वाटेल अशा आणखी कोणत्याही साक्षीदाराला बोलावण्याची मुभा दिली जाईल.

**ख- दोषारोपांचे संयोजन**

वेगवेगळ्या अपराधांकरिता अलगअलग दोषारोप.

२१८. (१) कोणत्याही व्यक्तीवर ज्याचा आरोप करण्यात आला असेल अशा प्रत्येक विभिन्न अपराधाबद्दल अलग-अलग दोषारोप असेल, आणि अशा प्रत्येक दोषारोपाची संपरीक्षा अलगअलगपणे केली जाईल :

परंतु, जेव्हा आरोपी व्यक्ती लेखी अर्जाद्वारे तशी इच्छा व्यक्त करील आणि अशा व्यक्तीला ते बाधक होणार नाही असे दंडाधिकाऱ्याचे मत असेल तेव्हा त्याबाबतीत, दंडाधिकाऱ्याला अशा व्यक्ती-विरुद्ध मांडणी केलेल्या सर्व किंवा कितीही दोषारोपाची एकत्रितपणे संपरीक्षा करता येईल.

(२) पोटकलम (१) मधील कोणतीही गोष्ट २१९, २२०, २२१ व २२३ या कलमांतील उपबंधांच्या प्रवर्तनावर परिणाम करणार नाही.

**उदाहरण**

'क' वर एका प्रसंगी चोरी केल्याचा आणि अन्य प्रसंगी जबर दुखापत केल्याचा आरोप आहे. चोरीबद्दल व जबर दुखापत केल्याबद्दल 'क' वर अलगअलग दोषारोप ठेवून त्याची अलगअलगपणे संपरीक्षा केली पाहिजे.

एका वर्षातील एकाच प्रकारच्या तीन अपराधांबद्दल एकत्रितपणे दोषारोप ठेवता येणे.

२१९. (१) जेव्हा एकाच प्रकारचे एकाहून जास्त अपराध, अशांपैकी पहिल्या अपराधापासून शेवटच्या अपराधापर्यंतच्या बारा महिन्यांच्या अवधीत केल्याबद्दल—मग ते त्याच व्यक्तीबाबत असोत वा नसोत एखाद्या व्यक्तीवर आरोप करण्यात आला असेल तेव्हा, त्यापैकी जास्तीत जास्त तीन इतक्या मर्यादेपर्यंत कितीही अपराधांचा दोषारोप तिच्यावर ठेवून एकाच संपरीक्षेत तिची संपरीक्षा करता येईल.

(२) जेव्हा अपराध हे 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या अथवा कोणत्याही विशेष किंवा स्थानिक कायद्याच्या त्याच कलमाखाली तेवढ्याच शिक्षेस पात्र असतात तेव्हा, ते एकाच प्रकारचे असतात :

परंतु, या कलमाच्या प्रयोजनार्थ 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या कलम ३७९ खाली शिक्षापात्र असलेला अपराध हा उक्त संहितेच्या कलम ३८० खालील शिक्षापात्र अपराध ज्या प्रकारचा आहे त्याच प्रकारचा असल्याचे मानण्यात येईल, आणि उक्त संहितेच्या अथवा कोणत्याही विशेष किंवा स्थानिक कायद्याच्या कोणत्याही कलमाखालील शिक्षापात्र अपराध करण्याचा प्रयत्न करणे हा अपराध असेल तेव्हा, त्या कलमाखालील शिक्षापात्र अपराध हा अशा प्रयत्नाच्याच प्रकारचा अपराध असल्याचे मानण्यात येईल.

एकाहून अधिक अपराधांची संपरीक्षा.

२२०. (१) त्याच संव्यवहाराचे घटक होऊ शकतील अशाप्रकारे एकमेकींशी निगडित असलेल्या कृतींच्या एका मालिकेत जर, त्याच व्यक्तीने एकाहून अधिक अपराध केले असतील तर, तिच्यावर अशा प्रत्येक अपराधाचा दोषारोप ठेवून त्याबद्दल तिची एकाच संपरीक्षेत संपरीक्षा करता येईल.

(२) जेव्हा कलम २१२ च्या पोटकलम (२) मध्ये किंवा कलम २१९ च्या पोटकलम (१) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे फौजदारीपात्र न्यासभंग किंवा अप्रामाणिकपणे अपहार अशा एक किंवा अधिक अपराधांचा दोषारोप ठेवण्यात आलेल्या व्यक्तीवर, तो अपराध किंवा ते अपराध करणे सुकर होण्यासाठी किंवा ते केल्याचे लपवण्यासाठी तिने खोटे हिशेब दाखवण्याचा एक किंवा अधिक अपराध केले असल्याचा आरोप करण्यात आला असेल तेव्हा, अशा प्रत्येक अपराधाबद्दल तिच्यावर दोषारोप ठेवून त्याबद्दल तिची एका संपरीक्षेत संपरीक्षा करता येईल.

(३) अभिकथित कृती मिळून अपराध घडलेला असून, त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यातील ज्या व्याख्यांद्वारे अपराधाची व्याख्या केलेली किंवा शिक्षा ठरवलेली असेल अशा दोन किंवा अधिक अलगअलग व्याख्यांमध्ये तो मोडत असेल तर, अशांपैकी प्रत्येक अपराधाबद्दल त्यांचा आरोप करण्यात आलेल्या व्यक्तीवर दोषारोप ठेवून एका संपरीक्षेत तिची संपरीक्षा करता येईल.

(४) ज्या अनेक कृतींपैकी एखादी कृती हीच किंवा एकाहून अधिक कृती या स्वयमेव अपराध आहेत त्या एकत्र केल्या असता एक वेगळा अपराध होत असेल तर, अशा एकत्रित कृतींमुळे होणाऱ्या अपराधाबद्दल आणि अशांपैकी कोणत्याही एका किंवा अधिक कृतींनी घडणाऱ्या अपराधाबद्दल, त्यांचा आरोप असलेल्या व्यक्तीवर दोषारोप ठेवून एका संपरीक्षेत तिची संपरीक्षा करता येईल.

(५) या कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या कलम ७१ वर परिणाम करणार नाही.

**पोटकलम (१) ची उदाहरणे**

(क्) कायदेशीर हवालातीत असलेल्या 'ख' या व्यक्तीला 'क' अवैधपणे सोडवतो, आणि तसे करताना 'ख' ज्याच्या हवालातीत होता त्या 'ग' या पोलीस शिपायाला जबर दुखापत करतो. 'क' वर 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याची कलमे २२५ व ३३३ यांखालील अपराधांचा दोषारोप ठेवून, त्याला सिद्धदोष ठरवता येईल.

(ख्) जारकर्म करण्याच्या उद्देशाने 'क' दिवसा घरफोडी करतो, आणि याप्रमाणे ज्या घरात त्याने प्रवेश केला त्या घरात 'ख' च्या पत्नीशी जारकर्म करतो. 'क' वर 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याची कलमे ४५४ व ४९७ याखालील अपराधांचे वेगवेगळे दोषारोप ठेवून त्याला सिद्धदोष ठरवता येईल.

(ग्) 'ग' ची पत्नी 'ख' हिच्याशी जारकर्म करण्याच्या उद्देशाने 'क' तिला भुरळ पाडून 'ग' पासून दूर नेतो, आणि नंतर तिच्याशी जारकर्म करतो. 'क' वर 'भारतीय दंड संहितेच्या' ४९८ व ४९७ या कलमाखालील अपराधांचे वेगवेगळे दोषारोप ठेवून त्याला सिद्धदोष ठरवता येईल.

(घ्) 'क' च्या कब्जात अनेक मोहोरा असून त्या नकली असल्याचे त्याला माहीत आहे व 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या कलम ४६६ खाली शिक्षापात्र असलेली अनेक बनावटीकरणाची कृत्ये करण्यासाठी त्या मोहोरा वापरण्याचा त्याचा उद्देश आहे. 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या ४७३ व्या कलमाखाली प्रत्येक मोहोर कब्जात बाळगल्याबद्दल 'क' वर अलग अलग दोषारोप ठेवून त्यास सिद्धदोष ठरवता येईल.

(ङ्) 'ख' विरुद्ध फौजदारी कार्यवाही करण्यास न्याय्य किंवा कायदेशीर आधारकारण नाही हे माहीत असताना 'ख' ला क्षती पोहोचवण्याच्या उद्देशाने 'क' त्याच्याविरुद्ध तशी कार्यवाही सुरू करतो आणि 'ख' ने अपराध केला असल्याचा दोषारोप त्याच्यावर ठेवण्यास न्याय्य किंवा कायदेशीर आधारकारण नाही हे माहीत असताना त्याच्यावर तसा खोटा आरोप करतो. 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यातील कलम २११ खाली दोन अपराधांबद्दल 'क' वर अलगअलग दोषारोप ठेवून त्याला सिद्धदोष ठरवता येईल.

(च्) 'ख' ने अपराध केला असल्याचा दोषारोप त्याच्यावर ठेवण्यास न्याय्य किंवा कायदेशीर आधारकारण नाही हे माहीत असताना 'क' त्याला क्षती पोचवण्याच्या उद्देशाने त्याच्यावर तसा खोटा आरोप करतो. देहान्त दंडास पात्र असलेल्या अपराधाबद्दल 'ख' सिद्धदोष ठरावा या उद्देशाने संपरीक्षेच्या वेळी 'क' हा 'ख' विरुद्ध खोटी साक्ष देतो. 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या २११ व १९४ या कलमाखालील अपराधांबद्दल 'क' वर अलगअलग दोषारोप ठेवून त्याला सिद्धदोष ठरवता येईल.

(छ्) दंगा करणे, जबर दुखापत करणे व दंगा मोडून काढण्याचे आपले कर्तव्य पार पाडण्याच्या प्रयत्नात असलेल्या लोकसेवकावर हमला करणे हे अपराध 'क' हा अन्य सहाजणांसह करतो. 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या १४७, ३२५ आणि १५२ या कलमाखालील अपराधांबद्दल 'क' वर अलगअलग दोषारोप ठेवून त्याला सिद्धदोष ठरवता येईल.

(ज्) 'ख', 'ग' व 'घ' यांना भयभीत करण्याच्या उद्देशाने 'क' त्यांना शारीरिक इजा करण्याची धमकी एकाचवेळी देतो. 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या ५०६ व्या कलमाखालील तीन अपराधांपैकी प्रत्येकाबद्दल 'क' वर दोषारोप ठेवून त्याला सिद्धदोष ठरवता येईल.

(क्) ते (ज्) यांपैकी त्या त्या उदाहरणात निर्देशिलेल्या वेगवेगळ्या दोषारोपांची एकाचवेळी संपरीक्षा करता येईल.

**पोटकलम (३) ची उदाहरणे**

(झ्) 'क' हा गैरपणे 'ख' ला वेताने झोडपतो. 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या ३५२ व ३२३ या कलमाखाली 'क' वर अलगअलग दोषारोप ठेवून त्याला सिद्धदोष ठरवता येईल.

(ञ्) धान्याची अनेक चोरलेली पोती लपवण्याच्या हेतूने ती 'क' व 'ख' यांच्या स्वाधीन करण्यात येतात. तो चोरीचा माल आहे हे त्यांना माहीत आहे. त्यानंतर पोती पेवाच्या तळाशी लपवण्यासाठी 'क' व 'ख' एकमेकांना स्वेच्छेने सहाय्य करतात. 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या ४११ आणि ४१४ या कलमाखालील अपराधांबद्दल 'क' आणि 'ख' यांच्यावर अलगअलग दोषारोप ठेवून त्यांना सिद्धदोष ठरवता येईल.

(ट्) आपले मूल उघड्यावर सोडून दिल्यामुळे मरण्याचा संभव आहे हे माहीत असताना 'क' त्याला उघड्यावर टाकते. याप्रमाणे उघड्यावर टाकल्याचा परिणाम म्हणून ते मूल मृत्यू पावते. 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या ३१७ व ३०४ या कलमांखालील अपराधांबद्दल 'क' वर अलगअलग दोषारोप ठेवून तिला सिद्धदोष ठरवता येईल.

पोटकलम (३) ची उदाहरणे

(ठ) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या १६७ व्या कलमाखालील अपराधाबद्दल 'ख' या लोकसेवकाला सिद्धदोष ठरवण्याकरता अप्रामाणिकपणाने 'क' हा बनावट दस्तऐवज अस्सल पुरावा म्हणून वापरतो. त्या संहितेतील कलम ४७१ (कलम ४६६ सहित) आणि कलम १९६ या कलमांखालील अपराधांबद्दल 'क' वर अलगअलग दोषारोप ठेवून त्याला सिद्धदोष ठरवता येईल.

पोटकलम (४) चे उदाहरण

(ड) 'क' हा 'ख' ची लूटमार करतो, आणि तसे करताना त्याला स्वेच्छापूर्वक दुखापत करतो. 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या ३२३, ३९२ आणि ३९४ या कलमांखालील अपराधांबद्दल 'क' वर दोषारोप ठेवून त्याला सिद्धदोष ठरवता येईल.

**कोणता अपराध करण्यात आलेला आहे याबद्दल शंका असेल तेथे.**

२२१. (१) जी तथ्ये शाबीत करता येतील ती अनेक अपराधांपैकी कोणत्या अपराधाची घटक-तथ्ये होतील हे शंकास्पद आहे असे एखाद्या कृतीचे किंवा कृतिमालिकेचे स्वरुप असेल तर, आरोपीने असे सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही अपराध केल्याचा दोषारोप त्याच्यावर ठेवता येईल, आणि अशांपैकी कितीही दोषारोपांची एकाच वेळी संपरीक्षा करता येईल ; अथवा उक्त अपराधांपैकी कोणता ना कोणता-तरी अपराध केल्याचे पर्यायी दोषारोप त्याच्यावर ठेवता येतील.

(२) जर अशा प्रकरणात आरोपीवर एका अपराधाचा दोषारोप ठेवला असेल आणि पोटकलम (१) च्या उपबंधाखाली ज्या अपराधाचा त्याच्यावर दोषारोप ठेवता आला असता असा एखादा वेगळा अपराध त्याने केला असल्याचे पुराव्यात दिसून आले तर, त्याने जो अपराध केला असल्याचे दाखवण्यात आले असेल त्या अपराधाचा त्याच्यावर दोषारोप ठेवण्यात आलेला नसला तरी त्याच्याबद्दल त्याला सिद्धदोष ठरवता येईल.

उदाहरणे

(क) 'चोरी' किंवा 'चोरीची संपत्ती स्वीकारणे' किंवा 'फौजदारीपात्र न्यासभंग' किंवा 'ठकवणूक' या सदरात मोडू शकेल अशा कृतीचा 'क' वर आरोप ठेवण्यात आला आहे. त्याच्यावर चोरी करणे, चोरीची संपत्ती स्वीकारणे, फौजदारीपात्र न्यासभंग करणे व ठकवणूक करणे हे दोषारोप ठेवता येतील अथवा त्याच्यावर चोरी केल्याचा किंवा चोरीची संपत्ती स्वीकारल्याचा किंवा फौजदारीपात्र न्यासभंग केल्याचा किंवा ठकवणूक केल्याचा दोषारोप ठेवता येईल.

(ख) वर उल्लेखिलेल्या प्रकरणात 'क' वर फक्त चोरीचा दोषारोप ठेवण्यात आला आहे. त्याने फौजदारीपात्र न्यासभंग केल्याचा किंवा चोरीचा माल स्वीकारल्याचा अपराध केला आहे असे दिसून येते. अशा अपराधाचा त्याच्यावर दोषारोप ठेवलेला नसला तरी, त्याला फौजदारीपात्र न्यासभंगाबद्दल किंवा, (प्रकरणपरत्वे), चोरीचा माल स्वीकारल्याबद्दल सिद्धदोष ठरवता येईल.

(ग) 'ख' ने 'ग' ला दंडुक्याने मारल्याचे आपण पाहिले असे 'क' दंडाधिकाऱ्यासमोर शपथेवर कथन करतो. 'ख' ने 'ग' ला कधीच मारले नव्हते असे 'क' सत्र न्यायालयापुढे शपथेवर कथन करतो. या परस्परविरोधी विधानांपैकी कोणते खोटे आहे हे शाबीत करणे शक्य नसले तरीही, 'क' वर त्यांपैकी कशाचाही दोषारोप ठेवून त्याने उद्देशपूर्वक खोटी साक्ष दिल्याबद्दल त्याला सिद्धदोष ठरवता येईल.

**शाबीत केलेल्या अपराधात जेव्हा दोषारोप केलेला अपराध समाविष्ट असेल तेव्हा.**

२२२. (१) ज्या अनेक बाबींपैकी काहींच्याच संयोगामुळे एखादा पूर्ण गौण अपराध होतो त्या बाबी मिळून बनलेल्या अपराधाचा जेव्हा एखाद्या व्यक्तीवर दोषारोप ठेवलेला असेल, आणि असा संयोग शाबीत झाला असला तरी बाकीच्या बाबी शाबीत झाल्या नसतील तेव्हा, त्या गौण अपराधाबद्दल त्याच्यावर दोषारोप ठेवलेला नसला तरीही, त्याला त्याबद्दल सिद्धदोष ठरवता येईल.

(२) जेव्हा एखाद्या व्यक्तीवर अपराधाचा दोषारोप ठेवलेला असून ज्यामुळे तो गौण अपराध ठरतो अशी तथ्ये शाबीत केलेली असतील तेव्हा, त्या गौण अपराधाचा त्याच्यावर दोषारोप ठेवलेला नसला तरीही, त्याला त्याबद्दल सिद्धदोष ठरवता येईल.

(३) जेव्हा एखाद्या व्यक्तीवर अपराधाचा दोषारोप ठेवलेला असेल तेव्हा, असा अपराध करण्याचा प्रयत्न केल्याचा वेगळा दोषारोप त्याच्यावर ठेवलेला नसला तरीही, त्याला त्या प्रयत्नाबद्दल सिद्धदोष ठरवता येईल.

(४) कोणत्याही गौण अपराधाबाबत कार्यवाही सुरू करण्यासाठी आवश्यक गोष्टींची पूर्तता झाली नसेल त्याबाबतीत, या कलमातील कोणतीही गोष्ट त्या गौण अपराधाबद्दलची दोषसिद्धी प्राधिकृत करत असल्याचे मानले जाणार नाही.

उदाहरणे

(क) 'क' कडे परिवाहक म्हणून सोपवण्यात आलेल्या मालाबाबत त्याने फौजदारीपात्र न्यासभंग केला असा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यातील ४०७ व्या कलमाखाली दोषारोप ठेवण्यात आला आहे. त्याने त्या मालाबाबत त्या संहितेच्या ४०६ व्या कलमाखाली फौजदारीपात्र न्यासभंग केला, पण तो माल त्याच्याकडे परिवाहक म्हणून सोपवण्यात आलेला नव्हता असे दिसून येते. उक्त कलम ४०६ खाली फौजदारीपात्र न्यासभंगाबद्दल त्याला सिद्धदोष ठरवता येईल.

उदाहरणे

(ख्) 'क' ने जबर दुखापत केल्याबद्दल 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या कलम ३२५ खाली त्याच्यावर दोषारोप ठेवण्यात आला आहे. तीव्र व आकस्मिक प्रक्षोभनामुळे आपण ते कृत्य केले असे तो शाबीत करतो. त्या संहितेच्या ३२५ व्या कलमाखाली त्याला सिद्धदोष ठरवता येईल.

**कोणत्या व्यक्तींवर संयुक्तपणे दोषारोप ठेवता येईल.**

२२३. पुढील व्यक्तींवर एकत्रितपणे दोषारोप ठेवून त्यांची संपरीक्षा करता येईल, त्या अशा :—

(क्) एकाच संव्यवहाराच्या ओघात तोच अपराध केल्याचा आरोप असलेल्या व्यक्ती;

(ख्) एखाद्या अपराधाचा आरोप असलेल्या व्यक्ती, आणि अशा अपराधास अपप्रेरणा दिल्याचा किंवा तो अपराध करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप असलेल्या व्यक्ती;

(ग्) ज्या व्यक्तींवर, त्यांनी बारा महिन्यांच्या अवधीत कलम २१९ च्या अर्थानुसार त्याच प्रकारचे एकाहून अधिक अपराध मिळून केल्याचा आरोप असेल त्या व्यक्ती;

(घ्) एकाच संव्यवहाराच्या ओघात निरनिराळे अपराध केल्याचा आरोप असलेल्या व्यक्ती ;

(ङ्) ज्या अपराधामध्ये चोरी, बलाद्ग्रहण, ठकवणूक किंवा फौजदारीपात्र अपहार समाविष्ट आहे अशा अपराधाचा आरोप असलेल्या व्यक्ती, आणि ज्या व्यक्तींवर, अशा प्रथमोक्त व्यक्तींनी केलेल्या अशा कोणत्याही अपराधामुळे एखाद्या संपत्तीचा कब्जा हस्तांतरित झाल्याचे अभिकथन करण्यात आले असून ती स्वीकारल्याचा किंवा ठेवून घेतल्याचा किंवा तिची विल्हेवाट करण्याच्या किंवा ती लपवण्याच्या कामी सहाय्य केल्याचा, अथवा अशा नंतर उल्लेखिलेल्या कोणत्याही अपराधास अपप्रेरणा दिल्याचा किंवा तो अपराध करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप असेल अशा व्यक्ती;

(च्) ज्या चोरीच्या संपत्तीचा कब्जा त्याच अपराधामुळे हस्तांतरित झाला आहे तिच्याबाबत 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या ४११ व ४१४ या कलमांखालील किंवा त्यांपैकी कोणत्याही कलमाखालील अपराधाचा आरोप असलेल्या व्यक्ती;

(छ्) नकली नाण्यासंबंधी 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या बाराव्या प्रकरणाखालील कोणत्याही अपराधाचा आरोप असलेल्या व्यक्ती आणि त्याच नाण्यासंबंधी उक्त प्रकरणाखालील अन्य कोणताही अपराध केल्याचा किंवा अशा कोणत्याही अपराधास अपप्रेरणा दिल्याचा किंवा तो अपराध करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप असलेल्या व्यक्ती;

आणि या प्रकरणाच्या पूर्वगामी भागात अंतर्भूत असलेले उपबंध, शक्य होईल तेथवर, अशा सर्व दोषारोपांना लागू असतील :

परंतु, जेव्हा अनेक व्यक्तींवर वेगवेगळ्या अपराधांचा दोषारोप ठेवलेला असेल आणि अशा व्यक्ती या कलमात विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही वर्गात मोडत नसतील तेव्हा, अशा व्यक्तींनी लेखी अर्जाद्वारे तशी इच्छा व्यक्त केली आणि अशा सर्व व्यक्तींची एकत्र संपरीक्षा करण्याने अशा व्यक्तींवर बाधक परिणाम होणार नाही अशी व तसे करणे समयोचित आहे अशी दंडाधिकाऱ्याची खात्री झाली तर, त्याला त्याप्रमाणे एकत्र संपरीक्षा करता येईल.

**अनेक दोषारोपांपैकी एकाबाबत दोषसिद्धी झाल्यावर उरलेले दोषारोप मागे घेणे.**

२२४. जेव्हा एकाच व्यक्तीच्या विरुद्ध एकापेक्षा अधिक शीर्षे अंतर्भूत असलेल्या दोषारोपाची मांडणी करण्यात येते आणि त्यांच्यापैकी एका किंवा अधिक दोषारोपांवरून दोषसिद्धी झालेली असेल तेव्हा, फिर्यादीदारास किंवा खटला चालवणाऱ्या अधिकाऱ्यास, न्यायालयाच्या संमतीने उरलेला किंवा उरलेले दोषारोप मागे घेता येतील, अथवा न्यायालयास स्वतः होऊन अशा दोषारोपाची किंवा दोषारोपांची चौकशी किंवा संपरीक्षा स्थगित करता येईल आणि याप्रमाणे दोषारोप मागे घेणे हे असा दोषारोप किंवा असे दोषारोप यातून मुक्त करण्यासारखेच परिणामक असेल; मात्र दोषसिद्धी रद्द ठरल्यास त्या बाबतीत उक्त न्यायालयास (दोषसिद्धी रद्द ठरवणाऱ्या न्यायालयाच्या आदेशाच्या अधीनतेने) याप्रमाणे मागे घेतलेल्या दोषारोपाची किंवा दोषारोपांची चौकशी किंवा संपरीक्षा पुढे चालवता येईल.

## प्रकरण अठरा

## सत्र न्यायालयापुढील संपरीक्षा

**सरकारी अभियोक्त्याने संपरीक्षा चालविणे.**

२२५. सत्र न्यायालयासमोरील प्रत्येक संपरीक्षेत, खटला सरकारी अभियोक्त्याकरवी चालवला जाईल.

**फिर्यादीपक्षातर्फे प्रारंभिक कथन करणे.**

२२६. कलम २०९ खाली खटला सुपूर्द करण्यात आल्यावरून जेव्हा आरोपी न्यायालयासमोर उपस्थित होईल किंवा आणला जाईल तेव्हा, फिर्यादी हा आरोपीविरुद्ध आणलेल्या दोषारोपाचे वर्णन करून आणि कोणत्या पुराव्याने त्याने आरोपीचा दोष शाबीत करण्याचे योजिले आहे ते निवेदन करून आपल्या बाजूचे प्रारंभिक कथन करील.

विनादोषारोप सुटका. २२७. खटल्याचा अभिलेख आणि त्यासोबत सादर केलेले कागदपत्र विचारात घेतल्यावर आणि आरोपी व फिर्यादीपक्ष यांची याबाबतची निवेदने ऐकल्यानंतर जर, आरोपीच्या विरुद्ध कार्यवाही करण्यास पुरेसा आधार नाही असे न्यायाधीशाला वाटले तर, तो आरोपीला विनादोषारोप सोडून देईल आणि तसे करण्यामागची आपली कारणे नमूद करील.

दोषारोपांची मांडणी करणे. २२८. (१) पुर्वोक्तानुसार विचार केल्यानंतर आणि पक्षांची बाजू ऐकल्यानंतर जर,—

(क) आरोपीने केलेला अपराध केवळ सत्र न्यायालयानेच संपरीक्षा करण्याजोगा असा नाही असे गृहीत धरण्यास आधार आहे असे न्यायाधीशाचे मत झाले तर, तो आरोपी व्यक्तीविरुद्ध दोषारोप ठेवू शकेल आणि आदेशाद्वारे तो खटला संपरीक्षेसाठी मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याकडे वर्ग करू शकेल आणि तद्नंतर पोलीस अहवालावरून सुरू केलेल्या वॉरंट-खटल्यांच्या संपरीक्षेसाठी अनुसरावयाच्या प्रक्रियेनुसार मुख्य न्याय दंडाधिकारी त्या अपराधाची संपरीक्षा करील;

(ख) आरोपीने केलेला अपराध केवळ सत्र न्यायालयानेच संपरीक्षा करण्याजोगा असा आहे असे गृहीत धरण्यास आधार आहे असे न्यायाधीशाचे मत झाले तर, तो आरोपींविरुद्ध दोषारोपाची लेखी मांडणी करील.

(२) पोटकलम (१) च्या खंड (ख) खाली न्यायाधीश दोषारोपाची मांडणी करील त्या बाबतीत, तो दोषारोप आरोपीला वाचून दाखवला जाईल व समजावून देण्यात येईल आणि आरोपीवर दोषारोप केलेला अपराध तो कबूल करणार आहे की आपली संपरीक्षा केली जाण्याची मागणी करणार आहे हे त्याला विचारले जाईल.

अपराधीपणाच्या कबुलीवरून दोषसिद्धी. २२९. जर आरोपीने अपराधाची कबुली दिली तर, न्यायाधीश ती कबुली नोंदून घेईल आणि स्वविवेकानुसार तीवरून त्याला सिद्धदोष ठरवू शकेल.

फिर्यादीपक्षाच्या साक्षी पुराव्यासाठी तारीख. २३०. जर आरोपीने उत्तर देण्यास नकार दिला तर, किंवा उत्तर दिले नाही तर, किंवा त्याने संपरीक्षा करण्याची मागणी केली तर, किंवा कलम २२९ खाली त्यास सिद्धदोष ठरविण्यात आले नाही तर, न्यायाधीश साक्षीदारांच्या तपासणीसाठी तारीख निश्चित करील, आणि फिर्यादीपक्षाच्या अर्जावरून, कोणत्याही साक्षीदाराला हजर राहण्यास अथवा कोणताही दस्तऐवज किंवा अन्य वस्तू हजर करण्यास भाग पाडण्यासाठी कोणतीही आदेशिका काढू शकेल.

फिर्यादीपक्षातर्फे साक्षी पुरावा. २३१. (१) याप्रमाणे निश्चित केलेल्या तारखेस न्यायाधीश फिर्यादीपक्षाच्या पुष्ट्यर्थ हजर केला जाईल असा सर्व साक्षीपुरावा घेण्याचे काम सुरू करील.

(२) न्यायाधीश स्वविवेकानुसार, एखाद्या साक्षीदाराची उलट तपासणी अन्य कोणत्याही साक्षीदाराची किंवा साक्षीदारांची तपासणी होईपर्यंत लांबणीवर टाकण्यास परवानगी देऊ शकेल किंवा कोणत्याही साक्षीदारास आणखी उलट तपासणीस पुन्हा बोलावू शकेल.

दोषमुक्ती. २३२. फिर्यादीपक्षातर्फे साक्षीपुरावा घेऊन आरोपीची तपासणी केल्यानंतर आणि त्या मुद्यावरील फिर्यादीपक्षाचे व बचावपक्षाचे म्हणणे ऐकल्यानंतर जर, न्यायाधीशाला आरोपीने अपराध केला असल्याचा पुरावा नाही असे वाटले तर, न्यायाधीश दोषमुक्तीचा आदेश नमूद करील.

बचावाला सुरुवात करणे. २३३. (१) आरोपीस कलम २३२ खाली दोषमुक्त करण्यात आले नाही तर त्याबाबतीत त्याला आपल्या बचावाला सुरुवात करण्यास आणि त्याच्या पुष्ट्यर्थ त्याच्याकडे असेल तो कोणताही साक्षीपुरावा हजर करण्यास सांगितले जाईल.

(२) जर आरोपीने कोणतेही कैफियतपत्र दिले तर, न्यायाधीश ते अभिलेखात दाखल करील.

(३) एखाद्या साक्षीदाराला समक्ष हजर होण्यास अथवा कोणताही कागद किंवा वस्तू हजर केली जाण्यास भाग पाडण्याकरिता कोणतीही आदेशिका काढण्याबाबत आरोपीने अर्ज केला तर, न्यायाधीश अशी आदेशिका काढील—मात्र असा, अर्ज त्रास देण्यासाठी किंवा विलंब लावण्यासाठी किंवा न्यायाची उद्दिष्टे विफल करण्यासाठी केलेला आहे या कारणास्तव तो नाकारावा असे त्याला वाटले तर, त्यास त्याबद्दलची कारणे लेखी नमूद करावी लागतील.

युक्तिवाद. २३४. जेव्हा बचावपक्षाच्या बाजूने कोणी साक्षीदार असल्यास त्याची संपूर्ण तपासणी पूर्ण होईल तेव्हा फिर्यादी आपली बाजू संक्षेपाने मांडील आणि आरोपी किंवा त्याचा वकील उत्तर देण्यास हक्कदार होईल.

परंतु, जेव्हा आरोपीने किंवा त्याच्या वकिलाने कायदेविषयक मुद्दा उपस्थित केला असेल तेव्हा न्यायाधीशाच्या परवानगीने फिर्यादीपक्षाला अशा कायदेविषयक मुद्यांसंबंधात आपली निवेदने सादर करता येतील.

२३५. (१) युक्तिवाद आणि कोणतेही कायदेविषयक मुद्दे असल्यास ते ऐकल्यानंतर, न्यायाधीश त्या खटल्यातील न्यायनिर्णय देईल. दोषमुक्ती किंवा दोषसिद्धी यांचा न्यायनिर्णय.

(२) जर आरोपी सिद्धदोष ठरला आणि न्यायाधीशाने कलम ३६० च्या उपबंधानुसार कार्यवाही केली नाही तर एरव्ही तो शिक्षेच्या प्रश्नावर आरोपीचे म्हणणे ऐकून घेईल आणि नंतर कायद्यानुसार त्याला शिक्षा ठोठावील.

२३६. पूर्वी दोषसिद्धी झाली असल्याबद्दल कलम २११चे पोटकलम (७) याच्या उपबंधाखालील दोषारोप ठेवण्यात आला असेल आणि दोषारोपात अभिकथन केल्याप्रमाणे आपणास पूर्वी सिद्धदोष ठरवण्यात आले असल्याचे तो कबूल करत नसेल अशा प्रकरणी, कलम २२९ किंवा कलम २३५ खाली उक्त आरोपीस सिद्धदोष ठरवल्यानंतर न्यायाधीशाला अभिकथित पूर्व दोषसिद्धीबाबत साक्षीपुरावा घेता येईल, आणि त्यावरील निष्कर्ष त्याला नमूद करावा लागेल : पूर्वीची दोषसिद्धी.

परंतु, कलम २२९ किंवा कलम २३५ खाली आरोपीला सिद्धदोष ठरवण्यात आल्याशिवाय, न्यायाधीश असा कोणताही दोषारोप वाचून दाखविणार नाही किंवा आरोपीला त्याबाबत उत्तर देण्यास सांगितले जाणार नाही, अथवा फिर्यादीपक्षाला किंवा त्याने दाखल केलेल्या साक्षीपुराव्यात पूर्वीच्या दोषसिद्धीचा निर्देश करता येणार नाही.

२३७. (१) कलम १९९ च्या पोटकलम (२) खाली अपराधाची दखल घेणारे सत्र न्यायालय, त्यासंबंधीच्या खटल्याची संपरीक्षा दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयासमोर पोलीस अहवालाव्यतिरिक्त अन्यथा गुदरल्या जाणाऱ्या वॉरंट खटल्यांच्या संपरीक्षेच्या प्रक्रियेनुसार करील : कलम १९९ (२) खाली गुदरलेल्या खटल्यांतील कार्यपद्धती.

परंतु, ज्या व्यक्तीविरुद्ध अपराध केला गेल्याचे अभिकथन केलेले असेल त्या व्यक्तीची फिर्यादीपक्षाचा साक्षीदार म्हणून तपासणी केली जाईल—मात्र सत्र न्यायालयाने काही कारणांस्तव अन्यथा निदेश दिला तर, त्याला ती कारणे नमूद करावी लागतील.

(२) या कलमाखालील प्रत्येक संपरीक्षा, त्यातील कोणत्याही पक्षकाराची तशी इच्छा असल्यास किंवा तसे करणे न्यायालयास योग्य वाटल्यास, कक्षांतर्गत करण्यात येईल.

(३) अशा कोणत्याही प्रकरणी जर न्यायालयाने सर्व आरोपींना किंवा त्यांच्यापैकी कोणालाही विनादोषारोप सोडले किंवा दोषमुक्त केले आणि त्यांच्या विरुद्ध किंवा त्यांच्यापैकी कोणाहीविरुद्ध आरोप करण्यास वाजवी कारण नव्हते असे त्यांचे मत झाले तर, ते न्यायालय ज्या व्यक्तीबाबत अपराध घडल्याचे अभिकथन करण्यात आले अशा (राष्ट्रपती, उप राष्ट्रपती किंवा राज्याचा राज्यपाल किंवा संघ राज्यक्षेत्राचा प्रशासक यांच्याहून अन्य) व्यक्तीने अशा आरोपीस किंवा एकापेक्षा अधिक आरोपी असतील तर अशा आरोपींपैकी प्रत्येकास किंवा कोणालातरी भरपाई का देऊ नये त्याचे कारण दाखवण्याचा तिला निदेश देऊ शकेल.

(४) याप्रमाणे निदेश देण्यात आलेली व्यक्ती जे कोणतेही कारण दाखवील ते न्यायालय नमूद करील आणि विचारात घेईल, आणि आरोप करण्यास वाजवी कारण नव्हते याबाबत न्यायालयाची खात्री झाली तर त्याची कारणे नमूद करुन ते, अशा व्यक्तीने आरोपीस किंवा त्यांच्यापैकी प्रत्येकास किंवा कोणासही, ते ठरवील त्याप्रमाणे जास्तीत जास्त एक हजार रुपये एवढ्या रकमेची भरपाई द्यावी असा आदेश काढू शकेल.

(५) पोटकलम (४) खालील देववलेली भरपाई, म्हणजे जणू काही दंडाधिकाऱ्याने बसवलेला द्रव्यदंड असावा त्याप्रमाणे ती वसूल करण्यात येईल.

(६) पोटकलम (४) खाली भरपाई देण्याचा निदेश ज्या व्यक्तीस देण्यात आला असेल अशा कोणाही व्यक्तीला अशा आदेशामुळे, या कलमाखाली देण्यात आलेल्या फिर्यादीबाबतच्या कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी दायित्वातून सूट मिळणार नाही :

परंतु, या कलमाखाली आरोपी व्यक्तीला देण्यात आलेली कोणतीही रक्कम त्याच बाबीशी संबंधित असलेल्या कोणत्याही नंतरच्या दिवाणी दाव्यात अशा व्यक्तीला भरपाई देववतांना हिशेबात घेतली जाईल.

(७) पोटकलम (४) खाली भरपाई देण्याचा आदेश ज्या व्यक्तीस देण्यात आला असेल ती व्यक्ती, जेथवर तो आदेश भरपाईच्या प्रदानाशी संबंधित असेल तेथवर त्या आदेशाविरुद्ध उच्च न्यायालयाकडे अपील करू शकेल.

(८) जेव्हा आरोपी व्यक्तीला भरपाई दिली जाण्याचा आदेश काढण्यात आला असेल तेव्हा, अपील सादर करण्यासाठी दिलेला कालावधी संपण्यापूर्वी किंवा अपील सादर केले असेल तर, त्या अपिलाचा निर्णय लागण्यापूर्वी त्याला भरपाई दिली जाणार नाही.

## प्रकरण एकोणीस

## दंडाधिकाऱ्याने करावयाची वॉरंट-खटल्यांची संपरीक्षा

### क—पोलीस अहवालावरून दाखल केलेले खटले

कलम २०७ चे अनुपालन. २३८. पोलीस अहवालावरून दाखल केलेल्या कोणत्याही वॉरंट-खटल्यात जेव्हा संपरीक्षेच्या प्रारंभी आरोपी दंडाधिकाऱ्यासमोर उपस्थित होईल किंवा आणला जाईल तेव्हा, आपण कलम २०७च्या उपबंधाचे अनुपालन केले आहे अशी दंडाधिकारी स्वतःची खात्री करून घेईल.

आरोपीला केव्हा विनादोषारोप सोडले जाईल. २३९. कलम १७३ खालील पोलीस अहवाल व त्याबरोबर पाठवलेले कागदपत्र यांचा विचार केल्यावर आणि दंडाधिकाऱ्यास जरूर वाटेल तर व तेवढी आरोपीची तपासणी केल्यावर आणि फिर्यादी-पक्षाला व आरोपीला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यावर, जर दंडाधिकाऱ्यास आरोपीविरुद्ध केलेला आरोप निराधार वाटला तर तो आरोपीला विनादोषारोप सोडील, आणि तसे करण्याची आपली कारणे नमूद करील.

दोषारोपाची मांडणी करणे. २४०. (१) याप्रमाणे विचार केल्यावर, तपासणी झाली असल्यास ती तपासणी आणि सुनावणी झाल्यानंतर जर, या प्रकरणाखाली संपरीक्षा करण्याजोगा अपराध आरोपीने केला आहे हे गृहीत धरण्यास आधार आहे असे दंडाधिकाऱ्याचे मत झाले आणि असा दंडाधिकारी त्या अपराधाची संपरीक्षा करण्यास सक्षम असून, त्याच्या मते तो त्याबद्दल पर्याप्त शिक्षा देऊ शकत असेल तर, तो आरोपीविरुद्ध दोषारोपाची लेखी मांडणी करील.

(२) नंतर आरोपीला दोषारोप वाचून दाखवण्यात येईल व समजावून सांगण्यात येईल, आणि दोषारोप केलेला अपराध तो कबूल करणार आहे की आपली संपरीक्षा केली जाण्याची मागणी करणार आहे हे त्याला विचारले जाईल.

अपराधीपणाच्या कबुलीवरून दोषसिद्धी. २४१. जर आरोपीने अपराधाची कबुली दिली तर, दंडाधिकारी ती कबुली नोंदून घेईल आणि स्वविवेकानुसार तीवरून त्याला सिद्धदोष ठरवू शकेल.

फिर्यादीपक्षातर्फे साक्षीपुरावा. २४२. (१) जर आरोपीने उत्तर देण्यास नकार दिला तर, किंवा उत्तर दिले नाही किंवा संपरीक्षा करण्याची मागणी केली तर, किंवा दंडाधिकाऱ्याने कलम २४१ खाली आरोपीस सिद्धदोष ठरवले नाही तर, दंडाधिकारी साक्षीदारांच्या तपासणीसाठी तारीख निश्चित करील.

(२) फिर्यादीपक्षाच्या अर्जावरून, दंडाधिकारी त्या पक्षाच्या कोणत्याही साक्षीदारास समक्ष हजर होण्याचा अथवा कोणताही कागद किंवा अन्य वस्तू हजर करण्याचा निदेश देणारे समन्स त्याच्यावर काढू शकेल.

(३) याप्रमाणे निश्चित केलेल्या तारखेस दंडाधिकारी फिर्यादी पक्षाच्या पुष्ट्यर्थ हजर केला जाईल असा सर्व साक्षीपुरावा घेण्याचे काम सुरू करील :

परंतु, दंडाधिकारी एखाद्या साक्षीदारांची उलटतपासणी अन्य कोणत्याही साक्षीदाराची किंवा साक्षीदारांची तपासणी होईपर्यंत लांबणीवर टाकण्यास परवानगी देऊ शकेल किंवा कोणत्याही साक्षीदारास आणखी उलटतपासणीसाठी पुन्हा बोलावू शकेल.

बचावपक्षातर्फे साक्षीपुरावा. २४३. (१) त्यानंतर आरोपीला आपला बचाव सुरू करण्यास व आपला साक्षीपुरावा हजर करण्यास सांगितले जाईल, आणि जर आरोपीने कोणतेही कफियतपत्र दिले तर, दंडाधिकारी ते अभिलेखात दाखल करील.

(२) आपल्या बचावाला सुरूवात केल्यानंतर जर तपासणीसाठी किंवा उलटतपासणीसाठी एखाद्या साक्षीदारास समक्ष हजर होण्यास अथवा कोणताही दस्तऐवज किंवा अन्य वस्तू हजर केली जाण्यास भाग पाडण्याकरता कोणतीही आदेशिका काढण्याबाबत आरोपीने दंडाधिकाऱ्याकडे अर्ज केला तर, दंडाधिकारी अशी आदेशिका काढील—मात्र, असा अर्ज त्रास देण्यासाठी किंवा विलंब लावण्यासाठी किंवा न्यायाची उद्दिष्टे विफल करण्यासाठी केलेला आहे या कारणास्तव नाकारला जावा असे त्याला वाटले तर, त्याला असे कारण लेखी नमूद करावे लागेल :

परंतु, आपल्या बचावाला सुरूवात करण्यापूर्वी आरोपीने कोणत्याही साक्षीदाराची तपासणी केली असेल किंवा त्याची उलटतपासणी घेण्याची संधी त्याला होती असे असेल तर, अशा साक्षीदारांची समक्ष हजेरी न्यायाच्या उद्दिष्टांसाठी जरुरीची आहे अशी दंडाधिकाऱ्याची खात्री झाल्याशिवाय या कलमाखाली त्याला हजर राहण्यास भाग पाडले जाणार नाही.

(३) पोटकलम (२) खालील अर्जावरून कोणत्याही साक्षीदाराला समन्स काढण्यापूर्वी, दंडाधिकारी संपरीक्षेच्या प्रयोजनार्थ हजर राहण्यासाठी साक्षीदाराला येणाऱ्या वाजवी खर्चाची रक्कम न्यायालयात जमा केली जावी अशी आज्ञा करू शकेल.

## ख-पोलीस अहवालाव्यतिरिक्त अन्यथा दाखल केलेले खटले

**फिर्यादीपक्षातर्फे साक्षीपुरावा.**

२४४. (१) पोलीस अहवालाव्यतिरिक्त अन्यथा दाखल केलेल्या कोणत्याही वॉरंट-खटल्यामध्ये जेव्हा आरोपी दंडाधिकाऱ्यासमोर उपस्थित होईल किंवा आणला जाईल तेव्हा, दंडाधिकारी फिर्यादीपक्षाचे म्हणणे ऐकण्यास सुरुवात करील आणि फिर्यादीपक्षाच्या पुष्टचर्थ सादर करण्यात येईल असा सर्व साक्षीपुरावा घेईल.

(२) दंडाधिकारी फिर्यादीपक्षाच्या अर्जावरून त्याच्या साक्षीदारांपैकी कोणासही समक्ष हजर होण्याचा अथवा कोणताही कागद किंवा अन्य वस्तू हजर करण्याचा त्याला निदेश देणारे समन्स काढू शकेल.

**आरोपीला केव्हा विनादोषारोप सोडले जाईल.**

२४५. (१) कलम २४४ मध्ये निर्दिष्ट केलेला सर्व साक्षीपुरावा घेतल्यावर, ज्याचे खंडन न झाल्यास आरोपीला सिद्धदोष ठरवणे समर्थनीय होईल असे कोणतेही तथ्य त्याच्याविरुद्ध शाबीत करण्यात आलेले नाही असे काही कारणांस्तव दंडाधिकाऱ्यास वाटले तर, दंडाधिकारी ती कारणे नमूद करून त्याला विनादोषारोप सोडील.

(२) खटला कोणत्याही पूर्वीच्या टप्प्यात असताना जर काही कारणास्तव दंडाधिकाऱ्यास आरोप निराधार आहे असे वाटले तर, ती कारणे नमूद करून आरोपीस विनादोषारोप सोडण्यास अशा दंडाधिकाऱ्याला या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होतो असे मानले जाणार नाही.

**आरोपीला विनादोषारोप सोडले जात नाही. तेव्हाची कार्यपद्धती.**

२४६. (१) असा साक्षीपुरावा घेण्यात आलेला असेल किंवा खटला कोणत्याही पूर्वीच्या टप्प्यात असताना, या प्रकरणाखाली संपरीक्षा करण्याजोगा अपराध आरोपीने केलेला आहे हे गृहीत धरण्यासाठी आधार आहे असे दंडाधिकाऱ्याचे मत झाले आणि असा दंडाधिकारी त्या अपराधाची संपरीक्षा करण्यास सक्षम असून, त्याच्या मते तो त्या अपराधाबद्दल पर्याप्त शिक्षा देऊ शकत असेल तर, तो आरोपीविरुद्ध दोषारोपाची लेखी मांडणी करील.

(२) नंतर आरोपीला दोषारोप वाचून दाखवण्यात येईल व समजावून सांगण्यात येईल, आणि त्याला आपण अपराधी असल्याची कबुली द्यावयाची आहे की काही बचाव द्यावयाचा आहे हे विचारले जाईल.

(३) जर आरोपीने आपण अपराधी असल्याची कबुली दिली तर, दंडाधिकारी ती कबुली नोंदून घेईल आणि स्वविवेकानुसार तीवरून त्याला सिद्धदोष ठरवू शकेल.

(४) जर आरोपीने उत्तर देण्यास नकार दिला तर, किंवा उत्तर दिले नाही तर, किंवा संपरीक्षा करण्याची मागणी केली तर, किंवा पोटकलम (३) खाली आरोपीला सिद्धदोष ठरवण्यात आले नाही तर, फिर्यादीपक्षाच्या ज्या साक्षीदारांची साक्ष तपासणी करण्यात आली असेल त्यांपैकी एखाद्याची उलटतपासणी करण्याची आपली इच्छा आहे काय, व असल्यास, कोणाची उलटतपासणी करावयाची आहे ते आरोपीने खटल्याच्या पुढील सुनावणीच्या प्रारंभी किंवा दंडाधिकाऱ्याला काही कारणांस्तव—ती कारणे नमूद करावी लागतील—तसे योग्य वाटल्यास तात्काळ निवेदन करावे, असे आरोपीला सांगितले जाईल.

(५) आपली तशी इच्छा आहे असे त्याने सांगितले तर, त्याने नांवे सांगितलेल्या साक्षीदारांना पुन्हा बोलावले जाईल, आणि उलटतपासणी व (झाल्यास) फेरतपासणी झाल्यानंतर त्यांना मोकळे करण्यात येईल.

(६) फिर्यादीपक्षाच्या बाकीच्या कोणत्याही साक्षीदारांची साक्ष त्यानंतर घेण्यात येईल, आणि उलटतपासणी व (झाल्यास) फेरतपासणी झाल्यानंतर, त्यांनादेखील मोकळे करण्यात येईल.

**बचावपक्षातर्फे साक्षीपुरावा.**

२४७. त्यानंतर आरोपीला आपल्या बचावास सुरुवात करण्यास व आपला साक्षी पुरावा हजर करण्यास सांगितले जाईल; आणि कलम २४३ चे उपबंध त्या खटल्याला लागू होतील.

## ग-संपरीक्षेची समाप्ती

**दोषमुक्ती किंवा दोषसिद्धी.**

२४८. (१) या प्रकरणाखालील ज्या कोणत्याही खटल्यात दोषारोपाची मांडणी केलेली असेल त्यात जर दंडाधिकाऱ्यांस आरोपी अपराधी नसल्याचे आढळून आले तर, तो दोषमुक्तीचा आदेश नमूद करील.

(२) या प्रकरणाखालील कोणत्याही खटल्यात जेव्हा दंडाधिकाऱ्यास आरोपी अपराधी असल्याचे आढळून येईल, पण तो कलम ३२५ किंवा ३६० च्या उपबंधानुसार कार्यवाही करणार नाही, त्याबाबतीत, शिक्षेच्या प्रश्नाबाबत आरोपीचे म्हणणे ऐकल्यानंतर दंडाधिकारी कायद्यानुसार त्याला शिक्षा ठोठावील.

(३) या प्रकरणाखालील कोणत्याही खटल्यास जेव्हा कलम २११ पोटकलम (७) च्या उप-बंधाखाली पूर्वीच्या दोषसिद्धीचा आरोप केलेला असेल आणि दोषारोपात अभिकथन केल्याप्रमाणे आपणास पूर्वी सिद्धदोष ठरवण्यात आले होते हे आरोपी कबूल करत नसेल त्याबाबतीत, उक्त आरोपीला सिद्धदोष ठरवल्यानंतर दंडाधिकाऱ्याला अभिकथित पूर्व दोषसिद्धीबाबत साक्षीपुरावा घेता येईल, आणि तो त्यावरील निष्कर्ष नमूद करील :

परंतु, पोटकलम (२) खाली आरोपीला सिद्धदोष ठरवल्याशिवाय दंडाधिकारी असा कोणताही आरोप वाचून दाखवणार नाही किंवा आरोपीला त्याबाबत उत्तर देण्यास सांगितले जाणार नाही अथवा फिर्यादीपक्षाला किंवा त्याने दाखल केलेल्या साक्षीपुराव्यात पूर्वीच्या दोषसिद्धीचा निर्देश करता येणार नाही.

फिर्यादाराची अनुपस्थिती.

२४९. फिर्यादीवरून कार्यवाही दाखल केलेली असून खटल्याच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या कोणत्याही दिवशी फिर्यादार अनुपस्थित असेल आणि अपराध कायद्याने आपसात मिटवता येत असेल किंवा तो दखलपात्र अपराध नसेल तेव्हा, यात यापूर्वी काहीही अंतर्भूत असले तरी, दोषारोपाची मांडणी केली जाण्यापूर्वी कोणत्याही वेळी दंडाधिकारी स्वविवेकानुसार आरोपीस विनादोषारोप सोडू शकेल.

वाजवी कारणाशिवाय आरोप केल्याबद्दल भरपाई.

२५०. (१) देण्यात आलेल्या फिर्यादीवरून अथवा पोलीस अधिकाऱ्याला किंवा दंडाधिकाऱ्याला देण्यात आलेल्या वर्दीवरून गुदरलेल्या कोणत्याही खटल्यात, दंडाधिकाऱ्याने संपरीक्षा करण्याजोग्या कोणत्याही अपराधाचा एका व्यक्तीवर किंवा अनेक व्यक्तींवर दंडाधिकाऱ्यासमोर आरोप करण्यात आला असेल आणि ज्याने त्या खटल्याची सुनावणी केली त्या दंडाधिकाऱ्याने सर्व आरोपींना किंवा त्यांपैकी कोणालाही विनादोषारोप सोडले असेल किंवा दोषमुक्त केले असेल आणि त्यांच्याविरुद्ध किंवा त्यांच्यापैकी कोणाही विरुद्ध आरोप करण्यास वाजवी कारण नव्हते असे त्याचे मत असेल तर, आपण काढलेल्या विनादोषारोप सुटकेच्या किंवा दोषमुक्तीच्या आदेशाद्वारे दंडाधिकारी, ज्या व्यक्तीच्या फिर्यादीवरून किंवा वर्दीवरून आरोप ठेवण्यात आला ती व्यक्ती उपस्थित असल्यास, अशा आरोपीला अथवा एकापेक्षा अधिक आरोपी असतील तेव्हा अशा आरोपींपैकी प्रत्येकाला किंवा कोणालाही तिने भरपाई का देऊ नये याबद्दल तात्काळ कारण दाखवण्यास तिला फर्मावू शकेल; अथवा जर अशी व्यक्ती उपस्थित नसेल तर, तिने उपस्थित होऊन वर सांगितल्याप्रमाणे कारण दाखवावे यासाठी तिच्यावर समन्स काढण्याचा निदेश देऊ शकेल.

(२) असा फिर्यादार किंवा वर्दीदार जे कोणतेही कारण दाखवील ते दंडाधिकारी नमूद करील आणि विचारात घेईल, आणि आरोप करण्यास वाजवी कारण नव्हते याबद्दल स्वतःची खात्री झाली तर, कारणे नमूद करून त्या कारणास्तव तो दंडाधिकारी जास्तीत जास्त जेवढा द्रव्यदंड करण्याची त्याला शक्ती आहे तेवढ्या मर्यादेपर्यंत तो ठरवील एवढी भरपाई रक्कम अशा फिर्यादाराने किंवा वर्दीदाराने आरोपीस किंवा त्यांच्यापकी प्रत्येकास किंवा कोणासही द्यावी असा आदेश काढू शकेल.

(३) पोटकलम (२) खाली भरपाई देण्याचे निर्देशित करणारा आदेश काढताना ज्या व्यक्तीने अशी भरपाई द्यावी असा आदेश देण्यात येत आहे त्या व्यक्तीने ती देण्यास कसूर केल्यास, तिला जास्तीत जास्त तीस दिवस इतक्या मुदतीची साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागेल असेही आणखी दंडाधिकारी त्या आदेशाद्वारे फर्मावू शकेल.

(४) जेव्हा कोणत्याही व्यक्तीला पोटकलम (३) खाली कारावासात ठेवले जाईल तेव्हा, 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) कलमे ६८ व ६९ यांचे उपबंध, शक्य तेथवर, लागू होतील.

(५) या कलमाखाली भरपाई देण्याचा निदेश जिला देण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीला अशा आदेशामुळे, तिने दिलेल्या फिर्यादीबाबतच्या किंवा दिलेल्या वर्दीबाबतच्या कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी दायित्वातून सूट मिळणार नाही :

परंतु, या कलमाखालील आरोपी व्यक्तीला दिलेली कोणतीही रक्कम, त्याच बाबीच्या संबंधातील कोणत्याही नंतरच्या दिवाणी दाव्यात अशा व्यक्तीला भरपाई देववताना हिशेबात घेतली जाईल.

(६) पोट-कलम (२) खाली ज्या फिर्यादाराला किंवा वर्दीदाराला द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याने शंभर रुपयांपेक्षा जास्त भरपाई देण्याचा आदेश दिलेला असेल अशा फिर्यादाराला किंवा वर्दीदाराला अशा न्यायाधीशाने केलेल्या संपरीक्षेत जणू काही सिद्धदोष ठरवलेले असावे त्याप्रमाणे त्याला त्या आदेशावर अपील करता येईल.

(७) जेव्हा आरोपी व्यक्तीला भरपाई देण्याचा आदेश काढलेला असून पोटकलम (६) खाली ते प्रकरण अपिलास पात्र असेल तर, अपील सादर करण्यासाठी देण्यात आलेला कालावधी संपण्यापूर्वी अथवा अपील सादर करण्यात आले तर अपिलाचा निर्णय लागण्यापूर्वी तिला भरपाई देण्यात येणार नाही; आणि असा भरपाईचा आदेश देण्यात आलेला असून, ते प्रकरण याप्रमाणे अपिलास पात्र नसेल तर, आदेशाच्या दिनांकापासून एक महिना संपण्यापूर्वी भरपाई देण्यात येणार नाही.

(८) या कलमाचे उपबंध समन्स-खटल्यांना व त्याचप्रमाणे वॉरंट खटल्यांना लागू आहेत.

## प्रकरण वीस

## दंडाधिकाऱ्यांनी करावयाची समन्स-खटल्यांची संपरीक्षा

२५१. जेव्हा समन्स-खटल्यात दंडाधिकाऱ्यासमोर आरोपी उपस्थित होईल किंवा आणला जाईल तेव्हा, ज्या अपराधाचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला असेल त्याचा तपशील त्याला सांगितला जाईल, आणि आपण अपराधी असल्याची कबुली त्याला द्यावयाची आहे की त्याला काही बचाव द्यावयाचा आहे हे विचारण्यात येईल, पण रीतसर दोषारोपाची मांडणी करण्याची जरूरी असणार नाही. आरोपाचा आशय सांगणे.

२५२. जर आरोपीने आपण अपराधी असल्याची कबुली दिली तर, न्यायाधीश शक्य होईल तितपत आरोपींनी योजलेल्या शब्दांतच ती कबुली नमूद करून ठेवील, आणि स्वविवेकानुसार तीवरून त्याला सिद्धदोष ठरवू शकेल. अपराधीपणाच्या कबुलीवरून दोषसिद्धी.

२५३. (१) कलम २०६ खाली समन्स काढण्यात आले असेल आणि दंडाधिकाऱ्यासमोर उपस्थित न होता, दोषारोपाबाबत आपण अपराधी असल्याची कबुली देण्याची आरोपीची इच्छा असेल त्या बाबतीत, त्याला आपली कबुली अंतर्भूत असलेले पत्र व समन्समध्ये विनिर्दिष्ट केलेला द्रव्यदंडदेखील डाकेने किंवा संदेशवाहकाकरवी दंडाधिकाऱ्याकडे पाठवावा लागेल. आरोपींच्या अनुपस्थितीत क्षुल्लक प्रकरणांत अपराधीपणाच्या कबुलीवरून दोषसिद्धी.

(२) दंडाधिकारी स्वविवेकानुसार आरोपीला त्याच्या अनुपस्थितीत त्याच्या अपराधीपणाच्या कबुलीवरून सिद्धदोष ठरवून, समन्समध्ये विनिर्दिष्ट केलेला द्रव्यदंड भरण्याची शिक्षा देऊ शकेल आणि आरोपीने पाठवलेली रक्कम त्या द्रव्यदंडापोटी वळती करून घेण्यात येईल अथवा आरोपीने यासंबंधात प्राधिकृत केलेला वकील आरोपीच्यावतीने कबुली देईल त्या बाबतीत, दंडाधिकारी शक्य असेल तितपत वकीलाने योजलेल्या शब्दातच ती कबुली नमूद करून ठेवील, आणि स्वविवेकानुसार अशा कबुलीवरून आरोपीला सिद्धदोष ठरवून वर सांगितल्याप्रमाणे त्याला शिक्षा देऊ शकेल.

२५४. (१) जर दंडाधिकाऱ्याने कलम २५२ किंवा कलम २५३ खाली आरोपीस सिद्धदोष ठरवले नाही तर, दंडाधिकारी फिर्यादीपक्षाची बाजू ऐकून घेऊन फिर्यादीपक्षाच्या पुष्ट्यर्थ हजर केला जाईल असा सर्व साक्षी पुरावा घेण्याच्या आणि आरोपींचीही बाजू ऐकून आपल्या बचावासाठी तो हजर करील असा सर्व साक्षीपुरावा घेण्याच्या कामास लागेल. सिद्धदोष ठरवण्यात आले नसेल तेव्हाची कार्यपद्धती.

(२) फिर्यादीपक्षाच्या किंवा आरोपीच्या अर्जावरून, दंडाधिकारी स्वत:ला योग्य वाटल्यास कोणत्याही साक्षीदारावर त्याला समक्ष हजर होण्याचा अथवा कोणताही कागद किंवा अन्य वस्तू हजर करण्याचा निदेश देणारे समन्स काढू शकेल.

(३) अशा अर्जावरून कोणत्याही साक्षीदाराला समन्स काढण्यापूर्वी दंडाधिकारी संपरीक्षेसाठी हजर होण्याकरता साक्षीदाराला येणाऱ्या वाजवी खर्चाची रक्कम न्यायालयात जमा केली जावी असे फर्मावू शकेल.

२५५. (१) कलम २५४ मध्ये निर्दिष्ट केलेला साक्षीपुरावा आणि दंडाधिकारी स्वत: होऊन हजर करावयास लावील असा आणखी कोणताही साक्षीपुरावा असल्यास तो घेतल्यावर जर दंडाधिकाऱ्यास आरोपी अपराधी नाही असे आढळून आले तर, तो दोषमुक्तीचा आदेश नमूद करील. दोषमुक्ती किंवा दोषसिद्धी.

(२) जेव्हा दंडाधिकारी कलम ३२५ किंवा कलम ३६० च्या उपबंधांनुसार कार्यवाही करणार नाही तेव्हा, आरोपी अपराधी असल्याचे त्यास आढळून आले तर, तो त्याला कायद्यानुसार शिक्षा ठोठावील.

(३) कलम २५२ किंवा कलम २५५ खाली दंडाधिकारी या प्रकरणाखाली संपरीक्षायोग्य असलेला जो कोणताही अपराध आरोपीने केला आहे असे कबूल करण्यात आलेल्या किंवा शाबीत झालेल्या तथ्यांवरून दिसत असेल त्या अपराधाबद्दल आरोपीला त्यावरून सिद्धदोष ठरवणे त्याला बाधक होणार नाही अशी दंडाधिकाऱ्याची खात्री झाली तर मग फिर्यादीचे किंवा समन्सचे स्वरूप काहीही असले तरी तो आरोपीला सिद्धदोष ठरवू शकेल.

२५६. (१) जर दिलेल्या फिर्यादीवरून समन्स काढण्यात आले असेल आणि, आरोपीच्या उपस्थितीसाठी नियत केलेल्या दिवशी किंवा त्यानंतरच्या ज्या कोणत्याही दिवसापर्यंत सुनावणी तहकूब केली जाईल त्या दिवशी फिर्याददार उपस्थित राहिला नाही तर, यात यापूर्वी काहीही अंतर्भूत असले तरी, दंडाधिकारी आरोपीस दोषमुक्त करील—मात्र, त्या प्रकरणाची सुनावणी अन्य एखाद्या दिवसापर्यंत तहकूब करणे त्याला काही कारणास्तव उचित वाटले तर गोष्ट वेगळी: फिर्याददाराची अनुपस्थिती किंवा मृत्यू.

परंतु, जेव्हा एखादा वकील किंवा खटला चालवणारा अधिकारी फिर्याददाराचे प्रतिनिधित्व करत असेल अथवा जेव्हा फिर्याददाराने जातीनिशी उपस्थित राहण्याची जरूरी नाही असे दंडाधिकाऱ्याचे मत असेल तेव्हा, दंडाधिकारी त्याची उपस्थिती माफ करून खटला पुढे चालवू शकेल.

(२) पोटकलम (१) चे उपबंध हे, फिर्याददाराच्या मृत्यूमुळे त्याची अनुपस्थिती घडली असेल अशा प्रकरणांना देखील, शक्य होईल तेथवर, लागू होतील.

**फिर्यादी काढून घेणे.** २५७. या प्रकरणाखालील कोणत्याही खटल्यामध्ये अंतिम आदेश दिला जाण्यापूर्वी कोणत्याही वेळी, जर फिर्यादाराने आरोपीविरुद्ध किंवा एकापेक्षा अधिक आरोपी असतील तर त्या सर्वांविरुद्ध किंवा त्यांच्यापकी कोणाहीविरुद्ध असलेली आपली फिर्याद मागे घेण्याची परवानगी आपणांस मिळण्यासाठी पुरेशी कारणे आहेत अशी दंडाधिकाऱ्याची खात्री पटवली तर, दंडाधिकारी त्याला ती फिर्याद काढून घेण्याची परवानगी देऊ शकेल, आणि ज्या आरोपीबाबतची फिर्याद याप्रमाणे मागे घेण्यात आली असेल त्याला तद्नंतर तो दोषमुक्त करील.

**विवक्षित प्रकरणी कार्यवाही थांबवण्याची शक्ती.** २५८. फिर्याद देण्यात आल्यावरून नव्हे तर अन्य प्रकारे गुदरलेल्या कोणत्याही समन्स-खटल्यांत प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याला किंवा मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीने अन्य कोणत्याही न्याय दंडाधिकाऱ्याला कार्यवाही कोणत्याही टप्प्यात असताना, कारणे नमूद करून कोणताही न्यायनिर्णय अधिघोषित न करता ती कार्यवाही थांबवता येईल व प्रमुख साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आल्यानंतर याप्रमाणे कार्यवाही थांबवण्यात आली असेल त्या बाबतीत, त्याला दोषमुक्तीचा न्यायनिर्णय अधिघोषित करता येईल व अन्य कोणत्याही बाबतीत आरोपीची मुक्तता करता येईल व अशी मुक्तता विनादोषारोप सुटकेसारखीच परिणामक असेल.

**समन्स-खटल्यांचे वॉरंट-खटल्यांत रूपांतर करणे.** २५९. सहा महिन्यांहून अधिक मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधासंबंधीच्या समन्स-खटल्याच्या संपरीक्षेच्या ओघात जेव्हा न्यायहितार्थ अपराधाची संपरीक्षा वॉरंट-खटल्याच्या संपरीक्षेच्या प्रक्रियेनुसार केली पाहिजे असे दंडाधिकाऱ्याला दिसून येईल तेव्हा, असा दंडाधिकारी या संहितेत वॉरंट-खटल्यांच्या संपरीक्षेसाठी उपबंधित केलेल्या रीतीने त्या खटल्याची फेरसुनावणी करण्यास सुरुवात करू शकेल व पूर्वी साक्ष तपासणी केलेल्या अशा कोणत्याही साक्षीदाराला पुन्हा बोलावून घेऊ शकेल

## प्रकरण एकवीस

## संक्षिप्त संपरीक्षा

**संक्षिप्त संपरीक्षा करण्याची शक्ती.** २६०. (१) या संहितेत काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) कोणत्याही मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याला;

(ख) कोणत्याही महानगर दंडाधिकाऱ्याला;

(ग) उच्च न्यायालयाने यासंबंधात खास शक्ती प्रदान केलेल्या कोणत्याही प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याला ;

स्वत:ला योग्य वाटले तर, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही अपराधांची संक्षिप्त संपरीक्षा करता येईल :—

(एक) मृत्यूच्या आजीव कारावासाच्या किंवा दोन वर्षांहून अधिक मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र नसलेले अपराध ;

(दोन) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)- कलम ३७९, कलम ३८० किंवा कलम ३८१ खाली चोरीचा अपराध—चोरीच्या संपत्तीचे मूल्य दोनशे रुपयांहून अधिक नसेल त्याबाबतीत ;

(तीन) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)-कलम ४११ खाली चोरीची संपत्ती लपवून ठेवण्याचा किंवा ठेवून घेण्याचा अपराध—अशा संपत्तीचे मूल्य दोनशे रुपयांहून अधिक नसेल त्याबाबतीत ;

(चार) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)-कलम ४१४ खाली चोरीची संपत्ती लपवून ठेवण्याच्या किंवा तिची विल्हेवाट करण्याच्या कामी सहाय्य करण्याचा अपराध—अशा संपत्तीचे मूल्य दोनशे रुपयांहून अधिक नसेल त्याबाबतीत ;

(पाच) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)-कलमे ४५४ व ४५६ खालील अपराध ;

(सहा) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)-कलम ५०४ खाली शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान करण्याचा अपराध व कलम ५०६ खाली फौजदारीपात्र धाकदपटशाचा अपराध ;

(सात) पूर्वोक्त अपराधांपैकी कोणत्याही अपराधाचे अपप्रेरण ;

(आठ) पूर्वोक्त अपराधांपैकी कोणताही अपराध करण्याचा प्रयत्न हाच अपराध असेल त्याबाबतीत, असा प्रयत्न ;

(नऊ) ज्या कृतीबाबत 'गुरे अतिक्रमण अधिनियम, १८७१' (१८७१ चा १)-कलम २० खाली फिर्याद देता येईल अशा कृतीने घडलेला अपराध.

(२) जेव्हा संक्षिप्त संपरीक्षेच्या ओघात दंडाधिकाऱ्याला, त्या खटल्याची संक्षेपत: संपरीक्षा करणे इष्ट नाही असे त्याचे स्वरूप आहे असे दिसून येईल तेव्हा, दंडाधिकारी पूर्वी तपासणी केलेल्या अशा कोणत्याही साक्षीदारांना पुन्हा बोलावील आणि या संहितेत उपबंधित केलेल्या रीतीने त्या खटल्याची फेरसुनावणी करण्यास सुरुवात करील.

२६१. द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याच्या शक्ती ज्याच्या ठायी विनिहित झाल्या असतील अशा कोणत्याही दंडाधिकाऱ्याला जो कोणताही अपराध केवळ द्रव्यदंडाच्या अथवा द्रव्यदंडासहित किंवा त्याविना जास्तीत जास्त सहा महिने इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल त्याची आणि अशा कोणत्याही अपराधाचे कोणत्याही प्रकारे अपप्रेरण किंवा तो अपराध करण्याचा प्रयत्न या प्रकरणांची संक्षेपत: संपरीक्षा करण्याची शक्ती उच्च न्यायालय प्रदान करू शकेल. द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याने करावयाची संक्षिप्त संपरीक्षा.

२६२. (१) या प्रकरणाखालील संपरीक्षेमध्ये या संहितेत समन्स-खटल्याच्या संपरीक्षेसाठी विनिर्दिष्ट केलेली प्रक्रिया, यात यापुढे उल्लेखिलेली बाब खेरीजकरून एरव्ही अनुसरली जाईल. संक्षिप्त संपरीक्षांची कार्यपद्धती.

(२) या प्रकरणाखालील कोणत्याही दोषसिद्धीच्या बाबतीत, तीन महिन्यांहून अधिक मुदतीच्या शिक्षेचा आदेश काढला जाणार नाही.

२६३. संक्षिप्त संपरीक्षा केल्या जाणाऱ्या प्रत्येक खटल्यात राज्य शासन निदेशित करील अशा नमुन्यानुसार दंडाधिकारी पुढील तपशिलाची नोंद करील; तो असा :— संक्षिप्त संपरीक्षांमधील अभिलेख.

(क) खटल्याचा अनुक्रमांक ;

(ख) अपराध घडल्याचा दिनांक;

(ग) अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक;

(घ) फिर्यादिदार असल्यास त्याचे नाव;

(ङ) आरोपीचे नाव, आई-वा-बापाचे नाव व निवासस्थान;

(च) ज्याबद्दल फिर्याद दिली तो अपराध व शाबीत झालेला (असल्यास) असा अपराध आणि कलम २६० मधील पोटकलम (१) च्या खंड (दोन), खंड (तीन) किंवा खंड (चार) खाली येणाऱ्या प्रकरणी ज्या संपत्तीबाबत अपराध करण्यात आला असेल तिचे मूल्य;

(छ) आरोपीचे प्रतिकथन व (झाली असल्यास) त्याची तपासणी;

(ज) निष्कर्ष;

(झ) शिक्षादेश किंवा अन्य अंतिम आदेश;

(ञ) कार्यवाही समाप्त झाली तो दिनांक.

२६४. संक्षिप्त संपरीक्षा केलेल्या ज्या ज्या खटल्यात आरोपीने आपण अपराधी असल्याची कबुली दिली नसेल अशा प्रत्येक खटल्यात दंडाधिकारी, साक्षीपुराव्याचा सारांश व निष्कर्षामागील कारणांचे त्रोटक निवेदन यांचा अंतर्भाव करून न्यायनिर्णय नमूद करील. संक्षिप्त संपरीक्षा केलेल्या खटल्यांतील न्यायनिर्णय.

२६५. (१) असा प्रत्येक अभिलेख व न्यायनिर्णय न्यायालयाच्या भाषेत लिहिण्यात येईल. अभिलेखाची व न्यायनिर्णयाची भाषा

(२) उच्च न्यायालय अपराधांची संक्षिप्त संपरीक्षा करण्याची शक्ती असलेल्या कोणत्याही दंडाधिकाऱ्याला, उपरोक्त अभिलेख किंवा न्यायनिर्णय किंवा ते दोन्ही मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याने या संबंधात नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकरवी तयार करून घेण्यास प्राधिकृत करू शकेल, व याप्रमाणे तयार केलेल्या अभिलेखावर किंवा न्यायनिर्णयावर अशा दंडाधिकाऱ्याला स्वाक्षरी करावी लागेल.

## प्रकरण बावीस

## कारागृहात बंदिवान किंवा स्थानबद्ध केलेल्या व्यक्तींची समक्ष हजेरी

२६६. या प्रकरणात,— व्याख्या.

(क) "स्थानबद्ध" या संज्ञेत, प्रतिबंधक स्थानबद्धतेचा उपबंध करणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीचा समावेश आहे ;

(ख) "कारागृह" यामध्ये,—

(एक) राज्य शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे दुय्यम तुरुंग म्हणून जाहीर केलेले असे कोणतेही स्थळ;

(दोन) कोणतेही सुधारालय, बोर्स्टल संस्था किंवा तशाच स्वरूपाची अन्य संस्था,

यांचा समावेश आहे.

२६७. (१) जेव्हा केव्हा या संहितेखालील चौकशीच्या, संपरीक्षेच्या किंवा कार्यवाहीच्या ओघात, फौजदारी न्यायालयाला असे दिसून येईल की,— कैद्यांना समक्ष हजर करण्यास फर्मावण्याची शक्ती.

(क) कारागृहात बंदिवान किंवा स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीला अपराधाच्या दोषारोपाला उत्तर देण्यासाठी किंवा तिच्याविरुद्ध होणाऱ्या कोणत्याही कार्यवाहीच्या प्रयोजनासाठी त्या न्यायालयापुढे आणले जावे, किंवा

(ख) न्यायाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अशा व्यक्तीची साक्षीदार म्हणून तपासणी करणे जरुरीचे आहे,

तेव्हा दोषारोपाला उत्तर देण्यासाठी किंवा अशा कार्यवाहीच्या प्रयोजनासाठी किंवा, प्रकरणपरत्वे, साक्ष देण्यासाठी अशा व्यक्तीला न्यायालयापुढे आणावे असे कारागृहाच्या अंमलदार अधिकाऱ्याला फर्माविणारा आदेश न्यायालय काढू शकेल.

(२) पोटकलम (१) खालील आदेश द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याने दिलेला असेल त्याबाबतीत, असा दंडाधिकारी ज्याला दुय्यम आहे त्या मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याने तो प्रतिस्वाक्षरित केलेला असल्याशिवाय तो कारागृहाच्या अंमलदार अधिकाऱ्याकडे पाठवला जाणार नाही किंवा तो त्यावरून कार्यवाही करणार नाही.

(३) पोटकलम (२) खाली प्रतिस्वाक्षरित करण्यासाठी सादर केलेल्या प्रत्येक आदेशासोबत, ज्यामुळे दंडाधिकाऱ्याच्या मते तो आदेश देणे जरुरीचे झाले त्या तथ्यांचे निवेदन असेल आणि ज्याला ते सादर करण्यात येईल तो मुख्य न्याय दंडाधिकारी ते निवेदन विचारात घेतल्यानंतर, आदेशावर प्रतिस्वाक्षरी करण्यास नकार देऊ शकेल.

**राज्य शासनाची विवक्षित व्यक्तींना कलम २६७ च्या प्रवर्तनातून वगळण्याची शक्ती.**

२६८. (१) पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबी लक्षात घेऊन, राज्य शासन, कोणत्याही व्यक्तीला किंवा कोणत्याही वर्गातील व्यक्तींना ज्या कारागृहात बंदिवान किंवा स्थानबद्ध केलेले असेल त्या कारागृहातून तिला वा त्यांना हलवले जाऊ नये असे कोणत्याही वेळी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेशित करू शकेल व तद्नंतर तो आदेश अंमलात असेतोवर कलम २६७ खाली काढलेला कोणताही आदेश मग तो राज्य शासनाच्या आदेशाच्या पूर्वीचा असो वा नंतरचा असो,—अशा व्यक्तीच्या किंवा अशा वर्गातील व्यक्तींच्या बाबतीत परिणामक असणार नाही.

(२) पोटकलम (१) खाली आदेश काढण्यापूर्वी राज्य शासन पुढील बाबी लक्षात घेईल, त्या अशा :—

(क) ज्या अपराधाबद्दल किंवा ज्या कारणांवरून त्या व्यक्तीला किंवा त्या वर्गातील व्यक्तींना कारागृहात बंदिवान किंवा स्थानबद्ध करण्याचा आदेश देण्यात आला असेल त्या अपराधाचे स्वरूप किंवा ती कारणे;

(ख) त्या व्यक्तीला किंवा त्या वर्गातील व्यक्तींना कारागृहातून हलवण्याची परवानगी दिली तर सार्वजनिक सुव्यवस्थेत बिघाड होण्याची संभाव्यता;

(ग) सर्वसाधारणपणे लोकहित.

**कारागृहाच्या अंमलदार अधिकाऱ्याने विवक्षित संभाव्य प्रसंगी आदेशाचे पालन करण्यापासून परावृत्त राहणे.**

२६९. कलम २६७ खाली जिच्याबाबत आदेश काढलेला असेल ती व्यक्ती जर—

(क) आजारामुळे किंवा विकलतेमुळे कारागृहातून हलवता येण्यासारखी नसेल तर; किंवा

(ख) संपरीक्षा होण्यासाठी हवालातीत ठेवलेली असेल अथवा संपरीक्षा होईपावेतो किंवा प्रारंभिक अन्वेषण होईपावेतो हवालातीत परत पाठवलेली असेल तर; किंवा

(ग) तिच्या हवालातीची मुदत आदेशाचे अनुपालन होण्यासाठी आणि ज्या कारागृहात तिला बंदीवान किंवा स्थानबद्ध केलेले असेल तेथे तिला परत नेण्यासाठी लागणारा अवधी पुरा होण्यापूर्वी संपत असेल तर; किंवा

(घ) कलम २६८ खाली राज्य शासनाने काढलेला आदेश जिला लागू होतो अशी ती व्यक्ती असेल तर,

कारागृहाचा अंमलदार अधिकारी न्यायालयाचा आदेश अंमलात आणण्यापासून परावृत्त राहील आणि याप्रमाणे परावृत्त राहण्यामागील कारणांचे निवेदन न्यायालयाकडे पाठवील :

परंतु, कारागृहापासून पंचवीस किलोमीटरहून अधिक दूर नसलेल्या एखाद्या स्थळी साक्ष देण्यासाठी अशा व्यक्तीची समक्ष हजेरी आवश्यक असेल तेथे, कारागृहाचा अंमलदार अधिकारी खंड (ख) मध्ये उल्लेखिलेल्या कारणास्तव तसा परावृत्त राहणार नाही.

**कैद्याला न्यायालयापुढे बंदोबस्तात आणणे.**

२७०. कलम २६९ च्या उपबंधांच्या अधीनतेने, कारागृहाचा अंमलदार अधिकारी कलम २६७ च्या पोटकलम (१) खाली दिलेला व त्या कलमाच्या पोटकलम (२) खाली जरूर तेथे प्रतिस्वाक्षरित केलेला आदेश हाती पडताच, आदेशात नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीला ज्या न्यायालयात तिची समक्ष हजेरी आवश्यक असेल तेथे आदेशात नमूद केलेल्या वेळी उपस्थित राहता येईल अशा बेताने तिला नेण्याची व्यवस्था करील, आणि तिची साक्ष तपासणी होईपर्यंत किंवा ज्या कारागृहात तिला बंदीवान किंवा स्थानबद्ध केले होते तेथे तिला परत नेण्यासाठी न्यायालयाकडून प्राधिकार मिळेपर्यंत न्यायालयात किंवा त्याच्या जवळपास तिला बंदोबस्तात ठेवण्याची व्यवस्था करील.

**कारागृहातील साक्षीदाराच्या तपासणीसाठी आयोगपत्र काढण्याची शक्ती.**

२७१. या प्रकरणाचे उपबंध, कारागृहात बंदिवान किंवा स्थानबद्ध केलेल्या कोणत्याही व्यक्तीची साक्षीदार म्हणून तपासणी करण्यासाठी कलम २८४ खाली आयोगपत्र काढण्याच्या न्यायालयाच्या शक्तीला बाधक असणार नाहीत; आणि तेविसाव्या प्रकरणाच्या भाग ख चे उपबंध आयोगपत्रावरून अन्य कोणत्याही व्यक्तीच्या होणाऱ्या तपासणीच्या संबंधात जसे लागू आहेत तसे ते कारागृहातील अशा कोणत्याही व्यक्तीची आयोगपत्रावरून तपासणी करण्याच्या संबंधात लागू असतील.

## प्रकरण तेवीस

## चौकशी व संपरीक्षा यांतील साक्षीपुरावा

### क—साक्षीपुरावा घेण्याची व नोंदण्याची पद्धत

२७२. राज्यातील उच्च न्यायालयाहून अन्य प्रत्येक न्यायालयाची भाषा या संहितेच्या प्रयोजनार्थ कोणती असावी ते राज्य शासनाला ठरवता येईल. न्यायालयांची भाषा.

२७३. अन्यथा स्पष्टपणे उपबंधित केले असेल ते खेरीजकरून एरव्ही, संपरीक्षेच्या किंवा अन्य कार्यवाहीच्या ओघात घेतला जाणारा सर्व साक्षीपुरावा आरोपीच्या समक्ष, किंवा त्याची जातिनिशी उपस्थिती माफ केलेली असेल तेव्हा त्याच्या वकिलाच्या समक्ष घेण्यात येईल. साक्षीपुरावा आरोपीच्या समक्ष घेणे.

**स्पष्टीकरण.**—या कलमात "आरोपी" या संज्ञेमध्ये, या संहितेखाली ज्या व्यक्तीच्या संबंधात आठव्या प्रकरणाखाली कोणतीही कार्यवाही सुरू करण्यात आली असेल त्या व्यक्तीचा समावेश आहे.

२७४. (१) दंडाधिकाऱ्यासमोर संपरीक्षा केल्या जाणाऱ्या व सर्व समन्स-खटल्यामध्ये, कलमे-१४५ ते १४८ (दोन्ही धरून) यांखालील सर्व चौकशींमध्ये व संपरीक्षेच्या ओघात होणाऱ्या कार्यवाही-व्यतिरिक्त कलम ४४६ खालील अन्य सर्व कार्यवाहींमध्ये प्रत्येक साक्षीदाराची तपासणी जसजशी होत जाईल तसतसे दंडाधिकारी न्यायालयाच्या भाषेत त्यांच्या साक्षीच्या सारांशाचे टिप्पण करीत जाईल : समन्स खटल्यांतील चौकशीमधील अभिलेख.

परंतु, जर दंडाधिकारी स्वतः असे टिप्पण करण्यास असमर्थ असेल तर, तो आपल्या असमर्थतेचे कारण नमूद केल्यानंतर, असे टिप्पण खुल्या न्यायालयात आपण तोंडी सांगितलेल्या मजकुराबरहुकूम लेखी करवून घेईल.

(२) अशा टिप्पणावर दंडाधिकारी स्वाक्षरी करील व ते टिप्पण अभिलेखाचा भाग होईल.

२७५. (१) दंडाधिकाऱ्यापुढे संपरीक्षा केल्या जाणाऱ्या सर्व वॉरंट-खटल्यांमध्ये प्रत्येक साक्षीदाराची जसजशी तपासणी होत जाईल तसतशी त्याची साक्ष दंडाधिकारी स्वतः अथवा खुल्या न्यायालयात तोंडी मजकूर सांगून अथवा शारीरिक किंवा अन्य प्रकारच्या अक्षमतेमुळे तो तसे करण्यास असमर्थ असेल तर, त्याच्या निदेशानुसार व देखरेखीखाली त्याने या संबंधात नियुक्त केलेला अधिकारी लेखी उतरवून घेत जाईल. वॉरंट-खटल्यांतील अभिलेख.

(२) जेव्हा दंडाधिकारी साक्ष उतरुन घेण्याची तजवीज करील तेव्हा, तो पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कारणास्तव आपण स्वतः साक्ष उतरवून घेऊ शकलो नाही असे प्रमाणपत्र नमूद करील

(३) अशी साक्ष सर्वसामान्यपणे हकीकतीच्या रूपात उतरवून घेतली जाईल; पण दंडाधिकाऱ्याला स्वविवेकानुसार अशा साक्षीचा कोणताही भाग प्रश्नोत्तराच्या रूपात उतरवून घेता येईल किंवा घेण्याची तजवीज करता येईल.

(४) याप्रमाणे उतरून घेतलेल्या साक्षीवर दंडाधिकारी स्वाक्षरी करील व ती अभिलेखाचा भाग होईल.

२७६. (१) सत्र न्यायालयापुढील सर्व संपरीक्षांमध्ये प्रत्येक साक्षीदाराची जसजशी तपासणी केली जाईल तसतशी त्याची साक्ष पीठासीन न्यायाधीश स्वतः अथवा खुल्या न्यायालयात तोंडी मजकुर सांगून, अथवा त्याच्या निदेशानुसार व देखरेखीखाली, त्याने या संबंधात नियुक्त केलेला न्यायालयाचा अधिकारी लेखी उतरवून घेत जाईल. सत्र न्यायालयापुढील संपरीक्षेतील अभिलेख.

[1][ (२) अशी साक्ष सर्वसामान्यपणे हकीकतींच्या रूपाने उतरुन घेण्यात येईल; पण पीठासीन न्यायाधीशाला स्वविवेकानुसार अशी संपूर्ण साक्ष किंवा तिचा कोणताही भाग प्रश्नोत्तराच्या रूपात उतरवून घेता येईल किंवा घेण्याची तजवीज करता येईल.]

(३) याप्रमाणे उतरवून घेतलेल्या साक्षीवर पीठासीन न्यायाधीश स्वाक्षरी करील व ती अभिलेखाचा भाग होईल.

२७७. कलम २७५ किंवा कलम २७६ खाली जेथे साक्ष उतरवून घेतलेली असेल त्या प्रत्येक खटल्यात,— साक्षीच्या अभिलेखाची भाषा.

(क) जर साक्षीदाराने न्यायालयाच्या भाषेत साक्ष दिली तर, ती त्या भाषेत उतरून घेतली जाईल;

(ख) जर त्याने अन्य कोणत्याही भाषेत साक्ष दिली तर, जमल्यास ती त्या भाषेत उतरून घेतली जाईल व जर तसे करणे जमण्यासारखे नसेल तर, जसजशी साक्षीदाराची तपासणी होईल तसतसे न्यायालयाच्या भाषेत साक्षीचा यथार्थ अनुवाद तयार केला जाईल, दंडाधिकारी किंवा पीठासीन न्यायाधीश त्यावर स्वाक्षरी करील, व तो अभिलेखाचा भाग होईल ;

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम २० द्वारे मूळ पोटकलम (२) ऐवजी घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

(ग) जेथे खंड (ख) खाली न्यायालयाच्या भाषेहून अन्य भाषेत साक्ष उतरून घेतले असेल तेथे जमेल तितक्या लवकर न्यायालयाच्या भाषेत तिचा यथार्थ अनुवाद तयार केला जाईल दंडाधिकारी किंवा पीठासीन न्यायाधीश त्यावर स्वाक्षरी करील आणि तो अभिलेखाचा भाग होईल :

परंतु, जेव्हा खंड (ख) खाली साक्ष इंग्रजीमध्ये उतरवून घेतली असेल व पक्षकारांपैकी कोणीही न्यायालयाच्या भाषेत तिचा अनुवाद केला जाण्याची मागणी केली नसेल तेव्हा, न्यायालयाला अशा अनुवादाशिवाय चालवून घेता येईल.

**अशी साक्ष पुरी होईल तेव्हा त्याबाबत करावयाची कार्यपद्धती.**

२७८. (१) कलम २७५ किंवा कलम २७६ खाली घेतलेली प्रत्येक साक्षीदाराची साक्ष पूर्ण होईल तेव्हा, आरोपी समक्ष हजर असेल तर, त्याच्या किंवा तो वकिलामार्फत उपस्थित असेल तर वकिलाच्या समक्ष साक्षीदाराला ती वाचून दाखवण्यात येईल व जरूर तर तीत दुरुस्ती केली जाईल.

(२) साक्षीदाराला साक्ष वाचून दाखवण्यात येईल तेव्हा, त्याने तिचा एखादा भाग बरोबर असल्याचे नाकारले तर, दंडाधिकारी किंवा पीठासीन न्यायाधीश साक्षीत दुरुस्ती करण्याऐवजी, त्या साक्षीवर साक्षीदाराने घेतलेल्या आक्षेपाचे टिप्पण करू शकेल व आपणांस जरुरीचे वाटतील असे शेरे जोडील.

(३) जर साक्ष ज्या भाषेत देण्यात आली तीहून निराळ्या भाषेत तिचा अभिलेख करण्यात आला असेल व साक्षीदाराला ती भाषा समजत नसेल तर, ज्या भाषेत साक्ष दिली होती त्या भाषेत किंवा जी भाषा त्याला समजते त्या भाषेत तो अभिलेख त्याला भाषांतर करून सांगितला जाईल.

**आरोपीला किंवा त्याच्या वकिलाला साक्षीचे भाषांतर करून सांगणे.**

२७९. (१) जेव्हाकेव्हा आरोपीला न समजणाऱ्या भाषेत कोणतीही साक्ष देण्यात आलेली असेल व तो न्यायालयात जातीने उपस्थित असेल तेव्हा, त्याला समजणाऱ्या भाषेत ती साक्ष त्याला खुल्या न्यायालयात भाषांतर करून सांगण्यात येईल.

(२) जर तो वकिलामार्फत उपस्थित राहिला आणि न्यायालयाच्या भाषेहून अन्य भाषेत व वकिलाला न समजणाऱ्या भाषेत साक्ष दिली गेली तर, ती साक्ष अशा वकिलाला न्यायालयाच्या भाषेत भाषांतर करून सांगितली जाईल.

(३) जेव्हा रीतसर शाबितीच्या प्रयोजनार्थ कागदपत्र ठेवले जातील तेव्हा, त्यांपैकी आवश्यक वाटेल तेवढ्याच भागात भाषांतर करणे हे न्यायालयाच्या विवेकाधीन असेल.

**साक्षीदाराच्या चालचर्येबाबत शेरे.**

२८०. जेव्हा पीठासीन न्यायाधीशाने किंवा दंडाधिकाऱ्याने साक्षीदाराची साक्ष नोंदली असेल तेव्हा, तपासणी चालू असताना अशा साक्षीदाराची जी चालचर्या दिसून आली त्याबाबत दंडाधिकाऱ्याला काही महत्वाचे वाटल्यास तसे शेरेही तो नमूद करील.

**आरोपीच्या तपासणीचा अभिलेख.**

२८१. (१) जेव्हाकेव्हा आरोपीची तपासणी महानगर दंडाधिकाऱ्याकडून केली जाईल तेव्हा, दंडाधिकारी न्यायालयाच्या भाषेत आरोपीच्या तपासणीच्या सारांशाचे टिप्पण करील व अशा टिप्पणावर दंडाधिकारी स्वाक्षरी करील व ते टिप्पण अभिलेखाचा भाग होईल.

(२) जेव्हाकेव्हा आरोपीची तपासणी महानगर दंडाधिकाऱ्याहून अन्य कोणताही दंडाधिकारी किंवा सत्र न्यायालय यांच्याकडून केली जाईल तेव्हा, आरोपीला विचारलेला प्रत्यक प्रश्न व त्याने दिलेले प्रत्येक उत्तर धरून अशी संपूर्ण तपासणी पीठासीन न्यायाधीश किंवा दंडाधिकारी स्वत: अथवा शारीरिक किंवा अन्य प्रकारच्या अक्षमतेमुळे तो तसे करण्यास असमर्थ असेल तर, त्यांच्या निदेशानुसार व देखरेखीखाली त्याने या संबंधात नियुक्त केलेला अधिकारी पूर्णतया नोंदवून घेईल.

(३) जमल्यास तो अभिलेख आरोपीची तपासणी ज्या भाषेत झाली असेल त्या भाषेत किंवा ते जमण्यासारखे नसेल तर, न्यायालयाच्या भाषेत केला जाईल.

(४) अभिलेख आरोपीला दाखविला जाईल किंवा वाचून दाखविला जाईल, अथवा, तो ज्या भाषेत लिहिलेला आहे ती भाषा त्याला समजत नसेल तर, त्याला समजणाऱ्या भाषेत भाषांतर करून तो त्याला सांगितला जाईल आणि आपली उत्तरे स्पष्ट करण्याची किंवा त्यात भर घालण्याची त्याला मोकळीक असेल.

(५) त्यानंतर आरोपी त्यावर स्वाक्षरी करील आणि दंडाधिकारी किंवा पीठासीन न्यायाधीशही त्यावर स्वाक्षरी करील आणि आपल्या समक्ष व आपल्याला ऐकू येईल अशा रीतीने तपासणी घेतलेली होती व आरोपीने दिलेल्या जबाबाचा संपूर्ण व खरा वृत्तांत अभिलेखात अंतर्भूत आहे असे स्वाक्षरीनिशी प्रमाणित करील.

(६) संक्षिप्त संपरीक्षेच्या ओघात होणाऱ्या आरोपी व्यक्तीच्या तपासणीस या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होत नाही.

**दुभाषी खरेखुरे भाषांतर करण्यास बांधलेला असणे.**

२८२. कोणत्याही साक्षीचे किंवा जबाबाचे भाषांतर करण्यासाठी जेव्हा केव्हा कोणत्याही फौजदारी न्यायालयाला दुभाष्याची मदत लागेल तेव्हा, तो दुभाषी अशा साक्षीचे किंवा जबाबाचे खरेखुरे भाषांतर करण्यास बांधलेला असेल.

उच्च न्यायालयातील अभिलेख.

२८३. प्रत्येक उच्च न्यायालय, आपणांपुढे येणाऱ्या खटल्यातील साक्षीदारांच्या साक्षीचा व आरोपीच्या तपासणीचा तपशील अशा रीतीने उतरून घेण्यात यावा ते सर्वसाधारण नियमाद्वारे विहित करू शकेल, व अशी साक्ष व तपासणीचा तपशील अशा नियमानुसार उतरवून घेतला जाईल.

## ख—साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे

केव्हा साक्षीदाराची समक्ष हजेरी माफ करून आयोगपत्र काढता येईल.

२८४. (१) या संहितेखाली कोणत्याही चौकशीच्या, संपरीक्षेच्या किंवा अन्य कार्यवाहीच्या ओघात जेव्हाकेव्हा, न्यायाची उद्दिष्टे साधण्यासाठी साक्षीदाराची तपासणी करण्याची जरूरी आहे व त्याला समक्ष हजर राहण्यास भाग पाडावयाचे झाले तर त्या खटल्याच्या परिस्थितीनुसार गैरवाजवी ठरेल इतका विलंब, खर्च किंवा गैरसोय झाल्याशिवाय राहणार नाही असे न्यायालयाला किंवा दंडाधिकाऱ्याला दिसून आले तर, ते न्यायालय किंवा तो दंडाधिकारी अशी साक्षीदाराची हजेरी माफ करू शकेल व या प्रकरणाच्या उपबंधानुसार साक्षीदाराच्या तपासणीसाठी आयोगपत्र काढू शकेल :

परंतु, जेव्हा न्यायाची उद्दिष्टे साधण्यासाठी भारताच्या राष्ट्रपतीची किंवा उप-राष्ट्रपतीची किंवा राज्याच्या राज्यपालाची किंवा संघ राज्यक्षेत्राच्या प्रशासकाची साक्षीदार म्हणून तपासणी करणे जरुरीचे असेल तेव्हा, अशा साक्षीदाराच्या तपासणीसाठी आयोगपत्र काढले जाईल.

(२) फिर्यादीपक्षाच्या साक्षीदाराच्या तपासणीसाठी आयोगपत्र काढताना न्यायालय, वकिलाची फी धरुन आरोपीचा खर्च भागविण्यासाठी न्यायालयाला वाजवी वाटेल अशी रक्कम फिर्यादीपक्षाने द्यावी असा निर्देश देऊ शकेल.

आयोगपत्र कोणाला निदेशून काढावयाचे.

२८५. (१) जेथे या संहितेचा विस्तार आहे त्या राज्यक्षेत्रात साक्षीदार असेल तर, ज्याच्या स्थानिक अधिकारितेत साक्षीदार सापडू शकेल त्या मुख्य महानगर दंडाधिकाऱ्याला किंवा, प्रकरणपरत्वे, मुख्य न्याय दंडाधिकाऱ्यास निदेशून आयोगपत्र काढले जाईल.

(२) साक्षीदार भारतात असला तरी, जर तो जेथे या संहितेचा विस्तार नाही अशा राज्यात किंवा क्षेत्रात असेल तर, आयोगपत्र हे केंद्र शासन अधिसूचनेद्वारे यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशा न्यायालयास किंवा अधिकाऱ्यास निदेशून काढले जाईल.

(३) जर साक्षीदार भारताबाहेरील एखाद्या देशात किंवा एखाद्या स्थळी असेल व केंद्र शासनाने अशा देशाच्या किंवा स्थळाच्या शासनाबरोबर फौजदारी बाबींसंबंधी साक्षीदारांची साक्ष घेण्याबाबत ठराव केला असेल तर, आयोगपत्र हे केंद्र शासन यासंबंधात अधिसूचनेद्वारे विहित करील त्याप्रमाणे तशा नमुन्यानुसार, तशा न्यायालयास किंवा अधिकाऱ्यास निदेशून काढले जाईल, आणि पुढे रवाना करण्यासाठी विहित अशा प्राधिकाऱ्याकडे पाठवण्यात येईल.

आयोगपत्रांची अंमलबजावणी.

२८६. आयोगपत्र मिळाल्यावर मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा मुख्य न्याय दंडाधिकारी किंवा तो यासंबंधात नियुक्त करील असा महानगर किंवा न्याय दंडाधिकारी साक्षीदाराला समन्स काढून आपणांसमोर बोलावील किंवा साक्षीदार जेथे असेल त्या स्थळी जाईल व या संहितेखालील वॉरंट-खटल्यांच्या संपरीक्षेच्याच पद्धतीप्रमाणे त्याची साक्ष घेईल व यासाठी तसेच अधिकार वापरील.

पक्षकारांना साक्षीदाराची तपासणी करता येणे.

२८७. (१) या संहितेखालील ज्या कोणत्याही कार्यवाहीत आयोगपत्र काढलेले असेल त्या कार्यवाहीतील पक्षकार आयोगपत्र निदेशित करणाऱ्या न्यायालयाला किंवा दंडाधिकाऱ्याला वादप्रश्नाशी संबद्ध वाटतील असे आपापले परिप्रश्न लेखी स्वरूपात पाठवू शकेल आणि दंडाधिकाऱ्याने किंवा न्यायालयाने किंवा आयोगपत्र ज्याला निदेशून काढले किंवा ज्याच्याकडे त्याची अंमलबजावणी करण्याचे काम सोपवले आहे त्या दंडाधिकाऱ्याने अशा परिप्रश्नावरून साक्षीदाराची साक्षतपासणी करणे कायदेशीर असेल.

(२) अशा कोणत्याही पक्षकाराला वकिलामार्फत किंवा पक्षकार हवालातीत नसेल तर जातीने अशा दंडाधिकाऱ्यासमोर न्यायालयासमोर, किंवा अधिकाऱ्यासमोर उपस्थित राहता येईल व उक्त साक्षीदाराची (प्रकरणपरत्वे) साक्षतपासणी, उलटतपासणी व फेरतपासणी करता येईल.

आयोगपत्र प्रतिवेदनासह परत पाठवणे.

२८८. (१) कलम २८४ खाली काढलेल्या कोणत्याही आयोगपत्राची रीतसर अंमलबजावणी करण्यात आल्यावर आयोगपत्र काढणाऱ्या न्यायालयाकडे किंवा दंडाधिकाऱ्याकडे त्याखाली तपासणी केलेल्या साक्षीदाराच्या जबानीसह ते परत पाठवले जाईल आणि आयोगपत्र, त्याचे प्रतिवेदन व जबानी पक्षकारांना निरीक्षणासाठी सर्व वाजवी वेळी खुली राहील व सर्व रास्त अपवाद सोडून कोणत्याही पक्षकाराला ते त्या खटल्यामध्ये पुराव्यादाखल वाचता येतील व ते अभिलेखाचा भाग होतील.

(२) याप्रमाणे घेतलेली कोणतीही जबानी जर 'भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२' (१८७२ चा १)-कलम ३३ द्वारे विहित केलेल्या शर्तींची पूर्तता करत असेल तर तो खटला दुसऱ्या न्यायालयाकडे असतानाही नंतरच्या कोणत्याही टप्प्यातदेखील पुराव्यात स्वीकारली जाईल.

कार्यवाही तहकूबी.

२८९. कलम २८४ खाली आयोगपत्र काढलेल्या प्रत्येक खटल्यात चौकशी, संपरीक्षा किंवा अन्य कार्यवाही आयोगपत्राच्या अंमलबजावणीसाठी व ते प्रतिवेदनासह परत येण्यासाठी वाजवी मर्यादेपर्यंत पुरेसा होईल अशा विनिर्दिष्ट काळापुरती तहकूब करता येईल.

विदेशी आयोगपत्रांची अंमलबजावणी. २९०. (१) कलम २८६ चे उपबंध हे आणि कलम २८७ व कलम २८८ मधील जेवढा काही भाग आयोगपत्राची अंमलबजावणी व ते प्रतिवेदनासह परत करणे यांच्याशी संबंधित असेल तेवढा भाग हे कलम २८४ खाली काढलेल्या आयोगपत्रांना जसे लागू होतात तसे ते यात यापुढे उल्लेखिलेल्या न्यायालयांपैकी, न्यायाधीशांपैकी किंवा दंडाधिकाऱ्यांपैकी कोणीही काढलेल्या आयोगपत्रांबाबत लागू होतील.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली न्यायालये, न्यायाधीश व दंडाधिकारी पुढीलप्रमाणे आहेत :—

(क) भारतातील ज्या क्षेत्रावर या संहितेचा विस्तार नाही अशा एखाद्या क्षेत्रात अधिकारिता वापरणारे जे कोणतेही न्यायालय, न्यायाधीश किंवा दंडाधिकारी केंद्र शासन अधिसूचनेद्वारे या संबंधात विनिर्दिष्ट करील असे न्यायालय, न्यायाधीश किंवा दंडाधिकारी ;

(ख) भारताबाहेरील जो कोणताही देश किंवा स्थळ केंद्र शासन अधिसूचनेद्वारे यासंबंधात विनिर्दिष्ट करील तेथे अधिकारिता वापरणारे आणि फौजदारी बाबीसंबंधात साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्र काढण्याचा त्या देशात किंवा त्यास्थळी अंमलात असलेल्या कायद्याअन्वये प्राधिकार असलेले असे कोणतेही न्यायालय, न्यायाधीश किंवा दंडाधिकारी.

वैद्यकीय साक्षीदाराची जबानी. २९१. (१) जिल्हा शल्यचिकित्सकाची किंवा अन्य वैद्यकीय साक्षीदाराची दंडाधिकाऱ्याने आरोपीच्या समक्ष घेतलेली व साक्षांकित केलेली किंवा या प्रकरणाखालील आयोगपत्रावरून घेतलेली जबानी ही, जबानीदाराला जरी साक्षीदार म्हणून बोलाविलेले नसले तरी, या संहितेखालील कोणत्याही चौकशीत, संपरीक्षेत, किंवा अन्य कार्यवाहीत पुरावा म्हणून देता येईल.

(२) न्यायालयाला योग्य वाटले तर अशा कोणत्याही जबानीदाराला समन्स पाठवून त्याच्या जबानीच्या विषयवस्तूबाबत न्यायालय त्याची तपासणी करू शकेल आणि फिर्यादीपक्षाचा किंवा आरोपीचा अर्ज आल्यास त्याला तसे करावे लागेल.

टाकसाळीच्या अधिकाऱ्यांचा साक्षीपुरावा. २९२. (१) जो दस्तऐवज केंद्र शासन अधिसूचनेद्वारे यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशा, टाकसाळीच्या किंवा इंडिया सिक्युरिटी प्रेसच्या (नियंत्रक, मुद्रांक व लेखनसामग्री यांचे कार्यालय धरून) कोणत्याही राजपत्रित अधिकाऱ्याकडे या संहितेखालील कोणत्याही कार्यवाहीच्या ओघात तपासणीसाठी व अहवालासाठी रीतसर सादर केलेल्या कोणत्याही बाबीसंबंधीचा किंवा वस्तूसंबंधीचा त्याच्या सहीचा अहवाल असल्याचे दिसत असेल असा कोणताही दस्तऐवज, त्या अधिकाऱ्याला साक्षीदार म्हणून बोलाविलेले नसले तरीही, या संहितेखालील कोणत्याही चौकशीत, संपरीक्षेत किंवा अन्य कार्यवाहीत पुरावा म्हणन वापरता येईल.

(२) न्यायालयाला योग्य वाटल्यास, ते अशा कोणत्याही अधिकाऱ्याला समन्स पाठवून त्याच्या अहवालाच्या विषयवस्तूसंबंधात त्याची तपासणी करू शकेल :

परंतु, अशा कोणत्याही अधिकाऱ्याला, अहवाल ज्यावर आधारित असेल असे कोणतेही अभिलेख हजर करण्याबद्दल समन्स पाठवले जाणार नाही.

(३) 'भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२' (१८७२ चा १) कलमे १२३ व १२४ च्या उपबंधास बाध न येता, टाकसाळ मास्टरच्या किंवा इंडिया सिक्युरीटी प्रेसच्या किंवा, प्रकरणपरत्वे, नियंत्रक, मुद्रांक व लेखनसामग्री यांच्या परवानगीखेरीज, अशा कोणत्याही अधिकाऱ्याला,—

(क) अहवाल ज्यावर आधारित असेल अशा अप्रकाशित अधिकृत अभिलेखांवरून मिळवलेला कोणताही पुरावा देण्याची, किंवा

(ख) त्या बाबीच्या किंवा वस्तूच्या तपासणीच्या ओघात त्याने लावलेल्या कोणत्याही कसोटीचे स्वरुप किंवा तपशील उघड करण्याची,

मुभा दिली जाणार नाही.

विवक्षित शासकीय वैज्ञानिक तज्ञांचे अहवाल. २९३. (१) जो दस्तऐवज हे कलम ज्याला लागू होते त्या शासकीय वैज्ञानिक तज्ञाकडे या संहितेखालील कोणत्याही कार्यवाहीच्या ओघात तपासणी किंवा विश्लेषण यासाठी व अहवालासाठी रीतसर सादर केलेल्या कोणत्याही बाबीसंबंधीचा किंवा वस्तूसंबंधीचा त्याच्या सहीचा अहवाल असल्याचे दिसत असेल असा कोणताही दस्तऐवज या संहितेखालील कोणत्याही चौकशीत, संपरीक्षेत किंवा अन्य कार्यवाहीत पुरावा म्हणून वापरता येईल.

(२) न्यायालयाला योग्य वाटल्यास ते अशा कोणत्याही तज्ञाला समन्स पाठवून त्यांच्या अहवालाच्या विषयवस्तूसंबंधात त्याची तपासणी करू शकेल.

(३) जेव्हा न्यायालयाने अशा कोणत्याही तज्ञाला सन्मस पाठवले असेल व तो जातीने हजर राहण्यास असमर्थ असेल तेव्हा, न्यायालयाने त्याला जातीने हजर राहण्याबद्दल स्पष्टपणे निदेश दिलेला नसल्यास, तो आपल्याबरोबर काम करणारा जो कोणी जबाबदार अधिकारी त्या खटल्याच्या तथ्यांशी सुपरिचित असून न्यायालयात आपल्या वतीने समाधानकारकपणे जबानी देऊ शकत असेल अशा अधिकाऱ्याला न्यायालयात हजर राहण्याबाबत प्रतिनियुक्त करू शकेल.

(४) हे कलम पुढील शासकीय वैज्ञानिक तज्ञांना लागू आहे, ते असे :—

(क) शासनाचा कोणताही रसायन परीक्षक किंवा सहायक रसायन परीक्षक;

(ख) मुख्य निरीक्षक, स्फोटक द्रव्ये;

(ग) संचालक, अंगुलि मुद्रा केंद्र;

(घ) संचालक, हाफकिन इन्स्टिट्यूट, मुंबई;

(ङ) केंद्रीय न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेचा किंवा राज्य न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेचा संचालक, [1][उपसंचालक किंवा सहायक संचालक];

(च) शासनाचा रक्तजलशास्त्रज्ञ.

**विवक्षित दस्तऐवजाच्या औपचारिक शाबितीची जरूरी नसणे.**

२९४. (१) जेव्हा कोणत्याही न्यायालयापुढे फिर्यादीपक्षाने किंवा आरोपीने कोणताही दस्तऐवज दाखल केला असेल तेव्हा, अशा प्रत्येक दस्तऐवजाचा तपशील सूचीत समाविष्ट केला जाईल, आणि फिर्यादीपक्षाला किंवा प्रकरणपरत्वे, आरोपीला अथवा फिर्यादीपक्षातर्फे किंवा आरोपीतर्फे कोणी वकील असल्यास त्याला अशा प्रत्येक दस्तऐवजाचा खरेपणा कबूल किंवा नाकबूल करण्यास सांगितले जाईल.

(२) दस्तऐवजांची सूची राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यानुसार असेल.

(३) एखाद्या दस्तऐवजाच्या अस्सलपणाबद्दल वाद नसेल तेव्हा, असा दस्तऐवज या संहितेखालील चौकशीत संपरीक्षेत, किंवा कोणत्याही अन्य कार्यवाहीत, जिने तो स्वाक्षरित केला असल्याचे दिसत असेल त्या व्यक्तीची स्वाक्षरी शाबीत न करता पुराव्यात वाचता येईल :

परंतु, स्वविवेकानुसार न्यायालय अशी स्वाक्षरी शाबीत करण्यास फर्मावू शकेल.

**लोकसेवकांच्या वर्तनाच्या शाबितीसाठी प्रतिज्ञालेख.**

२९५. जेव्हा या संहितेखालील कोणत्याही चौकशीच्या, संपरीक्षेच्या किंवा अन्य कार्यवाहीच्या ओघात कोणत्याही न्यायालयाकडे कोणताही अर्ज करण्यात आला असेल आणि त्यात कोणत्याही लोकसेवकाबाबत अभिकथने केलेली असतील तेव्हा, अर्जदाराला अर्जात अभिकथन केलेल्या तथ्यांचा पुरावा प्रतिज्ञालेखाद्वारे देता येईल, आणि न्यायालयाला योग्य वाटल्यास ते तशा तथ्यांसंबंधीचा पुरावा तशा रीतीने देण्यात यावा असा आदेश देऊ शकेल.

**प्रतिज्ञालेखाद्वारे औपचारिक स्वरूपाचा साक्षीपुरावा.**

२९६. (१) जिची साक्ष औपचारिक स्वरूपाची आहे अशा कोणत्याही व्यक्तीला प्रतिज्ञालेखाद्वारे साक्ष देता येईल, आणि सर्व रास्त अपवाद सोडून, या संहितेखालील कोणत्याही चौकशीत, संपरीक्षेत किंवा अन्य कार्यवाहीत ती पुराव्यादाखल वाचता येईल.

(२) न्यायालयाला योग्य वाटले तर अशा कोणत्याही व्यक्तीला समन्स पाठवून प्रतिज्ञालेखात अंतर्भूत असलेल्या तथ्यांबाबत न्यायालय तिची तपासणी करू शकेल आणि फिर्यादीपक्षाचा किंवा आरोपीचा अर्ज आल्यास त्याला तसे करावे लागेल.

**कोणत्या प्राधिकाऱ्यासमोर प्रतिज्ञालेख शपथपूर्वक करता येतील.**

२९७. (१) या कलमाखाली कोणत्याही न्यायालयासमोर उपयोजावयाचा प्रतिज्ञालेख—

[2][(क) कोणत्याही न्यायाधीशासमोर अगर कोणत्याही न्याय किंवा कार्यकारी दंडाधिकाऱ्यासमोर ; अथवा];

(ख) उच्च न्यायालयाने किंवा सत्र न्यायालयाने नियुक्त केलेल्या कोणत्याही शपथ आयुक्तासमोर ; अथवा

(ग) 'लेखप्रमाणक अधिनियम, १९५२' (१९५२ चा ५३) याखाली नियुक्त केलेल्या कोणत्याही लेखप्रमाणकासमोर

शपथपूर्वक किंवा दृढकथनपूर्वक करता येईल.

(२) प्रतिज्ञालेख हे, जबानीदार आपल्या माहितीवरून शाबीत करू शकेल अशी तथ्ये आणि जी खरी असल्याचे समजण्यात त्याला वाजवी कारण असेल अशी तथ्ये एवढ्यापुरतेच मर्यादित राहतील. आणि त्यात अशी तथ्ये वेगवेगळी नमूद केली जातील, आणि दुसऱ्या प्रकारच्या तथ्यांच्या बाबतीत जबानीदाराला असा समज होण्याची कारणे स्पष्टपणे नमूद करावी लागतील.

(३) प्रतिज्ञालेखातील कोणतीही अपप्रवादात्मक किंवा असंबद्ध बाब काढून टाकण्याबाबत किंवा ती विशोधित करण्याबाबत न्यायालय आदेश देऊ शकेल.

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम २१ द्वारे समाविष्ट केले. (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २२ द्वारे मूळ खंड (क) ऐवजी घातला (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

पूर्वीची दोषसिद्धी किंवा दोषमुक्ती कशी शाबीत करावयाची

२९८. या संहितेखालील कोणत्याही चौकशीत, संपरीक्षेत किंवा अन्य कार्यवाहीत, पूर्वीची दोषसिद्धी किंवा दोषमुक्ती त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे उपबंधित केलेल्या अन्य कोणत्याही पद्धतीव्यतिरिक्त आणखी,—

(क) अशी दोषसिद्धी किंवा दोषमुक्ती ज्या न्यायालयात करण्यात आली होती त्या न्यायालयाचे अभिलेख ज्याच्या हवाली असतील त्या अधिकाऱ्याच्या सहीनिशी जो उतारा शिक्षादेशाची किंवा आदेशाची प्रत असल्याचे प्रमाणित झाले असेल त्या उताऱ्याद्वारे, किंवा

(ख) दोषसिद्धीच्या बाबतीत शिक्षा किंवा तिचा कोणताही भाग ज्या कारागृहात भोगला गेला असेल त्याच्या अंमलदार अधिकाऱ्याने स्वाक्षरित केलेल्या प्रमाणपत्राद्वारे किंवा ज्याअन्वये शिक्षा भोगली असेल तो हवालातनामा हजर करून,

व त्याबरोबरच अशा प्रत्येक बाबतीत आरोपी व्यक्ती आणि याप्रमाणे सिद्धदोष किंवा दोषमुक्त झालेली व्यक्ती एकच असल्याबद्दलचा पुरावा सादर करून, शाबीत करता येईल.

आरोपीच्या अनुपस्थितीत पुराव्याचा अभिलेख.

२९९. (१) जर आरोपी व्यक्ती फरारी झाली आहे, आणि व्यक्तीला तात्काळ अटक करता येईलसे दिसत नाही असे शाबीत करण्यात आले तर, ज्या अपराधाबद्दल फिर्याद देण्यात आली त्याबद्दल अशा व्यक्तीची संपरीक्षा करण्यात [1][किंवा संपरीक्षा होईपावेतो तिला हवालातीत ठेवण्यास] सक्षम असलेले न्यायालय तिच्या अनुपस्थितीत फिर्यादीपक्षाच्या वतीने कोणी साक्षीदार हजर केलेले असल्यास त्यांची तपासणी करू शकेल आणि त्याच्या जबान्या नोंदवू शकेल आणि अशा व्यक्तीला अटक करण्यात आल्यावर, ज्या अपराधाचा दोषारोप तिच्यावर ठेवलेला असेल त्याबाबतच्या चौकशीच्या किंवा त्याबद्दलच्या संपरीक्षेच्या वेळी जबानीदार मृत्यू पावला असल्यास, किंवा साक्ष देण्यास असमर्थ असल्यास, किंवा सापडू शकत नसल्यास किंवा त्याला हजर करावयाचे झाल्यास, त्या खटल्याच्या परिस्थितीत गैरवाजवी ठरेल इतका विलंब, खर्च किंवा गैरसोय झाल्याशिवाय राहणार नाही असे असल्यास, अशी कोणतीही जबानी आरोपीविरुद्ध पुराव्यात देता येईल.

(२) जर मृत्यूच्या किंवा आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध एखाद्या अज्ञान व्यक्तीने किंवा व्यक्तींनी केला आहे असे दिसून आले तर, उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायाधीश असे निर्देशित करू शकेल की, कोणत्याही प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याने रीतसर चौकशी करावी आणि अपराधासंबंधी साक्षीपुरावा देऊ शकणाऱ्या कोणत्याही साक्षीदाराची तपासणी करावी आणि मागाहून कोणत्याही व्यक्तीवर त्या अपराधाचा आरोप ठेवला जाईल तेव्हा याप्रमाणे घेतलेल्या जबान्या, जबानीदार मृत्यू पावला असल्यास किंवा साक्ष देण्यास असमर्थ असल्यास किंवा तो भारताच्या सीमांबाहेर असल्यास, आरोपीविरुद्ध पुराव्यात देता येतील.

## प्रकरण चौवीस

## चौकशी व संपरीक्षा यासंबंधीचे सर्वसाधारण उपबंध

एकदा सिद्धदोष किंवा दोषमुक्त ठरवण्यात आलेल्या व्यक्तीची त्याच अपराधाबद्दल संपरीक्षा करावयाची नाही

३००. (१) ज्या व्यक्तीची एखाद्या अपराधाबद्दल पुरेशा अधिकारितेच्या न्यायालयाने एकदा संपरीक्षा केली असून, अशा अपराधाबाबत तिला सिद्धदोष किंवा दोषमुक्त ठरवले असेल ती व्यक्ती अशी दोषसिद्धी किंवा दोषमुक्ती अंमलात असताना त्याच अपराधाबद्दल अथवा त्याच तथ्यांवरून, तिच्याविरुद्ध ठेवण्यात आलेल्या दोषारोपाहून अन्य असा दोषारोप कलम २२१ च्या पोटकलम (१) खाली ज्या अपराधाबद्दल ठेवता आला असता किंवा त्या कलमाच्या पोटकलम (२) खाली ज्याबद्दल तिला सिद्धदोष ठरवता आले असते अशा अन्य कोणत्याही अपराधाबद्दल पुन्हा संपरीक्षा केली जाण्यास पात्र असणार नाही

(२) कोणत्याही अपराधाबाबत दोषमुक्त किंवा सिद्धदोष ठरलेल्या व्यक्तीची, कलम २२० च्या पोटकलम (१) खाली पूर्वीच्या संपरीक्षेत ज्याबद्दल तिच्याविरुद्ध अलग दोषारोप ठेवता आला असता अशा कोणत्याही विभिन्न अपराधाबद्दल राज्य शासनाच्या संमतीने मागाहून संपरीक्षा करता येईल.

(३) कोणत्याही कृतीने घडलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल एखाद्या व्यक्तीला सिद्धदोष ठरवण्यात आले असून, त्या कृतीमुळे घडून आलेले परिणाम व अशी कृती मिळून, तिला ज्याबद्दल सिद्धदोष ठरवण्यात आले त्याहून वेगळा असा अपराध घडला असेल त्याबाबतीत, तिला सिद्धदोष ठरवण्यात आले त्यावेळी ते परिणाम घडलेले नसतील तर, किंवा ते घडले असल्याचे न्यायालयात माहीत नसेल तर, अशा लगतपूर्वी उल्लेखिलेल्या अपराधाबद्दल तिची मागाहून संपरीक्षा करता येईल.

(४) कोणत्याही कृती मिळून घडलेल्या कोणत्याही अपराधाबाबत दोषमुक्त किंवा सिद्धदोष ठरलेल्या व्यक्तीवर, अशी दोषमुक्ती किंवा दोषसिद्धी झाली असली तरीही, तिने केलेल्या त्याच कृती मिळून घडलेल्या अन्य कोणत्याही अपराधाबद्दल मागाहून दोषारोप ठेवावयाचा असल्यास, प्रथम ज्या न्यायालयाने तिची संपरीक्षा केली असेल ते न्यायालय त्या अपराधाची संपरीक्षा करण्यास सक्षम नव्हते असे असेल तर, अशा अन्य अपराधाबद्दल तिच्यावर मागाहून दोषारोप ठेवून तिची संपरीक्षा करता येईल.

---

१. १९७८ चा अधिनियम ४५ कलम २३ द्वारे समाविष्ट केले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

(५) कलम २५८ खाली विनादोषारोप सोडून देण्यात आलेल्या व्यक्तीला ज्या न्यायालयाने याप्रमाणे विनादोषारोप सोडून दिले असेल त्या न्यायालयाच्या किंवा ज्या अन्य कोणत्याही न्यायालयाला असे प्रथम उल्लेखिलेले न्यायालय दुय्यम असेल त्या न्यायालयाच्या संमतीखेरीज, त्याच अपराधाबद्दल तिची पुन्हा संपरीक्षा केली जाणार नाही.

(६) या कलमातील कोणतीही गोष्ट 'सर्वसाधारण खंड अधिनियम, १८९७' (१८९७ चा १०) यामधील कलम २६ च्या किंवा या संहितेतील कलम १८८ च्या उपबंधावर परिणाम करणार नाही

**स्पष्टीकरण.**—फिर्याद काढून टाकणे किंवा आरोपीला विनादोषारोप सोडून देणे म्हणजे, या कलमाच्या प्रयोजनार्थ, दोषमुक्ती नव्हे.

उदाहरणे

(क) नोकरीत असताना चोरी केल्याच्या दोषारोपावरून 'क' ची संपरीक्षा केलेली असून, त्याला दोषमुक्त करण्यात आले आहे. दोषमुक्ती अंमलात असताना मागाहून त्याच्यावर, नोकरीत असताना चोरी केल्याचा किंवा त्याच तथ्यांवरून नुसत्या चोरीचा किंवा फौजदारीपात्र न्यासभंगाचा दोषारोप ठेवता येणार नाही.

(ख) जबर दुखापत केल्याबद्दल 'क' ची संपरीक्षा केलेली असून, त्याला सिद्धदोष ठरवण्यात आले आहे. नंतर जखमी व्यक्ती मरण पावते. सदोष मनुष्यवधाबद्दल 'क' ची पुन्हा संपरीक्षा करता येईल.

(ग) 'क' वर 'ख' ची हत्या केल्याबद्दल सदोष मनुष्यवधाचा दोषारोप सत्र न्यायालयापुढे ठेवण्यात येऊन त्याला सिद्धदोष ठरवण्यात आले आहे. त्याच तथ्यांवरून 'क' ची 'ख' च्या खुनाबद्दल संपरीक्षा करता येणार नाही.

(घ) 'ख' ला स्वेच्छापूर्वक दुखापत केल्याबद्दल 'क' वर प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याने दोषारोप ठेवून त्याला सिद्धदोष ठरवले आहे. ही बाब या कलमाच्या पोटकलम (३) खाली येत नसल्यास, 'ख' ला जबर दुखापत केल्याबद्दल मागाहून त्याच तथ्यांवरून 'क' ची संपरीक्षा करता येणार नाही.

(ङ) 'ख' च्या अंगावरील संपत्तीची चोरी केल्याबद्दल द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याने 'क' वर दोषारोप ठेवून त्याला सिद्धदोष ठरवले आहे. त्याच तथ्यांवरून मागाहून 'क' वर जबरी चोरीचा दोषारोप ठेवून त्याची संपरीक्षा करता येईल.

(च) 'घ' ची जबरी चोरी केल्याबद्दल प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याने 'क', 'ख' व 'ग' यांच्यावर दोषारोप ठेवून त्यांना सिद्धदोष ठरवले आहे. त्याच तथ्यांवरून मागाहून 'क', 'ख' व 'ग' यांच्यावर दरवडयाचा दोषारोप ठेवून त्यांची संपरीक्षा करता येईल.

**सरकारी अभियोक्त्यांनी उपस्थित राहणे.**

३०१. (१) एखाद्या खटल्याची जबाबदारी असलेल्या सरकारी अभियोक्त्याला किंवा सहायक सरकारी अभियोक्त्याला ज्या कोणत्याही न्यायालयापुढे तो खटला, चौकशी, संपरीक्षा किंवा अपील असेल त्याच्यासमोर कोणत्याही लेखी प्राधिकाराशिवाय उपस्थित होऊन वादकथन करता येईल.

(२) जर अशा कोणत्याही खटल्यात कोणत्याही खाजगी व्यक्तीने कोणत्याही व्यक्तिविरुद्ध न्यायालयात खटला चालवण्यासाठी एखाद्या वकिलाला माहिती देऊन नेमले तर, त्या खटल्याची जबाबदारी असलेला सरकारी अभियोक्ता किंवा सहायक सरकारी अभियोक्ता खटला चालवील आणि याप्रमाणे नेमलेला वकील त्यात सरकारी अभियोक्त्याच्या किंवा सहायक सरकारी अभियोक्त्याच्या निदेशानुसार काम चालवील आणि खटल्यातील साक्षीपुरावा संपल्यानंतर न्यायालयाच्या परवानगीने तो लेखी युक्तिवाद सादर करू शकेल.

**खटला चालवण्यास परवानगी.**

३०२. (१) एखाद्या खटल्याची चौकशी किंवा संपरीक्षा करणारा कोणताही दंडाधिकारी निरीक्षकाहून खालच्या दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्याहून अन्य कोणत्याही व्यक्तीला खटला चालवण्यास परवानगी देऊ शकेल, पण महा अधिवक्ता किंवा सरकारी अधिवक्ता किंवा सरकारी अभियोक्ता किंवा सहायक सरकारी अभियोक्ता याहून अन्य कोणतीही व्यक्ती, अशा परवानगीशिवाय तसे करण्यास हक्कदार असणार नाही:

परंतु, ज्या अपराधाबाबत आरोपीविरुद्ध खटला चालवण्यात आला असेल त्याच्या चौकशीत कोणत्याही पोलिसाने भाग घेतला नसल्यास त्याला खटला चालवण्याची परवानगी दिली जाणार नाही.

(२) खटला चालवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला तो जातीनिशी किंवा वकिलाकरवी चालविता येईल.

**जिच्याविरुद्ध कार्यवाही सुरू करण्यात आली त्या व्यक्तीचा स्वतःचा बचाव करून घेण्याचा हक्क.**

३०३. ज्या कोणत्याही व्यक्तीवर फौजदारी न्यायालयापुढे आरोप करण्यात आला असेल किंवा जिच्याविरुद्ध या संहितेखाली कार्यवाही सुरू करण्यात आली असेल तिला स्वाधिकाराने आपल्या पसंतीच्या वकिलाकरवी आपला बचाव करून घेता येईल.

विवक्षित बाबतीत राज्याच्या खर्चाने आरोपीला कायदेविषयक सहाय्य.

३०४. (१) सत्र न्यायालयापुढील संपरीक्षेत वकिलाने आरोपीचे प्रतिनिधित्व केलेले नसेल आणि वकील नेमण्याइतपत आरोपीची पुरेशी ऐपत नाही असे न्यायालयाला दिसून येईल त्या बाबतीत, न्यायालय राज्याच्या खर्चाने त्याच्या बचावासाठी वकील नेमून देईल.

(२) (क) पोटकलम (१) खाली बचावासाठी वकील निवडण्याची पद्धत;

(ख) न्यायालयांनी अशा वकिलांना उपलब्ध करून द्यावयाच्या सोयी;

(ग) शासनाने अशा वकिलांना द्यावयाची फी;

या गोष्टींसाठी व सर्वसाधारणपणे पोटकलम (१) ची प्रयोजने पार पाडण्यासाठी उपबंध करणारे नियम उच्च न्यायालयाला राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने करता येतील.

(३) राज्य शासन अधिसूचनेद्वारे असे निर्देशित करू शकेल की, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केला असेल अशा दिनांकापासून पोटकलम (१) व (२) चे उपबंध जसे सत्र न्यायालयासमोरील संपरीक्षांच्या संबंधांत लागू होतात तसे ते राज्यातील न्यायालयांसमोरील कोणत्याही प्रकारच्या संपरीक्षांच्या संबंधात लागू असतील.

निगम किंवा नोंदीव सोसायटी ही आरोपी असेल त्याबाबतीतील कार्यपद्धती.

३०५. (१) या कलमात "निगम" याचा अर्थ, निगमित कंपनी किंवा अन्य निगम-निकाय, असा आहे आणि त्यात 'सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०' (१८६० चा २१) याखाली नोंदलेल्या सोसायटीचा समावेश आहे.

(२) जेव्हा एखाद्या चौकशीत किंवा संपरीक्षेत निगम हा आरोपी व्यक्ती किंवा आरोपी व्यक्तींपैकी एक असेल तेव्हा, त्याला चौकशीच्या किंवा संपरीक्षेच्या प्रयोजनार्थ प्रतिनिधी नियुक्त करता येईल आणि अशी नियुक्ती ही निगमाच्या मोहोरेनिशी केली जाण्याची गरज नाही.

(३) निगमाचा प्रतिनिधी उपस्थित राहील त्या बाबतीत, एखादी गोष्ट समक्ष केली पाहिजे किंवा आरोपीला वाचून दाखवली किंवा सांगितली पाहिजे किंवा समजावून दिली पाहिजे असा या संहितेतील कोणताही दंडक म्हणजे ती गोष्ट त्या प्रतिनिधीच्या समक्ष केली पाहिजे किंवा प्रतिनिधीला वाचून दाखवली पाहिजे किंवा सांगितली पाहिजे किंवा समजावून दिली पाहिजे असा दंडक होय असा त्याचा अर्थ लावला जाईल आणि आरोपीची तपासणी केली पाहिजे असा कोणताही दंडक म्हणजे प्रतिनिधीची तपासणी केली पाहिजे असा दंडक होय असा त्याचा अर्थ लावला जाईल.

(४) निगमाचा प्रतिनिधी उपस्थित राहणार नाही त्याबाबतीत, पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेला असा कोणताही दंडक लागू असणार नाही.

(५) निगमाच्या व्यवस्थापकीय संचालकाने अथवा निगमाच्या कारभाराचे व्यवस्थापन करणाऱ्या किंवा करणाऱ्यांपैकी एक असलेल्या व्यक्तीने (मग तिला कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो) स्वाक्षरित केले असल्याचे दिसणारे जे निवेदन, त्यात नामनिर्दिष्ट केलेली व्यक्ती या कलमाच्या प्रयोजनार्थ निगमाचा प्रतिनिधी म्हणून नियुक्त करण्यात आली आहे अशा आशयाचे असून ते दाखल करण्यात आले असेल त्या बाबतीत, विरुद्ध शाबीत झाले नाही तर, अशी व्यक्ती याप्रमाणे नियुक्त झाली आहे असे न्यायालय गृहीत धरील.

(६) न्यायालयापुढील चौकशीत किंवा संपरीक्षेत निगमाचा प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहणारी कोणतीही व्यक्ती ही असा प्रतिनिधी आहे किंवा नाही असा प्रश्न उपस्थित झाला तर, न्यायालय त्या प्रश्नाचा निर्णय करील.

सहअपराधीला माफी देऊ करणे.

३०६. (१) हे कलम ज्यास लागू होते अशा अपराधात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे निबद्ध किंवा सहभागी असल्याचे समजण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीचा साक्षीपुरावा मिळविण्याच्या हेतूने, अशा व्यक्तीला मुख्य न्याय दंडाधिकारी किंवा महानगर दंडाधिकारी, अपराधाचे अन्वेषण किंवा चौकशी किंवा संपरीक्षा कोणत्याही टप्प्यात असताना आणि त्या अपराधाची चौकशी किंवा संपरीक्षा करणारा प्रथम वर्ग दंडाधिकारी, चौकशी किंवा संपरीक्षा कोणत्याही टप्प्यात असताना, अपराधासंबंधीची आणि तो करण्याच्या कामी म्होरक्या म्हणून किंवा अपप्रेरक म्हणून संबंधित अशा प्रत्येक व्यक्तीसंबंधीची तिला माहित असलेली सर्व परिस्थिती संपूर्णपणे व खरेपणाने उघड करण्याच्या शर्तीवर माफी देऊ शकेल.

(२) हे कलम,—

(क) सत्र न्यायालयानेच केवळ किंवा 'फौजदारी विधि विशोधन अधिनियम, १९५२' (१९५२ चा ४६) याखाली नियुक्त केलेल्या विशेष न्यायाधीशाच्या न्यायालयाने संपरीक्षा करण्याजोग्या कोणत्याही अपराधास; किंवा

(ख) सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या शिक्षेस किंवा त्याहून अधिक कडक शिक्षेस पात्र असलेल्या कोणत्याही अपराधास, लागू आहे.

(३) पोटकलम (१) खाली माफी देऊ करणारा प्रत्येक दंडाधिकारी,—

(क) तसे करण्याची आपली कारणे;

(ख) ज्या व्यक्तीला माफी देऊ करण्यात आली ती तिने स्वीकारली किंवा नाही याची नोंद करील आणि आरोपीने केलेल्या अर्जावरून त्याला अशा नोंदीची प्रत विनामूल्य पुरवील.

(४) पोटकलम (१) खाली देऊ केलेली माफी स्वीकारणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला—

(क) अपराधाची दखल घेणाऱ्या दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयात आणि मागाहून कोणतीही संपरीक्षा झाल्यास त्या संपरीक्षेत, साक्षीदार म्हणून तपासले जाईल;

(ख) तिला आधीच जामीन देण्यात आला नसेल तर, संपरीक्षा संपेपर्यंत हवालातीत स्थानबद्ध केले जाईल.

(५) जेथे पोटकलम (१) खाली देऊ केलेली माफी एखाद्या व्यक्तीने स्वीकारली असेल आणि पोटकलम (४) खाली तिची तपासणी करण्यात आली असेल तर, अपराधाची दखल घेणारा दंडाधिकारी, त्या खटल्याची पुढील चौकशी न करता,—

(क) (एक) केवळ सत्र न्यायालयानेच संपरीक्षा करण्याजोगा तो अपराध असेल तर किंवा दखल घेणारा दंडाधिकारी हा मुख्य न्याय दंडाधिकारी असेल तर, सत्र न्यायालयाकडे;

(दोन) 'फौजदारी विधि विशोधन अधिनियम, १९५२' (१९५२ चा ४६) याखाली नियुक्त केलेल्या विशेष न्यायाधीशाच्या न्यायालयानेच संपरीक्षा करण्याजोगा तो अपराध असेल तर, त्या न्यायालयाकडे,

संपरीक्षेसाठी सुपूर्द करील;

(ख) अन्य कोणत्याही बाबतीत, तो खटला मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याकडे वर्ग करील व तो मुख्य न्याय दंडाधिकारी स्वतः खटल्याची संपरीक्षा करील.

माफी देऊ करण्याचा निदेश देण्याची शक्ती.

३०७. खटला याप्रमाणे सुपूर्द केल्यानंतर पण न्यायनिर्णय दिला जाण्यापूर्वी कोणत्याही वेळी, ज्याच्याकडे तो सुपूर्द केलेला असेल ते न्यायालय, अशा कोणत्याही अपराधात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे निबद्ध अथवा सहभागी असल्याचे समजण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीचा साक्षीपुरावा मिळवण्याच्या हेतूने त्याच शर्तीवर अशा व्यक्तीला माफी देऊ शकेल.

माफीच्या शर्तींचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्तीची संपरीक्षा.

३०८. (१) कलम ३०६ किंवा कलम ३०७ खाली देऊ केलेली माफी जिने स्वीकारली आहे त्या व्यक्तीविषयी जेव्हा, आपल्या मते अशा व्यक्तीने अत्यावश्यक अशी काहीतरी गोष्ट बुद्धिपुरस्सर लपवून किंवा खोटी साक्ष देऊन, ज्या शर्तीवर तिला माफी देऊ करण्यात आली तिचे अनुपालन केलेले नाही असे सरकारी अभियोक्त्याने प्रमाणित केले असेल त्या बाबतीत, ज्या अपराधासंबंधात याप्रमाणे माफी देऊ करण्यात आली होती त्याबद्दल किंवा त्याच बाबीच्यासंबंधात ती व्यक्ती ज्याबद्दल दोषी असल्याचे दिसून येईल अशा अन्य कोणत्याही अपराधाबद्दल आणि खोटी साक्ष दिल्याच्या अपराधाबद्दल अशा व्यक्तीची संपरीक्षा करता येईल :

परंतु, अशा व्यक्तीची संपरीक्षा अन्य आरोपींपैकी कोणाबरोबरही संयुक्तपणे केली जाणार नाही :

परंतु आणखी असे की, अशा व्यक्तीची संपरीक्षा खोटी साक्ष दिल्याच्या अपराधाबद्दल उच्च न्यायालयाच्या मंजुरीखेरीज केली जाणार नाही, आणि त्या अपराधास कलम १९५ किंवा कलम ३४० मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(२) देऊ केलेली माफी स्वीकारताना अशा व्यक्तीने दिलेला आणि कलम १६४ खाली दंडाधिकाऱ्याने किंवा कलम ३०६ च्या पोटकलम (४) खाली न्यायालयाने नोंदलेला जबाब अशा संपरीक्षेत त्याच्याविरुद्ध पुराव्यात देता येईल.

(३) अशा संपरीक्षेत आरोपी, ज्या शर्तींवर अशी माफी देऊ करण्यात आली तिचे आपण अनुपालन केले आहे असे प्रतिकथन करण्यास हक्कदार असेल; आणि अशा बाबतीत, शर्त पाळण्यात आलेली नाही हे फिर्यादीपक्षाला शाबीत करावे लागेल.

(४) अशा संपरीक्षेत न्यायालय—

(क) ते सत्र न्यायालय असेल तर, आरोपीला दोषारोप वाचून दाखवण्यापूर्वी व समजावून सांगण्यापूर्वी;

(ख) ते दंडाधिकाऱ्याचे न्यायालय असेल तर, फिर्यादीपक्षाच्या साक्षीदारांची साक्ष घेण्यापूर्वी, ज्या शर्तींवर माफी देऊ करण्यात आली त्या शर्ती आपण पाळल्या आहेत असे प्रतिकथन करावयाचे आहे का असे आरोपीला विचारील.

(५) जर आरोपीने असे प्रतिकथन केले तर, न्यायालय ते प्रतिकथन नोंदवून घेईल आणि संपरीक्षा पुढे चालवील, आणि त्या खटल्याचा न्यायनिर्णय देण्यापूर्वी, आरोपीने माफीच्या शर्तींचे पालन केले आहे किंवा नाही हे ठरवील आणि त्याने तसे पालन केले आहे असे न्यायालयाने ठरवले तर, या संहितेत काहीही अंतर्भूत असले तरी, ते दोषमुक्तीचा न्यायनिर्णय देईल.

कार्यवाही पुढे ढकलण्याची किंवा तहकूब करण्याची शक्ती.

३०९. (१) प्रत्येक चौकशीत किंवा संपरीक्षेत, कार्यवाही शक्य तितक्या शीघ्रतेने करण्यात येईल आणि विशेषतः साक्षीदारांची तपासणी एकदा सुरू झाली की, उपस्थित असलेल्या सर्व साक्षीदारांची तपासणी पुरी होईपर्यंत ती रोजच्या रोज चालू ठेवली जाईल, मात्र काही कारणास्तव लगतनंतरच्या दिवसाहून अधिक काळ तहकूब करणे न्यायालयाला जरूरीचे वाटले तर, न्यायालयाला ती कारणे नमूद करावी लागतील.

(२) अपराधाची दखल घेतल्यानंतर, किंवा संपरीक्षा सुरू झाल्यानंतर कोणत्याही चौकशीची सुरुवात पुढे ढकलणे किंवा संपरीक्षा तहकूब करणे काही कारणास्तव आवश्यक किंवा उचित असल्याचे न्यायालयाला दिसून आले तर, कारणे नमूद करून ते वेळोवेळी त्याला योग्य वाटतील अशा अटींवर, त्याला वाजवी वाटेल अशा अवधीकरीता, तो पुढे ढकलू शकेल किंवा तहकूब करू शकेल, आणि आरोपी हवालातीत असेल तर, त्याला वॉरंटाद्वारे तेथे परत पाठवले जाईल:

परंतु, कोणताही दंडाधिकारी या कलमाखाली आरोपी व्यक्तीला एकावेळी पंधरा दिवसांहून अधिक अवधीकरता हवालातीत परत पाठवणार नाही:

परंतु आणखी असे की, साक्षीदार हजर असतील तेव्हा, त्यांनी तपासल्याशिवाय चौकशी किंवा संपरीक्षा तहकूब करण्यास किंवा पुढे ढकलण्यास मान्यता दिली जाणार नाही—मात्र विशेष कारणास्तव तसे न केल्यास कारणे नमूद करावी लागतील :

[1][परंतु आणखी असे की, आरोपी व्यक्तीला देण्याचे योजलेल्या शिक्षेविरुद्ध कारण दाखवणे तिला शक्य व्हावे एवढ्याच केवळ प्रयोजनासाठी संपरीक्षा किंवा चौकशी तहकूब करण्यास मान्यता दिली जाणार नाही.]

**स्पष्टीकरण १.**—आरोपीने अपराध केला असावा असा संशय घेण्यास पुरेसा पुरावा मिळालेला असेल आणि हवालातीत परत पाठवण्याने आणखी पुरावा मिळण्याचा संभव आहे असे दिसत असेल तर, हवालातीत परत पाठवण्यास ते वाजवी कारण होऊ शकेल.

**स्पष्टीकरण २.**—याप्रमाणे चौकशी किंवा संपरीक्षा तहकूब करण्यास किंवा पुढे ढकलण्यास ज्या अटींवर मान्यता दिली जाईल त्यांमध्ये, योग्य प्रसंगी फिर्यादीपक्षाने किंवा आरोपीने खर्च देण्याच्या अटीचा समावेश आहे.

स्थळाचे निरीक्षण.

**३१०.** (१) चौकशी, संपरीक्षा किंवा अन्य कार्यवाही कोणत्याही टप्प्याला असताना पक्षकारांना रीतसर नोटीस देऊन कोणताही न्यायाधीश किंवा दंडाधिकारी अपराध ज्या स्थळी घडल्याचे अभिकथन करण्यात आले असेल अशा कोणत्याही स्थळाला अथवा अशा चौकशीत किंवा संपरीक्षेत दिलेल्या साक्षीपुराव्याचे यथोचित मूल्यमापन करण्यासाठी ज्याचे निरीक्षण करणे त्याच्या मते जरुरीचे असेल अशा कोणत्याही स्थळाला भेट देऊन निरीक्षण करू शकेल आणि अनावश्यक विलंब न लावता तो अशा निरीक्षणात नजरेस आलेल्या कोणत्याही संबद्ध तथ्यांचे टिप्पण नमूद करील.

(२) असे टिपण खटल्याच्या अभिलेखाचा भाग होईल आणि अभियोक्त्याने, फिर्यादिदाराने किंवा आरोपीने किंवा खटल्यातील अन्य कोणत्याही पक्षकाराने तशी इच्छा दर्शवली तर, त्याला त्या टिप्पणीची प्रत विनामूल्य पुरवण्यात येईल.

महत्त्वाच्या साक्षीदारास समन्स काढण्याची किंवा हजर असलेल्या व्यक्तीची साक्ष तपासणी करण्याची शक्ती.

**३११.** कोणतेही न्यायालय या संहितेखालील कोणतीही चौकशी, संपरीक्षा किंवा अन्य कार्यवाही कोणत्याही टप्प्यात असताना कोणत्याही व्यक्तीला साक्षीदार म्हणून समन्स काढू शकेल अथवा समक्ष हजर असलेल्या कोणत्याही व्यक्तीला साक्षीदार म्हणून समन्स काढलेले नसले तरी तिची साक्षतपासणी करू शकेल, अथवा आधीच साक्ष तपासणी केलेल्या व्यक्तीला परत बोलावून तिची फेरतपासणी करू शकेल; आणि अशा कोणत्याही व्यक्तीचा साक्षीपुरावा खटल्याचा निर्णय न्याय्यपणे होण्यासाठी अत्यावश्यक आहे असे दिसून आले तर, न्यायालय तिला समन्स काढून तिची साक्षतपासणी करील किंवा पुन्हा बोलावून फेरतपासणी करील.

फिर्यादिदारांचा व साक्षीदारांचा खर्च.

**३१२.** राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, कोणतेही फौजदारी न्यायालय, त्याला योग्य वाटल्यास अशा न्यायालयासमोरील या संहितेखालील कोणत्याही चौकशीच्या, संपरीक्षेच्या किंवा अन्य कार्यवाहीच्या कामासाठी समक्ष हजर राहणाऱ्या कोणत्याही फिर्यादीदाराचा किंवा साक्षीदाराचा वाजवी खर्च शासनाकडून देवविण्याचा आदेश देऊ शकेल.

आरोपीची तपासणी करण्याची शक्ती.

**३१३.** (१) प्रत्येक चौकशीमध्ये किंवा संपरीक्षेमध्ये पुराव्यात आपल्याविरुद्ध दिसणाऱ्या कोणत्याही परिस्थितिविशेषांचा व्यक्तिशः खुलासा करणे आरोपीला शक्य व्हावे यासाठी न्यायालय,—

(क) कोणत्याही टप्प्यात, न्यायालयाला जरूर वाटतील असे प्रश्न आरोपीला पूर्वसूचना दिल्याशिवाय विचारू शकेल;

(ख) फिर्यादीपक्षाच्या साक्षीदारांची तपासणी केल्यानंतर व आरोपीला आपला बचाव देण्यास सांगण्यापूर्वी त्या प्रकरणाबाबत सर्वसाधारण स्वरूपाचे प्रश्न विचारील:

परंतु, ज्या समन्स-खटल्यात न्यायालयाने आरोपीला जातीनिशी हजर राहण्यापासून माफी दिली असेल त्यामध्ये, ते खंड (ख) खाली त्याची तपासणी करण्यापासूनसुद्धा माफी देऊ शकेल.

(२) पोटकलम (१) खाली आरोपीची तपासणी होईल तेव्हा, त्याला शपथ दिली जाणार नाही

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम २४ द्वारे समाविष्ट केले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

(३) अशा प्रश्नांची उत्तरे देण्यास नकार देण्यामुळे किंवा त्यांना खोटी उत्तरे देण्यामुळे आरोपी स्वतः शिक्षेस पात्र होणार नाही.

(४) आरोपीने दिलेली उत्तरे अशा चौकशीत किंवा संपरीक्षेत विचारात घेता येतील व त्याने जो कोणताही अपराध केला असल्याचे अशा उत्तरांवरून सूचित होऊ शकेल अशा अन्य कोणत्याही अपराधाबद्दलच्या अन्य कोणत्याही चौकशीत किंवा संपरीक्षेत त्याच्या बाजूने किंवा त्याच्याविरुद्ध पुराव्या-दाखल मांडता येतील.

३१४. (१) कार्यवाहीतील कोणत्याही पक्षकाराला आपला साक्षीपुरावा संपल्यावर शक्य होईल तितक्या लवकर तोंडी संक्षिप्त युक्तिवाद करता येईल व काही युक्तिवाद तोंडी मांडला असल्यास तो संपवण्यापूर्वी न्यायालयाकडे आपल्या बाजूला पुष्टिकारक असे युक्तिवाद संक्षिप्तात व वेगवेगळ्या शीर्षकाखाली येणारे टिप्पण सादर करता येईल व असे प्रत्येक टिप्पण अभिलेखाचा भाग होईल. तोंडी युक्तिवाद व युक्तिवादाचे टिप्पण.

(२) अशा प्रत्येक टिप्पणाची एक प्रत त्याचवेळी विरुद्ध पक्षकाराला पुरविण्यात येईल.

(३) लेखी युक्तिवाद दाखल करण्यासाठी कार्यवाही तहकूब करण्याला मान्यता दिली जाणार नाही—मात्र काही कारणास्तव अशा तहकुबीला मान्यता देणे न्यायालयाला जरुरीचे वाटल्यास त्याला ती कारण नमूद करावी लागतील.

(४) तोंडी युक्तिवाद संक्षिप्त किंवा संबद्ध नाहीत असे न्यायालयाचे मत असेल तर, ते त्यावर नियंत्रण घालू शकेल.

३१५. (१) फौजदारी न्यायालयापुढे अपराधाचा आरोप ठेवण्यात आलेली कोणतीही व्यक्ती बचावपक्षाच्या बाजूने साक्षीदार होण्यास सक्षम असेल व स्वतःविरुद्ध किंवा त्याच संपरीक्षेत आपल्या बरोबरीने दोषारोप ठेवण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तिविरुद्ध केलेल्या दोषारोपांच्या नाशाबितीसाठी तिला शपथेवर साक्ष देता येईल : आरोपी व्यक्ती साक्षीदार होण्यास सक्षम असणे.

परंतु,—

(क) त्या व्यक्तीला तिच्या स्वतःच्या लेखी विनंतीखेरीज साक्षीदार म्हणून बोलावले जाणार नाही;

(ख) तिने साक्ष न देणे हे पक्षकारांपैकी कोणालाही किंवा न्यायालयाला कोणत्याही प्रकारे टीकाविषय करता येणार नाही अथवा त्यामुळे, तिच्याविरुद्ध किंवा त्याच संपरीक्षेत तिच्या बरोबरीने दोषारोप ठेवण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणतेही गृहीतक संभवणार नाही.

(२) ज्या कोणत्याही व्यक्तींविरुद्ध कोणत्याही फौजदारी न्यायालयात कलम ९८ किंवा कलम १०७ किंवा कलम १०८ किंवा कलम १०९ किंवा कलम ११० किंवा प्रकरण नववे किंवा दहाव्या प्रकरणाचा भाग 'ख', भाग 'ग' किंवा भाग 'घ' याखाली कार्यवाही दाखल करण्यात आली असेल तिला अशा कार्यवाहीत स्वतः साक्षीदार म्हणून पुढे होता येईल:

परंतु, कलम १०८, कलम १०९ किंवा कलम ११० खालील कार्यवाहीत अशा व्यक्तींने साक्ष न देणे हे पक्षकारांपैकी कोणालाही किंवा न्यायालयाला कोणत्याही प्रकारे टीकाविषयक करता येणार नाही अथवा त्यामुळे, तिच्याविरुद्ध किंवा त्याच संपरीक्षेत तिच्या बरोबरीने कार्यवाही करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणतेही गृहीतक संभवणार नाही.

३१६. कलमे ३०६ व ३०७ मध्ये उपबंधित केले आहे ते खेरीजकरून एरव्ही, स्वतःला ज्ञात असलेली कोणतीही बाब उघड करण्यास किंवा लपवून ठेवण्यास आरोपीला प्रवृत्त करण्याकरता कोणतेही वचन देऊन किंवा धमकी देऊन किंवा अन्यथा त्याच्यावर दडपण आणता येणार नाही. प्रकटन करण्यास प्रवृत्त करण्यासाठी दडपण आणावयाचे नाही.

३१७. (१) या संहितेखालील चौकशी किंवा संपरीक्षा कोणत्याही टप्प्याला असताना न्या-यहितार्थ न्यायालयात आरोपींची जातीनिशी हजेरी जरूरीची नाही किंवा आरोपी न्यायालयाच्या कामकाजात हेकेखोरपणाने अडथळे आणत आहे अशी काही कारणास्तव न्यायाधीशाची किंवा दंडाधिकाऱ्याची खात्री होईल तेव्हा, ती कारणे नमूद करून तो न्यायाधीश किंवा दंडाधिकारी आरोपीचे प्रतिनिधित्व वकिलामार्फत होत असेल तर, आरोपीला समक्ष हजर राहण्यापासून माफी देऊन त्याच्या अनुपस्थितीत अशी चौकशी किंवा संपरीक्षा पुढे चालू ठेवू शकेल आणि कार्यवाही नंतरच्या कोणत्याही टप्प्यात असताना अशा आरोपीने जातीने हजर व्हावे असे निदेशित करू शकेल. विवक्षित प्रकरणी आरोपीच्या अनुपस्थितीत चौकशी व संपरीक्षा करण्यासाठी उपबंध.

(२) जेव्हा अशा कोणत्याही खटल्यात आरोपीचे प्रतिनिधित्व वकिलामार्फत होत नसेल अथवा न्यायाधीशाला किंवा दंडाधिकाऱ्याला आरोपीची जातीनिशी हजेरी जरुरीची वाटेल तेव्हा, त्याला योग्य वाटल्यास व कारणे नमूद करून, तो अशी चौकशी किंवा संपरीक्षा तहकूब करू शकेल अथवा अशा आरोपीचे प्रकरण वेगळे विचारात घ्यावे किंवा त्याची वेगळी संपरीक्षा करावी असा आदेश देऊ शकेल.

आरोपीला कार्यवाही समजत नसेल त्याबाबतीत कार्यपद्धती.

३१८. आरोपी जरी मनोविकल नसला तरी त्याला कार्यवाही समजावून देणे शक्य नसेल तर, न्यायालय चौकशी किंवा संपरीक्षा पुढे चालवू शकेल व उच्च न्यायालयाहून अन्य न्यायालयाच्या बाबतीत, जर अशा कार्यवाहीची परिणती दोषसिद्धीत झाली तर ती कार्यवाही उच्च न्यायालयाकडे त्या खटल्याच्या परिस्थितीच्या अहवालासह पाठवली जाईल व उच्च न्यायालय त्यावर स्वतःला योग्य वाटेल तो आदेश देईल.

अपराधाबाबत दोषी असल्याचे दिसणाऱ्या अन्य व्यक्तींविरुद्ध कार्यवाही करण्याची शक्ती.

३१९. (१) अपराधाच्या चौकशीच्या किंवा संपरीक्षेच्या ओघात जेव्हा, आरोपी नसलेल्या एखाद्या व्यक्तीने एखादा अपराध केला असून त्याबद्दल अशा व्यक्तीची आरोपीबरोबर संपरीक्षा केली जाऊ शकते असे पुराव्यावरून दिसून येईल तेव्हा, न्यायालयाला अशा व्यक्तीने जो अपराध केला असल्याचे दिसत असेल त्याबद्दल तिच्याविरुद्ध कार्यवाही करता येईल.

(२) जेव्हा अशी व्यक्ती न्यायालयात समक्ष हजर नसेल तेव्हा, उपरोक्त प्रयोजनासाठी प्रकरणाच्या परिस्थितीनुसार जरुरी पडेल त्याप्रमाणे, तिला अटक केली जाऊ शकेल किंवा समन्स काढले जाऊ शकेल.

(३) न्यायालयात हजर राहणाऱ्या एखाद्या व्यक्तीला अटक केलेली नसली किंवा समन्स काढलेले नसले तरी, तिने जो अपराध केला असल्याचे दिसत असेल त्यांची चौकशी किंवा संपरीक्षा करण्याच्या प्रयोजनासाठी असे न्यायालय तिला अडकवून ठेवू शकेल.

(४) पोटकलम (१) खाली न्यायालय कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कार्यवाही करील तेव्हा,—

(क) अशा व्यक्तीबाबतची कार्यवाही नव्याने सुरू केली जाईल व साक्षीदारांची फेरसुनावणी करण्यात येईल ;

(ख) खंड (क) च्या उपबंधांच्या अधीनतेने, ज्या अपराधाबाबत चौकशी किंवा संपरीक्षा सुरू झाली होती त्याची न्यायालयाने दखल घेतली त्यावेळी जणू काही अशी व्यक्ती आरोपी व्यक्ती असावी त्याप्रमाणे तो खटला पुढे चालू होईल.

अपराध आपसात मिटविणे.

३२०. (१) पुढे दिलेल्या तक्त्याच्या पहिल्या दोन स्तंभांत 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यातील कलमांखाली शिक्षापात्र असलेले जे अपराध विनिर्दिष्ट केले आहेत ते त्या तक्त्याच्या तिसऱ्या स्तंभात नमूद केलेल्या व्यक्तींना आपसात मिटवता येतील :—

तक्ता

| अपराध (१) | 'भारतीय दंड संहिते'चे लागू असलेले कलम (२) | ज्या व्यक्तीला अपराध मिटविता येईल ती व्यक्ती (३) |
|---|---|---|
| कोणत्याही व्यक्तीच्या धार्मिक भावना दुखावण्याच्या बुद्धिपुरस्सर उद्देशाने शब्द उच्चारणे, इ. | २९८ | जिच्या धार्मिक भावना दुखावणे अभिप्रेत असेल ती व्यक्ती. |
| दुखापत पोचवणे. . . . . | ३२३, ३३४ | जिला दुखापत पोचवण्यात आली ती व्यक्ती. |
| कोणत्याही व्यक्तीला गैरपणे निरुद्ध किंवा परिरुद्ध करणे. | ३४१, ३४२ | निरुद्ध किंवा परिरुद्ध केलेली व्यक्ती. |
| हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग . . | ३५२, ३५५, ३५८ | जिच्यावर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग केली ती व्यक्ती. |
| आगळीक—घडून आलेली हानी किंवा नुकसान ही फक्त खाजगी व्यक्तीचीच हानी किंवा नुकसान असेल तेव्हा. | ४२६, ४२७ | ज्या व्यक्तीची हानी किंवा नुकसान झाले असेल ती व्यक्ती. |
| फौजदारीपात्र अतिक्रमण . . . . | ४४७ | ज्या संपत्तीबाबत अतिक्रमण झाले तिचा कब्जा असलेली व्यक्ती. |
| गृह-अतिक्रमण . . . . | ४४८ | ज्या संपत्तीबाबत अतिक्रमण झाले तिचा कब्जा असलेली व्यक्ती. |
| सेवा-संविदेचा फौजदारीपात्र भंग . . . . | ४९१ | अपराध्याने ज्या व्यक्तीबरोबर संविदा केली ती व्यक्ती. |
| परगमन . . . . | ४९७ | त्या स्त्रीचा पती. |
| गुन्हेगारी उद्देशाने विवाहित स्त्रीस भुरळ पाडून नेणे किंवा पळवून नेणे किंवा अडकवून ठेवणे. | ४९८ | त्या स्त्रीचा पती. |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| [1][अब्रूनुकसानी—पोटकलम (२) खालील तक्त्याच्या स्तंभ १ मध्ये 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या कलम ५०० समोर विनिर्दिष्ट केलेली अशी प्रकरणे खेरीजकरून.] | ५०० | अब्रूनुकसानी झालेली व्यक्ती. |
| अब्रूनुकसानीकारक असल्याचे माहीत असलेले साहित्य छापणे किंवा कोरणे. | ५०१ | अब्रूनुकसानी झालेली व्यक्ती. |
| अब्रूनुकसानीकारक साहित्य अंतर्भूत असलेला छापील किंवा कोरीव पदार्थ, त्यात तसे साहित्य असल्याचे माहीत असताना विकणे. | ५०२ | अब्रूनुकसानी झालेली व्यक्ती. |
| शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेला अपमान. | ५०४ | अपमान झालेली व्यक्ती. |
| फौजदारीपात्र धाकदपटशा—तो अपराध सात वर्षे कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल ती बाब खेरीजकरून. | ५०६ | धाकदपटशा दाखवलेली व्यक्ती. |
| एखादी व्यक्ती दैवी प्रकोपाचा विषय होईल असा तिचा समज करून देऊन घडवलेली कृती. | ५०८ | जिच्याबाबत अपराध केला ती व्यक्ती. |

(२) पुढे दिलेल्या तक्त्याच्या पहिल्या दोन स्तभांत 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यातील कलमांखाली शिक्षापात्र असलेले जे अपराध विनिर्दिष्ट केले आहेत ते, अशा अपराधाची संपरीक्षा ज्या न्यायालयासमोर प्रलंबित असेल त्याच्या परवानगीने, त्या तक्त्याच्या तिसऱ्या स्तंभात नमूद केलेल्या व्यक्तींना आपसात मिटवता येतील :—

तक्ता

| अपराध | 'भारतीय दंड संहिते'चे लागू असलेले कलम | ज्या व्यक्तीला अपराध मिटविता येईल ती व्यक्ती. |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापूर्वक दुखापत पोचवणे. | ३२४ | जिला दुखापत पोचवण्यात आली ती व्यक्ती. |
| इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवणे. | ३२५ | जिला दुखापत पोचवण्यात आली ती व्यक्ती. |
| गंभीर व आकस्मिक प्रक्षोभनामुळे स्वेच्छापूर्वक जबर दुखापत करणे. | ३३५ | जिला दुखापत पोचवण्यात आली ती व्यक्ती. |
| मानवी जीवित किंवा इतरांची व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने एखादी कृती करून दुखापत पोचवणे. | ३३७ | जिला दुखापत पोचवण्यात आली ती व्यक्ती |
| मानवी जीवित किंवा इतरांची व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणाने व हयगयीने एखादी कृती करून जबर दुखापत पोचवणे. | ३३८ | जिला दुखापत पोचवण्यात आली ती व्यक्ती. |
| एखाद्या व्यक्तीला तीन दिवस किंवा त्याहून अधिक काळ गैरपणे परिरुद्ध करणे. | ३४३ | परिरुद्ध केलेली व्यक्ती. |
| एखाद्या व्यक्तीला दहा दिवस किंवा त्याहून अधिक काळ गैरपणे परिरुद्ध करणे. | ३४४ | परिरुद्ध केलेली व्यक्ती. |
| एखाद्या व्यक्तीला गुप्तस्थळी गैरपणे परिरुद्ध करणे. | ३४६ | परिरुद्ध केलेली व्यक्ती. |
| स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिच्यावर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे. | ३५४ | जिच्यावर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग केला ती स्त्री. |
| व्यक्तीला गैरपणे परिरुद्ध करण्याचा प्रयत्न करताना हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे. | ३५७ | जिच्यावर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग केला ती व्यक्ती. |

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम २५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१८ डिसेंबर १९७८ रोजी व तेव्हापासून.)

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| चोरी—चोरीच्या संपत्तीचे मूल्य दोनशे पन्नास रुपयांहून अधिक नसेल तेथे. | ३७९ | चोरीच्या संपत्तीचा मालक. |
| कारकुनाने किंवा चाकराने मालकाच्या कब्जातील संपत्तीची चोरी करणे—चोरीच्या संपत्तीचे मूल्य दोनशे पन्नास रुपयांहून अधिक नसेल तेथे. | ३८१ | चोरीच्या संपत्तीचा मालक. |
| संपत्तीचा अप्रमाणिक अपहार. .. | ४०३ | अपहार केलेल्या संपत्तीचा मालक. |
| फौजदारीपात्र न्यासभंग—संपत्तीचे मूल्य दोनशे पन्नास रुपयांहून अधिक नसेल तेथे. | ४०६ | ज्या संपत्तीबाबत न्यासभंग करण्यात आला तिचा मालक. |
| परिवाहक, मालधक्कावाला इ. नी केलेला फौजदारीपात्र न्यासभंग—संपत्तीचे मूल्य दोनशे पन्नास रुपयांहून अधिक नसेल तेथे. | ४०७ | ज्या संपत्तीबाबत न्यायसभंग करण्यात आला तिचा मालक. |
| कारकुनाने किंवा चाकराने केलेला फौजदारीपात्र न्यासभंग—संपत्तीचे मूल्य दोनशे पन्नास रुपयांहून अधिक नसेल तेथे. | ४०८ | ज्या संपत्तीबाबत न्यासभंग करण्यात आला तिचा मालक. |
| चोरीची संपत्ती ही चोरीची असल्याचे माहीत असताना ती अप्रामाणिकपणे स्वीकारणे—चोरीच्या संपत्तीचे मूल्य दोनशे पन्नास रुपयांहून अधिक नसेल तेथे. | ४११ | चोरीच्या संपत्तीचा मालक. |
| चोरीची संपत्ती ही चोरीची असल्याचे माहीत असताना ती लपवून ठेवण्याच्या किंवा तिची वासलात लावण्याच्या कामी साहाय्य करणे—चोरीच्या संपत्तीचे मूल्य दोनशे पन्नास रुपयांहून अधिक नसेल तेथे. | ४१४ | चोरीच्या संपत्तीचा मालक. |
| ठकवणूक. .. .. .. | ४१७ | ठकवणूक झालेली व्यक्ती. |
| ज्या व्यक्तीच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यास अपराधी विधितः किंवा वैध संविदेनुसार बद्ध होता त्या व्यक्तीला ठकवणे. | ४१८ | ठकवणूक झालेली व्यक्ती. |
| तोतयेगिरी करून ठकवणूक करणे. .. .. | ४१९ | ठकवणूक झालेली व्यक्ती. |
| ठकवणूक करणे आणि संपत्तीची सुपूर्दगी करण्यास अथवा मूल्यवान रोखा बनवण्यास, त्यात फेरबदल करण्यास किंवा तो नष्ट करण्यास अप्रामाणिकपणे प्रवृत्त करणे. | ४२० | ठकवणूक झालेली व्यक्ती. |
| संपत्तीची धनकोमध्ये विभागणी होण्यास प्रतिबंध करण्यासाठी ती कपटीपणाने हलवणे किंवा लपवणे. | ४२१ | त्यामुळे बाधित झालेले धनको. |
| अपराध्याला येणे असलेले ऋण किंवा रक्कम त्याच्या धनकोंना उपलब्ध होऊ देण्यास कपटीपणाने प्रतिबंध करणे. | ४२२ | त्यामुळे बाधित झालेले धनको. |
| प्रतिफलाबाबतचे खोटे कथन अंतर्भूत असलेले हस्तांतरणपत्र कपटीपणाने निष्पादित करणे. | ४२३ | त्यामुळे बाधित झालेली व्यक्ती. |
| संपत्ती कपटीपणान हलवणे किंवा लपवून ठेवणे. .. | ४२४ | त्यामुळे बाधित झालेली व्यक्ती. |
| दहा रुपये किंवा त्याहून अधिक किंमतीच्या जनावरास ठार मारून किंवा विकलांग करून आगळीक करणे. | ४२८ | जनावराचा मालक. |
| कितीही किंमतीची गुरेढोरे, इ. ना. अथवा पन्नास रुपये किंवा त्याहून अधिक किंमतीच्या जनावरास ठार मारून किंवा विकलांग करून आगळीक करणे. | ४२९ | गुरांचा किंवा जनावरांचा मालक. |
| पाटबंधाऱ्यांच्या कामाची खराबी करून किंवा गैरपणे पाण्याची दिशा बदलून आगळीक करणे—फक्त खाजगी व्यक्तीचीच हानी किंवा नुकसान झाले असेल तेव्हा. | ४३० | हानी किंवा नुकसान झालेली व्यक्ती. |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| कारावासाच्या शिक्षेस पात्र असा (चोरीहून अन्य) अपराध करण्यासाठी गृह-अतिक्रमण. | ४५१ | ज्या घरात अतिक्रमण झाले त्याचा कब्जा जिच्याकडे असेल ती व्यक्ती. |
| खोटे व्यापार-चिन्ह किंवा स्वामित्व-चिन्ह वापरणे. | ४८२ | अशा वापरामुळे हानी किंवा नुकसान झालेली व्यक्ती. |
| दुसऱ्याचे वापरले असेल तसे व्यापार-चिन्ह किंवा स्वामित्व-चिन्ह नकली तयार करणे. | ४८३ | जिच्या व्यापार-चिन्हाचे किंवा स्वामित्व-चिन्हाचे नकलीकरण झाले ती व्यक्ती. |
| नकली स्वामित्व-चिन्हाने अंकित असलेला माल जाणीवपूर्वक किंवा तो विक्रीसाठी मांडणे, किंवा विक्रीसाठी अगर निर्मितीसाठी जवळ बाळगणे. | ४८६ | जिच्या व्यापार-चिन्हाचे किंवा स्वामित्व-चिन्हाचे नकलीकरण झाले ती व्यक्ती. |
| पती किंवा पत्नी हयात असतानाच्या काळात पुन्हा विवाह करणे. | ४९४ | असा विवाह करणाऱ्या व्यक्तीचा पती किंवा पत्नी. |
| राष्ट्रपती किंवा उप राष्ट्रपती किंवा राज्याचा राज्यपाल किंवा संघ राज्यक्षेत्राचा प्रशासक किंवा एखादा मंत्री याने आपली सरकारी कार्ये पार पाडताना केलेल्या वर्तनाबाबत त्याची अब्रूनुकसानी— सरकारी अभियोक्त्याने दिलेल्या फिर्यादीवरून कार्यवाही सुरू झाली असता. | ५०० | अब्रूनुकसानी झालेली व्यक्ती. |
| स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने शब्द अगर ध्वनी उच्चारणे अथवा हावभाव करणे किंवा कोणतीही वस्तू प्रदर्शित करणे किंवा स्त्रीच्या एकांतपणाचा भंग करणे. | ५०९ | जिचा विनयभंग करण्याचा उद्देश होता किंवा जिच्या एकांतपणाचा भंग झाला ती स्त्री. |

(३) जेव्हा या कलमाखाली कोणताही अपराध आपसात मिटवण्यासारखा असेल तेव्हा, अशा अपराधास अपप्रेरणा देणे किंवा असा अपराध करण्याचा प्रयत्न करणे (जेव्हा असा प्रयत्न हाच अपराध असेल तेव्हा) हे अपराध त्याच रीतीने आपसात मिटवता येतील.

(४) (क) जी व्यक्ती या कलमाखाली अपराध मिटवण्यास अन्यथा सक्षम होऊ शकेल ती अठरा वर्षे वयाखालील असेल अथवा निर्बुद्ध किंवा वेडी असेल तेव्हा, तिच्या वतीने संविदा करण्यास सक्षम असलेल्या कोणत्याही व्यक्तीला न्यायालयाच्या परवानगीने असा अपराध आपसात मिटवता येईल.

(ख) जी व्यक्ती या कलमाखाली अपराध मिटवण्यास अन्यथा सक्षम होऊ शकेल ती व्यक्ती मरण पावल्यावर 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे अशा व्यक्तीचा जो वैध प्रतिनिधी असेल त्याला न्यायालयाच्या संमतीने अपराध आपसात मिटवता येईल.

(५) जेव्हा आरोपीला संपरीक्षा होईपावेतो हवालतीत ठेवण्यात आले असेल किंवा त्याला सिद्ध-दोष ठरवण्यात आले असून अपील प्रलंबित असेल तेव्हा, ज्याच्याकडे संपरीक्षेसाठी त्याला पाठवण्यात आले असेल किंवा, प्रकरणपरत्वे ज्याच्या पुढे अशा अपिलाची सुनावणी व्हावयाची असेल त्या न्यायालयाच्या अनुज्ञेशिवाय अपराध आपसात मिटवू दिला जाणार नाही.

(६) कलम ४०१ खालील पुनरीक्षणाच्या आपल्या शक्तींचा वापर करणारे उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय कोणत्याही व्यक्तीला, या कलमाखाली जो कोणताही अपराध आपसात मिटवण्यास अशी व्यक्ती सक्षम असेल तो मिटवण्यास मुभा देऊ शकेल.

(७) जर कोणत्याही अपराधाबद्दल आरोपी पूर्व दोषसिद्धीच्या कारणामुळे वाढीव शिक्षेस किंवा निराळ्या प्रकारच्या शिक्षेस पात्र असेल तर, असा अपराध आपसात मिटवता येणार नाही.

(८) या कलमाखाली केलेली अपराधाची मिटवणूक ही ज्याच्याबरोबर अपराध आपसात मिटवला त्या आरोपीची दोषमुक्ती झाल्यासारखीच परिणामक असेल.

(९) या कलमाद्वारे उपबंधित केलेले असेल तसे खेरीजकरून अन्यथा कोणताही अपराध आपसात मिटवता येणार नाही.

३२१. एखाद्या खटल्याची सूत्रे सोपवण्यात आलेल्या सरकारी अभियोक्त्याला किंवा सहायक सरकारी अभियोक्त्याला न्यायालयाच्या संमतीने, न्यायनिर्णय घोषित होण्यापूर्वी कोणत्याही वेळी कोणत्याही व्यक्तीवरील खटल्यातून सर्वस्वी किंवा ज्या अपराधांबद्दल त्याची संपरीक्षा केली जात असेल त्यांपैकी कोणत्याही एका किंवा अधिक अपराधांपुरते अंग काढून घेता येईल ; व याप्रमाणे अंग काढून घेतल्यावर— **खटल्यातून अंग काढून घेणे.**

(क) जर ती गोष्ट दोषारोपाची मांडणी करण्यापूर्वी केली असेल तर, आरोपीला अशा अपराधाच्या किंवा अपराधांच्याबाबत विनादोषारोप सोडले जाईल ;

(ख) जर ती गोष्ट दोषारोपाची मांडणी केल्यानंतर केली असेल किंवा या संहितेखाली कोणत्याही दोषारोपाची मांडणी करण्याची आवश्यकता नसेल तर, त्याला अशा अपराधाच्या किंवा अपराधांच्या बाबत विनादोषारोप सोडले जाईल :

परंतु, जेव्हा,—

(एक) असा अपराध संघराज्याच्या शासनशक्तीच्या व्याप्तीत येणाऱ्या बाबींसंबंधीच्या कोणत्याही कायद्याविरुद्ध असेल तेव्हा, किंवा

(दोन) 'दिल्ली विशेष पोलीस आस्थापना अधिनियम, १९४६' (१९४६ चा २५) याखाली दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेने त्याचे अन्वेषण केलेले असेल तेव्हा, किंवा

(तीन) त्यात केंद्र शासनाच्या मालकीच्या कोणत्याही संपत्तीचा अपहार किंवा नाश किंवा नुकसान अंतर्भूत असेल तेव्हा, किंवा

(चार) केंद्र शासनाच्या सेवेतील एखाद्या व्यक्तीने आपले पदीय कर्तव्य पार पाडण्याचे कार्य करताना किंवा तसे म्हणून कार्य करताना तो अपराध केलेला असेल तेव्हा,

आणि खटल्याची सूत्रे सोपवण्यात आलेल्या सरकारी अभियोक्त्याची नियुक्ती केंद्र शासनाने केलेली नसेल तर, खटल्यातून अंग काढून घेण्याला न्यायालयाच्या संमतीसाठी त्याला केंद्र शासनाने तशी परवानगी दिल्याशिवाय, विनंतीअर्ज करता येणार नाही आणि संमती देण्यापूर्वी न्यायालय, अभियोक्त्याला खटल्यातून अंग काढून घेण्यासाठी केंद्र शासनाने दिलेली परवानगी आपल्यापुढे सादर करण्याचा निदेश त्याला देईल.

दंडाधिकारी निकालात काढू शकणार नाही अशा खटल्यांमधील कार्यपद्धती.

३२२. (१) जर कोणत्याही जिल्ह्यातील दंडाधिकाऱ्यासमोर होणाऱ्या कोणत्याही अपराध चौकशीच्या किंवा संपरीक्षेच्या ओघात पुराव्यावरून त्या दंडाधिकाऱ्याला—

(क) त्या खटल्याची संपरीक्षा करण्याची किंवा तो संपरीक्षेसाठी सुपूर्द करण्याची आपणांस अधिकारिता नाही, किंवा

(ख) तो खटला जिल्ह्यातील अन्य कोणत्याही दंडाधिकाऱ्याने ज्याची संपरीक्षा करावी किंवा संपरीक्षेसाठी सुपूर्द करावा अशा प्रकारचा आहे, किंवा

(ग) त्या खटल्याची संपरीक्षा मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याने करणे योग्य आहे,

असे गृहीत धरणे समर्थनीय वाटले तर, तो कार्यवाही तहकूब करील व तो खटला, त्याचे स्वरूप स्पष्ट करणाऱ्या संक्षिप्त अहवालासह, मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याकडे किंवा मुख्य न्याय दंडाधिकारी निदेशित करील अशा अधिकारिता असलेल्या अन्य दंडाधिकाऱ्याकडे सादर करील.

(२) ज्याच्याकडे खटला सादर केलेला असेल त्या दंडाधिकाऱ्याला तशी शक्ती प्रदान झालेली असल्यास, तो स्वतः त्या खटल्याची संपरीक्षा करू शकेल किंवा आपणांस दुय्यम असलेल्या ज्या दंडाधिकाऱ्याला अधिकारिता असेल अशा कोणत्याही दंडाधिकाऱ्याकडे तो निर्देशित करू शकेल किंवा आरोपीला संपरीक्षा होईपावेतो हवालातीत ठेवू शकेल.

चौकशी किंवा संपरीक्षा सुरू झाल्यानंतर, खटला सुपूर्द करण्यायोग्य असल्याचे दंडाधिकाऱ्याला आढळून येईल तेव्हाची कार्यपद्धती.

३२३. जर दंडाधिकाऱ्यासमोरील कोणत्याही अपराध-चौकशीत किंवा संपरीक्षेत, न्यायनिर्णय स्वाक्षरित करण्यापूर्वी कार्यवाही कोणत्याही टप्प्यात असताना, दंडाधिकाऱ्याला सत्र न्यायालयाने ज्याची संपरीक्षा करावयास हवी असा तो खटला आहे असे दिसून आले तर, तो यात यापूर्वी अंतर्भूत असलेल्या उपबंधाखाली त्या न्यायालयाकडे तो खटला सुपूर्द करील [1][आणि त्यानंतर अठराव्या प्रकरणाचे उपबंध अशा रीतीने केलेल्या सुपूर्दगीला लागू होतील.]

नाणी पाडणे, मुद्रांक कायदा किंवा संपत्ती यांच्या संबंधातील अपराधां-बद्दल पूर्वी दोषसिद्धी झालेल्या व्यक्तींची संपरीक्षा.

३२४. (१) जेथे एखाद्या व्यक्तीला 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) प्रकरण १२ वे किंवा प्रकरण १७वे याखाली तीन वर्षे किंवा त्याहून अधिक मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल सिद्धदोष ठरवलेले असून, त्यापैकी कोणत्याही प्रकरणाखाली तीन वर्षे किंवा त्याहून अधिक मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असा कोणत्याही अपराधाबद्दल तिच्यावर पुन्हा आरोप ठेवलेला असेल व अशा व्यक्तीने तो अपराध केलेला आहे असे गृहीत धरण्यास आधारकारण आहे अशी, ज्या दंडाधिकाऱ्यापुढे तो खटला प्रलंबित असेल त्याची खात्री होईल त्या बाबतीत, आरोपीला मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याकडे संपरीक्षेसाठी पाठवले जाईल किंवा सत्र न्यायालयाकडे सुपूर्द केले जाईल—मात्र प्रथमोक्त दंडाधिकारी त्या खटल्याची संपरीक्षा करण्यास सक्षम असेल व आरोपी सिद्धदोष ठरल्यास त्याला पुरेशी शिक्षा देणे आपणांस शक्य आहे असे त्याचे मत असेल तर गोष्ट वेगळी.

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम २६ द्वारे समाविष्ट केले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

(२) जेव्हा कोणत्याही व्यक्तीला पोटकलम (१) खाली मुख्य न्याय दंडाधिकाऱ्यांकडे संपरीक्षेसाठी पाठविलेले असेल किंवा सत्र न्यायालयाकडे सुपूर्द केलेले असेल तेव्हा, त्याच चौकशीत किंवा संपरीक्षेत त्याचबरोबर संयुक्तपणे आरोप ठेवण्यात आलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीला दंडाधिकाऱ्याने कलम २३९ किंवा, प्रकरणपरत्वे, कलम २४५ खाली विनादोषारोप सोडले नाही तर एरव्ही, अशा अन्य व्यक्तीलाही त्याचप्रमाणे पाठवले किंवा सुपूर्द केले जाईल.

**पुरेशी कडक शिक्षा देणे दंडाधिकाऱ्याला शक्य नसेल तेव्हाची कार्यपद्धती.**

३२५. (१) जेव्हा केव्हा फिर्यादीपक्षाचा व आरोपीचा साक्षीपुरावा ऐकल्यानंतर, आरोपी दोषी आहे, व जी शिक्षा, देण्याची आपणांस शक्ती आहे त्याहून निराळ्या प्रकारची किंवा त्याहून कडक शिक्षा आरोपीला मिळावयास पाहिजे असे दंडाधिकाऱ्याचे मत होईल किंवा तो द्वितीय वर्ग दंडाधिकारी असल्यास, कलम १०६ खाली आरोपीला बंधपत्र करून देण्यास फर्मावले पाहिजे असे त्या दंडाधिकाऱ्याचे मत होईल तेव्हा, तो आपले मत नमूद करू शकेल आणि तो ज्याला दुय्यम असेल त्या मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याकडे आपल्याकडील कार्यवाही सादर करून आरोपीला त्याच्याकडे पाठवू शकेल.

(२) जेव्हा एकाहून अधिक आरोपींची एकत्रितपणे संपरीक्षा होत असेल व अशा आरोपींपैकी कोणाच्याही बाबत पोटकलम (१) खाली कार्यवाही करणे दंडाधिकाऱ्याला जरुरीचे वाटेल तेव्हा, जे त्याच्या मते दोषी असतील अशा सर्व आरोपींना तो मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याकडे पाठवील.

(३) ज्याच्याकडे कार्यवाही सादर केलेली असेल तो मुख्य न्याय दंडाधिकारी, स्वत:ला योग्य वाटले तर, पक्षकारांची तपासणी करू शकेल व ज्या कोणत्याही साक्षीदाराने आधीच साक्षी दिली असेल त्याला पुन्हा बोलावून तपासणी करू शकेल आणि कोणताही आणखी साक्षी पुरावा मागवू व घेऊ शकेल, व त्या खटल्यात स्वत:ला योग्य वाटेल तसा व कायद्यानुसार असेल असा न्यायनिर्णय, शिक्षादेश किंवा आदेश देईल.

**अंशत: एका दंडाधिकाऱ्याने व अंशत: दुसऱ्याने नोंदवलेल्या पुराव्यावरून दोषसिद्धी किंवा सुपूर्दगी.**

३२६. (१) जेव्हा केव्हा एखाद्या चौकशीत किंवा संपरीक्षेत संपूर्ण साक्षीपुरावा किंवा त्याचा कोणताही भाग ऐकून तो नोंदवल्यानंतर एखादा [१][न्यायाधीश किंवा दंडाधिकारी] तीसंबंधीच्या अधिकारितेचा वापर करण्याचा थांबला असून, त्याच्या जागी दुसरा [१][न्यायाधीश किंवा दंडाधिकारी] आला असेल आणि त्याला अशी अधिकारिता असून तो तिचा वापर करत असेल तेव्हा, अशा अनुवर्ती [१][न्यायाधीशाला किंवा दंडाधिकाऱ्याला] आपल्या पूर्वाधिकाऱ्याने याप्रमाणे नोंदवलेल्या साक्षीपुराव्यावरून अथवा अंशत: त्या पूर्वाधिकाऱ्याने व अंशत: आपण नोंदवलेल्या साक्षीपुराव्यावरून कार्यवाही करता येईल :

परंतु, ज्यांची साक्ष आधीच नोंदवण्यात आली आहे त्या साक्षीदारांपैकी कोणाचीही आणखी तपासणी होणे न्यायाहितार्थ जरुरीचे आहे असे अनुवर्ती [१][न्यायाधीशाचे किंवा दंडाधिकाऱ्याचे] मत असेल तर, तो अशा कोणत्याही साक्षीदाराला पुन्हा समन्स काढू शकेल आणि तो ज्यासाठी परवानगी देईल अशी आणखी कोणतीही तपासणी, उलटतपासणी व फेरतपासणी झाल्यास त्यानंतर साक्षीदाराला जाऊ दिले जाईल.

(२) जेव्हा या संहितेच्या उपबंधाखाली एखादा खटला [२][एका न्यायाधीशाकडून दुसऱ्या न्यायाधीशाकडे किंवा एका दंडाधिकाऱ्याकडून दुसऱ्या दंडाधिकाऱ्याकडे] वर्ग केला जाईल तेव्हा, पोटकलम (१) मध्ये अभिप्रेत असल्याप्रमाणे, पहिल्या दंडाधिकाऱ्याचा त्यासंबंधीच्या अधिकारितेचा वापर थांबला असून दुसरा त्याचा उत्तराधिकारी झाला आहे असे मानले जाईल.

(३) या कलमातील कोणतीही गोष्ट संक्षिप्त संपरीक्षांना अथवा ज्या खटल्यांतील कार्यवाही कलम ३२२ खाली तहकूब करण्यात आली असेल किंवा ज्यांतील कार्यवाही कलम ३२५ खाली वरिष्ठ दंडाधिकाऱ्याकडे सादर केली असेल त्या खटल्यांना लागू असणार नाही.

**न्यायालय खुले असणे.**

३२७. [३][(१)] ज्या स्थळी कोणत्याही अपराधाची चौकशी किंवा संपरीक्षा करण्याकरता कोणतेही फौजदारी न्यायालय भरवण्यात आलेले असेल ते स्थळ खुले न्यायालय असल्याचे मानले जाईल व त्यात जितके लोक सोईस्करपणे मावू शकतील तितक्या प्रमाणात आम जनतेला तेथे प्रवेश असेल :

परंतु, कोणत्याही विशिष्ट खटल्याची कोणतीही चौकशी किंवा संपरीक्षा कोणत्याही टप्प्यात असताना, पीठासीन न्यायाधीश किंवा दंडाधिकारी, स्वत:ला योग्य वाटल्यास, न्यायालयाच्या वापरात असलेल्या खोलीत किंवा इमारतीत आम जनतेला किंवा एखाद्या विशिष्ट व्यक्तीला प्रवेश मिळणार नाही अथवा त्या व्यक्ती तेथे उपस्थित राहू शकणार नाहीत किंवा थांबू शकणार नाहीत असा आदेश देऊ शकेल.

[३][(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी 'भारतीय दंड संहिते' चे कलम ३७६ याखालील बलात्कार अगर कलम ३७६क, कलम ३७६ख, कलम ३७६ग किंवा कलम ३७६घ याखालील एखादा अपराध यासंबंधीची चौकशी व संपरीक्षा कक्षांतर्गत चालवली जाईल :

---

१. १९७८चा अधिनियम ४५, कलम २७ द्वारे 'दंडाधिकारी' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २७ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

३. १९८३ चा अधिनियम ४३, कलम ४ द्वारे कलम ३२७ ला त्या कलमाचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक दिला व त्या पोटकलमानंतर उपर्युक्त पोटकलमे समाविष्ट केली (२५ डिसेंबर, १९८३ रोजी व तेव्हापासून).

परंतु, पीठासीन न्यायाधीश स्वत:ला योग्य वाटल्यास किंवा दोन्हीपैकी कोणत्याही पक्षाने तसा अर्ज केल्यास, एखाद्या विशिष्ट व्यक्तीला न्यायालयाच्या वापरात असलेल्या खोलीत किंवा इमारतीत येण्यास किंवा तेथे उपस्थित राहण्यास किंवा थांबण्यास परवानगी देऊ शकेल.

(३) जेव्हा पोटकलम (२) खाली कोणतीही कार्यवाही चालू असेल तेव्हा, न्यायालयाच्या पूर्व-परवानगीवाचून अशा कार्यवाहीच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीने काहीही मजकूर छापणे किंवा प्रकाशित करणे हे कायदेशीर ठरणार नाही.]

## प्रकरण पंचवीस

## मनोविकल आरोपी व्यक्तींबाबतचे उपबंध

वेडा असलेल्या आरोपीच्या बाबतीतील कार्यपद्धती. ३२८. (१) जेव्हा एखादी चौकशी करणाऱ्या दंडाधिकाऱ्यासह, ज्या व्यक्तीविरुद्ध चौकशी चालवण्यात येते ती मनोविकल आहे आणि त्यामुळे आपला बचाव करण्यास अक्षम आहे असे सकारण वाटत असेल तेव्हा, दंडाधिकारी अशा मनोविकलतेच्या वस्तुस्थितीबाबत चौकशी करील व जिल्ह्याच्या जिल्हा शल्यचिकित्साकरवी किंवा राज्य शासन निदेशित करील अशा अन्य वैद्यकीय अधिकाऱ्याकरवी अशा व्यक्तीची तपासणी करवून घेईल, आणि तद्नंतर अशा शल्यचिकित्सकाची किंवा अन्य अधिकाऱ्याची साक्षीदार म्हणून साक्षतपासणी करील, व ती साक्षतपासणी तो लेखनिविष्ट करील.

(२) अशी तपासणी व चौकशी होईपावेतो दंडाधिकाऱ्यास अशा व्यक्तीबाबत कलम ३३० च्या उपबंधानुसार कार्यवाही करता येईल.

(३) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली व्यक्ती मनोविकल आहे आणि त्यामुळे आपला बचाव करण्यास अक्षम आहे असे अशा दंडाधिकाऱ्याचे मत असेल तर, तो तशा आशयाचा निष्कर्ष नमूद करील आणि त्या खटल्यातील त्यानंतरचे कामकाज लांबणीवर टाकील.

न्यायालयासमोर संपरीक्षा केल्या जाणाऱ्या मनोविकल व्यक्तीच्या बाबतीतील कार्यपद्धती. ३२९. (१) दंडाधिकाऱ्यासमोर किंवा सत्र न्यायालयासमोर कोणत्याही व्यक्तीची संपरीक्षा चालू असताना जर, अशी व्यक्ती मनोविकल आहे व त्यामुळे आपला बचाव करण्यास अक्षम आहे असे दंडाधिकाऱ्याला किंवा न्यायालयाला वाटले तर, तो दंडाधिकारी किंवा ते न्यायालय प्रथमत: अशा विकलतेच्या किंवा अक्षमतेच्या तथ्याबाबत संपरीक्षा करील आणि आपणासमोर हजर केला जाईल असा वैद्यकीय किंवा अन्य पुरावा विचारात घेतल्यानंतर, त्या तथ्याबाबत आपली खात्री झाली तर, तो दंडाधिकारी किंवा ते न्यायालय तशा आशयाचा निष्कर्ष नमूद करील व त्या खटल्यातील पुढील कामकाज लांबणीवर टाकील.

(२) आरोपीची मनोविकलता व अक्षमता या तथ्याची संपरीक्षा दंडाधिकाऱ्यासमोर किंवा न्यायालयासमोर होणाऱ्या त्याच्या संपरीक्षेचा भाग असल्याचे मानले जाईल.

अन्वेषण किंवा संपरीक्षा होईपोवतो वेड्याची सुटका. ३३०. (१) जेव्हा केव्हा कलम ३२८ किंवा कलम ३२९ खाली, एखादी व्यक्ती मनोविकल असल्याचे आणि आपला बचाव करण्यास अक्षम असल्याचे आढळून येईल तेव्हा, दंडाधिकारी किंवा प्रकरणपरत्वे, न्यायालय,—मग तो खटला ज्यात जामीन घेता येतो अशा प्रकारचा असो वा नसो—त्या व्यक्तीची यथायोग्य काळजी घेतली जावी व स्वत:ला किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला इजा पोचवण्यास तिला प्रतिबंध व्हावा यासाठी आणि दंडाधिकाऱ्यासमोर किंवा न्यायालयासमोर अथवा दंडाधिकारी किंवा न्यायालय या संबंधात नियुक्त करील अशा अधिकाऱ्यासमोर आवश्यक असेल तेव्हा तिने उपस्थित व्हावे यासाठी पुरेसा जामीन देण्यात आल्यावर तिला सोडून देईल.

(२) दंडाधिकाऱ्याच्या किंवा न्यायालयाच्या मते ज्यात जामीन घेण्यात येऊ नये अशा प्रकारचा तो खटला असेल तर, अथवा पुरेसा जामीन देण्यात आला नसेल तर, दंडाधिकारी किंवा, प्रकरणपरत्वे न्यायालय त्यास योग्य वाटेल अशा स्थळी व अशा रीतीने आरोपीस सुरक्षित हवालातीत स्थानबद्ध करण्याचा आदेश देईल, आणि केलेली कारवाई राज्य शासनाला कळवील :

परंतु, आरोपीला पागलखान्यात अडकवून ठेवण्याचा आदेश 'भारताचा वेडाबाबत अधिनियम, १९१२' (१९१२ चा ४) याखाली राज्य शासनाने केलेले असतील अशा नियमांना अनुसरल्याशिवाय अन्यथा देण्यात येणार नाही.

चौकशी किंवा संपरीक्षा पुन्हा सुरू करणे. ३३१. (१) जेव्हा केव्हा कलम ३२८ किंवा कलम ३२९ खाली चौकशी किंवा संपरीक्षा लांबणीवर टाकण्यात येईल तेव्हा, दंडाधिकाऱ्यास किंवा, प्रकरणपरत्वे, न्यायालयास, संबंधित व्यक्ती मनोविकल असण्याचे बंद झाल्यानंतर कोणत्याही वेळी चौकशी किंवा संपरीक्षा पुन्हा सुरू करता येईल, आणि अशा दंडाधिकाऱ्यासमोर किंवा न्यायालयासमोर आरोपीने उपस्थित व्हावे किंवा त्यास आणावे असे फर्मावता येईल.

(२) जेव्हा कलम ३३० खाली आरोपीस सोडून देण्यात आले असेल आणि त्याच्या उपस्थितीबद्दलचे जामीनदार त्याला दंडाधिकारी किंवा न्यायालय यासंबंधात नियुक्त करील अशा अधिकाऱ्याकडे हजर करतील तेव्हा, आरोपी स्वत:चा बचाव करण्यास क्षम आहे असे अशा अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र पुराव्यात स्वीकारण्याजोगे असेल.

३३२. (१) आरोपी दंडाधिकाऱ्यासमोर किंवा न्यायालयासमोर उपस्थित झाल्यावर अथवा आरोपीला आपल्या समोर आणल्यावर दंडाधिकाऱ्यास किंवा न्यायालयास, तो स्वतःचा बचाव करण्यास क्षम आहे असे वाटले तर, चौकशी किंवा संपरीक्षा पुढे चालू होईल. आरोपी दंडाधिकाऱ्यासमोर किंवा न्यायालयासमोर उपस्थित झाल्यावरची कार्यपद्धती.

(२) आरोपी स्वतःचा बचाव करण्यास अजूनही अक्षम आहे असे दंडाधिकाऱ्यास किंवा न्यायालयास वाटले तर, दंडाधिकारी किंवा न्यायालय कलम ३२८ किंवा, प्रकरणपरत्वे, कलम ३२९ च्या उपबंधानुसार कृती करील आणि जर आरोपी मनोविकल व त्यामुळे स्वतःचा बचाव करण्यास अक्षम असल्याचे आढळून आले तर, कलम ३३० च्या उपबंधानुसार अशा आरोपीबाबत कार्यवाही करील.

३३३. जेव्हा चौकशीच्या किंवा संपरीक्षेच्या वेळी आरोपी निकोप मनाचा असल्याचे दिसून येईल, आणि आरोपीने केलेले कृत्य ते करतेवेळी तो निकोप मनाचा असता तर अपराध ठरले असते आणि कृत्य घडले त्यावेळी तो त्या कृत्याचे स्वरूप काय आहे किंवा ते गैर आहे किंवा कायद्याच्या विरोधी कृत्य आहे हे जाणण्यास मनोविकलतेमुळे अक्षम होता असे समजण्यास कारण आहे याबद्दल, आपणासमोर देण्यात आलेल्या साक्षीपुराव्यावरून दंडाधिकाऱ्यांची खात्री होईल तेव्हा, दंडाधिकारी खटला पुढे चालू करील आणि, सत्र न्यायालयाने आरोपीची संपरीक्षा करणे योग्य असेल तर, त्याला संपरीक्षेसाठी सत्र न्यायालयाकडे सुपूर्द करील. आरोपी निकोप मनाचा असल्याचे दिसून येईल तेव्हा.

३३४. कोणत्याही व्यक्तीने ज्यावेळी अपराध केल्याचे अभिकथन करण्यात आले असेल त्यावेळी ती ज्या कृत्याने अपराध घडला असल्याचे अभिकथन झाले असेल त्यांचे स्वरूप काय आहे अथवा ते कृत्य गैर किंवा कायद्याच्या विरोधी आहे हे जाणण्यास मनोविकलतेमुळे अक्षम होती या कारणावरून त्या व्यक्तीस दोषमुक्त करण्यात येईल तेव्हा, त्याने ते कृत्य केले किंवा नाही याबाबतचा निष्कर्ष स्पष्टपणे नमूद केला जाईल. मनोविकलतेच्या कारणावरून दोषमुक्तीचा न्यायनिर्णय.

३३५. (१) आरोपी व्यक्तीने अभिकथित कृत्य केलेले आहे असा निष्कर्ष नमूद केला जाईल तेव्हा, ज्याच्यासमोर संपरीक्षा झाली असेल तो दंडाधिकारी किंवा ते न्यायालय, असे कृत्य अक्षमता आढळून आली नसती तर अपराध ठरले असते अशा स्वरूपाचे असेल तर,— अशा कारणावरून दोषमुक्त केलेल्या व्यक्तीला सुरक्षित हवालातीत स्थानबद्ध करणे.

(क) दंडाधिकाऱ्याला किंवा न्यायालयाला योग्य वाटेल अशा स्थळी व अशा रीतीने त्या व्यक्तीला सुरक्षित हवालातीत स्थानबद्ध करण्याचा आदेश देईल; किंवा

(ख) अशा व्यक्तीला तिच्या एखाद्या नातलगाच्या किंवा मित्राच्या स्वाधीन करण्याचा आदेश देईल.

(२) आरोपीला पागलखान्यात अडकवून ठेवण्याचा आदेश, 'भारताचा वेडाबाबत अधिनियम, १९१२' (१९१२ चा ४) याखाली राज्य शासनाने केलेले असतील अशा नियमांना अनुसरल्याशिवाय अन्यथा देण्यात येणार नाही.

(३) पोटकलम (१) च्या खंड (ख) खाली आरोपीला नातलगाच्या किंवा मित्राच्या हवाली करण्याचा आदेश द्यावयाचा असल्यास अशा नातलगाने किंवा मित्राने अर्ज केल्याखेरीज आणि,—

(क) हवाली केल्या जाणाऱ्या व्यक्तीची यथायोग्य काळजी घेतली जावी आणि स्वतःला किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला इजा पोचवण्यास तिला प्रतिबंध व्हावा यासाठी;

(ख) राज्य शासन निदेशित करील त्या अधिकाऱ्यासमोर आणि त्या त्या वेळी व स्थळी निरीक्षणासाठी तिला हजर केले जावे यासाठी;

दंडाधिकाऱ्याला किंवा न्यायालयाला समाधानकारक वाटेल असा जामीन त्याने दिल्याखेरीज असा कोणताही आदेश दिला जाणार नाही.

(४) दंडाधिकारी किंवा न्यायालय पोटकलम (१) खाली केलेली कारवाई राज्य शासनाला कळवील.

३३६. कलम ३३० किंवा कलम ३३५ च्या उपबंधाखाली एखाद्या व्यक्तीला ज्या तुरुंगात बंदिवान करण्यात आले असेल त्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला राज्य शासन 'कारागृह महानिरीक्षक' याची कलम ३३७ किंवा कलम ३३८ खालील सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही कार्य पार पाडण्याची शक्ती प्रदान करू शकेल. अंमलदार अधिकाऱ्याला कार्ये पार पाडण्याची शक्ती प्रदान करण्याची राज्य शासनाची शक्ती.

३३७. जर अशा व्यक्तीला कलम ३३० च्या पोटकलम (२) च्या उपबंधाखाली अडकवून ठेवलेले असेल आणि तुरुंगात अडकवलेल्या व्यक्तीच्या बाबतीत कारागृह महानिरीक्षकाने किंवा पागलखान्यात अडकवलेल्या व्यक्तीच्या बाबतीत अशा पागलखान्याच्या वीक्षकांनी किंवा त्यांच्यापैकी कोणाही दोघा वीक्षकांनी आपल्या मते अशी व्यक्ती स्वतःचा बचाव करण्यास क्षम आहे असे प्रमाणित केले तर दंडाधिकारी किंवा न्यायालय नियत करील अशा वेळी तिला दंडाधिकाऱ्यासमोर किंवा प्रकरणपरत्वे न्यायालयासमोर नेले जाईल, आणि दंडाधिकारी किंवा न्यायालय अशा व्यक्तीबाबत कलम ३३२ च्या उपबंधाखाली कार्यवाही करील; आणि अशा महानिरीक्षकाचे किंवा वीक्षकांचे पूर्वोक्त प्रमाणपत्र पुराव्यात स्वीकारण्याजोगे असेल. वेडा कैदी आपला बचाव करण्यास क्षम असल्याचे घोषित करण्यात आले असेल त्या बाबतीतील कार्यपद्धती.

अडकवून ठेवलेली वेडी व्यक्ती सोडून देण्यायोग्यअसल्याचे ठरविण्यात आले असेल त्या बाबतीतील कार्यपद्धती.

३३८. (१) जर अशा व्यक्तीला कलम ३३० च्या पोटकलम (२) खाली किंवा कलम ३३५ खाली अडकून ठेवलेले असेल, आणि महानिरीक्षकांनी किंवा वीक्षकांनी आपल्या मते त्या व्यक्तीला सोडून दिल्याने ती व्यक्ती स्वतःला किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला इजा पोचवील असा धोका नाही असे प्रमाणित केले तर, त्यावरून राज्य शासन तिला सोडून देण्याचा किंवा हवालतीत अडकवून ठेवण्याचा किंवा आधीच तिला सार्वजनिक पागलखान्यात पाठवले नसल्यास, अशा पागलखान्यात पाठवून देण्याचा आदेश देऊ शकेल; आणि तिला एखाद्या पागलखान्यात पाठवून देण्याचा त्याने आदेश दिल्यास ते एक न्यायिक व दोन वैद्यकीय अशा अधिकाऱ्यांनी बनलेल्या एखाद्या आयोगाची नियुक्ती करू शकेल.

(२) असा आयोग अशा व्यक्तीच्या मानसिक अवस्थेबाबत रीतसर चौकशी करील, जरूर तो साक्षीपुरावा घेईल, आणि राज्य शासनाला अहवाल देईल व मग ते शासन स्वतःला योग्य वाटेल त्याप्रमाणे त्या व्यक्तीला सोडून देण्याचा किंवा अडकवून ठेवण्याचा आदेश देऊ शकेल.

वेड्या व्यक्तीला नातलगाच्या किंवा मित्राच्या हवाली करणे.

३३९. (१) जेव्हा केव्हा कलम ३३० च्या किंवा कलम ३३५ च्या उपबंधाखाली अडकवून ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीचा एखादा नातलग किंवा मित्र, तिला आपल्या हवाली करण्यात यावे अशी इच्छा प्रदर्शित करील. तेव्हा, राज्य शासन अशा नातलगाने किंवा मित्राने तसा अर्ज केल्यावर आणि,—

(क) हवाली केल्या जाणाऱ्या व्यक्तीची यथायोग्य काळजी घेतली जावी आणि स्वतःला किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला इजा पोचवण्यास प्रतिबंध व्हावा यासाठी;

(ख) राज्य शासन निदेशित करील त्या अधिकाऱ्यासमोर आणि त्या त्या वेळी व स्थळी, निरीक्षणासाठी तिला हजर केले जावे यासाठी;

(ग) एखाद्या व्यक्तीला कलम ३३० च्या पोटकलम (२) खाली अडकवून ठेवले असल्यास आवश्यक तेव्हा अशा दंडाधिकाऱ्यासमोर किंवा न्यायालयासमोर तिला हजर केले जावे यासाठी; अशा राज्य शासनाला समाधानकारक वाटेल असा जामीन त्याने दिल्यावर, अशा व्यक्तीला अशा नातलगाच्या किंवा मित्रांच्या हवाली केले जावे असा आदेश देईल.

(२) याप्रमाणे हवाली केलेल्या व्यक्तीवर एखाद्या अपराधाचा आरोप असून ती मनोविकल असल्यामुळे व स्वतःचा बचाव करण्यास अक्षम असल्यामुळे त्या अपराधाची संपरीक्षा लांबणीवर टाकण्यात आली असेल आणि पोटकलम (१) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या निरीक्षक अधिकाऱ्याने, अशी व्यक्ती स्वततःचा बचाव करण्यास अक्षम आहे असे प्रमाणित करून केव्हाही दंडाधिकाऱ्याला किंवा न्यायालयाला कळवले, तर, असा दंडाधिकारी किंवा न्यायालय अशा आरोपी व्यक्तीला ज्या नातलगाच्या किंवा मित्रांच्या हवाली करण्यात आले असेल त्याने त्या व्यक्तीला दंडाधिकाऱ्यासमोर किंवा न्यायालयासमोर हजर करावे असे फर्मावील; आणि याप्रमाणे तिला हजर करण्यात आल्यावर, न्यायालय कलम ३३२ च्या उपबंधानुसार कार्यवाही करील, आणि निरीक्षक अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र पुराव्यात स्वीकारण्याजोगे असेल.

## प्रकरण सव्वीस

## न्यायदानाच्या कामावर परिणाम करणाऱ्या अपराधांबाबतचे उपबंध

कलम१९५ मध्ये उल्लेखिलेल्या प्रकरणांतील कार्यपद्धती.

३४०. (१) एखाद्या न्यायालयातील कार्यवाहीमध्ये किंवा तिच्या संबंधात अथवा त्या न्यायालयातील कार्यवाहीमध्ये पुराव्यात हजर केलेल्या किंवा दिलेल्या दस्तऐवजाबाबत जो कोणताही अपराध घडला असल्याचे दिसत असेल अशा, कलम १९५-पोटकलम (१) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अपराधाबाबत चौकशी करणे हे न्यायहितार्थ समयोचित आहे असे, या संबंधात किंवा अन्यथा त्या न्यायालयाकडे आलेल्या अर्जावरून त्यांचे मत झाले तर, असे न्यायालय स्वतःला जरूर वाटल्यास व जरूर वाटेल तशी प्रारंभिक चौकशी केल्यानंतर,—

(क) तशा आशयाचा निष्कर्ष नमूद करू शकेल ;

(ख) त्याबाबत लेखी फिर्याद देऊ शकेल ;

(ग) अधिकारिता असलेल्या प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याकडे ती पाठवू शकेल ;

(घ) आरोपीने दंडाधिकाऱ्यासमोर उपस्थित व्हावे यासाठी पुरेसा जामीन घेऊ शकेल अथवा अभिकथित अपराध बिनजामिनी असून न्यायालयाला तसे जरुरीचे वाटल्यास, आरोपीला बंदोबस्तात अशा दंडाधिकाऱ्याकडे पाठवू शकेल; आणि

(ङ) कोणत्याही व्यक्तीला अशा दंडाधिकाऱ्यासमोर उपस्थित होऊन साक्ष देण्यासाठी बांधून घेऊ शकेल.

(२) जेथे एखाद्या न्यायालयाने एखाद्या अपराधाबाबत पोटकलम (१) खाली फिर्याद दिलेली नसेल किंवा अशी फिर्याद दिली जावी म्हणून केलेला अर्ज नाकारलेलाही नसेल अशा कोणत्याही बाबतीत त्या अपराधाबाबत पोटकलम (१) द्वारे त्या न्यायालयाला प्रदान केलेली शक्ती ही ज्या न्यायालयाला असे पूर्वोक्त न्यायालय कलम १९५ च्या पोटकलम (४) च्या अर्थानुसार दुय्यम असेल त्या न्यायालयाला वापरता येईल.

(३) या कलमाखाली दिलेल्या फिर्यादीवर,—

(क) फिर्याद देणारे न्यायालय हे उच्च न्यायालय असेल तर, ते न्यायालय नियुक्त करील असा अधिकारी;

(ख) अन्य कोणत्याही बाबतीत, न्यायालयाचा पीठासीन अधिकारी स्वाक्षरी करील.

(४) या कलमात, "न्यायालय" या संज्ञेस कलम १९५ मध्ये असलेलाच अर्थ आहे.

३४१. (१) ज्या व्यक्तीच्या अजवानाच्या उच्च न्यायालयाहून अन्य कोणत्याही न्यायालयाने कलम ३४० च्या पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली फिर्याद देण्यास नकार दिला असेल अथवा अशा न्यायालयाने जिच्याविरुद्ध अशी फिर्याद दिली असेल अशा कोणत्याही व्यक्तीला असे पूर्वोक्त न्यायालय कलम १९५-पोटकलम (४) च्या अर्थानुसार ज्या न्यायालयाला दुय्यम असेल त्याच्याकडे अपील करता येईल, आणि तदनंतर संबंधित पक्षांना नोटीस देऊन, ते वरिष्ठ न्यायालय फिर्याद मागे घेण्याचा अथवा प्रकरणपरत्वे, कलम ३४० खाली असे पूर्वोक्त न्यायालय जी फिर्याद देऊ शकले असते ती देण्याचा निदेश देऊ शकेल, आणि जर त्याने अशी फिर्याद दिली तर, त्या कलमाचे उपबंध तदनुसार लागू होतील.

अपील.

(२) या कलमाखालील आदेश, आणि अशा कोणत्याही आदेशाच्या अधीनतेने, कलम ३४० अलील आदेश अंतिम असतील, पुनरीक्षणास पात्र असणार नाहीत.

३४२. कलम ३४० खाली फिर्याद दाखल करण्यासाठी आपणांकडे करण्यात आलेला अर्ज किंवा कलम ३४१ खालील अपील ऐकणारे कोणतेही न्यायालय वादखर्चाबाबत न्याय्य असेल असा आदेश देऊ शकेल.

वाद खर्चाचा आदेश देण्याची शक्ती.

३४३. (१) कलम ३४० किंवा कलम ३४१ खाली ज्याच्याकडे फिर्याद देण्यात आली असेल तो दखल घेणाऱ्या दंडाधिकारी, पंधरव्या प्रकरणात काहीही अंतर्भूत असले तरी, शक्य होईल तेथवर, ती फिर्याद जणू काही पोलीस दंडाधिकाऱ्याची अहवालावरून दाखल करण्यात आलेली असावी त्याप्रमाणे त्या प्रकरणाचा परामर्श घेण्यास सुरुवात करील.

कार्यपद्धती.

(२) ज्या न्यायिक कार्यवाहीतून ती बाब उद्भवलेली आहे तिच्यात झालेल्या निर्णयाविरुद्ध केलेले अपील प्रलंबित आहे असे अशा दंडाधिकाऱ्याच्या किंवा ज्याच्याकडे तो खटला वर्ग करण्यात आला असेल अशा अन्य कोणत्याही दंडाधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून दिले जाईल त्याबाबतीत, तो, स्वतःला योग्य वाटल्यास, खटला कोणत्याही टप्प्यात असताना, त्याची सुनावणी अशा अपिलाचा निर्णय होईपर्यंत तहकूब करू शकेल.

३४४. (१) जर कोणताही न्याय निर्णय देतेवेळी किंवा कोणतीही न्यायिक कार्यवाही निकालात काढणारा कोणताही अंतिम आदेश देतेवेळी सत्र न्यायालयाने किंवा प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याने अशा आशयाचे मत व्यक्त केले की, अशा कार्यवाहीत उपस्थित झालेल्या एखाद्या साक्षीदाराने समजूनसवरून किंवा बुद्धिपुरःसर खोटा साक्षीपुरावा दिलेला आहे अथवा अशा कार्यवाहीत वापरला जावा अशा उद्देशाने खोटा साक्षीपुरावा तयार केलेला आहे तर, खोटा साक्षीपुरावा दिल्याबद्दल किंवा, प्रकरणपरत्वे, तयार केल्याबद्दल त्या साक्षीदाराची संक्षिप्त संपरीक्षा करणे हे न्यायहितार्थ जरुरीचे व समयोचित आहे अशी स्वतःची खात्री झाल्यास, ते न्यायालय किंवा तो दंडाधिकारी त्या अपराधाची दखल घेऊ शकेल आणि, अशा अपराधाबद्दल अपराध्याला शिक्षा का होऊ नये याचे कारण दाखवण्याची त्याला वाजवी संधी दिल्यानंतर अशा अपराध्याची संक्षिप्त संपरीक्षा करू शकेल आणि त्याला तीन महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास, किंवा पाचशे रुपयापर्यंत असू शकेल इतका द्रव्यदंड, किंवा दोन्ही शिक्षा ठोठावू शकेल.

खोटा साक्षीपुरावा देणाऱ्या अपराधाबद्दलच्या संपरीक्षेसाठी संक्षिप्त कार्यपद्धती.

(२) अशा प्रत्येक खटल्यात, न्यायालय संक्षिप्त संपरीक्षांसाठी विहित केलेल्या प्रक्रियेस शक्यतितकी जवळची प्रक्रिया अनुसरील.

(३) न्यायालय या कलमाखाली कार्यवाही करण्याचा निर्णय घेत नाही त्याबाबतीत, त्या अपराधांबद्दल कलम ३४० खाली फिर्याद देण्याच्या त्याच्या शक्तीवर या कलमातील कोणतीही गोष्ट परिणाम करणार नाही.

(४) पोटकलम (१) खाली कोणतीही कारवाई सुरू केल्यानंतर जेव्हा, त्या पोटकलमात निर्दिष्ट केलेले मत ज्या न्यायनिर्णयात किंवा आदेशात व्यक्त केलेले असेल त्याविरुद्ध अपील किंवा पुनरीक्षणअर्ज सादर किंवा दाखल केलेला आहे असे त्या सत्र न्यायालयाला किंवा प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याला दाखवून देण्यात येईल तेव्हा, त्याला संपरीक्षेचे पुढील कामकाज, अपिलाचा किंवा प्रकरणपरत्वे, पुनरीक्षण अर्जाचा निकाल होईपर्यंत तहकूब करता येईल, आणि तदनंतर संपरीक्षेचे पुढील कामकाज अपिलाच्या किंवा पुनरीक्षण-अर्जाच्या निकालानुसार चालेल.

३४५. (१) जेव्हा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) कलम १७५, कलम १७८, कलम १७९, कलम १८० किंवा कलम २२८ यांमध्ये वर्णन केलेला असा कोणताही अपराध कोणत्याही दिवाणी, फौजदारी किंवा महसूल न्यायालयाच्या नजरेस पडेल अशा प्रकारे किंवा समक्ष घडला असेल तेव्हा, ते न्यायालय अपराध्याला हवालातीत स्थानबद्ध करवू शकेल आणि त्याच दिवशी न्यायालय उठण्यापूर्वी कोणत्याही वेळी अपराधाची दखल घेऊ शकेल आणि, अपराध्याला या कलमाखाली शिक्षा का होऊ नये

अवमानाच्या विवक्षित प्रकरणातील कार्यपद्धती.

याचे कारण दाखविण्याची त्याला वाजवी संधी दिल्यानंतर, त्याला जास्तीत जास्त दोनशे रुपये इतका द्रव्यदंड, व द्रव्यदंड न भरल्यास, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा ठोठावू शकेल मात्र तत्पूर्वी असा द्रव्यदंड भरण्यात आला तर गोष्ट वेगळी.

(२) अशा प्रत्येक खटल्यात न्यायालय अपराधाची घटकतथ्ये व त्यांसोबत, अपराध्याने काही कथन केले असल्यास ते, तसेच निष्कर्ष व शिक्षादेश नमूद करील.

(३) जर 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) कलम २२८ खालील अपराध असेल तर, ज्याला व्यत्यय आणला किंवा ज्याचा अपमान केला ते न्यायालय ज्या न्यायिक कार्यवाहीचे काम करत होते तिचे स्वरूप व टप्प्याचे आणि व्यत्ययाचे किंवा अपमानाचे स्वरूप हे त्या नोंदीत दर्शविले जाईल.

एखाद्या प्रकरणाचा कलम ३४५ खाली परामर्श घेऊ नये असे न्यायालयाला वाटेल त्या बाबतीतील कार्यपद्धती.

३४६. (१) कलम ३४५ मध्ये निर्दिष्ट केलेल्यांपैकी आणि आपल्या नजरेस पडेल अशा प्रकारे किंवा आपल्या समक्ष घडलेला कोणताही अपराध केल्याचा आरोप असलेल्या व्यक्तीला, तिने द्रव्यदंड भरण्यात कसूर केली नाही तरी कारावासात ठेवावे किंवा तिच्यावर दोनशे रुपयांहून अधिक द्रव्यदंड बसवावा असे जर कोणत्याही प्रकरणात न्यायालयाला वाटले अथवा ते प्रकरण कलम ३४५ खाली निकालात काढू नये असे जर अन्य कोणत्याही कारणामुळे अशा न्यायालयाला वाटले तर, यात यापूर्वी उपबंधित केल्यानुसार अपराधाची घटक तथ्ये व आरोपीचे कथन नमूद केल्यानंतर असे न्यायालय ते प्रकरण त्याची संपरीक्षा करण्याची अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे पाठवू शकेल आणि अशा दंडाधिकाऱ्यासमोर अशा व्यक्तीने उपस्थित राहण्यासाठी जामीन द्यावा असे फर्मावू शकेल, आणि पुरेसा जामीन देण्यात आला नाही तर, अशा व्यक्तीला अशा दंडाधिकाऱ्याकडे बंदोबस्तात पाठवील.

(२) ज्या दंडाधिकाऱ्याकडे या कलमाखाली कोणतेही प्रकरण पाठवण्यात आले असेल तो दंडाधिकारी ते प्रकरण जणू काही पोलीस अहवालावरून सुरू करण्यात आलेले असावे त्याप्रमाणे शक्य तेथवर त्या प्रकरणांचा परामर्श घेण्यास सुरुवात करील.

निबंधक किंवा दुय्यम निबंधक यांना केव्हा दिवाणी न्यायालय मानावयाचे.

३४७. राज्य शासन तसे निदेशित करील तेव्हा, '[***] नोंदणी अधिनियम, १९०८' (१९०८ चा १६) याखाली नियुक्त केलेला कोणताही निबंधक किंवा दुय्यम निबंधक हा ३४५ व ३४६ या कलमांच्या अर्थानुसार दिवाणी न्यायालय असल्याचे मानले जाईल.

माफीपत्र सादर केल्यावर अपराध्याची विनादोषारोप सुटका.

३४८. एखाद्या व्यक्तीने जी कोणतीही गोष्ट करणे कायद्याने आवश्यक असेल ते करण्याला तिने नकार दिल्याबद्दल किंवा ते न केल्याबद्दल अथवा उद्देशपूर्वक अपमान केल्याबद्दल किंवा व्यत्यय आणल्याबद्दल जेव्हा कोणत्याही न्यायालयाने कलम ३४५ खाली तिला अपराधी म्हणून शिक्षापात्र ठरवलेले असेल अथवा कलम ३४६ खाली एखाद्या दंडाधिकाऱ्याकडे तिला संपरीक्षेसाठी पाठवलेले असेल तेव्हा अशा न्यायालयाच्या आदेशाला किंवा मागणीला त्याने मान दिल्यास किंवा त्याच्या समाधानापुरेसे माफीपत्र सादर केल्यास, ते न्यायालय अपराध्याला विनादोषारोप सोडू शकेल किंवा शिक्षा माफ करू शकेल.

उत्तर देण्यास किंवा दस्तऐवज हजर करण्यास नकार देणाऱ्या व्यक्तीला कारावासात ठेवणे किंवा हवालातीत पाठवणे.

३४९. जर कोणत्याही साक्षीदाराने त्याला विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यास अथवा फौजदारी न्यायालयापुढे एखादा दस्तऐवज किंवा एखादी वस्तू हजर करण्यास जिला फर्मावण्यात आले असेल अशा एखाद्या व्यक्तीने स्वतःच्या कब्जात किंवा सत्तेखाली असलेला जो कोणताही दस्तऐवज किंवा वस्तू हजर करणे न्यायालयाने आवश्यक केले असेल ती हजर करण्यास नकार दिला आणि अशा नकाराबद्दल रास्त सबब सांगण्याची वाजवी संधी दिल्यानंतरही तिने तसे केले नाही तर, कारणे लेखी नमूद करून त्यांकरता असे न्यायालय जास्तीत जास्त सात दिवसांच्या अशा कोणत्याही मुदतीकरिता तिला साध्या कारावासाची शिक्षा देऊ शकेल किंवा पीठासीन दंडाधिकाऱ्याच्या किंवा न्यायाधीशाच्या सहीच्या वॉरंटाद्वारे न्यायालयाच्या एखाद्या अधिकाऱ्याच्या हवालातीत पाठवू शकेल—मात्र दरम्यान अशा व्यक्तीने आपली तपासणी केली जाण्यास व उत्तरे देण्यास अथवा तो दस्तऐवज किंवा वस्तू हजर करण्यास संमती दिली तर गोष्ट वेगळी—आणि जर तिने आपला नकारांचा हेका चालू ठेवला तर, कलम ३४५ किंवा कलम ३४६ च्या उपबंधानुसार तिच्याबाबत कार्यवाही करता येईल.

समन्सचे पालन म्हणून हजर न राहिल्याबद्दल शिक्षा देण्याची संक्षिप्त कार्यपद्धती.

३५०. (१) जर फौजदारी न्यायालयासमोर उपस्थित होण्यासाठी समन्स काढण्यात आलेला कोणताही साक्षीदार समन्सचे पालन म्हणून विवक्षित स्थळी व वेळी उपस्थित राहण्यास कायद्याने बांधलेला होता आणि त्या स्थळी किंवा वेळी हजर राहण्यास रास्त सबबीशिवाय त्याने कसूर केली किंवा त्यास नकार दिला किंवा ज्या स्थळी त्याने उपस्थित रहावयाचे तेथून ज्यावेळी त्याने निघून जाणे योग्य होते त्यापूर्वी तो तेथून निघून गेला आणि ज्या न्यायालयासमोर त्याने उपस्थित रहावयाचे त्याचे अशा साक्षीदाराची संक्षिप्त संपरीक्षा करावी हे न्यायहितार्थ समयोचित आहे याबाबत समाधान झाले तर ते न्यायालय त्या अपराधाची दखल घेऊ शकेल आणि अपराध्याला या कलमाखाली शिक्षा का करण्यात येऊ नये याचे कारण दाखवण्याची त्याला संधी दिल्यानंतर जास्तीत जास्त शंभर रुपये इतका द्रव्यदंड त्याला ठोठावू शकेल.

---

१. १९४७ चा अधिनियम ५६ याचे कलम ३ आणि दुसरी अनुसूची या द्वारे 'भारतीय' हे शब्द वगळले.

(२) अशा प्रत्येक खटल्यात, न्यायालय संक्षिप्त संपरीक्षांसाठी विहित केलेल्या प्रक्रियेस शक्य तितकी जवळची प्रक्रिया अनुसरील.

३५१. (१) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, उच्च न्यायालयाहून अन्य न्यायालयाने कलम ३४४, कलम ३४५, कलम ३४९ किंवा कलम ३५० खाली शिक्षा दिलेल्या कोणत्याही व्यक्तीला, अशा न्यायालयात करण्यात आलेल्या हुकूमनाम्यांवर किंवा आदेशांवर ज्याच्याकडे अपिले होऊ शकतील त्या न्यायालयाकडे अपील करता येईल. **३४४, ३४५, ३४९, ३५० या कलमांखालील दोषसिद्धींविरुद्ध अपिले.**

(२) एकोणतिसाव्या प्रकरणाचे उपबंध या कलमाखालील अपिलांना लागू होण्याजोगे असतील तेथवर ते लागू होतील, आणि ज्यांविरुद्ध अपील करण्यात आले त्या निर्णयात अपील न्यायालयाला फेरबदल करता येईल किंवा तो फिरवता येईल अथवा ती शिक्षा कमी करता येईल किंवा ती फिरवता येईल.

(३) लवुवाद न्यायालयाने केलेल्या दोषसिद्धीवरील अपील ज्या सत्रविभागात असे न्यायालय स्थित असेल त्या विभागाच्या सत्र न्यायालयाकडे होऊ शकेल.

(४) कलम ३४७ खाली काढलेल्या निदेशाच्या आधारे दिवाणी न्यायालय मानल्या गेलेल्या कोणत्याही निबंधकाने किंवा उप निबंधकाने केलेल्या दोषसिद्धीवरील अपील ज्या सत्रविभागात अशा निबंधकाचे किंवा उप निबंधकाचे कार्यालय स्थित असेल त्या विभागाच्या सत्र न्यायालयाकडे होऊ शकेल.

३५२. ३४४, ३४५, ३४९ आणि ३५० या कलमांमध्ये उपबंधित केले असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, कलम १९५ मध्ये निर्देशिलेला कोणताही अपराध जेव्हा (उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाहून अन्य) फौजदारी न्यायालयाच्या कोणत्याही न्यायाधीशांसमोर किंवा दंडाधिकाऱ्यासमोर किंवा त्याच्या प्राधिकाराचा अवमान केल्याने झालेला असेल अथवा न्यायालयीन कार्यवाहीच्या ओघात असा न्यायाधीश किंवा दंडाधिकारी म्हणून त्याच्या दखलगिरीत आणलेला असेल तेव्हा, तो अशा अपराधाबद्दल कोणत्याही व्यक्तीची संपरीक्षा करणार नाही. **विवक्षित न्यायाधीश आणि दंडाधिकारी यांच्यासमोर विवक्षित अपराध केले असता त्यांनी त्यांची संपरीक्षा करावयाची नाही.**

## प्रकरण सत्तावीस

### न्यायनिर्णय

३५३. (१) मूळ अधिकारितेच्या कोणत्याही फौजदारी न्यायालयामधील प्रत्येक संपरीक्षेतील न्यायनिर्णय संपरीक्षा संपल्यानंतर ताबडतोब अथवा मागाहून एखाद्या वेळी (पक्षकारांना किंवा त्यांच्या वकिलांना त्याबाबत नोटीस दिली गेली पाहिजे) पीठासीन अधिकारी पुढीलप्रकारे खुल्या न्यायालयात अधिघोषित करील, ते असे—— **न्यायनिर्णय.**

(क) संपूर्ण न्यायनिर्णयपत्र देऊन; किंवा

(ख) संपूर्ण न्यायनिर्णय वाचून, किंवा

(ग) न्यायनिर्णयाचा प्रवर्ती भाग वाचून आणि आरोपीला किंवा त्याच्या वकिलाला समजणाऱ्या भाषेत न्यायनिर्णयाचा सारांश समजावून देऊन.

(२) जेथे पोटकलम (१) च्या खंड (क) खाली न्यायनिर्णय दिला जाईल तेथे, पीठासीन अधिकारी त्याचे लघुलेखन करवून घेईल, अनुलिपी तयार झाल्याबरोबर तीवर आणि तिच्या प्रत्येक पृष्ठावर स्वाक्षरी करील आणि खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय दिल्याचा दिनांक त्यावर लिहील.

(३) पोटकलम (१) चा खंड (ख) किंवा, प्रकरणपरत्वे, खंड (ग) याखाली न्यायनिर्णय किंवा त्याचा प्रवर्ती भाग वाचून दाखवला जाईल त्या बाबतीत, तो पीठासीन अधिकारी खुल्या न्यायालयात त्यावर दिनांक घालील आणि स्वाक्षरी करील आणि जर तो स्वहस्ताक्षरात लिहिलेला नसेल तर, न्यायनिर्णयाच्या प्रत्येक पृष्ठावर तो स्वाक्षरी करील.

(४) पोटकलम (१) चा खंड (ग) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने न्यायनिर्णय अधिघोषित करण्यात येईल त्या बाबतीत, संपूर्ण न्यायनिर्णय किंवा त्याची प्रत पक्षकारांच्या किंवा त्यांच्या वकिलांच्या अवलोकनार्थ ताबडतोब विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येईल.

(५) जर आरोपी हवालातीत असेल तर, अधिघोषित केलेला न्यायनिर्णय ऐकण्यासाठी त्याला तेथे आणण्यात येईल.

(६) जर आरोपी हवालातीत नसेल तर, संपरीक्षेच्या वेळी त्याची जातिनिशी हजेरी माफ करण्यात आली असून त्याला फक्त द्रव्यदंडाचीच शिक्षा दिलेली असेल किंवा त्याला दोषमुक्त केलेले असेल ती बाब खेरीजकरून एरव्ही, न्यायालय त्यास न्यायनिर्णय ऐकण्यासाठी समक्ष हजर राहणे आवश्यक करील :

परंतु, जेथे एकापेक्षा अधिक आरोपी असतील, आणि न्यायनिर्णय अधिघोषित करावयाचा त्या दिनांकास त्यांच्यापैकी एक किंवा अधिक आरोपी न्यायालयात हजर राहिले नसतील त्या बाबतीत, खटला निकालात काढण्यास गैरवाजवी विलंब लागू नये यासाठी पीठासीन अधिकारी ते गैरहजर असले तरीही न्यायनिर्णय अधिघोषित करू शकेल.

(७) कोणत्याही फौजदारी न्यायालयाने दिलेला न्याय निर्णय, तो देण्यासाठी कळविलेल्या दिवशी किंवा स्थळी एखादा पक्षकार किंवा त्याचा वकील अनुपस्थित राहिला अथवा अशा दिवसाबाबतची किंवा स्थळाबाबतची नोटीस अशा पक्षकारांवर किंवा त्यांच्या वकिलांवर किंवा त्यांच्यापैकी एखाद्यावर बजावण्यात आली नाही किंवा बजावणी सदोष होती एवढ्याच कारणाने विधिबाह्य असल्याचे मानले जाणार नाही.

(८) या कलमातील कोणतीही गोष्ट कोणत्याही प्रकारे कलम ४६५ च्या उपबंधाची व्याप्ती मर्यादित करते असा त्याचा अर्थ लावला जाणार नाही.

न्यायनिर्णयाची भाषा व मजकूर.

३५४. (१) या संहितेद्वारे अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीजकरून एरव्ही, कलम ३५३ मध्ये ज्या न्यायनिर्णयाचा निर्देश केला आहे—

(क) असा प्रत्येक न्यायनिर्णय न्यायालयाच्या भाषेत लिहिला जाईल ;

(ख) त्यात, निर्णीत करावयाचा मुद्दा किंवा मुद्दे, त्यावरील निर्णय आणि निर्णयाची कारणे अंतर्भूत असतील ;

(ग) त्यात, अपराध घडला असल्यास कोणत्या अपराधाबद्दल आणि 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या किंवा अन्य कायद्याच्या कोणत्या कलमाखाली आरोपीला सिद्धदोष ठरवलेले आहे व त्याला कोणती शिक्षा देण्यात आली आहे ते विनिर्दिष्ट केले जाईल ;

(घ) तो दोषमुक्तीचा न्यायनिर्णय असेल तर, आरोपीला कोणत्या अपराधाबाबत दोषमुक्त करण्यात आले आहे ते त्यात नमूद केले जाईल आणि त्याला मुक्त करण्यात यावे असे त्याद्वारे निदेशित केले जाईल.

(२) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याखाली दोषसिद्धी करण्यात आली असेल आणि त्या संहितेच्या दोहोंपैकी कोणत्या कलमाखाली किंवा एकाच कलमाच्या दोहोंपैकी कोणत्या भागाखाली अपराध येतो याबाबत शंका असेल तेव्हा, न्यायालय त्याचा पृथकपणे उल्लेख करील आणि वैकल्पिक न्यायनिर्णय देईल.

(३) जेव्हा मृत्यूच्या किंवा पर्याय म्हणून आजीव कारावासाच्या किंवा काही वर्षे मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल दोषसिद्धी झाली असेल तेव्हा, देण्यात आलेल्या शिक्षेची कारणे आणि, मृत्यूच्या शिक्षेच्या बाबतीत, अशा शिक्षेची विशेष कारणे न्यायनिर्णयात नमूद केली जातील.

(४) जेव्हा एक वर्ष किंवा त्याहून अधिक मुदतीच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल दोषसिद्धी झाली असली तरी न्यायालयाने तीन महिन्यांहून कमी मुदतीची शिक्षा दिलेली असेल तेव्हा, न्यायालय उठेपर्यंत कैद अशी ती शिक्षा असल्यास ती बाब किंवा या संहितेच्या उपबंधाखाली त्या खटल्याची संक्षिप्त संपरीक्षा झाली असल्यास ती बाब खेरीजकरून एरव्ही, अशी शिक्षा देण्यामागची आपली कारणे ते नमूद करील.

(५) जेव्हा कोणत्याही व्यक्तीला मृत्यूची शिक्षा देण्यात येईल तेव्हा, त्याला गळ्याला फास लावून मरेपर्यंत फासावर लटकावावे असे शिक्षादेशात निदेशित केले जाईल.

(६) कलम ११७ खालील किंवा कलम १३८ च्या पोटकलम (२) खालील प्रत्येक आदेश आणि कलम १२५, कलम १४५ किंवा कलम १४७ खाली दिलेला प्रत्येक अंतिम आदेश यामध्ये, निर्णीत करावयाचा मुद्दा किंवा मुद्दे, निर्णय आणि निर्णयाची कारणे अंतर्भूत असतील.

महानगर दंडाधिकाऱ्याचा न्यायनिर्णय.

३५५. यात यापूर्वी उपबंधित केलेल्या रीतीने न्यायनिर्णय नमूद करण्याऐवजी, महानगर दंडाधिकारी पुढील तपशील नमूद करील, तो असा :—

(क) खटल्याचा अनुक्रमांक;

(ख) अपराध घडल्याचा दिनांक;

(ग) कोणी फिर्यादिदार असल्यास त्याचे नांव;

(घ) आरोपी व्यक्तीचे व त्याच्या आई-बापाची नांवे आणि राहण्याचे ठिकाण;

(ङ) ज्याबद्दल फिर्याद देण्यात आली किंवा जो शाबीत करण्यात आला तो अपराध;

(च) आरोपीचे कथन आणि केलेली असल्यास त्याची तपासणी ;

(छ) अंतिम आदेश;

(ज) अशा आदेशाचा दिनांक ;

(झ) कलम ३७३ खाली किंवा कलम ३७४ च्या पोटकलम (३) खाली अंतिम आदेशावर अपील होऊ शकत असेल त्या सर्व प्रकरणी निर्णयाच्या कारणांचे संक्षिप्त निवेदन.

**३५६.** (१) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) कलम २१५, कलम ४८९क, कलम ४८९ख, कलम ४८९ग किंवा कलम ४८९घ खाली अथवा त्या संहितेच्या बाराव्या प्रकरणाखाली किंवा सतराव्या प्रकरणाखाली, तीन वर्षे किंवा त्याहून अधिक मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल भारतातील कोणत्याही न्यायालयाने एखाद्या व्यक्तीला सिद्धदोष ठरवलेले असून, द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाहून अन्य कोणत्याही न्यायालयाने त्यांपैकी कोणत्याही कलमाखाली किंवा प्रकरणाखाली तीन वर्षे किंवा त्याहून अधिक मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल पुन्हा दोषी ठरवले असेल तेव्हा, असे न्यायालय त्याला योग्य वाटल्यास, अशा व्यक्तीला कारावासाची शिक्षा देताना अशी शिक्षा संपण्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त पाच वर्षे इतक्या मुदतीपर्यंत तिने बंधमुक्ततेनंतरचे आपले राहण्याचे ठिकाण आणि अशा राहण्याच्या ठिकाणाचा बदल किंवा त्यातील अनुपस्थिती या गोष्टी यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने कळवल्या पाहिजेत असाही आदेश देऊ शकेल. पूर्वी सिद्धदोष ठरवलेल्या अपराध्याचा पत्ता कळविण्याचा आदेश.

(२) पोटकलम (१) मध्ये नामनिर्दिष्ट केलेल्या अपराधांच्या संदर्भातील त्या पोटकलमाचे उपबंध, असे अपराध करण्यासाठी केलेल्या फौजदारीपात्र कटांना आणि अशा अपराधांच्या आणि ते अपराध करण्याच्या प्रयत्नांच्या अपप्रेरणासही लागू आहेत.

(३) अपीलान्ती किंवा अन्यथा अशी दोषसिद्धी रद्द ठरवलेली असेल तर, असा आदेश शून्य होईल.

(४) या कलमाखाली आदेश अपील न्यायालय अथवा आपले पुनरीक्षणाची शक्ती वापरणारे उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय काढू शकेल.

(५) बंधमुक्त सिद्धदोष अपराध्यांनी राहण्याचे ठिकाण किंवा राहण्याच्या ठिकाणाचा बदल किंवा त्यातील अनुपस्थिती कळवण्यासंबंधी या कलमात असलेल्या उपबंधाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाला अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(६) अशा नियमांमध्ये त्यांच्या भंगाबद्दल शिक्षेचा उपबंध करता येईल आणि अशा कोणत्याही नियमाचा भंग केल्याचा दोषारोप ठेवण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीची, तिने त्याच्या निकटपूर्वी आपले राहण्याचे ठिकाण म्हणून कळवलेले ठिकाण ज्या जिल्ह्यात स्थित असेल तेथील सक्षम अधिकारितेच्या दंडाधिकाऱ्याला संपरीक्षा करता येईल.

**३५७.** (१) जेव्हा न्यायालय द्रव्यदंडाची शिक्षा किंवा द्रव्यदंड ज्याचा भाग आहे अशी शिक्षा (मृत्यूची शिक्षा धरून) देईल तेव्हा, न्यायनिर्णय देताना न्यायालय वसूल केलेला संपूर्ण द्रव्यदंड किंवा त्याचा कोणताही अंश पुढील कारणांसाठी उपयोजित करण्याचा आदेश देऊ शकेल, ते असे :— भरपाई देण्याचा आदेश.

(क) खटल्याच्या कामी योग्य रीतीने झालेला खर्च भागवण्यासाठी ;

(ख) अपराधामुळे झालेल्या कोणत्याही हानीबद्दल किंवा क्षतीबद्दल एखाद्या व्यक्तीला न्यायालयाच्या मते, दिवाणी न्यायालयात भरपाई वसूल करता येण्याजोगी असेल तेव्हा, अशा व्यक्तीला भरपाई देण्यासाठी ;

(ग) एखाद्या व्यक्तीला, अन्य व्यक्तीचा मृत्यू घडवून आणल्यामुळे एखाद्या अपराधाबद्दल किंवा असा अपराध करण्यास अपप्रेरणा दिल्याबद्दल सिद्धदोष ठरवण्यात आले असेल तेव्हा, ज्या व्यक्ती अशा मृत्यूमुळे त्यांना पोचलेल्या हानीबद्दल शिक्षा देण्यात आलेल्या व्यक्तीकडून 'प्राणांतिक अपघात अधिनियम, १८५५', (१८५५ चा १३) याखाली वसूल करण्यास हक्कदार असतील त्यांना भरपाई देण्यासाठी ;

(घ) चोरी, फौजदारीपात्र अपहार, फौजदारीपात्र न्यासभंग, अथवा ठकवणक, अथवा एखादी संपत्ती चोरीची असल्याचे माहीत असताना किंवा तसे समजण्यास कारण असताना ती चोरीची संपत्ती अप्रामाणिकपणे स्वीकारणे किंवा ठेऊन घेणे किंवा तिची विल्हेवाट करण्याच्या कामी स्वेच्छापूर्वक सहाय्य करणे हे ज्यात समाविष्ट आहे अशा कोणत्याही अपराधाबद्दल जेव्हा कोणत्याही व्यक्तीला सिद्धदोष ठरवण्यात आले असेल तेव्हा, अशी संपत्ती तिला हक्कदार असणाऱ्या व्यक्तीच्या कब्जात परत दिल्यास अशा संपत्तीच्या सद्भावपूर्ण खरेदीदारास ती गमवावी लागल्याबद्दल त्याला भरपाई देण्यासाठी.

(२) जर अपिलास पात्र असलेल्या एखाद्या खटल्यात द्रव्यदंड बसवण्यात आला असेल तर, अपील सादर करण्याकरता देण्यात आलेला अवधी लोटण्यापूर्वी किंवा, अपील सादर केले असेल तर अपिलाच्या निर्णयापूर्वी, असा कोणताही भरणा केला जाणार नाही.

(३) द्रव्यदंड हा जिचा भाग नाही अशी शिक्षा जेव्हा न्यायालयाने ठोठावली असेल तेव्हा, न्यायनिर्णय देताना न्यायालय आरोपी व्यक्तीला ज्या कृत्याबद्दल याप्रमाणे शिक्षादेश देण्यात आला असेल त्या कृत्यामुळे ज्या व्यक्तीला कोणतीही हानी किंवा क्षती पोचली असेल त्या व्यक्तीला आदेशात विनिर्दिष्ट केली जाईल अशी रक्कम भरपाईदाखल आरोपी व्यक्तीने द्यावी असा आदेश देऊ शकेल.

(४) या कलमाखालील आदेश अपील न्यायालय किंवा आपली पुनरीक्षणाच्या शक्ती वापरणारे उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय काढू शकेल.

(५) त्याच बाबींशी संबंधित असलेल्या नंतरच्या कोणत्याही दिवाणी दाव्यात भरपाई देववताना या कलमाखाली भरपाई म्हणून दिलेली किंवा वसूल केलेली कोणतीही रक्कम न्यायालय विचारात घेईल.

**निष्कारण अटक केलेल्या व्यक्तींना भरपाई.**

३५८. (१) जेव्हाकेव्हा कोणतीही व्यक्ती पोलीस अधिकाऱ्याकरवी अन्य व्यक्तीला अटक करवील तेव्हा, जो दंडाधिकारी त्या खटल्याची सुनावणी करील त्याला जर असे दिसून आले की, अशी अटक करण्यास पुरेसे कारण नव्हते, तर अशा प्रकारे अटक करणाऱ्या व्यक्तीने अशा अटक झालेल्या व्यक्तीला त्याबाबतीत तिच्या वेळेची झालेली हानी व खर्च याबद्दल दंडाधिकाऱ्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे जास्तीत जास्त शंभर रुपये इतकी भरपाई देण्याचा आदेश दंडाधिकारी काढू शकेल.

(२) अशा प्रकरणांत, जर एकाहून अधिक व्यक्तींना अटक झाली असेल तर दंडाधिकारी त्याच रीतीने, स्वत:ला योग्य वाटेल त्याप्रमाणे जास्तीत जास्त शंभर रुपये इतकी भरपाई त्यापैकी प्रत्येकाला देऊ शकेल.

(३) या कलमाखाली देववलेली सर्व भरपाई, म्हणजे जणू काही द्रव्यदंड असावा त्याप्रमाणे ती वसूल करता येईल, आणि ती अशा प्रकारे वसूल करता येत नसेल तर, ज्या व्यक्तीने ती द्यावयाची तिला दंडाधिकारी निदेशित करील त्याप्रमाणे जास्तीत जास्त तीस दिवस इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाचा शिक्षादेश देण्यात येईल—मात्र तत्पूर्वी अशी रक्कम भरण्यात आली तर गोष्ट वेगळी.

**बिनदखली प्रकरणात खर्च देण्याचा आदेश.**

३५९. (१) जेव्हाकेव्हा न्यायालयाकडे कोणत्याही बिनदखली अपराधाची फिर्याद देण्यात आली असेल तेव्हा, न्यायालयाने आरोपीला सिद्धदोष ठरवले तर, ते त्याच्यावर लादलेल्या शिक्षेशिवाय आणखी, फिर्यादिदाराला खटल्याच्या कामी आलेला खर्च संपूर्णत: किंवा अंशत: आरोपीने त्याला द्यावा असा आदेश देऊ शकेल, आणि तो खर्च देण्यात कसूर झाल्यास, आरोपीने जास्तीत जास्त तीस दिवस इतक्या मुदतीचा साधा कारावास भोगावा असाही आदेश देऊ शकेल, आणि अशा खर्चात न्यायालयाला वाजवी वाटेल त्याप्रमाणे आदेशिका-फी, साक्षीदार आणि वकिलाची फी यांबाबत आलेल्या कोणत्याही खर्चाचा समावेश असेल.

(२) या कलमाखालील आदेश हा अपील न्यायालय व आपल्या पुनरीक्षणाच्या शक्ती वापरणारे उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय काढू शकेल.

**चांगले वर्तन ठेवण्यासाठी परिवीक्षेच्या शर्तींवर किंवा समज दिल्यावर सोडून देणे.**

३६०. (१) एकवीस वर्षे वयाखालील नसलेली कोणतीही व्यक्ती जेव्हा फक्त द्रव्यदंडाच्या अगर सात वर्षे किंवा त्याहून कमी मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र अशा अपराधाबद्दल सिद्धदोष ठरवण्यात आली असेल अथवा कोणतीही एकवीस वर्षे वयाखालील व्यक्ती किंवा कोणतीही स्त्री, जेव्हा मृत्यूच्या किंवा आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र नसलेल्या अपराधाबद्दल सिद्धदोष ठरवण्यात आली असेल आणि अपराधाविरुद्ध पूर्वी दोषसिद्धी झाल्याचे शाबीत करण्यात आले नसेल तेव्हा, ज्या न्यायालयासमोर त्याची दोषसिद्धी झाली त्याला, अपराध्याचे वय, चारित्र्य किंवा पूर्ववृत्त आणि ज्या परिस्थितीत अपराध करण्यात आला ती परिस्थिती लक्षात घेऊन चांगले वर्तन ठेवण्यासाठी परिवीक्षाकाल नेमून दिल्यावर अपराध्याला सोडून देणे समयोचित आहे असे दिसून आले तर, त्याला एकदम कोणतीही शिक्षा देण्याऐवजी ते न्यायालय, स्वत: निदेशित करील अशा (जास्तीत जास्त तीन वर्षे इतक्या) कालावधीत, आरोपीला बोलावण्यात येईल तेव्हा उपस्थित राहून शिक्षा स्वीकारण्याबाबत आणि दरम्यान शांतता राखण्याबाबत व चांगले वर्तन ठेवण्याबाबत जामीनदारांच्यासह किंवा त्यांच्याविना असे बंधपत्र त्याने करून दिल्यावर त्याला सोडून द्यावे असे निदेशित करू शकेल :

परंतु, उच्च न्यायालयाने खास अधिकार प्रदान न केलेल्या द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याने कोणत्याही पहिल्या वेळेच्या अपराध्याला सिद्धदोष ठरवले असेल आणि या कलमाने प्रदान केलेल्या शक्ती वापरल्या जाव्यात असे दंडाधिकाऱ्याचे मत असेल त्या बाबतीत, तो तशा आशयाचे आपले मत नमूद करील आणि आरोपीला प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्यापुढे पाठवून किंवा त्याच्यासमोर उपस्थित राहण्याबद्दल जामीन घेऊन अशा दंडाधिकाऱ्याकडे ती कार्यवाही सादर करील, व तो दंडाधिकारी पोटकलम (२) मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने तो खटला निकालात काढील.

(२) पोटकलम (१) मध्ये उपबंधित केल्यानुसार प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याकडे कार्यवाही सादर केलेली असेल त्या बाबतीत, मुळात त्या खटल्याची सुनावणी अशा दंडाधिकाऱ्याने केली असती तर तो जसा शिक्षादेश किंवा आदेश देऊ शकला असता तसा शिक्षादेश किंवा आदेश तो त्यावर देऊ शकेल, आणि कोणत्याही मुद्यावर आणखी चौकशी किंवा अधिक पुरावा आवश्यक आहे असे त्याला वाटले तर, तो स्वत: अशी चौकशी करू शकेल किंवा असा पुरावा घेऊ शकेल अथवा अशी चौकशी करण्याचे किंवा पुरावा घेण्याचे निदेशित करू शकेल.

(३) चोरी, इमारतीतील चोरी, अप्रामाणिकपणे केलेला अपहार, ठकवणूक किंवा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याखाली जास्तीत जास्त २ वर्षे इतक्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला कोणताही अपराध किंवा केवळ द्रव्यदंडाच्याच शिक्षेस पात्र असलेला कोणताही अपराध याबद्दल जेव्हा एखाद्या व्यक्तीला सिद्धदोष ठरवण्यात आले असून तिच्याविरुद्ध पूर्वी दोषसिद्धी झाल्याचे शाबीत झालेले नाही अशा कोणत्याही खटल्यात, ज्या न्यायालयासमोर तिची याप्रमाणे दोषसिद्धी झाली ते न्यायालय, अपराध्याचे वय, चारित्र्य, पूर्ववृत्त किंवा शारीरिक वा मानसिक स्थिती आणि अपराधाचे क्षुल्लक स्वरूप

किंवा अपराध ज्या परिस्थितीत करण्यात आला अशी कोणतीही सौम्यकारी परिस्थिती लक्षात घेता, आपणास योग्य वाटल्यास त्याला कोणतीही शिक्षा देण्याऐवजी यथायोग्य समज दिल्यानंतर सोडून देऊ शकेल.

(४) या कलमाखालील आदेश अपील न्यायालय अथवा आपल्या पुनरीक्षणाच्या शक्ती वापरणारे उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय काढू शकेल.

(५) जेव्हा कोणत्याही अपराध्याबाबत या कलमाखाली आदेश देण्यात आलेला असेल तेव्हा उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय, अशा न्यायालयाकडे अपील करण्याचा हक्क असून अपील झाल्यावर किंवा आपल्या पुनरीक्षणाच्या शक्ती वापरत असताना, असा आदेश रद्द करू शकेल आणि त्याच्या ऐवजी अशा अपराध्याला कायद्यानुसार शिक्षादेश देऊ शकेल :

परंतु, उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय, ज्या न्यायालयाने अपराध्याला सिद्धदोष ठरवले ते न्यायालय देऊ शकले असते त्याहून मोठी शिक्षा या पोटकलमाखाली देणार नाही.

(६) १२१, १२४ आणि ३७३ या कलमांचे उपबंध, शक्य तेथवर, या कलमाच्या उपबंधांच्या अनुरोधाने देण्यात आलेल्या जामीनदारांच्या बाबतीत लागू होतील.

(७) पोटकलम (१) खाली अपराधाच्या सुटकेचा निदेश देण्यापूर्वी न्यायालय ज्या स्थलसीमेत ते कार्य करीत असेल त्या किंवा शर्तीचे अनुपालन करण्यासाठी नेमून दिलेल्या कालावधीत अपराधी जेथे राहण्याची शक्यता आहे त्या स्थलसीमेत अपराध्याचे किंवा त्याचा कोणताही जामीनदार असल्यास त्याच्या स्थिर वास्तव्याचे किंवा नेहमीच्या व्यवसायाचे ठिकाण आहे याबाबत स्वतःची खात्री करून घेईल.

(८) ज्याने अपराध्याला सिद्धदोष ठरविले असेल त्या न्यायालयाची किंवा ज्याने त्याच्या मूळच्या अपराधाबाबत अपराध्यावर कार्यवाही केली असती त्या न्यायालयाची जर अशी खात्री झाली की, अपराधी त्याच्या जातमुचलक्याच्या शर्तींपैकी एखाद्या शर्तीचे अनुपालन करण्यास चुकला आहे तर ते त्याला अटक करण्यासाठी वॉरंट काढू शकेल.

(९) अशा वॉरंटावरून अपराध्याला अटक करण्यात आली असता त्याला वॉरंट काढणाऱ्या न्यायालयापुढे आणला जाईल, आणि असे न्यायालय खटल्याची सुनावणी होईपर्यंत त्याला हवालातीत परत पाठवू शकेल किंवा शिक्षादेशाच्या वेळी त्याने उपस्थित राहण्याच्या शर्तीवर जामीनादेश देऊन त्याला पुरेसा जामीन देण्यास सांगू शकेल आणि असे न्यायालय खटल्याच्या सुनावणीनंतर शिक्षादेश देऊ शकेल.

(१०) या कलमातील कोणतीही गोष्ट 'अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८' (१९५८ चा २०) किंवा 'बालक अधिनियम, १९६०' (१९६० चा ६०) याच्या अथवा किशोरवयीन अपराध्यांवरील उपचार, त्यांचे प्रशिक्षण किंवा पुनर्वसन यासाठी त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या उपबंधांवर परिणाम करणार नाही.

**विवक्षित प्रकरणांत विशेष कारणांची नोंद करणे.**

३६१. जेव्हा न्यायालय—

(क) कलम ३६० खाली किंवा 'अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८' (१९५८ चा २०) याच्या उपबंधाखाली आरोपी व्यक्तीसंबंधी, किंवा

(ख) 'बालक अधिनियम, १९६०' (१९६० चा ६०) अथवा किशोरवयीन अपराध्यांवर उपचार, त्यांचे प्रशिक्षण किंवा पुनर्वसन यांसाठी त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखाली एखाद्या किशोरवयीन अपराध्यांसंबंधी,

कार्यवाही करू शकले असते, पण त्याने तसे केलेले नसेल तेव्हा, तसे न केल्याची विशेष कारणे ते आपल्या न्यायनिर्णयात नमूद करील.

**न्यायालयाने न्यायनिर्णयात फेरबदल करावयाचा नाही.**

३६२. या संहितेने किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याने अन्यथा उपबंधित केले असेल तेवढे वगळता एरव्ही, कोणतेही न्यायालय आपल्या न्यायनिर्णयावर किंवा प्रकरणाचा निकाल करणाऱ्या अंतिम आदेशावर त्याने स्वाक्षरी केली की, हस्तदोष किंवा आकडेमोडीतील चूक दुरुस्त करण्याखेरीज इतर फेरबदल त्यात करणार नाही किंवा त्याचे पुनर्विलोकन करणार नाही.

**न्यायनिर्णयाची प्रत आरोपीला व अन्य व्यक्तींना देणे.**

३६३. (१) जेव्हा आरोपीला कारावासाचा शिक्षादेश देण्यात येईल तेव्हा, न्यायनिर्णय घोषित झाल्यानंतर ताबडतोब त्या न्यायनिर्णयाची एक प्रत त्याला विनामूल्य देण्यात येईल.

(२) आरोपीच्या अर्जावरून, न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत किंवा त्याने तशी इच्छा प्रदर्शित केली असेल तेव्हा, व्यवहार्य असल्यास, त्याच्या स्वतःच्या भाषेतील, नाहीतर न्यायालयाच्या भाषेतील त्याचा अनुवाद त्याला विनाविलंब देण्यात येईल, आणि आरोपीला त्या न्यायनिर्णयावर अपील करता येण्यासारखे असेल अशा प्रत्येक बाबतीत, अशी प्रत विनामूल्य देण्यात येईल :

परंतु, जेव्हा उच्च न्यायालयाने मृत्यूचा शिक्षादेश दिला असेल किंवा कायम केला असेल तेव्हा, आरोपीला न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत ताबडतोब विनामूल्य देण्यात येईल— मग त्याने त्याकरता अर्ज केलेला असो वा नसो.

(३) पोटकलम (२) चे उपबंध ज्यावर आरोपीला अपील करता येते अशा न्यायनिर्णयाच्या संबंधात जसे लागू होतात तसे ते कलम ११७ खालील आदेशाच्या संबंधात लागू होतील.

(४) जेव्हा कोणत्याही न्यायालयाने आरोपीला मृत्यूचा शिक्षादेश दिला असेल आणि अशा न्यायनिर्णयावर हक्काने अपील करणे शक्य असेल तेव्हा, त्याची अपील करण्याची इच्छा असल्यास, त्याचे अपील किती अवधीत केले जावे ते न्यायालय त्याला कळवील.

(५) पोटकलम (२) मध्ये उपबंधित केले असेल तेवढे वगळून एरव्ही, फौजदारी न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयामुळे किंवा आदेशामुळे बाधित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, तिने यासंबंधात अर्ज केल्यावर आणि विहित आकार भरल्यावर अशा न्यायनिर्णयाची किंवा आदेशाची किंवा कोणत्याही जबानीची किंवा अभिलेखाच्या अन्य कोणत्याही भागाची प्रत देण्यात येईल :

परंतु, काही विशेष कारणाकरता न्यायालयाला योग्य वाटल्यास न्यायालय त्याला ती प्रत विनामूल्य देऊ शकेल.

(६) उच्च न्यायालय नियमांद्वारे, फौजदारी न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयाच्या किंवा आदेशाच्या प्रती त्या न्यायनिर्णयाशी किंवा आदेशाशी संबंधित नसलेल्या कोणत्याही व्यक्तीला उच्च न्यायालय अशा नियमांद्वारे उपबंधित करील अशी फी तिने भरल्यास आणि अशा शर्तींवर देण्याबाबत उपबंध करू शकेल.

न्यायनिर्णयाचा केव्हा अनुवाद करावयाचा.

**३६४.** मूळचा न्यायनिर्णय कार्यवाहीच्या अभिलेखात निविष्ट केला जाईल आणि जेव्हा मूळचा न्यायनिर्णय न्यायालयाच्या भाषेहून वेगळ्या भाषेत लिहिलेला असेल आणि आरोपी तशी मागणी करील तेव्हा, न्यायालयाच्या भाषेतील त्याचा अनुवाद अशा अभिलेखाला जोडला जाईल.

सत्र न्यायालयाने निष्कर्षाची व शिक्षादेशाची प्रत जिल्हा दंडाधिकाऱ्याला पाठवणे.

**३६५.** सत्र न्यायालयाने किंवा मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याने संपरीक्षा केलेल्या खटल्यांमध्ये ते न्यायालय किंवा, प्रकरणपरत्वे, असा दंडाधिकारी, आपल्या निष्कर्षाची आणि (असल्यास) शिक्षादेशाची प्रत, ज्याच्या स्थानिक अधिकारितेत संपरीक्षा झाली त्या जिल्हा दंडाधिकाऱ्याकडे पाठवील.

## प्रकरण अठ्ठावीस

## मृत्यूचे शिक्षादेश कायम करण्यासाठी सादर करणे

सत्र न्यायालयाने मृत्यूचा शिक्षादेश कायम करण्यासाठी सादर करणे.

**३६६.** (१) जेव्हा सत्र न्यायालय मृत्यूचा शिक्षादेश देईल तेव्हा, ती कार्यवाही उच्च न्यायालयाकडे सादर करण्यात येईल, आणि तो शिक्षादेश उच्च न्यायालयाने कायम केल्याशिवाय त्याची अंमलबजावणी केली जाणार नाही.

(२) शिक्षादेश देणारे न्यायालय सिद्धदोष व्यक्तीला वॉरंटाखाली तुरुंगाच्या हवालातीत पाठवील.

आणखी चौकशी करण्याची किंवा अधिक साक्षी पुरावा घेण्याचा निदेश देण्याची शक्ती.

**३६७.** (१) अशी कार्यवाही सादर करण्यात येईल तेव्हा, सिद्धदोष व्यक्तीच्या दोषीपणाशी किंवा निर्दोषीपणाशी संबंधित असलेल्या एखाद्या मुद्याबाबत आणखी चौकशी करण्यात यावी किंवा अधिक साक्षी पुरावा घेण्यात यावा असे उच्च न्यायालयाला वाटले तर, ते स्वतः अशी चौकशी करू शकेल किंवा असा साक्षी पुरावा घेऊ शकेल, अथवा सत्र न्यायालयाकरवी ती चौकशी केली जावी किंवा साक्षी पुरावा घेतला जावा असा निदेश देऊ शकेल.

(२) जेव्हा अशी चौकशी करण्यात येईल किंवा असा साक्षीपुरावा घेण्यात येईल तेव्हा, उच्च न्यायालयाने अन्यथा निदेशित केले नसेल तर, आरोपी व्यक्तीची उपस्थिती माफ करता येईल.

(३) चौकशी उच्च न्यायालयाने केली नसेल किंवा साक्षी पुरावा (घेतला असल्यास) उच्च न्यायालयाकडे नसेल तेव्हा, अशा चौकशीचा निष्कर्ष किंवा साक्षी पुरावा प्रमाणित करून अशा न्यायालयाकडे पाठवण्यात येईल.

शिक्षादेश कायम करण्याची किंवा दोषसिद्धी रद्दबातल करण्याची शक्ती.

**३६८.** कलम ३६६ खाली सादर करण्यात आलेल्या कोणत्याही खटल्यात उच्च न्यायालय—

(क) शिक्षादेश कायम करू शकेल, किंवा कायद्याने प्राधिकृत केलेला अन्य कोणताही शिक्षादेश देऊ शकेल, किंवा

(ख) दोषसिद्धी रद्दबातल करू शकेल, आणि सत्र न्यायालय आरोपीला ज्या कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धदोष ठरवू शकले असते अशा कोणत्याही अपराधाबद्दल त्याला सिद्धदोष ठरवू शकेल अथवा त्याच किंवा सुधारित दोषारोपावरून नव्याने संपरीक्षा करण्याचा आदेश देऊ शकेल, किंवा

(ग) आरोपी व्यक्तीला दोषमुक्त करू शकेल :

परंतु, अपील दाखल करण्यासाठी देण्यात आलेला अवधी संपेपर्यंत किंवा अशा अवधीत अपील सादर केले असेल तर अशा अपिलाचा निकाल होईपर्यंत, या कलमाखाली शिक्षादेश कायम करण्याचा आदेश दिला जाणार नाही.

३६९. याप्रमाणे सादर करण्यात आलेल्या प्रत्येक खटल्यात, उच्च न्यायालयाने शिक्षादेश कायम करण्यासाठी द्यावयाचा आदेश किंवा कोणताही नवीन शिक्षादेश किंवा आदेश असे न्यायालय दोन किंवा अधिक न्यायाधीशांचे मिळून बनले असेल तेव्हा, त्यातील कमीत कमी दोघांकडून केला जाईल, संमत केला जाईल आणि स्वाक्षरीत केला जाईल. कायमीकरणाच्या आदेशावर किंवा नवीन शिक्षादेशावर दोन न्यायाधीशांनी स्वाक्षरी करणे.

३७०. जेव्हा न्यायाधीशांच्या न्यायपीठासमोर अशा कोणत्याही खटल्याची सुनावणी झाली असेल आणि मताच्या बाबतीत असे न्यायाधीश समसमान विभागले गेले असतील तेव्हा, कलम ३९२ मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने प्रकरणाचा निर्णय करण्यात येईल. मतभेदाच्या बाबतीतील कार्यपद्धती.

३७१. मृत्यूचा शिक्षादेश कायम करण्याकरता सत्र न्यायालयाने उच्च न्यायालयाकडे सादर केलेल्या खटल्यांमध्ये, उच्च न्यायालयाने कायमीकरणाचा आदेश किंवा अन्य आदेश दिल्यानंतर उच्च न्यायालयाचा योग्य अधिकारी न्यायालयाच्या मोहोरनिशी आणि आपल्या अधिकृत स्वाक्षरीने साक्षांकित केलेली त्या आदेशाची प्रत सत्र न्यायालयाकडे विनाविलंब पाठवील. उच्च न्यायालयाकडे कायमीकरणासाठी सादर केलेल्या खटल्यांतील कार्यपद्धती.

## प्रकरण एकोणतीस

## अपिले

३७२. या संहितेने किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याने उपबंधित केले असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, फौजदारी न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयावर किंवा आदेशावर अपील होऊ शकणार नाही. अन्यथा उपबंध केला असल्याशिवाय अपील होऊ शकणार नाही.

३७३. (एक) ज्या व्यक्तीला शांतता राखण्यासाठी किंवा चांगले वर्तन ठेवण्यासाठी जामीन देण्याचा कलम ११७ खाली आदेश देण्यात आला असेल ; किंवा

(दोन) जी व्यक्ती कलम १२१ खाली जामीनदार स्वीकारण्यास नकार देणाऱ्या किंवा तो नाकारणाऱ्या आदेशामुळे नाराज झाली असेल ;

अशी कोणतीही व्यक्ती सत्र न्यायालयाकडे अशा आदेशाविरुद्ध अपील करू शकेल :

परंतु, कलम १२२ च्या पोटकलम (२) किंवा पोटकलम (४) च्या उपबंधानुसार ज्यांच्याविरुद्ध कार्यवाही सत्र न्यायाधीशापुढे मांडण्यात आली असेल अशा व्यक्तींना या कलमातील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही. शांतता राखण्यासाठी किंवा चांगले वर्तन ठेवण्यासाठी जामीन आवश्यक करणाऱ्या किंवा त्याबद्दल जामीनदार स्वीकारण्यास नकार देणाऱ्या किंवा तो नाकारणाऱ्या आदेशांवर अपील.

३७४. (१) उच्च न्यायालयाने आपल्या असाधारण मूळ फौजदारी अधिकारितेत केलेल्या संपरीक्षेत सिद्धदोष ठरवण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करता येईल. दोषसिद्धीवरील अपिले.

(२) ज्या व्यक्तीला सत्र न्यायाधीशाने किंवा अपर सत्र न्यायाधीशाने केलेल्या संपरीक्षेत सिद्धदोष ठरवण्यात आले असेल अथवा ज्या व्यक्तीला अन्य कोणत्याही न्यायालयाने केलेल्या संपरीक्षेत [1][ सिद्धदोष ठरवण्यात आले असून, त्या संपरीक्षेत तिच्याविरुद्ध किंवा त्याच संपरीक्षेत सिद्धदोष ठरवलेल्या अन्य एखाद्या व्यक्तीविरुद्ध सात वर्षांहून अधिक कारावासाचा शिक्षादेश संमत केलेला असेल ] अशा कोणत्याही व्यक्तीला उच्च न्यायालयाकडे अपील करता येईल.

(३) पोटकलम (२) मध्ये अन्यथा उपबंधित केले असेल तेवढे वगळून एरव्ही,—

(क) महानगर दंडाधिकाऱ्याने किंवा सहायक सत्र न्यायाधीशाने अथवा प्रथम वर्ग किंवा द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याने केलेल्या संपरीक्षेत सिद्धदोष ठरवण्यात आलेल्या, किंवा

(ख) कलम ३२५ खाली शिक्षादेश देण्यात आलेल्या, किंवा

(ग) जिच्याबाबत कोणत्याही दंडाधिकाऱ्याने कलम ३६० खाली आदेश किंवा शिक्षादेश दिलेला असेल अशा,

कोणत्याही व्यक्तीला सत्र न्यायालयाकडे अपील करता येईल.

३७५. कलम ३७४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, आरोपी व्यक्तीने आपण दोषी असल्याची कबुली दिली असेल आणि अशा कबुलीत तिला सिद्धदोष ठरवण्यात आले असेल त्याबाबतीत—

(क) दोषसिद्धी उच्च न्यायालयाने केली असेल तर; किंवा

(ख) दोषसिद्धी सत्र न्यायालयाने, महानगर दंडाधिकाऱ्याने अथवा प्रथम किंवा द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याने केली असेल तर, शिक्षेची व्याप्ती किंवा वैधता या बाबी खेरीजकरून,

त्यावर अपील होणार नाही. आरोपी आपण दोषी असल्याची कबुली देईल अशा विवक्षित प्रकरणी अपील नाही.

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम २८ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

क्षुल्लक खटल्यांत अपील नाही.

३७६. कलम ३७४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, पुढीलपैकी कोणत्याही बाबतीत म्हणजे,–

(क) उच्च न्यायालय जास्तीत जास्त सहा महिने इतक्या मुदतीच्या कारावासाचाच किंवा जास्तीत जास्त एक हजार रुपये इतक्या द्रव्यदंडाचाच किंवा असा कारावास व द्रव्यदंड या दोन्हींचा शिक्षादेश देईल त्याबाबतीत;

(ख) सत्र न्यायालय किंवा महानगर दंडाधिकारी जास्तीत जास्त तीन महिने इतक्या मुदतीच्या कारावासाचाच किंवा जास्तीत जास्त दोनशे रुपये इतक्या द्रव्यदंडाचाच किंवा असा कारावास व द्रव्यदंड या दोन्हींचा शिक्षादेश देईल त्याबाबतीत ;

(ग) प्रथम वर्ग दंडाधिकारी जास्तीत जास्त शंभर रुपये इतक्या द्रव्यदंडाचाच शिक्षादेश देईल त्याबाबतीत; किंवा

(घ) संक्षिप्त संपरीक्षा करण्यात आलेल्या खटल्यात, ते काम चालवण्यास कलम २६० खाली शक्ती प्रदान करण्यात आलेला दंडाधिकारी जास्तीत जास्त दोनशे रुपये इतक्या द्रव्यदंडाचाच शिक्षादेश देईल त्याबाबतीत ;

सिद्धदोष व्यक्तीला अपील करता येणार नाही :

परंतु, अशा कोणत्याही शिक्षेला अन्य कोणतीही शिक्षा जोडलेली असेल तर, तिच्याविरुद्ध अपील करता येईल, पण :––

(एक) आरोपी व्यक्तीने शांतता राखण्यासाठी जामीन द्यावा असा तिला आदेश दिलेला आहे ; किंवा

(दोन) द्रव्यदंडाचा भरणा करण्यात कसूर झाल्यास कारावास देण्याबद्दलचा निदेश शिक्षादेशात समाविष्ट आहे; किंवा

(तीन) त्या खटल्यात द्रव्यदंडाचे एकाहून अधिक आदेश दिलेले आहेत (जर लादलेल्या द्रव्यदंडाची एकूण रक्कम त्या खटल्याच्या बाबतीत यात यापूर्वी विनिर्दिष्ट केलेल्या रकमेहून अधिक नसेल तर);

एवढ्याच कारणावरून अशा शिक्षेवर अपील करता येणार नाही.

राज्य शासनाकडून शिक्षेविरुद्ध अपील.

३७७. (१) पोटकलम (२) मध्ये अन्यथा उपबंधित केले असेल तेवढे वगळून एरव्ही, उच्च न्यायालयाहून अन्य कोणत्याही न्यायालयाने केलेल्या संपरीक्षेत जेथे दोषसिद्धी झाली असेल अशा कोणत्याही खटल्यात, राज्य शासन सरकारी अभियोक्त्याला ती शिक्षा अपुरी असल्याच्या कारणावरून तीविरुद्ध उच्च न्यायालयाकडे अपील सादर करण्याचा निदेश देऊ शकेल.

(२) ज्या खटल्यात "दिल्ली विशेष पोलीस आस्थापना अधिनियम, १९४६' (१९४६ चा २५) याखाली घटित झालेल्या दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेने अथवा या संहितेहून अन्य अशा कोणत्याही केंद्रीय अधिनियमाखाली अपराधाबाबत अन्वेषण करण्याची शक्ती प्रदान झालेल्या अन्य कोणत्याही यंत्रणेने अपराधाबाबत अन्वेषण केलेले असेल त्यात जर अशी दोषसिद्धी झाली तर, सरकारी अभियोक्त्याला, ती शिक्षा अपुरी असल्याच्या कारणावरून तीविरुद्ध उच्च न्यायालयाकडे अपील सादर करण्याचा [१][केंद्र शासनदेखील निदेश देऊ शकेल.]

(३) जेव्हा शिक्षा अपुरी असल्याच्या कारणावरून त्या शिक्षेविरुद्ध अपील दाखल करण्यात आले असेल तेव्हा, आरोपीला शिक्षावाढीविरुद्ध कारण दाखवण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज उच्च न्यायालय शिक्षा वाढवणार नाही आणि कारण दाखवताना आरोपीला आपली दोषमुक्ती करण्याबद्दल किंवा शिक्षेत कपात करण्याबद्दल प्रतिकथन करता येईल.

दोषमुक्तीच्या बाबतीत अपील.

३७८. (१) पोटकलम (२) मध्ये अन्यथा उपबंधित केले असेल तेवढे वगळून एरव्ही व पोटकलमे (३) व (५) यांच्या उपबंधांच्या अधीनतेने, राज्य शासन कोणत्याही बाबतीत सरकारी अभियोक्त्याला, उच्च न्यायालयाहून अन्य कोणत्याही न्यायालयाने दिलेल्या दोषमुक्तीच्या मूळ किंवा अपीली आदेशावर [२][किंवा सत्र न्यायालयाने पुनरीक्षणान्ती दिलेल्या दोषमुक्तीच्या] आदेशावर उच्च न्यायालयाकडे अपील सादर करण्याचा निदेश देऊ शकेल.

(२) 'दिल्ली विशेष पोलीस आस्थापना अधिनियम, १९४६' (१९४६ चा २५) याखाली घटित झालेल्या दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेने किंवा या संहितेहून अन्य कोणत्याही केंद्रीय अधिनियमाखाली अपराधाचे अन्वेषण करण्याची शक्ती प्रदान झालेल्या कोणत्याही यंत्रणेने अपराधाचे अन्वेषण केलेले आहे अशा कोणत्याही खटल्यात असा दोषमुक्तीचा आदेश दिलेला असेल तर, केंद्र शासन सरकारी अभियोक्त्याला, दोषमुक्तीच्या आदेशावर उच्च न्यायालयाकडे पोटकलम (३) च्या उपबंधाच्या अधीनतेने अपील सादर करण्याचा निदेश देऊ शकेल.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खालील कोणतेही अपील उच्च न्यायालयाच्या परवानगीशिवाय विचारार्थ स्वीकारले जाणार नाही.

---

१. १९७८ चा अधिनियम ४५ चे कलम २९ द्वारे "केंद्र शासन" याऐवजी "केंद्र शासनदेखील" हा मजकूर घातला (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

(४) जर दिलेल्या फिर्यादीवरून सुरू केलेल्या कोणत्याही खटल्यात असा दोषमुक्तीचा आदेश देण्यात आला आणि फिर्याददाराने उच्च न्यायालयाकडे अर्ज केल्यावर त्याने दोषमुक्तीच्या आदेशावर अपील करण्यास विशेष अनुज्ञा दिली तर, फिर्याददाराला उच्च न्यायालयाकडे असे अपील सादर करता येईल.

(५) दोषमुक्तीच्या आदेशावर अपील करण्यास विशेष अनुज्ञा मिळण्यासाठी पोटकलम (४) खाली केलेला अर्ज, दोषमुक्तीच्या त्या आदेशाच्या दिनांकापासून गणना करता, फिर्याददार हा लोकसेवक असल्यास त्याच्या बाबतीत सहा महिने व अन्य प्रत्येक बाबतीत साठ दिवस संपल्यानंतर उच्च न्यायालय विचारार्थ स्वीकारणार नाही.

(६) जर कोणत्याही खटल्यात, दोषमुक्तीच्या आदेशावर अपील करण्यास विशेष अनुज्ञा मिळण्यासाठी पोटकलम (४) खाली केलेला अर्ज नाकारला गेला तर, दोषमुक्तीच्या त्या आदेशावर पोटकलम (१) खाली किंवा पोटकलम (२) खाली अपील होऊ शकणार नाही.

**उच्च न्यायालयाने केलेल्या दोषसिद्धी-विरुद्ध विवक्षित बाबतीत अपील.**

३७९. जेव्हा उच्च न्यायालयाने अपीलांती आरोपीच्या दोषमुक्तीचा आदेश फिरवून त्याला सिद्धदोष ठरवले असेल व त्याला मृत्यूची किंवा आजीव कारावासाची अथवा दहा वर्षे किंवा त्याहून अधिक मुदतीच्या कारावासाची शिक्षा दिली असेल तेव्हा, त्याला सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करता येईल.

**विवक्षित बाबतीत अपिलाचा विशेष हक्क.**

३८०. या प्रकरणात काहीही अंतर्भूत असले तरीही, जेव्हा एका संपरीक्षेत एकाहून अधिक व्यक्तींना सिद्धदोष ठरवण्यात आले असेल व अशांपैकी कोणत्याही व्यक्तीबाबत अपीलपात्र न्यायनिर्णय किंवा आदेश देण्यात आला असेल तेव्हा, अशा संपरीक्षेत सिद्धदोष ठरलेल्या सर्व व्यक्तींना किंवा त्यांपैकी कोणालाही अपिलाचा हक्क असेल.

**सत्र न्यायालयाकडे केलेल्या अपिलाची सुनावणी कशी केली जाते.**

३८१. (१) पोटकलम (२) च्या उपबंधाच्या अधीनतेने, सत्र न्यायालयाकडे किंवा सत्र न्यायाधीशांकडे केलेल्या अपिलाची सुनावणी सत्र न्यायाधीश किंवा अपर सत्र न्यायाधीश करील :

परंतु, द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याने केलेल्या संपरीक्षेत झालेल्या दोषसिद्धीविरुद्ध केलेल्या अपिलाची सुनावणी व निकाल सहायक सत्र न्यायाधीशाला किंवा मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याला करता येईल.

(२) अपर सत्र न्यायाधीश, सहायक सत्र न्यायाधीश किंवा मुख्य न्याय दंडाधिकारी, हा त्या विभागाचा सत्र न्यायाधीश सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे त्याच्याकडे जी अपिले सोपवील अथवा उच्च न्यायालय त्याला ज्यांची सुनावणी करण्यास विशेष आदेशाद्वारे निदेश देईल अशाच अपिलांची सुनावणी करील.

**अपील विनंती अर्ज.**

३८२. प्रत्येकी अपील, अपीलकर्त्याने किंवा त्याच्या वकिलाने लेखी सादर केलेल्या विनंतीअर्जाच्या रूपात केला जाईल, व अशा प्रत्येक विनंतीअर्जासोबत, (ज्याच्याकडे तो सादर केला आहे त्या न्यायालयाने अन्यथा निर्देशित केले नसेल तर) ज्याविरुद्ध अपील केले त्या न्यायनिर्णयाची किंवा आदेशाची प्रत जोडावी लागेल.

**अपीलकर्ता तुरुंगात असेल तेव्हाची कार्यपद्धती.**

३८३. जर अपीलकर्ता तुरुंगात असेल तर, त्याला आपला अपिलाचा विनंतीअर्ज व त्यासोबतच्या प्रती तुरुंगाच्या अंमलदार अधिकाऱ्यांकडे सादर करता येतील व तो अधिकारी तद्नंतर असा विनंती अर्ज व प्रती योग्य त्या अपील न्यायालयाकडे पाठवील.

**अपील विनासोपस्कार खारीज करणे.**

३८४. (१) जर कलम ३८२ किंवा कलम ३८३ खाली मिळालेल्या व अपील विनंतीअर्जाचे व न्यायनिर्णयाच्या प्रतीचे परीक्षण केल्यावर अपील न्यायालयाला हस्तक्षेप करण्यास पुरेसे कारण नाही असे वाटले तर, त्यास अपील विनासोपस्कार खारीज करता येईल :

परंतु,—

(क) कलम ३८२ खाली सादर केलेले कोणतेही अपील, हे अपीलकर्त्याला किंवा त्याच्या वकिलाला त्या अपिलाच्या पुष्ट्यर्थ आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी मिळाल्याशिवाय खारीज केले जाणार नाही;

(ख) कलम ३८३ खाली सादर केलेले कोणतेही अपील हे अपीलकर्त्याला त्या अपिलाच्या पुष्ट्यर्थ आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज खारीज केले जाणार नाही—मात्र ते क्षुल्लक आहे किंवा हवालातीतील आरोपीला न्यायालयापुढे हजर करण्याने त्या प्रकरणाच्या परिस्थितीच्या मानाने फारच गैरसोय होणार आहे असे अपील न्यायालयाला वाटले तर गोष्ट वेगळी;

(ग) कलम ३८३ खाली सादर केलेले कोणतेही अपील सादर करण्यासाठी दिलेला कालावधी संपेपर्यंत असे कोणतेही अपील विनासोपस्कार खारीज केले जाणार नाही.

(२) या कलमाखाली अपील खारीज करण्यापूर्वी न्यायालयाला त्या खटल्याचा अभिलेख मागवता येईल.

(३) जेव्हा या कलमाखाली अपील खारीज करणारे अपील न्यायालय हे सत्र न्यायालय किंवा मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याचे न्यायालय असेल तेव्हा, ते तसे करण्याची आपली कारणे नमूद करील.

(४) जेव्हा कलम ३८३ खाली सादर केलेले अपील या कलमाखाली विनासोपस्कार खारीज केले जाईल व कलम ३८२ खाली त्याच अपीलकर्त्याच्या वतीने रीतसर सादर केलेला दुसरा अपील विनंती अर्ज आपण विचारात घेतलेला नाही असे अपील न्यायालयाला आढळून येईल तेव्हा, कलम ३९३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कायद्यानुसार अशा अपिलाची सुनावणी व निकाल करणे हे न्यायहितार्थ जरुरीचे अशी त्या न्यायालयाची खात्री पटली तर, त्याला तसे करता येईल.

विनासोपस्कार खारीज न केलेल्या अपिलांच्या सुनावणीची कार्यपद्धती.

३८५. (१) जर अपील न्यायालयाने अपील विनासोपस्कार खारीज केले नाही तर, ते न्यायालय—

(एक) अपीलकर्त्याला किंवा त्याच्या वकिलाला;

(दोन) राज्य शासन यासंबंधात नियुक्त करील अशा अधिकाऱ्याला ;

(तीन) फिर्यादीवरून सुरू केलेल्या खटल्यातील दोषसिद्धीच्या न्यायनिर्णयावर अपील केलेले असेल तर फिर्याददाराला;

(चार) जर कलम ३७७ किंवा कलम ३७८ खाली अपील केलेले असेल तर आरोपीला, कोणत्या वेळी व स्थळी अशा अपिलाची सुनावणी होईल याबद्दलची नोटीस देईल व अशा अधिकाऱ्याला, फिर्याददाराला किंवा आरोपीला अपिलाच्या कारणांची प्रतही पुरवील.

(२) नंतर अपील न्यायालयात त्या खटल्याचा अभिलेख त्यावेळी उपलब्ध नसेल तर, ते न्यायालय असा अभिलेख मागवील व पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेईल :

परंतु, जर अपील फक्त शिक्षेच्या व्याप्तीविषयी किंवा वैधतेविषयीच असेल तर, न्यायालयाला अभिलेख न मागवताही अपिलाचा निकाल करता येईल.

(३) जेथे दोषसिद्धीवर अपील करण्यास अपीलकर्त्याच्या म्हणण्याप्रमाणे कडक शिक्षा हेच फक्त कारण असेल तर, अन्य कोणत्याही कारणाच्या पुष्टयर्थ, न्यायालयाच्या अनुज्ञेखेरीज त्याला आपले म्हणणे पुढे मांडता येणार नाही किंवा ते ऐकून घेतले जाणार नाही.

अपील न्यायालयाच्या शक्ती.

३८६. अशा अभिलेखाचे अवलोकन केल्यानंतर व अपिलकर्त्याचे किंवा त्याचा वकील उपस्थित राहिल्यास त्याचे व सरकारी अभियोक्ता उपस्थित राहिल्यास त्याचे आणि कलम ३७७ किंवा कलम ३७८ खालील अपिलाच्या बाबतीत आरोपी उपस्थित राहिल्यास त्याचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर जर, हस्तक्षेप करण्यास पुरेसे कारण नाही असे अपील न्यायालयाला वाटले तर, ते न्यायालय अपील खारीज करू शकेल अथवा,—

(क) दोषमुक्तीच्या आदेशावरील अपिलात, असा आदेश फिरवू शकेल व आणखी चौकशी करावी किंवा, प्रकरणपरत्वे, आरोपीची पुन्हा संपरीक्षा करावी किंवा त्याला संपरीक्षा होईपावेतो हवालातीत ठेवावे असा निदेश देऊ शकेल किंवा त्याला दोषी ठरवून कायद्यानुसार शिक्षादेश देऊ शकेल;

(ख) दोषसिद्धीवरील अपिलात,—

(एक) निष्कर्ष व शिक्षादेश फिरवून आरोपीला दोषमुक्त करू शकेल किंवा विनादोषारोप सोडू शकेल अगर अशा अपील न्यायालयाला दुय्यम असलेल्या सक्षम अधिकारितेच्या न्यायालयाने त्याची पुन्हा संपरीक्षा करावी किंवा त्याला संपरीक्षेसाठी सुपूर्द करावे असा आदेश देऊ शकेल, अथवा

(दोन) शिक्षादेश कायम ठेवून निष्कर्षात फेरबदल करू शकेल, अथवा

(तीन) निष्कर्षात फेरबदल करून किंवा केल्याशिवाय, शिक्षेचे स्वरूप किंवा व्याप्ती यात अगर स्वरूप आणि व्याप्ती यांत जेणेकरून ती शिक्षा वाढणार नाही अशाप्रकारे फेरबदल करू शकेल;

(ग) शिक्षावाढीसाठी केलेल्या अपिलात,—

(एक) निष्कर्ष व शिक्षादेश फिरवून आरोपीला दोषमुक्त करू शकेल किंवा विनादोषारोप सोडू शकेल अगर त्या अपराधाची संपरीक्षा करण्यास सक्षम असलेल्या न्यायालयाने आरोपीची पुन्हा संपरीक्षा करावी असा आदेश देऊ शकेल, अथवा

(दोन) शिक्षादेश कायम ठेवून निष्कर्षात फेरबदल करू शकेल अथवा,

(तीन) निष्कर्षात फेरबदल करून किंवा केल्याशिवाय, शिक्षेचे स्वरूप किंवा व्याप्ती यांत अगर स्वरूप आणि व्याप्ती यांत जेणेकरून शिक्षा वाढेल किंवा कमी होईल अशाप्रकारे फेरबदल करू शकेल;

(घ) अन्य कोणत्याही आदेशावरील अपिलात, अशा आदेशात फेरबदल करू शकेल किंवा तो फिरवू शकेल;

(ङ) न्याय्य किंवा योग्य असेल असे कोणतेही विशोधन अथवा कोणताही परिणामी किंवा आनुषंगिक आदेश देऊ शकेल :

परंतु, आरोपीला शिक्षावाढीविरुद्ध कारण दाखवण्याची संधी मिळाल्याशिवाय ती शिक्षा याप्रमाणे वाढवली जाणार नाही :

परंतु आणखी असे की, अपील न्यायालय त्याच्या मते आरोपीने जो अपराध केला असेल त्याबद्दल अपीलाधीन आदेश किंवा शिक्षादेश देणारे न्यायालय जी शिक्षा देऊ शकले असते तीहून मोठी शिक्षा देणार नाही.

३८७. २७ व्या प्रकरणामध्ये अंतर्भूत असलेल्या मूळ अधिकारितेच्या फौजदारी न्यायालयाच्या न्याय-निर्णयासंबंधीचे नियम, सत्र न्यायालयाने किंवा मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याने अपीलान्ती दिलेल्या न्याय-निर्णयाला, शक्य होईल तेथवर, लागू असतील : दुय्यम अपील न्यायालयांचे न्यायनिर्णय.

परंतु, न्यायनिर्णय दिला जात असता तो ऐकण्यासाठी आरोपीला तेथे आणले जाणार नाही किंवा हजर राहण्यास फर्मावले जाणार नाही-मात्र अपील न्यायालयाने अन्य निदेश दिला तर गोष्ट वेगळी.

३८८. (१) जेव्हाकेव्हा उच्च न्यायालयाने या प्रकरणाखाली एखाद्या खटल्याचा अपीलान्ती निर्णय दिला असेल तेव्हा, ज्याविरुद्ध अपील केले असेल तो निष्कर्ष, शिक्षादेश किंवा आदेश ज्या न्यायालयाने लिहिला किंवा दिला होता त्या न्यायालयाकडे ते आपला न्यायनिर्णय किंवा आदेश प्रमाणित करून पाठवील व जर असे न्यायालय हे मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याहून अन्य न्याय दंडाधिकाऱ्याचे न्यायालय असेल तर, उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय किंवा आदेश मुख्य न्याय दंडाधिकाऱ्यामार्फत पाठवला जाईल; व जर असे न्यायालय हे कार्यकारी दंडाधिकाऱ्याचे न्यायालय असेल तर, उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय किंवा आदेश जिल्हा दंडाधिकाऱ्यामार्फत पाठवला जाईल. उच्च न्यायालयाने अपीलान्ती दिलेला आदेश कनिष्ठ न्यायालयाकडे प्रमाणित करून पाठविणे.

(२) ज्या न्यायालयाकडे उच्च न्यायालय आपला न्यायनिर्णय किंवा आदेश प्रमाणित करून पाठवील ते त्यावरून उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाला किंवा आदेशाला अनुरुप असणारे असे आदेश देईल; व जरूर तर, अभिलेख त्यानुसार विशोधित केला जाईल.

३८९. (१) सिद्धदोष व्यक्तीने केलेले अपील प्रलंबित असताना कारणे लेखी नमूद करून त्याकरता अपील न्यायालय, ज्याविरुद्ध अपील केलेले असेल त्या शिक्षादेशाची किंवा आदेशाची अंमलबजावणी निलंबित करावी असा व जर ती व्यक्ती बंदिवासात असेल तर, तिला जामिनावर किंवा तिच्या जात-मुचलक्यावरून सोडावे असाही आदेश देऊ शकेल. अपील प्रलंबित असताना शिक्षादेशाचे निलंबन ; अपीलकर्त्याची जामिनावर सुटका.

(२) सिद्धदोष व्यक्तीने उच्च न्यायालयाला दुय्यम असलेल्या न्यायालयाकडे अपील केले असल्यास, या कलमाने अपील न्यायालयास प्रदान केलेली शक्ती उच्च न्यायालयासही त्या बाबतीत वापरता येईल.

(३) अपील सादर करण्याचा आपला उद्देश आहे याबाबत सिद्धदोष व्यक्तीने, तिला ज्या न्यायालयाने सिद्धदोष ठरवले असेल त्याची खात्री पटवली तर,—

(एक) अशी व्यक्ती जामिनावर असून तिला जास्तीत जास्त तीन वर्षे इतक्या मुदतीच्या कारावासाचा शिक्षादेश मिळाला असेल त्या बाबतीत, किंवा

(दोन) ज्या अपराधाबद्दल अशा व्यक्तीला सिद्धदोष ठरवण्यात आले तो, जामीनपात्र असून ती व्यक्ती जामिनावर असेल त्या बाबतीत,

अपील सादर केले जाण्यास व पोटकलम (१) खाली अपील न्यायालयाचे आदेश मिळण्यास पुरेसा वेळ मिळेल इतक्या कालावधीकरता ते न्यायालय जामीन नाकारण्यास विशेष कारणे नसल्यास, सिद्धदोष व्यक्तीला जामिनावर सोडण्याचा आदेश देईल; आणि ती व्यक्ती याप्रमाणे जामिनावर सुटलेली असेल तोपर्यंत कारावासाचा शिक्षादेश निलंबित असल्याचे मानण्यात येईल.

(४) सरतेशेवटी अपीलकर्त्याला काही मुदतीच्या कारावासाचा किंवा आजीव कारावासाचा शिक्षादेश दिला जाईल तेव्हा, ज्या कालावधीत त्याला याप्रमाणे सोडलेले असेल तो कालावधी जितक्या मुदतीची शिक्षा त्याला दिलेली असेल तिची गणना करताना वगळण्यात येईल.

३९०. जेव्हा कलम ३७८ खाली अपील सादर केले जाईल तेव्हा, उच्च न्यायालय आरोपीला अटक करून आपणापुढे किंवा कोणत्याही दुय्यम न्यायालयापुढे आणण्याचा निदेश देणारे वॉरंट काढू शकेल व ज्या न्यायालयापुढे त्याला आणले जाईल ते त्याला अपिलाचा निकाल होईपर्यंत कारागृहात पाठवू शकेल किंवा त्याला जामिनावर सोडू शकेल. दोषमुक्तीवरील अपीलाचे कामी आरोपीला अटक.

३९१. (१) या प्रकरणाखाली कोणत्याही अपिलाचे काम पाहताना अपील न्यायालयाला अधिक पुराव्याची जरूरी वाटली तर, ते आपली कारणे नमूद करून स्वतः असा पुरावा घेऊ शकेल अथवा दंडाधिकाऱ्याने अगर अपील न्यायालय हे उच्च न्यायालय असेल तेव्हा सत्र न्यायालयाने किंवा दंडाधिकाऱ्याने तो पुरावा घ्यावा असा निदेश देऊ शकेल. अपील न्यायालय अधिक पुरावा घेऊ शकेल किंवा तो घेण्याचा निदेश देऊ शकेल.

(२) जेव्हा सत्र न्यायालय किंवा दंडाधिकारी अधिक पुरावा घेईल तेव्हा, ते किंवा तो असा पुरावा अपील न्यायालयाकडे प्रमाणित करून पाठवील व तद्नंतर असे न्यायालय अपिलाचा निकाल करण्याच्या कामास सुरुवात करील.

(३) जेव्हा अधिक पुरावा घेण्यात येईल तेव्हा, आरोपीला किंवा त्याच्या वकिलाला उपस्थित राहण्याचा हक्क असेल.

(४) या कलमाखाली पुरावा घेण्याचे काम हे जणू काही चौकशी करण्याचे काम असावे त्याप्रमाणे ते तेविसाव्या प्रकरणाच्या उपबंधास अधीन असेल.

अपील न्यायालयातील न्यायाधीश मताच्या बाबतीत समसमान विभागले जातील त्यावेळची कार्यपद्धती.

३९२. जेव्हा या प्रकरणाखालील अपिलाची सुनावणी उच्च न्यायालयाने काही न्यायाधीशांच्या न्यायपीठासमोर केली असून, त्यांच्यात मतभेद झालेला असेल तेव्हा, त्यांच्या मतासहित अपील त्या न्यायालयाच्या दुसऱ्या न्यायाधीशापुढे ठेवले जाईल, व तो न्यायाधीश स्वत:ला योग्य वाटेल अशा सुनावणीनंतर आपले मत देईल, व न्यायनिर्णय किंवा आदेश त्या मतानुसार होईल :

परंतु, जर न्यायपीठाच्या घटक-न्यायाधीशांपैकी एका न्यायाधीशाने किंवा या कलमाखाली दुसऱ्या न्यायाधीशासमोर अपील ठेवलेले असेल तर त्या बाबतीत, त्या न्यायाधीशाने तसे आवश्यक केल्यास त्याहून मोठ्या न्यायपीठाकरवी अपिलाची फेर सुनावणी व निर्णय केला जाईल.

अपिलान्ती दिलेल्या न्यायनिर्णयांची व आदेशांची अंतिमता.

३९३. अपील न्यायालयाने अपिलान्ती दिलेले न्यायनिर्णय व आदेश एकोणतिसाव्या प्रकरणातील कलम ३७७, कलम ३७८, कलम ३८४ चे पोटकलम (४) यांमध्ये किंवा तिसाव्या प्रकरणामध्ये उपबंधित केलेल्या बाबी खेरीजकरून अन्य बाबतीत अंतिम असतील :

परंतु, कोणत्याही खटल्यातील दोषसिध्दीविरुद्ध करण्यात आलेल्या अपिलाचा अंतिम निकाल केलेला असला तरी,—

(क) कलम ३७८ खाली दोषमुक्तीविरुद्ध केलेल्या, त्याच खटल्यातून उद्‌भवणाऱ्या अपिलाची किंवा,

(ख) कलम ३७७ खाली शिक्षा वाढवण्यासाठी केलेल्या, त्याच खटल्यातून उद्‌भवणाऱ्या अपिलाची,

अपील न्यायालयाला गुणावगुणानुसार सुनावणी करता येईल व त्याचा निकाल करता येईल.

अपिले अवसान पावणे.

३९४. (१) कलम ३७७ किंवा कलम ३७८ खालील प्रत्येक अपील आरोपीचा मृत्यू होताच कायमचे अवसान पावेल.

(२) (द्रव्यदंडाच्या शिक्षादेशावरील अपील खेरीजकरून) या प्रकरणाखालील अन्य प्रत्येक अपील अपीलकर्त्यांचा मृत्यू होताच कायमचे अवसान पावेल :

परंतु, जेव्हा अपील दोषसिद्धीविरुद्ध व मृत्यूच्या किंवा कारावासाच्या शिक्षादेशाविरुद्ध असेल आणि अपील प्रलंबित असताना अपीलकर्ता मृत्यू पावला असेल तेव्हा, त्याच्या जवळच्या नातलगांपैकी कोणालाही अपीलकर्त्यांच्या मृत्यूपासून तीस दिवसांच्या आत, अपील चालू ठेवण्यास अनुज्ञा मिळण्यासाठी अपील न्यायालयाकडे अर्ज करता येईल ; व जर अनुज्ञा दिली गेली तर, अपील अवसान पावणार नाही.

स्पष्टीकरण.—या कलमात, "जवळचा नातलग" याचा अर्थ, आई-वा-बाप, पती-वा-पत्नी, रेषीय वंशज, भाऊ किंवा बहीण, असा आहे.

## प्रकरण तीस

## निर्देशन पुनरीक्षण

उच्च न्यायालयाकडे निर्देशन.

३९५. (१) आपणांपुढे प्रलंबित असलेल्या खटल्यात कोणत्याही अधिनियमाच्या अध्यादेशाच्या किंवा विनियमाच्या अथवा अधिनियमात, अध्यादेशात किंवा विनियमात असलेल्या कोणत्याही उपबंधांच्या विधिग्राह्यतेबाबत असा एखादा प्रश्न अंतर्भूत आहे की, त्याचा निर्णय करणे हे खटल्याचा निकाल करण्यासाठी आवश्यक आहे याबाबत कोणत्याही न्यायालयाची खात्री झाली असेल आणि असा अधिनियम, अध्यादेश, विनियम किंवा उपबंध विधिबाह्य किंवा अप्रवर्ती आहे असे त्याचे मत असेल, पण ते न्यायालय ज्याला दुय्यम आहे त्या उच्च न्यायालयाने किंवा सर्वोच्च न्यायालयाने तसे घोषित केलेले नसेल त्या बाबतीत, ते न्यायालय आपले मत व त्यामागील आपली कारणे देऊन त्या प्रकरणाचे परिकथन तयार करील, आणि उच्च न्यायालयाच्या निर्णयार्थ ते निर्देशित करील.

**स्पष्टीकरण.**—या कलमात "विनियम" याचा अर्थ, 'सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७' (१८९७ चा १०) यामध्ये किंवा एखाद्या राज्याच्या 'सर्वसाधारण वाक्खंड अधिनियमात' व्याख्या केली असेल तसा कोणताही अधिनियम, असा आहे.

(२) सत्र न्यायालयापुढे किंवा महानगर दंडाधिकाऱ्यापुढे प्रलंबित असलेल्या ज्या खटल्याला पोटकलम (१) चे उपबंध लागू नाहीत त्या खटल्यात त्याला योग्य वाटल्यास, अशा खटल्याच्या सुनावणीत उद्‌भवणारा कोणताही विधिप्रश्न उच्च न्यायालयाच्या निर्णयार्थ निर्देशित करता येईल.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली उच्च न्यायालयाकडे निर्देशित करणारे कोणतेही न्यायालय त्यावरील उच्च न्यायालयाचा निर्णय होईपावेतो आरोपीला तुरुंगात पाठवू शकेल किंवा फर्मावले जाईल तेव्हा उपस्थित होण्यासाठी जामीन घेऊन त्याला सोडू शकेल.

३९६. (१) जेव्हा एखादा प्रश्न याप्रमाणे निर्देशित केलेला असेल तेव्हा उच्च न्यायालय त्यावर त्याला योग्य वाटेल असा आदेश देईल व ज्या न्यायालयाने ते निर्देशन केले त्याच्या अशा आदेशाची प्रत पाठवण्याची तजवीज करील व ते न्यायालय उक्त आदेशानुरुप खटल्याचा निकाल करील. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार खटल्याचा निकाल करणे.

(२) उच्च न्यायालय, अशा निर्देशनाचा खर्च कोणी द्यायचा ते निदेशित करू शकेल.

३९७. (१) उच्च न्यायालय किंवा कोणताही सत्र न्यायाधीश आपल्या स्थानिक अधिकारितेत असलेल्या कोणत्याही कनिष्ठ फौजदारी न्यायालयाने लिहिलेल्या किंवा दिलेल्या कोणत्याही निष्कर्षाची शिक्षादेशाची किंवा आदेशाची यथातथ्यता, वैधता किंवा औचित्य याबाबत आणि त्या न्यायालयाच्या कोणत्याही कार्यवाहीची नियमानुसारिता याबाबत स्वत:ची खात्री करून घेण्यासाठी अशा कनिष्ठ न्यायालयासमोरील कोणत्याही कार्यवाहीचा अभिलेख मागवून त्याचे परीक्षण करू शकेल आणि असा अभिलेख मागवताना, कोणत्याही शिक्षादेशाची किंवा आदेशाची अंमलबजावणी निलंबित करावी आणि आरोपी बंदिवासात असल्यास, त्याला अभिलेखाचे परीक्षण होईपावेतो जामीन किंवा त्याचा जातमुचलका घेऊन सोडावे असा निदेश देऊ शकेल. पुनरीक्षणाच्या शक्ती वापरण्यासाठी अभिलेख मागवणे.

**स्पष्टीकरण.**—सर्व दंडाधिकारी—मग ते कार्यकारी असोत वा न्यायिक असोत व मूळ अधिकारिता वापरणारे असोत वा अपील अधिकारिता वापरणारे असोत—या पोटकलमाच्या व कलम ३९८ च्या प्रयोजनार्थ सत्र न्यायाधीशाला दुय्यम असल्याचे मानले जाईल.

(२) पोटकलम (१) द्वारे प्रदान केलेल्या पुनरीक्षणाच्या शक्ती कोणत्याही अपिलात, चौकशीत संपरीक्षेत किंवा अन्य कार्यवाहीत दिलेल्या कोणत्याही अंतर्वादिक आदेशाच्या संबंधात वापरल्या जाणार नाहीत.

(३) जर या कलमाखाली कोणत्याही व्यक्तीने उच्च न्यायालयाकडे किंवा सत्र न्यायाधीशाकडे कोणताही अर्ज केलेला असेल तर, त्याच व्यक्तीने केलेला आणखी कोणताही अर्ज त्यांच्यापैकी कोणीही विचारार्थ स्वीकारणार नाही.

३९८. कलम ३९७ खाली किंवा अन्यथा कोणत्याही अभिलेखाचे परीक्षण केल्यावर उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायाधीश, कलम २०३ खालील किंवा कलम २०४ च्या पोटकलम (४) खाली काढून टाकलेल्या कोणत्याही फिर्यादीबाबत किंवा अपराधाचा आरोप असलेल्या ज्या व्यक्तीला विनादोषारोप सोडलेले असेल तिच्या प्रकरणाबाबत मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याने स्वत: किंवा त्याला दुय्यम असलेल्यापैकी कोणत्याही दंडाधिकाऱ्याने आणखी चौकशी करावी असा निदेश देऊ शकेल आणि मुख्य न्याय दंडाधिकारी स्वत: अशी चौकशी करू शकेल किंवा कोणत्याही दुय्यम दंडाधिकाऱ्याला ती करण्याचा निदेश देऊ शकेल : चौकशीचा आदेश देण्याची शक्ती.

परंतु, या कलमाखाली निदेश का दिला जाऊ नये याचे कारण दाखवण्याची संधी विनादोषारोप सोडलेल्या कोणत्याही व्यक्तीला मिळाल्याशिवाय कोणतेही न्यायालय तिच्या प्रकरणाबाबत असा निदेश देणार नाही.

३९९. (१) सत्र न्यायाधीशाला ज्या कोणत्याही कार्यवाहीचा अभिलेख त्याने स्वत: मागवला असेल तिच्याबाबतीत कलम ४०१ च्या पोटकलम (१) खाली उच्च न्यायालयाला वापरता येतील त्या सर्व किंवा त्यापकी कोणत्याही शक्ती वापरता येतील. सत्र न्यायाधीशाच्या पुनरीक्षणाच्या शक्ती.

(२) जेव्हा पोटकलम (१) खाली सत्र न्यायाधीशासमोर कोणतीही पुनरीक्षणाच्या स्वरूपाची कार्यवाही सुरू झाली असेल तेव्हा, कलम ४०१ ची पोटकलमे (२), (३), (४), व (५) यांचे उपबंध शक्य होईल तेथवर अशा कार्यवाहीला लागू असतील व उक्त पोटकलमांतील उच्च न्यायालयाच्या निदेशांचा अर्थ सत्र न्यायाधीशांचे निर्देश म्हणून लावला जाईल.

(३) जेव्हा सत्र न्यायाधीशापुढे कोणत्याही व्यक्तीने किंवा तिच्या वतीने पुनरीक्षणासाठी कोणताही अर्ज केला असेल तेव्हा, सत्र न्यायाधीशाचा अशा व्यक्तीसंबंधीचा त्यावरील निर्णय अंतिम असेल व अशा व्यक्तीच्या चालनेने होणारी पुनरीक्षणाच्या स्वरूपाची आणखी कोणतीही कार्यवाही उच्च न्यायालय किंवा अन्य कोणतेही न्यायालय विचारार्थ स्वीकारणार नाही.

४००. सत्र न्यायाधीशाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे किंवा त्याखाली अपर सत्र न्यायाधीशाकडे वर्ग केलेल्या कोणत्याही खटल्याबाबत, त्याला या प्रकरणाखालील सत्र न्यायाधीशाच्या सर्व शक्ती असतील व त्या वापरता येतील. अपर सत्र न्यायाधीशाची शक्ती.

४०१. (१) उच्च न्यायालयाने ज्या कोणत्याही कार्यवाहीचा अभिलेख स्वत: मागविला असेल किंवा जी अन्यथा त्याला माहीत झाली असेल त्या कार्यवाहीच्या बाबतीत, स्वविवेकानुसार उच्च न्यायालय ३८६, ३८९, ३९० व ३९१ या कलमांद्वारे अपील-न्यायालयाला आणि कलम ३०७ द्वारे सत्र न्यायालयाला प्रदान केलेल्यापकी कोणत्याही शक्तीचा वापर करू शकेल व जेव्हा पुनरीक्षण-न्यायालयाचे घटक न्यायाधीश मतांच्या बाबतीत समसमान विभागले गेले असतील तेव्हा, कलम ३९२ द्वारे उपबंधित केलेल्या रीतीने खटल्याचा निकाल केला जाईल. उच्च न्यायालयाच्या पुनरीक्षण शक्ती.

(२) आरोपीला किंवा अन्य व्यक्तीला स्वतःच्या बचावासाठी जातीनिशी किंवा वकिलामार्फत आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळाल्याशिवाय तिला बाधक असा कोणताही आदेश या कलमाखाली दिला जाणार नाही.

(३) या कलमातील कोणतीही गोष्ट उच्च न्यायालयाला दोषमुक्तीच्या निष्कर्षाचे दोषसिद्धीच्या निष्कर्षात रूपांतर करण्यास प्राधिकृत करते असे मानले जाणार नाही.

(४) जेव्हा या संहितेखाली अपील होऊ शकत असेल व अपील आणलेले नसेल तेव्हा, जो पक्षकार अपील करू शकला असता त्याच्या चालनेने होणारी पुनरीक्षणाच्या स्वरूपाची कार्यवाही विचारार्थ स्वीकारली जाणार नाही.

(५) या संहितेखाली अपील होऊ शकत असले तरी एखाद्या व्यक्तीने उच्च न्यायालयाकडे पुनरीक्षणासाठी अर्ज केलेला असेल आणि उच्च न्यायालयाकडे अपील होऊ शकत नाही, अशा चुकीच्या समजुतीने असा अर्ज केलेला असून पुनरीक्षण-अर्ज म्हणजे अपील विनंतीअर्ज असल्याचे समजून चालणे न्यायहितार्थ जरुरीचे आहे अशी उच्च न्यायालयाची खात्री होईल त्याबाबतीत, त्याला तसे करता येईल व तद्नुसार त्या विनंती-अर्जाचे काम पाहता येईल.

**पुनरीक्षणाचे खटले काढून घेण्याची किंवा वर्ग करण्याची उच्च न्यायालयाची शक्ती.**

४०२. (१) जेव्हा केव्हा एका संपरीक्षेत सिद्धदोष ठरलेल्या एका किंवा अधिक व्यक्तींनी उच्च न्यायालयाकडे पुनरीक्षणासाठी अर्ज केला असेल व त्याच संपरीक्षेत सिद्धदोष ठरलेल्या कोणत्याही व्यक्तीने सत्र न्यायाधीशाकडे पुनरीक्षणासाठी अर्ज केला असेल तेव्हा, पक्षकारांची सर्वसाधारण सोय व अंतर्भूत असलेल्या प्रश्नांचे महत्व लक्षात घेऊन उच्च न्यायालय दोहोंपैकी कोणत्या न्यायालयाने पुनरीक्षण-अर्जाचा अंतिम निकाल करावा हा निर्णय करील व जेव्हा पुनरीक्षणाच्या सर्व अर्जांचा निकाल स्वतःच करावा असे उच्च न्यायालय ठरवील तेव्हा, सत्र न्यायाधीशापुढे प्रलंबित असलेले पुनरीक्षणाचे अर्ज आपणांकडे वर्ग करावेत असे उच्च न्यायालय निदेशित करील व जेव्हा पुनरीक्षणाच्या अर्जांचा निकाल स्वतःच करण्याची जरूरी नाही असे उच्च न्यायालय ठरवील तेव्हा, आपणांकडे करण्यात आलेले पुनरीक्षणाचे अर्ज सत्र न्यायाधीशाकडे वर्ग केले जावेत असे ते निदेशित करील.

(२) जेव्हाकेव्हा कोणताही पुनरीक्षण-अर्ज उच्च न्यायालयाकडे वर्ग केला जाईल तेव्हा, ते न्यायालय जणू काही तो अर्ज खुद्द त्याच्यासमोर रीतसर केलेला असावा त्याप्रमाणे त्याचे काम पाहिल.

(३) जेव्हाकेव्हा कोणताही पुनरीक्षण-अर्ज सत्र न्यायाधीशाकडे वर्ग केला जाईल तेव्हा, तो न्यायाधीश जणू काही तो अर्ज खुद्द त्याच्यासमोर रीतसर केलेला असावा त्याप्रमाणे त्याचे काम पाहिल.

(४) जेव्हा एखादा पुनरीक्षणाचा अर्ज उच्च न्यायालयाने सत्र न्यायाधीशाकडे वर्ग केला असेल तेव्हा, ज्या व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या पुनरीक्षण-अर्जाचा निकाल सत्र न्यायाधीशाने केला असेल त्यांच्या चालनेने आलेला आणखी कोणताही पुनरीक्षण-अर्ज उच्च न्यायालयाकडे किंवा अन्य कोणत्याही न्यायालयाकडे चालू शकणार नाही.

**पक्षकारांचे म्हणणे एकण्याचा न्यायालयाचा विकल्पाधिकार.**

४०३. या संहितेने अन्यथा व्यक्तपणे उपबंधित केले असेल तेवढे वगळून एरव्ही, आपल्या पुनरीक्षण शक्तींचा वापर करणाऱ्या कोणत्याही न्यायालयासमोर कोणत्याही पक्षकाराला जातिनिशी किंवा वकिलामार्फत आपले म्हणणे मांडण्याचा हक्क नाही; पण अशा शक्तींचा वापर करताना स्वतःला योग्य वाटल्यास ते न्यायालय कोणत्याही पक्षकाराने जातीनिशी किंवा वकिलामार्फत मांडलेले म्हणणे ऐकून घेऊ शकेल.

**महानगर दंडाधिकाऱ्याने दिलेले आपल्या निर्णयाच्या कारणांचे कथन उच्च न्यायालयाने विचारात घेणे.**

४०४. जेव्हा कलम ३९७ खाली उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय हे महानगर दंडाधिकाऱ्याने केलेल्या कोणत्याही संपरीक्षेचा अभिलेख मागवील तेव्हा, दंडाधिकाऱ्याला अभिलेखासोबत आपल्या निर्णयाची किंवा आदेशाची कारणे व त्याला त्या वादप्रश्नाच्या दृष्टीने महत्वपूर्ण वाटतील अशी कोणतीही तथ्ये देणारे कथन सादर करता येईल; आणि उक्त निर्णय किंवा आदेश अधिशून्य किंवा अपास्त करण्यापूर्वी न्यायालय असे कथन विचारात घेईल.

**उच्च न्यायालयाचा आदेश कनिष्ठ न्यायालयाकडे प्रमाणित करून पाठविणे.**

४०५. जेव्हा उच्च न्यायालयाने किंवा सत्र न्यायाधीशाने या प्रकरणाखाली एखाद्या खटल्याचे पुनरीक्षण केले असेल तेव्हा, ते न्यायालय किंवा तो न्यायाधीश पुनरीक्षित निष्कर्ष, शिक्षादेश किंवा आदेश ज्या न्यायालयाने लिहिला किंवा दिला होता त्याच्याप्रत आपला निर्णय किंवा आदेश कलम ३८८ मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने प्रमाणित करून पाठविल, आणि ज्या न्यायालयाला तो निर्णय किंवा आदेश याप्रमाणे प्रमाणित केला जाईल ते त्यावर याप्रमाणे प्रमाणित केलेल्या निर्णयानुरूप असतील असे आदेश देईल; व जरूर तर, अभिलेख तद्नुसार विशोधित केला जाईल.

## प्रकरण एकतीस

## फौजदारी खटले वर्ग करणे

४०६. (१) न्यायाची उद्दिष्टे साधण्यासाठी या कलमाखाली आदेश देणे समयोचित आहे असे जेव्हाकेव्हा सर्वोच्च न्यायालयाला दाखवून देण्यात येईल तेव्हा, ते एखादा विशिष्ट खटला किंवा अपील एका उच्च न्यायालयाकडून दुसऱ्या उच्च न्यायालयाकडे किंवा एका उच्च न्यायालयाला दुय्यम असलेल्या फौजदारी न्यायालयाकडून दुसऱ्या उच्च न्यायालयाला दुय्यम अशा, तितकीच किंवा वरिष्ठ अधिकारिता असलेल्या दुसऱ्या फौजदारी न्यायालयाकडे वर्ग केला जावा असा निदेश देऊ शकेल. खटले व अपिले वर्ग करण्याची सर्वोच्च न्यायालयाची शक्ती.

(२) भारताचा महान्यायवादी किंवा हितसंबंधित पक्ष यांच्या अर्जावरूनच सर्वोच्च न्यायालयाला या कलमाखाली कार्यवाही करता येईल ; व असा प्रत्येक अर्ज चालना-अर्जाद्वारे केला जाईल, व ज्या बाबतीत अर्जदार हा भारताचा महान्यायवादी किंवा राज्याचा महाअधिवक्ता असेल तेवढी बाब खेरीज-करून एरव्ही, त्या अर्जाला प्रतिज्ञालेखाद्वारे किंवा दृढकथनाद्वारे पुष्टी द्यावी लागेल.

(३) या कलमाने प्रदान केलेल्या शक्तींचा वापर केला जाण्यासाठी केलेला कोणताही अर्ज काढून टाकला जाईल त्या बाबतीत अर्ज थिल्लरपणाचा किंवा तापदायक होता असे सर्वोच्च न्यायालयाचे मत झाल्यास, ते ज्या कोणत्याही व्यक्तीला अर्जाचा विरोध करावा लागला असेल तिला अर्जदाराने त्या प्रकरणाच्या परिस्थितीत न्यायालयाला योग्य वाटेल त्याप्रमाणे जास्तीत जास्त एक हजार रुपये इतकी रक्कम भरपाई म्हणून द्यावी असा आदेश देऊ शकेल.

**४०७.** (१) जेव्हाकेव्हा उच्च न्यायालयाला असे दाखवून देण्यात येईल की,— खटले व अपिले वर्ग करण्याची उच्च न्यायालयाची शक्ती.

(क) त्याला दुय्यम असलेल्या एखाद्या न्यायालयात न्याय व निःपक्षपाती चौकशी किंवा संपरीक्षा होऊ शकत नाही ; किंवा

(ख) असाधारण अडचणीचा एखादा विधिप्रश्न उद्भवण्याचा संभव आहे ; किंवा

(ग) या कलमाखाली आदेश देणे हे या संहितेच्या एखाद्या उपबंधानुसार आवश्यक आहे अथवा ते पक्षकारांना किंवा साक्षीदारांना सर्वसाधारणपणे सोयीचे होईल किंवा न्यायाची उद्दिष्टे साधण्यासाठी समयोचित आहे,

तेव्हा ते न्यायालय असा आदेश देऊ शकेल की,—

(एक) १७७ ते १८५ (दोन्ही धरून) या कलमाखाली अर्हता नसलेल्या पण इतर बाबतीत एखाद्या अपराध्याची चौकशी किंवा संपरीक्षा करण्यास सक्षम असलेल्या कोणत्याही न्यायालयाने अशा अपराधाची चौकशी किंवा संपरीक्षा करावी ;

(दोन) कोणताही विशिष्ट खटला किंवा अपील, अथवा विशिष्ट वर्गातील खटले किंवा अपिले आपल्या हुकूमतीखालील एखाद्या फौजदारी न्यायालयाकडून समान किंवा वरिष्ठ अधिकारिता असलेल्या अशा अन्य कोणताही फौजदारी न्यायालयाकडे वर्ग करण्यात यावे ;

(तीन) एखादा विशिष्ट खटला सत्र न्यायालयाकडे संपरीक्षेसाठी सुपूर्द करावा ; किंवा

(चार) कोणताही विशिष्ट खटला किंवा अपील खुद्द आपणांकडे वर्ग करण्यात येऊन, आपणांसमोर त्याची संपरीक्षा केली जावी.

(२) उच्च न्यायालयाला कनिष्ठ न्यायालयाच्या अहवालावरून किंवा हितसंबंधित पक्षाच्या अर्जावरून किंवा स्वप्रेरणेने कार्यवाही करता येईल :

परंतु, त्याच सत्र-विभागात एका फौजदारी न्यायालयाकडून दुसऱ्या फौजदारी न्यायालयाकडे खटला वर्ग केला जाण्यासाठी सत्रन्यायाधीशाकडे अर्ज करण्यात येऊन त्याने तो नाकारला असल्याशिवाय, खटला याप्रमाणे वर्ग करण्यासाठी उच्च न्यायालयाकडे अर्ज करता येणार नाही.

(३) पोटकलम (१) खालील आदेशासाठी करावयाचा प्रत्येक अर्ज चालना-अर्जाद्वारे केला जाईल व ज्या बाबतीत अर्जदार हा राज्याचा महाअधिवक्ता असेल ती बाब खेरीजकरून एरव्ही, त्या अर्जाला प्रतिज्ञालेखाद्वारे किंवा दृढकथनाद्वारे पुष्टी द्यावी लागेल.

(४) जेव्हा असा अर्ज आरोपी व्यक्तीने केला असेल तेव्हा, उच्च न्यायालय पोट-कलम (७) खाली जी कोणतीही भरपाई देववील ती देण्याबद्दल आरोपीला ते न्यायालय जामीनदारासह किंवा त्यांच्या विना असे बंधपत्र निष्पादित करून देण्याचा निदेश देऊ शकेल.

(५) असा अर्ज करणाऱ्या प्रत्येक आरोपी व्यक्तीने सरकारी अभियोक्त्याला अर्जाची लेखी नोटीस व सोबत ज्या आधारकारणांवरून तो अर्ज केला त्यांची प्रत दिली पाहिजे व अशी नोटीस देण्याच्या व अर्जाची सुनावणी होण्याच्या दरम्यान निदान चोवीस तास लोटले असल्याशिवाय अर्जाच्या गुणावगुणांनुसार कोणताही आदेश दिला जाणार नाही.

(६) खटला किंवा अपील कोणत्याही दुय्यम न्यायालयाकडून वर्ग केले जाण्यासाठी अर्ज आलेला असेल त्या बाबतीत, अर्जाचा निकाल होईपर्यंत दुय्यम न्यायालयातील कार्यवाही स्थगित करणे न्यायाच्या हिताचे जरुरीचे आहे अशी उच्च न्यायालयाची खात्री पटली तर, ज्या अटी लादणे आपणास योग्य वाटेल अशा अटींवर उच्च न्यायालय ती स्थगित करण्याचा आदेश देऊ शकेल :

परंतु, अशा स्थगनामुळे दुय्यम न्यायालयाच्या कलम ३०९ खाली हवालातीत परत पाठवणी करण्याचा शक्तीवर परिणाम होणार नाही.

(७) पोटकलम (१) खालील आदेशासाठी आलेला अर्ज काढून टाकण्यात येईल. त्या बाबतीत, अर्ज थिल्लरपणाचा किंवा तापदायक होता असे उच्च न्यायालयाचे मत झाल्यास, ते ज्या कोणत्याही व्यक्तीला अर्जाचा विरोध करावा लागला असेल तिला अर्जदाराने त्या प्रकरणाच्या परिस्थितीत न्यायालयाला योग्य वाटेल त्याप्रमाणे जास्तीत जास्त एक हजार रुपये इतकी रक्कम भरपाई म्हणून द्यावी असा आदेश देऊ शकेल.

(८) जेव्हा उच्च न्यायालय पोटकलम (१) खाली एखाद्या न्यायालयातून खटला आपणापुढे संपरीक्षेसाठी वर्ग केला जावा असा आदेश देईल तेव्हा, जर खटला याप्रमाणे वर्ग झाला नसता तर त्या न्यायालयाने जी प्रक्रिया अनुसरली असती तीच प्रक्रिया उच्च न्यायालय अशा संपरीक्षेत अनुसरील.

(९) या कलमातील कोणतीही गोष्ट कलम १९७ खाली शासनाने दिलेल्या कोणत्याही आदेशावर परिणाम करते असे मानले जाणार नाही.

**खटले व अपिले वर्ग करण्याची सत्र न्यायाधीशाची शक्ती.**

४०८. (१) जेव्हाकेव्हा न्यायाची उद्दिष्टे साधण्यासाठी या पोटकलमाखाली आदेश देणे समयोचित आहे असे सत्र न्यायाधीशाला दाखवून देण्यात येईल तेव्हा, तो एखादा विशिष्ट खटला त्याच्या सत्र-विभागातील एका फौजदारी न्यायालयातून दुसऱ्या फौजदारी न्यायालयात वर्ग केला जावा असा आदेश देऊ शकेल.

(२) सत्र न्यायाधीशाला कनिष्ठ न्यायालयाच्या अहवालावरून किंवा हित संबंधित पक्षाच्या अर्जावरून किंवा स्वप्रेरणेने कार्यवाही करता येईल.

(३) कलम ४०७ च्या (३), (४), (५), (६), (७) व (९) या पोटकलमांचे उपबंध जसे कलम ४०७ च्या पोटकलम (१) खालील आदेशासाठी उच्च न्यायालयाकडे करावयाच्या अर्जासंबंधात लागू होतात तसे ते या कलमाच्या पोटकलम (१) खालील आदेशासाठी सत्र न्यायाधीशाकडे करावयाच्या अर्जास लागू होतील—मात्र या कलमाच्या पोटकलम (७) मधील "एक हजार रुपये" याऐवजी "दोनशे पन्नास रुपये" हा शब्दोल्लेख घातलेला असावा त्याप्रमाणे ते पोटकलम लागू होईल.

**सत्र न्यायाधीशांनी खटले व अपिले काढून घेणे.**

४०९. (१) सत्र न्यायाधीशाला आपणास दुय्यम असलेल्या कोणत्याही सहायक सत्र न्यायाधीशाकडून किंवा मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याकडून कोणताही खटला किंवा अपील काढून घेता येईल किंवा आपण त्याच्याकडे सोपवलेला कोणताही खटला किंवा अपील परत मागवता येईल.

(२) सत्र न्यायाधीशाला आपण कोणत्याही अपर सत्र न्यायाधीशाकडे सोपवलेला कोणताही खटला किंवा अपील त्या न्यायाधीशापुढे खटल्याची संपरीक्षा किंवा अपिलाची सुनावणी सुरू होण्यापूर्वी कोणत्याही वेळी परत मागवता येईल.

(३) सत्र न्यायाधीश पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली खटला किंवा अपील काढून घेईल किंवा परत मागवील त्या बाबतीत, त्याला एकतर त्याच्या स्वतःच्या न्यायालयात खटल्याची संपरीक्षा करता येईल किंवा त्याला स्वतःला अपिलाची सुनावणी करता येईल, अथवा, प्रकरणपरत्वे संपरीक्षेसाठी किंवा सुनावणीसाठी या संहितेच्या उपबंधानुसार ते काम दुसऱ्या न्यायालयाकडे सोपवता येईल.

**न्याय दंडाधिकाऱ्यांनी खटले काढून घेणे.**

४१०. (१) कोणत्याही मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याला आपणांस दुय्यम असलेल्या दंडाधिकाऱ्यांकडून कोणताही खटला काढून घेता येईल किंवा आपण त्याच्याकडे सोपवलेला कोणताही खटला परत मागवता येईल व त्याला स्वतःला अशा खटल्याची चौकशी किंवा संपरीक्षा करता येईल, अथवा त्याची चौकशी किंवा संपरीक्षा करण्यास सक्षम असलेल्या अशा अन्य कोणत्याही दंडाधिकाऱ्याकडे तो चौकशीसाठी किंवा संपरीक्षेसाठी निर्देशित करता येईल.

(२) कोणत्याही न्याय दंडाधिकाऱ्याला, त्याने कलम १९२ च्या पोटकलम (२) खाली अन्य कोणत्याही दंडाधिकाऱ्याकडे सोपवलेला कोणताही खटला परत मागवता येईल व त्याला स्वतःला अशा खटल्याची चौकशी किंवा संपरीक्षा करता येईल.

**कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी खटले सोपवणे किंवा काढून घेणे.**

४११. कोणत्याही जिल्हा दंडाधिकाऱ्याला किंवा उप-विभागीय दंडाधिकाऱ्याला,—

(क) आपणांपुढे सुरु झाली असेल अशी कोणतीही कार्यवाही निकालात काढण्यासाठी आपणास दुय्यम असलेल्या कोणत्याही दंडाधिकाऱ्याकडे ती सोपवता येईल;

(ख) आपणास दुय्यम असलेल्या कोणत्याही दंडाधिकाऱ्याकडून कोणताही खटला काढून घेता येईल किंवा आपण त्याच्याकडे सोपवला असेल असा कोणताही खटला परत मागवता येईल आणि स्वतःच अशी कार्यवाही निकालात काढता येईल किंवा ती निकालात काढण्यासाठी अन्य कोणत्याही दंडाधिकाऱ्याकडे निर्देशित करता येईल.

**४१२.** कलम ४०८, कलम ४०९, कलम ४१० किंवा कलम ४११ खाली आदेश देणारा सत्र न्यायाधीश किंवा दंडाधिकारी तो आदेश देण्याची आपली कारणे नमूद करील. **कारणे नमूद करणे.**

## प्रकरण बत्तीस

## शिक्षांची अंमलबजावणी, निलंबन, माफी व सौम्यीकरण

### क—मृत्युदंड

**४१३.** जेव्हा मृत्युदंड कायम करण्यासाठी उच्च न्यायालयाकडे सादर केलेल्या खटल्यात, उच्च न्यायालयाचा त्यावरील कायमीकरणाचा किंवा अन्य आदेश सत्र न्यायालयाला मिळेल तेव्हा, ते न्यायालय वॉरंट काढून किंवा जरूर ती अन्य उपाययोजना करून असा आदेश अंमलात आणवील. **कलम ३६८ खाली दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी.**

**४१४.** जेव्हा उच्च न्यायालयाने अपीलान्ती किंवा पुनरीक्षणान्ती मृत्यूची शिक्षा दिली असेल तेव्हा, उच्च न्यायालयाचा आदेश मिळाल्यावर सत्र न्यायालय वॉरंट काढून शिक्षा अंमलात आणवील. **उच्च न्यायालयाने दिलेल्या मृत्युदंडाची अंमलबजावणी.**

**४१५.** (१) उच्च न्यायालयाने एखाद्या व्यक्तीला मृत्यूची शिक्षा दिली असेल व त्याच्या न्यायनिर्णयावर सर्वोच्च न्यायालयाकडे संविधानाच्या अनुच्छेद १३४-खंड (१) च्या उपखंड (क्) किंवा उपखंड (ख्) खाली अपील होऊ शकत असेल त्याबाबतीत, उच्च न्यायालय असे अपील करण्यासाठी दिलेला कालावधी संपेपर्यंत किंवा त्या कालावधीत अपील केले गेले तर अशा अपिलाचा निकाल केला जाईपर्यंत शिक्षेची अंमलबजावणी पुढे ढकलण्याचा आदेश देईल. **सर्वोच्च न्यायालयाकडे अपील होऊ शकत असल्यास, मृत्युदंडाची अंमलबजावणी पुढे ढकलणे.**

(२) उच्च न्यायालयाने मृत्यूची शिक्षा दिली असेल किंवा कायम केली असेल व जिला शिक्षा दिली त्या व्यक्तीने उच्च न्यायालयाकडे संविधानाच्या अनुच्छेद १३२ खाली किंवा अनुच्छेद १३४ मधील खंड (१) च्या उपखंड (ग्) खाली प्रमाणपत्र दिले जाण्यासाठी अर्ज केला असेल त्याबाबतीत, उच्च न्यायालय अशा अर्जाचा निकाल करीपर्यंत, किंवा जर अशा अर्जावरून प्रमाणपत्र दिले गेले तर अशा प्रमाणपत्रावरून सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करण्यासाठी दिलेला कालावधी संपेपर्यंत शिक्षेची अंमलबजावणी पुढे ढकलण्याचा उच्च न्यायालय आदेश देईल.

(३) उच्च न्यायालयाने मृत्यूची शिक्षा दिली असेल किंवा कायम केली असेल व जिला शिक्षा दिली त्या व्यक्तीचा, संविधानाच्या अनुच्छेद १३६ खाली अपिलासाठी विशेष अनुज्ञा दिली जाण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडे विनंतीअर्ज सादर करण्याचा इरादा आहे अशी उच्च न्यायालयाची खात्री झाली असेल त्याबाबतीत, ते असा विनंतीअर्ज सादर करणे त्या व्यक्तीला शक्य होण्यासाठी आपणास पुरेसा वाटेल इतका काळ शिक्षेची अंमलबजावणी पुढे ढकलण्याचा आदेश देईल.

**४१६.** जिला मृत्यूची शिक्षा दिलेली आहे ती स्त्री गर्भवती असल्याचे आढळून आले तर, उच्च न्यायालय शिक्षेची अंमलबजावणी पुढे ढकलण्याचा आदेश देईल व त्याला योग्य वाटेल तर ती शिक्षा आजीव कारावासाच्या शिक्षेत परिवर्तित करून ती सौम्य करू शकेल. **गर्भवती स्त्रीची देहान्ताची शिक्षा पुढे ढकलणे.**

### ख—कारावास

**४१७.** (१) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे अन्यथा उपबंधित केले असेल तेवढे खेरीजकरून, या संहितेखाली कारावासात ठेवण्यास किंवा हवालातीत ठेवण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीला कोणत्या स्थळी बंदिवासात ठेवावे याबाबत राज्य शासन निदेश देऊ शकेल. **कारावासाचे स्थळ नियत करण्याची शक्ती.**

(२) जर या संहितेखाली कारागृहात किंवा हवालातीत ठेवण्यास पात्र असलेली कोणतीही व्यक्ती दिवाणी तुरुंगात बंदिवासात असेल तर, कारावासात किंवा हवालातीत ठेवण्याचा आदेश देणारे न्यायालय किंवा दंडाधिकारी त्या व्यक्तीला फौजदारी तुरुंगात हलवण्याचा निदेश देऊ शकेल.

(३) जेव्हा पोटकलम (२) खाली एखाद्या व्यक्तीला फौजदारी तुरुंगात हलवले जाईल तेव्हा, तिची तेथून सुटका झाल्यावर तिला पुन्हा दिवाणी तुरुंगात परत पाठवले जाईल ; मात्र—

(क्) तिला फौजदारी तुरुंगात हलवल्यापासून तीन वर्षे लोटली असतील तर त्याबाबतीत 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) कलम ५८ किंवा, प्रकरणपरत्वे, 'प्रांतीय दिवाळखोरी अधिनियम, १९२०' (१९२० चा ५) कलम २३ खाली तिची सुटका झाली असल्याचे मानले जाईल ; किंवा

(ख्) ज्या न्यायालयाने तिला दिवाणी तुरुंगात ठेवण्याचा आदेश दिला त्याने 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) कलम ५८ किंवा, प्रकरणपरत्वे, 'प्रांतीय दिवाळखोरी अधिनियम, १९२०' (१९२० चा ५) कलम २३ खाली सुटका होण्यास ती व्यक्ती हक्कदार आहे असे फौजदारी तुरुंगाच्या अंमलदार अधिकाऱ्याला प्रमाणपत्राने कळवले तर, तिला याप्रमाणे दिवाणी तुरुंगात परत पाठवले जाणार नाही.

कारावासाच्या शिक्षेची अंमलबजावणी. ४१८. (१) कलम ४१३ मध्ये ज्यांसाठी उपबंध केला आहे त्याहून अन्य खटल्यांमध्ये आरोपीला आजीव कारावासाची किंवा काही मुदतीच्या कारावासाची शिक्षा दिली जाईल तेव्हा, जेथे आरोपीला बंदिवासात ठेवले असेल किंवा ठेवावयाचे असेल अशा तुरुंगाकडे किंवा अन्य स्थळाकडे शिक्षा देणारे न्यायालय तात्काळ वॉरंट पाठवील व आरोपीला याप्रमाणे आधीच अशा तुरुंगात किंवा अन्य स्थळी बंदिवासात ठेवलेले नसेल तर त्याला वॉरंटासह अशा तुरुंगात किंवा अन्य स्थळी पाठवून देईल :

परंतु, आरोपीला न्यायालयाने उठेपर्यंत कारावासाची शिक्षा दिली असेल त्याबाबतीत वॉरंट तयार करण्याची किंवा तुरुंगात पाठवण्याची जरुरी असणार नाही व न्यायालय निदेशित करील अशा स्थळी आरोपीला बंदिवासात ठेवता येईल.

(२) आरोपीला पोटकलम (१) मध्ये नमूद केलेली अशी कारावासाची शिक्षा देतेवेळी, तो न्यायालयात हजर नसेल त्याबाबतीत न्यायालय त्याला जेथे बंदिवासात ठेवावयाचे त्या तुरुंगात किंवा त्या स्थळी पाठवण्यासाठी त्याच्या अटकेचे वॉरंट काढील ; व अशा बाबतीत, शिक्षा त्याच्या अटकेच्या दिनांकास सुरू होईल.

वॉरंट अंमलबजावणीसाठी निदेशून काढणे. ४१९. कारावासाच्या शिक्षेच्या अंमलबजावणीबाबतचे प्रत्येक वॉरंट जेथे कैद्याला बंदिवासात ठेवले असेल किंवा ठेवावयाचे असेल अशा तुरुंगाच्या किंवा अन्य स्थळांच्या अंमलदार अधिकाऱ्यास निदेशून काढले जाईल.

वॉरंट कोणाकडे दाखल करावयाचे. ४२०. जेव्हा कैद्याला तुरुंगामध्ये बंदिवासात ठेवावयाचे असेल तेव्हा वॉरंट तुरुंगाधिकाऱ्याकडे दाखल केले जाईल.

### ग—द्रव्यदंड वसूल करणे

द्रव्यदंडाच्या वसुलीसाठी वॉरंट. ४२१. (१) जेव्हा एखाद्या अपराध्याला द्रव्यदंड भरण्याची शिक्षा देण्यात आली असेल तेव्हा, शिक्षा देणाऱ्या न्यायालयास पुढीलपकी कोणत्याही मार्गाने किंवा दोन्ही मार्गांनी द्रव्यदंडाच्या वसुलीसाठी कारवाई करता येईल, ते न्यायालय :—

(क) अपराध्याच्या कोणत्याही जंगम संपत्तीची जप्ती व विक्री करून रक्कम वसूल करण्यासाठी वॉरंट काढू शकेल ;

(ख) कसूरदाराच्या जंगम किंवा स्थावर संपत्तीतून किंवा दोन्हींतून ती रक्कम जमीन-महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यास त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याला प्राधिकृत करणारे वॉरंट त्या जिल्हाधिकाऱ्याला निदेशून काढू शकेल :

परंतु, द्रव्यदंड भरण्यात कसूर झाल्यास अपराध्याला कारावासात ठेवले जावे असे जर शिक्षादेशात निदेशित केले असेल व तशी कसूर झाल्यामुळे अशा अपराध्याने संपूर्ण कारावास भोगला असेल तर, कोणतेही न्यायालय असे वॉरंट काढणार नाही ; मात्र तसे करणे जरूरीचे आहे असे त्याला विशेष कारणास्तव वाटले तर ती कारणे लेखी नमूद करून अथवा कलम ३५७ खाली द्रव्यदंडातून खर्च किंवा भरपाई देण्याचा आदेश त्याने दिला असेल तर, ते असे वॉरंट काढू शकेल.

(२) राज्य शासनाला पोटकलम (१) च्या खंड (क) खालील वॉरंटाची अंमलबजावणी कोणत्या रीतीने करावयाची त्यासंबंधी विनियमन करण्यासाठी व अशा वॉरंटाची अंमलबजावणी करताना जप्त केलेल्या कोणत्याही संपत्तीबाबत अपराध्याहून अन्य कोणत्याही व्यक्तीने सांगितलेल्या कोणत्याही हक्क-मागण्यांचा संक्षेपतः निर्णय करण्यासाठी नियम करता येतील.

(३) न्यायालय पोटकलम (१) च्या खंड (ख) खाली जिल्हाधिकाऱ्याला निदेशून वॉरंट काढील त्याबाबतीत, जिल्हाधिकारी असे वॉरंट म्हणजे जणू काही जमीन-महसूलाच्या थकबाकीसंबंधीच्या कायद्याखाली दिलेले प्रमाणपत्र असावे त्याप्रमाणे अशा कायद्यानुसार ती रक्कम वसूल करील :

परंतु, अशा कोणत्याही वॉरंटाची अंमलबजावणी अपराध्याला अटक करून किंवा त्याला कारागृहात स्थानबद्ध करून केली जाणार नाही.

अशा वॉरंटाचा परिणाम. ४२२. कोणत्याही न्यायालयाने कलम ४२१ च्या पोटकलम (१) च्या खंड (क) खाली काढलेल्या वॉरंटाची अंमलबजावणी अशा न्यायालयाच्या स्थानिक अधिकारितेत करता येईल व अशा अधिकारिते-बाहेरील अशी कोणतीही संपत्ती ज्याच्या स्थानिक अधिकारितेत सापडेल त्या जिल्हा दंडाधिकाऱ्याने ते वॉरंट पृष्ठांकित केले की, त्याद्वारे अशा संपत्तीची जप्ती व विक्री करणे प्राधिकृत होईल.

जेथे या संहितेचा विस्तार नाही अशा कोणत्याही राज्यक्षेत्रातील न्यायालयाने द्रव्यदंडाच्या वसुलीसाठी काढलेले वॉरंट. ४२३. या संहितेत किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे या संहितेचा विस्तार नाही अशा कोणत्याही राज्यक्षेत्रातील फौजदारी न्यायालयाने अशा कोणत्याही अपराध्याला द्रव्यदंड भरण्याची शिक्षा दिलेली असेल व जेथे या संहितेचा विस्तार आहे त्या राज्यक्षेत्रांतील एखाद्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याला जणू काही ती रक्कम जमीन-महसुलाची थकबाकी असावी त्याप्रमाणे ती वसूल करण्यास प्राधिकृत करणारे वॉरंट शिक्षा देणाऱ्या न्यायालयाने त्याला निदेशून काढलेले असेल तेव्हा, असे वॉरंट हे जेथे या संहितेचा विस्तार आहे त्या राज्यक्षेत्रातील न्यायालयाने कलम ४२१ च्या पोटकलम (१) च्या खंड (ख) खाली काढलेले वॉरंट असल्याचे मानले जाईल, व अशा वॉरंटाच्या अंमलबजावणी बाबतचे उक्त कलमाच्या पोटकलम (३) मधील उपबंध तदनुसार लागू होतील.

४२४. (१) जेव्हा एखाद्या अपराध्याला फक्त द्रव्यदंडाचीच शिक्षा देण्यात आली असेल व द्रव्यदंड भरण्यात कसूर झाल्यास कारावासाची शिक्षा फर्मावण्यात आली असेल व द्रव्यदंड तात्काळ भरला गेला नसेल तेव्हा, न्यायालय,— कारावासाच्या शिक्षादेशाच्या अंमलबजावणीचे निलंबन.

(क) असा आदेश देऊ शकेल की, एकतर आदेशाच्या दिनांकापासून उशिरात उशिरा तीस दिवसांपर्यंत कोणत्याही दिनांकास किंवा तत्पूर्वी द्रव्यदंड एकदम सगळा भरला जावा अथवा दोन किंवा तीन हप्त्यांनी दिला जावा व त्यांपैकी पहिला हप्ता आदेशाच्या दिनांकापासून उशिरात उशिरा तीस दिवसांपर्यंत कोणत्याही दिनांकास किंवा तत्पूर्वी आणि अन्य हप्ता किंवा हप्ते जास्तीत जास्त तीस दिवसांच्या कालांतराने किंवा, प्रकरणपरत्वे, कालांतरागणिक भरला जावा ;

(ख) ज्या दिनांकास किंवा दिनांकांना किंवा ज्यापूर्वी द्रव्यदंडाचा किंवा, प्रकरणपरत्वे, त्याच्या हप्त्यांचा भरणा करावयाचा त्या दिनांकास किंवा दिनांकांना अपराध्याने उपस्थित व्हावे अशी शर्त अंतर्भूत असलेले असे, न्यायालयाला योग्य वाटेल त्याप्रमाणे जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना असे बंधपत्र अपराध्याने निष्पादित करून दिल्यावर कारावासाच्या शिक्षेची अंमलबजावणी निलंबित करून अपराध्याची सुटका करू शकेल ; आणि द्रव्यदंडाची किंवा, प्रकरणपरत्वे, त्याच्या कोणत्याही हप्त्याची रक्कम आदेशानुसार उशिरात उशिरा ज्या अखेरच्या दिनांकास प्रदेय होती त्या दिनांकास किंवा तत्पूर्वी वसूल झाली नाही तर, न्यायालय लगेच कारावासाच्या शिक्षेची अंमलबजावणी करण्याचा निदेश देऊ शकेल.

(२) पैशाचा भरणा केला जावा व तो वसूल न झाल्यास कारावासाची शिक्षा द्यावी असा आदेश देण्यात आला असून पैशाचा तात्काळ भरणा झाला नसेल अशाही प्रकरणी, पोटकलम (१) चे उपबंध लागू असतील; आणि ज्या व्यक्तीविरुद्ध आदेश देण्यात आला तिने त्या पोटकलमात निर्दिष्ट करण्यात आलेले असे बंधपत्र करून देणे आवश्यक केले असता ती तसे करण्यास चुकली तर, न्यायालय लगेच कारावासाचा शिक्षादेश देऊ शकेल.

### घ—अंमलबजावणीविषयक सर्वसाधारण उपबंध

४२५. शिक्षेच्या अंमलबजावणीसाठी काढावयाचे प्रत्येक वॉरंट ज्याने शिक्षा दिली तो न्यायाधीश किंवा तो दंडाधिकारी किंवा त्याच्या पदाचा उत्तराधिकारी काढू शकेल. वॉरंट कोण काढू शकेल.

४२६. (१) जेव्हा पळून गेलेल्या सिद्धदोष अपराध्याला या संहितेखाली मृत्यूची, आजीव कारावासाची किंवा द्रव्यदंडाची शिक्षा दिलेली असेल तेव्हा, त्यात यापूर्वी अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या अधीनतेने, अशी शिक्षा तात्काळ अंमलात येईल. पळून गेलेल्या सिद्धदोष अपराध्याला दिलेली शिक्षा केव्हा अंमलात यावयाची.

(२) जेव्हा पळून गेलेल्या सिद्धदोष अपराध्याला या संहितेखाली काही मुदतीच्या कारावासाची शिक्षा दिली असेल तेव्हा,—

(क) अशी शिक्षा जर असा सिद्धदोष अपराधी पळून गेला तेव्हा जी शिक्षा तो भोगत होता तीहून स्वरूपतः अधिक कडक असेल तर, नवीन शिक्षा तात्काळ अंमलात येईल ;

(ख) अशी शिक्षा जर असा सिद्धदोष अपराधी पळून गेला तेव्हा जी शिक्षा तो भोगत होता तीहून स्वरूपतः अधिक कडक नसेल तर तो पळून जाण्याच्या वेळी आधीच्या त्याच्या शिक्षेपैकी राहिलेल्या भागाइतका आणखी काळ त्याने कारावास भोगल्यानंतर नवीन शिक्षा अंमलात येईल.

(३) पोटकलम (२) च्या प्रयोजनार्थ सश्रम कारावासाची शिक्षा साध्या कारावासाच्या शिक्षेहून अधिक कडक असल्याचे मानले जाईल.

४२७. (१) आधीच कारावासाची शिक्षा भोगत असलेल्या व्यक्तीला जेव्हा नंतरच्या दोषसिद्धीअंती कारावासाची किंवा आजीव कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येईल तेव्हा, नंतरची शिक्षा अशा आधीच्या शिक्षेस समवर्ती असेल असे न्यायालयाने निदेशित केले नाही तर एरव्ही, असा कारावास किंवा आजीव कारावास तिला आधी ज्या कारावासाची शिक्षा झाली होती तो कारावास संपताच सुरू होईल : आधीच दुसऱ्या एखाद्या अपराधाबद्दल शिक्षा झालेल्या अपराध्याला शिक्षा.

परंतु, जामीन देण्यात कसूर केल्याबद्दल ज्या व्यक्तीला कलम १२२ खालील आदेशाद्वारे कारावासाची शिक्षा देण्यात आली असेल ती व्यक्ती अशी शिक्षा भोगत असताना असा आदेश दिला जाण्यापूर्वी केलेल्या अपराधाबद्दल तिला कारावासाची शिक्षा देण्यात येईल त्या बाबतीत, नंतरची शिक्षा तात्काळ सुरू होईल.

(२) आधीच आजीव कारावासाची शिक्षा भोगत असलेल्या एखाद्या व्यक्तीला नंतरच्या दोषसिद्धीअंती काही मुदतीच्या कारावासाची किंवा आजीव कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येईल तेव्हा, नंतरची शिक्षा आधीच्या शिक्षेस समवर्ती असेल.

**आरोपीने भोगलेल्या स्थानबद्धतेच्या कालावधीची कारावासाच्या शिक्षेतून वजावाट करणे.**

४२८. दोषसिद्धीअन्ती आरोपी व्यक्तीला काही मुदतीच्या कारावासाची शिक्षा [1][द्रव्यदंड भरण्यात कसूर झाल्यामुळे भोगावयाच्या कारावासाची शिक्षा नव्हे] ठोठावण्यात आली असेल तेव्हा, त्याच प्रकरणातील अन्वेषणाच्या, चौकशीच्या किंवा संपरीक्षेच्या काळात व अशा दोषसिद्धीच्या दिनांकापूर्वी त्याने जर काही स्थानबद्धता भोगली असेल तर त्या कालावधीची अशा दोषसिद्धीअन्ती त्याला ठोठावण्यात आलेल्या कारावासाच्या मुदतीतून वजावाट केली जाईल, व त्याला ठोठावण्यात आलेल्या कारावासाच्या मुदतीपैकी जर काही मुदत राहिली तर दोषसिद्धीपायीचा कारावास भोगण्याचे अशा व्यक्तीचे दायित्व तेवढ्यापुरते मर्यादित राहील.

**व्यावृत्ती.**

४२९. (१) कोणतीही व्यक्ती आधीच्या किंवा नंतरच्या स्वतःच्या दोषसिद्धीअन्ती ज्या शिक्षेला पात्र झाली असेल तिचा किंवा तिचा कोणताही भाग कलम ४२६ किंवा कलम ४२७ मधील कोणत्याही गोष्टीमुळे तिला माफ होणार नाही.

(२) जेव्हा द्रव्यदंड भरण्यात कसूर झाल्यास भोगावयाची म्हणून दिलेली कारावासाची शिक्षा कारावासाच्या मुख्य शिक्षेस जोडलेली असेल व ती मुख्य शिक्षा भोगणाऱ्या व्यक्तीने त्या शिक्षेच्या अंमलबजावणीनंतर आणखी एक व अनेक कारावासाच्या मुख्य शिक्षा भोगावयाच्या असतील तेव्हा, द्रव्यदंड भरण्यात कसूर झाल्यास भोगावयाच्या कारावासाची शिक्षा ती व्यक्ती उपरोक्त एक वा अनेक पुढील मुख्य शिक्षा भोगीपर्यंत अंमलात आणली जाणार नाही.

**शिक्षेची अंमलबजावणी झाल्यावर वॉरंट प्रतिवेदनासह परत करणे.**

४३०. जेव्हा शिक्षेची संपूर्णपणे अंमलबजावणी करण्यात येईल तेव्हा, तिची अंमलबजावणी करणारा अधिकारी ज्याने ते वॉरंट काढले त्या न्यायालयाकडे, शिक्षेची अंमलबजावणी कशा रीतीने करण्यात आली ते प्रमाणित करणाऱ्या आपल्या सहीच्या पृष्ठांकनासह ते वॉरंट परत पाठवील.

**जे पैसे देण्याबाबत आदेश झाला असेल ते द्रव्यदंड म्हणून वसूल करणे.**

४३१. या संहितेखाली दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या आधारे (द्रव्यदंडाहून अन्य असे) जे पैसे येणे असून ते वसूल करण्याच्या पद्धतीबाबत अन्यथा स्पष्टपणे उपबंध केला नसेल ते म्हणजे जणू काही द्रव्यदंड असावा त्याप्रमाणे वसूल करता येण्यासारखे असतील :

परंतु, कलम ३५९ खालील आदेशास कलम ४२१ लागू करताना, या कलमाच्या आधारे जणू काही कलम ४२१ मधील पोटकलम (१) च्या परंतुकात, "कलम ३५७ खाली द्रव्यदंडातून खर्च किंवा भरपाई देण्याचा आदेश" या मजकुरानंतर "किंवा कलम ३५९ खाली वादखर्च देण्याचा आदेश" हा मजकूर अंतर्भूत केलेला असावा त्याप्रमाणे त्या कलमाचा अर्थ लावला जाईल.

### ङ—शिक्षा निलंबित करणे, त्या माफ करणे व सौम्य करणे

**शिक्षा निलंबित किंवा माफ करण्याची शक्ती.**

४३२. (१) जेव्हा कोणत्याही व्यक्तीला एखाद्या अपराधाबद्दल शिक्षा देण्यात आली असेल तेव्हा, समुचित सरकार कोणत्याही वेळी बिनशर्तपणे किंवा शिक्षा झालेली व्यक्ती स्वीकारील अशा कोणत्याही शर्तीवर तिच्या शिक्षेची अंमलबजावणी निलंबित करू शकेल किंवा तिला जी शिक्षा देण्यात आली असेल ती संपूर्णपणे किंवा तिचा कोणताही भाग माफ करू शकेल.

(२) जेव्हाकेव्हा शिक्षा निलंबित किंवा माफ करण्यासाठी समुचित सरकारकडे अर्ज केला जाईल तेव्हा, समुचित सरकार ज्याच्यासमोर दोषसिद्धी झाली किंवा ज्याने ती कायम केली त्या न्यायालयाच्या पीठासीन न्यायाधीशाकडे, अर्ज मंजूर करावा की नाकारावा याबाबतचे त्याचे मत व त्याबरोबर अशा मतामागील त्याची कारणे निवेदन करण्याची व तसेच अशा मताच्या निवेदनासोबत संपरीक्षेच्या अभिलेखाची किंवा विद्यमान असेल अशा अभिलेखाची प्रमाणित प्रत पाठवण्याची मागणी करू शकेल.

(३) ज्या कोणत्याही शर्तीवर शिक्षा निलंबित किंवा माफ झाली होती त्या शर्तीची समुचित सरकारच्या मते पूर्तता झाली नसेल तर, समुचित सरकारला निलंबन किंवा माफी रद्द करता येईल, व ज्या व्यक्तीची शिक्षा निलंबित किंवा माफ झाली ती व्यक्ती मुक्त असेल तर, तद्नंतर तिला कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकरवी वॉरंटाशिवाय अटक करता येईल व राहिलेल्या भागाची शिक्षा भोगण्यासाठी तिला परत तुरुंगात पाठवता येईल.

(४) या कलमाखाली ज्या शर्तीवर शिक्षा निलंबित किंवा माफ केली जाईल ती शर्त, जिच्या प्रीत्यर्थ शिक्षा निलंबित किंवा माफ झाली त्या व्यक्तीने पूर्ण करावयाची किंवा तिच्या इच्छेवर अवलंबून नसलेली अशी शर्त असू शकेल.

(५) शिक्षांचे निलंबन आणि ज्या शर्तीवर विनंतीअर्ज सादर केले जावेत व विचारात घेतले जावेत त्या शर्ती यांबाबत समुचित सरकार सर्वसाधारण नियमांद्वारे किंवा विशेष आदेशांद्वारे निदेश देऊ शकेल :

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम ३१ द्वारे घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

परंतु, अठरा वर्षांवरील वयाच्या पुरुषाला दिलेल्या (द्रव्यदंडाच्या शिक्षेहून अन्य) कोणत्याही शिक्षेच्या बाबतीत, शिक्षा झालेल्या पुरुष व्यक्तीने किंवा तिच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने केलेला कोणताही विनंतीअर्ज, शिक्षा झालेली व्यक्ती तुरुंगात असून,—

(क) असा विनंतीअर्ज शिक्षा झालेल्या व्यक्तीने केलेला असेल त्याबाबतीत, तो तुरुंगाच्या अंमलदार अधिकाऱ्यामार्फत सादर केला आहे ; किंवा

(ख) असा विनंतीअर्ज अन्य कोणत्याही व्यक्तीने केलेला असेल त्याबाबतीत, शिक्षा झालेली व्यक्ती तुरुंगात आहे असे अधिकथन त्यात अंतर्भूत आहे,

असे असल्याशिवाय असा कोणताही विनंतीअर्ज विचारार्थ स्वीकारला जाणार नाही.

(६) वरील पोटकलमाचे उपबंध हे फौजदारी न्यायालयाने या संहितेच्या किंवा अन्य कोणत्याही कायद्याच्या कोणत्याही कलमाखाली दिलेला जो कोणताही आदेश कोणत्याही व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर निर्बंध घालील अथवा त्याच्यावर किंवा त्याच्या संपत्तीवर दायित्व लादील त्यास लागू असतील.

(७) या कलमात व कलम ४३३ मध्ये "समुचित सरकार" या शब्दप्रयोगाचा अर्थ,—

(क) संघराज्याच्या शासनशक्तीच्या व्याप्तीत येणाऱ्या बाबींसंबंधी एखाद्या कायद्याखालील कोणत्याही अपराधाबद्दल शिक्षा दिलेली असेल किंवा पोटकलम (६) मध्ये निर्दिष्ट केलेला आदेश त्या कायद्याखाली दिलेला असेल त्या प्रकरणी, केंद्र सरकार, असा आहे ;

(ख) अन्य प्रकरणी, ज्या राज्यात अपराध्याला शिक्षा झाली असेल किंवा उक्त आदेश देण्यात आला असेल त्याचे सरकार, असा आहे.

**४३३.** समुचित सरकारला, शिक्षा झालेल्या व्यक्तीच्या संमतीशिवाय,— **शिक्षा सौम्य करण्याची शक्ती.**

(क) मृत्यूची शिक्षा ही 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) द्वारे उपबंधित केलेल्या अन्य कोणत्याही शिक्षेत परिवर्तित करून ;

(ख) आजीव कारावासाची शिक्षा ही जास्तीत जास्त चौदा वर्षे इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेत किंवा द्रव्यदंडाच्या शिक्षेत परिवर्तित करून ;

(ग) सश्रम कारावासाची शिक्षा ही त्या व्यक्तीला जितक्या मुदतीच्या साध्या कारावासाची शिक्षा देता आली असती तितक्या मुदतीच्या साध्या कारावासाच्या शिक्षेत किंवा द्रव्यदंडाच्या शिक्षेत परिवर्तित करून ;

(घ) साध्या कारावासाची शिक्षा ही द्रव्यदंडाच्या शिक्षेत परिवर्तित करून;

सौम्य करता येईल.

[1][**४३३क.** कलम ४३२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या अपराधाबद्दल कायद्याद्वारे उपबंधित केलेल्या शिक्षांपैकी मृत्युदंड ही एक शिक्षा असेल अशा अपराधाबद्दल एखाद्या व्यक्तीला सिद्धदोष ठरवल्यानंतर आजीव कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली असेल किंवा एखाद्या व्यक्तीला ठोठावण्यात आलेली मृत्यूची शिक्षा कलम ४३३ खाली आजीव कारावासाच्या शिक्षेत परिवर्तित करून सौम्य करण्यात आली असेल त्या बाबतीत, अशा व्यक्तीने किमान चौदा वर्षे कारावास भोगल्याखेरीज तिला कारागृहातून मुक्त केले जाणार नाही.] **विवक्षित प्रकरणी शिक्षा माफ करण्याच्या किंवा सौम्य करण्याच्या शक्तीवरील निर्बंध.**

**४३४.** कलमे ४३२ व ४३३ यांद्वारे राज्य सरकारला प्रदान करण्यात आलेल्या शक्ती मृत्युदंडाच्या बाबतीत केंद्र सरकारलाही वापरता येतील. **मृत्युदंडाच्या बाबतीत केंद्र सरकारची समवर्ती शक्ती.**

**४३५.** (१) (क) ज्या अपराधाचे अन्वेषण 'दिल्ली विशेष पोलीस आस्थापना अधिनियम, १९४६ (१९४६ चा २५) याखाली घटित झालेल्या दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेने किंवा या संहितेहून अन्य कोणत्याही केंद्रीय अधिनियमाखाली अपराधाचे अन्वेषण करण्याची शक्ती प्रदान झालेल्या अन्य कोणत्याही यंत्रणेने केले होते, किंवा **विवक्षित प्रकरणी राज्य शासनाने केंद्र सरकारचा विचार घेतल्यानंतर कार्यवाही करणे.**

(ख) ज्या अपराधात केंद्र सरकारच्या कोणत्याही संपत्तीचा अपहार किंवा नाश किंवा नुकसान अनुस्यूत होते, किंवा

(ग) जो अपराध केंद्र सरकारच्या सेवेतील एखाद्या व्यक्तीने आपली पदीय कामे पार पाडताना किंवा तसे म्हणून कार्य करताना केला होता,

त्या अपराधाबद्दल शिक्षा ठोठावलेली असेल अशा कोणत्याही प्रकरणी, शिक्षा माफ किंवा सौम्य करण्यासाठी ४३२ व ४३३ या कलमांनी राज्य सरकारला प्रदान केलेल्या शक्ती राज्य सरकार केंद्र सरकारचा विचार घेतल्याखेरीज वापरणार नाही.

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम ३२ द्वारे घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

(२) ज्यांपैकी काही अपराध संघराज्याच्या शासनशक्तीच्या व्याप्तीत येणाऱ्या बाबींशी संबंधित आहेत अशा अपराधांबद्दल दोषसिद्धी झाली असून ज्या व्यक्तीला समवर्तीपणे भोगावयाच्या वेगवेगळ्या मुदतीच्या शिक्षा दिलेल्या असतील तिच्या संबंधात राज्य शासनाने दिलेला शिक्षांच्या निलंबनाचा, माफीचा किंवा सौम्यीकरणाचा कोणताही आदेश, संघराज्याच्या शासनशक्तीच्या व्याप्तीत येणाऱ्या बाबींविषयी अशा व्यक्तीने केलेल्या अपराधांच्या संबंधात केंद्र सरकारनेही अशा शिक्षांच्या निलंबनाचा, माफीचा किंवा, प्रकरणपरत्वे, सौम्यीकरणाचा आदेश दिल्याशिवाय परिणामक होणार नाही.

## प्रकरण तेहेतीस

### जामीन व बंधपत्रे यांबाबतचे उपबंध

कोणत्या प्रकरणांत जामीन घ्यावयाचा.

४३६. (१) जेव्हा बिन-जामिनी अपराधाचा आरोप असलेल्या व्यक्तीहून अन्य कोणत्याही व्यक्तीला पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याने वॉरंटाशिवाय अटक केली असेल किंवा स्थानबद्ध केले असेल अथवा ती व्यक्ती न्यायालयापुढे उपस्थित झाली असेल किंवा तिला आणले गेले असेल व अशा अधिकाऱ्याच्या हवालातीत असताना कोणत्याही वेळी किंवा अशा न्यायालयासमोरील कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यात जामीन देण्यास ती तयार असेल तर, अशा व्यक्तीला जामिनावर सोडले जाईल :

परंतु, असा अधिकारी किंवा न्यायालय त्याला योग्य वाटले तर, अशा व्यक्तीकडून जामीन घेण्या ऐवजी, यात यानंतर उपबंधित केल्याप्रमाणे तिने आपल्या उपस्थितीसाठी जामिनदाराविना बंधपत्र निष्पादित करून दिल्यावर तिला बंधमुक्त करु शकेल :

परंतु आणखी असे की, या कलमातील कोणतीही गोष्ट कलम ११६ मधील पोटकलम (३) च्या [१][किंवा कलम ४४६ क च्या] उपबंधावर परिणाम करत असल्याचे मानले जाणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखादी व्यक्ती उपस्थितीची वेळ व स्थळ यांबाबत जामीन बंधपत्राच्या शर्तीचे अनुपालन करण्यास चुकली असेल तर, त्याच प्रकरणात जेव्हा नंतरच्या प्रसंगी ती न्यायालयासमोर उपस्थित होईल किंवा बंदोवस्तात आणली जाईल तेव्हा, न्यायालय तिला जामिनावर सोडण्यास नकार देऊ शकेल व अशा बंधपत्राने बांधल्या गेलेल्या कोणत्याही व्यक्तीला बंधपत्राखालील दंड भरण्यास फर्माविण्याच्या ज्या शक्ती न्यायालयाला कलम ४४६ खाली प्रदान केलेल्या आहेत त्या शक्तींना अशा कोणत्याही नकारामुळे बाध येणार नाही.

बिनजामिनी अपराधाच्या बाबतीत जामीन केव्हा घेता येईल.

४३७. [२][(१) जेव्हा कोणताही बिनजामिनी अपराध केल्याचा आरोप असलेल्या किंवा तसा वहीम असलेल्या कोणत्याही व्यक्तीला पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याने वॉरंटाशिवाय अटक केली असेल किंवा स्थानबद्ध केले असेल अथवा उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय याहून अन्य न्यायालयापुढे ती उपस्थित झाली असेल किंवा तिला आणले गेले असेल तेव्हा, तिला जामिनावर सोडता येईल:

परंतु,—

(एक) अशी व्यक्ती मृत्यूच्या किंवा जन्मठेपेच्या शिक्षेस पात्र अशा अपराधाबद्दल दोषी आहे असे समजण्यास वाजवी कारणे दिसत असल्यास तिला याप्रमाणे सोडले जाणार नाही;

(दोन) असा अपराध हा दखलपात्र अपराध असेल आणि तिला यापूर्वी फाशीच्या, जन्मठेपेच्या किंवा सात वर्षे अगर त्याहून अधिक मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरवण्यात आलेले असेल तर अथवा यापूर्वी तिला बिनजामिनी आणि दखल पात्र अपराधाबद्दल दोन किंवा त्याहून अधिक वेळा दोषी ठरवण्यात आलेले असेल तर, अशा व्यक्तीला याप्रमाणे सोडले जाणार नाही :

परंतु, खंड (एक) किंवा खंड (दोन) मध्ये निर्देशिलेली व्यक्ती जर सोळा वर्षाखालील वयाची असेल किंवा स्त्री असेल किंवा आजारी वा दुर्बल असेल तर, तिला जामिनावर सोडावे असे न्यायालय निदेशित करू शकेल :

परंतु आणखी असे की, खंड (दोन) मध्ये निर्देशिलेल्या व्यक्तीला काही इतर खास कारणामुळे जामिनावर सोडणे न्याय्य आणि उचित आहे अशी न्यायालयाची खात्री झाली तर, न्यायालय तिला तसे सोडण्याबद्दल निदेश देऊ शकेल :

परंतु आणखी असे की, आरोपी व्यक्ती जामिनावर सुटण्यास अन्यथा हक्कदार असेल व न्यायालय जे निदेश देईल त्यांचे आपण अनुपालन करू असे अभिवचन तिने दिले तर, अन्वेषण चालू असता साक्षीदारांकरवी ओळख पटवण्यासाठी आरोपीची जरूरी लागेल एवढीच गोष्ट जामीन मंजूर करायला नकार देण्यास पुरेसे कारण होणार नाही.]

१. १९८० चा अधिनियम ६३, कलम ४ द्वारे घातले (२३ सप्टेंबर, १९८० रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे मूळ पोटकलमाऐवजी घातले (२३ सप्टेंबर १९८० रोजी व तेव्हापासून).

(२) आरोपीने बिनजामिनी अपराध केला आहे असे समजण्यास वाजवी कारणे नाहीत, पण त्याच्या दोषीपणाबाबत आणखी चौकशी करण्यास पुरेशी कारणे आहेत असे, अन्वेषण किंवा चौकशी किंवा, प्रकरणपरत्वे, संपरीक्षा कोणत्याही टप्प्यात असताना अशा अधिकाऱ्याला किंवा न्यायालयाला दिसून आले तर, [1][कलम ४४६ क मधील उपबंधांच्या अधीनतेने आणि अशी चौकशी प्रलंबित असताना] जामिनावर अथवा अशा अधिकाऱ्याच्या किंवा न्यायालयाच्या स्वविवेकानुसार, यात यापुढे उपबंधित केल्याप्रमाणे आरोपीने आपल्या उपस्थितीसाठी जामीनदारांविना बंधपत्र निष्पादित करून दिल्यावर आरोपीला जामिनावर सोडता येईल.

(३) जेव्हा सात वर्षे किंवा त्याहून अधिक असू शकेल इतक्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असा अपराध किंवा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) प्रकरण ६ वे, प्रकरण १६ वे किंवा प्रकरण १७ वे याखालील अपराध किंवा अशा कोणत्याही अपराधाचे अपप्रेरण किंवा असा अपराध करण्याचा कट अगर प्रयत्न केल्याचा आरोप किंवा वहीम असलेल्या व्यक्तीची पोटकलम (१) खाली जामिनावर सुटका झाली असेल तेव्हा,—

(क) या प्रकरणाखाली निष्पादित केलेल्या बंधपत्राच्या शर्तींना अनुसरून अशी व्यक्ती उपस्थित होईल हे सुनिश्चित करण्यासाठी, किंवा

(ख) जो अपराध केल्याचा आरोप किंवा वहीम अशा व्यक्तीवर आहे त्यासारखा अपराध ती करणार नाही हे सुनिश्चित करण्यासाठी, किंवा

(ग) अन्यथा न्यायाच्या हितार्थ,

आपणांस जरुरीचे वाटेल अशी कोणतीही शर्त न्यायालयाला लादता येईल.

(४) पोटकलम (१) किंवा (२) खाली कोणत्याही व्यक्तीची जामिनावर सुटका करणारा अधिकारी किंवा न्यायालय तसे करण्याची आपली [2][कारणे किंवा विशेष कारणे] लेखी नमूद करील.

(५) ज्या कोणत्याही न्यायालयाने पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली एखाद्या व्यक्तीची जामिनावर सुटका केली असेल ते न्यायालय त्याला तशी जरूरी वाटली तर, अशा व्यक्तीला अटक करण्यांत यावी असा निदेश देऊन तिला हवालातीत पाठवू शकेल.

(६) दंडाधिकाऱ्याने संपरीक्षा करण्याजोग्या कोणत्याही खटल्यात जर कोणत्याही बिनजामिनी अपराधाचा आरोप असलेल्या व्यक्तीची संपरीक्षा त्या खटल्यात साक्षीपुरावा घेण्यासाठी नियत केलेल्या पहिल्या दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधीत समाप्त झाली नाही तर, अशा व्यक्तीला संपूर्ण उक्त कालावधीत ती हवालातीत असल्यास दंडाधिकाऱ्याच्या समाधानापुरेसा होईल अशा जामिनावर सोडले जाईल—मात्र तशीच काही कारणे असल्यास ती नमूद करून दंडाधिकाऱ्याने अन्यथा निदेश दिला तर गोष्ट वेगळी.

(७) जर बिनजामिनी अपराधाचा आरोप असलेल्या व्यक्तीची संपरीक्षा समाप्त झाल्यानंतर व न्यायनिर्णय दिला जाण्यापूर्वी कोणत्याही वेळी आरोपी अशा कोणत्याही अपराधाबद्दल दोषी नाही असे समजण्यास वाजवी आधारकारणे आहेत असे न्यायालयाचे मत झाले तर, आरोपी हवालातीत असल्यास त्याने न्यायनिर्णय ऐकण्यासाठी आपण उपस्थित राहण्याबाबत जामीनदारांविना बंधपत्र निष्पादित करून दिले की, न्यायालय त्याची सुटका करील.

**अटकेची आशंका वाटणाऱ्या व्यक्तीला जामीन मंजूर करण्यासाठी निदेश.**

४३८. (१) बिनजामिनी अपराध केल्याच्या आरोपावरून आपणास अटक होईल असे जेव्हा कोणत्याही व्यक्तीला सकारण वाटत असेल तेव्हा, या कलमाखाली निदेश मिळण्यासाठी तिला उच्च न्यायालयाकडे किंवा सत्र न्यायालयाकडे अर्ज करता येईल; व ते न्यायालय स्वत:ला योग्य वाटले तर त्या व्यक्तीला अशी अटक झाल्यास तिला जामिनावर सोडले जावे असा निदेश देऊ शकेल.

(२) जेव्हा उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय पोटकलम (१) खाली निदेश देईल तेव्हा त्याला अशा निदेशामध्ये, त्या विशिष्ट खटल्याची तथ्ये लक्षात घेता स्वत:ला योग्य वाटतील अशा, शर्तींचा समावेश करता येईल व त्यामध्ये पुढील शर्तीही असू शकतील—

(एक) आवश्यक असेल त्याप्रमाणे व तेव्हा ती व्यक्ती पोलीस अधिकाऱ्याला पूसतपासासाठी उपलब्ध झाली पाहिजे अशी शर्त ;

(दोन) त्या व्यक्तीने त्या प्रकरणाच्या तथ्यांशी परिचित असलेली कोणतीही व्यक्ती न्यायालयासमोर किंवा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यासमोर अशी तथ्ये उघड करण्यापासून जेणेकरून परावृत्त होईल अशाप्रकारे तिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणतेही प्रलोभन दाखवता कामा नये, धमकी देता कामा नये किंवा वचन देता कामा नये अशी शर्त ;

---

१. १९८० चा अधिनियम ६३, कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२३ सप्टेंबर, १९८० रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२३ सप्टेंबर, १९८० रोजी व तेव्हापासून).

(तीन) त्या व्यक्तीने न्यायालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय भारत देश सोडून जाता कामा नये अशी शर्त;

(चार) ४३७ व्या कलमाखाली जणू काही जामीन मंजूर करण्यात आलेला असावा त्याप्रमाणे त्या कलमाच्या पोटकलम (३) खाली लादली जाईल अशी अन्य शर्त.

(३) जर अशा व्यक्तीला त्यानंतर अशा आरोपावरून पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याने वॉरंटशिवाय अटक केली व ती अटकेच्या वेळी किंवा अशा अधिकाऱ्याला हवालाती असताना कोणत्याही वेळी जामीन देण्यास तयार असेल तर, तिची जामिनावर सुटका केली जाईल; व जर अशा अपराधाची दखल घेणाऱ्या दंडाधिकाऱ्याने, आपण प्रथमतः त्या व्यक्तीविरुद्ध वॉरंट काढावे असे ठरवले तर, तो पोटकलम (१) खाली न्यायालयाच्या निदेशानुरुप जामीनपात्र वॉरंट काढील.

जामिनाविषयी उच्च न्यायालयाच्या किंवा सत्र न्यायालयाच्या शक्ती.

४३९. (१) उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय,—

(क) एखाद्या अपराधाच्या आरोपावरून जी हवालातीत असेल अशा व्यक्तीची जामिनावर सुटका करावी असा निदेश देऊ शकेल, आणि अपराध कलम ४३७ च्या पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा असेल तर, त्या पोटकलमात नमूद केलेल्या प्रयोजनासाठी त्याला जरुरीची वाटेल अशी कोणतीही शर्त लादू शकेल;

(ख) कोणत्याही व्यक्तीची जामिनावर सुटका करताना दंडाधिकाऱ्याने लादलेली एखादी शर्त रद्द करावी किंवा तीत फेरफार करावा असा निदेश देऊ शकेल.

परंतु, केवळ सत्र न्यायालयानेच संपरीक्षा करण्यायोग्य किंवा याप्रमाणे संपरीक्षायोग्य नसला तरी जो आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र आहे अशा अपराधाचा आरोप असलेल्या एखाद्या व्यक्तीला जामीन मंजूर करण्यापूर्वी उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय सरकारी अभियोक्त्याला जामिनाच्या अर्जाची नोटीस देईल; मात्र अशी नोटीस देणे व्यवहार्य नाही असे त्यांचे मत असल्यास ते त्याची कारणे लेखी नमूद करील.

(२) उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय ज्या कोणत्याही व्यक्तीला या प्रकरणाखाली जामिनावर सोडण्यात आले असेल तिला अटक करण्यात यावी असा निदेश देऊन तिला हवालातीत पाठवू शकेल.

बंधपत्राची रक्कम व ती कमी करणे.

४४०. (१) या प्रकरणाखाली निष्पादित केलेल्या प्रत्येक बंधपत्राची रक्कम प्रकरणाच्या परिस्थितीचा योग्य तो विचार करून नियत केली जाईल व ती अत्याधिक असता कामा नये.

(२) पोलीस अधिकाऱ्याने किंवा दंडाधिकाऱ्याने आवश्यक केलेला जामीन कमी करावा असे उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय निदेशित करू शकेल.

आरोपीचे व जामिनदारांचे बंधनपत्र.

४४१. (१) कोणत्याही व्यक्तीला जामिनावर सोडले जाण्यापूर्वी किंवा त्याच्या जातमुचलक्यावरून सोडले जाण्यापूर्वी अशा व्यक्तीने व तिला जामिनावर सोडले जाईल तेव्हा एका किंवा अधिक पुरेशा जामीनदारांनी पोलीस अधिकाऱ्याला किंवा, प्रकरणपरत्वे, न्यायालयाला पुरेशी वाटेल इतक्या रकमेचे बंधपत्र अशा शर्तीवर निष्पादित करून दिले पाहिजे की, अशी व्यक्ती बंधपत्रात नमूद केलेल्या वेळी व स्थळी हजर राहील व पोलीस अधिकारी किंवा, प्रकरणपरत्वे, न्यायालय अन्यथा निदेश देईपर्यंत तो तशी हजर राहत जाईल.

(२) कोणत्याही व्यक्तीची जामिनावर सुटका करण्यासाठी कोणतीही शर्त लादलेली असेल तेव्हा बंधपत्रात ती शर्त अंतर्भूत असेल.

(३) जर त्या प्रकरणी तसे आवश्यक असेल तर, जामिनावर सुटका केलेल्या व्यक्तीला फर्मावले जाईल तेव्हा उच्च न्यायालयासमोर, सत्र न्यायालयासमोर, किंवा अन्य न्यायालयासमोर दोषारोपास उत्तर देण्यासाठी तिने उपस्थित राहिले पाहिजे असेही बंधन पत्रान्वये तिच्यावर घातले जाईल.

(४) जामीनदार पुरेसे किंवा योग्य आहेत किंवा काय हे निर्धारीत करण्याच्या प्रयोजनार्थ न्यायालयाला जामीनदारांच्या पुरेसेपणासंबंधीची किंवा योग्यतेसंबंधीची तथ्ये अंतर्भूत असलेले प्रतिज्ञालेख, त्या तथ्यांचा पुरावा म्हणून स्वीकारता येतील किंवा त्याला तसे जरूर वाटले तर, अशा पुरेसेपणाबाबत किंवा योग्यतेबाबत त्याला स्वतःला चौकशी करता येईल किंवा त्या न्यायालयाला दुय्यम असलेल्या दंडाधिकाऱ्याकरवी चौकशी करवता येईल.

हवालातीतून मुक्तता.

४४२. (१) जिच्या उपस्थितीसाठी बंधपत्र निष्पादित केले गेले असेल त्या व्यक्तीला बंधपत्र निष्पादित होताच सोडले जाईल, व ती जेव्हा तुरुंगात असेल तेव्हा तिला जामिनादेश देणारे न्यायालय तुरुंगाच्या अंमलदार अधिकाऱ्याला सुटका करण्याचा आदेश देईल व तो आदेश मिळाल्यावर असा अधिकारी त्याला सोडून देईल.

(२) हे कलम, कलम ४३६ किंवा कलम ४३७ यांमधील कोणत्याही गोष्टीमुळे, ज्याच्यासाठी बंधपत्र निष्पादित केले त्याहून अन्य कोणत्याही कामासंबंधात स्थानबद्ध केले जाण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीची सुटका आवश्यक ठरते असे मानले जाणार नाही.

४४३. जर चुकीमुळे, कपटामुळे किंवा अन्य कारणामुळे अपुरे जामीनदार स्वीकारण्यात आले पहिल्यांदा घेतलेला किंवा ते नंतर अपुरे ठरले तर, न्यायालय जामिनावर सोडलेल्या व्यक्तीला आपणांपुढे आणले जावे असे जामीन पुरेसा नसेल निदेशित करणारे अटकेचे वॉरंट काढून तिला पुरेसे जामीनदार देण्याचा आदेश देऊ शकेल व तिने तसे तेव्हा पुरेशा करण्यात कसूर केली तर, तिला तुरुंगात पाठवू शकेल. जामिनाचा आदेश देण्याची शक्ती.

४४४. (१) जामिनावर सोडलेल्या व्यक्तीच्या समक्ष हजेरीसाठी व उपस्थितीसाठी देण्यात जामीनदारांची. आलेल्या सर्व जामीनदारांना किंवा त्यांपैकी कोणालाही कोणत्याही वेळी दंडाधिकाऱ्याकडे असा अर्ज करता दायित्व मुक्तता. येईल की, बंधपत्र संपूर्णपणे किंवा अर्जदारांशी संबंधित असेल तेवढ्या मर्यादेपर्यंत विसर्जित करावे.

(२) असा अर्ज करण्यात आल्यावर, याप्रमाणे सोडलेल्या व्यक्तीला आपणांपुढे आणले जावे असा निदेश देणारे आपले अटक-वॉरंट दंडाधिकारी काढील.

(३) वॉरंटाच्या अनुरोधाने अशी व्यक्ती उपस्थित झाल्यावर किंवा ती स्वेच्छेने स्वाधीन झाल्यावर, दंडाधिकारी, बंधपत्र संपूर्णपणे किंवा अर्जदारांशी संबंधित असेल तेवढ्या मर्यादेपर्यंत विसर्जित करण्याचा निदेश देईल, व अशा व्यक्तीला अन्य पुरेसे जामीनदार देण्यास फर्मावील व जर तिने तसे करण्यात कसूर केली तर, तिला तुरुंगात पाठवील.

४४५. जेव्हा न्यायालयाने किंवा अधिकाऱ्याने कोणत्याही व्यक्तीला जामीनदारांसह किंवा त्यांच्या- मुचलक्याऐवजी विना असे बंधपत्र निष्पादित करण्यास सांगितले असेल तेव्हा, असे न्यायालय किंवा अधिकारी चांगल्या अनामत. वर्तणुकीबद्दलच्या बंधपत्राची बाब खेरीजकरून अन्य बाबतीत, असे बंधपत्र निष्पादित करण्याऐवजी न्यायालय किंवा अधिकारी ठरवील इतकी रक्कम किंवा इतक्या रकमेच्या सरकारी वचनचिठ्या अनामत ठेवण्यास परवानगी देऊ शकेल.

४४६. (१) जेथे या संहितेखालील बंधपत्र न्यायालयासमोर उपस्थित होण्यासाठी किंवा संपत्ती जेव्हा बंधपत्र दंडपात्र हजर करण्यासाठी दिलेले असेल व ते दंडपात्र झाले आहे असे, त्या न्यायालयाचे किंवा ज्याच्याकडे होईल तेव्हाची तो खटला मागाहून वर्ग करण्यात आला अशा कोणत्याही न्यायालयाचे समाधान होईल अशाप्रकारे शाबीत कार्यपद्धती. केले जाईल त्याबाबतीत,

अथवा या संहितेखालील अन्य कोणत्याही बंधपत्राबाबत, ते दंडपात्र झाले आहे असे, ज्याने ते बंधपत्र घेतले त्या न्यायालयाचे किंवा ज्याच्याकडे तो खटला मागाहून वर्ग करण्यात आला अशा कोणत्याही न्यायालयाचे किंवा कोणत्याही प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याचे समाधान होईल अशाप्रकारे शाबीत करण्यात येईल त्याबाबतीत,

न्यायालय अशा शाबितीची आधारकारणे नमूद करील व अशा बंधपत्राने बांधलेल्या कोणत्याही व्यक्तीस त्यात नमूद केलेला दंड भरण्यास किंवा तो का भरू नये त्याचे कारण दाखवण्यास फर्मावू शकेल.

**स्पष्टीकरण.**—न्यायालयासमोर उपस्थित होण्यासाठी किंवा संपत्ती हजर करण्यासाठी दिलेल्या बंधपत्रातील शर्त यामध्ये, ज्याच्याकडे तो खटला मागाहून वर्ग केला जाईल अशा कोणत्याही न्यायालयासमोर उपस्थित होण्याची किंवा, प्रकरणपरत्वे, संपत्ती हजर करण्याची शर्त समाविष्ट आहे असा त्याचा अर्थ लावला जाईल.

(२) जर पुरेसे कारण दाखवले नाही व दंड भरला नाही तर, न्यायालयाला या संहितेखाली असा दंड हा जणू काही त्याने लादलेला द्रव्यदंड असावा त्याप्रमाणे तो वसूल करण्याची कार्यवाही करता येईल:

[1][परंतु, जेव्हा असा द्रव्यदंड भरला नसेल आणि उपर्युक्त पद्धतीने तो वसूल करणे शक्य नसेल तर, जामीनदार म्हणून याप्रमाणे बांधली गेलेली व्यक्ती, द्रव्यदंडाच्या वसुलीचा आदेश देणाऱ्या न्यायालयाच्या आदेशान्वये, सहा महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या दिवाणी तुरुंगातील कारावासास पात्र होईल.]

(३) न्यायालय निर्दिष्ट दंडाचा कोणताही भाग स्वविवेकानुसार माफ करून फक्त अंशत: भरणा करवून घेऊ शकेल.

(४) बंधपत्राचा जामीनदार ते बंधपत्र दंडपात्र होण्यापूर्वी मृत्यू पावला तर, त्याची संपदा बंधपत्राबाबतच्या समग्र दायित्वातून मुक्त होईल.

(५) जिने कलम १०६ किंवा कलम ११७ किंवा ३६० खाली जामीन दिला आहे अशा कोणत्याही व्यक्तीला, जो अपराध करणे म्हणजे तिच्या बंधपत्राच्या किंवा कलम ४४८ खाली तिच्याऐवजी दुसऱ्याने निष्पादित केलेल्या बंधपत्राच्या शर्तीचा भंग ठरतो अशा अपराधाबद्दल सिद्धदोष ठरवलेले असेल तर, ज्या न्यायालयाने तिला अशा अपराधाबद्दल सिद्धदोष ठरवले त्याच्या न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत तिच्या जामीनदाराविरुद्ध किंवा जामीनदारांविरुद्ध या कलमाखाली करण्यात आलेल्या कार्यवाहीत पुरावा म्हणून वापरता येईल व जर अशी प्रमाणित प्रत याप्रमाणे वापरली गेली तर, विरुद्ध शाबीत न झाल्यास तिने असा अपराध केला असल्याचे न्यायालय गृहीत धरील.

---

१. १९८० चा अधिनियम ६३, कलम ६ द्वारे जादा दाखल केले (२३ सप्टेंबर, १९८० रोजी व तेव्हापासून).

बंधपत्र किंवा जामीन-बंधपत्र रद्द होणे.

[1][ ४४६क. कलम ४४६ च्या उपबंधाना बाध न येता, जेव्हा एखाद्या प्रकरणी या संहितेखालील बंधपत्र हे एखाद्या व्यक्तीने न्यायालयासमोर उपस्थित होण्याबाबत असेल आणि शर्तीचा भंग केल्याबद्दल ते दंडपात्र झाले असेल तर,—

(क) अशा व्यक्तीने निष्पादित केलेले बंधपत्र व त्याचप्रमाणे अशा प्रकरणात त्याच्या एका किंवा त्याहून अधिक जामीनदारांनी निष्पादित केले असल्यास ते बंधपत्र रद्द होईल ; आणि

(ख) ज्याच्यासमोर उपस्थित राहण्यासाठी बंधपत्र निष्पादित केलेले असेल तो पोलीस अधिकारी किंवा, प्रकरणपरत्वे, ते न्यायालय यांची, असे बंधपत्र ज्या व्यक्तीवर बंधनकारक आहे त्या व्यक्तीने बंधपत्रातील शर्तीचे अनुपालन करण्यामध्ये कसूर करण्याला पुरेसे कारण नव्हते याबाबत खात्री झाली तर, तिची सुटका केली जाणार नाही :

परंतु, या संहितेच्या इतर कोणत्याही उपबंधांच्या अधीनतेने, त्या प्रकरणात पोलीस अधिकाऱ्याला किंवा प्रकरणपरत्वे, न्यायालयाला पुरेशी वाटेल त्याप्रमाणे तितक्या रकमेचे नवीन आणि अशा एका किंवा अधिक जामीनदारांनी बंधपत्र करुन दिल्यावर तिला सोडून देता येईल. ]

जामीनदार दिवाळखोर झाल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास त्याबाबतीतील किंवा बंधपत्र दंडपात्र होईल तेव्हाची कार्यपद्धती.

४४७. जेव्हा या संहितेखालील बंधपत्राचा कोणताही जामीनदार दिवाळखोर होईल किंवा मृत्यू पावेल किंवा जेव्हा कलम ४४६ च्या उपबंधाखाली कोणतेही बंधपत्र दंडपात्र होईल तेव्हा, ज्याच्या आदेशावरुन असे बंधपत्र घेतले गेले होते ते न्यायालय किंवा तो प्रथमवर्ग दंडाधिकारी जिच्याकडून असा जामीन मागवण्यात आला होता त्या व्यक्तीला मूळ आदेशातील निदेशांनुसार नवीन जामीन देण्याचा आदेश देऊ शकेल व जर असा जामीन देण्यात आला नाही तर, जणू काही अशा मूळ आदेशाच्या अनुपालनात कसूर झालेली असावी त्याप्रमाणे अशा न्यायालयाला किंवा दंडाधिकाऱ्याला कार्यवाही करता येईल.

अज्ञान व्यक्तीकडून बंधपत्र आवश्यक केले असेल तेव्हा.

४४८. जिला कोणत्याही न्यायालयाने किंवा अधिकाऱ्याने बंधपत्र निष्पादित करण्यास सांगितले असेल ती व्यक्ती अज्ञान असेल तेव्हा, अशा न्यायालयाला किंवा अधिकाऱ्याला तिच्याऐवजी फक्त जामीनदाराने किंवा जामीनदारांनीच निष्पादित केलेले बंधपत्र स्वीकारता येईल.

कलम ४४६ खालील आदेशांवर अपील.

४४९. कलम ४४६ खाली देण्यात आलेल्या सर्व आदेशांवर,—

(एक) दंडाधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाच्या बाबतीत, सत्र न्यायाधीशाकडे,

(दोन) सत्र न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या बाबतीत, अशा न्यायालयाने दिलेल्या आदेशावर ज्याच्याकडे अपील करता येते त्या न्यायालयाकडे,

अपील करता येईल.

विवक्षित मुचलक्यांवरून येणे असलेली रक्कम वसूल करण्याचा निदेश देण्याची शक्ती.

४५०. उच्च न्यायालयात किंवा सत्र न्यायालयात उपस्थित किंवा हजर राहण्यासाठी दिलेल्या बंधपत्रावरुन येणे असलेली रक्कम वसूल करण्याकरता असे उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय कोणत्याही दंडाधिकाऱ्याला निदेश देऊ शकेल.

## प्रकरण चौतीस

## संपत्तीची विल्हेवाट

विवक्षित खटल्यांमध्ये संपरीक्षा प्रलंबित असेपर्यंत संपत्तीच्या अभिरक्षेचा व विल्हेवाटीचा आदेश.

४५१. जेव्हा कोणत्याही चौकशीत किंवा संपरीक्षेत फौजदारी न्यायालयासमोर कोणतीही संपत्ती हजर केली जाईल, तेव्हा, न्यायालय चौकशी किंवा संपरीक्षा समाप्त होईपर्यंत अशा संपत्तीच्या योग्य अभिरक्षेसाठी त्याला योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल व जर संपत्ती लवकर व स्वभावतः खराब होण्यासारखी असेल अगर तिची विक्री किंवा अन्य प्रकारे विल्हेवाट करण समयोचित असेल तर, न्यायालय त्याला जरुर वाटेल असा पुरावा नोंदवल्यानंतर, तशी विक्री किंवा विल्हेवाट करण्याचा आदेश देऊ शकेल.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ, "संपत्ती" यात,—

(क) न्यायालयासमोर हजर केली असेल किंवा त्याच्या अभिरक्षेत असेल अशी कोणत्याही प्रकारची संपत्ती किंवा दस्तऐवज,

(ख) जिच्या संबंधात अपराध करण्यात आल्याचे दिसत असेल किंवा जी कोणताही अपराध करण्यासाठी वापरण्यात आल्याचे दिसत असेल अशी कोणतीही संपत्ती,

समाविष्ट आहे.

---

१. १९८० चा अधिनियम ६३, कलम ७ द्वारे समाविष्ट केले (२३ सप्टेंबर, १९८० रोजी व तेव्हापासून).

*संपरीक्षेच्या अखेरीस संपत्ती-च्या विल्हेवाटीचा आदेश.*

४५२. (१) जेव्हा कोणत्याही फौजदारी न्यायालयातील चौकशी किंवा संपरीक्षा समाप्त होईल तेव्हा, त्याच्यासमोर हजर करण्यात आलेल्या किंवा त्यांच्या अभिरक्षेत असलेल्या किंवा ज्यासंबंधात कोणताही अपराध करण्यात आल्याचे दिसत असेल अशा किंवा कोणताही अपराध करण्यासाठी वापरण्यात आलेल्या अशा कोणत्याही संपत्तीचा किंवा दस्तऐवजाचा नाश करून, अधिहरण करून किंवा त्याच्या कब्जास हक्कदार असल्याचा दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडे सुपूर्द करून किंवा अन्य काहीतरी करून विल्हेवाट करण्यासाठी न्यायालय स्वतःला योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल.

(२) कोणतीही संपत्ती तिच्या कब्जात हक्कदार असल्याचा दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडे सुपूर्द करण्यासाठी पोटकलम (१) खाली बिनशर्त अथवा पोटकलम (१) खाली दिलेला आदेश अपीलान्ती किंवा पुनरीक्षणान्ती आपरिवर्तित करण्यात किंवा रद्द ठरवण्यात आल्यास अशी संपत्ती न्यायालयाकडे परत करण्यास वचनबद्ध करणारे, न्यायालयाच्या समाधानापुरते बंधपत्र जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना तिने निष्पादित करुन द्यावे अशा शर्तीवर आदेश देता येईल.

(३) सत्र न्यायालय स्वतः पोटकलम (१) खाली आदेश देण्याऐवजी मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याकडे संपत्ती सुपूर्द करण्याचा निदेश देऊ शकेल, व तो त्यावर कलमे ४५७, ४५८ व ४५९ यांमध्ये उपबंधित केलेल्या रीतीने त्याबाबत कार्यवाही करील.

(४) जर संपत्ती जीवधनाच्या (पाळीव पशुपक्ष्यांच्या) रुपात असेल किंवा लवकर व निसर्गतः खराब होण्यासारखी असेल तर किंवा जर पोटकलम (२) च्या अनुरोधाने बंधपत्र निष्पादित करण्यात आले असेल तर ती बाब खेरीजकरुन एरव्ही, पोटकलम (१) खाली दिलेला आदेश दोन महिनेपर्यंत किंवा अपील सादर केल्यास अशा अपिलाचा निकाल होईपर्यंत सामील केला जाणार नाही.

(५) या कलमात "संपत्ती" या संज्ञेत, जिच्या संबंधात अपराध करण्यात आला असल्याचे दिसत असेल तिच्या बाबतीत, मुळात जी कोणत्याही पक्षाच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली होती अशाच संपत्तीचा नव्हे तर, तिचे ज्यात रुपांतर केले गेले किंवा तिची जिच्याशी अदलाबदल केली गेली अशा कोणत्याही संपत्तीचा व अशा रुपांतरातून किंवा अदलाबदलीतून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे जे काही प्राप्त झाले असेल त्याचा समावेश आहे.

*आरोपींकडे सापडलेला पैसा निर्दोष खरेदीदाराला देण.*

४५३. चोरी करणे किंवा चोरीची संपत्ती स्वीकारणे हे ज्या अपराधात समाविष्ट आहे किंवा जो अपराध त्या सदरात मोडतो अशा कोणत्याही अपराधाबद्दल जेव्हा एखाद्या व्यक्तीला सिद्धदोष ठरवण्यात आले असेल व ती चोरीची संपत्ती असल्याचे माहीत नसताना किंवा तसे समजण्यात कारण नसताना तिच्याकडून अन्य कोणत्याही व्यक्तीने ती संपत्ती विकत घेतली असून, सिद्धदोष व्यक्तीच्या अटकेनंतर काही पैसा तिच्या कब्जातून घेण्यात आला आहे असे शाबीत करण्यात आले असून तेव्हा, अशा खरेदीदारांचा अर्ज आल्यास व चोरीच्या संपत्तीच्या कब्जात हक्कदार असलेल्या व्यक्तीला ती परत मिळाल्यावर, न्यायालय अशा खरेदीदाराने दिलेल्या किमतीहून अधिक नाही इतकी रक्कम अशा पैशातून त्याला देण्यात यावी असा आदेश देऊ शकेल.

*कलम ४५२ किंवा कलम ४५३ खालील आदेशांविरुद्ध अपील.*

४५४. (१) कलम ४५२ किंवा कलम ४५३ खाली एखाद्या न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीला अशा पूर्वोक्त न्यायालयाने केलेल्या दोषसिद्धीवर सर्वसामान्यपणे ज्या न्यायालयाकडे अपिले होऊ शकतात त्याच्याकडे त्या आदेशाविरुद्ध अपिल करता येईल.

(२) असे अपील करण्यात आल्यास अपील न्यायालय अपिलाचा निकाल होईपर्यंत आदेश स्थगित करण्याचा निदेश देऊ शकेल किंवा आदेशात आपरिवर्तन अगर फेरबदल करु शकेल किंवा आदेश शून्य करुन न्याय्य असतील असे आणखी आदेश देऊ शकेल.

(३) पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या शक्ती अपिलाच्या, कायमीकरणाच्या किंवा पुनरीक्षणाच्या न्यायालयालाही पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला आदेश ज्या खटल्यात दिलेला होता त्याचे काम पाहताना वापरता येतील.

*बदनामीकारक व अन्य प्रकारचे साहित्य नष्ट करणे.*

४५५. (१) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)—कलम २९२, कलम २९३, कलम ५०१ किंवा कलम ५०२ खाली दोषसिद्धी केल्यावर न्यायालय, ज्याच्याबाबत दोषसिद्धी झाली त्या वस्तूच्या नकला न्यायालयाच्या अभिरक्षेत असतील किंवा सिद्धदोष ठरलेल्या व्यक्तीच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली राहिल्या असतील त्या सर्व नकला नष्ट करण्याचा आदेश देऊ शकेल.

(२) 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)—कलम २७२, कलम २७३, कलम २७४ किंवा कलम २७५ खाली दोषसिद्धी केल्यावर, न्यायालय त्याच रीतीने, ज्याच्याबाबत दोषसिद्धी झाली तो अन्नपदार्थ, पेय, औषधिद्रव्य किंवा वैद्यकीय सिद्धपदार्थ नष्ट करण्याचा आदेश देऊ शकेल.

*स्थावर संपत्तीचा कब्जा परत देववण्याची शक्ती.*

४५६. (१) जेव्हा फौजदारीपात्र बलप्रयोग किंवा बलप्रदर्शन अथवा फौजदारीपात्र धाकदपटशा यांचा अवलंब करुन केलेल्या अपराधाबद्दल एखाद्या व्यक्तीला सिद्धदोष ठरवलेले असेल आणि अशा बलप्रयोगाने किंवा बलप्रदर्शनाने अथवा धाकदपटशाने कोणत्याही व्यक्तीकडून कोणत्याही स्थावर संपत्तीचा कब्जा काढून घेतला गेला आहे असे न्यायालयाला दिसून आले तर, न्यायालयाला योग्य वाटल्यास संपत्ती जिच्या कब्जात असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीला जरूर तर बळाने निष्कासित करून पहिल्या व्यक्तीकडे त्या संपत्तीचा कब्जा परत द्यावा असा आदेश देऊ शकेल :

परंतु, न्यायालय असा कोणताही आदेश दोषसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याहून अधिक काळानंतर काढणार नाही.

(२) त्या अपराधाची संपरीक्षा करणाऱ्या न्यायालयाने पोटकलम (१) खाली आदेश दिलेला नसेल त्याबाबतीत, अपिलाचे, कायमीकरणाचे किंवा पुनरीक्षणाचे न्यायालय अपिलाचा, निर्देशनाचा किंवा, प्रकरणपरत्वे, पुनरीक्षणाचा निकाल करताना स्वतःला योग्य वाटले तर, असा आदेश देऊ शकेल.

(३) पोटकलम (१) खाली आदेश देण्यात आलेला असेल त्याबाबतीत, कलम ४५४ चे उपबंध कलम ४५३ खालील आदेशाच्या संबंधात जसे लागू होतात तसे ते या आदेशाच्या संबंधात लागू असतील.

(४) या कलमाखाली दिलेला कोणताही आदेश, कोणत्याही व्यक्तीला अशा स्थावर संपत्तीवरील किंवा तिच्यातील जो कोणताही हक्क किंवा हितसंबंध दिवाणी दाव्यात प्रस्थापित करता येईल त्यास बाध आणणार नाही.

संपत्तीचे अभिग्रहण केल्यावर पोलिसांनी अवलंबिण्याची कार्यपद्धती.

४५७. (१) जेव्हाकेव्हा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने संपत्तीचे अभिग्रहण केल्याचे वृत्त या संहितेच्या उपबंधांखाली दंडाधिकाऱ्याला कळवण्यात आले असेल, व चौकशीत किंवा संपरीक्षेत अशी संपत्ती फौजदारी न्यायालयासमोर आणली गेली नसेल तेव्हा, अशा संपत्तीची विल्हेवाट करणे किंवा तिच्या कब्जास हक्कदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे तिची सुपूर्दगी करणे याबाबत अथवा अशी व्यक्ती कोण याविषयी खातरजमा करता येत नसेल तर अशी संपत्ती अभिरक्षेत ठेवणे व हजर करणे याबाबत दंडाधिकारी स्वतःला योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल.

(२) अशी हक्कदार असलेली व्यक्ती ज्ञात असल्यास, दंडाधिकारी स्वतःला योग्य वाटतील अशा शर्तींवर (काही असल्यास) त्या व्यक्तीकडे संपत्ती सुपूर्द करण्याचा आदेश देऊ शकेल व जर अशी व्यक्ती अज्ञात असेल तर, दंडाधिकारी ती संपत्ती अडकवून ठेऊ शकेल व अशा बाबतीत ज्या वस्तू मिळून अशी संपत्ती बनली असेल त्या विनिर्दिष्ट करणारी उद्घोषणा काढील व संपत्तीवर मागणी हक्क सांगणाऱ्या व्यक्तीने अशा उद्घोषणेच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत आपणांसमोर उपस्थित होऊन स्वतःचा मागणीहक्क शाबीत करावा असे त्या उद्घोषणेद्वारे फर्मावील.

जेव्हा सहा महिन्यांत कोणीही मागणीदार उपस्थित होत नाही त्याबाबतीतील कार्यपद्धती.

४५८. (१) जर अशा कालावधीत कोणत्याही व्यक्तीने अशा संपत्तीवर आपला मागणीहक्क शाबीत केला नसेल व अशी संपत्ती जिच्या कब्जात सापडली ती व्यक्ती आपणांस ती संपत्ती वैध रीतीने प्राप्त झाली हे दाखवून देण्यास असमर्थ असेल तर, दंडाधिकारी आदेशाद्वारे असे निर्देशित करू शकेल की, अशी संपत्ती राज्य शासनाच्या स्वाधीन राहील व राज्य शासन ती विकू शकेल व अशा विक्रीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा विनियोग विहित करण्यात येईल अशा रीतीने केला जावा.

(२) अशा कोणत्याही आदेशावरील अपील दंडाधिकाऱ्याने केलेल्या दोषसिद्धींवर सर्वसामान्यपणे ज्या न्यायालयाकडे अपिले होऊ शकतात त्याच्याकडे होऊ शकेल.

नाशवंत संपत्तीची विक्री करण्याची शक्ती.

४५९. अशा संपत्तीच्या कब्जास हक्कदार असलेली व्यक्ती अज्ञात किंवा अनुपस्थित असून संपत्ती लवकर व निसर्गतः खराब होण्यासारखी असेल तर, अथवा ज्या दंडाधिकाऱ्याला तिच्या अभिग्रहणाचे वृत्त कळवण्यात आले त्याच्या मते, तिची विक्री मालकाला फायदेशीर ठरण्यासारखी असेल किंवा अशा संपत्तीचे मूल्य दहा रुपयांहून कमी असेल तर, दंडाधिकारी कोणत्याही वेळी तिच्या विक्रीचा निदेश देऊ शकेल; आणि कलमे ४५७ व ४५८ यांचे उपबंध अशा विक्रीपासूनच्या निव्वळ उत्पन्नाला व्यवहार्य असेल तितपत जसेच्या तसे लागू होतील.

## प्रकरण पस्तीस

## अनियमित कार्यवाही

ज्यांमुळे कार्यवाही रद्दबातल होत नाही अशा गैरनियम बाबी.

४६०. जर कोणत्याही दंडाधिकाऱ्याला पुढीलपैकी, म्हणजे—

(क) कलम ९४ खाली झडती-वॉरंट काढणे;

(ख) अपराधाचे अन्वेषण करण्यास कलम १५५ खाली पोलीसांना आदेश देणे;

(ग) कलम १७६ खाली मरणान्वेषण करणे;

(घ) त्याच्या स्थानिक अधिकारितेतील ज्या व्यक्तीने अशा अधिकारितेच्या सीमांबाहेर अपराध केला असेल तिला गिरफतार करण्यासाठी कलम १८७ खाली आदेशिका काढणे;

(ङ) कलम १९० च्या पोटकलम (१) मधील खंड (क) किंवा खंड (ख) खाली अपराधाची दखल घेणे;

(च) कलम १९२ च्या पोटकलम (२) खाली एखादा खटला सोपवणे;

(छ) कलम ३०६ खाली माफी देणे;

(ज्) कलम ४१० खाली खटला परत मागवून स्वत: त्याची संपरीक्षा करणे;

(झ्) कलम ४५८ किंवा ४५९ खाली संपत्तीची विक्री करणे,

यांपैकी कोणतीही एखादी गोष्ट करण्याची शक्ती विधित: प्रदान झाली नसताना त्याने चुकीने सद्भावपूर्वक ती गोष्ट केली तर, त्याला अशी शक्ती नव्हती एवढयाच कारणावरून त्याची कार्यवाही रद्द ठरवण्यात येणार नाही.

४६१. जर कोणत्याही दंडाधिकाऱ्याने त्या संबंधात विधित: शक्ती प्रदान झालेल्या नसताना पुढीलपैकी कोणतीही गोष्ट केली, म्हणजे,— ज्यांमुळ कार्यवाही रद्दबातल होते अशा अनियमित बाबी.

(क्) कलम ८३ खाली संपत्ती जप्त करून तिची विक्री केली ;

(ख्) डाक किंवा तार प्राधिकरणाच्या अभिरक्षेतील दस्तऐवजासाठी, पार्सलासाठी किंवा अन्य वस्तूसाठी झडती-वॉरंट काढले ;

(ग्) शांतता राखण्यासाठी जामीन मागितला ;

(घ्) सद्वर्तनासाठी जामीन मागितला ;

(ङ्) सद्वर्तनी असण्यास विधित: बांधील असलेल्या व्यक्तीला विनादोषारोप सोडले ;

(च्) शांतता राखण्याबाबतचे बंधपत्र रद्द केले ;

(छ्) निर्वाहखर्चाचा आदेश दिला ;

(ज्) स्थानिक उपद्रवाबाबत कलम १३३ खाली आदेश दिला ;

(झ्) सार्वजनिक उपद्रवाची पुनरावृत्ती होण्यास किंवा तो चालू राहण्यास कलम १४३ खाली मनाई केली ;

(ञ्) दहाव्या प्रकरणाच्या भाग 'ग' किंवा भाग 'घ' खाली आदेश दिला ;

(ट्) कलम १९० च्या पोटकलम (१) मधील खंड (ग्) खाली अपराधाची दखल घेतली ;

(ठ्) अपराध्याची संपरीक्षा केली ;

(ड्) अपराध्याची संक्षेपत: संपरीक्षा केली ;

(ढ्) दुसऱ्या दंडाधिकाऱ्याने कार्यवाहीवृत्त नमूद केले असता, कलम ३२५ खाली शिक्षादेश दिला ;

(ण्) अपिलाचा निर्णय केला ;

(त्) कलम ३९७ खाली कार्यवाहीपत्र मागवून घेतली ;

(थ्) कलम ४४६ खाली दिलेल्या आदेशाचे पुनरीक्षण केले तर,

त्याची कार्यवाही शून्य होईल.

४६२. कोणत्याही फौजदारी न्यायालयाचा कोणताही निष्कर्ष, शिक्षादेश किंवा आदेश ज्या चौकशीच्या, संपरीक्षेच्या किंवा अन्य कार्यवाहीच्या ओघात काढला गेला ती चुकीच्या सत्र विभागात, जिल्ह्यात, उपविभागात किंवा अन्य चुकीच्या स्थानिक क्षेत्रात झाली होती एवढयाच कारणावरून तो रद्द ठरवला जाणार नाही. मात्र अशा चुकीमुळे प्रत्यक्षात न्याय निष्फळ झाला असल्याचे दिसून आले तर तो अपवाद समजावा. चुकीच्या ठिकाणची कार्यवाही.

४६३. (१) कलम १६४ किंवा कलम २८१ खाली नोंदलेला किंवा तसा नोंदला असल्याचे दिसणारा आरोपीव्यक्तीचा कबुलीजबाब किंवा अन्य कथन ज्या न्यायालयासमोर पुराव्यात दिले गेले किंवा दाखल करून घेण्यात आले अशा कोणत्याही न्यायालयाला जर, कथन नोंदवणाऱ्या दंडाधिकाऱ्याने अशांपैकी कोणत्याही एखाद्या कलमाच्या उपबंधांचे पालन केले नसल्याचे आढळून आले तर, 'भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२' (१८७२ चा १) यांच्या ९१ व्या कलमात काहीही अंतर्भूत असले तरीही अशा अपालनासंबंधी पुरावा घेता येईल व अशा अपालनामुळे आरोपीच्या गुणधारित बचावाबाबत त्याला क्षती पोचत नाही व नोंदवण्यात आलेले कथन रीतसर केले होते अशी त्याची खात्री झाली तर, त्याला असे कथन ग्राह्य धरता येईल. कलम १६४ च्या किंवा कलम २८१ च्या उपबंधांचे पालन न होणे.

(२) या कलमाचे उपबंध अपिलाच्या, निर्देशनाच्या व पुनरीक्षणाच्या न्यायालयाला लागू आहेत.

४६४. (१) सक्षम अधिकारितेच्या न्यायालयाचा कोणताही निष्कर्ष, शिक्षादेश किंवा आदेश हा, दोषारोपाची मांडणी केलेली नव्हती एवढयाच कारणावरून अथवा दोषारोपात दोषारोपांच्या अपसंयोजनासुद्धा कोणतीही चूक होती किंवा त्यात काही गाळले होते किंवा काही अनियमित गोष्ट होती, एवढयाच कारणावरून विधिबाह्य मानला जाणार नाही. मात्र अपिलाचे, कायमीकरणाचे किंवा पुनरीक्षणाचे न्यायालय असेल त्याच्या मते त्यामुळे न्याय खरोखरीच निष्फळ झाला असेल तर तो अपवाद समजावा. दोषारोपाची मांडणी न करणे किंवा त्याचा अभाव किंवा त्यातील चूक यांचा परिणाम.

(२) अपिलाचे, कायमीकरणाचे किंवा पुनरीक्षणाचे जे न्यायालय असेल त्याच्या मते जर खरोखरीच न्याय निष्फळ झाला असेल तर, ते—

(क) दोषारोपाची मांडणी केलेली नसल्यास त्या बाबतीत, दोषारोपाची मांडणी केली जावी व दोषारोपाची मांडणी झाली की तेथून पुढे संपरीक्षा पुन्हा सुरू केली जावी असा आदेश देऊ शकेल ;

(ख) दोषारोपात चूक, गाळणूक किंवा अनियमित गोष्ट असल्यास त्या बाबतीत, त्याला योग्य वाटेल अशा कोणत्याही रीतीने दोषारोपाची मांडणी करण्यात आल्यावर त्यावरून नव्याने संपरीक्षा केली जावी असा निदेश देऊ शकेल :

परंतु, शाबीत केलेल्या तथ्यांबाबत आरोपीविरुद्ध कोणताही विधिग्राह्य दोषारोप केला जाऊ शकत नाही अशी त्या प्रकरणाची तथ्ये आहेत असे न्यायालयाचे मत असेल तर, ते दोषसिद्धी रद्द ठरवील.

चूक, गाळणूक किंवा अनियमित गोष्ट असल्याच्या कारणाने निष्कर्ष किंवा शिक्षादेश केव्हा उलट फिरवता येईल.

४६५. (१) यात यापूर्वी अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या अधीनतेने, सक्षम अधिकारितेच्या न्यायालयाने काढलेला कोणताही निष्कर्ष, शिक्षादेश, किंवा आदेश, हा, या संहितेखालील संपरीक्षच्या पूर्वी किंवा दरम्यान फिर्यादीत, समन्सात, वॉरंटात, उद्घोषणेत, आदेशात, न्यायनिर्णयात किंवा अन्य कार्यवाहीत कोणतीही चूक, गाळणूक किंवा अनियमित गोष्ट असल्यामुळे किंवा खटल्यास देण्यात आलेल्या मंजुरीत कोणतीही चूक किंवा अनियमित गोष्ट असल्यामुळे अपिलाचे, कायमीकरणाचे किंवा पुनरीक्षणाचे जे न्यायालय असेल त्याच्या कडून फिरवला जाणार नाही किंवा त्यात फेरबदल केला जाणार नाही-मात्र त्या न्यायालयाच्या मते त्यामुळे न्याय खरोखरीच निष्फळ झाला असेल तर तो अपवाद समजावा.

(२) या संहितेखालील कोणत्याही कार्यवाहीत कोणत्याही चुकीमुळे, गाळणुकीमुळे किंवा अनियमित गोष्टीमुळे अथवा खटल्यास देण्यात आलेल्या कोणत्याही मंजुरीतील कोणत्याही चुकीमुळे किंवा अनियमित गोष्टीमुळे न्याय निष्फळ झाला आहे का हे ठरवताना कार्यवाही आधीच्या टप्प्यात असताना तो आक्षेप घेता आला असता काय व घ्यायला हवा होता काय हा मुद्दा न्यायालय लक्षात घेईल.

दोष किंवा चूक असल्यामुळे जप्ती बेकायदेशीर व्हावयाची नाही.

४६६. या संहितेखाली कोणतीही जप्ती केली असता त्यासंबंधीच्या समन्समध्ये, दोषसिद्धीत, जप्ती-वॉरंटात किंवा अन्य कार्यवाहीत कोणताही दोष किंवा प्रारुपविषयक उणीव असल्यास त्यामुळे, ती जप्ती बेकायदेशीर होती किंवा जप्तीचे काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अतिक्रमण केले असे मानले जाणार नाही.

## प्रकरण छत्तीस

### विवक्षित अपराधांची दखल घेण्याची मुदत

व्याख्या.

४६७. या प्रकरणाच्या प्रयोजनापुरते, "मुदतमर्यादा" याचा अर्थ, संदर्भामुळे अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर, अपराधाची दखल घेण्यासाठी कलम ४६८ मध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी असा आहे.

---

*महाराष्ट्र कराधान विधि सुधारणा (मर्यादा लागू न होणे) अधिनियम, १९७६ (१९७६ चा महा. २४) याचे कलम २ पुढीलप्रमाणे आहे :—

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे प्रकरण छत्तीस विवक्षित अपराधांना लागू न होणे.

२. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या प्रकरण छत्तीसमधील कोणतीही गोष्ट—

(एक) अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमितीअन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधांस, किंवा

(दोन) त्या संहितेच्या उपबंधांन्वये अशा अपराधाबरोबर ज्यांची संपरीक्षा करता येईल अशा इतर कोणत्याही अपराधांस,

लागू होणार नाही आणि खंड (एक) किंवा खंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक अपराधाची दखल, जणू काही त्या प्रकरणाचे उपबंध अधिनियमित केलेले नसावेत, त्याप्रमाणे, अधिकारिता असलेल्या न्यायालयाला घेता येईल.

अनुसूची

(कलम २ पहा)

१. मुंबईचा मोटार स्पिरिटच्या विक्रीवर कर बसविण्याबाबत अधिनियम, १९५८ (सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६६).

२. मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ (सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१).

३. महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम ९).

४. महाराष्ट्र कृषि उत्पन्न करअधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम ४१).

५. महाराष्ट्र राज्य व्यवसायव्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १६).

४६८. (१) या संहितेत अन्यत्र अन्यथा उपबंधित केलेले असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, कोणतेही न्यायालय मुदतमर्यादा संपल्यानंतर, पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गातील अपराधाची दखल घेणार नाही. मुदतमर्यादा उलटून गेल्यानंतर दखल घेण्यास आडकाठी.

(२) मुदतमर्यादा—

(क्) अपराध द्रव्यदंडाच्याच शिक्षेला पात्र असल्यास, सहा महिने ;

(ख्) अपराध जास्तीत जास्त एक वर्ष इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेला पात्र असल्यास, एक वर्ष ;

(ग्) अपराध एक वर्षाहून अधिक, पण जास्तीत जास्त तीन वर्षे इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेला पात्र असल्यास, तीन वर्षे,

इतकी असेल.

[1][(३) या कलमाच्या प्रयोजनार्थ, ज्या अपराधांची संपरीक्षा एकत्रितपणे करता येईल त्यांच्या संबंधातील मुदतमर्यादा त्यांपैकी जो अपराध अधिक कडक शिक्षा किंवा जास्तीत जास्त कडक शिक्षा होण्यास पात्र असेल त्या अपराधाच्या संबंधात निश्चित करण्यात येईल.]

(क्) अपराधाच्या दिनांकास ; किंवा

(ख्) अपराधामुळे बाधा पोचलेल्या व्यक्तीला किंवा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला अपराध घडल्याचे ज्ञात नव्हते असे असेल तर, असा अपराध घडल्याचे ज्या दिवशी अशा व्यक्तीला प्रथमच आणि ज्या दिवशी कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला प्रथमच ज्ञात होईल त्यांपैकी अगोदरच्या दिवशी, किंवा

(ग्) अपराध कोणी केला हे ज्ञात नसेल तर, अपराधी कोण होता हे ज्या दिवशी, अपराधामुळे बाधा पोचलेल्या व्यक्तीला प्रथमच आणि ज्या दिवशी अपराधाबाबत अन्वेषण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला प्रथमच ज्ञात होईल त्यांपैकी अगोदरच्या दिवशी,

सुरू होईल.

(२) उक्त कालावधीची गणना करताना, ज्या दिवसापासून अशा कालावधीची गणना करावयाची तो वगळण्यात येईल.

**४७०.** (१) मुदतमर्यादेची गणना करताना, ज्या अवधीत कोणतीही व्यक्ती यथायोग्य तत्परतेने विवक्षित प्रकरणी अपराध्याविरुद्ध अन्य खटला चालवीत असेल—मग तो प्रारंभिक न्यायालयात असो वा अपिलाच्या किंवा पुनरीक्षणाच्या न्यायालयात असो—तो अवधी वगळण्यात येईल : **अवधी वगळणे.**

परंतु, तो खटला त्याच तथ्यांशी संबंधित असून जे न्यायालय अधिकारितेतील उणिवेमुळे किंवा तशाच स्वरूपाच्या अन्य कारणामुळे तो खटला विचारार्थ स्वीकारण्यात असमर्थ आहे त्या न्यायालयात तो सद्भावपूर्वक चालवला असल्याशिवाय असा कोणताही अवधी वगळला जाणार नाही.

(२) जेव्हा एखाद्या अपराधाबाबत खटला दाखल करण्याचे व्यादेशाद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थगित करण्यात आले असेल तेव्हा, मुदतमर्यादेची गणना करताना, व्यादेश किंवा आदेश चालू राहिल्याचा कालावधी आणि ज्या दिवशी तो व्यादेश किंवा आदेश काढला किंवा दिला व ज्या दिवशी तो मागे घेतला तो दिवस वगळला जाईल.

(३) जेव्हा एखाद्या अपराधाबद्दल खटल्याची नोटीस देण्यात आली असेल अथवा अपराधाबद्दल कोणताही खटला सुरू करण्यासाठी त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली शासनाची किंवा कोणत्याही प्राधिकरणाची पूर्वसंमती किंवा मंजुरी आवश्यक असेल तेव्हा, मुदतमर्यादेची गणना करताना, अशा नोटिशीचा कालावधी अथवा, प्रकरणपरत्वे, अशी संमती किंवा मंजुरी मिळवण्यासाठी लागणारा अवधी वगळला जाईल.

**स्पष्टीकरण.**—शासनाची किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाची संमती किंवा मंजुरी मिळवण्यासाठी लागणाऱ्या अवधीची गणना करताना, संमती किंवा मंजुरी मिळवण्यासाठी ज्या दिनांकास अर्ज केलेला असेल तो व शासनाचा किंवा अन्य प्राधिकरणाचा आदेश मिळाल्याचा दिनांक हे दोन्ही वगळले जातील.

(४) मुदतमर्यादेची गणना करताना, ज्या अवधीत अपराधी—

(क्) भारताबाहेर असेल किंवा भारताबाहेरील जे कोणतेही क्षेत्र केंद्र शासनाच्या प्रशासनाखाली आहे त्याबाहेर असेल, किंवा

(ख्) फरारी होऊन किंवा गुप्त राहून त्याने अटक चुकवली असेल,

तो अवधी वगळला जाईल.

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम ३३ द्वारे घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

न्यायालय बंद होईल तो दिनांक वगळणे. ४७१. जेव्हा न्यायालय बंद असण्याच्या दिवशी मुदतमर्यादा संपत असेल त्या बाबतीत, ज्या दिवशी न्यायालय पुन्हा सुरू होईल त्या दिवशी न्यायालयाला दखल घेता येईल.

**स्पष्टीकरण.**—न्यायालय कोणत्याही एखाद्या दिवशी त्याच्या नेहमीच्या कामाच्या वेळात बंद असेल तर, या कलमाच्या अर्थानुसार ते त्या दिवशी बंद असल्याचे मानले जाईल.

सतत चालू राहणारा अपराध. ४७२. सतत चालू राहणाऱ्या अपराधाच्या बाबतीत, अपराध चालू राहील त्या अवधीत प्रत्येक क्षणी नवीन मुदतमर्यादा सुरू होईल.

विवक्षित प्रकरणी मुदतमर्यादा वाढवणे. ४७३. या प्रकरणाच्या पूर्वगामी उपबंधात काहीही अंतर्भूत असले तरी, मुदतमर्यादा संपल्यानंतर एखाद्या अपराधाची दखल घ्यावयाची झाल्यास, विलंबाचे योग्य प्रकारे स्पष्टीकरण देण्यात आले आहे किंवा न्यायहितार्थ तशी दखल घेणे जरुरीचे आहे असे जर प्रकरणाच्या तथ्यांवरुन किंवा त्यातील परिस्थितीत कोणत्याही न्यायालयाचे समाधान झाले तर, त्याला त्या अपराधाची दखल घेता येईल.

## प्रकरण सदतीस

### संकीर्ण

उच्च न्यायालयां-समोरील संपरीक्षा. ४७४. जेव्हा उच्च न्यायालय कलम ४०७ खालील संपरीक्षेहून अन्य प्रकारे अपराधाची संपरीक्षा करील तेव्हा, सत्र न्यायालयाने जर त्या खटल्याची संपरीक्षा केली असती तर, त्याने जी प्रक्रिया अनुसरली असती तीच प्रक्रिया उच्च न्यायालय त्या अपराधाच्या संपरीक्षेत अनुसरील.

लष्करी न्यायालया-कडून संपरीक्षा होण्यास पात्र अशा व्यक्तींना समादेशक अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करणे. ४७५. (१) कोणत्या प्रकरणांमध्ये भूसैनिकी, नौसैनिकी किंवा वायुसैनिकी कायद्याला अधीन असलेल्या व्यक्तींची संपरीक्षा, ही संहिता लागू असलेले एखादे न्यायालय किंवा लष्करी न्यायालय करील त्याबाबत केंद्र शासनाला ही संहिता आणि 'भूसेना अधिनियम, १९५०' (१९५० चा ४६), 'नौसेना अधिनियम, १९५७' (१९५७ चा ६२) व 'वायुसेना अधिनियम, १९५०' (१९५० चा ४५) आणि संघराज्याच्या सशस्त्र सेनांसंबंधी त्या त्या काळी अंमलात असलेला कोणताही कायदा यांच्याशी सुसंगत असे नियम करता येतील; आणि जेव्हा कोणत्याही व्यक्तीला दंडाधिकाऱ्यापुढे आणले जाईल व ही संहिता लागू असलेल्या एखाद्या न्यायालयाकडून किंवा लष्करी न्यायालयाकडून ज्या अपराधाबद्दल संपरीक्षा होण्यास ती पात्र आहे अशा अपराधाचा दोषारोप तिच्यावर ठेवलेला असेल तेव्हा, असा दंडाधिकारी असे नियम लक्षात घेईल व योग्य प्रकरणी, ज्या अपराधाचा आरोप तिच्यावर असेल त्यासंबंधीच्या परिकथनासह दंडाधिकारी तिला, लष्करी न्यायालयाकडून संपरीक्षा होण्यासाठी, ती व्यक्ती ज्या पथकात असेल त्याच्या समादेशक अधिकाऱ्याकडे किंवा, प्रकरणपरत्वे, सर्वांत जवळच्या भूसैनिकी, नौसैनिकी किंवा वायुसैनिकी ठाण्याच्या समादेशक अधिकाऱ्याकडे सुपूर्द करील.

**स्पष्टीकरण.**—या कलमात,—

(क) "पथक" यामध्ये रेजिमेंट, कोअर, शिप, तुकडी, ग्रूप, बटालियन किंवा कंपनी यांचा समावेश आहे;

(ख) "लष्करी न्यायालय" यामध्ये, संघराज्याच्या सशस्त्र सेनादलांना लागू असलेल्या संबद्ध कायद्याखाली घटित झालेल्या लष्करी न्यायालयासारखेच अधिकार असलेल्या कोणत्याही अधिकरणाचा समावेश आहे.

(२) प्रत्येक दंडाधिकारी अशा कोणत्याही स्थळी तळ देऊन असलेल्या किंवा नेमलेल्या भूसैनिकांच्या, नौसैनिकांच्या, वायुसैनिकांच्या कोणत्याही पथकाच्या किंवा ग्रूपच्या कोणत्याही समादेशक अधिकाऱ्यांकडून तसा लेखी अर्ज आल्यास, अशा अपराधाचा आरोप ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीला गिरफ्तार करून ताब्यात घेण्यासाठी शिकस्तीचे प्रयत्न करील.

(३) उच्च न्यायालय स्वतःला योग्य वाटले तर, त्या राज्यात स्थित असलेल्या एखाद्या तुरुंगात स्थानबद्ध असलेल्या कैद्याला लष्करी न्यायालयापुढे संपरीक्षेसाठी किंवा त्या लष्करी न्यायालयापुढे प्रलंबित असलेल्या कोणत्याही कामाच्या संबंधात साक्ष तपासणीसाठी आणले जावे, असा निदेश देऊ शकेल.

प्रारुपे. ४७६. संविधानाच्या २२७ व्या अनुच्छेदाद्वारे प्रदान केलेल्या शक्तींच्या अधीनतेने, दुसऱ्या अनुसूचीत घालून दिलेले प्रारूपे प्रत्येक प्रकरणाच्या परिस्थितीत आवश्यक असतील त्या त्या फेरफारांसह त्यांत नमूद केलेल्या त्या त्या प्रयोजनासाठी वापरता येतील व वापरल्यास ते पुरेसे होईल.

उच्च न्यायालयाची नियम करण्याची शक्ती. ४७७. (१) राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने प्रत्येक उच्च न्यायालयाला पुढील गोष्टींबाबत नियम करता येतील, ते असे—

(क) आपणांस दुय्यम असलेल्या फौजदारी न्यायालयांमध्ये कोणत्या व्यक्तींना अर्जनवीस म्हणून काम करण्यास परवानगी देता येईल याबाबतचे नियम;

(ख) अशा व्यक्तींना लायसन देणे, त्यांनी धंदा चालवणे व त्यांनी आकारावयाच्या फीचे प्रमाण यांचे विनियमन करणारे नियम;

(ग) याप्रमाणे केलेल्यांपैकी कोणत्याही नियमाचे व्यतिक्रमण करण्याबद्दल शिक्षेचा उपबंध करणारे व कोणत्या प्राधिकरणाने अशा व्यतिक्रमणाबाबत अन्वेषण करावयाचे व शिक्षा द्यावयाच्या ते ठरवणारे नियम;

(घ) विहित करणे आवश्यक असेल किंवा विहित करता येईल अशा अन्य कोणत्याही बाबीविषयीचे नियम.

(२) या कलमाखाली केलेले सर्व नियम **शासकीय राजपत्रात** प्रकाशित केले जातील.

[1][४७८. एखाद्या राज्याच्या विधानसभेने ठरावाद्वारे तशी परवानगी दिल्यास, राज्य शासन उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करून अधिसूचनेद्वारे असे निदेशित करू शकेल की, कलम १०८, १०९, ११०, १४५ आणि १४७ यांमधील कार्यकारी दंडाधिकाऱ्यासंबंधीचे निदश म्हणजे प्रथमवर्ग न्याय दंडाधिकाऱ्यासंबंधीचे निर्देश होत असा त्याचा अर्थ लावण्यात यावा.] * काही विवक्षित प्रकरणांत कार्यकारी दंडाधिकाऱ्यांना नेमून दिलेल्या कार्यामध्ये फेरबदल करण्याची शक्ती.

४७९. ज्या कोणत्याही खटल्यात कोणताही न्यायाधीश किंवा दंडाधिकारी स्वत: एक पक्षकार आहे किंवा तो व्यक्तिशः हितसंबंधित आहे त्यात, तो त्याच्या न्यायालयावर ज्या न्यायालयात अपील होऊ शकते त्याच्या परवानगीखेरीज, त्या खटल्याची संपरीक्षा करणार नाही किंवा तो खटला संपरीक्षेसाठी सुपूर्द करणार नाही, आणि कोणताही न्यायाधीश किंवा दंडाधिकारी खुद्द त्याने दिलेल्या न्यायनिर्णयावरील किंवा आदेशावरील अपिलाची सुनावणी करणार नाही. न्यायाधीश किंवा दंडाधिकारी ज्यात व्यक्तिश: हितसंबंधित असेल तो खटला.

**स्पष्टीकरण.**—एखादा न्यायाधीश किंवा दंडाधिकारी कोणत्याही खटल्याशी सार्वजनिक नात्याने संबंधित आहे एवढ्याच कारणाने, अथवा अपराध जेथे करण्यात आल्याचे अभिकथन करण्यात आलेले आहे ते स्थळ किंवा त्या खटल्याच्या दृष्टीने महत्त्वाची अशी अन्य कोणतीही घडामोड जेथे घडल्याचे अभिकथन करण्यात आलेले असेल असे अन्य कोणतेही स्थळ त्याने पाहिलेले असून त्याने खटल्यासंबंधी चौकशी केलेली आहे तेवढ्याच कारणाने, तो त्यातील पक्षकार असल्याचे किंवा त्यात व्यक्तिशः हितसंबंधित असल्याचे मानले जाणार नाही.

४८०. कोणत्याही दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयात व्यवसाय करणाऱ्या कोणत्याही वकिलाला त्या न्यायालयात किंवा त्या न्यायालयाच्या स्थानिक अधिकारितेतील कोणत्याही न्यायालयात दंडाधिकारी म्हणून बसता येणार नाही. व्यवसाय करणाऱ्या वकिलाने विवक्षित न्यायालयात दंडाधिकारी म्हणून बसावयाचे नाही.

४८१. या संहितेखाली होणाऱ्या कोणत्याही संपत्तीच्या विक्रीच्या संबंधात ज्याने कोणतेही काम करावयाचे असेल अशा लोकसेवकाला ती संपत्ती खरेदी करता येणार नाही किंवा त्या संपत्तीसाठी बोली बोलता येणार नाही. विक्रीशी संबंधित असलेल्या लोकसेवकाने संपत्ती खरेदी करावयाची नाही किंवा त्या संपत्तीकरता बोली बोलायची नाही.

४८२. या संहितेखालील कोणताही आदेश अंमलात आणण्यासाठी किंवा कोणत्याही न्यायालयाच्या कार्यवाहीच्या दुरुपयोगास प्रतिबंध करण्यासाठी किंवा अन्यथा न्यायाची उद्दिष्टे साधण्यासाठी जरुरीचे असतील असे कोणतेही आदेश देण्याच्या ज्या अंगभूत शक्ती उच्च न्यायालयाला आहेत त्यांवर या संहितेतील कोणतीही गोष्ट मर्यादा घालते किंवा परिणाम करते, असे मानले जाणार नाही. उच्च न्यायालयाच्या अंगभूत शक्तींची व्यावृत्ती.

४८३. प्रत्येक उच्च न्यायालय त्याला दुय्यम असलेल्या न्याय दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयांवर, अशा दंडाधिकाऱ्यांकडून प्रकरणे सत्वर व योग्य तऱ्हेने निकालात काढली जातील याची सुनिश्चिती व्हावी अशा प्रकारे अधीक्षण करील. न्याय दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयांवर सतत अधीक्षण करणे हे उच्च न्यायालयाचे कर्तव्य.

---

१. १९८० चा अधिनियम ६३, कलम ८ द्वारे मूळ कलमाऐवजी घातले (२३ सप्टेंबर, १९८० रोजी व तेव्हापासून).

* फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७७ (१९७८ चा महा.१) याअन्वये मूळ कलम ४७८ च्या उपखंड (ख) ऐवजी नवीन खंड दाखल केला होता. पण आता मूळ कलमच बदलले असल्याने सदर सुधारणा दाखल केली नाही.

निरसन व व्यावृत्ती. ४८४. (१) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) याद्वारे निरसित झाली आहे.

(२) असे निरसन झाले असले तरीही,—

(क) ही संहिता जेव्हा अंमलात येणार त्या दिनांकाच्या निकटपूर्वी जर कोणतेही अपील, अर्ज, संपरीक्षा, चौकशी किंवा अन्वेषण प्रलंबित असेल तर, प्रकरणपरत्वे, असे अपील, अर्ज, संपरीक्षा, चौकशी किंवा अन्वेषण जणू काही ही संहिता अंमलात आलेली नसावी त्याप्रमाणे अशा प्रारंभाच्या निकटपूर्वी 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) (यात यानंतर 'जुनी संहिता' म्हणून निर्दिष्ट) जशी अंमलात होती तिच्या उपबंधानुसार निकालात काढले जाईल, चालू ठेवण्यात येईल किंवा करण्यात येईल :

परंतु, जुन्या संहितेच्या अठराव्या प्रकरणाखालील जी जी चौकशी या संहितेच्या प्रारंभाच्यावेळी प्रलंबित असेल ती प्रत्येक चौकशी या संहितेच्या उपबंधानुसार केली जाईल व निकालात काढली जाईल ;

(ख) जुन्या संहितेखाली प्रकाशित केलेल्या व या संहितेच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अंमलात असलेल्या सर्व अधिसूचना, काढलेल्या उद्घोषणा, प्रदान केलेल्या शक्ती, विहित केलेले नमुने, निश्चित केलेल्या स्थानिक अधिकारिता, दिलेले शिक्षादेश व आदेश, केलेले नियम आणि केलेल्या नियुक्ती (विशेष दंडाधिकारी म्हणून नव्हे) या संहितेच्या समनुरुप उपबंधाखाली अनुक्रमे प्रकाशित केलेल्या, काढलेल्या, प्रदान केलेल्या, विहित केलेल्या, निश्चित केलेल्या, दिलेले व केलेले असल्याचे मानले जाईल ;

(ग) जुन्या संहितेखाली दिलेल्या कोणत्याही मंजुरीच्या किंवा संमतीच्या अनुरोधाने व्हावी याची कोणतीही कार्यवाही त्या संहितेखाली सुरू झालेली नसेल तर, ती मंजुरी किंवा संमती या संहितेच्या समनुरुप उपबंधाखाली दिली असल्याचे मानले जाईल आणि अशा मंजुरीच्या किंवा संमतीच्या अनुरोधाने या संहितेखाली कार्यवाही सुरू करता येईल ;

(घ) जुन्या संहितेचे उपबंध संविधानाच्या ३६३ व्या अनुच्छेदाच्या अर्थांतर्गत संस्थानाधिपती असलेल्या व्यक्तीविरुद्ध गुदरलेल्या प्रत्येक खटल्याच्या संबंधात लागू असण्याचे चालू राहील.

(३) एखाद्या अर्जासाठी किंवा अन्य कार्यवाहीसाठी जुन्या संहितेखाली विहित केलेली मुदत या संहितेच्या प्रारंभी किंवा तत्पूर्वी संपली असेल तर, या संहितेने त्यासाठी त्याहून अधिक मुदत विहित केली आहे किंवा मुदत वाढवण्याकरिता या संहितेत उपबंध केलेले आहेत एवढ्याच कारणाने, या संहितेतील कोणत्याही गोष्टीचा अर्थ, त्यामुळे या संहितेखाली असा कोणताही अर्ज करणे किंवा कार्यवाही सुरु करणे शक्य आहे, असा लावला जाणार नाही.

# पहिली अनुसूची

## अपराधांचे वर्गीकरण

**स्पष्टीकरणात्मक टिप्पणी.**-(१) 'भारतीय दंड संहिते' खालील अपराधांसंबंधात, ज्याचा क्रमांक पहिल्या स्तंभात दिला आहे त्या कलमासमोरील स्तंभ दोन व तीन मधील नोंदी म्हणजे 'भारतीय दंड संहिते' तील अपराधाची व्याख्या किंवा त्याकरिता विहित केलेली शिक्षा म्हणून नव्हे तर केवळ कलमाचा सारांश दर्शवणाऱ्या म्हणून उद्देशित आहेत.

(२) या अनुसूचीत (एक) "प्रथम वर्ग दंडाधिकारी" आणि "कोणताही दंडाधिकारी" या शब्दप्रयोगात महानगर दंडाधिकारी समाविष्ट आहेत, पण कार्यकारी दंडाधिकारी नाहीत ; (दोन) "दखलपात्र" हा शब्द "पोलीस अधिकारी वॉरंटाशिवाय अटक करू शकेल" या अर्थाने योजलेला आहे ; आणि (तीन) "बिनदखली" हा शब्द "पोलीस अधिकारी वॉरंटाशिवाय अटक करणार नाही" या अर्थाने योजलेला आहे.

**एक—'भारतीय दंड संहिते' खालील अपराध**

| कलम (१) | अपराध (२) | शिक्षा (३) | दखलपात्र किंवा बिनदखली (४) | जामीनपात्र किंवा बिनजामिनी (५) | कोणत्या न्यायालयात संपरीक्षायोग्य (६) |
|---|---|---|---|---|---|
| | **प्रकरण पाच** | | | | |
| | **अपप्रेरण** | | | | |
| १०९ | कोणत्याही अपराधांचे अपप्रेरण—अपप्रेरणामुळे परिणामतः अपप्रेरित कृती घडली असून त्या अपप्रेरणाकरिता शिक्षेचा कोणताही उपबंध केलेला नसल्यास. | अपप्रेरित अपराधाला असेल तीच. | अपप्रेरित अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध जामीनपात्र किंवा बिनजामिनी असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षायोग्य असेल ते न्यायालय. |
| ११० | कोणत्याही अपराधांचे अपप्रेरण—अपप्रेरित व्यक्तीने अपप्रेरकाच्यापेक्षा वेगळ्या उद्देशाने कृती केल्यास. | अपप्रेरित अपराधाला असेल तीच. | अपप्रेरित अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध जामिनपात्र किंवा बिनजामिनी असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षायोग्य असेल ते न्यायालय. |
| १११ | कोणत्याही अपराधाचे अपप्रेरण—जेव्हा एका कृतीला अपप्रेरणा दिली जाऊन निराळी कृती केली जाते तेव्हा ; परंतुकाच्या अधीनतेने. | ज्या अपराधाला अपप्रेरणा देणे उद्देशित होते त्याला असेल तीच. | अपप्रेरित अपराध दखलपात्र किंवा बिनजामिनी असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध जामीनपात्र किंवा बिनजामिनी असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षायोग्य असेल ते न्यायालय. |
| ११३ | कोणत्याही अपराधांचे अपप्रेरण—अपप्रेरित कृतीमुळे घडून आलेला पण अपप्रेरकाला उद्देशित असलेल्या कृतीहून भिन्न असा परिणाम घडून आला असेल तेव्हा. | केलेल्या अपराधाला असेल तीच. | अपप्रेरित अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध जामीनपात्र किंवा बिनजामिनी असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षायोग्य असेल ते न्यायालय. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ११४ | कोणत्याही अपराधाचे अपप्रेरण—अपराध घडला तेव्हा अपप्रेरक उपस्थित असल्यास. | केलेल्या अपराधाला असेल तीच. | अपप्रेरित अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध जामीनपात्र किंवा बिनजामिनी असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षा योग्य असेल ते न्यायालय. |
| ११५ | मृत्यूच्या किंवा आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाचे अपप्रेरण-अपप्रेरणाच्या परिणामी अपराध न घडल्यास. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | अपप्रेरित अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | बिनजामिनी. | अपप्रेरित अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षा योग्य असेल ते न्यायालय. |
| | अपप्रेरणाच्या परिणामी, अपाय करणारी कृती केली गेल्यास. | १४ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | अपप्रेरित अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | बिनजामिनी. | अपप्रेरित अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षा योग्य असेल ते न्यायालय. |
| ११६ | कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाचे अपप्रेरण—अपप्रेरणाच्या परिणामी अपराध न घडल्यास. | अपराधासाठी उपबंधित केलेल्या कमाल मुदतीच्या एक-चतुर्थांशाइतका कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | अपप्रेरित अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध जामीनपात्र किंवा बिनजामिनी असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षा योग्य असेल ते न्यायालय. |
| | अपप्रेरक किंवा अपप्रेरित व्यक्ती ही, अपराध घडण्यास प्रतिबंध करणे हे ज्याचे कर्तव्य आहे असा लोकसेवक असल्यास. | अपराधासाठी उपबंधित केलेल्या कमाल मुदतीच्या निम्म्याइतका कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | अपप्रेरित अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध जामीनपात्र किंवा बिनजामिनी असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षा-योग्य असेल ते न्यायालय. |
| ११७ | जनतेकडून किंवा दहाहून जास्त व्यक्तींकडून अपराध घडून येण्यास अपप्रेरणा देणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | अपप्रेरित अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध जामीनपात्र किंवा बिनजामिनी असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षा-योग्य असेल ते न्यायालय. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११८ | मृत्यूच्या किंवा आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्याचा बेत लपवणे—अपराध घडल्यास. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | अपप्रेरित अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | बिनजामिनी. | अपप्रेरित अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षा-योग्य असेल ते न्यायालय. |
| | अपराध न घडल्यास. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | अपप्रेरित अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | जामीनपात्र. | अपप्रेरित अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षा-योग्य असेल ते न्यायालय. |
| ११९ | ज्यास प्रतिबंध करणे हे आपले कर्तव्य आहे तो अपराध करण्याचा बेत लोक सेवकाने लपवणे—अपराध घडल्यास. | अपराधाकरता उपबंधित केलेल्या कमाल मुदतीच्या निम्म्या-इतका कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | अपप्रेरित अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध जामीनपात्र किंवा बिनजामिनी असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षा-योग्य असेल ते न्यायालय. |
| | अपराध हा मृत्यूच्या किंवा आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास. | १० वर्षांचा कारावास. | अपप्रेरित अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | बिनजामिनी. | अपप्रेरित अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षा-योग्य असेल ते न्यायालय. |
| | अपराध न घडल्यास. | अपराधाकरता उपबंधित केलेल्या कमाल मुदतीच्या एक-चतुर्थांशाइतका कारावास, किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही. | अपप्रेरित अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | जामीनपात्र. | अपप्रेरित अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षा-योग्य असेल ते न्यायालय. |
| १२० | कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्याचा बेत लपवणे—अपराध घडल्यास. | अपराधाकरता उपबंधित केलेल्या कमाल मुदतीच्या एक-चतुर्थांशाइतका कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | अपप्रेरित अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध जामीनपात्र किंवा बिनजामिनी असेल त्यानुसार. | अपप्रेरित अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षा-योग्य असेल ते न्यायालय. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| | अपराध न घडल्यास. | अपराधाकरता उपबंधित केलेल्या कमाल मुदतीच्या एक-अष्टमांशाइतका कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | अपप्रेरित अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | जामीनपात्र. | अपप्रेरित अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षायोग्य असेल ते न्यायालय. |

प्रकरण पाच-क

**फौजदारीपात्र कट**

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| १२०ख | मृत्यूच्या किंवा आजीव कारावासाच्या किंवा दोन वर्षे अगर त्याहून अधिक मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्याचा फौजदारीपात्र कट. | कटाला उद्दिष्टभूत असलेल्या अपराधाच्या अपप्रेरणासाठी असेल तीच. | कटाला उद्दिष्टभूत असलेला अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | कटाला उद्दिष्टभूत असलेला अपराध जामीनपात्र किंवा बिनजामिनी असेल त्यानुसार. | कटाला उद्दिष्टभूत असलेल्या अपराधाच्या अपप्रेरणाचे कृत्य ज्या न्यायालयात संपरीक्षायोग्य असेल ते न्यायालय. |
| | अन्य कोणताही फौजदारीपात्र कट. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

प्रकरण सहा

**देशविरोधी अपराध**

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| १२१ | भारत सरकारविरुद्ध युद्ध करणे किंवा युद्ध करण्याचा प्रयत्न करणे किंवा युद्ध करण्यास अपप्रेरणा देणे. | मृत्यू, किंवा आजीव कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| १२१क | देशाविरुद्ध विवक्षित अपराध करण्याचा कट करणे. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२२ | भारत सरकारविरुद्ध युद्ध करण्याच्या उद्देशाने शस्त्रे इ. गोळा करणे. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| १२३ | युद्ध करण्याचा बेत, ते सुकर करण्याच्या उद्देशाने लपवणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| १२४ | कोणताही कायदेशीर अधिकार वापरण्यास भाग पाडण्याच्या किंवा निरुद्ध करण्याच्या उद्देशाने राष्ट्रपती, राज्यपाल इत्यादींवर हमला करणे. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| १२४क | प्रजाक्षोभन. | आजीव कारावास व द्रव्यदंड, किंवा ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड, किंवा द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| १२५ | भारत सरकारशी सख्याचे किंवा शांततेचे संबंध असलेल्या कोणत्याही आशियाई सत्ते-विरुद्ध युद्ध करणे किंवा असे युद्ध करण्यास अपप्रेरणा देणे. | आजीव कारावास व द्रव्यदंड, किंवा ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड, किंवा द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| १२६ | भारत सरकारशी सख्याचे किंवा शांततेचे संबंध असलेल्या कोणत्याही सत्तेच्या राज्य-क्षेत्रात लुटमार करणे. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड, आणि विव-क्षित संपत्तीचे समपहरण. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| १२७ | १२५ व १२६ या कलमांमध्ये उल्लेखिल्याप्रमाणे युद्धात किंवा लुटमारीत हस्तगत झालेली संपत्ती स्वीकारणे. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड, आणि विव-क्षित संपत्तीचे समपहरण. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| १२८ | लोकसेवकाने आपल्या हवालातीतील राज्यकैद्याला किंवा युद्धकैद्याला पळून जाण्यास इच्छापूर्वक मुभा देणे. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| १२९ | लोकसेवकाने हयगयीने आपल्या हवालातीतील राज्यकैद्याला किंवा युद्धकैद्याला पळून जाऊ देणे. | ३ वर्षांचा साधा कारा-वास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| १३० | अशा कैद्याला पळून जाण्यास मदत करणे किंवा अवैधपणे सोडवणे किंवा आसरा देणे, अथवा अशा कैद्याला पुन्हा गिरफ्तार करण्यास कोणताही प्रतिकार करणे. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |

प्रकरण सात

## भूसेना, नौसेना व वायुसेना यासंबंधीचे अपराध

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| १३१ | लष्करी बंडास अपप्रेरणा देणे, अथवा अधिकारी, भूसैनिक, नौसैनिक किंवा वायुसैनिक याला त्याच्या निष्ठेपासून किंवा कर्तव्यापासून विचलित करण्याचा प्रयत्न करणे. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| १३२ | लष्करी बंडाचे अपप्रेरण—त्याच्या परिणामी लष्करी बंड घडून आल्यास. | मृत्यू, किंवा आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| १३३ | अधिकाऱ्याला, भूसैनिकाला, नौसैनिकाला किंवा वायुसैनिकाला त्याचा वरिष्ठ अधिकारी आपले पदकार्य बजावत असताना त्याच्यावर हमला करण्यास अपप्रेरणा देणे. | ३ वर्षांचा कारावास, व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १३४ | असा हमला करण्यास अपप्रेरणा देणे— हमला घडून आल्यास. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १३५ | अधिकाऱ्याला, भूसैनिकाला, नौसैनिकाला किंवा वायुसैनिकाला चाकरी सोडून पळून जाण्यास अपप्रेरणा देणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| १३६ | याप्रमाणे चाकरी सोडून पळून आलेल्या अधिकाऱ्याला, भूसैनिकाला, नौसैनिकाला किंवा वायुसैनिकाला आसरा देणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| १३७ | व्यापारी जलयानावर त्याच्या नौकाधिपतीच्या किंवा तेथील हुकूमतदार व्यक्तीच्या हयगयीमुळे पळून आलेला इसम लपून राहणे. | ५०० रुपये द्रव्यदंड. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३८ | अधिकाऱ्याला, भूसैनिकाला, नौसैनिकाला किंवा वायुसैनिकाला शिरजोरीचे कृत्य करण्यास अपप्रेरणा देणे—परिणामी अपराध घडल्यास. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| १४० | आपण भूसैनिक, नौसैनिक किंवा वायुसैनिक आहोत असा समज व्हावा म्हणून असा भूसैनिक, नौसैनिक किंवा वायुसैनिक वापरतो तशी वर्दी परिधान करणे अथवा तसे कोणतेही ओळख-चिन्ह जवळ बाळगणे. | ३ महिन्यांचा कारावास, किंवा ५०० रुपये द्रव्य-दंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |

प्रकरण आठ

## सार्वजनिक प्रशांततेच्या विरोधी अपराध

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४३ | बेकायदेशीर जमावाचा घटक असणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| १४४ | कोणत्याही प्राणघातक हत्यारानिशी सज्ज होऊन बेकायदेशीर जमावात सामील होणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| १४५ | बेकायदेशीर जमावाला पांगण्याचा आदेश झाला असल्याचे माहीत असूनही त्यात सामील होणे किंवा थांबून राहणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| १४७ | दंगा करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| १४८ | प्राणघातक हत्यारानिशी सज्ज होऊन दंगा करणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १४९ | जर बेकायदेशीर जमावातील कोणत्याही घटकव्यक्तीने अपराध केला तर अशा जमावातील अन्य प्रत्येक घटकव्यक्ती अपराधाबद्दल दोषी होईल. | अपराधासाठी असेल तीच. | अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | अपराध जामीनपात्र किंवा बिनजामिनी असेल त्यानुसार. | अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षायोग्य असेल ते न्यायालय. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| १५० | बेकायदेशीर जमावात सहभागी होण्यासाठी भाडोत्री व्यक्ती गोळा करणे, त्यांना बांधून घेणे किंवा नेमणे. | अशा जामावातील घटक व्यक्तीसाठी असेल तीच व अशा जमावातील घटक व्यक्तीने केलेल्या कोणत्याही अपराधासाठी असेल तीच. | दखलपात्र. | अपराध जामीनपात्र किंवा बिनजामिनी असेल त्यानुसार. | अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षायोग्य असेल ते न्यायालय. |
| १५१ | पाच किंवा अधिक व्यक्तींच्या जमावाला पांगण्याचा आदेश मिळाल्यानंतर जाणीवपूर्वक त्यात सामील होणे किंवा थांबून राहणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| १५२ | लोकसेवक दंगा, इत्यादी शमवीत असताना त्याच्यावर हमला करणे किंवा त्याला अटकाव करणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १५३ | दंगा घडवून आणण्याच्या उद्देशाने बेछूटपणे प्रक्षोभन करणे—दंगा घडून आल्यास. | १ वर्षाचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| | दंगा घडून न आल्यास. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १५३क | वर्गावर्गांमध्ये शत्रुत्व वाढवणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | उपासनास्थान, इत्यादी ठिकाणी वर्गावर्गांमध्ये शत्रुत्व वाढवणे. | ५ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १५३ख | राष्ट्रीय एकात्मतेला बाधक असे अभ्यारोप, प्रपादने. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | सार्वजनिक उपासनास्थान इत्यादी ठिकाणी तसे केल्यास. | ५ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १५४ | जमिनीचा मालक किंवा ताबाधारक याने दंगा, इत्यादीची खबर न देणे. | १,००० रुपये द्रव्यदंड. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| १५५ | जिच्या हितार्थ किंवा जिच्या वतीने दंगा घडवून आणला असेल त्या व्यक्तीने त्याचा प्रतिबंध करण्यासाठी शक्य ते सर्व कायदेशीर उपाय न योजणे. | द्रव्यदंड. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| १५६ | ज्याच्या हितार्थ दंगा घडवून आणला असेल त्या मालकाच्या किंवा ताबाधारकाच्या अभिकर्त्याने त्यास प्रतिबंध करण्यासाठी शक्य व सर्व कायदेशीर उपाय न योजणे. | द्रव्यदंड. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| १५७ | बेकायदेशीर जमावासाठी गोळा केलेल्या भाडोत्री व्यक्तींना आसरा देणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| १५८ | बेकायदेशीर जमावात किंवा दंग्यात सहभागी होण्यासाठी भाडोत्री होणे किंवा शस्त्रसज्ज होऊन जाणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| १६० | दंगल करणे. | १ महिन्याचा कारावास, किंवा १०० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |

## प्रकरण नऊ

## लोकसेवकांकडून किंवा त्यांच्यासंबंधी घडणारे अपराध

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६१ | स्वत: लोकसेवक असून किंवा होणे अपेक्षित असून पदीय कार्याच्या बाबतीत वैध पारिश्रमिकाहून अन्य परितोषण घेणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १६२ | लोकसेवकावर प्रभाव पाडण्यासाठी भ्रष्ट किंवा अवैध मार्गाने परितोषण घेणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १६३ | लोकसेवकावर वैयक्तिक प्रभाव पाडण्यासाठी परितोषण घेणे. | १ वर्षाचा साधा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

एच ४२३२—२२

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| १६४ | स्वतःच्या संबंधात मागील दोन खंडांमध्ये व्याख्या केलेल्या अपराधांस लोकसेवकाने अपप्रेरणा देणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १६५ | लोकसेवकाने केलेल्या कोणत्याही कार्यवाहीत किंवा व्यवहारात निबद्ध असलेल्या व्यक्ती-कडून अशा लोकसेवकाने प्रतिफलाविना कोणतीही मूल्यवान वस्तू मिळवणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १६५क | कलम १६१ किंवा कलम १६५ खाली शिक्षापात्र असलेल्या अपराधांना अपप्रेरणा देणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १६६ | कोणत्याही व्यक्तीला क्षती पोहोचवण्याच्या उद्देशाने लोकसेवकाने कायद्याच्या निदेशाची अवज्ञा करणे. | १ वर्षाचा साधा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १६७ | क्षती पोहोचवण्याच्या उद्देशाने लोकसेवकाने चुकीच्या दस्तऐवजाची मांडणी करणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी |
| १६८ | लोकसेवकाने बेकायदेशीरपणे व्यापारधंदा करणे. .. .. .. | १ वर्षाचा साधा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १६९ | लोकसेवकाने बेकायदेशीरपणे संपत्ती विकत घेणे किंवा तीसाठी बोली देणे. .. | २ वर्षांचा साधा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही व संपत्ती खरेदी केली असेल तर तिचे अधिहरण. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १७० | लोकसेवकाची बतावणी करून तोतयेगिरी करणे. .. .. .. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. कोणताही दंडाधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७१ | लोकसेवक वापरतो तशी वर्दी किंवा तसे ओळखचिन्ह कपटी उद्देशाने परिधान करणे किंवा जवळ बाळगणे. | ३ महिन्यांचा कारावास, किंवा २०० रुपये द्रव्य-दंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |

प्रकरण नऊ-क

**निवडणुकींसंबंधीचे अपराध**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७१ङ | लाचलुचपत. | १ वर्षाचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही, अथवा जर सरबराईच्याच स्वरूपात केली असेल तर फक्त द्रव्यदंड. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १७१च | निवडणुकीत गैरवाजवी प्रभाव पाडणे. | १ वर्षाचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | निवडणुकीत तोतयेगिरी करणे. | १ वर्षाचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १७१छ | निवडणुकीच्या संबंधात खोटे कथन. | द्रव्यदंड. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १७१ज | निवडणुकीच्या संबंधात अवैधपणे पैसे खर्च करणे. | ५०० रुपये द्रव्यदंड. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १७१झ | निवडणुकीचे हिशेब ठेवण्यास चुकणे. | ५०० रुपये द्रव्यदंड. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

प्रकरण दहा

**लोकसेवकांच्या कायदेशीर प्राधिकाराचे अवमान**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७२ | लोकसेवकाकडून होणारी समन्सची बजावणी किंवा इतर कार्यवाही टाळण्यासाठी फरारी होणे. | १ महिन्याचा साधा कारावास, किंवा ५०० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी.] |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| | जर समन्सद्वारे किंवा नोटिशीद्वारे न्यायालयात जातीने हजर राहणे, इत्यादी आवश्यक केले असेल तर. | ६ महिन्यांचा साधा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| १७३ | कोणतेही समन्स किंवा नोटीस बजावण्यास किंवा लावण्यास प्रतिबंध करणे, अथवा ती लावली असता काढून टाकणे अथवा उद्घोषणेला प्रतिबंध करणे. | १ महिन्याचा साधा कारावास, किंवा ५०० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| | जर समन्स इ. द्वारे न्यायालयात जातीने हजर राहणे, इत्यादी आवश्यक केले असेल तर. | ६ महिन्यांचा साधा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| १७४ | विवक्षित स्थळी जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत हजर राहण्याचा वैध आदेश न पाळणे किंवा प्राधिकार नसता तेथून निघून जाणे. | १ महिन्याचा साधा कारावास, किंवा ५०० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| | जर आदेशाद्वारे न्यायालयात जातीने हजर राहणे, इ. आवश्यक केले असेल तर. | ६ महिन्यांचा साधा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| १७५ | लोकसेवकाकडे दस्तऐवज हजर किंवा स्वाधीन करण्यास विधितः बद्ध असलेल्या व्यक्तीने असा दस्तऐवज हजर करण्याचे उद्देशपूर्वक टाळणे. | १ महिन्याचा साधा कारावास, किंवा ५०० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | अपराध ज्या न्यायालयात घडला असेल ते न्यायालय—प्रकरण सव्वीसच्या उपबंधांच्या अधीनतेने; किंवा जर न्यायालयात घडला नसेल तर कोणताही दंडाधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | जर दस्तऐवज न्यायालयात हजर करणे किंवा त्याच्या स्वाधीन करणे आवश्यक केले असेल तर. | ६ महिन्यांचा साधा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | अपराध ज्या न्यायालयात घडला असेल ते न्यायालय—प्रकरण सव्वीसच्या उपबंधांच्या अधीनतेने; किंवा जर न्यायालयात घडला नसेल तर, कोणताही दंडाधिकारी. |
| १७६ | लोकसेवकाला दखल किंवा माहिती देण्यास विधितः बद्ध असलेल्या व्यक्तीने अशी दखल किंवा माहिती देण्याचे उद्देशपूर्वक टाळणे. | १ महिन्याचा साधा कारावास, किंवा ५०० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| | जर आवश्यक करण्यात आलेली दखल किंवा माहिती अपराध घडणे, इ. संबंधी असेल तर. | ६ महिन्यांचा साधा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| | या संहितेच्या कलम ३५६ च्या पोटकलम (१) खाली काढलेल्या आदेशाद्वारे दखल किंवा माहिती देणे आवश्यक केले असेल तर. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| १७७ | समजूनसवरून लोकसेवकाला खोटी माहिती पुरवणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| | जर आवश्यक करण्यात आलेली माहिती अपराध घडणे, इत्यादींसंबंधी असेल तर. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| १७८ | शपथ घेण्यास लोकसेवकाने रीतसर फर्माविले असता त्यास नकार देणे. | ६ महिन्यांचा साधा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | अपराध ज्या न्यायालयात घडला असेल ते न्यायालय,—प्रकरण सव्वीसच्या उपबंधांच्या अधीनतेने; किंवा जर न्यायालयात घडला नसेल तर, कोणताही दंडाधिकारी. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| १७९ | सत्य कथन करण्यास विधित: बद्ध असताना प्रश्नांची उत्तरे देण्यास नकार देणे. | ६ महिन्यांचा साधा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | अपराध ज्या न्यायालयात घडला असेल ते न्यायालय,—प्रकरण सव्वीसच्या उपबंधांच्या अधीनतेने; किंवा जर न्यायालयात घडला नसेल तर, कोणताही दंडाधिकारी. |
| १८० | लोकसेवकाकडे केलेले कथन स्वाक्षरित करण्यास विधित: बद्ध असताना तसे करण्यास नकार देणे. | ३ महिन्यांचा साधा कारावास, किंवा ५०० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | अपराध ज्या न्यायालयात घडला असेल ते न्यायालय,—प्रकरण सव्वीसच्या उपबंधांच्या अधीनतेने; किंवा जर न्यायालयात घडला नसेल तर, कोणताही दंडाधिकारी. |
| १८१ | जे खोटे आहे ते लोकसेवकाला समजूनसवरून शपथेवर खरे म्हणून सांगणे. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १८२ | लोकसेवकाला आपल्या कायदेशीर शक्तीचा वापर कोणत्याही व्यक्तीला क्षती किंवा त्रास होईल अशाप्रकारे करायला लावण्यासाठी त्याला खोटी माहिती देणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १८३ | लोकसेवकाच्या कायदेशीर प्राधिकारान्वये संपत्ती ताब्यात घेतली जाण्यास प्रतिकार करणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| १८४ | लोकसेवकाच्या प्राधिकारान्वये विक्रीस काढलेल्या संपत्तीच्या विक्रीला अटकाव करणे. | १ महिन्याचा कारावास, किंवा ५०० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८५ | संपत्तीच्या कायदेशीरपणे प्राधिकृत झालेल्या विक्रीत, ती खरेदी करण्यास विधितः अक्षम असलेल्या व्यक्तीने बोली बोलणे, किंवा बोली बोलण्याने येणारी आबंधने पाळण्याचा उद्देश नसताना बोली बोलणे. | १ महिन्याचा कारावास, किंवा २०० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| १८६ | लोकसेवक आपली सार्वजनिक कार्ये पार पाडीत असताना त्याला अटकाव करणे. .. | ३ महिन्यांचा कारावास, किंवा ५०० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| १८७ | लोकसेवकाला सहाय्य देणे विधितः बंधनकारक असताना असे सहाय्य देण्याचे टाळणे. .. | १ महिन्याचा साधा कारावास, किंवा २०० रुपये द्रव्यदंड किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| | आदेशिकेची अंमलबजावणी, अपराधांस प्रतिबंध, इत्यादी कामांत मदत मागणाऱ्या लोकसेवकाला मदत करण्याबाबत बुद्धिपुरःसर दुर्लक्ष करणे. | ६ महिन्यांचा साधा कारावास, किंवा ५०० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| १८८ | लोकसेवकाने कायदेशीरपणे जारी केलेल्या आदेशाची अवज्ञा—कायदेशीरपणे नेमलेल्या व्यक्तींना अशा अवज्ञेमुळे अटकाव, त्रास किंवा क्षती पोचल्यास. | १ महिन्याचा साधा कारावास, किंवा २०० रुपये द्रव्यदंड, किंवा दो ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| | मानवी जीवितास, आरोग्याला किंवा सुरक्षिततेला अशा अवज्ञेमुळे धोका पोचल्यास, इत्यादी. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| १८९ | कोणतेही पदीय कार्य करण्याबद्दल किंवा करण्याचे वर्जिण्याबद्दल लोकसेवकाचे मन वळवण्यासाठी त्याला किंवा तो जिच्यामध्ये हितसंबंधित असेल त्या व्यक्तीला क्षती पोचवण्याचा त्याला धाक घालणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| १९० | लोकसेवकाकडे संरक्षणासाठी कायदेशीर अर्ज करण्यापासून परावृत्त राहण्याबद्दल एखाद्या व्यक्तीचे मन वळवण्याकरता तिला क्षती पोचवण्याचा धाक घालणे. | १ वर्षाचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | **प्रकरण अकरावे** | | | | |
| | **खोटा पुरावा आणि सार्वजनिक न्यायाच्या विरोधी अपराध** | | | | |
| १९३ | न्यायिक कार्यवाहीत खोटा पुरावा देणे किंवा रचणे. .. .. .. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | अन्य कोणत्याही प्रकरणी खोटा पुरावा देणे किंवा रचणे. .. .. .. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| १९४ | देहान्तदंडाच्या अपराधाबद्दल एखाद्या व्यक्तीची दोषसिद्धी घडवून आणण्याच्या उद्देशाने खोटा पुरावा देणे किंवा रचणे. | आजीव कारावास, किंवा १० वर्षे सश्रम कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| | जर त्यायोगे निरपराध व्यक्ती सिद्धदोष ठरली आणि फाशी गेली तर. .. .. | मृत्युदंड किंवा वरील-प्रमाणे. | बिनदखली. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| १९५ | आजीव कारावासाच्या अथवा ७ वर्षे किंवा त्याहून अधिक कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल दोषसिद्धी घडवून आणण्याच्या उद्देशाने खोटा पुरावा देणे किंवा रचणे. | अपराधाकरता असेल तीच. | बिनदखली. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| १९६ | जो पुरावा खोटा किंवा रचलेला असल्याचे माहीत असेल तो न्यायिक कार्यवाही मध्ये वापरणे. | खोटा पुरावा देण्याबद्दल किंवा रचण्याबद्दल असेल तीच. | बिनदखली. | .. असा पुरावा देण्याचा अपराध जामीनपात्र किंवा बिनजामिनी असेल त्यानुसार. | खोटा पुरावा देण्याचा किंवा रचण्याचा अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षा-योग्य असेल ते न्यायालय. |
| १९७ | एखाद्या तथ्याबद्दल जशा प्रकारचे प्रमाणपत्र पुरावा म्हणून स्वीकार्य असते तशा प्रकारचे खोटे प्रमाणपत्र समजूनसवरून देणे किंवा स्वाक्षरित करणे. | खोटा पुरावा देण्याबद्दल किंवा रचण्याबद्दल असेल तीच. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. खोटा पुरावा देण्याचा अपराध ज्या न्याया-लयात संपरीक्षायोग्य असेल ते न्यायालय. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९८ | खोटे असल्याचे स्वतःला माहीत असलेले प्रमाणपत्र खरे म्हणून वापरणे. .. | खोटा पुरावा देण्याबद्दल किंवा रचण्याबद्दल असेल तीच. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. खोटा पुरावा देण्याचा अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षायोग्य असेल ते न्यायालय. |
| १९९ | जे कोणतेही अधिकथन कायद्यानुसार पुरावा म्हणून स्वीकार्य आहे त्यात केलेले खोटे कथन. | खोटा पुरावा देण्याबद्दल किंवा रचण्याबद्दल असेल तीच. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. खोटा पुरावा देण्याचा अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षायोग्य असेल ते न्यायालय. |
| २०० | असे अधिकथन खोटे असल्याचे माहीत असताना ते खरे म्हणून वापरणे. .. | खोटा पुरावा देण्याबद्दल किंवा रचण्याबद्दल असेल तीच. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. खोटा पुरावा देण्याचा अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षायोग्य असेल ते न्यायालय. |
| २०१ | अपराध्याला शिक्षेपासून वाचवण्यासाठी पुरावा नाहीसा होण्याची तजवीज करणे किंवा त्यासंबंधी खोटी माहिती देणे—अपराध देहांतदंडच असल्यास. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | ज्या अपराधासंबंधात पुरावा नाहीसा केलेला आहे तो दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | जामीनपात्र. | .. सत्र न्यायालय. |
| | आजीव कारावासाच्या किंवा १० वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास. .. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | १० वर्षांहून कमी कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास. .. .. | अपराधाकरता उपबंधित केलेल्या कमाल मुदतीच्या एक-चतुर्थांशाइतका कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षायोग्य असेल ते न्यायालय. |
| २०२ | अपराधाची माहिती देण्यास विधितः बद्ध असलेल्या व्यक्तीने माहिती देण्याचे उद्देशपूर्वक टाळणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २०३ | घडलेल्या अपराधाबाबत खोटी माहिती देणे. .. .. .. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| २०४ | कोणताही दस्तऐवज पुरावा म्हणून हजर केला जाऊ नये यासाठी लपवणे किंवा नष्ट करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २०५ | दाव्यातील किंवा फौजदारी खटल्यातील कोणत्याही कृतीच्या किंवा कामकाजाच्या प्रयोजनार्थ अथवा जामीनदार किंवा प्रतिभूती बनण्यासाठी तोतयेगिरी करणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २०६ | समपहृत म्हणून किंवा शिक्षादेशाखालील द्रव्यदंडाची पूर्ती म्हणून किंवा हुकूमनाम्याची अंमलबजावणी म्हणून संपत्तीचे अभिग्रहण होऊ नये यासाठी ती कपटीपणाने हलवणे किंवा लपवणे, इत्यादी. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| २०७ | समपहृत म्हणून किंवा शिक्षादेशाखालील द्रव्यदंडाची पूर्ती म्हणून किंवा हुकूमनाम्याची अंमलबजावणी म्हणून संपत्तीचे अभिग्रहण होऊ नये यासाठी, तिच्यावर हक्क नसताना दावा सांगणे किंवा तीवरील कोणत्याही हक्कासंबंधी फसवणूक करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| २०८ | देय नसलेल्या रकमेसाठी कपटीपणाने हुकूमनामा होऊ देणे किंवा हुकूमनाम्याची पूर्ती करण्यात आल्यानंतर त्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी होऊ देणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २०९ | न्यायालयात खोटा मागणी हक्क सांगणे. | २ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २१० | आपणांस देय नसलेल्या रकमेसाठी कपटीपणाने हुकूमनामा मिळवणे किंवा हुकूमनाम्याची पूर्ती झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी घडवून आणणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २११ | क्षती पोचवण्याच्या उद्देशाने अपराधाचा खोटा दोषारोप करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | दोषारोप केलेला अपराध ७ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कारावासाच्या शिक्षेला पात्र असल्यास. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दोषारोप केलेला अपराध देहांतदंडच किंवा आजीव कारावासाच्या शिक्षेला पात्र असल्यास. .. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. सत्र न्यायालय. |
| २१२ | अपराध्याला आसरा देणे—अपराध देहांतदंडच असल्यास. .. .. .. | ५ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | आजीव कारावासाच्या किंवा १० वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास. .. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | १० वर्षांच्या नव्हे पण १ वर्षाच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास. .. .. | अपराधाकरता उपबंधित केल्याप्रमाणे कमाल मुदतीच्या एक-चतुर्थांशा-इतका व तशा वर्णनाचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २१३ | अपराध्याला शिक्षेपासून वाचविण्यासाठी देणगी घेणे, इ.– अपराध देहांतदंडच असल्यास. .. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | आजीव कारावासाच्या किंवा १० वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेला पात्र असल्यास. .. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | १० वर्षांहून कमी कारावासाच्या शिक्षेला पात्र असल्यास. | अपराधाकरता उपबंधित केलेल्या कमाल मुदतीच्या एक-चतुर्थांशा-इतका कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २१४ | अपराध्याला शिक्षेपासून वाचवण्याच्या प्रतिफलादाखल देणगी देऊ करणे किंवा संपत्ती परत करणे—अपराध देहांतदंडच असल्यास. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | आजीव कारावासाच्या किंवा १० वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेला पात्र असल्यास. .. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

एच ४२३२—२३अ

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | १० वर्षांहून कमी कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास. | अपराधाकरता उपबंधित केलेल्या कमाल मुदतीच्या एक-चतुर्थांशाइतका कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २१५ | एखाद्या अपराधामुळे एखाद्या व्यक्तीला ज्या जंगम संपत्तीपासून वंचित व्हावे लागले असेल ती परत मिळवण्याच्या कामी मदत करण्यासाठी अपराध्याला गिरफ्तार न करवता देणगी घेणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २१६ | हवालातीतून पळालेल्या किंवा ज्याच्या गिरफ्तारीचा आदेश देण्यात आला आहे अशा अपराध्याला आसरा देणे—अपराध देहांतदंडच असल्यास. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | आजीव कारावासाच्या किंवा १० वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास. | ३ वर्षांचा कारावास-द्रव्यदंडासह किंवा त्याविना. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | १० वर्षांच्या नव्हे पण १ वर्षाच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास. | अपराधाकरता उपबंधित केलेल्या कमाल मुदतीच्या एक-चतुर्थांशाइतका कारावास, किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी |
| २१६क | लुटारू किंवा दरोडेखोर यांना आसरा देणे. | ७ वर्षांचा सश्रम कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २१७ | व्यक्तीला शिक्षेपासून किंवा संपत्तीला समपहरणापासून वाचवण्याच्या उद्देशाने लोकसेवकाने कायद्याच्या निदेशाची अवज्ञा करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २१८ | एखाद्या व्यक्तीला शिक्षेपासून किंवा संपत्तीला समपहरणापासून वाचवण्याच्या उद्देशाने लोकसेवकाने चुकीच्या अभिलेखाची किंवा लेखाची मांडणी करणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २१९ | लोकसेवकाने न्यायिक कार्यवाहीत बेकायदा असल्याचे आपणास माहीत असेल तो आदेश अहवाल, अधिनिर्णय किंवा निर्णय भ्रष्टतापूर्वक देणे व अधिघोषित करणे. | ७ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २२० | प्राधिकार असलेल्या व्यक्तीने आपण बेकायदा वागत असल्याचे माहीत असताना संपरीक्षेसाठी सुपूर्द करणे किंवा बंदिवासात पाठवणे. | ७ वर्षांचा कारावास किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २२१ | अपराध्याला गिरफ्तार करण्यास विधितः बद्ध असलेल्या लोकसेवकाने गिरफ्तारी करण्याचे उद्देशपूर्वक टाळणे——अपराध देहांतदंडय असल्यास. | ७ वर्षांचा कारावास, द्रव्यदंडासह, किंवा त्याविना. | ज्या अपराधासंबंधात अशी अकृती करण्यात आली असेल ती दखल पात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | आजीव कारावासाच्या किंवा १० वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास. .. | ३ वर्षांचा कारावास-द्रव्यदंडासह किंवा त्याविना. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | १० वर्षांहून कमी कारावासाच्या शिक्षेला पात्र असल्यास. .. .. .. | २ वर्षांचा कारावास द्रव्यदंडासह किंवा त्याविना | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २२२ | न्यायालयाच्या शिक्षादेशास अधीन असलेल्या व्यक्तीला गिरफ्तार करण्यास विधितः बद्ध असलेल्या लोकसेवकाने गिरफ्तारी करण्याचे उद्देशपूर्वक टाळणे——मृत्युची शिक्षा झाली असल्यास. | आजीव कारावास, किंवा १४ वर्षांचा कारावास-द्रव्यदंडासह किंवा त्याविना. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| | आजीव कारावासाची अथवा १० वर्षे किंवा त्याहून अधिक कारावासाची शिक्षा झाली असल्यास. | ७ वर्षांचा कारावास-द्रव्यदंडासह किंवा त्याविना. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | १० वर्षांहून कमी कारावासाची शिक्षा झाली असल्यास किंवा कायदेशीरपणे हवालातीत पाठवलेले असल्यास. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| २२३ | लोकसेवकाने हयगयीने बंदिवासातून पळून जाऊ देणे. | २ वर्षांचा साधा कारावास, किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| २२४ | एखाद्या व्यक्तीने आपल्या कायदेशीर गिरफ्तारीला प्रतिकार किंवा अटकाव करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| २२५ | कोणत्याही व्यक्तीच्या कायदेशीर गिरफ्तारीला प्रतिकार किंवा अटकाव करणे अथवा तिची कायदेशीर हवालातीतून अवैधपणे सुटका करणे. | २ वर्षांचा कारावास किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| | आजीव कारावासाच्या किंवा १० वर्षे कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाचा दोषारोप असल्यास. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | देहांतदंडय अपराधाचा दोषारोप असल्यास. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | त्या व्यक्तीला आजीव कारावासाची अथवा १० वर्षे किंवा त्याहून अधिक कारावासाची शिक्षा झाली असल्यास. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | मृत्यूची शिक्षा झाली असल्यास. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| २२५क | ज्यांसाठी अन्यथा उपबंध केलेला नाही अशा प्रकरणांत, लोकसेवकाने गिरफ्तारी करण्याचे टाळणे किंवा पळून जाऊ देणे :— | | | | |
| | (क) उद्देशपूर्वक गिरफ्तारी करण्याचे टाळल्यास किंवा पलायन होऊ दिल्यास ; | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | (ख) हयगयीने गिरफ्तारी करण्याचे टाळल्यास किंवा पलायन होऊ दिल्यास. | २ वर्षांचा साधा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २२५ख | ज्यांसाठी अन्यथा उपबंध केलेला नाही अशा प्रकरणांत, कायदेशीर गिरफ्तारीला प्रतिकार करणे किंवा पळून जाणे किंवा अवैधपणे सुटका करणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| २२७ | शिक्षा-माफीच्या शर्तीचा भंग. | मूळच्या शिक्षादेशातील शिक्षा किंवा शिक्षेचा एखादा भाग भोगून झालेला असल्यास, उरलेली शिक्षा. | दखलपात्र. | बिनजामिनी. | मूळचा अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षा-योग्य असेल ते न्यायालय. |
| २२८ | न्यायिक कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यात पीठासीन असलेल्या लोकसेवकाचा उद्देशपूर्वक अपमान करणे किंवा त्याच्या कामात व्यत्यय आणणे. | ६ महिन्यांचा साधा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | अपराध ज्या न्यायालयात घडला असेल ते न्यायालय—प्रकरण सव्वीसच्या उपबंधांच्या अधीनतेने |
| [1][२२८क | विवक्षित अपराधांना बळी पडलेली व्यक्ती कोण ते उघड करणे, इत्यादी. | २ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| | न्यायालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय त्याचे कामकाजवृत्त छापणे किंवा प्रकाशित करणे. | २ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी.] |
| २२९ | ज्यूरी-सदस्याची किंवा न्यायसहायकाची बतावणी करून तोतयेगिरी करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

## प्रकरण बारा

## नाणी व शासकीय मुद्रांक यासंबंधीचे अपराध

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३१ | नाणे नकली तयार करणे किंवा नकली नाणे तयार करण्याच्या प्रक्रियेचा कोणताही भाग पार पाडणे. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी |

१. १९८३ चा अधिनियम, ४३, कलम ५ द्वारे समाविष्ट केले (२५ डिसेंबर, १९८३ रोजी व तेव्हापासून).

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| २३२ | भारतीय नाणे नकली तयार करणे किंवा असे नाणे नकली तयार करण्याच्या प्रक्रियेचा कोणताही भाग पार पाडणे. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| २३३ | नाणे नकली तयार करण्याचे एखादे साधन बनवणे, विकत घेणे, किंवा विकणे. .. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २३४ | भारतीय नाणे नकली तयार करण्याचे साधन बनवणे, विकत घेणे किंवा विकणे. .. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| २३५ | नाणे नकली तयार करण्याच्या कामी वापरण्याकरता साधन किंवा सामग्री कब्जात बाळगणे. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी |
| | भारतीय नाणे असेल तर. .. .. .. .. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| २३६ | भारताबाहेर नाण्याचे नकलीकरण करण्यास भारतामध्ये अपप्रेरणा देणे. .. | असे नकली नाणे भारतात तयार करण्यास दिलेल्या अपप्रेरणाबद्दल उपबंधित केलेली शिक्षा. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| २३७ | नकली नाण्याची आयात किंवा निर्यात—ते नकली असल्याचे माहीत असताना. .. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २३८ | भारतीय नकली नाण्याची आयात किंवा निर्यात—ते नकली असल्याचे माहीत असताना. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| २३९ | कोणतेही नकली नाणे ते कब्जात आले तेव्हा तसे असल्याचे माहीत असताना ठेवून घेणे आणि ते कोणत्याही व्यक्तीला देणे, इत्यादी. | ५ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २४० | भारतीय नाण्याबाबत तसेच करणे. .. .. .. .. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |

एब ४२३२—२४

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २४१ | कोणतेही नकली नाणे अन्य व्यक्तीकडे खरे म्हणून समजूनसवरून सुपूर्द करणे—ते जेव्हा प्रथम कब्जात आले तेव्हा सुपूर्दकाराला ते नकली असल्याचे माहीत नसल्यास. | २ वर्षांचा कारावास, किंवा नकली तयार केलेल्या नाण्याच्या मूल्याच्या १० पटीपर्यंत द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. कोणताही दंडाधिकारी |
| २४२ | एखाद्या व्यक्तीने नकली नाणे कब्जात बाळगणे—ते नाणे कब्जात आले तेव्हा ते नकली असल्याचे तिला माहीत असल्यास. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २४३ | एखाद्या व्यक्तीने भारतीय नाणे कब्जात बाळगणे—ते नाणे कब्जात आले तेव्हा ते नकली असल्याचे तिला माहीत असल्यास. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २४४ | टाकसाळीत कामाला असलेल्या व्यक्तीने कायद्यानुसार ठरलेल्याहून निराळ्या वजनाचे किंवा मिश्रणाचे नाणे घडवणे. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २४५ | नाणी बनवण्याचे कोणतेही साधन बेकायदेशीरपणे टाकसाळीतून घेऊन जाणे. .. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २४६ | कपटीपणाने कोणत्याही नाण्याचे वजन कमी करणे किंवा मिश्रण बदलणे. .. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २४७ | कपटीपणाने भारतीय नाण्याचे वजन कमी करणे किंवा मिश्रण बदलणे. .. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २४८ | कोणतेही नाणे निराळ्या वर्णनाचे नाणे म्हणून खपून जावे या उद्देशाने त्या नाण्याचे रूप बदलणे. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २४९ | भारतीय नाणे निराळ्या वर्णनाचे नाणे म्हणून खपून जावे या उद्देशाने त्या नाण्याचे रूप बदलणे. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २५० | बदल करण्यात आला आहे हे माहीत असताना कब्जात बाळगलेले नाणे दुसऱ्या व्यक्तीकडे सुपूर्द करणे. | ५ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २५१ | बदल करण्यात आलेला आहे हे माहीत असताना कब्जात बाळगलेले भारतीय नाणे सुपूर्द करणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| २५२ | बदल करण्यात आलेले नाणे एखाद्या व्यक्तीने कब्जात बाळगणे—ते नाणे कब्जात आले तेव्हा त्यात बदल केला असल्याचे तिला माहीत असल्यास. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| २५३ | बदल करण्यात आलेले भारतीय नाणे एखाद्या व्यक्तीने कब्जात बाळगणे—ते नाणे कब्जात आले तेव्हा त्यात बदल केला असल्याचे तिला माहीत असल्यास. | ५ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २५४ | एखादे नाणे अस्सल म्हणून दुसऱ्या व्यक्तीला सुपूर्द करणे—ते नाणे पहिल्यांदा कब्जात आले तेव्हा त्यात बदल करण्यात आल्याचे सुपूर्दकाराला माहीत नसल्यास. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा नाण्याच्या मूल्याच्या १० पटीपर्यंत द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २५५ | शासकीय मुद्रांक नकली तयार करणे. .. .. .. .. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| २५६ | शासकीय मुद्रांक नकली तयार करण्यासाठी साधन किंवा सामग्री कब्जात बाळगणे. .. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २५७ | शासकीय मुद्रांक नकली तयार करण्यासाठी साधन बनवणे, विकत घेणे किंवा विकणे. .. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २५८ | नकली शासकीय मुद्रांकाची विक्री. .. .. .. .. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २५९ | नकली शासकीय मुद्रांक कब्जात बाळगणे. .. .. .. .. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २६० | जो नकली असल्याचे माहीत आहे असा शासकीय मुद्रांक अस्सल म्हणून वापरणे. .. | ७ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २६१ | शासनास हानी पोचवण्याच्या उद्देशाने, शासकीय मुद्रांक लावलेल्या पदार्थावरील कोणताही लेख पुसून टाकणे, किंवा एखाद्या दस्तऐवजासाठी वापरलेला मुद्रांक त्यावरून काढून टाकणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २६२ | जो आधी वापरण्यात आलेला असल्याचे माहीत आहे असा शासकीय मुद्रांक वापरणे. .. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २६३ | मुद्रांक वापरण्यात आलेला असल्याचे दर्शविणारी खूण खोडून टाकणे. | ३ वर्षांचा कारावास किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २६३क | खोट्या मुद्रांकांना मनाई. | २०० रुपये द्रव्यदंड. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |

प्रकरण तेरा

**वजने व मापे यासंबंधीचे अपराध**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २६४ | वजन करण्यासाठी खोट्या साधनाचा कपटपूर्ण वापर. | १ वर्षाचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| २६५ | खोटे वजन किंवा माप याचा कपटपूर्ण वापर. | १ वर्षाचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| २६६ | कपटपूर्ण वापरासाठी खोटी वजने किंवा मापे कब्जात बाळगणे. | १ वर्षाचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| २६७ | कपटपूर्ण वापरासाठी खोटी वजने किंवा मापे बनवणे किंवा विकणे. | १ वर्षाचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | बिनजामिनी. | कोणताही दंडाधिकारी. |

प्रकरण चौदा

**सार्वजनिक आरोग्य, सुरक्षितता, सोय, सभ्यता व नीतिमत्ता यांना बाधक असे अपराध**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २६९ | जीवितास धोकादायक असलेल्या कोणत्याही रोगाचा संसर्ग जीमुळे पसरण्याचा संभव असल्याचे माहीत आहे अशी कोणतीही हयगयीची कृती करणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| २७० | जीवितास धोकादायक असलेल्या कोणत्याही रोगाचा संसर्ग ज्यीमुळे पसरण्याचा संभव असल्याचे माहीत आहे अशी कोणतीही घातकी कृती करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २७१ | कोणत्याही पृथक्‌वासाच्या नियमाची समजूनसवरुन अवज्ञा करणे. .. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २७२ | विक्रीसाठी असलेल्या खाद्य पदार्थात किंवा पेयात ते अपायकारक होईल अशाप्रकारे भेसळ करणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २७३ | कोणताही खाद्य पदार्थ किंवा पेय ते अपायकारक असल्याचे माहीत असताना खाद्य पदार्थ किंवा पेय म्हणून त्याची विक्री करणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २७४ | विक्रीसाठी ठेवावयाच्या कोणत्याही औषधिद्रव्यात किंवा औषधीय सिद्धपदार्थात, त्याची गुणकारिता कमी होईल किंवा कार्य बदलेल किंवा ते अपायकारक होईल अशाप्रकारे त्यात भेसळ करणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २७५ | कोणतेही औषधिद्रव्ये किंवा औषधीय सिद्धपदार्थ, त्यात भेसळ करण्यात आल्याचे माहीत असताना विक्रीसाठी ठेवणे किंवा दवाखान्यातून देणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २७६ | कोणतेही औषधिद्रव्ये किंवा वैद्यकीय सिद्धपदार्थ, वेगळे औषधिद्रव्य किंवा वैद्यकीय सिद्धपदार्थ म्हणून समजून सवरून विकणे किंवा दवाखान्यातून देणे, | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २७७ | सार्वजनिक झऱ्याचे किंवा जलाशयाचे पाणी घाण करणे. .. .. .. | ३ महिन्यांचा कारावास, किंवा ५०० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २७८ | वातावरण आरोग्यास अपायकारक करणे. .. .. .. | ५०० रुपये द्रव्यदंड. .. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २७९ | ज्यामुळे मानवी जीवित धोक्यात येणे, इ. गोष्टी होतील इतक्या बेफामपणे किंवा हयगयीने सार्वजनिक रस्त्यावरून वाहन हाकणे किंवा सवारी करणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रूपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २८० | ज्यामुळे मानवी जीवित धोक्यात येणे, इ. गोष्टी होतील इतक्या बेफामपणे किंवा हयगयीने एखादे जलयान चालवणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रूपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २८१ | फसवा प्रकाश, चिन्ह किंवा बोयरा दाखवणे. .. .. .. .. | ७ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २८२ | भाडे घेऊन एखाद्या व्यक्तीला ज्यामुळे तिचे जीवित धोक्यात येईल अशा असुरक्षित स्थितीत किंवा इतका बोजा लादलेल्या जलयानातून जलमार्गे नेणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रूपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २८३ | कोणत्याही सार्वजनिक रस्त्यात किंवा नौकानयन मार्गात धोका निर्माण करणे, अटकाव करणे किंवा क्षती पोचवणे. | २०० रूपये द्रव्यदंड. .. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २८४ | ज्यामुळे मानवी जीवित धोक्यात येणे, इ. गोष्टी होतील अशा प्रकारे कोणत्याही विषारी पदार्थाबाबत हयगयीचे वर्तन करणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रूपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २८५ | ज्यामुळे मानवी जीवित धोक्यात येणे, इ. गोष्टी होतील अशा प्रकारे आग किंवा कोणताही ज्वालाग्राही पदार्थ यांच्याबाबत हयगयीचे वर्तन करणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रूपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २८६ | कोणत्याही स्फोटक पदार्थाबाबत याप्रमाणे हयगयीने वर्तन करणे. .. .. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रूपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २८७ | कोणत्याही यंत्रसामग्रीबाबत याप्रमाणे हयगयीचे वर्तन करणे. .. .. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रूपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २८८ | जी कोणतीही इमारत पाडून टाकण्यास किंवा तिची दुरुस्ती करण्यास हक्कदार करणारी शक्ती असलेल्या व्यक्तीने ती इमारत पाडण्यामुळे मानवी जीवितास निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्याच्या संबंधात खबरदारी घेण्याचे टाळणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रूपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| २८९ | एखाद्या व्यक्तीने आपल्या कब्जातील कोणत्याही प्राण्यापासून मानवी जीविताला पोचणाऱ्या धोक्याच्या किंवा जबर दुखापत होण्याच्या संबंधात खबरदारी म्हणून अशा प्राण्याचा बंदोबस्त करण्याचे टाळणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २९० | सार्वजनिक उपद्रव करणे. .. .. .. .. | २०० रुपये द्रव्यदंड. .. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २९१ | उपद्रव थांबवण्याबाबतच्या व्यादेशानंतरही तो चालू ठेवणे. .. .. .. | ६ महिन्यांचा साधा कारावास, किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २९२ | अश्लील पुस्तके, इत्यादींची विक्री, इ. कोणि पेय | पहिल्या दोषसिद्धीअन्ती दोन वर्षांचा कारावास, व २,००० रुपये द्रव्यदंड आणि दुसरी किंवा त्यानंतर दोषसिद्धी झाल्यास पाच वर्षांचा कारावास व ५,००० रुपये द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २९३ | अश्लील वस्तू तरुण व्यक्तींना विकणे, इत्यादी. .. .. .. | पहिल्या दोषसिद्धीअन्ती ३ वर्षांचा कारावास व २,००० रुपये द्रव्यदंड आणि दुसरी किंवा त्यानंतर दोषसिद्धी झाल्यास ७ वर्षांचा कारावास व ५,००० रुपये द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| २९४ | अश्लील गाणी. .. .. .. .. | ३ महिन्यांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २९४क | लॉटरी कार्यालय ठेवणे. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| | लॉटरीसंबंधीचे प्रस्ताव प्रकाशित करणे. | १,००० रुपये द्रव्यदंड. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |

## प्रकरण पंधरा

## धर्मासंबंधीचे अपराध

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २९५ | कोणत्याही व्यक्तिवर्गाच्या धर्माचा अपमान करण्याच्या उद्देशाने उपासनास्थान किंवा पवित्र वस्तू नष्ट करणे, तिचे नुकसान करणे किंवा ती अपवित्र करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | बिनजामिनी. | कोणताही दंडाधिकारी. |
| २९५ क | कोणत्याही वर्गाच्या धर्माचा किंवा धार्मिक श्रद्धांचा दुष्ट उद्देशाने अपमान करणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| २९६ | धार्मिक उपासनेत गुंतलेल्या जमावास व्यत्यय आणणे. | १ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| २९७ | कोणत्याही व्यक्तीच्या उपासनेच्या किंवा दफनाच्या जागी अतिक्रमण करणे, कोणत्याही व्यक्तीच्या भावना दुखावण्याच्या किंवा तिच्या धर्माचा अपमान करण्याच्या उद्देशाने अंत्यसंस्कारात अडथळा आणणे, अथवा मानवी शवाची अप्रतिष्ठा करणे. | १ वर्षाचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| २९८ | कोणत्याही व्यक्तीच्या धार्मिक भावना दुखावण्याच्या उद्देशाने, तिच्या कानावर पडेल अशा तऱ्हेने कोणताही शब्द उच्चारणे किंवा आवाज काढणे अथवा तिच्या नजरेस पडेल अशा तऱ्हेने तिच्या नजरेसमोर कोणताही हावभाव करणे किंवा कोणतीही वस्तू ठेवणे. | १ वर्षाचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |

## प्रकरण सोळा

## मानवी शरीरास बाधक होणारे अपराध

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३०२ | खून. | मृत्यू, किंवा आजीव कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ३०३ | जन्मठेप—कैद्याने खून करणे. .. .. .. .. | मृत्यू. .. | दखलपात्र. .. | बिनजामिनी. .. | सत्र न्यायालय. |
| ३०४ | 'खून' या सदरात न मोडणारा सदोष मनुष्यवध—ज्या कृतीमुळ मृत्यू घडून आला ती कृती मृत्यू इ. घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेली असल्यास. | आजीव कारावास किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. .. | बिनजामिनी. .. | सत्र न्यायालय. |
| | त्या कृतीमुळे मृत्यू घडून येण्याचा संभव आहे हे माहीत असताना, परंतु मृत्यू, इ. घडवून आणण्याचा कोणताही उद्देश नसताना कृती केल्यास. | १० वर्षांचा कारावास किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही. | दखलपात्र. .. | बिनजामिनी. .. | सत्र न्यायालय |
| ३०४क | बेदरकारपणे किंवा हयगयीने केलेल्या कृतीमुळे मृत्यूस कारण होणे. .. .. | २ वर्षांचा कारावास किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही. | दखलपात्र. .. | जामीनपात्र. .. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| [1][३०४ख | हुंडाबळी. .. .. .. .. | ७ वर्षांपेक्षा कमी नसेल अशा परंतु जो आजीव कारावासापर्यंत असू शकेल इतका कारावास. | दखलपात्र. .. | बिनजामिनी. .. | सत्र न्यायालय. |
| ३०५ | बालकाच्या अथवा भ्रमिष्ट किंवा भ्रांतचित्त किंवा निर्बुद्ध व्यक्तीच्या, अथवा नशा चढलेल्या व्यक्तीच्या आत्महत्येचे अपप्रेरण. | मृत्यू, किंवा आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. .. | बिनजामिनी. .. | सत्र न्यायालय. |
| ३०६ | आत्महत्या करण्यास अपप्रेरणा देणे. .. .. .. .. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. .. | बिनजामिनी. .. | सत्र न्यायालय. |
| ३०७ | खुनाचा प्रयत्न करणे. .. .. .. .. .. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. .. | बिनजामिनी. .. | सत्र न्यायालय. |
| | अशा कृतीमुळे कोणत्याही व्यक्तीला दुखापत झाल्यास. .. .. .. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. .. | बिनजामिनी. .. | सत्र न्यायालय. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | जन्मठेप-कैद्याने खुनाचा प्रयत्न करणे—दुखापत झाल्यास. | मृत्यू, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ३०८ | सदोष मनुष्यवध करण्याचा प्रयत्न करणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| | अशा कृतीमुळे कोणत्याही व्यक्तीला दुखापत झाल्यास. | ७ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ३०९ | आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणे. | १ वर्षांचा साधा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ३११ | ठग असणे. | आजीव कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ३१२ | गर्भस्राव घडवून आणणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | स्पंदितगर्भा असल्यास. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३१३ | स्त्रीच्या संमतीशिवाय गर्भस्राव घडवून आणणे. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ३१४ | गर्भस्राव घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेल्या कृतीमुळे मृत्यू घडून येणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| | ती कृती स्त्रीच्या संमतीशिवाय केली असल्यास. | आजीव कारावास किंवा वरीलप्रमाणे. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ३१५ | मूल जिवंत जन्माला येण्यास प्रतिबंध करण्याच्या किंवा जन्मानंतर त्याचा मृत्यू घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेली कृती. | १० वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |

१. १९८६ चा अधिनियम ४३, कलम ११ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

एच ४२३२—२५

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ३१६ | 'सदोष मनुष्यवध' या सदरात मोडणाऱ्या कृतीद्वारे, स्पंदन पावणाऱ्या अजात गर्भजीवाचा मृत्यू घडवून आणणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| ३१७ | १२ वर्षे वयाखालील मुलाला त्याच्या आई-वा-बापाने किंवा जिच्याकडे त्यांची देखभाल आहे त्या व्यक्तीने त्या मुलाचा संपूर्णतः परित्याग करण्याच्या उद्देशाने त्याला उघड्यावर टाकणे. | ७ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३१८ | मृत देहाची गुप्तपणे विल्हेवाट लावून अपत्यजन्माची लपवणूक करणे. .. .. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी |
| ३२३ | इच्छापूर्वक दुखापत पोचवणे. .. .. .. .. | १ वर्षांचा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी |
| ३२४ | घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापूर्वक दुखापत पोचवणे. .. .. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी |
| ३२५ | इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवणे. .. .. .. .. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| ३२६ | घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवणे. .. .. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३२७ | संपत्ती किंवा मूल्यवान रोखा जबरीने घेण्यासाठी अथवा जे अवैध आहे किंवा ज्यामुळे एखादा अपराध करणे सुकर होऊ शकेल असे काहीही करण्यास जबरीने भाग पाडण्यासाठी इच्छापूर्वक दुखापत पोचवणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३२८ | दुखापत, इत्यादी पोचवण्याच्या उद्देशाने मूर्च्छाकारक औषधिद्रव्य सेवन करण्यास देणे. .. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३२९ | संपत्ती किंवा मूल्यवान रोखा जबरीने घेण्यासाठी अथवा जे अवैध आहे किंवा ज्यामुळे एखादा अपराध करणे सुकर होऊ शकेल असे काहीही करण्यास जबरीने भाग पाडण्यासाठी इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवणे. | आजीव कारावास किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. .. |
| ३३० | कबुलीजबाब किंवा माहिती जबरीने घेण्यासाठी अथवा संपत्ती, इत्यादी परत करण्यास भाग पाडण्यासाठी इच्छापूर्वक दुखापत पोचवणे. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३३१ | कबुलीजबाब किंवा माहिती जबरीने घेण्यासाठी अथवा संपत्ती, इत्यादी परत करण्यास भाग पाडण्यासाठी इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| ३३२ | लोकसेवकाला त्याच्या कर्तव्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी इच्छापूवक दुखापत पोचवणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३३३ | लोकसेवकाला त्याच्या कर्तव्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| ३३४ | गंभीर व आकस्मिक प्रक्षोभकारणामुळे इच्छापूर्वक दुखापत पोचवणे---ज्या व्यक्तीने प्रक्षोभित केले तिच्याहून अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत पोचवण्याचा उद्देश नसताना. | १ महिन्याचा कारावास, किंवा ५०० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| ३३५ | गंभीर व आकस्मिक प्रक्षोभकारणामुळे जबर दुखापत पोचवणे---ज्या व्यक्तीने प्रक्षोभित केले तिच्याहून अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत पोचवण्याचा उद्देश असताना. | ४ वर्षांचा कारावास, किंवा २,००० रुपये द्रव्यदंड किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३३६ | ज्यामुळे मानवी जीवित किंवा इतरांची व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात येईल अशी कोणतीही कृती करणे. | ३ महिन्यांचा कारावास, किंवा २५० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| ३३७ | ज्यामुळे मानवी जीवित, इत्यादी धोक्यात येईल अशा कृतीने दुखापत पोचवणे. .. | ६ महिन्यांचा कारावास, किंवा ५०० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| ३३८ | ज्यामुळे मानवी जीवित, इत्यादी धोक्यात येईल अशा कृतीने जबर दुखापत करणे. .. | २ वर्षांचा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ३४१ | कोणत्याही व्यक्तीला गैरपणे निरुद्ध करणे. | १ महिन्याचा साधा कारावास, किंवा ५०० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ३४२ | कोणत्याही व्यक्तीला गैरपणे परिरुद्ध करणे. | १ वर्षाचा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ३४३ | तीन दिवस किंवा त्याहून अधिक काळ गैरपणे परिरुद्ध करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ३४४ | दहा दिवस किंवा त्याहून अधिक काळ गैरपणे परिरुद्ध करणे. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ३४५ | कोणत्याही व्यक्तीच्या मुक्ततेकरिता प्राधिलेख काढलेला आहे हे माहीत असताना, त्या व्यक्तीस गैरपणे परिरुद्ध करून ठेवणे. | अन्य कोणत्याही कलमाखालील कारावासाशिवाय आणखी २ वर्षांचा कारावास. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३४६ | एखाद्या व्यक्तीला गुप्तस्थळी गैरपणे परिरुद्ध करणे. | अन्य कोणत्याही कलमाखालील कारावासाशिवाय आणखी २ वर्षांचा कारावास. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३४७ | संपत्ती जबरीने घेण्यासाठी किंवा अवैध कृती, इत्यादी करण्यास जबरीने भाग पाडण्यासाठी गैर परिरोध. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ३४८ | कबुलीजबाब किंवा माहिती जबरीने घेण्यासाठी अथवा संपत्ती, इत्यादी परत करण्यास भाग पाडण्यासाठी परिरोध. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३५२ | गंभीर प्रक्षोभकारण नसताना एरव्ही हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग. | ३ महिन्यांचा कारावास, किंवा ५०० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ३५३ | लोकसेवकाला त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ३५४ | स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिच्यावर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ३५५ | गंभीर व आकस्मिक प्रक्षोभकारण नसताना एरव्ही, एखाद्या व्यक्तीची मानहानी करण्याच्या उद्देशाने हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ३५६ | एखाद्या व्यक्तीने परिधान केलेल्या किंवा जवळ बाळगलेल्या संपत्तीची चोरी करण्याचा प्रयत्न करताना हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ३५७ | एखाद्या व्यक्तीला गैरपणे परिरुद्ध करण्याचा प्रयत्न करताना हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे. | १ वर्षाचा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ३५८ | गंभीर व आकस्मिक प्रक्षोभकारणावरून हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे. | १ महिन्याचा साधा कारावास, किंवा २०० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ३६३ | अपनयन. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३६३क | एखाद्या अज्ञान व्यक्तीला भीक मागण्यासाठी नेमता यावे किंवा त्या कामी तिचा वापर करून घेता यावा यासाठी अशा अज्ञान व्यक्तीचे अपनयन करणे किंवा तिचा ताबा मिळवणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | एखाद्या अज्ञान व्यक्तीला भीक मागण्यासाठी नेमता यावे किंवा त्या कामी तिचा वापर करून घेता यावा यासाठी अशा अज्ञान व्यक्तीला विकलांग करणे. | आजीव कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ३६४ | खून करण्यासाठी अपनयन करणे किंवा अपहरण करणे. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा सश्रम कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| [1][ ३६४क | खंडणी, इत्यादींसाठी अपनयन. | मृत्युदंड, किंवा आजीव कारावास व द्रव्य दंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. ] |
| ३६५ | गुप्तपणे व गैरपणे एखाद्या व्यक्तीला परिरुद्ध करण्याकरिता तिचे अपनयन किंवा अपहरण करणे. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३६६ | एखाद्या स्त्रीला विवाहाची सक्ती करण्याच्या किंवा तिला शीलभ्रष्ट, इत्यादी करण्याच्या उद्देशाने तिचे अपनयन किंवा अपहरण करणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ३६६क | अज्ञान मुलगी अनैतिक कृत्यासाठी मिळवणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ३६६ख | परकीय देशातून मुलींची आयात करणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ३६७ | एखाद्या व्यक्तीला जबर दुखापत पोचवणे, तिला गुलाम बनवणे, इत्यादींसाठी तिचे अपनयन किंवा अपहरण करणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ३६८ | अपनयन केलेल्या व्यक्तीला लपवणे किंवा तिला परिरुद्ध करून ठेवणे. | अपनयन किंवा अपहरण याबद्दलची शिक्षा. | दखलपात्र. | बिनजामिनी. | अपनयन किंवा अपहरण हा अपराध ज्या न्यायालयात संपरीक्षायोग्य असेल ते न्यायालय. |
| ३६९ | एखाद्या बालकाच्या अंगावरील संपत्ती काढून घेण्याच्या उद्देशाने त्या बालकाचे अपनयन किंवा अपहरण करणे. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३७० | गुलाम म्हणून कोणत्याही व्यक्तीची खरेदी करणे किंवा वासलात लावणे. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३७१ | गुलामांचा नित्यशः व्यवहार करणे. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |

१. १९९३ चा अधिनियम ४२, कलम ४ द्वारे समाविष्ट केले.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३७२ | वेश्याव्यवसाय, इत्यादी प्रयोजनार्थ अज्ञान व्यक्तीची विक्री करणे किंवा तिला भाड्याने देणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ३७३ | त्याच प्रयोजनांकरिता अज्ञान व्यक्तीची खरेदी करणे किंवा तिचा कब्जा मिळवणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ३७४ | बकायदेशीर वेठबिगारी. | १ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| [1][ ३७६ | बलात्कार. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| | एखाद्या पुरुषाने बारा वर्षांहून कमी वय नसलेल्या स्वतःच्या पत्नीशी जबरी संभोग करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | सत्र न्यायालय. |
| ३७६क | फारकतीच्या कालावधीत एखाद्या पुरुषाने आपल्या पत्नीशी संभोग करणे. | २ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली | जामीनपात्र. | सत्र न्यायालय. |
| ३७६ख | लोकसेवकाने त्याच्या हवालातीत असलेल्या स्त्रीशी संभोग करणे. | ५ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र (परंतु वॉरंटाशिवाय किंवा दंडाधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय अटक करता येणार नाही.) | जामीनपात्र. | सत्र न्यायालय. |
| ३७६ग | तुरुंग, सुधारगृह, इत्यादींच्या अधीक्षकाने संभोग करणे. | ५ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र (परंतु वॉरंटाशिवाय किंवा दंडाधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय अटक करता येणार नाही.) | जामीनपात्र. | सत्र न्यायालय. |

१. १९८३ चा अधिनियम ४३, कलम ५ द्वारे समाविष्ट केले (२५ डिसेंबर, १९८३ रोजी व तेव्हापासून).

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ३७६घ | रुग्णालयाचा व्यवस्थापक, इ.नी. त्या रुग्णालयातील कोणत्याही स्त्रीशी संभोग करणे. .. | ५ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र (परंतु वॉरंटाशिवाय किंवा दंडाधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय अटक करता येणार नाही.) | जामीनपात्र. .. | सत्र न्यायालय.] |
| ३७७ | अनैसर्गिक अपराध. .. .. .. .. .. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. .. | बिनजामिनी. .. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

प्रकरण सतरा

**संपत्तीच्या विरोधी अपराध**

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ३७९ | चोरी. .. .. .. .. .. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. .. | बिनजामिनी. .. | कोणताही दंडाधिकारी. |
| ३८० | इमारत, तंबू किंवा जलयान यातील चोरी. .. .. .. .. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. .. | बिनजामिनी. .. | कोणताही दंडाधिकारी. |
| ३८१ | कारकुनाने किंवा चाकराने मालकाच्या किंवा नियोक्त्याच्या कब्जातील संपत्तीची चोरी करणे. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. .. | बिनजामिनी. .. | कोणताही दंडाधिकारी. |
| ३८२ | चोरी-अशी चोरी करण्याच्या किंवा ती केल्यानंतर काढता पाय घेण्याच्या किंवा तीतून मिळवलेली संपत्ती ठेवून घेण्याच्या प्रयोजनार्थ मृत्यू किंवा दुखापत किंवा अवरोध घडवून आणण्याची अथवा मृत्यूची, दुखापतीची किंवा अवरोधाची भीती उत्पन्न करण्याची पूर्वतयारी करून चोरी करणे. | १० वर्षांचा सश्रम कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. .. | बिनजामिनी. .. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३८४ | बलाद्ग्रहण. .. .. .. .. .. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. .. | बिनजामिनी. .. | कोणताही दंडाधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३८५ | बलाद्ग्रहण करण्यासाठी क्षती पोचवण्याची भीती घालणे किंवा भीती घालण्याचा प्रयत्न करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ३८६ | एखाद्या व्यक्तीस मृत्यू किंवा जबर दुखापत यांची भीती घालून बलाद्ग्रहण करणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३८७ | बलाद्ग्रहण करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला मृत्यू किंवा जबर दुखापत यांची भीती घालणे किंवा भीती घालण्याचा प्रयत्न करणे. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३८८ | मृत्यू, आजीव कारावास किंवा १० वर्षांचा कारावास या शिक्षेस पात्र अशा अपराधाचा आरोप करण्याची धमकी देऊन बलाद्ग्रहण करणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | ज्याबद्दल धमकी देण्यात आली तो अनैसर्गिक अपराध असल्यास. | आजीव कारावास. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३८९ | बलाद्ग्रहण करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला मृत्यू, आजीव कारावास किंवा १० वर्षांचा कारावास या शिक्षेस पात्र अशा अपराधाचा आरोप करण्याची भीती घालणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | तो अनैसर्गिक अपराध असल्यास | आजीव कारावास | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३९२ | जबरी चोरी. | १० वर्षांचा सश्रम कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | सार्वजनिक मार्गावर सूर्यास्त व सूर्योदय यांच्या दरम्यान करण्यात आल्यास. | १४ वर्षांचा सश्रम कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३९३ | जबरी चोरी करण्याचा प्रयत्न करणे. | ७ वर्षांचा सश्रम कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३९४ | जबरी चोरी करताना किंवा करण्याचा प्रयत्न करताना एखाद्या व्यक्तीने इच्छापूर्वक दुखापत करणे अथवा अशा जबरी चोरीत तिच्या जोडीला अन्य कोणतीही व्यक्ती निबद्ध असणे. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा सश्रम कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३९५ | दरवडा. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा सश्रम कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ३९६ | दरवड्यामध्ये खून. | मृत्यू, आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा सश्रम कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |

एच ४२३२—२६

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| ३९७ | मृत्यू किंवा जबर दुखापत घडवून आणण्याच्या प्रयत्नासहित जबरी चो किंवा दरवडा. | कमीतकमी ७ वर्षांचा सश्रम कारावास. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| ३९८ | प्राणघातक हत्यारानिशी सज्ज असताना जबरी चोरी करण्याचा किंवा दरवडा घालण्याचा प्रयत्न करणे. | कमीत कमी ७ वर्षांचा सश्रम कारावास. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| ३९९ | दरवडा घालण्याची पूर्वतयारी करणे. .. .. .. .. | १० वर्षांचा सश्रम कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| ४०० | नित्यश: दरवडे घालण्यासाठी संघटित झालेल्या व्यक्तींच्या टोळीपैकी असणे. .. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा सश्रम कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| ४०१ | नित्यश: चोरी करण्यासाठी संघटित झालेल्या व्यक्तींच्या भटक्या टोळीपैकी असणे. .. | ७ वर्षांचा सश्रम कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४०२ | दरवडा घालण्यासाठी एकत्र जमलेल्या पाच किंवा अधिक व्यक्तींपैकी एक असणे. ... | ७ वर्षांचा सश्रम कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| ४०३ | जंगम संपत्तीचा अप्रामाणिकपणे अपहार करणे किंवा ती आपल्या उपयोगासाठी स्वत:ची म्हणून वापरणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| ४०४ | एखादी संपत्ती मृत व्यक्तीच्या मृत्यूसमयी तिच्या कब्जात होती आणि असा कब्जा घेण्यास विधित: हक्कदार असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात त्यानंतर ती नव्हती हे माहीत असताना तिचा अप्रामाणिकपणे अपहार करणे. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४०५ | मृताने नेमलेल्या कारकुनाने किंवा अन्य व्यक्तीने केला असल्यास. .. .. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४०६ | फौजदारीपात्र न्यासभंग. .. .. .. .. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४०७ | परिवाहक, मालधक्कावाला इ. नी केलेला फौजदारीपात्र न्यासभग. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४०८ | कारकुनाने किंवा चाकराने केलेला फौजदारीपात्र न्यासभंग. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४०९ | लोकसेवकाने अथवा बँकव्यवसायी, व्यापारी किंवा अभिकर्ता, इत्यादींनी केलेला फौजदारी-पात्र न्यासभंग. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४११ | चोरीची संपत्ती ही चोरीची असल्याचे माहीत असताना ती अप्रामाणिकपणे स्वीकारणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | बिनजामिनी. | कोणताही दंडाधिकारी. |
| ४१२ | चोरीची संपत्ती ती दरवडयाद्वारे मिळविण्यात आली असल्याचे माहीत असताना अप्रामाणिकपणे स्वीकारणे. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा सश्रम कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ४१३ | चोरीच्या संपत्तीचा नित्यशः व्यवहार करणे. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ४१४ | चोरीची संपत्ती ही चोरीची असल्याचे माहीत असताना ती लपवून ठेवण्याच्या किंवा तिची वासलात लावण्याच्या कामी सहाय्य करणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | बिनजामिनी. | कोणताही दंडाधिकारी. |
| ४१७ | ठकवणूक. | १ वर्षाचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ४१८ | ज्या व्यक्तीच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यास अपराधी विधितः किंवा वैध संविदेनुसार बद्ध होता त्या व्यक्तीला ठकवणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ४१९ | तोतयेगिरी करून ठकवणूक करणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ४२० | ठकवणूक करणे आणि संपत्तीची सुपूर्दगी करण्यास अथवा मूल्यवान रोखा बनवण्यास, त्यात फेरबदल करण्यास किंवा तो नष्ट करण्यास अप्रामाणिकपणे प्रवृत्त करणे. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४२१ | संपत्ती इ. ची धनकोंमध्ये विभागणी होण्यास प्रतिबंध करण्यासाठी ती कपटीपणाने हलवणे किंवा लपवणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ४२२ | अपराध्याला येणे असलेले ऋण किंवा रक्कम त्याच्या धनकोंना उपलब्ध होऊ देण्यास कपटीपणाने प्रतिबंध करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ४२३ | प्रतिफलाबाबतचे खोटे कथन अंतर्भूत असणारे हस्तांतरणपत्र कपटीपणाने निष्पादित करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ४२४ | स्वतःची किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीची संपत्ती कपटीपणाने हलवणे किंवा लपवून ठेवणे, अथवा तसे करण्यास सहाय्य करणे अथवा ती व्यक्ती ज्यास हक्कदार आहे अशी कोणतीही येणे रक्कम किंवा हक्कमागणी अप्रामाणिकपणे सोडून देणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ४२६ | आगळीक. | ३ महिन्याचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ४२७ | आगळीक करणे आणि त्याद्वारे ५० रुपये किंवा त्याहून अधिक रकमेचे नुकसान करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ४२८ | १० रुपये किंवा त्याहून अधिक किंमतीच्या कोणत्याही जनावरास ठार मारून, त्याच्यावर विषप्रयोग करून, त्याला विकलांग करून किंवा निरुपयोगी करून आगळीक करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ४२९ | कोणताही हत्ती, उंट, घोडा इ.—मग त्याची किंमत कितीही असो—अथवा ५० रुपये किंवा अधिक किंमतीचे अन्य कोणतेही जनावर यास ठार मारून, त्याच्यावर विषप्रयोग करून, त्याला विकलांग करून किंवा निरुपयोगी करून आगळीक करणे. | ५ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४३० | शेतकी प्रयोजने, इ. करता लागणाऱ्या पाण्याचा पुरवठा जेणेकरून कमी होईल अशा प्रकारे आगळीक करणे. | ५ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४३१ | सार्वजनिक रस्ता, पूल, नाव्य नदी किंवा नाव्य कालवा यांची खराबी करून आणि प्रवास करण्याच्या किंवा संपत्तीची ने-आण करण्याच्या दृष्टीने तो दुरुस्त करून किंवा त्याची सुरक्षितता कमी करून आगळीक करणे. | ५ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४३२ | सार्वजनिक निचरा-गटारे नुकसानकारक होईल अशाप्रकारे भरून वाहू देऊन किंवा त्यात अडथळा निर्माण करून आगळीक करणे. | ५ वर्षांचा कारावास, द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४३३ | दीपगृह किंवा सागरी धोक्याची निशाणी नष्ट करून, ती हलवून किंवा त्याची उपयुक्तता प्रथम करून, अथवा फसवा प्रकाश दाखवून आगळीक करणे. | ७ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४३४ | सार्वजनिक प्राधिकरणाने लावलेले सीमाचिन्ह नष्ट करून, हलवून, इ. प्रकारे आगळीक करणे. | १ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| ४३५ | १०० रुपयांच्या मर्यादेपर्यंत किंवा त्याहून अधिक अथवा शेतमालाच्या बाबतीत १० रुपयांच्या मर्यादेपर्यंत किंवा त्याहून अधिक नुकसान करण्याच्या उद्देशाने विस्तव किंवा स्फोटक पदार्थ याद्वारे आगळीक करणे. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४३६ | घर, इ. नष्ट करण्याच्या उद्देशाने विस्तव किंवा स्फोटक पदार्थ याद्वारे आगळीक करणे. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| ४३७ | मजली जलयान किंवा २० टन बारदान भरलेले जलयान नष्ट करण्याच्या अथवा असुरक्षित करण्याच्या उद्देशाने आगळीक करणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| ४३८ | मागील कलमात वर्णिलेली आगळीक विस्तव किंवा स्फोटक पदार्थ याद्वारे करण्यात आल्यास. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ४३९ | चोरी इ. करण्याच्या उद्देशाने जलयान किनाऱ्याकडे लावणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ४४० | मृत्यू किंवा दुखापत, इ. घडवून आणण्याची पूर्वतयारी करून केलेली आगळीक. | ५ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४४७ | फौजदारीपात्र अतिक्रमण. | ३ महिन्यांचा कारावास, किंवा ५०० रुपये द्रव्य-दंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ४४८ | गृह-अतिक्रमण. | १ वर्षांचा कारावास, किंवा १,००० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ४४९ | मृत्यूच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यासाठी गृह-अतिक्रमण. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा सश्रम कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ४५० | आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यासाठी गृह-अतिक्रमण. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ४५१ | कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यासाठी गृह-अतिक्रमण. | २ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| | तो चोरीचा अपराध असल्यास. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | कोणताही दंडाधिकारी. |
| ४५२ | दुखापत, हमला इ. करण्याची पूर्वतयारी करून नंतर गृह-अतिक्रमण. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | कोणताही दंडाधिकारी. |
| ४५३ | चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी. | २ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | कोणताही दंडाधिकारी. |
| ४५४ | कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यासाठी चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | कोणताही दंडाधिकारी. |
| | तो चोरीचा अपराध असल्यास. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४५५ | दुखापत, हमला, इ. करण्याची पूर्वतयारी करून चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४५६ | रात्रीच्या वेळी केलेले चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | कोणताही दंडाधिकारी. |
| ४५७ | कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यासाठी रात्रीच्या वेळी चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी. | ५ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | तो चोरीचा अपराध असल्यास. | १४ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४५८ | दुखापत, इ. करण्याची पूर्व तयारी करून रात्रीच्या वेळी चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी. | १४ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४५९ | चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी करताना जबर दुखापत करणे. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ४६० | रात्रीच्या वेळी घरफोडी, इ. करण्यात संयुक्तपणे निबद्ध असलेल्या निरनिराळ्या व्यक्तींपैकी एकाने मृत्यू घडवून आणणे किंवा जबर दुखापत करणे. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | सत्र न्यायालय. |
| ४६१ | आतमध्ये संपत्ती असलेले किंवा ज्याच्या आत ती आहे असा समज असेल असे कोणतेही बंद पात्र अप्रामाणिकपणाने फोडून उघडणे किंवा सोडून उघडणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | बिनजामिनी. | कोणताही दंडाधिकारी. |
| ४६२ | आतमध्ये कोणतीही संपत्ती असलेले किंवा ज्याच्या आत ती आहे असा समज असेल असे कोणतेही बंद पात्र सोपवण्यात आलेले असताना ते कपटीपणाने उघडणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |

प्रकरण अठरा

**दस्तऐवज व स्वामित्व-चिन्हे यासंबंधीचे अपराध**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४६५ | बनावटीकरण. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४६६ | लोकसेवकाने ठेवलेल्या न्यायालयीन अभिलेखांचे किंवा 'निबंधक, जन्म, इ.' यांच्या अभिलेखांचे बनावटीकरण. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ४६७ | मूल्यवान रोखा, मृत्युपत्र अथवा कोणताही मूल्यवान रोखा तयार करण्यासाठी, हस्तांतरित करण्यासाठी किंवा कोणतेही पैसे, इ. घेण्यासाठी द्यावयाचे प्राधिकारपत्र यांचे बनावटीकरण. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | मूल्यवान रोखा हा केंद्र शासनाची वचनचिठ्ठी असल्यास. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४६८ | ठकवणूक करण्यासाठी बनावटीकरण. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४६९ | कोणत्याही व्यक्तीच्या लौकिकाला बाध यावा या उद्देशाने किंवा त्या प्रयोजनार्थ त्याचा वापर होण्याचा संभव आहे हे माहीत असताना बनावटीकरण करणे. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४७१ | बनावट असल्याचे माहीत असलेला बनावट दस्तऐवज खरा म्हणून वापरणे. | अशा दस्तऐवजाच्या बनावटीकरणाबद्दलची शिक्षा. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | बनावट दस्तऐवज हा केंद्र शासनाची वचनचिठ्ठी असल्यास. | अशा दस्तऐवजाच्या बनावटीकरणाबद्दलची शिक्षा. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४७२ | 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ४६७ खाली शिक्षापात्र असे बनावटीकरण करण्याच्या उद्देशाने मोहोर, मुद्रापट्ट, इत्यादी बनविणे किंवा नकली तयार करणे अथवा अशी कोणतीही मोहोर, मुद्रापट्ट, इत्यादी नकली असल्याचे माहीत असताना तशाच उद्देशाने ते जवळ बाळगणे. | आजीव कारावास, किंवा ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४७३ | 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ४६७ खाली नव्हे तर अन्यथा शिक्षापात्र असे बनावटीकरण करण्याच्या उद्देशाने मोहोर, मुद्रापट्ट, इ. बनविणे किंवा नकली तयार करणे अथवा अशी कोणतीही मोहोर, मुद्रापट्ट नकली असल्याचे माहीत असताना तशाच उद्देशाने ते जवळ बाळगणे. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४७४ | एखादा दस्तऐवज बनावट असल्याचे माहीत असताना, तो खरा म्हणून वापरण्याच्या उद्देशाने जवळ बाळगणे; तो दस्तऐवज 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ४६६ मध्ये नमूद केलेल्या वर्णनाचा असल्यास. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| | जो दस्तऐवज 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ४६७ मध्ये नमूद केलेल्या वर्णनाचा असल्यास. | आजीव कारावास, किंवा ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४७५ | 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ४६७ मध्ये वर्णन केलेले दस्तऐवज अधिप्रमाणित करण्यासाठी वापरले जाणारे बोधचिन्ह किंवा चिन्ह नकली तयार करणे किंवा तशा नकली चिन्हाने अंकित असलेली सामग्री जवळ बाळगणे. | आजीव कारावास, किंवा ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४७६ | 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ४६७ मध्ये वर्णन केलेल्याहून अन्य दस्तऐवज अधिप्रमाणित करण्यासाठी वापरले जाणारे बोधचिन्ह किंवा चिन्ह नकली तयार करणे किंवा तशा नकली चिन्हाने अंकित असलेली सामग्री जवळ बाळगणे. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४७७ | कपटीपणाने मृत्यूपत्र, इत्यादी नष्ट करणे किंवा विरूपित करणे अथवा ते नष्ट करण्याचा किंवा विरूपित करण्याचा प्रयत्न करणे अथवा ते गुप्त राखणे इत्यादी. | आजीव कारावास, किंवा ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४७७क | खोटे हिशेब तयार करणे .. .. .. .. .. | ७ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४८२ | कोणत्याही व्यक्तीची फसगत करण्याच्या किंवा तिला क्षती पोचवण्याच्या उद्देशाने खोटे स्वामित्व-चिन्ह वापरणे. | १ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| ४८३ | दुसऱ्याने वापरले असेल तसे स्वामित्व-चिन्ह नुकसान किंवा क्षती पोचवण्याच्या उद्देशाने नकली तयार करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| ४८४ | लोकसेवकाने वापरलेले स्वामित्व-चिन्ह किंवा कोणत्याही संपत्तीची निर्मिती, प्रत, इत्यादी दर्शविण्यासाठी त्याने वापरलेले कोणतेही चिन्ह नकली तयार करणे. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४८५ | कोणतेही सरकारी किंवा खाजगी स्वामित्व-चिन्ह नकली तयार करण्यासाठी कपटीपणाने कोणताही साचा, मुद्रापट्ट किंवा अन्य साधन बनवणे किंवा जवळ बाळगणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४८६ | नकली स्वामित्व-चिन्हाने अंकित असलेला माल जाणीवपूर्वक विकणे. .. .. | १ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ४८७ | आतमध्ये माल असलेल्या कोणत्याही आवेष्टनावर किंवा पात्रावर, त्यात नसलेला माल, इत्यादी त्यात आहे असा समज व्हावा या कपटी उद्देशाने खोटे चिन्ह करणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| ४८८ | अशा कोणत्याही खोट्या चिन्हाचा उपयोग करणे. .. .. .. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| ४८९ | क्षती पोचवण्याच्या उद्देशाने स्वामित्व-चिन्ह काढून टाकणे, नष्ट करणे किंवा विरूपित करणे. | १ वर्षाचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| ४८९क | चलनी नोटा किंवा बँक-नोटा नकली तयार करणे. .. .. .. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| ४८९ख | बनावट किंवा नकली चलनी नोटा किंवा बँक-नोटा खऱ्या म्हणून वापरणे. .. | आजीव कारावास, किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| ४८९ग | बनावट किंवा नकली चलनी नोटा किंवा बँक-नोटा कब्जात बाळगणे. .. .. | ७ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. सत्र न्यायालय. |
| ४८९घ | चलनी नोटा किंवा बँक-नोटा बनावट किंवा नकली तयार करण्यासाठी यंत्रे, साधने किंवा सामग्री बनवणे किंवा कब्जात बाळगणे. | आजीव कारावास ,किंवा १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| ४८९ङ | चलनी नोटा किंवा बँक-नोटा यांसारखे दिसणारे दस्तऐवज बनवणे किंवा वापरणे. .. | १०० रुपये द्रव्यदंड. .. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| | मुद्रकाचे नाव व पत्ता उघड करण्याला नकार दिल्यास... .. .. | २०० रुपये द्रव्यदंड. .. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |

## प्रकरण एकोणीस

## सेवा-संविदांचा फौजदारीपात्र भंग

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ४९१ | बालवय, मनोविकलता किंवा रोग यांमुळे असहाय अशा व्यक्तीची देखभाल करण्यास किंवा तिच्या गरजा पुरवण्यास बांधलेले असता तसे इच्छापूर्वक टाळणे. | ३ महिन्यांचा कारावास, किंवा २०० रुपये द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |

## प्रकरण विसावे

### विवाहासंबंधीचे अपराध

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४९३ | एखाद्या पुरुषाने, त्याच्याशी कायदेशीरपणे विवाहबद्ध न झालेल्या स्त्रीचा, ती त्याच्याशी कायदेशीरपणे विवाहबद्ध झाली आहे असा लबाडीने समज करून देऊन त्या समजुतीने तिला आपल्याबरोबर दांपत्यभावाने राहण्यास भाग पाडणे. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४९४ | पती किंवा पत्नी ह्यात असतानाच्या काळात पुन्हा विवाह करणे. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४९५ | ज्या व्यक्तीबरोबर नंतरचा विवाह झाला असेल तिच्यापासून, पूर्वीच्या विवाहाची वस्तुस्थिती लपवल्याने घडणारा तोच अपराध. | १० वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४९६ | विवाहविधीमळे आपण कायदेशीरपणे विवाहबद्ध होत नाहीं याची जाणीव असताना कपटपूर्ण उद्देशाने तो विधी करवून घेणे. | ७ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४९७ | परगमन. | ५ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ४९८ | अपराध करण्याच्या उद्देशाने विवाहित स्त्रीस भुरळ पाडून नेणे किंवा पळवून नेणे किंवा अडकवून ठेवणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |

[1][प्रकरण वीस क

### पती किंवा पतीचे नातेवाईक यांनी क्रूर वागणूक देणे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४९८क | विवाहित स्त्रीशी क्रूरपणा केल्याबद्दल शिक्षा. | ३ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र-अपराध घडल्याची माहिती, अपराधामुळे नुकसान पोचलेल्या व्यक्तीने अथवा तिच्याशी रक्ताच्या किंवा सोयरिकीच्या किंवा दत्तकाच्या नात्याने संबंधित | बिनजामिनी. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

१. १९८३ चा अधिनियम ४६, कलम ६ द्वारे समाविष्ट केले (२५ डिसेंबर, १९८३ रोजी व तेव्हापासून).

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | असलेल्या व्यक्तीने अथवा असा कोणताही नातेवाईक नसेल तर या संबंधात शासनाने अधिसूचित केले असेल अशा वर्गातील किंवा प्रकरणपरत्वे, प्रवर्गातील, कोणत्याही लोकसेवकाने पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला दिली तर.] | | |
| | **प्रकरण एकवीस**<br>**अब्रूनुकसानी** | | | | |
| ५०० | राष्ट्रपती किंवा उप राष्ट्रपती किंवा राज्याचा राज्यपाल किंवा संघ राज्यक्षेत्राचा प्रशासक किंवा एखादा मंत्री याने आपली सरकारी कार्ये पार पाडताना केलेल्या वर्तनाबाबत त्याची अब्रूनुकसानी-सरकारी अभियोक्त्याने दिलेल्या फिर्यादीवरून कार्यवाही सुरू झाली असता. | २ वर्षांचा साधा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. सत्र न्यायालय. |
| | अन्य कोणत्याही प्रकरणातील अब्रूनुकसानी. .. .. .. | २ वर्षांचा साधा कारावास, किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ५०१ | (क) एखादे साहित्य राष्ट्रपती किंवा उप राष्ट्रपती किंवा राज्याचा राज्यपाल किंवा संघ राज्यक्षेत्राचा प्रशासक किंवा मंत्री आपली सरकारी कार्ये पार पाडत असतानाच्या त्याच्या वर्तनाबाबत त्याची अब्रूनुकसानी करणारा असल्याचे माहीत असताना तो छापणे किंवा कोरणे-सरकारी अभियोक्त्याने दिलेल्या फिर्यादीवरून कार्यवाही सुरू झाली असता. | २ वर्षांचा साधा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. सत्र न्यायालय. |
| | (ख) अन्य कोणत्याही प्रकरणी, एखादे साहित्य अब्रूनुकसानीकारक असल्याचे माहीत असताना ते छापणे किंवा कोरणे. | २ वर्षांचा साधा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५०२ | (क) राष्ट्रपती किंवा उप राष्ट्रपती किंवा राज्याचा राज्यपाल किंवा संघ राज्यक्षेत्राचा प्रशासक किंवा मंत्री आपली सरकारी कार्ये पार पाडत असतानाच्या त्याच्या वर्तनाबाबत त्याची अब्रूनुकसानी करणारे साहित्य एखाद्या छापील किंवा कोरीव पदार्थावर असल्याचे माहीत असताना अशा पदार्थाची विक्री-सरकारी अभियोक्त्याने दिलेल्या फिर्यादीवरून कायवाही सुरू झाली असता. | २ वर्षांचा साधा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | सत्र न्यायालय. |
| | (ख) अन्य कोणत्याही प्रकरणी, एखाद्या छापील किंवा कोरीव पदार्थावर अब्रूनुकसानकारक साहित्य असल्याचे माहीत असताना अशा पदार्थाची विक्री. | २ वर्षांचा साधा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | प्रथम वर्ग दंडाधिकारी. |

प्रकरण बावीस

## फौजदारीपात्र धाकदपटशा करणे, अपमान करणे आणि त्रास देणे यांविषयी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५०४ | शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | जामीनपात्र. | कोणताही दंडाधिकारी. |
| ५०५ | लष्करी बंड किंवा सार्वजनिक शांततेविरुद्ध अपराध करण्याच्या उद्देशाने खोटे विधान, अफवा इ. प्रसृत करणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | बिनजामिनी. | कोणताही दंडाधिकारी |
| | वेगवेगळ्या वर्गांमध्ये शत्रुत्व, द्वेषभाव किंवा दुर्भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने खोटी विधाने, अफवा इ. प्रसृत करणे. | ३ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | बिनजामिनी. | कोणताही दंडाधिकारी |
| | शत्रुत्व, द्वेषभाव किंवा दुर्भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने उपासनास्थान इ. ठिकाणी खोटे विधान, अफवा इ. प्रसृत करणे. | ५ वर्षांचा कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र. | बिनजामिनी. | कोणताही दंडाधिकारी. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ५०६ | फौजदारीपात्र धाकदपटशा. .. .. .. .. | २ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| | मृत्यू किंवा जबर दुखापत, घडवून आणणे-इत्यादीची धमकी असल्यास. .. | ७ वर्षांचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ५०७ | निनावी संदेशाद्वारे किंवा धमकी कोठून येते ते लपवून ठेवण्याची खबरदारी घेऊन फौजदारीपात्र धाकदपटशा करणे. .. | वरील कलमाखालील शिक्षेच्या जोडीला २ वर्षांचा कारावास. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ५०८ | एखादी व्यक्ती दैवी प्रकोपाचा विषय होईल असा तिचा समज करून देऊन घडवलेली कृती. .. | १ वर्षाचा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| ५०९ | स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने कोणताही शब्द उच्चारणे किंवा कोणताही हावभाव करणे. .. | १ वर्षाचा साधा कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |
| ५१० | नशेच्या अवस्थेत सार्वजनिक स्थळी इ. येऊन कोणत्याही व्यक्तीला त्रास देणे. .. | २४ तासांचा साधा कारावास, किंवा १० रुपये द्रव्यदंड किंवा दोन्ही. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |

## प्रकरण तेवीस

## अपराध करण्याचे प्रयत्न

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ५११ | आजीव कारावासाच्या किंवा अन्य कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेले अपराध करण्याचा प्रयत्न करणे आणि अशा प्रयत्नात अपराध घडण्यास साधक अशी कोणतीही कृती करणे. | आजीव कारावास, किंवा त्या अपराधाकरता उपबंधित केलेल्या कमाल मुदतीच्या जास्तीत जास्त निम्याइतका कारावास, किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | अपराध दखलपात्र किंवा बिनदखली असेल त्यानुसार. | अपराध्याने जो अपराध करण्याचा प्रयत्न केला तो जामीनपात्र बिनजामिनी असेल त्यानुसार. | ज्या अपराधाचा प्रयत्न झाला तो ज्या न्यायालयात किंवा संपरीक्षा योग्य असेल ते न्यायालय. |

### दोन—अन्य कायद्यांच्या विरुद्ध असलेल्या अपराधांचे वर्गीकरण

| अपराध | दखलपात्र की बिनदखली | जामीनपात्र की बिन-जामिनी | कोणत्या न्यायालयात संपरीक्षायोग्य |
|---|---|---|---|
| मृत्यूच्या आजीव कारावासाच्या किंवा ७ वर्षांहून अधिक कारावासाच्या शिक्षेला पात्र असल्यास. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. सत्र न्यायालय. |
| ३ वर्षे आणि त्याहून अधिक, पण ७ वर्षांहून अधिक नाही इतक्या कारावासाच्या शिक्षेला पात्र असल्यास. | दखलपात्र. | .. बिनजामिनी. | .. प्रथम वर्ग दंडाधिकारी. |
| ३ वर्षांहून कमी कारावासाच्या किंवा फक्त द्रव्यदंडाच्याच शिक्षेला पात्र असल्यास. .. | बिनदखली. | .. जामीनपात्र. | .. कोणताही दंडाधिकारी. |

दुसरी अनुसूची (कलम ४७६ पहा)

प्रारूप क्रमांक १

आरोपी व्यक्तीवर समन्स

(कलम ६१ पहा)

(आरोपी व्यक्तीचे नाव) ....................................................

(पत्ता) ..................................................................

यांस,

..........................................................................

(आरोप करण्यात आलेला अपराध थोडक्यात नमूद करावा) आरोपास जबाब देण्यासाठी तुमची उपस्थिती आवश्यक आहे, म्हणून तुम्हांस ............ येथील (दंडाधिकारी) .......... यांच्यासमोर दिनांक ........ माहे ...... १९ ... रोजी जातीने (किंवा, प्रकरणपरत्वे, वकिलामार्फत) हजर राहण्यास याद्वारे फर्माविण्यात येत आहे. यात कसूर होऊ नये.

आज, दिनांक ......... माहे ....... १९ ... रोजी.

(सही)

(न्यायालयाची मोहोर)

---

प्रारूप क्रमांक २

अटकेचे वॉरंट

(कलम ७० पहा)

..........................................................................

(जिने किंवा ज्यांनी वॉरंटाची अंमलबजावणी करावयाची त्या व्यक्तीचे/व्यक्तींची नाव/नावे व पदनाम/पदनामे) .........................................................

यांस,

(आरोपी व्यक्तीचे नाव) ....................................................

(पत्ता) ..................................................................

याच्यावर (अपराध नमूद करावा) .......... अपराधाचा आरोप करण्यात आलेला आहे म्हणून, उक्त ............................ यास अटक करून त्यास माझ्यासमोर हजर करावे असा तुम्हांस याद्वारे निदेश देण्यात येत आहे. यात कसूर होऊ नये.

आज, दिनांक ...... माहे ....... १९ .... रोजी.

(सही)

(न्यायालयाची मोहोर)

(कलम ७१ पहा)

हे वॉरंट पुढीलप्रमाणे पृष्ठांकित करता येईल :—

जर उक्त ............ याने दिनांक ............ रोजी माझ्यासमोर हजर राहण्यासाठी आणि माझ्याकडून अन्यथा निदेश देण्यात येईपर्यन्त याप्रमाणे हजर राहण्याचे चालू ठेवण्यासाठी .............. रुपये रकमेच्या एका जामीनदारासह (किंवा ......... रुपये रकमेतील प्रत्येकी दोन जामीनदारांसह) स्वतः ............. रुपये रकमेचा जामीन दिला तर त्यास सोडून देता येईल.

आज, दिनांक ...... माहे ....... १९ ... रोजी.

(सही)

(न्यायालयाची मोहोर)

### प्रारुप क्रमांक ३

### वॉरंटाखाली अटक करण्यात आल्यानंतर बंधपत्र व जामीनखत

(कलम ८१ पहा)

मी, (नाव) ....................................................................,
राहणार ..........................................................................
......................................................................., या

आरोपास जबाब देण्यासाठी, माझी उपस्थिती भाग पाडण्याकरता काढलेल्या वॉरंटा अन्वये मला ........ येथील जिल्हा दंडाधिकाऱ्यासमोर (किंवा, प्रकरणपरत्वे, ..........) आणण्यात आले असून, सदर आरोपास जबाब देण्यासाठी पुढील ........ महिन्याच्या ........ तारखेस ...... च्या न्यायालयात हजर राहण्यास व न्यायालय अन्यथा निदेशित करीपर्यंत याप्रमाणे हजर राहण्याचे चालू ठेवण्यास याद्वारे स्वतःला बांधून घेत आहे आणि, त्यात मी कसूर केल्यास रुपये .......... इतकी रक्कम गमावून ती सरकारजमा करण्यास स्वतःस बांधून घेत आहे.

आज, दिनांक ...... माहे ...... १९ ...... रोजी.

(सही)

उपर्युक्त व्यक्ती ..................................................................
राहणार ................................................................. हिने

ज्या आरोपावरून तिला अटक करण्यात आली त्या आरोपास जबाब देण्यासाठी पुढील ........ महिन्याच्या ........ तारखेस ........ च्या न्यायालयात ............ च्या समोर हजर राहावे व न्यायालय अन्यथा निदेशित करीपर्यंत याप्रमाणे हजर राहण्याचे चालू ठेवावे यासाठी मी याद्वारे स्वतःस जामीनदार म्हणून घोषित करीत आहे, आणि त्यात तिने कसूर केल्यास, रुपये ....... इतकी रक्कम गमावून ती सरकारजमा करण्यास स्वतःस बांधून घेत आहे.

आज, दिनांक ...... माहे ...... १९ ...... रोजी.

(सही)

---

### प्रारुप क्रमांक ४

### आरोपी व्यक्तीस उपस्थित राहण्यास फर्मावणारी उद्घोषणा

(कलम ८२ पहा)

ज्या अर्थी, ................ (नाव, वर्णन व पत्ता) याने 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ........ खाली शिक्षापात्र असलेला ........ अपराध केला आहे (किंवा केला असल्याचा संशय आहे) अशी फिर्याद माझ्यासमोर देण्यात आली आहे व त्यावरून अटक-वॉरंट काढले असता उक्त ................ (नाव) सापडू शकत नाही असे प्रतिवेदन देण्यात आले आहे ; आणि ज्याअर्थी, उक्त ................ (नाव) फरारी झालेला आहे (किंवा सदर वॉरंटाची बजावणी चुकवण्यासाठी तो गुप्तपणे वावरत आहे) याबद्दल माझी खात्री पटवण्यात आली आहे ;

म्हणून, उक्त फिर्यादीस जबाब देण्यासाठी ................, राहणार .............. यास दिनांक ........ रोजी ........ येथे (जागा) या न्यायालयासमोर (किंवा माझ्यासमोर) उपस्थित होण्यास फर्माविण्यात येत आहे अशी याद्वारे उद्घोषणा करण्यात येत आहे.

आज, दिनांक ........ माहे ........ १९ ........ रोजी.

(सही)

(न्यायालयाची मोहोर)

### प्रारुप क्रमांक ५

### साक्षीदारास हजर राहण्यास फर्मावणारी उद्घोषणा

(कलमे ८२, ८७ व ९० पहा)

ज्याअर्थी, ····················· (नाव, वर्णन व पत्ता) याने ······················ (अपराध थोडक्यात नमूद करावा) अपराध केला आहे (किंवा केला असल्याचा संशय आहे) अशी फिर्याद माझ्यासमोर देण्यात आली आहे आणि उक्त फिर्यादीच्या बाबीसंबंधी ·························· (साक्षीदाराचे नाव, वर्णन व पत्ता) याला या न्यायालयासमोर हजर राहण्यास भाग पाडण्याकरता वॉरंट काढण्यात आले आहे ; आणि ज्याअर्थी, सदर वॉरंट उक्त ···················· (साक्षीदाराचे नाव) याच्यावर ते बजावणे शक्य नाही असे प्रतिवेदन देण्यात आले आहे, आणि तो फरारी झाला आहे (किंवा सदर वॉरंटाची बजावणी चुकवण्यासाठी तो गुप्तपणे वावरत आहे) याबद्दल माझी खात्री पटवण्यात आली आहे ;

म्हणून, ज्या अपराधाबद्दल फिर्याद देण्यात आली आहे अशा अपराधासंबंधी तपासणी करण्यासाठी उक्त (नाव) ····················· यास, दिनांक ··············· रोजी ··········· येथे (जागा) या न्यायालयासमोर ················· वाजता उपस्थित होण्यास फर्मावण्यात आले आहे अशी याद्वारे उद्घोषणा करण्यात येत आहे.

आज, दिनांक ········ माहे ········· १९ ····· रोजी.

(न्यायालयाची मोहोर)

(सही)

---

### प्रारुप क्रमांक ६

### साक्षीदाराला हजर राहण्यास भाग पाडणारा जप्तीचा आदेश

(कलम ८३ पहा)

अंमलदार पोलीस अधिकारी,
··················· पोलीस ठाणे, यांस

ज्याअर्थी, या न्यायालयासमोर प्रलंबित असलेल्या फिर्यादीसंबंधात साक्ष देण्यासाठी ·········· (नाव, वर्णन व पत्ता) याला हजर राहण्यास भाग पाडण्याकरता रीतसर वॉरंट काढण्यात आले आहे आणि सदर वॉरंट बजावणे शक्य नाही असे प्रतिवेदन देण्यात आले आहे ; आणि ज्याअर्थी, तो फरारी झाला आहे (किंवा सदर वॉरंटाची बजावणी चुकवण्यासाठी तो गुप्तपणे वावरत आहे) याबद्दल माझी खात्री पटवण्यात आली आहे ; आणि त्यानंतर, एक उद्घोषणा रीतसर काढण्यात व प्रसिद्ध करण्यात आली असून किंवा येत असून, तीत नमूद केलेल्या वेळी व ठिकाणी उपस्थित होण्यास व साक्षीपुरावा देण्यास उक्त ···················· याला फर्मावण्यात आले आहे ;

म्हणून, उक्त ················ याची ················ रुपये किंमतीची जी संपत्ती ············ जिल्ह्यात आढळेल ती अभिग्रहण करून जप्त करण्यास, आणि या न्यायालयाचा पुढील आदेश होईपर्यंत उक्त संपत्ती जप्तीखाली ठेवण्यास, आणि हे वॉरंट, त्याची अंमलबजावणी कशा रीतीने केली ते प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह परत पाठवण्यास तुम्हाला याद्वारे प्राधिकृत करण्यात व फर्मावण्यात येत आहे.

आज, दिनांक ············· माहे ··········· १९ ····· रोजी.

(न्यायालयाची मोहोर)

(सही)

प्रारुप क्रमांक ७

आरोपी व्यक्तीला उपस्थित राहण्यास भाग पाडणारा जप्तीचा आदेश

(कलम ८३ पहा)

(जिने किंवा ज्यांनी वॉरंटाची अंमलबजावणी करावयाची आहे त्या व्यक्तीचे किंवा व्यक्तींची नाव/नावे आणि पदनाम/पदनामे) ························ यांस,—

ज्याअर्थी, ···················· (नाव, वर्णन व पत्ता) याने 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ············ खाली शिक्षापात्र असलेला ·············· अपराध केला आहे (किंवा केला असल्याचा संशय आहे) अशी फिर्याद माझ्यासमोर देण्यात आली आहे व त्यावरुन अटक-वॉरंट काढले असता, उक्त ························ (नाव) सापडू शकत नाही असे प्रतिवेदन देण्यात आले आहे ; आणि

ज्याअर्थी, उक्त ··············· (नाव) फरारी झाला आहे (किंवा सदर वॉरंटाची बजावणी चुकवण्यासाठी तो गुप्तपणे वावरत आहे) याबद्दल माझी खात्री पटवण्यात आली आहे ; आणि त्यानंतर एक उद्घोषणा रीतसर काढण्यात व प्रसिद्ध करण्यात आली असून किंवा येत असून, उक्त दोषारोपास ············ दिवसांत जबाब देण्यासाठी उपस्थित होण्यास उक्त ·········
········· (नाव) याला फर्माविण्यात येत आहे ; आणि

ज्याअर्थी, ················ या जिल्ह्यातील ············· या खेड्यातील (किंवा शहरातील) शासनाला महसूल भरणाऱ्या जमिनीहून अन्य पुढील संपत्ती उक्त ··············· कडे आहे, ती म्हणजे ·············, आणि तिच्या जप्तीसाठी आदेश काढण्यात आला आहे ;

म्हणून, कलम ८३ च्या पोटकलम (२) मधील खंड (क्) किंवा खंड (ग्) यात किंवा दोन्हींत* विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने उक्त संपत्ती जप्त करण्यास, आणि न्यायालयाचा पुढील आदेश होईपर्यन्त ती जप्तीसाठी ठेवण्यास, आणि हे वॉरंट, त्याची अंमलबजावणी कशा रीतीने केली ते प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह परत पाठवण्यास तुम्हाला याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

आज, दिनांक ················ माहे ············ १९ ····· रोजी.

(न्यायालयाची मोहोर)

(सही)

*ज्या संपत्तीवर जप्ती आणावयाची त्या संपत्तीचे स्वरुप जसे असेल त्यानुसार लागू नसेल ते खोडावे.

---

प्रारुप क्रमांक ८

जिल्हा दंडाधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांच्यामार्फत जप्ती आणण्यास प्राधिकृत करणारा आदेश

(कलम ८३ पहा)

जिल्हा दंडाधिकारी किंवा जिल्हाधिकारी,
········· जिल्हा यांस,—

ज्याअर्थी, ················· (नाव, वर्णन व पत्ता) याने, 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ·············· खाली शिक्षापात्र असलेला ················ अपराध केला आहे (किंवा केला असल्याचा संशय आहे) अशी फिर्याद माझ्यासमोर देण्यात आली आहे व त्यावरून अटक-वॉरंट काढले असता, उक्त ················ (नाव) सापडू शकत नाही असे प्रतिवेदन देण्यात आले आहे ; आणि

ज्याअर्थी, उक्त ··················· (नाव) फरारी झाला आहे (किंवा सदर वॉरंटाची बजावणी चुकवण्यासाठी तो गुप्तपणे वावरत आहे) याबद्दल माझी खात्री पटवण्यात आली आहे ; आणि त्यानंतर एक उद्घोषणा रीतसर काढण्यात व प्रसिद्ध करण्यात आली असून किंवा येत असून, उक्त दोषारोपास ············ दिवसात जबाब देण्यासाठी उपस्थित होण्यास उक्त ··············
(नाव) याला फर्माविण्यात येत आहे ; आणि

ज्याअर्थी, ................. च्या ................. जिल्ह्यातील ........ या खेड्यातील (किंवा शहरातील) शासनाला महसूल भरणारी विवक्षित जमीन उक्त .............. कडे आहे ;

म्हणून, कलम ८३ च्या पोटकलम (४) मधील खंड (क) किंवा खंड (ग) यात किंवा दोन्हींत* विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने उक्त जमिनींवर जप्ती आणविण्यास, आणि न्यायालयाचा पुढील आदेश होईपर्यंत ती जप्तीखाली ठेववण्यास, आणि या आदेशाच्या अनुपालनार्थ तुम्ही जे काही केले असेल ते प्रमाणित करून कळवण्यास तुम्हाला याद्वारे प्राधिकृत करण्यात व विनंती करण्यात येत आहे.

आज, दिनांक ............... माहे ........... १९ ..... रोजी.

(न्यायालयाची मोहोर)

(सही)

*नको असेल ते खोडावे.

---

प्रारुप क्रमांक ९

साक्षीदाराला हजर करण्यासाठी पहिल्या खेपेचे वॉरंट

(कलम ८७ पहा)

(ज्याने किंवा ज्यांनी वॉरंटाची अंमलबजावणी करावयाची आहे त्या पोलीस अधिकाऱ्याचे किंवा, अन्य व्यक्तीचे किंवा व्यक्तींची नाव/नावे आणि पदनाम/पदनामे) ..................... यांस

ज्याअर्थी, ........... (नाव, वर्णन व पत्ता) याने .................. (अपराध थोडक्यात नमूद करावा) अपराध केला आहे (किंवा केल्याचा संशय आहे) अशी फिर्याद माझ्यासमोर देण्यात आली आहे, आणि ............... (साक्षीदाराचे नाव व वर्णन) हा उक्त फिर्यादीसंबंधी साक्षीपुरावा देऊ शकेल असा संभव दिसतो आणि ज्याअर्थी, उक्त फिर्यादीच्या सुनावणीच्या वेळी हजर राहण्याची सक्ती केल्याशिवाय तो साक्षीदार म्हणून उपस्थित राहणार नाही असे मानण्यास माझ्याजवळ सबळ व पुरेसे कारण आहे ;

म्हणून, उक्त ............. (साक्षीदाराचे नाव) यास अटक करण्यास आणि ज्यासंबंधी फिर्याद देण्यात आली आहे त्या अपराधासंबंधी त्याची तपासणी करण्यासाठी त्याला न्यायालयात आणण्यास तुम्हांला या वॉरंटाद्वारे प्राधिकृत करण्यात व फर्माविण्यात येत आहे.

आज, दिनांक ........... माहे .......... १९ .... रोजी.

(न्यायालयाची मोहोर)

(सही)

---

प्रारुप क्रमांक १०

विशिष्ट अपराधाची माहिती मिळाल्यानंतर झडती घेण्यासाठी वॉरंट

(कलम ९३ पहा)

(ज्याने, किंवा ज्यांनी वॉरंटाची अंमलबजावणी करावयाची आहे त्या पोलीस अधिकाऱ्याचे किंवा अन्य व्यक्तीचे वा व्यक्तींची नाव/नावे आणि पदनाम/पदनामे) ........ यांस

ज्याअर्थी, ................ (अपराध थोडक्यात नमूद करावा) हा अपराध घडल्याची (किंवा संशयित अपराधाची) माहिती माझ्यापुढे ठेवण्यात आली आहे (किंवा फिर्याद देण्यात आली आहे), आणि मला असे दाखवून देण्यात आले आहे की, उक्त अपराधाबाबत (किंवा संशयित अपराधाबाबत) सध्या करण्यात येत असलेल्या किंवा करावयाच्या चौकशीच्या कामी ................ (वस्तू स्पष्टपणे विनिर्दिष्ट करावी) हजर करणे अत्यावश्यक आहे ;

म्हणून, उक्त ··············· (विनिर्दिष्ट वस्तू) साठी ············ (झडती ज्यापुरती मर्यादित ठेवायची त्या घराचे, जागेचे किंवा त्यांच्या भागाचे वर्णन करावे) याची झडती घेण्यास आणि जर ती वस्तू सापडली तर, ती ताबडतोब या न्यायालयासमोर हजर करण्यास या वॉरंटाद्वारे तुम्हांस प्राधिकृत करण्यात व फर्मावण्यात येत आहे आणि वॉरंटाच्या अंमलबजावणीनंतर तात्काळ, तुम्ही त्याअन्वये काय केले आहे ते प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह हे वॉरंट परत पाठवावे.

आज, दिनांक ······ माहे ··········· १९ ······· रोजी.

(न्यायालयाची मोहोर)

(सही)

---

## प्रारुप क्रमांक ११

### संपत्ती ठेवण्याच्या संशयित जागेची झडती घेण्यासाठी वॉरंट

(कलम ९४ पहा)

···························································

······· (शिपायापेक्षा वरचा दर्जा असलेल्या पोलीस अधिकाऱ्याचे नाव व पदनाम) यांस—

ज्याअर्थी, माझ्यापुढे जी काही माहिती ठेवण्यात आली तीवरून केलेल्या यथोचित चौकशीअंती माझा असा समज झालेला आहे की, ············ (घर किंवा अन्य जागेचे वर्णन करावे) हे चोरीची संपत्ती ठेवण्याची (किंवा विकण्याची) (किंवा कलमात उल्लेखिलेल्या अन्य दोहोंपैकी कोणत्याही प्रयोजनाकरता असेल तर कलमाच्या शब्दात ते प्रयोजन नमूद करावे) जागा म्हणून वापरण्यात आले आहे;

म्हणून, आवश्यक असेल अशा सर्व सहाय्यानिशी सदर घरात (किंवा अन्य जागेत) प्रवेश करण्यास, आणि त्या प्रयोजनाकरिता आवश्यक तर वाजवी बळाचा वापर करण्यास, आणि सदर घराच्या (किंवा अन्य जागेच्या) प्रत्येक भागाची (किंवा झडती एखाद्या भागापुरती मर्यादित असल्यास, तो भाग स्पष्टपणे विनिर्दिष्ट करावा) झडती घेण्यास, आणि कोणत्याही संपत्तीचे (किंवा दस्तऐवज किंवा मुद्रांक किंवा मोहोरा किंवा नाणी किंवा, प्रकरणपरत्वे, अश्लील वस्तू यांचे) (त्या त्या प्रकरणी आवश्यक असल्यास आणखी भर घालावी) आणि बनावट दस्तऐवज किंवा नकली मुद्रांक किंवा खोटया मोहोरा, किंवा नकली नाणी, किंवा (प्रकरणपरत्वे) नकली चलनी नोटा बनवण्यासाठी जी तेथे ठेवली असल्याचे तुम्हाला वाजवीपणे मानता येईल अशी कोणतीही साधने व सामग्री यांचेसुद्धा अभिग्रहण करून त्यांचा कब्जा घेण्यास आणि उक्त वस्तूंपैकी कब्जात घेतल्या जातील त्या वस्तू ताबडतोब या न्यायालयासमोर आणण्यास या वॉरंटद्वारे तुम्हांस प्राधिकृत करण्यात व फर्मावण्यात येत आहे. वॉरंटाच्या अंमलबजावणीनंतर तात्काळ तुम्ही त्याअन्वये काय केले आहे ते प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह हे वॉरंट परत पाठवावे.

आज, दिनांक ····· माहे ··········· १९ ······· रोजी.

(न्यायालयाची मोहोर)

(सही)

---

## प्रारुप क्रमांक १२

### शांतता राखण्यासाठी बंधपत्र

(कलमे १०६ व १०७ पहा)

मी, (नाव) ········ राहणार ·············· (ठिकाण), यांस ··············· अवधीपर्यंत किंवा ············ च्या बाबतीत सध्या ··········· न्यायालयात प्रलंबित असलेली चौकशी पूर्ण होईपर्यंत शांतता राखण्याकरता बंधपत्र लिहून देण्यास सांगण्यात आले आहे, म्हणून, उक्त अवधीत किंवा उक्त चौकशी पूर्ण होईपर्यंत शांतताभंग न करण्यास किंवा ज्यामुळे शांततेचा भंग होण्याचा संभव आहे अशी कोणतीही कृती न करण्यास मी याद्वारे स्वतःला बांधून घेत आहे. आणि या कामी माझ्याकडून कोणतीही कसूर झाल्यास, रुपये ·············· इतकी रक्कम गमावून ती सरकारजमा करण्यास याद्वारे स्वतःस बांधून घेत आहे.

आज, दिनांक ······· माहे ··········· १९ ······ रोजी.

(सही)

### प्रारुप क्रमांक १३

### चांगल्या वर्तणुकीसाठी बंधपत्र

(कलमे १०८, १०९ आणि ११० पहा)

मी, (नाव)..............., राहणार ············ (ठिकाण) ······यांस········ अवधीपर्यंत (कालावधी नमूद करावा) किंवा·······च्या बाबतीत सध्या······· न्यायालयात प्रलंबित असलेली चौकशी पूर्ण होईपर्यंत शासनाशी आणि भारताच्या सर्व नागरिकांशी चांगली वर्तणूक ठेवण्याकरिता बंधपत्र लिहून देण्यास सांगण्यात आले आहे, म्हणून उक्त अवधीत किंवा उक्त चौकशी पूर्ण होईपर्यंत शासनाशी आणि भारताच्या सर्व नागरिकांशी चांगली वर्तणूक ठेवण्यास मी याद्वारे स्वत:ला बांधून घेत आहे, आणि या कामी माझ्याकडून कोणतीही कसूर झाल्यास, रुपये······ इतकी रक्कम गमावून ती सरकारजमा करण्यास याद्वारे मी स्वत:स बांधून घेत आहे.

आज, दिनांक····माहे·············१९·······रोजी.

(सही)

(जामीनदारांसह बंधपत्र निष्पादित करावयाचे असेल त्या बाबतीत पुढील मजकूर जादा दाखल करावा.)

उपर्युक्त व्यक्ती ..........हिने उक्त अवधीत किंवा उक्त चौकशी पूर्ण होईपर्यंत शासनाशी व भारताच्या सर्व नागरिकांशी चांगली वर्तणूक ठेवावी यासाठी आम्ही याद्वारे स्वत:स जामीनदार म्हणून घोषित करीत आहोत; आणि तिने त्यात काही कसूर केल्यास, रुपये.... इतकी रक्कम गमावून ती सरकारजमा करण्यास स्वत:ला, संयुक्तपणे व अलगअलगपणे बांधून घेत आहोत.

आज, दिनांक......माहे.........१९....रोजी.

(सही)

---

### प्रारुप क्रमांक १४

### संभाव्य शांतताभंगाच्या माहितीवरून समन्स

(कलम ११३ पहा)

··············· (नाव) राहणार············यांस—

विश्वसनीय माहितीवरून माझ्या असे निदर्शनास आले आहे की, (माहितीचा विषय नमूद करा), ······आणि तुम्ही शांतताभंग (किंवा ज्यामुळे शांतताभंग घडून येण्याचा संभव आहे असे कृत्य) करण्याची शक्यता आहे, म्हणून ····.····या अवधीत तुम्ही शांतता राखावी यासाठी तुम्ही रुपये·········एवढ्या रकमेचे बंधपत्र लिहून द्यावे (आणि जामीनदार आवश्यक असतील तेव्हा, पुढील मजकूर घालावा), आणि एका जामीनदाराकडून (किंवा दोन जामीनदारांकडून) रुपये······· एवढ्या रकमेचे (एकापेक्षा अधिक जामीनदार असल्यास, प्रत्येकी तेवढ्या रकमेचे) बंधपत्र लिहून तुम्ही जामीन द्यावा असे तुम्हाला का सांगू नये याचे कारण दाखवण्यासाठी तुम्ही दिनांक·····माहे···· १९····रोजी म.पू. १०-०० वाजता दंडाधिकारी······यांच्या न्यायालयात जातीने (किंवा रीतसर प्राधिकृत अभिकर्त्यामार्फत) उपस्थित राहावे असे तुम्हांस फर्मावण्यात येत आहे.

आज, दिनांक······माहे···········१९······रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

### प्रारुप क्रमांक १५

### शांतता राखण्यासाठी जामीन देण्यात चुकल्याबद्दल तुरुंगात रवानगी करण्याबाबत वॉरंट

(कलम १२२ पहा)

········येथील तुरुंगाचा अंमलदार अधिकारी यांस,—

ज्याअर्थी,································· (नाव व पत्ता) याने ....महिन्यांच्या अवधीकरता शांतता राखावी यासाठी त्याने रुपये····एवढ्या रकमेचे एका जामीनदारासहित (किंवा प्रत्येकी·········रुपयांच्या दोन जामीनदारांसहित) बंधपत्र का लिहून

देऊ नये याचे कारण दाखविण्याकरता त्याला काढलेल्या समन्सच्या पालनार्थ तो माझ्यासमोर दिनांक ··· रोजी उपस्थित झाला ; आणि ज्याअर्थी उक्त ·········· (नाव) याने असे बंधपत्र द्यावे व असा जामीन द्यावा (समन्समध्ये उल्लेखिलेला जामीन मागाहून आदेशिलेल्या जामिनापेक्षा वेगळा असल्यास नमूद करावे) असा आदेश त्यानंतर देण्यात आला, आणि उक्त आदेशाचे अनुपालन करण्यास तो चुकला आहे ;

म्हणून उक्त.......... (नाव) यास, या वॉरंटासह आपल्या हवालातीत घेण्यास आणि त्याला ········ (कारावासाची मुदत) अवधीपर्यंत सदर तुरुंगात सुरक्षितपणे ठेवण्यास (मात्र दरम्यान त्याला सोडून देण्याचा कायदेशीर आदेश झाला तर गोष्ट वेगळी) या वॉरंटाद्वारे तुम्हाला प्राधिकृत करण्यात व फर्मावण्यात येत आहे. वॉरंटाची अंमलबजावणी कशा रीतीने केली ते प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह हे वॉरंट परत पाठवावे.

आज, दिनांक ·········· माहे ········ १९ ······ रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

### प्रारुप क्रमांक १६

### चांगल्या वर्तणुकीकरता जामीन देण्यास चुकल्याबद्दल तुरुंगात रवानगी करण्याबाबत वॉरंट

(कलम १२२ पहा)

········· येथील तुरुंगाचा अंमलदार अधिकारी यांस,—

ज्याअर्थी, मला असे दाखवून देण्यात आले आहे की, ········ (नाव आणि वर्णन) हा ····· या जिल्ह्यात गुप्तपणे वावरत आहे आणि दखलपात्र अपराध करण्याच्या दृष्टीने तो तसे करीत आहे असे समजण्यास कारण आहे ;

किंवा

ज्याअर्थी, ········· (नाव व वर्णन) याच्या सर्वसाधारण चारित्र्याचा पुरावा माझ्यापुढे रुजू करण्यात येऊन तो नोंदवण्यात आला आहे व त्यावरून असे दिसून येते की, तो सराईत लुटारू (किंवा, प्रकरणपरत्वे, घरफोडया इ.) आहे.

आणि ज्याअर्थी, ते नमूद करणारा आदेश अभिलिखित करण्यात आला असून, उक्त ········ (नाव) याने स्वतः रुपये ········ एवढया रकमेचे व एका जामीनदाराकडून रुपये........एवढया रकमेचे (दोन किंवा अधिक जामीनदार असल्यास प्रत्येकी तेवढया रकमेचे), बंधपत्र देऊन, ········ (कालावधी नमूद करावा) एवढया अवधीपर्यंत चांगली वर्तणूक ठेवण्याकरता जामीन द्यावा असे त्यास फर्मावण्यात आले आहे आणि उक्त ········ (नाव) उक्त आदेशाचे अनुपालन करण्यास चुकला आहे आणि उक्त जामीन लवकर सादर केला नाही तर अशा कसुरीबद्दल त्याला ......... (अवधी नमूद करावा) एवढया मुदतीच्या कारावासाची शिक्षा देण्याचा न्यायनिर्णय झाला आहे;

म्हणून, उक्त ··········· (नाव) यास या वॉरंटासह आपल्या हवालातीत घेण्यास आणि त्याला ············ (कारावासाची मुदत) अवधीपर्यंत सदर तुरुंगात सुरक्षितपणे ठेवण्यास, किंवा तो आधीच तुरुंगात असल्यास, त्याला तेथच स्थानबद्ध करण्यास (मात्र दरम्यान त्याला सोडून देण्याचा कायदेशीर आदेश झाला तर गोष्ट वेगळी) या वॉरंटाद्वारे तुम्हाला प्राधिकृत करण्यात व फर्मावण्यात येत आहे. वॉरंटाची अंमलबजावणी कशा रीतीने केली ते प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह हे वॉरंट परत पाठवावे.

आज, दिनांक ········ माहे ············ १९ ······ रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

### प्रारुप क्रमांक १७

### जामीन देण्यास चुकल्यावरून तुरुंगात टाकलेल्या व्यक्तीला सोडून देण्यासाठी वॉरंट

(कलमे १२२ व १२३ पहा)

·············· येथील तुरुंगाचा अंमलदार (अधिकारी किंवा ज्याच्या हवालातीत ती व्यक्ती आहे असा अन्य अधिकारी) यांस—

ज्याअर्थी, न्यायालयाच्या, दिनांक ····· माहे ········ ······ १९ ······ च्या वॉरंटाखाली ·············· (कैद्याचे नाव व वर्णन) यास तुमच्या हवालातीत सुपूर्द करण्यात आले होते ;

आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३च्या कलम ·············· खाली त्याने रीतसर जामीन दिलेला आहे ;

किंवा

ज्याअर्थी, न्यायालयाच्या दिनांक ········ माहे ············ १९ ······ च्या वॉरंटाखाली (················ कैद्याचे नाव व वर्णन) यास तुमच्या हवालातीत सुपूर्द करण्यात आले होते ; आणि त्याला सोडून दिल्यामुळे समाजाला धोका पोचणार नाही असे मानण्यास पुरेशी कारणे मला दिसून आली आहेत ;

म्हणून, उक्त ················ (नाव) अन्य कोणत्याही कारणासाठी स्थानबद्ध करण्यास पात्र नसेल तर, त्यास तात्काळ सोडून देण्यात यावे यासाठी तुम्हांला या वॉरंटाद्वारे प्राधिकृत करण्यात व फर्मावण्यात येत आहे.

आज, दिनांक ········ माहे ············ १९ ······ रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

प्रारुप क्रमांक १८

**निर्वाहखर्च देण्यास चुकल्याबद्दल कारावासाचे वॉरंट**

**(कलम १२५ पहा)**

················ येथील तुरुंगाचा अंमलदार अधिकारी यांस—

ज्याअर्थी, ········ (नाव, वर्णन व पत्ता) याची पत्नी ········ (नाव) किंवा त्याचे अपत्य ·········· (नाव) किंवा त्याचा बाप किंवा आई ········ (नाव), ·········· (कारण नमूद करा) या कारणामुळे स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ असून, त्यांचा निर्वाह करण्याइतपत त्या व्यक्तीची पुरेशी ऐपत आहे आणि तसे करण्यात तिने हयगय केली आहे (किंवा तिने नकार दिला आहे) असे माझ्यापुढे शाबीत करण्यात आले आहे ; आणि उक्त ·········· (नाव) याने त्याच्या उक्त पत्नीला (किंवा अपत्याला किंवा बापाला किंवा आईला) निर्वाहाकरता दरमहा रुपये ·········· इतकी रक्कम द्यावी असे फर्मावणारा आदेश रीतसर काढण्यात आला आहे ; आणि

ज्याअर्थी, आणखी असे शाबीत करण्यात आले आहे की, उक्त आदेशांची जाणूनबुजून पर्वा न करता उक्त ················ (नाव) ················ महिन्याचा (महिन्यांचा) भत्ता म्हणून देय असलेली रक्कम रुपये ·········· देण्यास चुकलेला आहे ;

आणि त्यावरून तिला उक्त तुरुंगात ·········· च्या कालावधीपर्यंत कारावास भोगावयास लावण्याचा निर्णय करणारा आदेश काढण्यात आला होता ;

म्हणून, उक्त ················ (नाव) यास या वॉरंटासह सदर तुरुंगामध्ये आपल्या हवालातीत घेण्यास आणि तेथे उक्त आदेशाची कायद्यानुसार बजावणी करण्यास तुम्हांस प्राधिकृत करण्यात व फर्मावण्यात येत आहे. वॉरंटाची अंमलबजावणी कशा रीतीने केली ते प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह हे वॉरंट परत करण्यात यावे.

आज, दिनांक ········ माहे ·········· १९ ······ रोजी.]

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

प्रारुप क्रमांक १९

**जप्ती व विक्रीद्वारे निर्वाहखर्च देण्यास भाग पाडण्यासाठी वॉरंट**

**(कलम १२५ पहा)**

(वॉरंटाची अंमलबजावणी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याचे किंवा अन्य व्यक्तीचे नाव व पदनाम) यांस—]

ज्याअर्थी, ···················· (नाव) याने त्याच्या पत्नीला (किंवा अपत्याला किंवा बापाला किंवा आईला) निर्वाहाकरता दरमहा रुपये ·········· एवढी रक्कम द्यावी असे त्याला फर्मावणारा आदेश रीतसर काढण्यात आला आहे, आणि ज्याअर्थी, उक्त आदेशाची जाणूनबुजून पर्वा न करता उक्त ················ (नाव) ············ महिन्याचा (महिन्यांचा) भत्ता म्हणून देय असलेली रुपये ·········· रक्कम देण्यास चुकलेला आहे ;

म्हणून, ·········जिल्ह्यात आढळेल अशी उक्त··················(नाव) ची कोणतीही जंगम संपत्ती जप्त करण्यास आणि जर अशा जप्तीनंतर (किती दिवसांची किंवा तासांची मुदत दिली ते नमूद करावे) ·········· दिवसांत किंवा तासांत उक्त रक्कम भरण्यात आली नाही तर, जप्त करण्यात आलेल्या जंगम संपत्तीची किंवा उक्त रक्कम चुकती करण्यासाठी त्या संपत्तीपैकी पुरेसा होईल इतक्या भागाची विक्री करण्यास, या वॉरंटाद्वारे तुम्हाला प्राधिकृत करण्यात व फर्मावण्यात येत आहे. वॉरंटाच्या अंमलबजावणीनंतर तात्काळ, या वॉरंटाखाली तुम्ही काय केले ते प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह हे वॉरंट परत पाठवावे.

आज, दिनांक········माहे·········१९····रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

प्रारूप क्रमांक २०

**उपद्रव दूर करण्यासाठी आदेश**

(कलम १३३ पहा)

(नाव, वर्णन व पत्ता)··········यांस—

ज्याअर्थी, मला असे दाखवून देण्यात आले आहे की, ················अमुक अमुक सार्वजनिक रस्ता (किंवा अन्य सार्वजनिक ठिकाण)·····(रस्ता किंवा सार्वजनिक ठिकाण याचे वर्णन करावे) वापरणाऱ्या व्यक्तींना, (ज्यामुळे अडथळा किंवा उपद्रव होतो ते नमूद करा)·······इत्यादीद्वारे तुम्ही अडथळा (किंवा उपद्रव) निर्माण केला आहे, आणि असा अडथळा (किंवा उपद्रव) अजूनही अस्तित्वात आहे;

किंवा

ज्याअर्थी, मला असे दाखवून देण्यात आले आहे की, तुम्ही मालक किंवा व्यवस्थापक म्हणून ·········अमुक अमुक ················ (विशिष्ट व्यापार किंवा व्यवसाय कोणता ते आणि जेथे तो चालवला जातो ते ठिकाण नमूद करावे) चालवीत आहात, आणि तो सार्वजनिक आरोग्यास (किंवा सुखसोयीस) ·········च्या कारणामुळे (कशा रीतीने हानिकारक परिणाम होत आहेत ते थोडक्यात नमूद करावे) हानिकारक आहे, आणि तो बंद करावयास हवा किंवा निराळ्या ठिकाणी हलवावयास हवा ;

किंवा

ज्याअर्थी, मला असे दाखवून देण्यात आले आहे की, ·········सार्वजनिक रस्त्यालगतच्या (रहदारीच्या मार्गाचे वर्णन करावे) विवक्षित तळ्याचे (किंवा विहिरीचे किंवा खोदकामाचे) तुम्ही मालक आहात (किंवा तो तुमच्या कब्जात आहे किंवा यावर तुमचे नियंत्रण आहे), आणि उक्त तळ्याला (किंवा विहिरीला किंवा खोदकामाला )कुंपण नसल्याने (किंवा त्याचे कुंपण सुरक्षित नसल्याने) जनतेची सुरक्षितता धोक्यात आहे ;

किंवा

ज्याअर्थी, (प्रकरणपरत्वे,) इ. इ.,

म्हणून, मी याद्वारे ················ अवधीत (देण्यात आलेला अवधी नमूद करावा) (उपद्रवाचा उपशम करण्यासाठी काय करणे आवश्यक आहे ते नमूद करावे) ··करण्यास किंवा···येथे ····यांच्या न्यायालयात पुढील·······महिन्याच्या············या दिनांकास उपस्थित होण्यास, आणि ह्या आदेशाची अंमलबजावणी का करू नये याचे कारण दाखवण्यास तुम्हांस निदेशून फर्मावीत आहे;

किंवा

मी याद्वारे, ·········अवधीत (देण्यात आलेला अवधी नमूद करावा) उक्त ठिकाणी उक्त व्यापार किंवा व्यवसाय चालवण्याचे बंद करण्यास आणि तो पुन्हा चालू न करण्यास किंवा उक्त व्यापार सध्या जेथे चालवण्यात येत आहे त्या ठिकाणाहून हलवण्यास, किंवा ··········येथे उपस्थित होण्यास इ. इ. तुम्हांला याद्वारे निदेशून फर्मावीत आहे ;

किंवा

मी याद्वारे, ·····················अवधीत (देण्यात आलेला अवधी नमूद करावा) पुरेसे कुंपण (कुंपण कशा प्रकारचे हवे व कोणत्या भागाला कुंपण घालावयाचे ते नमूद करावे) उभारण्यास किंवा ················येथे उपस्थित होण्यास इ. इ. तुम्हाला याद्वारे निदेशून फर्मावीत आहे ;

किंवा

मी तुम्हांला याद्वारे इ. इ. (प्रकरणपरत्वे), निदेशून फर्मावीत आहे.

आज, दिनांक··········माहे············१९····रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

## प्रारूप क्रमांक २१

### बंडाधिकाऱ्यांची नोटीस आणि अलंघनीय आदेश

(कलम १४१ पहा)

(नाव, वर्णन व पत्ता) ·················· यांस,—

मी याद्वारे तुम्हांला अशी नोटीस देत आहे की, दिनांक ······ माहे ·········· १९ ···· रोजी काढलेल्या ज्या आदेशाद्वारे, ······· (आदेशातील मागणी सारत: नमूद करा) असे फर्मावण्यात आले होते तो आदेश वाजवी आणि योग्य आहे असे आढळून आले आहे. तो आदेश कायम करण्यात आला आहे आणि उक्त आदेशाचे ············ अवधीत (देण्यात आलेला अवधी नमूद करा). पालन करण्यास मी तुम्हांला याद्वारे निदेशून फर्मावीत आहे, त्याची अवज्ञा केल्यास त्यासाठी 'भारतीय दंड संहिते' ने उपबंधित केलेल्या शिक्षेस पात्र होण्याची जोखीम पत्करावी लागेल.

आज, दिनांक ············ माहे ············ १९ ···· रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

## प्रारूप क्रमांक २२

### चौकशी होईस्तोवर निकटवर्ती संकटाचा बंदोबस्त करण्यासाठी आदेश

(कलम १४२ पहा)

(नाव, वर्णन व पत्ता) ···················· यांस,—

ज्याअर्थी, दिनांक ········ माहे ············ १९ ······ रोजी मी काढलेल्या सशर्त आदेशांबाबत चौकशी चालू आहे, आणि मला असे दाखवून देण्यात आले आहे की, उक्त आदेशात उल्लेखिलेल्या उपद्रवाच्या अनुषंगाने जनतेला इतक्या गंभीर प्रकाराचे संकट किंवा हानी पोहोचण्याचा धोका येऊन ठेपलेला आहे की, असे संकट किंवा हानी निवारण्यासाठी तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक झाले आहे, म्हणून मी याद्वारे 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३'—कलम १४२ च्या उपबंधाखाली तुम्हांला, चौकशीचा निकाल होईस्तोवर तात्काळ (कोणती तात्पुरती संरक्षक उपाययोजना करणे आवश्यक आहे ते स्पष्टपणे नमूद करावे) ········ करण्याबद्दल निदेश देऊन बजावीत आहे.

आज, दिनांक ············ माहे ············ १९ ···· रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

## प्रारूप क्रमांक २३

### उपद्रवाची पुनरावृत्ती, इत्यादींस मनाई करणारा दंडाधिकाऱ्याचा आदेश

(कलम १४३ पहा)

(नाव, वर्णन व पत्ता) ·················· यांस,—

ज्याअर्थी, मला असे दाखवून देण्यात आले आहे की, ············ (नमुना क्रमांक २० किंवा नमुना क्रमांक २४ मध्ये मार्गदर्शन केल्यानुसार, योग्य ती उद्देशिका लिहावी).

म्हणून, मी याद्वारे तुम्हाला उक्त उपद्रव पुन्हा न करण्याबद्दल किंवा चालू न ठेवण्याबद्दल सक्त आदेश देऊन बजावीत आहे.

आज, दिनांक ········ माहे ·········· १९ ···· रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

### प्रारूप क्रमांक २४

### अडथळा, दंगा इत्यादीस प्रतिबंध करणारा दंडाधिकाऱ्याचा आदेश

(कलम १४४ पहा)

(नाव, वर्णन व पत्ता) ................ यांस,—

ज्याअर्थी, मला असे दाखवून देण्यात आले आहे की, तुमच्याकडे ......... (जमीनजुमल्याचे स्पष्टपणे वर्णन करावे) चा कब्जा (किंवा अखत्यार) आहे आणि उक्त जमिनीवर चर खणताना खणलेल्या मातीचा किंवा दगडांचा भाग तुम्ही लागून असलेल्या सार्वजनिक रस्त्यावर फेकण्याच्या किंवा ठेवण्याच्या बेतात असून, त्यामुळे तो रस्ता वापरणाऱ्या व्यक्तींना अडथळा होण्याचा धोका निर्माण होऊ शकेल ;

किंवा

ज्याअर्थी, मला असे दाखवून देण्यात आले आहे की, तुम्ही आणि अन्य अनेक व्यक्ती एकत्र येऊन (व्यक्तिवर्गाचा उल्लेख करावा) सार्वजनिक रस्त्यावरून, इत्यादी (प्रकरणपरत्वे) मिरवणुकीने जाण्याच्या बेतात असून, अशा मिरवणुकीचे पर्यवसान दंग्यात किंवा दंगलीत होण्याची शक्यता आहे ;

किंवा

ज्याअर्थी, (प्रकरणपरत्वे) ......... इ. इत्यादी .........

म्हणून, मी याद्वारे उक्त रस्त्याच्या कोणत्याही भागावर जमिनीमधून खणून काढलेली कोणतीही माती किंवा दगड तुम्ही ठेऊ नये किंवा ठेवण्याची परवानगी देऊ नये, असा आदेश देत आहे ;

किंवा

उक्त रस्त्यावरुन अशी मिरवणूक नेण्यास मी याद्वारे मनाई करीत आहे, आणि अशा मिरवणुकीत (किंवा उद्देशिकेत कथन केलेल्या प्रकरणात आवश्यक असेल त्याप्रमाणे) कोणताही भाग घेऊ नये असा सक्त इशारा देऊन बजावीत आहे.

आज, दिनांक ......... माहे ......... १९ ..... रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

### प्रारूप क्रमांक २५

### वादातील जमीन, इत्यादींच्या कब्जास पक्षकार हक्कदार असल्याचे घोषित करणारा दंडाधिकाऱ्याचा आदेश

(कलम १४५ पहा)

रीतसर नोंदलेल्या आधारकारणांवरुन मला असे दिसते की, माझ्या स्थानिक अधिकारितेत स्थित असलेल्या विवक्षित (तंटयांचा विषय संक्षिप्तपणे नमूद करावा) ...... संबंधी ......... (पक्षकारांचे नाव व राहण्याचे ठिकाण, किंवा तंटा गावकऱ्यांच्या वेगवेगळ्या गटांमध्ये असेल तर फक्त राहण्याचे ठिकाण लिहावे) यांच्यामध्ये, जेणेकरून शांतताभंग होण्याची शक्यता आहे असा तंटा अस्तित्वात होता. सर्व उक्त पक्षकारांना उक्त (तंटयाची विषयवस्तू) त्याचा प्रत्यक्ष कब्जा कोणाकडे होता या तथ्यांसंबंधी आपापले दावे मांडणाऱ्या लेखी कैफियती सादर करण्यास सांगितले होते, आणि रीतसर चौकशी केली असता, कब्जाच्या वध हक्कांबाबत उक्त पक्षकारांपकी कोणाच्या दाव्यात कितपत तथ्य आहे ते विचारात न घेता असे दिसते की, उक्त ......... (नाव किंवा नावे किंवा वर्णन) याचा प्रत्यक्ष कब्जाबाबतचा दावा खरा आहे अशी खात्री झाल्यामुळे, मी असा निर्णय देत आहे आणि घोषित करीत आहे की, त्याच्याकडे (किंवा त्यांच्याकडे) उक्त ......... (तंटयाचा विषय) चा कब्जा आहे आणि रीतसर कायदेशीर मार्गाने त्यास (त्यांस) काढून टाकण्याचा आदेश दिला जाईपर्यंत असा कब्जा ठेऊन घेण्यास तो (ते) हक्कदार आहे (आहेत) आणि दरम्यान त्याच्या (किंवा त्यांच्या) कब्जाला कोणताही अडथळा आणण्यास मी सक्त मनाई करीत आहे.

आज, दिनांक ......... माहे ........... १९ ....... रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

### प्रारूप क्रमांक २६

### जमीन, इत्यादींच्या कब्जाच्या वाद प्रकरणी जप्तीचे वॉरंट

(कलम १४६ पहा)

..............येथील पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकारी (किंवा ............... चा जिल्हाधिकारी) यांस––

ज्याअर्थी, मला असे दाखवून देण्यात आले आहे की, माझ्या अधिकारितेच्या मर्यादांच्या आत स्थित असलेल्या विवक्षित ........ (तंटयाचा विषय संक्षिप्तपणे नमूद करावा) संबंधी ......... (संबंधित पक्षकारांची नावे व राहण्याचे ठिकाण, किंवा तंटा गावकऱ्यांच्या वेगवेगळ्या गटांमध्ये असेल तर, फक्त राहण्याचे ठिकाण लिहावे) यांच्यामध्ये, जेणेकरून शांतताभंग होण्याची शक्यता आहे असा तंटा अस्तित्वात होता आणि, उक्त पक्षकारांना .......... (तंटयाची विषयवस्तू) याचा प्रत्यक्ष कब्जा कोणाकडे होता या तथ्यासंबंधी आपापले दावे लेखी मांडण्यास सांगितले होते, आणि ज्याअर्थी, उक्त दाव्यांसंबंधी रीतसर चौकशी केली असता, माझा असा निर्णय झाला आहे की, उक्त पक्षकारांपकी कोणाकडेही (उक्त तंटयांची विषयवस्तु) याचा कब्जा नव्हता (किंवा पूर्वोक्ताप्रमाणे कब्जा कोणत्या पक्षकाराकडे होता याबद्दल मी स्वतःची खात्री करून घेऊ शकलो नाही) ;

म्हणून, (उक्त तंटयाची विषयवस्तू) याचा कब्जा घेण्यास आणि स्वतःकडे ठेवून घेण्यास, आणि तो कब्जा पक्षकारांचे हक्क किंवा कब्जासंबंधीचा दावा निर्णीत करणाऱ्या सक्षम न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश मिळेपर्यंत ते जप्तीखाली ठेवण्यास या वॉरंटाद्वारे तुम्हांस प्राधिकृत करण्यात व फर्माविण्यात येत आहे, आणि वॉरंटाची अंमलबजावणी कशा रीतीने केली ते प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह हे वॉरंट परत करण्यात यावे.

आज, दिनांक .......... माहे ........... १९ ....... रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

### प्रारूप क्रमांक २७

### जमिनीवर किंवा जलाशयावर एखादी गोष्ट करण्यास मनाई करणारा दंडाधिकाऱ्याचा आदेश

(कलम १४७ पहा)

माझ्या स्थानिक अधिकारितेत स्थित असलेली/ला ........... (तंटयाची विषयवस्तू संक्षिप्तपणे नमूद करावी) याच्या वापरासंबंधी तंटा उद्‌भवला असून त्या जमिनीच्या (किंवा जलाशयाच्या) वापरावर (व्यक्तीचे किंवा व्यक्तींचे वर्णन करावे) .......... याने/यांनी सर्वस्वी आपला हक्क सांगितला आहे, आणि त्याबाबत रीतसर चौकशी केल्यानंतर मला असे दिसते की, सदर जमिनीचा (किंवा जलाशयाचा) वापरहक्क जनतेला (किंवा व्यक्ती किंवा व्यक्तिवर्ग असेल तर, त्याचे किंवा त्यांचे वर्णन करावे) खुला झालेला आहे आणि (जर वर्षभर वापर करता येत असेल तर) उक्त चौकशी सुरू केल्यापासून तीन महिन्यांत (किंवा जर वापरहक्क फक्त विशिष्ट मोसमातच उपभोगता येण्यासारखा असेल तर, "तो उपभोगणे शक्य असेल त्या मोसमांपैकी फक्त शेवटच्या मोसमात" असे म्हणावे) सदर वापरहक्क उपभोगण्यात आलेला आहे ;

म्हणून, मी आदेश देत आहे की, उक्त (कब्जाचा/चे मागणीदार) किंवा त्यांचा कोणीही हितसंबंधी याला (किंवा यांना) सर्वस्वी कब्जा मिळण्यास हक्कदार म्हणून न्यायनिर्णीत करणारा सक्षम न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश मिळेपर्यंत, त्याने/त्यांनी, इतरांना उक्त जमिनीच्या (किंवा जलाशयाच्या) वापराचा हक्क उपभोगण्यापासून वंचित ठेवून कब्जा घेऊ नये (किंवा ठेवून घेऊ नये).

आज, दिनांक ......... माहे ......... १९ ....... रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

### प्रारूप क्रमांक २८

### पोलीस अधिकाऱ्यापुढील प्राथमिक चौकशीनंतर द्यावयाचे बंधपत्र आणि जामीन

(कलम १६९ पहा)

मी (नाव) ............; राहणार ..........., यांच्यावर ............ च्या अपराधाचा आरोप करण्यात आला असून आणि चौकशीनंतर मला ............ येथील दंडाधिकाऱ्यासमोर उपस्थित होण्यास फर्माविण्यात आले असल्याने,

किंवा

आणि चौकशीनंतर मला आवश्यक करण्यात येईल तेव्हा उपस्थित होण्यासाठी जातमुचलका लिहून देण्यास फर्माविण्यात आले असल्याने, उक्त आरोपास पुढील उत्तर देण्यासाठी ··········· येथील ········च्या न्यायालयात दिनांक.......माहे.......१९.....रोजी (किंवा यापुढे मला उपस्थित राहणे आवश्यक करण्यात येईल अशा दिनांकास) उपस्थित राहण्यास मी स्वत:ला बांधून घेत आहे. आणि यात मी काही कसूर केल्यास रु......एवढी गमावली रक्कम जाऊन ती सरकार जमा होण्यास मी याद्वारे स्वत:ला बांधून घेत आहे.

आज, दिनांक......माहे......१९....रोजी. (सही)

उक्त·· हा······येथील·····च्या न्यायालयात येत्या दिनांक················ माहे.....१९.....रोजी (किंवा यापुढे त्याला आवश्यक करण्यात येईल अशा कोणत्याही दिनांकास)......वाजता त्यांच्या विरुद्ध असलेल्या आरोपास पुढील उत्तर देण्याकरता उपस्थित राहावा यासाठी मी याद्वारे स्वत:ला (किंवा आम्ही संयुक्तपणे व अलगअलगपणे आम्हाला आणि आमच्यापैकी प्रत्येकाला) उक्त······(नाव) याचा/चे जामीनदार म्हणून घोषित करीत आहे/आहो, आणि त्याने त्यात कसूर केल्यास रु.......एवढी रक्कम गमावून ती सरकारजमा करण्यास मी (किंवा आम्ही) याद्वारे स्वत:ला बांधून घेत आहे/आहोत.

आज, दिनांक....माहे.....१९....रोजी. (सही)

---

**प्रारूप क्रमांक २९**

**फिर्याद चालवण्यासाठी किंवा साक्ष देण्यासाठी बंधपत्र**

कलम १७० पहा

मी, (नाव)···············, राहणार (ठिकाण·······················) यास येत्या दिनांक.......माहे............१९........रोजी.............येथे ·····················च्या न्यायालयात........वाजता हजर राहण्यास आणि अमुक क.ख. विरुद्ध ठेवलेल्या...................दोषारोपाच्या बाबतीत तेथल्या तेथे फिर्याद चालवण्यास (किंवा फिर्याद चालवण्यास आणि साक्ष देण्यास) (किंवा साक्ष देण्यास) स्वत:ला बांधून घेत आहे आणि त्यात कसूर झाल्यास रु...............एवढी रक्कम गमावून ती सरकारजमा करण्यास मी स्वत:ला बांधून घेत आहे.

आज, दिनांक.........माहे........१९.....रोजी

(सही)

---

**प्रारूप क्रमांक ३०**

**किरकोळ अपराधाचा आरोप करण्यात आलेल्या व्यक्तीला शेष समन्स**

(कलम २०६ पहा)

················, यास (आरोपीचे नाव) (राहणार)················· ···················(दोषारोप करण्यात आलेला अपराध थोडक्यात नमूद करावा) ···················या किरकोळ अपराधाच्या दोषारोपास उत्तर देण्यासाठी तुमची उपस्थिती आवश्यक आहे, म्हणून दिनांक.......माहे............१९........रोजी.......... येथील....... (दंडाधिकारी) यांच्या पुढे जातीने (किंवा वकिलामार्फत) उपस्थित राहण्यास किंवा जर दंडाधिकाऱ्यासमोर उपस्थित न होता आरोपाबद्दल दोषी असल्याची कबुली देण्याची तुमची इच्छा असेल तर, उक्त दिनांकापूर्वी दोषीपणाची लेखी कबुली आणि द्रव्यदंड म्हणून.......... रुपयांची रक्कम पाठवण्यास, किंवा जर वकिलामार्फत उपस्थित होऊन अशा वकिलामार्फत दोषीपणाची कबुली देण्याची तुमची इच्छा असेल तर, अशा वकिलाला आपल्या वतीने अशी दोषीपणाची कबुली देण्याकरता लेखी प्राधिकृत करण्यास आणि अशा वकिलामार्फत द्रव्यदंड भरण्यास तुम्हाला याद्वारे फर्माविण्यात येत आहे. यात कसूर होऊ नये.

आज, दिनांक.......माहे.......१९......रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

प्रारूप क्रमांक ३१

**दंडाधिकाऱ्याकडून सरकारी अभियोक्त्याला सुपूर्दगीची नोटीस**

(कलम २०९ पहा)

········चा दंडाधिकारी याद्वारे नोटीस देत आहे की, त्याने ·················ला त्याची पुढील सत्रात संपरीक्षा व्हावी यासाठी सुपूर्द केले आहे; आणि उक्त प्रकरणाची फिर्याद चालवण्यासाठी तो दंडाधिकारी सरकारी अभियोक्त्याला याद्वारे नियुक्त करीत आहे.

आरोपीवरील दोषारोप असा आहे की, ················ (दोषारोपात असेल त्याप्रमाणे अपराध नमूद करावा) इत्यादी.........

आज, दिनांक ······माहे ············१९······रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

प्रारूप क्रमांक ३२

**दोषारोप**

(कलमे २११, २१२ आणि २१३ पहा)

**एक. एका शीर्षाखाली दोषारोप**

(१) (क) मी, (दंडाधिकाऱ्याचे नाव आणि पद, इत्यादी) याद्वारे (आरोपी व्यक्तीचे नाव) ········तुमच्यावर पुढीलप्रमाणे दोषारोप ठेवीत आहे :—

(ख) तुम्ही दिनांक······माहे······१९···········रोजी किंवा त्या सुमारास ......येथे भारत सरकारच्या विरुद्ध युद्ध चालवले आणि त्याद्वारे तुम्ही 'भारतीय दंड संहिते'च्या कलम १२१ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

(ग) आणि मी याद्वारे असा निदेश देतो की, उक्त दोषारोपावरून तुमची या न्यायालयाद्वारे संपरीक्षा करण्यात यावी.

(दंडाधिकाऱ्याची सही व मोहोर)

**[ (ख) ऐवजी घालावयाचे] :—**

**कलम १२४ वरील**

(२) तुम्ही दिनांक······माहे······रोजी किंवा त्या सुमारास,·········· येथे भारताच्या राष्ट्रपतीला [किंवा, प्रकरणपरत्वे, (राज्याचे नाव)···············च्या राज्यपालाला] असा राष्ट्रपती (किंवा प्रकरणपरत्वे राज्यपाल) म्हणून एखादी कायदेशीर शक्ती वापरण्यापासून परावृत्त होण्यास भाग पाडण्याच्या हेतुने त्याच्यावर हमला केला, आणि त्याद्वारे तुम्ही, 'भारतीय दंड संहिते'च्या कलम १२४ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

**कलम १६१ वरील**

(३) तुम्ही ·············या खात्यातील लोकसेवक असताना, एखादे पदीय काम करण्याचे वर्जिण्यास प्रलोभन म्हणून वैध पारिश्रमिकाहून अन्य परितोषण प्रत्यक्षपणे············ (नाव नमूद करावे) कडून अन्य पक्षाकरता (नाव नमूद करावे) स्वीकारले आहे. आणि त्याद्वारे तुम्ही 'भारतीय दंड संहिते'च्या कलम १६१ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

**कलम १६६ वरील**

(४) तुम्ही दिनांक·····माहे······रोजी किंवा त्या सुमारास·············· येथे············अमुक कृती केली (किंवा, प्रकरणपरत्वे, करण्याचे टाळले) असून, असे वर्तन ······अधिनियमाच्या कलम·····च्या उपबंधाच्या विरुद्ध आहे आणि ················ ············ला बाधा आणणारे असल्याचे तुम्हाला माहिती आहे, आणि त्याद्वारे तुम्ही 'भारतीय दंड संहिते'च्या कलम १६६ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

**कलम १९३ वरील**

(५) तुम्ही दिनांक ····· माहे ········· रोजी किंवा त्या सुमारास ··············· येथे ················ यांच्या समोर चाललेल्या ············· च्या संपरीक्षेच्या ओघात साक्षीमध्ये " ·············· " असे निवेदन केले व ते निवेदन खोटे असल्याचे एकतर तुम्हाला माहीत आहे किंवा तुम्ही तसे मानत होता किंवा ते खरे असल्याचे तुम्ही मानत नाही, आणि त्याद्वारे तुम्ही 'भारतीय दंड संहिते' च्या कलम १९३ खाली शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

**कलम ३०४ वरील**

(६) तुम्ही दिनांक ········ माहे ·········· रोजी किंवा त्या सुमारास ··········· येथे 'खून' या सदरात न मोडणारा सदोष मनुष्यवध केला असून, त्यामुळे ················· चा मृत्यू घडून आला आहे आणि त्याद्वारे तुम्ही 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ३०४ खाली शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

**कलम ३०६ वरील**

(७) तुम्ही दिनांक ········ माहे ········· रोजी किंवा त्या सुमारास, ··········· येथे क. ख. हा नशेच्या अवस्थेत असताना त्याला आत्महत्या करण्यास अपप्रेरणा दिली, आणि त्याद्वारे तुम्ही 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ३०६ खाली शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

**कलम ३२५ वरील**

(८) तुम्ही दिनांक ·············· माहे ········ रोजी किंवा त्या सुमारास ········ येथे ········· ला इच्छापूर्वक गंभीर दुखापत केली, आणि त्याद्वारे 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ३२५ खाली शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

**कलम ३९२ वरील**

(९) तुम्ही दिनांक ······· माहे ·········· रोजी किंवा त्या सुमारास ··········· येथे......... (गाव नमूद करावे) यास लुबाडले, आणि त्याद्वारे तुम्ही 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ३९२ खाली शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

**कलम ३९५ वरील**

(१०) तुम्ही दिनांक ········ माहे ······ रोजी किंवा त्या सुमारास ·········· येथे दरवडा घातला आणि त्याद्वारे तुम्ही 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ३९५ खाली शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

**दोन-दोन किंवा अधिक शीर्षांसह दोषारोप**

(१) (क) मी, (दंडाधिकाऱ्याचे नाव आणि पद, इत्यादी) ······· याद्वारे (आरोपी व्यक्तीचे नाव) तुमच्यावर पुढीलप्रमाणे दोषारोप ठेवीत आहे :—

**कलम २४१ वरील**

(ख) पहिले असे की,—तुम्ही दिनांक ··········· माहे ········ रोजी किंवा त्या सुमारास ·············· येथे नकली असल्याचे माहीत असलेले एक नाणे क. ख. नावाच्या अन्य व्यक्तीकडे खरे म्हणून सुपूर्द केले, आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिते' च्या कलम २४१ खाली शिक्षापात्र असलेला आणि सत्र न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

दुसरे असे की,—तुम्ही दिनांक ······· माहे ······· रोजी किंवा त्या सुमारास ······ येथे एक नाणे नकली असल्याचे माहीत असताना क. ख. नावाच्या अन्य व्यक्तीला ते स्वीकारण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला आणि त्याद्वारे तुम्ही 'भारतीय दंड संहिते' च्या कलम २४१ खाली शिक्षापात्र असलेला आणि सत्र न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

(ग) आणि मी याद्वारे असा निदेश देतो की, उक्त दोषारोपाबद्दल तुमची उक्त न्यायालयाद्वारे संपरीक्षा करण्यात यावी.

(दंडाधिकाऱ्याची सही व मोहोर).

((ख) ऐवजी घालावयाचे) :—

**कलम ३०२ व ३०४ वरील**

(२) पहिले असे की,—तुम्ही दिनांक ············ माहे ·········· रोजी किंवा त्या सुमारास ········· येथे ········ चा मृत्यू घडवून खुनाचा अपराध केला आणि त्याद्वारे तुम्ही 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ३०२ खाली शिक्षापात्र आणि सत्र न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.*

दुसरे असे की,—तुम्ही दिनांक ········ माहे ················ रोजी किंवा त्या सुमारास ·············· येथे ·············· चा मृत्यू घडवून, 'खून' या सदरात न मोडणारा असा सदोष मनुष्यवध केला, आणि त्याद्वारे 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ३०४ खाली शिक्षापात्र असलेला आणि सत्र न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

**कलमे ३७९ व ३८२ वरील**

(३) पहिले असे की—तुम्ही दिनांक ··········· माहे ·········· रोजी किंवा त्या सुमारास ·········· येथे चोरी केली, आणि त्याद्वारे तुम्ही 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ३७९ खाली शिक्षापात्र असलेला आणि सत्र न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

दुसरे असे की,—तुम्ही दिनांक ·········· माहे ·············· रोजी किंवा त्या सुमारास, चोरी करता यावी म्हणून एखाद्या व्यक्तीचा मृत्यू घडवून आणण्याची पूर्वतयारी करून अशी चोरी केली आणि त्याद्वारे तुम्ही 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ३८२ खाली शिक्षापात्र असलेला आणि सत्र न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

तिसरे असे की,—तुम्ही दिनांक ········· माहे ············ रोजी किंवा त्या सुमारास, चोरी केल्यानंतर तुम्हाला निसटून जाता यावे म्हणून एका व्यक्तीला निरुद्ध करण्याची पूर्वतयारी करून अशी चोरी केली आणि त्याद्वारे तुम्ही 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ३८२ खाली शिक्षापात्र असलेला आणि सत्र न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

चौथे असे की,—तुम्ही दिनांक ······· माहे ·············· रोजी किंवा त्या सुमारास, चोरीद्वारे मिळवलेली संपत्ती ठेवून घेण्यासाठी एखाद्या व्यक्तीला दुखापतीची भीती निर्माण करण्याची पूर्वतयारी करून ········ येथे अशी चोरी केली आणि त्याद्वारे तुम्ही 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ३८२ खाली शिक्षापात्र असलेला आणि सत्र न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

**कलमे १९३ वरील पर्यायी दोषारोप**

(४) तुम्ही दिनांक ·········· माहे ·········· रोजी किंवा त्या सुमारास ········· येथे ·········· यांच्यासमोर चाललेल्या ·············· मधील चौकशीच्या ओघात साक्षीमध्ये असे निवेदन केले की, " ·············· ", आणि तुम्ही दिनांक ·········· माहे ·········· रोजी किंवा त्या सुमारास, ·········· येथे ·········· समोर चाललेल्या संपरीक्षेच्या ओघात साक्षीमध्ये असे निवेदन केले की, " ·············· " आणि यांपैकी एक निवेदन एकतर खोटे असल्याचे तुम्हाला माहीत होते किंवा तसे तुम्ही मानत होता किंवा ते खरे असल्याचे तुम्ही मानत नव्हता, आणि त्याद्वारे तुम्ही 'भारतीय दंड संहिते' च्या कलम १९३ खाली शिक्षापात्र असलेला आणि सत्र न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

*(दंडाधिकाऱ्याकडून संपरीक्षा करण्यात आलेल्या प्रकरणात "सत्र न्यायालयाच्या दखलगिरीत" याऐवजी "माझ्या दखलगिरीत" असे म्हणावे).

**तीन-पूर्वीच्या दोषसिद्धीनंतर चोरीचा दोषारोप**

मी, ·················· (दंडाधिकाऱ्याचे नाव व पद इत्यादी) याद्वारे ········ (आरोपी व्यक्तीचे नाव) तुमच्यावर पुढीलप्रमाणे दोषारोप ठेवीत आहे :—

तुम्ही दिनांक ·········· माहे ············ रोजी किंवा त्या सुमारास ·············· येथे चोरी केली आणि त्याद्वारे तुम्ही 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ३७९ खाली शिक्षापात्र असलेला आणि सत्र न्यायालयाच्या (किंवा, प्रकरणपरत्वे दंडाधिकाऱ्याच्या) दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

आणि तुम्ही उक्त ·············· (आरोपीचे नाव), यांच्यावर आणखी दोषारोप असा आहे की, तुम्ही उक्त अपराध करण्यापूर्वी, म्हणजे दिनांक ············ माहे ············ रोजी (ज्याच्याकडून संपरीक्षा करण्यात आली, ते न्यायालय नमूद करावे) ·········· कडून 'भारतीय दंड संहितेच्या सतराव्या प्रकरणाखाली ३ वर्षे मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असणाऱ्या अपराधाबद्दल म्हणजे रात्रीच्यावेळी घरफोडी करण्याच्या अपराधाबद्दल तुम्हास (ज्याखाली आरोपी म्हणून सिद्धदोष ठरविण्यात आले त्या कलमामध्ये वापरलेल्या शब्दांत अपराधाचे वर्णन करावे) सिद्धदोष ठरवण्यात आले आहे व ही दोषसिद्धी अजूनही पूर्णपणे अंमलात आहे आणि परिणामक आहे. आणि म्हणून तुम्ही भारतीय दंड संहिते' च्या कलम ७५ खालील वाढीव शिक्षेस पात्र आहात.

म्हणून, मी याद्वारे असा निदेश देतो की, तुमची संपरीक्षा करण्यात यावी, इत्यादी.

### प्रारुप क्रमांक ३३

### साक्षीदाराला समन्स

(कलमे ६१ व २४४ पहा)

..................................................

राहणार .................. यांस---

ज्याअर्थी, (आरोपीचे नाव) ............. राहणार .........(पत्ता) याने अमुक अमुक (वेळ व ठिकाण यांसह अपराध थोडक्यात नमूद करावा) अपराध केला आहे अशी माझ्याकडे फिर्याद देण्यात आली आहे, आणि मला असे दिसून येते की, फिर्यादीपक्षातर्फे तुम्ही महत्त्वाचा पुरावा देण्याची अथवा कोणताही दस्तऐवज किंवा अन्य वस्तू दाखल करण्याची शक्यता आहे ;

म्हणून, तुम्हाला याद्वारे या न्यायालयापुढे येत्या दिनांक ......... माहे .... रोजी मध्यान्हपूर्व दहा वाजता असा दस्तऐवज किंवा वस्तू दाखल करण्यासाठी अथवा उक्त फिर्यादीसंबंधाने तुम्हाला जे माहीत आहे त्याबद्दल साक्ष देण्यासाठी उपस्थित होण्याचे आणि न्यायालयाच्या परवानगीवाचून तेथून न जाण्याचे समन्स पाठवण्यात येत आहे ; आणि तुम्हांला याद्वारे ताकीद देण्यात येत आहे की, जर तुम्ही उक्त दिनांकास उपस्थित होण्याच्या कामी रास्त सबबीशिवाय हयगय केली किंवा नकार दिला तर, तुम्हांस हजर राहण्याची सक्ती करण्यासाठी वॉरंट काढले जाईल.

आज, दिनांक ......... माहे ......... १९ ....... रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

### प्रारुप क्रमांक ३४

### कारावासाचा किंवा द्रव्यदंडाचा शिक्षादेश [1][ न्यायालयाने ] संमत केल्यावर तुरुंगात रवानगी करण्याबाबतचे वॉरंट

[1][ (कलमे २३५, २४८ व २५५ पहा) ]

............. येथील तुरुंगाचा अंमलदार अधिकारी यांस---

ज्याअर्थी, दिनांक ........माहे.........१९ .......... रोजी ............. च्या क्रमसूचीच्या प्रकरण क्र. ...........मधील (पहिला, दुसरा किंवा, प्रकरणपरत्वे, तिसरा) कैदी (कैद्याचे नाव) .............यास 'भारतीय दंड संहितेच्या' (किंवा ............. अधिनियमाच्या) कलम (कलमे).... खाली ........ च्या अपराधाबद्दल (अपराध थोडक्यात नमूद करावा) माझ्यासमोर सिद्धदोष ठरवण्यात आले आणि त्यास .............चा (शिक्षा संपूर्णपणे आणि सुस्पष्टपणे नमूद करावी) शिक्षादेश देण्यात आला ;

म्हणून, याद्वारे उक्त ...................... (कैद्याचे नाव) याला या वॉरंटासह उक्त तुरुंगात स्वतःच्या हवालातीत घेण्यासाठी आणि त्यायोगे कायद्यानुसार पूर्वोक्त शिक्षादेशाची अंमल बजावणी करण्यासाठी तुम्हास प्राधिकृत करण्यात व फर्मावण्यात येत आहे.

आज, दिनांक ....... माहे ......... १९ ....... रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

### प्रारुप क्रमांक ३५

### भरपाई देण्यात कसूर केल्यावरून कारावासाचे वॉरंट

(कलम २५० पहा)

...... येथील तुरुंगाचा अंमलदार अधिकारी यांस---

ज्याअर्थी, (नाव व वर्णन) .............. याने .............(आरोपी व्यक्तीचे नाव व वर्णन) याच्या विरुद्ध अशी फिर्याद दिली आहे की, ..........(थोडक्यात उल्लेख करावा) आणि उक्त ..........(नाव) विरुद्ध आरोप करण्यास वाजवी आधारकारण नव्हते या कारणावरुन ती फिर्याद काढून टाकण्यात आली असून, त्या आदेशाद्वारे (फिर्यादिदाराचे नाव) ............याने भरपाई म्हणून रु. ........... रक्कम द्यावी असा निवाडा करण्यात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त रक्कम भरण्यात आलेली नाही आणि .......... दिवसांच्या मुदतीकरता त्याला तुरुंगामध्ये साध्या कारावासात ठेवण्याचा आदेश देण्यात आला आहे (पूर्वोक्त रक्कम तत्पूर्वी भरण्यात आली तर गोष्ट अलाहिदा) ;

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम ३५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१८ डिसेंबर १९७८ रोजी व तेव्हापासून).

दुस ····· मनुष्य आणि भरण्यात आली नाही तर, या वॉरंटासह उक्त ····(नाव) याला ·र 'भारतीय दंड संहिते'च्या कलम ६९ च्या उपबंधाच्या अधीनतेने ·दतीकरता (कारावासाची मुदत) सुरक्षितपणे ठेवण्यासाठी आणि ·कळे करण्यासाठी याद्वारे तुम्हाला प्राधिकृत करण्यात व अंमलबजावणी कशारीतीने केली ते प्रमाणित करणाऱ्या

१९ ·········रोजी.

(सही)

---

प्रारुप क्रमांक ३६

**·सलेल्या व्यक्तीला अपराधाच्या आरोपास उत्तर देण्यासाठी न्यायालयात हजर करण्यास फर्माविणारा आदेश**

(कलम २६७ पहा)

········तुरुंगाचा अंमलदार अधिकारी यांस,—

ज्याअर्थी, उपरोक्त तुरुंगात सध्या बंदिवान/स्थानबद्ध असलेला ·········(कैद्याचे नाव) यांची हजेरी ·········(आरोप करण्यात आलेला अपराध थोडक्यात नमूद करावा) या आरोपास उत्तर देण्यासाठी किंवा ········· (कार्यवाहीचा तपशील थोडक्यात नमूद करावा) या कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ आवश्यक आहे;

म्हणून, उक्त आरोपास उत्तर देण्यासाठी किंवा उक्त कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ उक्त ········ यास दिनांक ······माहे······रोजी········म.पू.·········वाजता या न्यायालयासमोर कडेकोट व पक्क्या बंदोबस्तानिशी हजर करण्यास आणि या न्यायालयाने त्याची पुढील हजेरी अनावश्यक ठरवल्यानंतर त्याला कडेकोट व पक्क्या बंदोबस्तानिशी उक्त तुरुंगात परत नेण्यास तुम्हाला याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

आणि तसेच, उक्त ········यास या आदेशामधील मजकुराची माहिती देण्यास आणि त्याची सोबत जोडलेली प्रत त्याच्याकडे सुपूर्द करण्यास तुम्हाला फर्माविण्यात येत आहे.

आज, दिनांक ·········माहे······१९·········रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

प्रतिस्वाक्षरी

(मोहोर) (सही)

---

प्रारुप क्रमांक ३७

**तुरुंगात असलेल्या व्यक्तीला साक्ष देण्यासाठी न्यायालयात हजर करण्यास फर्माविणारा आदेश**

(कलम २६७ पहा)

···························येथील तुरुंगाचा अंमलदार अधिकारी यांस—

ज्याअर्थी, (आरोपीचे नाव) ···············, राहणार ···················याने अमुक अमुक (वेळ व ठिकाण यांसह अपराध थोडक्यात नमूद करावा) ············अपराध केला आहे अशी या न्यायालयाकडे फिर्याद देण्यात आली आहे आणि मला असे दिसते की, सध्या उपरोक्त तुरुंगात बंदिवान/स्थानबद्ध असलेला कैदी (कैद्याचे नाव) ··················· हा फिर्यादी-पक्षातर्फे/बचावपक्षातर्फे महत्वाचा पुरावा देण्याची शक्यता आहे;

म्हणून, सध्या न्यायालयापुढे प्रलंबित असलेल्या प्रकरणी साक्ष देण्यासाठी उक्त ·········· यास दिनांक ·············माहे ········१९·········रोजी म.पू. ·········वाजता या न्यायालयासमोर कडेकोट व पक्क्या बंदोबस्तानिशी हजर करण्यास आणि या न्यायालयाने त्याची पुढील हजरी अनावश्यक ठरवल्यानंतर त्याला कडेकोट व पक्क्या बंदोबस्तानिशी उक्त तुरुंगात परत नेण्यास तुम्हाला याद्वारे फर्माविण्यात येत आहे. आणि तसेच, उक्त ·············यास या आदेशामधील मजकुराची माहिती देण्यास आणि त्याची सोबत जोडलेली प्रत त्याला सुपूर्द करण्यास तुम्हाला फर्माविण्यात येत आहे.

आज, दिनांक·······माहे······१९·········रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

प्रतिस्वाक्षरी

(मोहोर) (सही)

### प्रारुप क्रमांक ३८

### अवमानाच्या विवक्षित प्रकरणी द्रव्यदंड लादण्यात येतो तेव्हा तुरुंगात रवानगी करण्याबाबतचे वॉरंट

(कलम ३४५ पहा)

························येथील तुरुंगाचा अंमलदार अधिकारी यांस—

ज्याअर्थी, आज रोजी माझ्यापुढे भरलेल्या न्यायालयात (अपराध्याचे नाव व वर्णन)········ याने न्यायालयाच्या उपस्थितीत (किंवा देखत) बुद्धिपुरस्सर न्यायालयाचा अवमान केला आहे ;

आणि ज्याअर्थी, अशा अवमानाबद्दल उक्त··············· (अपराध्याचे नाव) याने रु.··········· एवढा द्रव्यदंड भरावा आणि त्यात कसूर झाल्यास,············ मुदतीचा (महिन्यांचा किंवा दिवसांचा आकडा नमूद करावा) साधा कारावास भोगावा असे न्यायालयाकडून न्यायनिर्णीत करण्यात आले आहे ;

म्हणून, उक्त द्रव्यदंड लवकर भरण्यात आला नाही तर या वॉरंटासह उक्त············ (अपराध्याचे नाव) याला स्वतःच्या हवालातीत घेण्यासाठी आणि उक्त तुरुंगात त्याला············ उक्त मुदतीकरता (कारावासाची मुदत) सुरक्षितपणे ठेवण्यासाठी आणि तो द्रव्यदंड मिळताच ताबडतोब त्याला मोकळा करण्यासाठी तुम्हाला प्राधिकृत करण्यात व फर्मावण्यात येत आहे; हे वॉरंट, त्याची अंमलबजावणी कशा रीतीने केली ते प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह परत करण्यात यावे.

आज, दिनांक········माहे·······१९·······रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

### प्रारुप क्रमांक ३९

### उत्तर देण्यास किंवा दस्तऐवज हजर करण्यास नकार देणाऱ्या साक्षीदारास हवालातीत रवाना करण्याबाबत दंडाधिकाऱ्याचे किंवा न्यायाधीशाचे वॉरंट

(कलम ३४९ पहा)

(न्यायालयाच्या अधिकाऱ्याचे नाव आणि पदनाम)················यांस—

ज्याअर्थी,·············(नाव व वर्णन) यास साक्षीदार म्हणून समन्स देण्यात (किंवा या न्यायालयासमोर आणण्यात) आले असताना आणि आज रोजी अभिकथित अपराधाच्या चौकशीत साक्ष देण्यास त्याला सांगण्यात आले असताना, सदर अभिकथित अपराधासंबंधी त्याला विचारण्यात आलेल्या आणि यथोचितरीत्या नमूद करण्यात आलेल्या विवक्षित प्रश्नाला (किंवा विवक्षित प्रश्नांना) उत्तर देण्याचे त्याने नाकारले आहे अथवा कोणताही दस्तऐवज हजर करण्यास त्याला फर्मावण्यात आले असताना, असा दस्तऐवज हजर करण्याचे त्याने नाकारले आहे आणि अशा नकाराबद्दल त्याने कोणतीही रास्त सबब सांगितलेली नाही व त्याने नकार दिल्याबद्दल त्याला············· (न्यायनिर्णीत केलेली स्थानबद्धतेची मुदत) एवढ्या मुदतीकरिता हवालातीत स्थानबद्ध करण्याचा आदेश देण्यात आला आहे ;

म्हणून, उक्त ···········(नाव) यास ताब्यात घेऊन···············दिवसांच्या मुदती-करता त्याला आपल्या हवालातीत सुरक्षितपणे ठेवण्यास आणि जर त्याने दरम्यान आपली साक्षतपासणी करू देण्यास व त्याला विचारण्यात आलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यास, किंवा त्याच्याकडून मागवण्यात आलेला दस्तऐवज हजर करण्यास संमती दिली तर, उक्त मुदतीपैकी अखेरच्या दिवशी किंवा त्याची संमती कळल्यानंतर ताबडतोब, कायद्यानुसार कार्यवाही करण्यासाठी त्याला या न्यायालयासमोर आणण्यास तुम्हांला याद्वारे प्राधिकृत करण्यात व फर्मावण्यात येत आहे; हे वॉरंट, त्याची अंमलबजावणी कशा रीतीने केली ते प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह परत करण्यात यावे.

आज, दिनांक··········माहे··············१९····रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

### प्रारुप क्रमांक ४०

### मृत्यूच्या शिक्षादेशाखाली तुरुंगात रवानगी करण्यासंबंधीचे वॉरंट

(कलम ३६६ पहा)

··············येथील तुरुंगाचा अंमलदार अधिकारी यांस—

ज्याअर्थी, दिनांक········माहे············१९····रोजी माझ्यासमोर भरवण्यात आलेल्या सत्रात, १९·········च्या क्रमसूचीच्या प्रकरण क्रमांक·········मधील (पहिला, दुसरा किंवा, प्रकरणपरत्वे तिसरा) कैदी (कैद्याचे नाव)··········यास 'भारतीय दंड संहिते' च्या कलम···············खाली 'खून' या सदरात मोडणाऱ्या सदोष मनुष्यवधाच्या अपराधाबद्दल रीतसर सिद्धदोष ठरवण्यात आले असून त्याला मृत्यूची शिक्षा ठोठावण्यात आली आहे आणि······ येथील············न्यायालयाकडून कायम केला जाण्यावर तो शिक्षादेश अवलंबून आहे ;

म्हणून, उक्त (कैद्याचे नाव) ............ याला या वॉरंटासह स्वतःच्या हवालातीत घेऊन त्याला उक्त तुरुंगात ठेवण्यास आणि उक्त................न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी या न्यायालयाने काढलेले पुढील वॉरंट किंवा आदेश तुम्हांला मिळेपर्यंत त्याला तेथे सुरक्षितपणे ठेवण्यास याद्वारे तुम्हांला प्राधिकृत करण्यात आणि फर्माविण्यात येत आहे.

आज, दिनांक ........ माहे ............. १९ .... रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

प्रारूप क्रमांक ४१

**शिक्षादेश सौम्य केल्यानंतरचे वॉरंट**

[1][कलमे ३८६, ४१३ व ४१६ पहा]

............... येथील तुरुंगाचा अंमलदार अधिकारी यांस—

ज्याअर्थी, दिनांक ........ माहे ............. १९ .... रोजी भरवण्यात आलेल्या सत्रात १९ ..... च्या क्रमसूचीच्या प्रकरण क्रमांक ........ मधील (पहिला, दुसरा किंवा प्रकरणपरत्वे तिसरा) कैदी (कैद्याचे नाव) ............... 'भारतीय दंड संहिते' च्या कलम ....... खाली शिक्षापात्र असलेल्या ............ अपराधाबद्दल सिद्धदोष ठरवण्यात येऊन ......... शिक्षा देण्यात आली, आणि त्यानुसार त्याला तुमच्या हवालातीत सोपवण्यात आले आहे. आणि ज्याअर्थी; ............ येथील ............ न्यायालयाच्या आदेशाने (त्याची दुसरी प्रत यासोबत जोडण्यात आली आहे) उक्त शिक्षादेशाद्वारे न्यायनिर्णीत केलेली शिक्षा आजीव कारावासाच्या शिक्षेत परिवर्तित केली आहे ;

म्हणून, उक्त ............ (कैद्याचे नाव) याला उक्त आदेशाखालील आजीव कारावासाची शिक्षा त्याने भोगावी म्हणून तुमच्याकडून योग्य प्राधिकाऱ्याकडे त्याच्या हवालातीत सुपूर्द केले जाईपर्यंत त्याला उक्त तुरुंगात तुमच्या हवालातीत ठेवण्यास तुम्हांला याद्वारे प्राधिकृत करण्यात आणि फर्माविण्यात येत आहे.

किंवा

जर सौम्य केलेली शिक्षा म्हणजे कारावासाची शिक्षा असेल तर, "म्हणून" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "उक्त तुरुंगात तुमच्या हवालातीत ठेवण्यास" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर घालावा, "म्हणून, उक्त ............ (कैद्याचे नाव) याला उक्त तुरुंगात तुमच्या हवालातीत ठेवण्यास व तेथे उक्त आदेशाखालील कारावासाच्या शिक्षेची कायद्यानुसार अंमलबजावणी करण्यास".

आज, दिनांक ........ माहे ........... १९ .... रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

प्रारूप क्रमांक ४२

**मृत्यूच्या शिक्षादेशाच्या अंमलबजावणीचे वॉरंट**

[1][कलमे ४१३ व ४१४ पहा]

............... येथील तुरुंगाचा अंमलदार अधिकारी यांस—

ज्याअर्थी, दिनांक ........ माहे ........... १९ ...... रोजी माझ्यासमोर भरवण्यात आलेल्या सत्रात १९ ...... च्या क्रमसूचीच्या प्रकरण क्रमांक ....... मधील (पहिला, दुसरा किंवा, प्रकरण-परत्वे, तिसरा) कैदी (कैद्याचे नाव) ............ यास न्यायालयाच्या दिनांक ........ च्या वॉरंटाद्वारे मृत्यूच्या शिक्षादेशाखाली तुमच्या हवालातीत सोपवण्यात आले आहे; आणि ज्याअर्थी, उक्त शिक्षादेश कायम करणारा ............ येथील उच्च न्यायालयाचा आदेश या न्यायालयाला मिळालेला आहे;

म्हणून, ............ (फाशीची वेळ आणि जागा) उक्त ............ याला तो मरेपर्यंत फाशी देऊन उक्त शिक्षादेशाची अंमलबजावणी करण्यास आणि हे वॉरंट, शिक्षादेशाची अंमलबजावणी केली आहे असे प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह परत करण्यास तुम्हांला याद्वारे प्राधिकृत करण्यात आणि फर्माविण्यात येत आहे.

आज, दिनांक ...... माहे ............ १९ ...... रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम ३५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी तेव्हापासून).

### प्रारुप क्रमांक ४३

### जप्ती व विक्री यांद्वारे द्रव्यदंड वसूल करण्यासाठी वॉरंट

(कलम ४२१ पहा)

(पोलीस अधिकाऱ्याचे अथवा जी किंवा ज्या व्यक्ती वॉरंटाची अंमलबजावणी करणार आहे किंवा आहेत त्या अन्य व्यक्तीचे नाव किंवा व्यक्तींची नावे)..................................................यांस—

ज्याअर्थी,..........(अपराध्याचे नाव व वर्णन) यास दिनांक......माहे......१९......रोजी माझ्यासमोर............च्या अपराधाबद्दल (अपराधाचे थोडक्यात वर्णन करावे) सिद्धदोष ठरवण्यात आले आणि रु.......द्रव्यदंड भरण्याचा आदेश देण्यात आला; आणि ज्याअर्थी, उक्त....................(नाव) याला उक्त द्रव्यदंड भरण्यास फर्मावण्यात आले असतानाही त्याने तो किंवा त्याचा एखादा अंश भरलेला नाही;

म्हणून,.............जिल्ह्यात आढळून येईल अशी कोणतीही उक्त (नाव)....................याच्या मालकीची कोणतीही जंगम संपत्ती जप्त करण्यास, आणि अशा जप्तीच्या लगतनंतर..................(किती दिवसांची किंवा तासांची मुदत देण्यात आली ते नमूद करावे) मुदतीच्या आत जर उक्त रक्कम भरण्यात आली नाही तर (किंवा ताबडतोब), जप्त केलेल्या जंगम संपत्तीची किंवा उक्त द्रव्यदंड भागवण्यास पुरेसा असेल अशा तिच्या भागाची विक्री करण्यास याद्वारे तुम्हाला प्राधिकृत करण्यात व फर्माविण्यात येत आहे आणि वॉरंटाच्या अंमलबजावणीनंतर ताबडतोब ते, त्याखाली तुम्ही काय केले ते प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह परत करण्यात यावे.

आज, दिनांक..................माहे......१९......रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

### प्रारुप क्रमांक ४४

### द्रव्यदंडाच्या वसुलीसाठी वॉरंट

(कलम ४२१ पहा)

जिल्हाधिकारी,....................जिल्हा यांस—

ज्याअर्थी,........................(अपराध्याचे नाव, पत्ता व वर्णन) यास दिनांक..........माहे........१९...रोजी.............च्या अपराधाबद्दल (अपराध थोडक्यात नमूद करावा) माझ्यासमोर सिद्धदोष ठरवण्यात आले व रु. .............इतका द्रव्यदंड भरण्याचा शिक्षादेश देण्यात आला; आणि

ज्याअर्थी, उक्त...............(नाव) यास उक्त द्रव्यदंड भरण्यास फर्मावण्यात आलेले असतानाही त्याने तो किंवा त्याचा एखादा अंश भरलेला नाही;

म्हणून, उक्त (नाव)......................याच्या जंगम किंवा स्थावर किंवा दोन्ही संपत्तीमधून उक्त द्रव्यदंडाची रक्कम जमीन-महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यास आणि या आदेशाच्या अनुपालनार्थ तुम्ही काय केले ते प्रमाणित करून कळवण्यास तुम्हांला याद्वारे प्राधिकृत करण्यात आणि फर्माविण्यात येत आहे.

आज, दिनांक.........माहे..........१९.....रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

### [1][प्रारुप क्रमांक ४४क

### सुटका करण्यात आलेला अपराधी द्रव्यदंड वसूल होईपर्यंत उपस्थित राहण्यासाठी बंधपत्र

[कलम ४२४(१) (ख) पहा]

ज्याअर्थी, मी (नाव) ....................................राहणार (ठिकाण)....................यांस रुपये..........इतका द्रव्यदंड भरण्याचा व द्रव्यदंड भरण्यात कसूर केल्यास.........इतक्या मुदतीचा कारावास भोगण्याचा शिक्षादेश देण्यात आला आहे; आणि

---

१. १९७८ चा अधिनियम ४५, कलम ३५ द्वारे समाविष्ट केले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

ज्याअर्थी, न्यायालयाने, पुढील दिनांकी (किंवा दिनांकांना) उपस्थित राहण्यासाठी मी पुढीलप्रमाणे बंधपत्र करून देण्याच्या शर्तीवर माझी सुटका करण्याचा आदेश दिलेला आहे :—

म्हणून, मी याद्वारे, पुढील दिनांकी किंवा दिनांकांना म्हणजेच ········ रोजी ········ वाजता येथील न्यायालयासमोर उपस्थित राहण्यासाठी स्वतःला बांधून घेत आहे आणि यात कसूर झाल्यास रुपये ········ इतकी रक्कम गमवावी लागून ती सरकारजमा केली जाण्यास मी स्वतःला बांधून घेत आहे.

आज, दिनांक ······ माहे ······ १९ ···· रोजी.

(सही)

**जामीनदारांसह बंधपत्र करून द्यावयाचे असेल त्या बाबतीत पुढील मजकुराची भर घालावी**

उपर्युक्त (नाव) ························ हा पुढील दिनांकी (किंवा दिनांकांना) म्हणजेच, ········ रोजी ········ च्या न्यायालयासमोर उपस्थित होईल याबद्दल आम्ही याद्वारे स्वतःला त्याचे जामीनदार म्हणून घोषित करीत आहोत आणि त्यात त्याने कसूर केल्यास रुपये ······ ची रक्कम गमावली जाऊन सरकारजमा केली जाण्यास आम्ही स्वतःला संयुक्तपणे व अलगअलगपणे बांधून घेत आहोत.

(सही)

---

**प्रारुप क्रमांक ४५**

**पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्यापुढे किंवा न्यायालयापुढे हजर होण्यासाठी बंधपत्र आणि जामीनखत**

(कलमे ४३६, ४३७, ४३८ (३) आणि ४४१ पहा)

मी, ······················ (नाव) राहणार ························ (ठिकाण) यास ················ येथील पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याने ········ च्या अपराधाच्या दोषारोपावरून वॉरंटाविना अटक केली असून किंवा स्थानबद्ध केले असून (किंवा ··················· च्या न्यायालयासमोर आणले असून), अशा दोषारोपासंबंधात ज्या ज्या दिवशी कोणतेही अन्वेषण किंवा संपरीक्षा करण्यात येईल त्या प्रत्येक दिवशी मला अशा अधिकाऱ्यासमोर किंवा न्यायालयासमोर हजर राहावे लागेल अशा शर्तीवर मला अशा अधिकाऱ्यापुढील किंवा न्यायालयापुढील हजेरीबद्दल जामीन देण्यास फर्माविण्यात आले आहे, आणि यात मी कसूर केल्यास रुपये ········· इतकी रक्कम गमवावी लागून ती सरकारजमा केली जाण्यास स्वतःला बांधून घेत आहे.

आज, दिनांक ······· माहे ········ १९ ···· रोजी. (सही)

उपर्युक्त (नाव) ················· हा ज्या ज्या दिवशी या दोषारोपासंबंधी ···· कोणतेही अन्वेषण करण्यात येईल किंवा अशा दोषारोपावरून संपरीक्षा करण्यात येईल त्या प्रत्येक दिवशी ·········... येथील पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्यासमोर किंवा ··········· येथील न्यायालयासमोर हजर होईल, तसेच अशा अन्वेषणाच्या प्रयोजनार्थ किंवा (प्रकरणपरत्वे) त्याच्या विरुद्ध असलेल्या दोषारोपाला उत्तर देण्यासाठी तो अशा अधिकाऱ्यासमोर किंवा न्यायालयासमोर येईल व उपस्थित राहील याबद्दल त्याचा जामीनदार म्हणून मी याद्वारे स्वतःला घोषित करत आहे (किंवा आम्ही स्वतःला संयुक्तपणे व आमच्यापैकी प्रत्येकाला अलगअलगपणे घोषित करत आहोत), आणि यात त्याने कसूर केल्यास रुपये ··········· इतकी रक्कम मला (किंवा आम्हांला) गमवावी लागून ती सरकारजमा केली जाण्यास मी याद्वारे स्वतःला बांधून घेत आहे (किंवा आम्ही याद्वारे स्वतःला बांधून घेत आहोत).

आज, दिनांक ······ माहे ······ १९ ······ रोजी. (सही)

---

**प्रारुप क्रमांक ४६**

**जामीन देण्यास चुकल्याबद्दल कारागृहात टाकलेल्या व्यक्तीला मुक्त करण्याचे वॉरंट**

(कलम ४४२ पहा)

··················· येथील तुरुंगाचा अंमलदार अधिकारी, (किंवा ती व्यक्ती ज्याच्या हवालातीत आहे असा अन्य अधिकारी) यांस—

ज्याअर्थी, या न्यायालयाच्या दिनांक ····· माहे ········ १९ ···· च्या वॉरंटाखाली ···· ··············· (कैद्याचे नाव व वर्णन) यास तुमच्या हवालातीत सोपवलेले आहे, आणि त्याने त्याच्या जामीनदारासह (किंवा जामीनदारांसह) 'फौजदारी प्रक्रिया संहिते' च्या कलम ४४१ खाली एक बंधपत्र रीतसर करून दिलेले आहे;

म्हणून अन्य कोणत्याही कारणास्तव स्थानबद्ध करण्यास तो पात्र नसेल तर, त्याला तात्काळ तुमच्या हवालातीतून मुक्त करण्यास तुम्हाला याद्वारे प्राधिकृत करण्यात व फर्माविण्यात येत आहे.

आज, दिनांक ········· माहे ········· १९ ······· रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

[1][प्राख्प क्रमांक ४७

**बंधपत्राची अंमलबजावणी करण्यासाठी जप्तीचे वॉरंट**

(कलम ४४६ पहा)

··············· येथील पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकारी, यांस,—

ज्याअर्थी, ······································ (व्यक्तीचे नाव, वर्णन व पत्ता) हा आपल्या मुचलक्यास अनुसरून ··················· (प्रसंग नमूद करावा) च्या वेळी उपस्थित राहण्यास चुकलेला आहे आणि त्याने या कसुरीबद्दल रुपये ········ (बंधपत्रातील दंड) इतकी रक्कम गमावली असून ती सरकारजमा होण्यास पात्र झाली आहे ; आणि ज्याअर्थी, उक्त ····· ··········· (व्यक्तीचे नाव) हा, त्याला रीतसर नोटीस मिळाल्यानंतरही उक्त रक्कम भरण्यास किंवा त्याला रक्कम भरण्याची सक्ती का करण्यात येऊ नये याचे कोणतेही पुरेसे कारण दाखवण्यास चुकलेला आहे ;

म्हणून, उक्त ················ (नाव) याची ············· जिल्ह्यात तुम्हाला सापडेल अशी कोणतीही जंगम संपत्ती तिचे अभिग्रहण करुन व ती अडकवून ठेवून जप्त करण्यास आणि जर उक्त रक्कम ······ दिवसांच्या आंत भरण्यास आली नाही तर, अशा रीतीने जप्त केलेल्या संपत्तीची किंवा पूर्वोक्त रक्कम वसूल करण्यास पुरेसा होईल अशा तिच्या भागाची विक्री करण्यास तुम्हाला याद्वारे प्राधिकृत करण्यात व फर्माविण्यात येत आहे. अंमलबजावणी केल्यानंतर ताबडतोब हे वॉरंट, त्याखाली तुम्ही काय केले त्याबद्दलच्या प्रतिवेदनासह परत करण्यात यावे.

आज, दिनांक ········· माहे ·········· १९ ······· रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

प्राख्प क्रमांक ४८

**बंधापत्राच्या भंगाबद्दल जामीनदारास नोटीस**

(कलम ४६६ पहा)

······························ (नाव),

(राहणार) ······························ यांस,—

ज्याअर्थी, (नाव) ··················· (राहणार) ···················· याने दिनांक ··· माहे ······· १९ ···· रोजी या न्यायालयासमोर उपस्थित व्हावे म्हणून तुम्ही दिनांक ······· माहे ········ १९ ···· रोजी त्याला जामीन राहिला होता आणि त्यात कसूर झाल्यास रु. ················ ची रक्कम गमवावी लागून सरकारजमा केली जाण्यास स्वतःला बांधून घेतले होते ; आणि ज्याअर्थी, उक्त (नाव) ················ या न्यायालयासमोर उपस्थित होण्यास चुकलेला आहे व अशा कसुरीमुळे तुम्ही रु. ·········· ची पूर्वोक्त रक्कम गमावली असून तो सरकारजमा होण्यास पात्र आहे ;

म्हणून, तुम्हाला याद्वारे, या दिनांकापासून ········ दिवसांच्या आत उक्त दंड भरण्यास किंवा उक्त रक्कम भरण्याची सक्ती तुमच्यावर का करण्यात येऊ नये याचे कारण त्या मदतीच्या आत दाखल ण्यास फर्माविण्यात येत आहे.

आज, दिनांक ········· माहे ·········· १९ ···· रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

१. १९७८ चा अधिनियम ४५ कलम ३५, द्वारे नमुना क्रमांक ४७ ते नमुना क्रमांक ५६ पर्यंतचे जादा नमुने समाविष्ट केले (१८ डिसेंबर, १९७८ रोजी व तेव्हापासून).

### प्रारुप क्रमांक ४९

### चांगल्या वागणुकीबद्दलचे बंधपत्र दंडपात्र झाल्याबद्दल जामीनदारास नोटीस

(कलम ४४६ पहा)

.................... (नाव),

(राहणार) .................... यांस,—

ज्याअर्थी, (नाव) .................... (राहणार) .............. कालावधीमध्ये चांगला वागेल यासाठी तुम्ही दिनांक ...... माहे .......... १९.... रोजी त्याला जामीन राहिला होता आणि त्यात कसूर झाल्यास रु. .......... ची रक्कम गमावली जाऊन ती सरकारजमा केली जाण्यास स्वतःला बांधून घेतले होते ; आणि ज्याअर्थी, तुम्ही अशा रीतीने जामीन राहिल्यानंतर करण्यात आलेल्या .................... (अपराध थोडक्यात नमूद करावा) अपराधाबद्दल उक्त (नाव) .................... यास सिद्धदोष ठरविण्यात आले आहे व त्यामुळे तुमचे जामीनखत दंडपात्र झाले आहे ;

म्हणून, तुम्हाला याद्वारे, .......... दिवसांच्या आत रु. ......... चा उक्त दंड भरण्यास किंवा तो दंड का भरण्यात येऊ नये याचे कारण ........ दिवसांच्या आत दाखवण्यास फर्माविण्यात येत आहे.

आज, दिनांक ....... माहे .......... १९..... रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

### प्रारुप क्रमांक ५०

### जामीनदाराविरुद्ध जप्तीचे वॉरंट

(कलम ४४६ पहा)

...................... (नाव),

(राहणार) ................ यांस,—

ज्याअर्थी, .......... (नाव, वर्णन व पत्ता) याने (बंधपत्राची शर्त नमूद करावी) ...... च्या उपस्थितीसाठी स्वतःस जामीनदार म्हणून बांधून घेतलेले आहे आणि उक्त ........ याने त्यात कसूर केली आहे व त्यायोगे रु. .......... इतकी रक्कम (बंधपत्रातील दंड) सरकारजमा होण्यास पात्र झाली आहे ;

म्हणून, उक्त .......... (नाव) याची .......... जिल्ह्यात तुम्हाला सापडेल अशी कोणतीही जंगम संपत्ती तिचे अभिग्रहण करून व ती अडकवून ठेऊन जप्त करण्यास आणि जर उक्त रक्कम ........ दिवसांच्या आत भरण्यात आली नाही तर, अशा रीतीने जप्त केलेल्या संपत्तीची किंवा पूर्वोक्त रक्कम वसूल करण्यास पुरेसा होईल अशा तिच्या भागाची विक्री करण्यास तुम्हाला याद्वारे प्राधिकृत करण्यात व फर्माविण्यात येत आहे. अंमलबजावणी केल्यानंतर तावडतोब हे वॉरंट, याखाली तुम्ही काय केले त्याबद्दलच्या प्रतिवेदनासह परत करण्यात यावे.

आज, दिनांक ........ माहे .......... १९.... रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

### प्रारुप क्रमांक ५१

### जामिनादेश देण्यात आलेल्या आरोपी व्यक्तीच्या जामीनदारास तुरुंगात रवाना करण्याबाबतचे वॉरंट

(कलम ४४६ पहा)

.......... येथील दिवाणी तुरुंगाचा अधीक्षक (किंवा तुरुंगरक्षक), यांस,—

ज्याअर्थी, .......... (जामीनदाराचे नाव व वर्णन) याने (बंधपत्राची शर्त नमूद करावी) .......... च्या उपस्थितीसाठी स्वतःस जामीनदार म्हणून बांधून घेतलेले आहे आणि उक्त ..... याने त्यात कसूर केली आहे व त्यायोगे उक्त बंधपत्रामध्ये उल्लेखिलेली दंडाची रक्कम गमावली जाऊन सरकारजमा होण्यास पात्र झाली आहे; आणि ज्याअर्थी, उक्त ........ (जामीनदाराचे नाव) त्याला योग्य ती नोटीस मिळाल्यानंतरही उक्त रक्कम भरण्यास किंवा रक्कम भरण्याची सक्ती त्याला का करण्यात येऊ नये याचे कोणतेही पुरेसे कारण दाखवण्यास चुकला आहे व त्याची जंगम संपत्ती जप्त करून व तिची विक्री करून ती रक्कम वसूल करणे शक्य नाही आणि त्याला ...... (कालावधी विनिर्दिष्ट करावा) पर्यंत दिवाणी तुरुंगामध्ये कारावासात ठेवण्याचा आदेश काढण्यात आलेला आहे ;

म्हणून, उक्त······(नाव) याला या वॉरंटासह आपल्या हवालातीत घेऊन त्याला उक्त तुरुंगामध्ये उक्त······(कारावासाची मुदत) पर्यंत सुरक्षितपणे ठेवण्यास तुम्हांस (म्हणजेच) उक्त अधीक्षकास (किंवा तुरुंगरक्षकास) याद्वारे प्राधिकृत करण्यात व फर्माविण्यात येत आहे आणि हे वॉरंट त्याची अंमलबजावणी कशा रीतीने केली ते प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह परत करण्यात यावे.

आज, दिनांक····माहे····१९····रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

प्रारुप क्रमांक ५२

**शांतता राखण्यासाठी करून दिलेले बंधपत्र दंडपात्र झाल्याबद्दल प्रकर्त्याला नोटीस**

(कलम ४४६ पहा)

(नाव, वर्णन व पत्ता)·····················यांस,—

ज्याअर्थी, दिनांक······माहे······१९······रोजी तुम्ही········इ. (बंधपत्रात असल्याप्रमाणे) न करण्याचे बंधपत्र करून दिले होते आणि हे बंधपत्र दंडपात्र झाल्याचा पुरावा माझ्यासमोर देण्यात आला आहे व तो रीतसर नोंदवण्यात आला आहे;

म्हणून, तुम्हाला याद्वारे·····दिवसांच्या आत रु.······इतका दंड भरण्यास किंवा तो भरण्याची सक्ती तुमच्यावर का करण्यात येऊ नये याचे कारण त्या मुदतीच्या आत माझ्यासमोर दाखवण्यास फर्माविण्यात येत आहे.

आज, दिनांक·······माहे········१९····रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

प्रारुप क्रमांक ५३

**शांतता राखण्यासाठी करून दिलेल्या बंधपत्राच्या भंगाबद्दल प्रकर्त्याची संपत्ती जप्त करण्याचे वॉरंट**

(कलम ४४६ पहा)

·············(पोलीस अधिकाऱ्याचे नाव व पदनाम),

·············पोलीस ठाणे, यांस·······

ज्याअर्थी,······(नाव व वर्णन) याने दिनांक······माहे·······१९·······रोजी शांततेचा भंग इ. (बंधपत्रात असल्याप्रमाणे) न करण्याचे बंधन स्वतःवर घालणारे रु.......इतक्या रकमेचे बंधपत्र करून दिले होते व उक्त बंधपत्र दंडपात्र झाल्याचा पुरावा माझ्यासमोर देण्यात आला आहे व तो रीतसर नोंदविण्यात आला आहे; आणि ज्याअर्थी, उक्त......(नाव) याला, उक्त रक्कम का भरण्यात येऊ नये याचे कारण दाखवण्यास फर्मावणारी नोटीस देण्यात आली आहे व तो तसे करण्यास किंवा उक्त रक्कम भरण्यास चुकलेला आहे;

म्हणून, उक्त······(नाव) याच्या मालकीची····जिल्ह्यात तुम्हाला आढळलेली अशी जंगम संपत्ती तिचे अभिग्रहण करून जप्त करण्यास व जर उक्त रक्कम ···च्या आत भरण्यात आली नाही तर, अशा रीतीने जप्त केलेल्या संपत्तीची किंवा पूर्वोक्त रक्कम वसूल करण्यास पुरेसा होईल अशा तिच्या भागाची विक्री करण्यास तुम्हाला याद्वारे प्राधिकृत करण्यात आणि फर्माविण्यात येत आहे. अंमलबजावणी केल्यानंतर ताबडतोब हे वॉरंट, त्याखाली तुम्ही काय केले त्याबद्दलच्या प्रतिवेदनासह परत करण्यात यावे.

आज, दिनांक······माहे·····१९······रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

---

प्रारुप क्रमांक ५४

**शांतता राखण्यासाठी करून दिलेल्या बंधपत्राच्या भंगाबद्दल कारावासाचे वॉरंट**

(कलम ४४६ पहा)

······ येथील दिवाणी तुरुंगाचा अधीक्षक (किंवा तुरुंगरक्षक), यांस—

ज्याअर्थी,······(नाव व वर्णन) याने शांतता राखण्यासाठी करून दिलेल्या बंधपत्राचा त्याने भंग केलेला आहे याबद्दलचा पुरावा माझ्यासमोर देण्यात आला आहे व त्यायोगे त्याने रु.········इतकी रक्कम गमावली असून ती सरकारजमा होण्यास पात्र झाली आहे; आणि ज्याअर्थी, उक्त ....(नाव) यास,

उक्त रक्कम भरण्यास किंवा उक्त रक्कम का भरण्यात येऊ नये यांबद्दलचे कारण दाखवण्यास रीतसर फर्मावण्यात आल्यानंतरही तो तसे करण्यास चुकलेला आहे, आणि त्याची जंगम संपत्ती जप्त करून त्याद्वारे उक्त रकमेचा भरणा करवून घेणे शक्य नाही, आणि उक्त ······(नाव) यास ········ कालावधीपर्यंत (कारावासाची मुदत) दिवाणी तुरुंगामध्ये कारावासात ठेवण्याचा आदेश काढण्यात आला आहे;

म्हणून, उक्त ······(नाव) याला या वॉरंटासह आपल्या हवालातीत घेऊन त्याला उक्त तुरुंगामध्ये उक्त ·········(कारावासाची मुदत) कालावधीपर्यंत सुरक्षितपणे ठेवण्यास तुम्हाला (म्हणजे) उक्त अधीक्षकास (किंवा तुरुंगरक्षकास) याद्वारे प्राधिकृत करून फर्माविण्यात येत आहे. हे वॉरंट, त्याची अंमलबजावणी कशा रीतीने केली ते प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह परत करण्यात यावे.

आज, दिनांक···········माहे··········१९········रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

### प्रारुप क्रमांक ५५

### चांगल्या वागणुकीसाठी करून दिलेले बंधपत्र दंडपात्र झाल्यानंतर जप्ती आणि विक्री करण्याचे वॉरंट

(कलम ४४६ पहा)

···········येथील पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकारी, यांस,—

ज्याअर्थी,·········(नाव, वर्णन व पत्ता) याने दिनांक·······माहे·····१९··· रोजी··········(प्रकर्त्याचे नाव, इ.) यांच्या चांगल्या वागणुकीसाठी रु.··········इतक्या रकमेच्या बंधपत्राद्वारे जामीन दिला होता आणि उक्त·······(नाव) याने ······चा अपराध केल्याचा पुरावा माझ्यासमोर देण्यात आलेला आहे व तो रीतसर नोंदवण्यात आलेला आहे; आणि ज्याअर्थी, उक्त·····(नाव) यास उक्त रक्कम का भरण्यात येऊ नये याबद्दलचे कारण दाखवण्यास फर्मावणारी नोटीस देण्यात आलेली आहे व तो तसे करण्यास किंवा उक्त रक्कम भरण्यास चुकलेला आहे;

म्हणून, उक्त·········(नाव) यांच्या मालकीची ·······जिल्ह्यात तुम्हांला सापडेल अशी जंगम संपत्ती तिचे अभिग्रहण करून जप्त करण्यास व जर उक्त रक्कम·····च्या आत भरण्यास आली नाही तर, अशा रीतीने जप्त केलेल्या संपत्तीची किंवा पूर्वोक्त रक्कम वसूल करण्यास पुरेसा होईल अशा तिच्या भागाची विक्री करण्यास तुम्हाला याद्वारे प्राधिकृत करण्यात आणि फर्माविण्यात येत आहे. अंमलबजावणी केल्यानंतर ताबडतोब हे वॉरंट, त्याखाली तुम्ही काय केले आहे त्याच्या प्रतिवेदनासह परत करण्यात यावे.

आज, दिनांक······माहे·······१९·····रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

### प्रारुप क्रमांक ५६

### चांगल्या वागणुकीसाठी करून दिलेले बंधपत्र दंडपात्र झाल्यानंतर कारावासाचे वॉरंट

(कलम ४४६ पहा)

········येथील दिवाणी तुरुंगाचा अधीक्षक (किंवा तुरुंगरक्षक), यांस—

ज्याअर्थी,·········(नाव, वर्णन व पत्ता) यांनी दिनांक·······माहे·······१९···· रोजी, ····(प्रकर्त्याचे नाव, इ.) यांच्या चांगल्या वागणुकीसाठी रु.······इतक्या रकमेच्या बंधपत्राद्वारे जामीन दिला होता आणि उक्त बंधपत्राच्या भंगाबद्दलचा पुरावा माझ्यासमोर देण्यात आला आहे व तो रीतसर नोंदण्यात आलेला आहे, आणि त्यायोगे उक्त ....(नाव) याने रु.······ इतकी रक्कम गमावली असून ती सरकारजमा होण्यास पात्र झाली आहे; आणि ज्याअर्थी, त्यास उक्त रक्कम भरण्यास किंवा उक्त रक्कम का भरण्यात येऊ नये याचे कारण दाखवण्यास रीतसर फर्मावण्यात आल्यानंतरही तो तसे करण्यास चुकलेला आहे आणि त्याची जंगम संपत्ती जप्त करून त्याद्वारे उक्त रकमेचा भरणा करवून घेणे शक्य नाही, आणि उक्त·····(नाव) यास·······कालावधी पर्यंत (कारावासाची मुदत) दिवाणी तुरुंगामध्ये कारावासात ठेवण्याचा आदेश काढण्यात आला आहे.

म्हणून, उक्त ········(नाव) याला या वॉरंटासह आपल्या हवालातीत घेऊन त्याला उक्त तुरुंगामध्ये उक्त···(कारावासाची मुदत) कालावधीपर्यंत सुरक्षितपणे ठेवण्यास तुम्हांस (म्हणजे) अधीक्षकास (किंवा तुरुंगरक्षकास) याद्वारे प्राधिकृत करण्यात आणि फर्माविण्यात येत आहे. हे वॉरंट त्याची अंमलबजावणी कशा रीतीने केली ते प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह परत करण्यात यावे.

आज, दिनांक·····माहे····१९·····रोजी.

(न्यायालयाची मोहोर) (सही)

# फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३

# THE CODE OF CRIMINAL PROCEDURE, 1973

## मराठी—इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| (—च्या) अखत्याराखालील | under one's charge | [क. ७३ (२)] |
| अटक चुकवणे | evade the arrest | [क. ४६ (२)] |
| अत्यावश्यक | essential | [क. ३०८ (१)] |
| अधिकथन | declaration | [क. ४३२ (५) (ख)] |
| अधिकरण | tribunal | [क. ४७५ (१) (ख)] |
| अधिकारकक्षा | competence | [क. १९० (२)] |
| अधिकारपूर्वक मागणे | require | [क. १२९ (२)] |
| अधिकारितेतील उणीव | defect of jurisdiction | [क. ४७० (१)] |
| अधिघोषित करणे | pronounce | [क. २१६ (१)] |
| अधिशून्य करणे | overrule | [क. ४०४] |
| अधिहरण करणे | confiscation | [क. ४५२] |
| अनुलिपि | transcript | [क. ३५३ (२)] |
| अनुल्लेख | omission | [क. २१५-उदा. (ख)] |
| अनुसार चालणे | abide by | [क. ३४४ (४)] |
| अन्वेषण | investigation | [क. २ (ज)] |
| अन्वेषण सुरू करणे | enter on an investigation | [क. १५७ (१) (ख)] |
| अपनयन | kidnapping | [क. ११० (घ)] |
| अपप्रवादात्मक | scandalous | [क. २९७ (३)] |
| अपप्रेरक | abettor | [क. ३०६ (१)] |
| अपप्रेरणा देणे | abet | [क. १०८ (१) (एक)] |
| अपराध | offence | [क. २ (ढ)] |
| अपराध करण्याचा उद्देश | criminal intent | [क. ३२०-तक्ता] |
| अपराधाची घटक तथ्ये | facts constituting an offence | [क. ३४५ (२)] |
| अपराधाची मिटवणूक | composition of an offence | [क. ३२० (८)] |
| अपराधीपणाची कबुली | plea of guilty | [क. २४१] |
| अपराधी म्हणून शिक्षापात्र ठरवणे | adjudge an offender to punishment | [क. ३४७] |
| अपसामान्यता | abnormality | [क. १२५ (१) (ग)] |
| अपहरण | abduction | [क. ११० (घ)] |
| अपहार | misappropriation | [क. ३२० (२)-तक्ता] |
| अपील अवसान पावणे | abatement of appeal | [क.३९४-स.टी.] |
| अपिल करण्यास विशेष अनुज्ञा | special leave to appeal | [क. ४१५ (३)] |
| अपीलकर्ता | appellant | [क. ३८३-स.टी.] |
| अपील न्यायालय | appellate court | [क. १०६ (४)] |
| अपीलयोग्य हुकूमनामा | appealable decree | [क. १९५ (३)] |
| अपील विनंतीअर्ज | petition of appeal | [क. ३८२-स.टी.] |
| अपीलाधीन आदेश किंवा शिक्षादेश | order or sentence under appeal | [क. ३८६ (ङ) दुसरे परंतुक] |
| अप्रकाशित अधिकृत अभिलेख | unpublished official records | [क. २९२ (३) (क)] |
| अप्रवर्ती | inoperative | [क. ३९५ (१)] |
| अप्रामाणिकपणे केलेला अपहार | dishonest misappropriation | [क. २१२ (२)] |
| अभिकथित अपराध | alleged offence | [क. २१३] |

**मराठी-इंग्रजी शब्दसूची—चालू**

| | | |
|---|---|---|
| अभिग्रहण | seizure | [क. १०२ (२)] |
| अभिग्रहण करणे | seize | [क. १०२-स.टी.] |
| अभिरक्षा | custody | [क. ४५१-स.टी.] |
| अराजादिष्ट अधिकारी | non-commissioned officer | [क. १३२ (३) (ख्)] |
| अलंघनीय आदेश | peremptory order | [दुसरी अनुसूची-नमुना क्र. २१] |
| अल्पवयीन अपराधी | youthful offender | [क. २७] |
| अवलंबून राहणे | abide | [क. ८३ (५)] |
| अवरुद्ध करणे | impound | [क. १०४] |
| अवलोकन करणे | peruse | [क. १४५ (४)] |
| अवैधपणे सोडवणे | rescue | [क. ६०] |
| (तसे) असल्याचे दिसणे | purport to be | [क. २९३ (१)] |
| अहवाल | report | [क. १४० (२)] |
| आगडोंब | conflagration | [क. १३३ (१) (ग्)] |
| आगळीक | mischief | [क. १०६ (२) (ख्)] |
| आत किंवा बाहेर | within or without | [क. १४१ (२)] |
| आदेशाला किंवा मागणीला मान देणे | submission to the order or requisition | [क. ३४८] |
| आदेशिका | process | [प्रकरण ६ वे शीर्षक] |
| आधारकारणे | grounds | [क. १६५ (१)] |
| आपसात मिटवणे | compounding | [क. ३२०-स.टी.] |
| आपसात मिटवण्यासारखा | compoundable | [क. ३२० (३)] |
| आयोगपत्र | commission | [क. १८९] |
| आयोगापत्राद्वारे तपासणी | examination on commission | [क. २७१] |
| आरोग्यविषयक किंवा विहारविषयक प्रयोजन | sanitary or recreative purpose | [क. १३३ (२) स्पष्टीकरण] |
| आरोप | accusation | [क. २३७ (३)] |
| आशंका वाटणे | apprehend | [क. १४४] |
| आशंकित संकट | apprehended danger | [क. १४४-स.टी.] |
| आळा घालणे | supress | [नमुना क्र. २०] |
| इच्छापूर्वक दुखापत करणे | voluntarily causing hurt | [क. ३००-उदा. (च्)] |
| इंडिया सिक्युरिटी प्रेस | India Security Press | [क. २९२ (१)] |
| (मृतदेह) उकरुन काढणे | disinter (the dead body) | [क. १७६ (३)] |
| उक्तीद्वारे किंवा कृतीद्वारे | by word or action | [क. ४६ (१)] |
| उघडउघड | manifestly | [क. १३१] |
| उदीम | trade | [क. १३३ (ख्)] |
| उद्घोषणा | proclamation | [क. ८२-स.टी] |
| उद्घोषित अपराधी | proclaimed offender | [क. ४० (१) (ख्)] |
| उपसर्ग पोचलेला | aggrieved | [क. १९८ (१)] |
| उपस्थित होऊन वादकथन करणे | appear and plead | [क. ३०१ (१)] |
| एकतर्फी | *ex-parte* | [क. १२६ (२)-परंतुक] |
| एखाद्याला कब्जात किंवा सत्तेखाली | in one's possession or power | [क. ३४९] |
| औचित्य | propriety | [क. ३९७ (१)] |
| अंमलबजावणी | 1. execution<br>2. enforcement | [प्रकरण ३२ वे-शीर्षक]<br>[क. १२८-स.टी.] |
| अंग खरचटणे | bruise | [क. १७४ (१)] |
| अंगभूत अधिकार | inherent power | [क. ४८२-स.टी.] |
| अंगुली मुद्रा केंद्र | finger print bureau | [क. २९३ (४) (ग्)] |
| कथनविरोध | contradiction | [क. १६२ (२) स्पष्टीकरण] |

| | | |
|---|---|---|
| कपटपूर्वक | fraudulently | [क.२१५-उदा. (क)] |
| कब्जा असणे | possess | [क. १४५ (४)] |
| कमाईसाठी जातीने काम करणे | personally work for gain | [क. ६९ (१)] |
| कक्षांतर्गत | *in camera* | [क २३७ (२)] |
| काढून घेणे | withdraw | [क. ४०९ (१)] |
| काढून टाकणे | 1. dismiss<br>2. strike out | [क. ४०६ (३)]<br>[क. २९७ (३)] |
| काम चालविणे | act | [क. ३०१ (२)] |
| कायदेविषयक मुद्दा | point of law | [क. २३४-परंतुक] |
| कायदेशीर रक्षणभार | lawful charge | [क. ९८] |
| कायदेशीर हवालात | lawful custody | [क. ४१ (१) (ङ)] |
| कायम | absolute | [क. १३३ (१)-शेवटचा परिच्छेद] |
| कायम करणे | 1. confirm<br>2. make absolute | [क. ३६६ (१)]<br>[क. १३८ (२)] |
| कायमीकरण | confirmation | [क. ४६४ (१)] |
| कारागृह | prison | [क. २६६ (ख)] |
| कार्यवाही | process | [क. ४८२] |
| कार्यवाही करणे | act | [क. ३२६ (१)] |
| केंद्रीय न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा | Central Forensic Science Laboratory | [क. २९३ (४) (ङ)] |
| कैफियतपत्र | written statement | [क. २३३ (२)] |
| क्रमवर्ती शिक्षा | consecutive sentences | [क. ३१ (२)] |
| क्रमसूची | Calendar | [दुसरी अनुसूची-नमुना क्र. ४२] |
| खटला चालविणे | conduct the prosecution | [क. ३०१ (२)] |
| खटला सुपूर्द करणे | commit a case | [क. ३२३-स. टी.] |
| खटल्याची जबाबदारी असलेली (व्यक्ती) | (person) in charge of case | [क. ३०१ (१)] |
| खटल्यातून अंग काढून घेणे | withdrawal from prosecution | [क. ३२१-स. टी.] |
| खबर | information | [क. ११३-परंतुक] |
| खारीज करणे | dismiss | [क. ३८४ स. टी.] |
| खबरी रिपोर्ट | first information report | [क. २०७ (दोन)] |
| खोटा साक्षीपुरावा तयार करणे | fabricate false evidence | [क. ३४४ (१)] |
| खंडन करणे | rebut | [क. २४५ (१)] |
| गिरफ्तार करणे | 1. apprehension<br>2. apprehend | [क. ४६० (घ)]<br>[क. ४१(१) (छ)] |
| गिरफ्तारी | apprehension | [क. ५८-स.टी.] |
| गुणदोषविषयक बचाव | defence on the merits | [क. ४६३ (१)] |
| गुन्हेगारी | criminal | [क. ३२०-तक्ता] |
| गुप्त राहणे | conceal oneself | [क. ४७० (४) (ख)] |
| गृह-अतिक्रमण | house-trespass | [क. ३९ (दहा)] |
| गैरकृत्य | wrongful act | [क. १०७ (१)] |
| गैरपणे परिरुद्ध करणे | wrongfully confine | [क. ९७-स. टी.] |
| गैरनियम कार्यवाही | irregular proceedings | [प्रकरण ३५ वे-शीर्षक] |
| गैरनियम बाबी | irregularities | [क. ४६०-स.टी.] |
| गौण | immaterial | [क. २१५-उदा. (घ)] |
| गौण अपराध | minor offence | [क. २२२ (१)] |

| | | |
|---|---|---|
| ग्राम-प्रमुख | headman of village | [क. ४० (२) (तीन) ] |
| ग्राह्य धरणे | admit | [क. ४६३ (१) ] |
| घटनास्थळ | spot | [क. १५७ (१) ] |
| घर किंवा घरवाडी | house or homestead | [क. ८२ (२) (एक) (ख्) ] |
| घरफोडी | house-breaking | [क. ४१ (१) (ख्)] |
| चालचर्या | demeanour | [क. २८०-स.टी.] |
| चालना-अर्ज | motion | [क. ४०६ (२)] |
| (—च्या) चालनेने | at the instance of | [क. ३९९ (३)] |
| चोरटे गृह अतिक्रमण | lurking house-trespass | [क. ३९ (१) (अकरा) ] |
| चोरी | theft | [क. ३९ (सहा) ] |
| चौकशी | inquiry | [क. २ (छ)] |
| जप्ती | attachment | [क. ८३-स.टी] |
| जप्ती-प्राधिलेख | writ of attachment | [क. ४६६] |
| जबर दुखापत | grievous hurt | [क.२११-उदा. (ख्)] |
| जबरी चोर | robber | [क. ४० (१) (ख्)] |
| जबानी | deposition | [क. ३६३ (५)] |
| जबानीदार | deponent | [क. २९१ (१)] |
| जबाब | statement | [क.२०७ (तीन) ] |
| जलद व स्वभावत: नाश पावणारी | subject to speedy and natural decay | [क. ८५ (१)] |
| जलमार्ग | channel | [क. १३७ (१) ] |
| जाणीव | notice | [क. २१३] |
| जातमुचलका | 1. own bond | [क. ५९] |
| | 2. recognizance | [क. ३६० (८) ] |
| जातीने हजर राहणे | attend | [क. १०५ (२) (ग्) ] |
| जामीन | security | [क. ७१-स. टी. ] |
| जामीनदार देणे | provision of sureties | [क. ११६ (३)-परंतुक (ख्) ] |
| जामीनदारांची दायित्वमुक्तता | discharge of sureties | [क. ४४४-स. टी.] |
| जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना | with or without sureties | [क. १०७ (१) ] |
| जामीन देणे | find security | [दुसरी अनुसूची नमुना-क्र. १५] |
| जामीनपात्र अपराध | bailable offence | [क. २ (क्) ] |
| जामीन मंजूर करणे | grant bail | [क. ७८ (२)] |
| जामिनादेश देणे | admit to bail | [क. ५१ (१)] |
| जारकर्म | adultery | [क. २२०-उदा. (ख्)] |
| झडतीचे काम चालविणे | conduct a search | [क. १६५ (२)] |
| झडती-वॉरंट | search-warrant | [क. १०५ (घ्)] |
| ठकवणूक | cheating | [क. ११० (घ) ] |
| ठग | thug | [क. ४० (१) (ख्) ] |
| ठराव करणे | make arrangement | [क. २८५ (३) ] |
| तक्ता | table | [क. ३२० (३) ] |
| (एखाद्या व्यक्तीविरुद्ध) तथ्य शाबीत करणे | make out a case (against one) | [क. २४५ (१)] |
| तथ्याबाबत संपरीक्षा करणे | try the fact | [क. ३२९ (१)] |
| तपासणी | examination | [क.१३९-स.टी.] |
| तहकुबी | adjournment | [क. २८९-स.टी.] |
| ताबाधारक | occupant | [क. १०० (६)] |

| | | |
|---|---|---|
| तीव्र व आकस्मिक प्रक्षोभन | grave and sudden provocation | [क. २२२-उदा. (ख)] |
| तुरुंग | jail | [क.२६६ (ख) (एक)] |
| तुरुंगरक्षक | Keeper (of jail) | [दुसरी अनुसूची-नमुना क्र.५१] |
| (एखाद्या व्यक्तीला) तुरुंगात परत पाठवणे | remand (a person) to prison | [क.१२३ (७)] |
| तुरुंगाधिकारी | Jailor | [क.४२०] |
| तोंडी किंवा कागदोपत्री पुरावा | evidence, oral or documentary | [क.१७३ (८)] |
| तोंडी सांगितलेला मजकूर | dictation | [क. २७४(१) -परंतुक] |
| त्रास | annoyance | [क.१४४(१)] |
| त्रोटक निवेदन | brief statement | [क.२६४] |
| थिल्लरपणाचा | frivolous | [क.४०६ (३)] |
| दरवडा | dacoity | [क.३९ (सात)] |
| दखलगिरी | cognizance | [दुसरी अनुसूची-नमुना क्र.३२] |
| दखलपात्र अपराध | cognizable offence | [क.२ (ग)] |
| दखलपात्र प्रकरण | cognizable case | [क.२ (ग)] |
| दंगल | affray | [क.१४४(१)] |
| दंडक | requirement | [क.३०५ (३)] |
| दंडाधिकाऱ्याचे न्यायालय | Court of Magistrate | [क. २३७(१)] |
| दालन | apartment | [क.४७ (२)-परंतु क] |
| दुभाषी | interpreter | [क.२८२-स.टी.] |
| दु:साहसी | desperate | [क.११० (छ)] |
| दृश्यप्रतिरूपण | visible representation | [क.९५ (२) (ख)] |
| दृश्यमान कारण | apparent cause | [क.१७४ (१)] |
| दिवाणी तुरुंग | civil jail | [क.४१७ (२)] |
| (---च्या) दिमतीला | at the disposal of | [क.८५ (२)] |
| देश | the State | [क.३९ (१) (एक)] |
| देह | person | [क.१९८ (३)] |
| देहान्ताची शिक्षा | capital sentence | [क.४१६-स.टी.] |
| देहान्ताच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध | capital offence | [क.२२०-उदा. (च)] |
| दैवी प्रकोप | divine displeasure | [क.३२० (१)-तक्ता] |
| दोन प्रतिलिप्यांमध्ये | in duplicate | [क.६१] |
| दोषमुक्ति | acquittal | [क.२३२-स.टी.] |
| दोषमुक्तीचा न्यायनिर्णय | judgement of acquittal | [क.३०८ (५)] |
| दोषसिद्धी | conviction | [क.१०६-स.टी.] |
| दोषारोप | charge | [क.२ (ख)] |
| दोषारोपाबाबत अपराधीपणाची कबुली देणे | plead guilty to the charge | [क.२०६ (१)] |
| दोषारोपाचे संयोजन | joinder of charges | [कलमे २१८ ते २२४-शीर्षक] |
| नकला | copies | [क.४५५ (१)] |
| नकली नाणे | counterfeit coin | [क. २१५-उदा. (क)] |
| नकाराचा हेका चालू ठेवणे | persist in one's refusal | [क.३४९] |
| नाशाबिती | disproof | [क.३१५ (१)] |
| नाशाबीत करणे | disprove | [क.५४] |
| निकटवर्ती संकट | imminent danger | [क.१४२ (१)] |
| निकोप मनाचा | of sound mind | [क.३३३-स.टी.] |

| | | |
|---|---|---|
| निगम | corporation | [क.३०५-स.टी.] |
| निगम-निकाय | body corporate | [क.३०५(१)] |
| निगमित कंपनी | incorporated company | [क.३०५(१)] |
| निदर्शनास आणून देणे | make to appear | [क.२१०(१)] |
| (-मध्ये) निबध्द | concerned (in) | [क.३०६(१)] |
| नियंत्रक, मुद्रांक व लेखनसामग्री | Controller of Stamps and Stationery | [क.२९२(१)] |
| नियमानुसारिता | regularity | [क.३९७(१)] |
| नियुक्ती | appointment | [क.९-स्पष्टीकरण] |
| निरस्त करणे | quash | [क.४६४(२) (ख)] |
| निरीक्षण अधिकारी | inspection officer | [क.३३९ (२)] |
| निरुद्ध करणे | restrain | [क. ३२०-तक्ता] |
| निर्देशन | reference | [क.१२२ (४)] |
| निर्दोष खरेदीदार | innocent purchaser | [क. ४५३-स.टी.] |
| निर्बंध घालणे | restraint | [क.१७१-स. टी.] |
| निर्बुद्ध | idiot | [क.१९८ (१)-परंतुक (क)] |
| निर्णय | finding | [क.३५१] |
| निलंबन | suspension | [प्रकरण ३२ वे-शीर्षक] |
| निवारण करणे | obviate | [क. १४२ (१)] |
| निवेदन | statement | [क.२६७(३)] |
| निशाणी | exhibit | [क.१८९] |
| निष्कर्ष | finding | [क.२६३-(ज)] |
| निष्कारण अटक करणे | arrest groundlessly | [क.३५८-स.टी.] |
| निष्कासित करणे | evict | [क.१४५(६)] |
| नुकसानी | damages | [क.३५७ (१) (ग)] |
| नेमून देणे | assign | [क.३०४(१)] |
| नोंदीव वैद्यक व्यवसायी | registered medical practitioner | [क. ५३(१)] |
| नोंदीव सोसायटी | registered society | [क.३०५-स. टी.] |
| न्यायनिर्णय | sentence | [क.१९५(४)] |
| न्याय निष्फळ होणे | failure of justice | [क.४६२] |
| न्याय होऊ न शकणे | failure of justice | [क. २१५] |
| न्यायालयाकडे विनंतीअर्ज करणे | move the court. | [क. ३२१-शेवटचा परिच्छेद] |
| न्यायिक अधिकारी | judicial office | [क.१८९] |
| न्यायिक कार्यवाही | judicial proceeding | [क. २ (झ)] |
| न्याय्य किंवा कायदेशीर आधारकारण | just or lawful ground | [क. २२०-उदा.(च)] |
| न्याय्य व निःपक्षपाती चौकशी | fair and impartial inquiry | [क.४०७ (१) (क)] |
| न्यूनकारी | in derogation of | [क. १४५ (१०)] |
| पथक | unit | [क.४७५ (१) (क)] |
| पदस्थापन | posting | [क.९-स्पष्टीकरण] |
| पदीय-पूर्वाधिकारी | predecessor-in-office | [क.१४४(५)] |
| परगमन | adultery | [क.२११-उदाहरण (ग)] |
| परत मागवणे | recall | [क.४०९ (१)] |
| परिवर्तित करून सौम्य करणे | commute | [क.४१६] |
| परिवाहक | carrier | [क.२२२-उदा. (क)] |
| परिवीक्षाकाळात चांगले वर्तन ठेवण्याच्या शर्तीवर | on probation of good conduct | [क.३६०-स.टी.] |

मराठी–इंग्रजी शब्दसूची—चालू

| | | |
|---|---|---|
| परिरुद्ध करणे | confine | [क. ४६ (१)] |
| परिप्रश्न | interrogatories | [क. २८७ (१)] |
| परीक्षण करणे | examine | [क. ३९७ (१)] |
| पहिल्या वेळचा अपराधी | first offender | [क. ३६० (१)-परंतुक] |
| पळून गेलेला सिद्धदोष अपराधी | escaped convict | [क. ४२६-स.टी.] |
| पागलखाना | lunatic asylum | [क. ३३०-परंतुक] |
| पांगवणे | disperse | [क. १२९स.टी.] |
| पीठासीन न्यायाधीश | presiding judge | [क. २७६ (१)] |
| पुढे रवाना करणे | transmission | [क. २८५ (३)] |
| पुनरीक्षणाच्या शक्ती | powers of revision | [क. १०४ (४)] |
| पुरावा दाखल करणे | adduce an evidence | [क. १२१ (२)] |
| पुराव्यात दाखल करून घेणे | receive as evidence | [क. १८९] |
| पुराव्यादाखल मांडणे | put in evidence | [क. ३१३ (४)] |
| पुन्हा समन्स पाठवणे | re-summon | [क. २१७ (क)] |
| पेहेरावयाचे कपडे | wearing-apparel | [क. ५१ (१)] |
| पेटी ऑफीसर | petty officer | [क. १३२ (३) (ख)] |
| पोलीस ठाणे | police station | [क. २ (घ)] |
| पोलीस अहवाल | police report | [क. २ (ढ)] |
| पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकारी | officer in charge of a police station | [क. २ (ण)] |
| पोलिसातील अधिकारी | officer of police | [क. १७३ (३)] |
| प्रकटन करण्यास प्रवृत्त करणे | induce disclosure | [क. ३१६-स.टी.] |
| प्रकरणाचा परामर्श घेणे | deal with the case | [क. ३४३ (१)] |
| प्रकरणाचे परिकथन करणे | state a case | [क. ३९५ (१)] |
| प्रकर्ता | principal | [दुसरी अनुसूची-नमुना क. ५२] |
| प्रक्रिया पद्धती | form of procedure | [क. ५] |
| प्रजाक्षोभक साहित्य | seditious matters | [क. १०८-स.टी.] |
| प्रजाक्षोभक साहित्य प्रसृत करणे | disseminate seditious matters. | [क. १०८-स.टी.] |
| प्रतिकथन करणे | plead | [क. २४२ (१)] |
| प्रतिनियुक्त करणे | depute | [क. १२१ (३)] |
| प्रतिवेदन | return | [क. २९० (१)] |
| प्रतिवेदनासह परत करणे | return | [क. ४३०-स.टी.] |
| प्रतिष्ठित रहिवासी | respectable inhabitant | [क. १७४ (१)] |
| प्रतिज्ञालेख | affidavit | [क. २९५] |
| प्रत्यर्पण | extradition | [क. ४१ (१) (छ)] |
| प्रत्यवाय करणे | preclude | [क. १४५ (५)] |
| प्रधान अधिकारी | principal officer | [क. ६३] |
| प्रमाणपत्राने कळवणे | certify | [क. ४१७ (ख)] |
| प्रारुप | form | [क. ६१-स.टी.] |
| प्रारुपविषयक उणीव | want of form | [क. ४६६] |
| प्रलोभन | inducement | [क. १६३-स.टी.] |
| प्रवर्तन | operation | [क. २१८ (२)] |
| प्रवर्ती भाग | operative part | [क. ३५३ (१) (ग)] |
| प्रसंगवशात् येणे | visit | [क. १४४ (३)] |
| प्रशांतता | tranquillity | [प्रकरण १० वे-शीर्षक] |
| प्रापक | receiver | [क. १४६-स.टी.] |

| | | |
|---|---|---|
| प्रारंभिक अन्वेषण | preliminary investigation | [क. १९६ (३)] |
| प्रारंभिक कथन करणे | open one's case | [क. २२६स.टी.] |
| प्रारंभिक चौकशी | preliminary inquiry | [क. १५९स.टी.] |
| प्रारंभिक न्यायालय | court of first instance | [क. १९५ (२) -परंतुक] |
| फर्मान | requisition | [क १६१ (१)] |
| फसवणूक | deception | [क. १८२ (१)] |
| फर्याद | complaint | [क. २ (घ)] |
| फिर्याद चालविणे | prosecute | [दुसरी अनुसूची-नमुना क. २९] |
| फिर्याद चालविणे किंवा साक्षीपुरावा देणे | prosecute or give evidence | [क. १७० (२)] |
| फिर्यादजन्य खटला | complaint case | [क. २१० (१)] |
| फिर्याददार | complainant | [क. १७० (२)] |
| फिर्याद देणे | make a complaint | [क. १९८ (१)-परंतुक (क)] |
| फिर्यादी | prosecutor | [क. २१६ (३)] |
| फिर्यादी पक्ष | prosecution | [क. २३२] |
| फौजदारी | criminal | [क. ४१७ (२)] |
| फौजदारीपात्र | criminal | [क. ४५६ (१)] |
| बचाव | defence | [क. ३०४ (२) (क)] |
| बचावपक्ष | defence | [क. २३२] |
| बचावाला सुरुवात करणे | entering upon defence | [क. २२३-स.टी.] |
| बदनामी | defamation | [क. १०८ (१) (एक) (ख)] |
| बदनामीकारक | libellous | [क. ४५५-स.टी.] |
| बनावटकार | forger | [क. ११० (क)] |
| बंद होणे | cesser | [क. ८(४)] |
| बंदिवासात ठेवणे | confine | [क.१२९(२)] |
| (–चा) बंदोबस्त करणे | 1. provide against | [दुसरी अनुसूची-नमुना क. २२] |
| | 2. take order with | [क. १४४ (१)] |
| बंदोबस्तात | 1. in custody | [क. ८१(१)] |
| | 2. under custody | [क.१७०(१)] |
| बंदोबस्तानिशी (पाठवणे) | (forward) in custody | [क. १७१-परंतुक] |
| बंधपत्र दंडपात्र करणे | forfeit a bond | [क. ४४६-स.टी.] |
| बंधपत्र दंडपात्र होणे | forefeiture of bond | [दुसरी अनुसूची-नमुना क. ४९] |
| बंधपत्र निष्पादित करणे | execute a bond | [क. १०६ (१)] |
| बंधपत्र विसर्जित करणे | discharge of bond | [क. १७३ (४)] |
| बंधमुक्त करणे | 1. release | [क. ११८] |
| | 2. discharge | [क. ४३६(१) १ ले परंतुक] |
| बंधमुक्त सिद्धदोषी | released convict | [क. ४१ (१) (ज)] |
| बलाद्ग्रहण | extortion | [क. ११० (ख)] |
| बळाने व गैरपणे कब्जा काढून घेणे | forcibly and wrongfully dispossess | [क. १४५ (४) परंतुक] |
| (एखाद्याची) बाजू संक्षेपाने मांडणे | sum up (ones) case | [क. २३४] |
| बांधून घेणे | bind over | [क. ३४० (ङ)] |
| बालगुन्हेगार | Juveniles | [क. २७-स.टी] |

| | | |
|---|---|---|
| (–च्या) बाहेर असणे | be absent (from) | [क. ४७० (४) (क)] |
| बिनजामिनी अपराध | non-bailable offence | [क. २ (क)] |
| बिनदखली अपराध | non-cognizable offence | [क. २ (ठ)] |
| बुद्धिपुर:स्सर | wilfully | [क. ३४४ (१)] |
| बेकायदेशीर अडथळा किंवा उपद्रव | unlawful obstruction or nuisance | [क. १३३ (क)] |
| बेकायदेशीर जमाव | unlawful assembly | [प्रकरण १० वे-शीर्षक] |
| बेत | design | [क. १५०] |
| बोर्स्टल संस्था | Borstal institution | [क. २६६ (ख) (दोन)] |
| भत्ता | allowance | [क.१२५ (घ) परंतुक] |
| भरपाई | compensation | [क. ३५७ (१) (ग)] |
| भाडे-उत्पन्न | rents | [क. १४५ (२)] |
| भारताचा महा न्यायवादी | Attorney-General of India | [क. ४०६ (२)] |
| भाषांतर करून सांगणे | interprete (to) | [क. २७८ (३)] |
| मनोविकल | of unsound mind | [प्रकरण २५ वे-शीर्षक] |
| मरणान्वेषण | inquest | [क. ४६० (ग)] |
| महत्त्वाची चूक | material error | [क. २१५-उदा. (ग)] |
| महत्त्वाचा साक्षीदार | material witness | [क. ३११-स.टी.] |
| महा अधिवक्ता | Advocate-General | [क. ४०६ (२)] |
| महानगर क्षेत्र | metropolitan area | [क. २ (ट)] |
| मागणीदार | claimant | [क. ८४ (१)] |
| मागणीहक्क | claim | [क. ४५८ (१)] |
| (दोषारोपाची) मांडणी करणे | frame (a charge) | [क. २१८ (१)-परंतुक] |
| मान्य किंवा अमान्य करणे | allow or disallow | [क. ८४ (१)] |
| माफ करणे | dispense with | [क. २८४-स.टी.] |
| माफी | remission | [प्रकरण ३२ वे-शीर्षक] |
| माफी देऊ करणे | tender of pardon | [क. ३०६-स.टी.] |
| माफी देणे | pardon | [क. ३०६ (१)] |
| माफीपत्र | apology | [क. ३४८-स. टी.] |
| मानेला फास लावून फाशी देणे | hang by the neck | [क. ३५४ (५)] |
| मारक हत्यारे | offensive weapons | [क. ५२] |
| माहिती | information | [क. ४० (१)] |
| माहिती देऊन नेमणे | instruct | [क. ३०१ (२)] |
| मुख्य अधिकारी | chief officer | [क. ६३] |
| मुख्य निरीक्षक, स्फोटक द्रव्ये | Chief Inspector of Explosives | [क. २९३ (४) (ख)] |
| मुचलका | recognizance | [क. ४४५ स.टी.] |
| मुदतमर्यादा | period of limitation | [क. ४६७] |
| मुलकी बळ | civil force | [क. १२९-स.टी.] |
| मूळ शिक्षा | substantive sentence | [क. ३० (ख)] |
| मृत्युदंड | death sentence | [प्रकरण ३२ वे क- कलमे ४१३ ते ४१६-शीर्षक] |
| (–च्या) मोहोरेनिशी | under the seal of | [क. ३०५ (२)] |
| (तसे) म्हणून कार्य करणे | purport to act | [क. २०० (क)] |
| म्होरक्या | principal | [क. ३०६ (१)] |

| | | |
|---|---|---|
| यथातथ्यता | correctness | [क. ३९७ (२)] |
| यथार्थ अनुवाद | true translation | [क. २७६ (१)] |
| युक्तिवाद | argument | [क. २३४-स.टी.] |
| युक्तिवादाचे टिप्पण | memorandum of argument | [क. ३१४ स.टी.] |
| रद्दबातल करणे | vitiate | [क. ४६०-स.टी.] |
| रद्द ठरवणे | set aside | [क. ९६-स.टी.] |
| रसायन परीक्षक | Chemical Examiner | [क. २९३ (४) (क)] |
| राजदौतिक | diplomatic | [क. १८९] |
| राजादिष्ट किंवा राजपत्रित अधिकारी | commissioned or gazetted officer. | [क. १३१] |
| राबता | resort | [क. ४० (१) (ख)] |
| राबता ठेवणे | frequent | [क. १४४ (३)] |
| रीतसर शाबिती | formal proof | [क. २७९ (३)] |
| रूढीप्राप्त किंवा व्यक्तिविषयक कायदा | customary or personal law | [क. १२७ (३) (ख)] |
| रूढीरिवाज | customs and manners | [क. १९८ (१)-परंतुक (क)] |
| रोजनामा | diary | [क. १६७ (१)] |
| लष्करी न्यायालय | Court-martial | [क. ४७५ (१) (ख)] |
| लेखप्रमाणक | notary | [क. २९७ (१) (ग)] |
| लेखनिविष्ट करणे | reduce to writing | [क. १६२ (१)] |
| लोकसेवक | public servant | [क. २९५] |
| वकिलामार्फत उपस्थित राहणे | appear by a pleader | [क. ११५] |
| वकील | pleader | [क. २ (थ)] |
| वकील नेमणे | engage a pleader | [क. ३०४ (१)] |
| वचनबद्ध करणे | engage | [क. ४५२ (२)] |
| वर्ग करणे | make over | [क. ३०६ (५) (ख)] |
| (खटला) वर्ग करणे | transfer (a case) | [क. ४०६ स.टी.] |
| वरिष्ठ न्यायालय | superior court | [क. ३४१ (१)] |
| वर्दी | information | [क. २५४ स.टी.] |
| वर्दीदार | informant | [क. १५४ (१)] |
| वाचून दाखवणे | read out | [क. २३६-परंतुक] |
| वादप्रश्न | issue | [क. २८७ (१)] |
| वापर हक्क | enjoyable use | [दुसरी अनुसूची—नमुना क्र. २७] |
| वापरावयाचे कार्याधिकार | functions exercisable | [क. ३ (४)] |
| वाणिज्यदौतिक | consular | [क. १८९] |
| विदेशी आयोगपत्र | foreign commission | [क. २९० स.टी.] |
| विधिप्रश्न | question of law | [क. ४०७ (१) (ख)] |
| विधिबाह्य | invalid | [क. ३९५ (१)] |
| विनादोषारोप सोडणे | discharge | [क. ११८-स.टी.] |
| विनासोपस्कार खारीज करणे | summary dismissal | [क. ३८४-स.टी.] |
| विलोपित करणे | vacate | [क. ११६ (६)] |
| विवाह करणे | contract a marriage | [क. १२५ (३)-स्पष्टीकरण] |
| विशिष्ट खटले | particular cases | [क. १३(१)] |
| विशेष समन्स | special summons | [क. २०६-स.टी.] |
| विशोधित करणे | amend | [क. २९७ (३)] |
| विक्षोभाची आशंका | apprehention of disturbance | [क. १०७ (२)] |

| | | |
|---|---|---|
| वीक्षक | visitors | [ क. ३३७ ] |
| वेडा | lunatic | [ क. १९८(१) परंतुक-(क्) ] |
| वैद्यकीय साक्षीदार | medical witness | [ क. २९१-स. टी. ] |
| वॉरंट | warrant | [ क. २(श्) ] |
| वॉरंट—ला निदेशून लिहिणे | direct a warrant to person | [ क. ३८ ] |
| वॉरंट-खटला | warrant-case | [ क. २(श्) ] |
| व्यवहार्य असेल तेथवर | as nearly as may be practicable | [ क. ११६(२) ] |
| व्यादेश | injunction | [ क. १४२-स. टी. ] |
| व्यापारी माल | merchandise | [ क. १३३ (ख्) ] |
| शक्य तितक्या शीघ्रतेने | as expeditiously as possible | [ क. ३०९ (१) ] |
| शपथ आयुक्त | Commissioner of Oaths | [ क. २९७(१) (ख्) ] |
| शपथेवर रीतसर चौकशी करणे | hold an inquiry on oath | [ क. १२१(१)-परंतुक ] |
| शांतताभंग | breach of the peace | [ क. १०७(१) ] |
| शांतताभंग घडवून आणणे | provoke a breach of the peace | [ क. २६०(१) (सहा) ] |
| शाबीत करणे | establish | [ क. ४५८(१) ] |
| शासनाचा रक्तजलशास्त्रज्ञ | Serologist to the Government | [ क. २९३(४) (च्) ] |
| शिबिराची जागा | camping grounds | [ क. १३३(२)-स्पष्टीकरण ] |
| शिक्षा ठोठावणे | pass a sentence | [ क. २३५(२) ] |
| संपत्तीची वासलात लावणे | dispose of property | [ क. ८३(१)-परंतुक(क्) ] |
| संयोग | combination | [ क. २२२(१) ] |
| संव्यवहार | transaction | [ क. २१५-उदा. (ख्) ] |
| संशयास्पद परिस्थिती | suspicious circumstances | [ क. ४०(१) (घ्) ] |
| संशयित व्यक्ती | suspected persons | [ क. १०९-. स.टी. ] |
| संस्थानाधिपति | Ruler | [ क. ४८४(२) (घ्) ] |
| संघराज्य | Union | [ क. ४१(१) (च्) ] |
| संक्षिप्त संपरीक्षा | summary trial | [ प्रकरण २१ चे-शीर्षक ] |
| संक्षेपतः संपरीक्षा करणे | try summarily | [ क. २६०-स. टी. ] |
| सतत चालू राहणारा अपराध | continuing offence | [ क. ४७२-स. टी. ] |
| सदोष मनुष्यवध | culpable homicide | [ क. ३००-उदा. (ख्) ] |
| सद्भावपूर्ण खरेदीदार | *bonafide* purchaser | [ क. ३५७(१) (घ्) ] |
| समज देणे | admonition | [ क. ३६०-स. टी. ] |
| समजूनसवरून | knowingly | [ क. ३४४(१) ] |
| समन्स-खटला | summons-case | [ क. २(ब्) ] |
| समर्थनीय करणे | warrant (as, one's conviction) | [ क. २४५ (१) ] |
| समवर्तीपणे चालू राहणे | run concurrently | [ क. ३१(१) ] |
| समक्ष हजेरी | attendance | [ क. १७०(१) ] |
| समादेशक अधिकारी | commanding officer | [ क. ४७५-स. टी. ] |
| समुचितपणे | adequately | [ क. २४० (१) ] |
| संपरीक्षा चालवणे | conduct a trial | [ क. ११६(२) ] |
| संपरीक्षेसाठी पाठवणे | send for trial | [ क. ३२४(१) ] |
| (खटला) संपरीक्षेसाठी सुपूर्द करणे | commit (a case) for trial | [ क. ३०६(५) (क्) ] |
| संपूर्ण व खरा वृत्तांत | full and true account | [ क. २८१(५) ] |
| सरकारी अधिवक्ता | Government Advocate | [ क. ३०२(१) ] |
| सरकारी अभियोक्ता | Public Prosecutor | [ क. ३०१(१) ] |
| सर्वसाधारण लौकिकाचा पुरावा | evidence of general repute | [ क. ११६(४) ] |

| | | |
|---|---|---|
| सशर्त विमुक्ती | conditional discharge | [ क. १२३(४) ] |
| सशस्त्र सेनादलें | armed forces | [ क. १२९(२) ] |
| सहअपराधी | accomplice | [ क. ३०६-स.टी. ] |
| (–मध्ये) सहभागी | privy (to) | [ क. ३०६(१) ] |
| साठेबाजी अथवा नफेबाजी | hoarding or profiteering | [ क. ११० (दोन) ] |
| सादर निवेदन | submission | [ क. २३४-परंतुक ] |
| सारांशाचे टिप्पण | memorandum of the substance | [ क. २७४(१) ] |
| सार्वजनिक उपद्रव | public nuisance | [ प्रकरण १० वे-ख ] |
| सार्वजनिक न्याय | public justice | [ क. १९५-स. टी. ] |
| सार्वजनिक प्रशांतता | public tranquility | [ क. १०७(१) ] |
| सार्वजनिक शांतता | public peace | [ क. १२९(१) ] |
| सार्वजनिक सुव्यवस्था | public order | [ प्रकरण १० वे-शीर्षक ] |
| सार्वजनिक स्थळ | public place | [ क. १३३(२)-स्पष्टीकरण ] |
| साक्षीदार म्हणून पुढे होणे | offer oneself as a witness | [ क. ३१५(२) ] |
| साक्षीदाराच्या कथनामधील विरोध दाखवून देणे. | contradict a witness | [ क. १६२(१)-परंतुक ] |
| सुधारालय | reformatory | [ क. २६६(ख) (दोन) ] |
| सुविधाधिकार | easement | [ क. १४७(१) ] |
| सूचना | intimation | [ क. १७४(१) ] |
| सोपवणे | make over | [ क. २००(ख) ] |
| सौम्यकारी परिस्थिती | extenuating circumstance | [ क. ३६०(३) ] |
| सौम्यीकरण | commutation | [ प्रकरण ३२ वे-शीर्षक ] |
| स्थगित करणे | stay | [ क. ४०७(६) ] |
| स्थानिक अधिकारिता | local jurisdiction | [ क. २ (ग) ] |
| स्थानिक अन्वेषण | local investigation | [ क. १३९-स. टी. ] |
| स्वयमेव | by itself or themselves | [ क. २२०(४) ] |
| स्वामित्व-चिन्ह | property mark | [ क. २११-उदा. (ग) ] |
| हकीकत | narrative | [ क. २७५(३) ] |
| हक्काने | of right | [ क. ३०३ ] |
| हमला | assault | [ क. १०६(२) (ख) ] |
| हरकतदार | objector | [ क. ८४(१) ] |
| हवालातनामा | warrant of commitment | [ क. २९८ (ख) ] |
| हवालातीत परत पाठवणे | remand | [ क. २६९ (ख) ] |
| (–च्या) हवाली | 1. in one's custody | [ क. २९८(क) ] |
| | 2. to one's care and custody | [ क. ३३९(१) ] |
| हवाली करणे | delivery to care | [ क. ३३९-स.टी. ] |
| हस्तदोष किंवा आकडेमोडीतील चूक | clerical or arithmetical error | [ क. ३६२ ] |
| हस्तक्षेप करणे | interpose | [ क. १४९ ] |
| हुकूम देणे | command | [ क. १२९(१) ] |
| हेकेखोरपणाने | persistently | [ क. ३१७(१) ] |
| क्षुल्लक | frivolous | [ क. ३८४(१) (ख) ] |
| क्षुल्लक अपराध | petty offence | [ क. २०६(२) ] |
| क्षुल्लक खटला | petty case | [ क. ३७६-स. टी. ] |
| क्षुल्लक स्वरुप | trivial nature | [ क. ३६०(३) ] |

# THE CODE OF CRIMINAL PROCEDURE, 1973

## फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| abatement of appeal | अपील अवसान पावणे | [S. 394-m.n.] |
| abduction | अपहरण | [S. 110 (d)] |
| abet | अपप्रेरणा देणे | [S. 108 (1)(i)] |
| abettor | अपप्रेरक | [S. 306 (1)] |
| abide | अवलंबून राहणे | [S. 83 (5)] |
| abide by | अनुसार चालणे | [S. 344 (4)] |
| abnormality | अपसामान्यता | [S. 125 (1)(c)] |
| absolute | कायम | [S. 133(1)-last para.] |
| accomplice | सहअपराधी | [S. 306-m.n.] |
| accusation | आरोप | [S. 237 (3)] |
| acquittal | दोषमुक्ति | [S. 232-m.n.] |
| act | १. काम चालविणे<br>२. कार्यवाही करणे | [S. 301 (2)]<br>[S. 326 (1)] |
| adduce an evidence | पुरावा दाखल करणे | [S. 121 (2)] |
| adequately | समुचितपणे | [S. 240 (1)] |
| adequately punish | पुरेशी शिक्षा करणे | [S. 246 (1)] |
| adjournment | तहकुबी | [S. 289-m.n.] |
| adjudge an offender to punishment | अपराधी म्हणून शिक्षापात्र ठरवणे | [S. 348] |
| admit | ग्राह्य धरणे | [S. 463 (1)] |
| admit to bail | जामिनादेश देणे | [S. 51 (1)] |
| admonition | समज देणे | [S. 360-m.n.] |
| adultery | १. जारकर्म<br>२. परगमन | [S. 220-ill. (b)]<br>[S. 211-ill. (c)] |
| Advocate-General | महा अधिवक्ता | [S. 406 (2)] |
| affidavit | प्रतिज्ञालेख | [S. 295] |
| affray | दंगल | [S. 144 (1)] |
| aggrieved | उपसर्ग पोचलेला | [S. 198 (1)] |
| alleged offence | अभिकथित अपराध | [S. 213] |
| allowance | भत्ता | [S. 125 (d)-proviso] |
| allow or disallow | मान्य किंवा अमान्य करणे | [S. 84 (1)] |
| amend | विशोधित करणे | [S. 297 (3)] |
| annoyance | त्रास | [S. 144 (1)] |
| apartment | दालन | [S. 47 (2)-proviso] |
| apology | माफीपत्र | [S. 348-m.n.] |
| apparent cause | दृश्यमान कारण | [S. 174 (1)] |
| appealable decree | अपीलयोग्य हुकूमनामा | [S. 195 (3)] |
| appear and plead | उपस्थित होऊन वादकथन करणे | [S. 301 (1)] |
| appear by a pleader | वकिलामार्फत उपस्थित राहणे | [S. 115] |
| appellant | अपीलकर्ता | [S. 383-m.n.] |
| Appellate Court | अपील न्यायालय | [S. 106-(4)] |
| appointment | नियुक्ति | [S. 9-expl.] |
| apprehend | १. आशंका वाटणे<br>२. गिरफ्तार करणे | [S. 144-m.n.]<br>[S. 41 (1)(g)] |
| apprehended danger | आशंकित संकट | [S. 144-m.n.] |

| | | |
|---|---|---|
| apprehension | १. गिरफ्तार करणे | [S. 460 (d)] |
| | २. गिरफ्तारी | [S. 58-m.n.] |
| apprehension of disturbance | विक्षोभाची आशंका | [S. 107 (2)] |
| argument | युक्तिवाद | [S. 234-m.n.] |
| armed forces | सशस्त्र सेनादले | [S. 129 (2)] |
| arrest groundlessly | निष्कारण अटक करणे | [S. 358-m.n.] |
| as expeditiously as possible | शक्य तितक्या शीघ्रतेने | [S. 309 (1)] |
| as nearly as may be practicable | व्यवहार्य असेल तेथवर | [S. 116 (2)] |
| assault | हमला | [S. 106 (2) (b)] |
| assign | नेमून देणे | [S. 304 (1)] |
| attachment | जप्ती | [S. 83-m.n.] |
| attend | जातीने हजर राहणे | [S. 105 (2) (c)] |
| attendance | समक्ष हजेरी | [S. 170 (1)] |
| at the dispsosal of | (–च्या) दिमतीला | [S. 85 (2)] |
| at the instance of | (–च्या) चालनेने | [S. 399 (3)] |
| Attorney-General of India | भारताचा महा न्यायवादी | [S. 406 (2)] |
| bailable offence | जामीनपात्र अपराध | [S. 2 (a)] |
| be absent (from) | (–च्या) बाहेर असणे | [S. 470 (4) (a)] |
| bind over | बांधून घेणे | [S. 340 (e)] |
| body corporate | निगम-निकाय | [S. 305 (1)] |
| *bona-fide* purchaser | सद्भावपूर्ण खरेदीदार | [S. 357 (1) (d)] |
| Borstal institution | बोर्स्टल संस्था | [S. 266 (*b*) (ii)] |
| breach of the peace | शांतताभंग | [S. 107 (1)] |
| brief statement | त्रोटक निवेदन | [S. 264] |
| bruise | अंग खरचटणे | [S. 174 (1)] |
| by itself or themselves | स्वयमेव | [S. 220 (4)] |
| by word or action | उक्तीद्वारे किंवा कृतीद्वारे | [S. 46 (1)] |
| Calendar | क्रमसूची | [Second Sch.-Form No. 42] |
| camping grounds | शिबिराची जागा | [S. 133 (2)-expl.] |
| capital offence | देहान्ताच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध | [S. 220-ill. (f)] |
| capital sentence | देहान्ताची शिक्षा | [S. 416-m.n.] |
| carrier | परिवाहक | [S. 222-ill. (a)] |
| Central Forensic Science Laboratory | केंद्रीय न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा | [S. 293 (4) (c)] |
| certify | प्रमाणपत्राने कळवणे | [S. 417 (b)] |
| cesser | बंद होणे | [S. 8 (4)] |
| channel | जलमार्ग | [S. 137 (1)] |
| charge | दोषारोप | [S. 2 (b)] |
| cheating | ठकवणूक | [S. 110 (d)] |
| Chemical Examiner | रसायन परीक्षक | [S. 293 (4) (a)] |
| Chief Inspector of Explosives | मुख्य निरीक्षक, स्फोटक द्रव्ये | [S. 293 (4) (b)] |
| chief officer | मुख्य अधिकारी | [S. 63] |
| civil force | मुलकी बळ | [S. 129-m.n.] |
| civil jail | दिवाणी तुरुंग | [S. 417 (2)] |
| claim | मागणीहक्क | [S. 458 (1)] |
| claimant | मागणीदार | [S. 84 (1)] |
| clerical or arithmetical error | हस्तदोष किंवा आकडेमोडीतील चूक | [S. 362] |

| | | |
|---|---|---|
| cognizable case | दखलपात्र प्रकरण | [ S. 2 (c) ] |
| cognizable offence | दखलपात्र अपराध | [ S. 2 (c) ] |
| cognizance | दखलगिरी | [ Second Sch.-Form No. 32 ] |
| combination | संयोग | [ S. 222 (1) ] |
| command | हुकूम देणे | [ S. 129 (1) ] |
| commanding officer | समादेशक अधिकारी | [ S. 475-m.n. ] |
| commission | आयोगपत्र | [ S. 189] |
| commissioned or gazetted officer | राजादिष्ट किंवा राजपत्रित अधिकारी | [ S. 131 ] |
| Commissioner of Oaths | शपथ आयुक्त | [ S. 297 (1) (b) ] |
| commit (a case) for trial | (खटला) संपरीक्षेसाठी सुपूर्द करणे | [ S. 306 (5) (a) ] |
| commutation | सौम्यीकरण | [ Chap. XXXII-heading ] |
| commute | परिवर्तित करून सौम्य करणे | [ S. 416 ] |
| compensation | भरपाई | [ S. 357 (1) (c) ] |
| competence | अधिकारकक्षा | [ S. 190 (2) ] |
| complainant | फिर्यादिदार | [ S. 170 (2) ] |
| complaint | फिर्याद | [ S. 2 (d) ] |
| complaint case | फिर्यादजन्य खटला | [ S. 210 (1) ] |
| composition of an offence | अपराधाची मिटवणूक | [ S. 320 (8) ] |
| compoundable | आपसात मिटवण्यासारखा | [ S. 320 (3) ] |
| compounding | आपसात मिटवणे | [ S. 320-m.n. ] |
| conceal oneself | गुप्त राहणे | [ S. 470 (4) (b) ] |
| concerned (in) | (–मध्ये) निबद्ध | [ S. 306 (1) ] |
| conditional discharge | सशर्त विमुक्ती | [ S. 123 (4) ] |
| conduct the prosecution | खटला चालविणे | [ S. 301 (2)] |
| conduct a search | झडतीचे काम चालविणे | [ S. 165 (2) ] |
| conduct a trial | संपरीक्षा चालवणे | [ S. 116 (2) ] |
| confine | १. बंदिवासात ठेवणे<br>२. पारिरुद्ध करणे | [ S. 129 (2) ]<br>[ S. 46 (1) ] |
| confirm | कायम करणे | [ S. 366 (1) ] |
| confirmation | कायमीकरण | [ S. 464 (1) ] |
| confiscation | अधिहरण करणे | [ S. 452 ] |
| conflagration | आगडोंब | [ S. 133 (1) (c) ] |
| consecutive sentences | क्रमवर्ती शिक्षा | [ S. 31 (2) ] |
| consular | वाणिज्यदौतिक | [ S. 189 ] |
| continuing offence | सतत चालू राहणारा अपराध | [ S. 472-m.n. ] |
| contract a marriage | विवाह करणे | [ S. 125 (3)-expl. ] |
| contradict a witness | साक्षीदारांच्या कथनांमधील विरोध दाखवून देणे | [ S. 162 (1)-proviso ] |
| contradiction | कथनविरोध | [ S. 162 (2)-expl. ] |
| Controller of Stamps and Stationery | नियंत्रक, मुद्रांक व लेखनसामग्री | [ S. 292 (1) ] |
| conviction | दोषसिद्धी | [ S. 106-m.n. ] |
| copies | नकला | [ S. 455 (1) ] |
| corporation | निगम | [ S. 305-m.n. ] |
| correctness | यथातथ्यता | [ S. 397 (1) ] |
| counterfeit coin | नकली नाणे | [ S. 215-ill. (a) ] |

| | | |
|---|---|---|
| Court-martial | लष्करी न्यायालय | [ S. 475 (1) (b) ] |
| Court of Magistrate | दंडाधिकाऱ्याचे न्यायालय | [ S. 237 (1)] |
| criminal | १. फौजदारी (as in : criminal jail) | [ S. 417 (2) ] |
| | २. गुन्हेगारी (as in : criminal intent) | [ S. 320-Table ] |
| | ३. फौजदारीपात्र (as in : criminal force) | [ S. 456 (1) ] |
| culpable homicide | सदोष मनुष्यवध | [ S. 300-ill (b) ] |
| custody | १. अभिरक्षा | [ S. 451-m.n. ] |
| | २. हवालात | [ S. 269 (c) ] |
| | ३. बंदोबस्त | [ S. 170 (1) ] |
| customs and manners | रुढिरिवाज | [ S. 198 (1)-proviso (e) ] |
| dacoity | दरवडा | [ S. 39 (vii) ] |
| damages | नुकसानी | [ S. 357 (1) (c) ] |
| deal with the case | प्रकरणाचा परामर्श घेणे | [ S. 343 (1) ] |
| death sentences | मृत्युदंड | [ Chap. XXXII-A-Ss. 413 to 416-heading] |
| deception | फसवणूक | [ S. 182 (1) ] |
| declaration | अधिकथन | [ S. 432 (5) (b) ] |
| defamation | बदनामी | [ S. 108 (1)(i)(b) ] |
| defect of jurisdiction | अधिकारितेतील उणीव | [ S. 470 (1)] |
| defence | १. बचावपक्ष | [S. 232 ] |
| | २. बचाव | [ S. 304 (2) (a) ] |
| defence on the merits | गुणदोषविषयक बचाव | [ S. 463 (1) ] |
| delivery to care | हवाली करणे | [ S. 339-m.n. ] |
| demeanour | चालचर्या | [ S. 280-m.n. ] |
| deponent | जबानीदार | [ S. 29(1) (2) ] |
| deposition | जबानी | [ S. 363 (5) ] |
| depute | प्रतिनियुक्त करणे | [ S. 121 (3) ] |
| design | बेत | [ S. 150 ] |
| desperate | दुःसाहसी | [ S. 110 (g) ] |
| diary | रोजनामा | [ S. 167 (1) ] |
| dictation | तोंडी सांगितलेला मजकूर | [ S. 274 (1)-proviso ] |
| diplomatic | राजदौतिक | [ S. 189 ] |
| direct a warrant to | वॉरंट—ला निदेशून लिहिणे | [ S. 38 ] |
| discharge | १. बंधमुक्त करणे | [ S. 436 (1)-proviso ] |
| | २. विनादोषारोप सोडणे | [ S. 118-m.n. ] |
| discharge of bond | बंध विसर्जित करणे | [ S. 173 (4) ] |
| discharge of sureties | जामीनदारांची दायित्वमुक्तता | [ S. 444-m.n. ] |
| dishonest misappropriation | अप्रामाणिकपणे केलेला अपहार | [ S. 212 (2) ] |
| disinter (the dead body) | (मृतदेह) उकरून काढणे | [ S. 176 (3) ] |
| dismiss | १. काढून टाकणे | [ S. 406 (3) ] |
| | २. खारीज करणे | [ S. 384 ] |
| dispense with | माफ करणे | [ S. 284-m.n. ] |
| disperse | पांगवणे | [ S. 129-m.n. ] |
| dispose of property | संपत्तीची वासलात लावणे | [S. 83 (1)-proviso (a) ] |

**इंग्रजी–मराठी शब्दसूची—चालू**

| | | |
|---|---|---|
| disproof | नाशाबिती | [ S. 315 (1)] |
| disprove | नाशाबीत करणे | [ S. 54 ] |
| disseminate seditious matters | प्रजाक्षोभक साहित्य प्रसृत करणे | [ S. 108-m.n.] |
| divine displeasure | दैवी प्रकोप | [ S. 320 (1)-Table ] |
| easement | सुविधाधिकार | [ S. 147 (1) ] |
| enforcement | अंमलबजावणी | [ S. 128-m.n. ] |
| engage | वचनबद्ध करणे | [ S. 452 (2) ] |
| engage a pleader | वकील नेमणे | [ S. 304(1) ] |
| enjoyable use | वापरहक्क | [ Second Sch.-Form No. 27 ] |
| entering upon defence | बचावाला सुरूवात करणे | [ S. 233-m.n. ] |
| enter on an investigation | अन्वेषण सुरू करणे | [ S. 157 (1) (b) ] |
| escaped convict | पळून गेलेला सिद्धदोषी | [ S. 426-m.n. ] |
| essential | अत्यावश्यक | [ S. 308 (1) ] |
| establish | शाबीत करणे | [ S. 458 (1) ] |
| evade the arrest | अटक चुकवणे | [ S. 46 (2) ] |
| evict | निष्कासित करणे | [ S. 145 (6) ] |
| evidence of general repute | सर्वसाधारण लौकिकाचा पुरावा | [ S. 116 (4) ] |
| evidence, oral or documentary | तोंडी किंवा कागदोपत्री पुरावा | [ S. 173 (8) ] |
| examination | तपासणी | [ S. 139-m.n. ] |
| examination on commission | आयोगपत्राद्वारे तपासणी | [ S. 271 ] |
| examine | परीक्षण करणे | [ S. 397 (1) ] |
| execute a bond | बंधपत्र निष्पादित करणे | [ S. 106 (1) ] |
| execution | अंमलबजावणी | [ Chap. XXXII-heading ] |
| exhibit | निशाणी .. | [ S. 189 ] |
| *exparte* | एकतर्फी .. | [ S. 126 (2)-proviso ] |
| extenuating circumstances | सौम्यकारी परिस्थिती .. | [ S. 360 (3) ] |
| extortion | बलाद्ग्रहण | [ S. 110 (d) ] |
| extradition | प्रत्यर्पण | [ S. 41 (1)(g) ] |
| fabricate false evidence | खोटा साक्षीपुरावा तयार करणे | [ S. 344 (1) ] |
| facts constituting an offence | अपराधाची घटक तथ्ये | [ S. 345 (2) ] |
| failure of justice | १. न्याय निष्फळ होणे<br>२. न्याय होऊ न शकणे | [ S. 462 ]<br>[ S. 215 ] |
| fair and impartial inquiry | न्याय्य व निःपक्षपाती चौकशी | [ S. 407 (1) (a) ] |
| finding | १. निष्कर्ष<br>२. निर्णय | [ S. 263 (h) ]<br>[ S. 351 ] |
| find security | जामीन देणे | [ Second Sch.-Form No. 15 ] |
| Finger Print Bureau | अंगुलि मुद्रा केंद्र | [ S. 293 (4) (c) ] |
| first information report | खबरी रिपोर्ट | [ S. 207 (ii) ] |
| first offender | पहिल्या वेळचा अपराधी | [ S. 360 (1)-proviso ] |
| forcibly and wrongfully dispossess | बळाने व गैरपणे कब्जा काढून घेणे | [ S. 145 (4)-proviso ] |
| foreign commission | विदेशी आयोगपत्र | [ S. 290-m.n. ] |
| forfeit a bond | बंधपत्र दंडपात्र करणे | [ S. 446-m.n. ] |
| forfeiture of bond | बंधपत्र दंडपात्र होणे | [ Second Sch.-Form No. 49 ] |

| | | |
|---|---|---|
| forger | बनावटकार | [ S. 110 (a) ] |
| form | प्रारुप | [ S. 61-m.n. ] |
| formal proof | रीतसर शाबिती | [ S. 279 (3) ] |
| form of procedure | प्रक्रिया-पद्धती | [ S. 5 ] |
| frame (a charge) | (दोषारोपाची) मांडणी करणे | [ S. 218 (1)-praviso ] |
| fraudulently | कपटपूर्वक | [ S. 215-ill. (a) ] |
| frequent | रावता असणे | [ S. 144 (3) ] |
| frivolous | १. थिल्लरपणाचा | [ S. 406 (3) ] |
| | २. क्षुल्लक | [ S. 384 (1) (b) ] |
| full and true account | संपूर्ण व खरा वृत्तांत | [ S. 281 (5) ] |
| functions exercisable | वापरावयाचे कार्याधिकार | [ S. 3 (4) ] |
| Government Advocate | सरकारी अधिवक्ता | [ S. 302 (1) ] |
| grant bail | जामीन मंजूर करणे | [ S. 78 (2) ] |
| grave and sudden provocation | तीव्र व आकस्मिक प्रक्षोभन | [ S. 222-ill. (b) ] |
| grievous hurt | जबर दुखापत | [ S. 211-ill. (b) ] |
| grounds | आधारकारणे | [ S. 165 (1) ] |
| hang by the neck | मानेला फास लावून फाशी देणे | [ S. 354 (5) ] |
| headman of village | ग्रामप्रमुख | [ S. 40 (2) (iii) ] |
| hoarding or profiteering | साठेबाजी अथवा नफेबाजी | [ S. 110 (ii) ] |
| hold an inquiry on oath | शपथेवर रीतसर चौकशी करणे | [ S. 121(1)-proviso ] |
| house-breaking | घरफोडी | [ S. 41 (1) (b) ] |
| house or homestead | घर किंवा घरवाडी | [ S. 82 (2) (i) (b) ] |
| house-trespass | गृह-अतिक्रमण | [ S. 39 (x) ] |
| immaterial | गौण | [ S. 215-ill. (d) ] |
| imminent danger | निकटवर्ती संकट | [ S. 142 (1) ] |
| impound | अवरूद्ध करणे | [ S. 104 ] |
| *in camera* | कक्षांतर्गत | [ S. 237 (2) ] |
| in-charge of case | खटल्याची जबाबदारी असलेली (व्यक्ती) | [ S. 301 (1) ] |
| incorporated company | निगमित कंपनी | [ S. 305 (1) ] |
| in custody | बंदोबस्तात | [ S. 81 (1) ] |
| (forward) in custody | बंदोबस्तानिशी (पाठवणे) | [ S. 171-proviso ] |
| idiot | निर्बुद्ध | [ S. 198 (1) proviso (a)] |
| in derogation of | न्यूनकारी | [ S. 145 (10) ] |
| India Security Press | इंडिया सिक्युरिटी प्रेस | [ S. 292 (1) ] |
| induce disclosure | प्रकटन करण्यास प्रवृत्त करणे | [ S. 316-m.n. ] |
| inducement | प्रलोभन | [ S. 163-m.n. ] |
| in duplicate | दोन प्रतिलिप्यांमध्ये | [ S. 61 ] |
| informant | वर्दीदार | [ S. 154 (1) ] |
| information | १. वर्दी | [ S. 154-m.n. ] |
| | २. माहिती | [ S. 40 (1) ] |
| | ३. खबर | [ S. 113-proviso ] |
| injunction | व्यादेश | [ S. 142-m.n. ] |
| innocent purchaser | निर्दोष खरेदीदार | [ S. 453-m.n. ] |
| in one's custody | (–च्या) हवाली | [ S. 298 (a) ] |
| in one's possession or power | एखाद्याच्या कब्जात किंवा सत्तेखाली | [ S. 349 ] |

## इंग्रजी–मराठी शब्दसूची—चालू

| | | |
|---|---|---|
| inoperative | अप्रवर्ती | [ S. 395 (1) ] |
| inquest | मरणान्वेषण | [ S. 460 (c) ] |
| inquiry | चौकशी | [ S. 2 (g) ] |
| interrogatories | परिप्रश्न | [ S. 287 (1) ] |
| irregularities | गैरनियम बाबी | [ S. 460-m.n. ] |
| irregular proceedings | गैरनियम कार्यवाही | [ Ch. XXXV-heading ] |
| inspection officer | निरीक्षण अधिकारी | [ S. 339 (2) ] |
| instruct | माहिती देऊन नेमणे | [ S. 301 (2) ] |
| interpose | हस्तक्षेप करणे | [ S. 149 ] |
| interprete (to) | भाषांतर करून सांगणे | [ S. 278 (3) ] |
| interpreter | दुभाषी | [ S. 282-m.n. ] |
| intimation | सूचना | [ S. 174 (1) ] |
| invalid | विधिबाह्य | [ S. 395 (1) ] |
| investigation | अन्वेषण | [ S. 2 (h) ] |
| issue | वादप्रश्न | [ S. 287 (1) ] |
| jail | तुरुंग | [ S. 266 (b) (i)] |
| jailor | तुरुंगाधिकारी | [ S. 420 ] |
| joinder of charges | दोषारोपांचे संयोजन | [ Ss. 218 to 224-heading ] |
| judgement of acquittal | दोषमुक्तीचा न्यायनिर्णय | [ S. 305 (5) ] |
| judicial officer | न्यायिक अधिकारी | [ S. 189 ] |
| judicial proceeding | न्यायिक कार्यवाही | [ S. 2 (i) ] |
| just or lawful ground | न्याय्य किंवा कायदेशीर आधार-कारण | [ S. 220-ill (f)] |
| juveniles | बालगुन्हेगार | [ S. 27-m.n. ] |
| keeper (of jail) | तुरुंगरक्षक | [ Second Sch.-Form No. 51 ] |
| kidnapping | अपनयन | [ S. 110 (d) ] |
| knowingly | समजूनसवरून | [ S. 344 (1) ] |
| lawful charge | कायदेशीर रक्षणभार | [ S. 98] |
| lawful custody | कायदेशीर हवालात | [ S. 41 (1) (e) ] |
| libellous | बदनामीकारक | [ S. 455-m.n. ] |
| local investigation | स्थानिक अन्वेषण | [ S. 139-m.n. ] |
| local jurisdiction | स्थानिक अधिकारिता | [ S. 2 (j) ] |
| lunatic | वेडा | [ S. 198 (1)-proviso (a) ] |
| lunatic asylum | पागलखाना | [ S. 330-proviso ] |
| lurking house-trespass | चोरटे गृह-अतिक्रमण | [ S. 39 (1) (xi) ] |
| make absolute | कायम करणे | [ S. 138 (2) ] |
| make a complaint | फिर्याद देणे | [ S. 198 (1)-proviso (a) ] |
| make arrangement | ठराव करणे | [ S. 285 (3) ] |
| make over | १. वर्ग करणे | [ S. 306 (5) (b) ] |
| | २. सोपवणे | [ S. 200 (b) ] |
| make out a case (against one) | (एखाद्या व्यक्तीविरुद्ध) तथ्य शाबित करणे | [ S. 245 (1) ] |

| | | |
|---|---|---|
| manifestly | उघडउघड | [S. 131] |
| material error | महत्वाची चूक | [S. 215-ill. (c)] |
| material witness | महत्वाचा साक्षीदार | [S. 311-m.n.] |
| make to appear | निदर्शनास आणून देणे | [S. 210 (1)] |
| medical witness | वैद्यकीय साक्षीदार | [S. 291-m n.] |
| memorandum of arguments | युक्तिवादाचें टिप्पण | [S. 314-m.n.] |
| memorandum of the substance | सारांशाचे टिप्पण | [S. 274 (1)] |
| merchandise | व्यापारी माल | [S. 133 (b)] |
| metropolitan area | महानगर क्षेत्र | [S. 2 (k)] |
| misappropriation | अपहार | [S. 320 (2)-Table] |
| minor offence | गौण अपराध | [S. 222 (1)] |
| mischief | आगळीक | [S. 106 (2) (b)] |
| motion | चालना-अर्ज | [S. 406 (2)] |
| move the court | न्यायालयाकडे विनंतीअर्ज करणे | [S. 321-last para.] |
| non-bailable offence | बिनजामिनी अपराध | [S. 2 (a)] |
| non-cognizable offence | बिनदखली अपराध | [S. 2 (1)] |
| non-commissioned officer | अराजादिष्ट अधिकारी | [S. 132 (3) (b)] |
| narrative | हकीकत | [S. 275 (3)] |
| notary | लेखप्रमाणक | [S. 297 (1) (c)] |
| objector | हरकतदार | [S. 84 (1)] |
| obviate | निवारण करणे | [S. 142 (1)] |
| occupant | ताबाधारक | [S. 100 (6)] |
| offence | अपराध | [S. 2 (n)] |
| offensive weapons | मारक हत्यारे | [S. 52] |
| offer oneself as a witness | साक्षीदार म्हणून पुढे होणे | [S. 315 (2)] |
| officer in charge of a police station | पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकारी | [S.2 (o)] |
| officer of police | पोलिसातील अधिकारी | [S. 173 (3)] |
| of right | हक्काने | [S. 303] |
| of sound mind | निकोप मनाचा | [S. 333-m.n.] |
| of unsound mind | मनोविकल | [Ch. XXV-heading] |
| omission | अनुल्लेख | [S. 215-ill. (b)] |
| on probation of good conduct | परिवीक्षाकाळात चांगले वर्तन ठेवण्याच्या शर्तीवर | [S. 360-m.n.] |
| open one's case | प्रारंभिक कथन करणे | [S. 226-m.n.] |
| operation | प्रवर्तन | [S. 218 (2)] |
| operative part | प्रवर्ती भाग | [S. 353 (1) (c)] |
| order or sentence under appeal | अपीलाधीन आदेश किंवा शिक्षादेश | [S. 386 (e)-second proviso] |
| overrule | अधिशून्य करणे | [S. 404] |
| own bond | जातमुचलका | [S. 59] |
| pardon | माफी देणे | [S. 306 (1)] |
| particular cases | विशिष्ट खटले | [S. 13 (1)] |
| pass a sentence | शिक्षा ठोठावणे | [S. 235 (2)] |
| peremptory order | अलंघनीय आदेश | [Second Sch.Form No. 21] |

| | | |
|---|---|---|
| period of limitation | मुदत मर्यादा | [S. 467] |
| persistently | हेकेखोरपणाने | [S. 317 (1)] |
| persist in one's refusal | नकाराचा हेका चालू ठेवणे | [S. 349] |
| person | देह | [S. 198 (3)] |
| personally work for gain | कमाईसाठी जातीने काम करणे | [S. 69 (1)] |
| peruse | अवलोकन करणे | [S. 145 (4)] |
| petition of appeal | अपील विनंती अर्ज | [S. 382-m.n.] |
| petty case | क्षुल्लक खटला | [S. 376-m.n.] |
| petty offence | क्षुल्लक अपराध | [S. 206 (2)] |
| petty officer | पेटी ऑफिसर | [S. 132 (3) (b)] |
| plead | प्रतिकथन करणे | [S. 308 (3)] |
| pleader | वकील | [S. 2 (q)] |
| plead guilty to the charge | दोषारोपाबाबत अपराधीपणाची कबुली देणे | [S. 206 (1)] |
| plea of guilty | अपराधीपणाची कबुली | [S. 241] |
| point of law | कायदेविषयक मुद्दा | [S. 234-proviso] |
| police report | पोलीस अहवाल | [S. 2 (r)] |
| police station | पोलीस ठाणे | [S. 2 (s)] |
| possess | कब्जा असणे | [S. 145 (4)] |
| posting | पदस्थापन | [S. 9-expl.] |
| powers of revision | पुनरीक्षणाच्या शक्ती | [S. 106 (4)] |
| preclude | प्रत्यवाय करणे | [S. 145 (5)] |
| predecessor-in-office | पदीय पूर्वाधिकारी | [S. 144 (5)] |
| preliminary inquiry | प्रारंभिक चौकशी | [S. 159 -m.n.] |
| preliminary investigation | प्रारंभिक अन्वेषण | [S. 196 (3)] |
| presiding judge | पीठासीन न्यायाधीश | [S. 276 (1)] |
| principal | १. म्होरक्या | [S. 306 (1)] |
| | २. प्रकर्ता | [Second Sch.-Form No. 52] |
| principal officer | प्रधान अधिकारी | [S. 63] |
| prison | कारागृह | [S. 266 (b)] |
| privy to | (—) मध्ये सहभागी | [S. 306 (1)] |
| process | १. कार्यवाही | [S. 482] |
| | २. आदेशिका | [Chap. VI-heading] |
| proclaimed offender | उद्घोषित अपराधी | [S. 40 (1) (b)] |
| proclamation | उद्घोषणा | [S. 82-m.n.] |
| pronounce | अधिघोषित करणे | [S. 216 (1)] |
| property-mark | स्वामित्व-चिन्ह | [S. 211-ill. (c)] |
| propriety | औचित्य | [S. 397 (1)] |
| prosecute | फिर्याद चालवणे | [Second Sch.-Form No. 29] |
| prosecute or give evidence | फिर्याद चालवणे किंवा साक्षीपुरावा देणे | [S. 170 (2)] |
| prosecution | फिर्यादीपक्ष | [S. 232] |
| prosecutor | फिर्यादी | [S. 216 (3)] |
| provide against | —चा बंदोबस्त करणे | [Second Sch.-Form No. 22] |

| | | |
|---|---|---|
| provision of sureties | जामीनदार देणे | [ S. 116 (3)-proiso (b) ] |
| provoke a breach of the peace | शांतताभंग घडवून आणणे | [ S. 260 (1) (vi) ] |
| public justice | सार्वजनिक न्याय | [ S. 195-m.n. ] |
| public nuisance | सार्वजनिक उपद्रव | [ Chap. X-B ] |
| public order | सार्वजनिक सुव्यवस्था | [ Chap. X-heading ] |
| public peace | सार्वजनिक शांतता | [ S. 129 (1) ] |
| public place | सार्वजनिक स्थळ | [ S. 133 (2)-expl. ] |
| public prosecutor | सरकारी अभियोक्ता | [ S. 301 (1) ] |
| public servant | लोकसेवक | [ S. 295 ] |
| public tranquillity | सार्वजनिक प्रशांतता | [ S. 107 (1) ] |
| purport to act | (तसे) म्हणून कार्य करणे | [ S. 200 (a) ] |
| purport to be | (तसे) असल्याचे दिसणे | [ S. 293 (1) ] |
| put in evidence | पुराव्यादाखल मांडणे | [ S. 313 (4) ] |
| quash | निरस्त करणे | [ S. 464 (2) (b) ] |
| question of law | विधिप्रश्न | [ S. 407 (1) (b) ] |
| read in evidence | पुराव्यादाखल वाचणे | [ S. 288 (1) ] |
| read out | वाचून दाखवणे | [ S. 236-proviso ] |
| rebut | खंडन करणे | [ S. 245 ] |
| recall | १. पुन्हा बोलावणे | [ S. 217-m.n. ] |
| | २. परत मागवणे | [ S. 409 (1) ] |
| receive as evidence | पुराव्यात दाखल करून घेणे | [ S. 189 ] |
| receiver | प्रापक | [ S. 146-m.n. ] |
| recognizance | जातमुचलका | [ S. 360 (8) ] |
| reduce to writing | लेखनिर्विष्ट करणे | [ S. 162 (1) ] |
| reference | निर्देशन | [ S. 122 (4) ] |
| reformatory | सुधारालय | [ S. 266-(b) (ii) ] |
| registered medical practitioner | नोंदीववैद्यक व्यवसायी | [ S. 53 (1) ] |
| registered society | नोंदीव सोसायटी | [ S. 305-m.n. ] |
| regularity | नियमानुसारिता | [ S. 397 (1) ] |
| release | बंधमुक्त करणे | [ S. 118 ] |
| released convict | बंधमुक्त सिद्धदोषी | [ S. 41 (1) (h) ] |
| remand | हवालातीत परत पाठविणे | [ S. 269 (b) ] |
| remand (a person) to prison | (एखाद्या व्यक्तीला) तुरुंगात परत पाठवणे | [ S. 123 (7) ] |
| remission | माफी | [ Chap. XXXII-heading ] |
| rents | भाडे उत्पन्न | [ S. 145 (2) ] |
| report | अहवाल | [ S. 140 (2) ] |
| require | अधिकारपूर्वक मागणी | [ S. 129 (2) ] |
| requirement | दंडक | [ S. 305 (3) ] |
| requisitation | फर्मान | [ S. 161 (1) ] |
| rescue | अवैधपणे सोडवणे | [ S. 60 ] |
| resort | राबता | [ S. 40 (1) (b) ] |
| respectable inhabitant | प्रतिष्ठित रहिवासी | [ S. 174 (1) ] |
| restrain | निरुद्ध करणे | [ S. 320-Table ] |
| restraint | निर्बंध घालणे | [ S. 171-m.n. ] |

| | | |
|---|---|---|
| re-summon | पुन्हा समन्स पाठवणे | [S. 217 (a)] |
| return | n. प्रतिवेदन | [S. 290 (1)] |
| | vb. प्रतिवेदनासह परत करणे | [S. 430-m.n.] |
| ruler | संस्थानाधिपति | [S. 484 (2) (d)] |
| run concurrently | समवर्तीपणे चालू राहणे | [S. 31 (1)] |
| robber | जबरी चोर | [S. 40 (1) (b)] |
| sanitary or recreative purpose | आरोग्यविषयक किंवा विहार-विषयक प्रयोजन. | [S. 133 (2)-expl.] |
| scandalous | अपप्रवादात्मक | [S. 297 (3)] |
| search-warrant | झडती-वॉरंट | [S. 105 (d)] |
| security | जामीन | [S. 71-m.n.] |
| seditious matter | प्रजाक्षोभक साहित्य | [S. 108-m.n.] |
| seize | अभिग्रहण करणे | [S. 102-m.n.] |
| seizure | अभिग्रहण | [S. 102 (2)] |
| sentence | न्यायनिर्णय | [S. 195 (4)] |
| send for trial | संपरीक्षेसाठी पाठवणे | [S. 324 (1)] |
| Serologist to the Government | शासनाचा रक्तजलशास्त्रज्ञ | [S. 293 (4) (f)] |
| set aside | रद्द ठरवणे | [S. 96-m.n.] |
| special leave to appeal | अपील करण्यास विशेष अनुज्ञा | [S. 415 (3)] |
| special summons | विशेष समन्स | [S. 206-m.n.] |
| spot | घटनास्थळ | [S. 157 (1)] |
| state a case | प्रकरणाचे परिकथन करणे | [S. 395 (1)] |
| statement | १. जबाब | [S. 207 (iii)] |
| | २. निवेदन | [S. 267 (3)] |
| stay | स्थगित करणे | [S. 407 (6)] |
| strike out | काढून टाकणे | [S. 297 (3)] |
| subject to speedy and natural decay | जलद व स्वभावतः नाश पावणारी | [S. 85 (1)] |
| submission | सादर निवेदन | [S. 234-proviso] |
| submission to the order or requisition | आदेशाला किंवा मागणीला मान देणे | [S. 348] |
| suppress | आळा घालणे | [Second Sch. Form No. 20] |
| substantive sentence | मूळ शिक्षा | [S. 30 (1) proviso (b)] |
| sufficient means | पुरेशी ऐपत | [S. 125 (1)] |
| summary dismissal | विनासोपस्कार खारीज करणे | [S. 384 m.n.] |
| summary trial | संक्षिप्त संपरीक्षा | [Chap. XXI-heading] |
| summons-case | समन्स-खटला | [S. 2 (w)] |
| sum up (one's) case | (एखाद्याची) बाजू संक्षेपाने मांडणे | [S. 234] |
| superior Court | वरिष्ठ न्यायालय | [S. 341 (1)] |
| suspected persons | संशयित व्यक्ती | [S. 109-m.n.] |
| suspension | निलंबन | [Chap. XXXII-heading] |
| suspicious circumstances | संशयास्पद परिस्थिती | [S. 40 (1) (d)] |
| table | तक्ता | [S. 320 (1)] |
| take order with | (—चा) बंदोबस्त करणे | [S. 144 (1)] |

इंग्रजी–मराठी शब्दसूची—चालू

| | | |
|---|---|---|
| tender of pardon | माफी देऊ करणे | [ S. 306-m.n ] |
| theft | चोरी | [ S. 39 (vi) ] |
| the state | देश | [ S. 39 (1) (i) ] |
| thug | ठग | [ S. 40 (9) (b) ] |
| to one's care and custody | (–च्या) हवाली | [ S. 339 (1) ] |
| trade | उदीम | [ S. 133 (b) ] |
| tranquillity | प्रशांतता | [ Chap. X-heading ] |
| transaction | संव्यवहार | [ S. 215 ill. (b) ] |
| transcript | अनुलिपि | [ S. 353 (2) ] |
| transfer (a case) | (खटला) वर्ग करणे | [ S. 406-n.m. ] |
| transmission | पुढे रवाना करणे | [ S. 285 (3) ] |
| tribunal | अधिकरण | [ S. 475 (1) (b) ] |
| trivial nature | क्षुल्लक स्वरूप | [ S. 360 (3) ] |
| true translation | यथार्थ अनुवाद | [ S. 276 (1) ] |
| try summarily | संक्षेपतः संपरीक्षा करणे | [ S. 260-m.n. ] |
| try the fact | तथ्यांबाबत संपरीक्षा करणे | [ S. 329 (1) ] |
| under custody | बंदोबस्तात | [ S. 170 (1) ] |
| under one's charge | (–च्या) अखत्याराखालील | [ S. 73 (2) ] |
| under the seal of | (–च्या) मोहोरेनिशी | [ S. 305 (2) ] |
| union | संघराज्य | [ S. 41 (1) (f) ] |
| unit | पथक | [ S. 475 (1) (a) ] |
| unlawful assembly | बेकायदेशीर जमाव | [ Chap. X-heading ] |
| unlawful obstruction or nuisance | बेकायदेशीर अडथळा किंवा उपद्रव | [ S. 133 (a) ] |
| unpublished official records | अप्रकाशित अधिकृत अभिलेख | [ S. 292 (3) (a) ] |
| vacate | विलोपित करणे | [ S. 116 (6) ] |
| visible representation | दृश्य प्रतिरूपण | [ S. 95 (2) (b) ] |
| visit | प्रसंगवशात येणे | [ S. 144 (3) ] |
| visitors | वीक्षक | [ S. 337 ] |
| vitiate | रद्दबातल करणे | [ S. 460-m.n. ] |
| voluntarily causing hurt | इच्छापूर्वक दुखापत करणे | [ S. 300-ill. (d) ] |
| want of form | प्रारूपविषयक उणीव | [ S. 466 ] |
| warrant | n. वॉरंट | [ S. 2 (x) ] |
| vb. (as, one's conviction) | समर्थनीय करणे | [ S. 245 (1) ] |
| warrant-case | वॉरंट-खटला | [ S. 2 (x) ] |
| warrant of commitment | हवालातनामा | [ S. 298 (b) ] |
| wearing-apparel | पेहेरावयाचे कपडे | [ S. 51 (1) ] |
| wilfully | बुद्धिपुरस्सर | [ S. 344 (1) ] |
| withdraw | काढून घेणे | [ S. 409 (1) ] |
| withdrawal from prosecution | खटल्यातून अंग काढून घेणे | [ S. 321-m.n. ] |
| within or without | आत किंवा बाहेर | [ S. 141 (2) ] |
| with or without sureties | जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना | [ S. 107 (1) ] |
| write of attachment | जप्ती-प्राधिलेख | [ S. 466 ] |
| written statement | कैफियतपत्र | [ S. 233 (2) ] |
| wrongful act | गैरकृत्य | [ S. 107 (1) ] |
| wrongfully confine | गैरपणे परिरुद्ध करणे | [ S. 97-m.n. ] |
| youthful offender | अल्पवयीन अपराधी | [ S. 27 ] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

# Maharashtra Government Publications can be obtained from—

- THE DIRECTOR
  GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS
  Maharashtra State
  Netaji Subhash Road, MUMBAI 400 004.
  Phone : 363 26 93 363 06 95
  363 11 48 363 40 49

- THE MANAGER
  GOVERNMENT PHOTOZINCO PRESS AND BOOK DEPOT
  Photozinco Press Area, Near G.P.O.
  PUNE 411 001.
  Phone 66 88 59

- THE MANAGER
  GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT
  Civil Lines
  NAGPUR 440 001.
  Phone 52 26 15

- ASSTT. DIRECTOR
  GOVERNMENT STATIONERY, STORE AND BOOK DEPOT
  Shaha Ganj, Near Gandhi Chowk
  AURANGABAD 431 001.
  Phone 33 14 68

**AND THE RECOGNISED BOOKSELLERS**